सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

### राज्य प्रशिक्षण धोरण अंतर्गत

# मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांचे बदलीनंतरचे प्रशिक्षण

**दि. २० ते २२ मार्च २०२४**
**बाएफ, वारजे, पुणे.**

## वाचन संदर्भ पुस्तिका




ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११ ०३०.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन




## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

राज्य प्रशिक्षण धोरण अंतर्गत

# मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांचे बदलीनंतरचे तांत्रिक प्रशिक्षण

दि. २० ते २२ मार्च, २०२४

# वाचन संदर्भ पुस्तिका

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११ ०३०.

**वाचन संदर्भ पुस्तिका**


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **प्रेरणा** : **मा. रनजीत सिंह देओल (भा.प्र.से.)**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य.
- **मार्गदर्शन** : **मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.)**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **संपादक** : **मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **सहसंपादक** : **डॉ. शोभा खंदारे**
  उपसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **रमाकांत काठमोरे**
  उपसंचालक, मानव संसाधन विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

  **बसवेश्वर किल्लेदार**
  उपविभाग प्रमुख (सी.पी.डी विभाग),
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

  **अरुण जाधव**
  वरिष्ठ अधिव्याख्याता,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वेळापूर, जि. सोलापूर.
- **संपादन साहाय्य** : **स्वाती वनारसे**
  लघुलेखक (सी.पी.डी विभाग),
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

  **सुनील आदिक**
  पदवीधर शिक्षक,
  जि. प. उच्च प्राथ. शाळा, वसूसायगाव, जि. छत्रपती संभाजीनगर.
- **प्रथम आवृत्ती** : मार्च २०२४
- **अर्थसाहाय्य** : राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.



- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# वाचन संदर्भ पुस्तिका

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग – संरचना व कार्यासन | १ |
| २. | शालेय शिक्षण विभाग – क्षेत्रीय कार्यालये | ८ |
| ३. | महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण – २०११ | ४९ |
| ४. | राज्याचे क्रीडा धोरण – २०१२ | ६३ |
| ५. | बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम – २००९ | १०३ |
| ६. | शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकातील २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया | १२८ |
| ७. | प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम (प्राथ./माध्य.) निपुण भारत | १३५ |
| ८. | सरल प्रणाली | १८९ |
| ९. | स्वयं–अर्थसहाय्यित शाळा अधिनियम २०१२ | २०० |
| १०. | महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७ | २१४ |
| ११. | प्रशिक्षणाची परिणामकारकता | २२४ |
| १२. | शाळा भेट – वर्ग भेट | २२८ |
| १३. | पीएम श्री. योजना | २३० |
| १४. | महाराष्ट्रातील वाचन चळवळ | २३६ |
| १५. | विद्या समीक्षा केंद्र (VSK) रचना व कार्यपद्धती | २४१ |
| १६. | प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना | २४६ |
| १७. | महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई | २५३ |
| १८. | महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | २५५ |
| १९. | महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषा धोरण | २५७ |
| २०. | राज्य शाळा मानक प्राधिकरण | २६७ |
| २१. | संच मान्यता | २७३ |
| २२. | भारताचे संविधान | २८१ |

# १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग - संरचना व कार्यासन

**प्रस्तावना :**

मनुष्यबळ विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून 'शिक्षण' ही बाब अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. ६ ते १४ वयोगटाच्या सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण पुरविणे हे शासनाचे घटनात्मक दायित्व आहे. महाराष्ट्र शासनाच्या या विभागाकडून भविष्यात उज्वल पिढी घडविण्याकरिता तसेच आर्थिक, सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने शैक्षणिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता विविध उपक्रम राबविण्यात येतात. राज्यशासनाचा, एकूण वित्तीय महसूल खर्चापैकी १/६ भाग सर्वसाधारण शिक्षणावर खर्च होतो.

राज्यामध्ये शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व विकास होण्याच्या दृष्टीने शासनाने क्रीडा व युवक सेवा संचालनालय असे स्वतंत्र संचालनालय स्थापन केले आहे. यामार्फत विविध क्रीडा व युवक कल्याण विषयक कार्यक्रम राबविण्यात येतात.

**प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण :**

राज्यातील ६ ते १४ वयोगटाच्या सर्व मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण पुरविण्याच्या उद्‌देशाने ''सर्व शिक्षा अभियान'' हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम शासनाकडून राबविण्यात येतो. सदर उपक्रम राबविण्याकरिता प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई ही स्वतंत्र स्वायत्त संस्था निर्माण केली आहे. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार वेगाने झाल्यामुळे राज्यात माध्यमिक शिक्षणाचा विस्तारही मोठ्या प्रमाणात झालेला आहे. राज्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा प्रामुख्याने खाजगी संस्थांकडून चालविल्या जातात. सन १९७२-७३ पासून राज्यात १०+२+३ हा शैक्षणिक आकृतिबंध सुरू करण्यात आला असून +२ स्तरावरील कनिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यात आलेली आहेत.

**क्रीडा व युवक कल्याण :**

राज्य शासनाच्या शिक्षण प्रणालीमध्ये शारीरिक शिक्षण, क्रीडा व युवक सेवा यांचा समावेश आहे. क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी जुलै १९७० मध्ये क्रीडा व युवक सेवा संचालनालयाची स्थापना करण्यात आली आहे. या संचालनालयामार्फत राज्याच्या क्रीडा विषयक धोरणांची अंमलबजावणी करण्यात येते.

क्रीडा शारीरिक शिक्षण व युवक कल्याण विषयक उपक्रमांबाबत जागृती निर्माण व्हावी, राज्यात क्रीडा संस्कृतीचा वारसा जपला जाऊन त्याचे संवर्धन याकरिता क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी १५ जुलै, १९७० रोजी क्रीडा व युवक सेवा या स्वतंत्र संचालनालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा या प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली संचालनालय कार्यान्वित आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे मुख्यालय मध्यवर्ती प्रशासकीय इमारत पुणे येथे असून मुंबई, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, लातूर या आठ विभागाच्या ठिकाणी विभागीय उपसंचालक कार्यालये, ३५ जिल्ह्यांच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालये व १०० तालुक्यांमध्ये तालुका क्रीडा अधिकारी कार्यालये कार्यरत आहेत.

**विभागाची उद्‌दिष्टे :**

शालेय शिक्षण व क्रीडा क्षेत्रामध्ये खालील उद्‌दिष्टांची पूर्तता करण्यास शासन कटिबद्‌ध आहे.

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ ची अंमलबजावणी.

२) प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावून त्यामध्ये जीवनोपयोगी शिक्षणाचा समावेश करणे.

३) सर्व मुला–मुलींचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे.

४) शाळांतील विद्यार्थ्यांची गळती कमी करून १०० टक्के उपस्थितीचे उद्दिष्ट साध्य करणे.

५) ६ ते १४ वयोगटातील शाळा सोडलेली/शाळेत कधीच न गेलेली, स्थलांतरित मुलांकरिता पर्यायी शिक्षणाचे उपक्रम राबविणे.

६) विशेष गरजा असलेल्या मुलांना शिक्षणाची समान संधी व सहभाग मिळवून देणे.

७) मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी विशेष कार्यक्रम राबविणे.

८) शैक्षणिक विकासासाठी असलेल्या केंद्राच्या व राज्याच्या पुढील योजना राज्यात प्रभावीपणे राबविणे.

अ) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान.

ब) सर्व शिक्षा अभियान योजना.

क) शालेय पोषण आहार योजना.

ड) भाषिक/धार्मिक अल्पसंख्याकासंबंधीच्या शैक्षणिक योजना. तसेच मदरसा आधुनिकीकरण योजना.

फ) Information & Communication Technology (ICT) योजना.

ग) मोफत गणवेश वाटप योजना.

घ) मोफत पाठ्यपुस्तक वाटप योजना.

च) राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना.

छ) राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या व राज्य शासनातर्फे राबविण्यात येणारी शुल्क माफी योजना.

९) राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक सवलती.

१०) U-DISE शालार्थ प्रणाली

११) शैक्षणिक शुल्क कायद्याची अंमलबजावणी.

१२) शाळांच्या अनुदान विषयक बाबी

१३) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, प्रशिक्षण धोरण.

१४) राज्याचे क्रीडा धोरण, युवक कल्याण विषयक बाबी, युवा धोरण.

१५) क्रीडा विषयक पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता विभाग/जिल्हा/तालुका स्तरावर क्रीडा संकुले उभी करणे.

१६) युवक सेवा व युवक कल्याण विषयक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

**विभागाची रचना :**

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन स्तरावरील प्रशासनिक विभागाकडून मुख्यत्वेकरून धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यात येतो. शासन स्तरावर विभागाचे मंत्री यांचेबरोबर प्रशासनिक नियंत्रणाकरिता प्रधान सचिव/सचिव हे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी कार्यरत आहेत. त्यांच्या अधिपत्याखाली विभागाकडे सहसचिव/उपसचिव, अवर सचिव/कक्ष अधिकारी व इतर सहायक कर्मचारीवृंद कार्यरत आहे. याबाबतचा तक्ता सोबत जोडला आहे.

## शालेय शिक्षण व क्रीडा विभागाची रचना दर्शविणारे विवरण पत्र १–

### शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (खुद्द) मंत्रालय,

**मंत्री**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**प्रधान सचिव/ सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई**

**सहसचिव (प्रशा)**
- प्रशा–१
- प्रशा–२
- प्रशा–३
- प्रशा–५
- लेखा शाखा
- नोंदणी शाखा

**उपसचिव (विद्यार्थी विकास)**
- एसडी–१
- एसडी–२
- एसडी–३
- एसडी–४
- एसडी–५
- एसडी–६

**उपसचिव (शिक्षक व शिक्षकेतर)**
- टिएनटी–१
- टिएनटी–२
- टिएनटी–३
- टिएनटी–४
- टिएनटी–५
- टिएनटी–६

**उपसचिव (शाळा व्यवस्थापन)**
- एसएम–१
- एसएम–२
- एसएम–३
- एसएम–४
- एसएम–५
- एसएम–६

**उपसचिव (क्रीडा अर्थसंकल्प समन्वय व नावीन्यपूर्ण बाबी)**
- क्रीयुसे–१
- क्रीयुसे–२
- क्रीयुसे–३
- प्रशिक्षण
- अर्थसंकल्प
- संगणक कक्ष
- समन्वय

**उपसचिव (विधी)**

शासन स्तरावर महत्त्वाचे निर्णय/धोरणात्मक बाबी हाताळण्यात येतात. मात्र योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी क्षेत्रीय कार्यालयातील विभाग प्रमुख व त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत होते. विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय स्तरावरील विभाग प्रमुखांची कार्यालये पुढीलप्रमाणे आहेत.

**आयुक्त शिक्षण :**

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) संचालक (अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) संचालक महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.

५) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

७) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे.

८) संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद.

**कार्यपूर्तीचे वेळापत्रक :**

विभागाच्या महत्त्वाच्या योजना व धोरणात्मक बाबींवर शासन स्तरावर निर्णय घेण्यात येतात. विभागाच्या विविध उद्दिष्टांची पूर्तता करण्याकरिता उपरोक्त क्षेत्रीय कार्यालयांकडून व त्यांच्या अधिपत्याखालील प्रादेशिक व निम्नपातळीवरील कार्यालयांकडून विविध योजना/उपक्रम राबविण्यात येतात. या उपक्रमाची माहिती व त्याबाबतच्या कार्यपूर्ती वेळापत्रकाचा समावेश क्षेत्रीय कार्यालयातील नागरिकांच्या सनदेमध्ये स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येत आहे. विभागाच्या स्तरावरील कामकाजाबाबत विवरणपत्र-३ मध्ये माहिती देण्यात आली आहे.

**माहितीची सुलभता :**

आधुनिक काळाची गरज म्हणून विभागाची तसेच क्षेत्रीय कार्यालयाची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. विभागाच्या कामाची प्रचंड व्याप्ती विचारात घेता काही विभाग प्रमुखांनी यापूर्वीच आपली माहिती/उपक्रम संकेत स्थळावर प्रसिद्ध केले आहेत.

## शालेय शिक्षण व क्रीडा विभागातील क्षेत्रीय कार्यालय प्रमुख

### विवरणपत्र – २

### आयुक्त (शिक्षण)

- शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
- शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
- संचालक (प्रौढ शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे. निरंतर शिक्षण
- संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे.
- अध्यक्ष महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
- अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
- संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

### क्रीडा विभागाचे क्षेत्रीय विभाग प्रमुख

संचालक,
क्रीडा व युवक सेवा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : इएसटी २०१३/(४४९/१३)/भाग-१/प्रशा-१**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १३ एप्रिल, २०१६.

**वाचा : १) शासन निर्णय क्र.इएसटी २०१३/(१९५/१३)/प्रशा-१, दि.१७.१०.२०१३**
**२) शासन परिपत्रक क्र. इएसटी २०१३/(४४९/१३)/प्रशा-१, दि.२२ सप्टेंबर, २०१४**

**शासन परिपत्रक :**

संदर्भाधीन दि. १७ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयानुसार शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रचलित कामकाजाच्या रचनेमध्ये मूलभूत बदल करण्यात आले आहेत. त्यामध्ये विभागातील ५ सहसचिव/उपसचिवांमध्ये (१) विद्यार्थी विकास (२) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी (३) शाळा व्यवस्थापन (४) प्रशासन आणि क्रीडा (५) अर्थसंकल्प या संकल्पनेप्रमाणे कामकाजाचे वाटप करण्यात आले आहे. तद्नंतर संदर्भाधीन दि. २२ सप्टेंबर, २०१४ च्या परिपत्रकान्वये सदर विषयसूचीमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. तथापि दि. २२.९.२०१४ रोजी निर्गमित केलेल्या विषयसूचीमधील काही विषय कोणत्या कार्यासनाने हाताळावे या संदर्भात कार्यासनांमध्ये संभ्रम आहे, काही विषय कोणत्याही कार्यासनाकडे सोपविण्यात आलेले नाहीत. तसेच काही कार्यासनांकडे अतिशय जास्त प्रमाणात काम व काही कार्यासनांकडे तुलनात्मकदृष्ट्या कमी कामकाज अशा बाबी निदर्शनास आल्यामुळे विषयसूचीमध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता विभागाच्या विषयसूचीमध्ये अंशत: बदल करण्यात येत आहेत. विषयसूची संदर्भातील यापूर्वीचे सर्व आदेश व परिपत्रके अधिक्रमित करून विभागाची विषयसूची सोबत जोडल्यानुसार अंतिम करण्यात येत आहे.

अद्याप काही कार्यासनांनी विषयसूचीमध्ये बदल केल्यानंतर नस्तींचे हस्तांतरण त्या त्या संबंधित कार्यासनांना केले नसल्याचे निदर्शनास येते. अंतिम विषयसूचीनुसार ज्या कार्यासनांच्या विषयांमध्ये बदल झालेला आहे त्या कार्यासनांनी तातडीने संबंधित नस्तींचे हस्तांतरण संबंधित कार्यासनास करावे. तसेच प्रशा-३ कार्यासनाकडील गोपनीय कक्षाच्या कामकाजाचे विभाजन झाले असल्यामुळे गोपनीय लिपीक/गोपनीय सहायक यांची सेवा प्रशा-१ कार्यासनाकडे दर्शविण्यात येत आहे. मात्र सदर गोपनीय लिपीक/सहायक यांचे कामकाज त्या त्या विषयानुसार अवर सचिव प्रशा-१ व कक्ष अधिकारी प्रशा-२ यांच्या नियंत्रणाखाली राहील. सदर आदेश मार्च २०१६ चे अर्थसंकल्पिय अधिवेशन संपल्यानंतर अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(र. प्र. आटे)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग – विषयसूची २०१६

### विभागातील पर्यवेक्षीय अधिकारी आणि त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यासने

| अ.क्र. | पर्यवेक्षीय अधिकारी | नियंत्रणाखालील कार्यासने/कक्ष |
|---|---|---|
| १. | सहसचिव (प्रशासन) | प्रशा–१ |
| | | प्रशा–२ |
| | | प्रशा–३ |
| | | प्रशा–५ |
| | | लेखा शाखा |
| | | नोंदणी शाखा |
| २. | सहसचिव (विद्यार्थी विकास) एस. डी. | एसडी–१ |
| | | एसडी–२ |
| | | एसडी–३ |
| | | एसडी–४ |
| | | एसडी–५ |
| | | एसडी–६ |
| ३. | उपसचिव (शिक्षक व शिक्षकेतर) टी. एन. टी | टीएनटी–१ |
| | | टीएनटी–२ |
| | | टीएनटी–३ |
| | | टीएनटी–४ |
| | | टीएनटी–५ |
| | | टीएनटी–६ |
| ४. | उपसचिव (शाळा व्यवस्थापन) एस. एम. | एसएम–१ |
| | | एसएम–२ |
| | | एसएम–३ |
| | | एसएम–४ |
| | | एसएम–५ |
| | | एसएम–६ |
| ५. | उपसचिव (क्रीडा. अर्थसंकल्प व नावीन्यपूर्ण बाबी) | क्रीयुसे–१ |
| | | क्रीयुसे–२ |
| | | क्रीयुसे–३ |
| | | अर्थसंकल्प शाखा |
| | | समन्वय कक्ष |
| | | प्रशिक्षण कक्ष |
| | | संगणक |
| | | सांख्यिकी कक्ष |

❑❑❑

# २. शालेय शिक्षण विभाग - क्षेत्रीय कार्यालये

**१) शिक्षण आयुक्तालय :**

**आयुक्त शिक्षण पदाची निर्मिती :**

सर्व संचालकांमध्ये प्रभावीपणे समन्वय साधण्यासाठी व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी एकत्रितपणे उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनाने 'आयुक्त शिक्षण' हे पद निर्माण केले. सद्य:स्थितीत मंजूर आठ पदांपैकी 'संचालक राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था पुणे (बालचित्रवाणी)' या पदाचे रूपांतर 'आयुक्त शिक्षण' असे करण्यात आले आहे.

**आयुक्त (शिक्षण) कर्तव्ये अधिकार व जबाबदाऱ्या** :

सर्व संचालकांसह शालेय शिक्षण विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेच्या कामामध्ये उचित समन्वय साधणे, विभागाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाययोजना करणे या उद्देशाने शा. नि. क्र. संकीर्ण २४३१/प्र.क्र. ५०/१३/प्रशा ५ दि. **१८ नोव्हेंबर २०१३** व समक्रमांक **दि. ७ एप्रिल २०१४** अन्वये 'आयुक्त' (शिक्षण) हे पद निर्माण करण्यात आले आहे.

या पदावरील अधिकाऱ्यास प्रभावीपणे कामकाज करता यावे म्हणून सदर पदाच्या कर्तव्य, जबाबदाऱ्या अधिकाराबाबत शा.नि.क्र. इएसटी ३८१४ प्र. क्र. १२३  १४ प्रशा २ **दि. २ मे २०१४ अन्वये** खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

१. 'आयुक्त' (शिक्षण) हे शालेय शिक्षण विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेचा प्रमुख म्हणून काम करतील व सर्व प्रशासकीय व अर्थसंकल्पीय इ. बाबींवर नियंत्रण ठेवतील. त्याकरिता सद्य:स्थितीत संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्याकडे असलेले प्रशासकीय नियोजन व अर्थसंकल्पीय बाबींचे संपूर्ण कामकाज ते हाताळणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यासह आयुक्त (शिक्षण) यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे.

२. आयुक्त (शिक्षण) यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली काम करणाऱ्या सर्व संचालकांकडून शासनास पाठविण्यात येणारे प्रस्ताव यापुढे आयुक्तांमार्फत शासनास पाठविण्यात यावेत. उदाहरणार्थ शाळांचे मूल्यांकन व अनुदान मान्यता, बृहत आराखडा, पटपडताळणी, समायोजन, स्वयं अर्थसहाय्य कायद्यानुसार शाळा मान्यतेचे प्रस्ताव इत्यादी.

३. सर्व संचालकांच्या कामांमध्ये समन्वय साधणे ही बाब आयुक्त (शिक्षण) यांच्या कार्यकक्षेत असल्याने अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, तसेच अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आणि संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) पुणे यांनी ते शासनाशी करत असलेला पत्रव्यवहार आयुक्त शिक्षण यांच्यामार्फत करावा.

४. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ **(बालभारती)** पुणे व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था **(बालचित्रवाणी)** पुणे या संस्थेच्या नियामक मंडळात सदस्य म्हणून आयुक्त (शिक्षण) काम पाहतील. त्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही सदर संस्थेने करणे आवश्यक राहील.

५. उपरोक्त नमूद सर्व स्वायत्त संस्थांनी त्यांचे काम अधिक प्रभावी होण्यासाठी आयुक्त (शिक्षण) यांनी केलेल्या सूचना विचारात घेणे बंधनकारक राहील.

६. तथापि, संचालक काही विषयांबाबत शासनाशी थेट पत्रव्यवहार करू शकतील असे आयुक्तांचे मत असल्यास अशा विषयांबाबतचा निर्णय आयुक्त (शिक्षण) यांनी त्यांच्या स्तरावर स्वतंत्ररीत्या घेऊन त्याबाबतचे कार्यालयीन आदेश त्यांच्या स्तरावर वेळोवेळी निर्गमित करावेत.

७. **राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान** (RMSA) हा कार्यक्रम शिक्षण आयुक्तांच्या अधिपत्याखाली राहील. तसेच सर्व शिक्षण अभियानामध्ये थेट अंतर्भूत नसलेल्या **शालेय पोषण आहार** योजना, **आयसीटी योजना** तसेच **व्यावसायिक प्रशिक्षण** इत्यादी योजनांच्या अंमलबजावणीवर आयुक्तांचे नियंत्रण राहील.

८. या व्यतिरिक्त सद्य:स्थितीत शासन स्तरावर हाताळण्यात येणाऱ्या विषयांपैकी जे विषय यापुढे आयुक्त स्तरावर हाताळले जातील त्याबाबतची यादी खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे. या विषय सूचीनुसार आयुक्तांनी प्रचलित तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

१. **संचालक संवर्गातील** अधिकाऱ्यांच्या नैमित्तिक, अर्जित, परावर्तीत रजा मंजूर करणे. तसेच त्यांच्या सेवापुस्तकाचे जतन करणे, अद्ययावत नोंदी घेणे इ. परंतु असाधारण रजेबाबत प्रचलित नियमानुसार कार्यवाही करावी.

२. **संचालक संवर्गातील** अधिकाऱ्याची वेतननिश्चिती, वार्षिक वेतनवाढ मंजूर करणे, सेवानिवृत्तीविषयक प्रकरणे हाताळणे इत्यादी.

३. **संचालक संवर्गातील** अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदित करणे.

४. सहसंचालक संवर्गातील तसेच विभागीय उपसंचालक पदावरील अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल पुनर्विलोकित करणे. सहसंचालकाचे शासन निर्णय पुनर्विलोकन करणे.

५. गट ब अराजपत्रित, गट क व गट ड संवर्गातील पदोन्नतीचे मानीव दिनांक देणे.

६. राज्यातील गट अ व गट ब मधील अधिकाऱ्यांनी अतिरिक्त कार्यभार धारण **केल्याबद्दल दोन वर्षांपर्यंतचे विशेष वेतन** मंजूर करणे.

७. म. शि. से. गट क व ड मधील शासकीय कर्मचारी यांच्या सेवापुस्तकामध्ये सुरुवातीला नोंद केलेल्या जन्मतारखेत सेवेत प्रवेश केल्यापासून पाच वर्षांचे आत दुरुस्ती करण्यास परवानगी देणे.

८. सरळ सेवा प्रवेशाने नियुक्त झालेल्या म. शि. से. गट अ मधील ज्येष्ठ अधिव्याख्याता शिक्षणाधिकारी व तत्सम प्रशासन अधिकारी म. शि. से. गट व अधिव्याख्याता, उपशिक्षणाधिकारी व तत्सम प्रशासन अधिकारी म. शि. से. गट व अधीक्षक व तत्सम विधी अधिकारी गट ब यांची शासन सेवेत रुजू होण्यापूर्वीची सेवा **प्रचलित नियमानुसार निवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरणेस मान्यता देणे.**

९. सरळसेवा प्रवेशाने नियुक्त झालेल्या ज्येष्ठ अधिव्याख्याता, शिक्षणाधिकारी व तत्सम प्रशासन अधिकारी म. शि. से. गट ब अधिव्याख्याता, उपशिक्षणाधिकारी व तत्सम म. शि. से. गट ब अधीक्षक व तत्सम सा. रा. से. गट ब अधीक्षक व तत्सम विधी अधिकारी गट ब यांचे **वेतन संरक्षणाबाबत मंजुरी देणे.**

१०. पीठासीन अधिकारी, **शाळा न्यायाधिकरण** पदावरील अधिकाऱ्यांचे उपसंचालकांनी प्रतिवेदित केलेले गोपनीय अहवाल पुनर्विलोकित करणे. ११ जिल्ह्याय ११ न्यायाधिकरणे आहेत.

११. डी. टी. एड. प्रवेश रिक्त असलेल्या जागा भरण्याची परवानगी देणे.

१२. पत्राद्वारे डी. टी. एड. प्रवेशाकरिता **शेवटच्या** संधीला परवानगी देणे. (संपुष्टात)

१३. महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे येथील **अतिथी भवन व वसतिगृह** निवास शुल्क वाढीसंबंधी परवानगी देणे.

१४. अनुदानित/विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळेतील कला, वाणिज्य, विज्ञान या तुकड्यांच्या **माध्यम** बदलास परवानगी देणे.

१५. राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक चित्रपट दाखविण्यास परवानगी देणे.

१६. सरळसेवा प्रवेशाने नियुक्त झालेल्या ज्येष्ठ अधिव्याख्याता, शिक्षणाधिकारी व तत्सम प्रशासन अधिकारी म. शि. से. गट ब अधिव्याख्याता, उपशिक्षणाधिकारी व तत्सम म. शि. से. गट ब अधीक्षक व तत्सम सा. रा. से. गट ब अधीक्षक व तत्सम विधी अधिकारी गट ब यांचे वेतन संरक्षणाबाबत मंजुरी देणे.

१७. कन्या माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सहशिक्षणास परवानगी देणे.


१८. राज्यशासनाच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त राज्यात इतर अभ्यासक्रम चालविणाऱ्या शाळा उदा. सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई., जी.ई.एस., आय.बी. इत्यादींना सदर अभ्यासक्रम चालविण्यास **ना हरकत प्रमाणपत्र** देणे व त्यांच्या **नुतनीकरणास** मंजुरी देणे.

१९. शासकीय कर्मचारी इत्यादींना घर बांधणी/मोटार कार/**दुचाकी वाहन** व वैयक्तिक **संगणक खरेदीसाठी** अग्रिम मंजूर करणे.

२०. विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना असलेल्या थेट अधिकारांचा वापर योग्यरीतीने होतो किंवा कसे याबाबत संनियंत्रण करणे, त्यादृष्टीने त्यांच्या कार्यालयीन तपासण्या करणे.

## संरचना


### २) शिक्षण संचालनालय (प्राथमिक शिक्षण)




अ.ए.शि.यो. – अपंग एकात्म शिक्षण योजना      सा. रा. से. – सामान्य राज्य सेवा

## ३) शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक)

## रचना व कार्यपद्धती




## ४) निरंतर प्रौढ शिक्षण व अल्पसंख्याक संचालनालय

**प्रशासकीय यंत्रणा :**

कोणताही कार्यक्रम यशस्वी करावयाचा असेल तर त्यासाठी स्वतंत्र अशी प्रशासकीय यंत्रणा हवी. प्रौढ शिक्षणाच्या कार्यासाठी राज्य व जिल्हा स्तरावर अशी प्रशासकीय यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. या यंत्रणेद्वारे राज्यातील कार्यक्रमावर देखरेख व संनियंत्रण ठेवले जाते.

**अ) प्रौढ शिक्षण विभागाची रचना :**

सन १९७८ साली राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्या अनुषंगाने राज्यातील कार्यक्रमांची देखरेख, संनियंत्रण यांच्या गतिशील व प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र संचालनालयाची स्थापना शासन निर्णय क्रमांक एस.इ.एस./१८८७/४३००२/(१६४४)/१८ दिनांक १–१–१९७९ अन्वये झाली. केंद्र शासनाच्या ग्रामीण कार्यात्मक साक्षरता प्रकल्पासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हा प्रौढ शिक्षण कार्यालयांची स्थापना करण्यात आली.




वर नमूद केलेल्या प्रशासकीय यंत्रणेचे कार्य हे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या धोरणानुसार व महाराष्ट्र साक्षरता परिषदेच्या मार्फत चालते.

संपूर्ण साक्षरता अभियान, साक्षरोत्तर कार्यक्रम व निरंतर शिक्षण योजनेअंतर्गत राज्य शासनाने प्रौढ शिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी निर्माण केलेल्या पदांच्या सेवा साक्षरता कार्यक्रमांकडे वर्ग केल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने निरंतर शिक्षण केंद्र स्थापन करण्याची योजना कार्यान्वित करण्याबाबत शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक रासामि १०९०/१८/९६ साशि–६, दिनांक ३० डिसेंबर १९९७ अन्वये मान्यता दिलेली आहे. राज्य प्रौढ शिक्षण योजना, ग्रामीण कार्यात्मक साक्षरता योजना व केंद्र पुरस्कृत प्रशासकीय संरचनेचे प्रबलीकरण या योजनेअंतर्गत मंजूर असलेली जिल्हा स्तरावरील खालील पदे निरंतर शिक्षण योजनेकडे वर्ग केलेली आहेत. जिल्हा प्रौढ शिक्षण अधिकाऱ्यांच्या पदनामात 'शिक्षणाधिकारी' (निरंतर शिक्षण) आणि प्रकल्पाधिकाऱ्यांच्या पदनामात उपशिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) असा बदल केला आहे.

**ब) जिल्हास्तरीय पदे :**

| अ. क्र. | पदाचे नाव | संख्या श्रेणी |
|---|---|---|
| १) | शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) | १ |
| २) | उपशिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) | १ |
| ३) | कार्यक्रम सहायक | १ |
| ४) | सहायक प्रकल्प अधिकारी/पर्यवेक्षक (तालुका स्तरावर प्रत्येकी) | १ |
| ५) | वरिष्ठ लिपिक | १ |
| ६) | कनिष्ठ लिपिक | २ |
| ७) | लघुलेखक (निम्नश्रेणी) | १ |
| ८) | वाहनचालक | १ |
| ९) | शिपाई | २ |
| | **एकूण पदे** | **११** |

## ५) महाराष्ट्र विद्या प्राधिकरण : रचना

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**
**विद्या प्राधिकरणाची पुनर्रचना.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : डायट ४५१६/(४०/१६)/प्रशिक्षण**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १७ ऑक्टोबर, २०१६.

**पहा :**
१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. आरटीई-२०१३/प्र.क्र.२५/प्राशि-१, दिनांक १९ मार्च, २०१३.

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. शैगुवि-२०१५/(८०/१५)/एसडी-६, दिनांक २२ जून, २०१५.

३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. याचिका-६२१४/प्र.क्र.१६/एसडी-१, दिनांक २९ फेब्रुवारी २०१६

**प्रस्तावना :**

१) पार्श्वभूमी :

१) मा. मुख्यमंत्री यांनी राज्यास गुणवत्तेच्या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर प्रथम तीन क्रमांकामध्ये आणण्याचे उद्‌दिष्ट दिले आहे. त्यास अनुसरून दिनांक २२ जून, २०१५ रोजी 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

२) सदर शासन निर्णयानुसार आज मितीस राज्यातील सुमारे ६०,५८१ शाळांमध्ये स्वयंस्फूर्तीने ज्ञानरचनावादी पद्‌धत कार्यान्वित करण्यात आली आहे व राज्यातील सुमारे २८,७९१ शाळा डिजिटल आणि १३,९२३ शाळांमध्ये Activity Based Learning सुरू करण्यात आले आहे. २,२७९ शाळा ISO मानांकित झाल्या असून राज्यातील ४४,४१६ शिक्षकांनी तंत्रस्नेही शिक्षक म्हणून स्वतःची नोंद केली आहे. राज्यातील शिक्षण प्रशासनातील अधिकारी आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील (डायट) मधील अधिकारी यांनी २२,७९३ शाळा दत्तक घेतल्या आहेत. समाज सहभागातून आजमितीस सुमारे १७३ कोटी रु. लोकनिधी शाळांनी प्राप्त केला आहे.

अशा विविध प्रयत्नांतून राज्यातील १९,७९४ शाळा प्रगत झाल्याचे घोषित करण्यात आले आहे.

३) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमात डिसेंबर, २०१७ पर्यंत १००% शाळा प्रगत करण्याचे उद्‌दिष्ट ठरविण्यात आले असून शैक्षणिक सत्र २०१६-१७ पर्यंत ५०% प्राथमिक, २५% उच्च प्राथमिक व २०% माध्यमिक शाळा प्रगत करण्याचे उद्‌दिष्ट ठरविण्यात आले आहे. एवढे मोठे उद्‌दिष्ट प्राप्त करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका व केंद्र पातळीपर्यंत सशक्त शैक्षणिक सक्षमीकरण व्यवस्था तयार करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक

संशोधन व प्रशिक्षण परिषद, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुनर्रचित करणे तसेच तालुका व केंद्रस्तरीय व्यवस्था पुनर्परिभाषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासननिर्णय :**

**१) विद्या प्राधिकरण :**

यापुढे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेस विद्या प्राधिकरण असे संबोधण्यात येईल. त्याची रचना खालीलप्रमाणे राहील. विद्या प्राधिकरणात गाभा समिती स्थापित करण्यात येईल.

**१-अ) गाभा समितीची रचना :**

विद्या प्राधिकरणाने कार्यवाहक म्हणून तर गाभा समितीने दिशादर्शक म्हणून कार्य करावयाचे आहे. त्यामध्ये प्रशासकीय व शिक्षण क्षेत्रातील अशासकीय व्यक्तींचा समावेश राहील. सदर समितीची सदस्य संख्या २० इतक्या मर्यादेपर्यंत राहील. तथापि, बैठकीस सदर क्षेत्रात कार्य करणाऱ्या व तज्ज्ञ व्यक्तींना आमंत्रित करता येईल.

**गाभा समितीची रचना खालीलप्रमाणे असेल :**

**शासकीय सदस्य :** विद्या प्राधिकरणामधील सदस्य, शिक्षण विभागातील क्षेत्रीय स्तरावरील गुणवत्तावाढीस यशस्वी झालेला प्रत्येक स्तर म्हणजे जिल्हा शिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे प्रतिनिधी, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख व शिक्षकांचे प्रतिनिधी

**अशासकीय सदस्य :** चांगल्या पद्धती व संशोधन यासंदर्भात राष्ट्रीय स्तरावर कार्य करत असलेले राज्याबाहेरील शिक्षण तज्ज्ञ, राज्यातील विद्यापीठांचे प्रतिनिधी, काही आंतरराष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक असलेल्या अशासकीय सदस्यांचा समावेश राहील.

**१-ब) गाभा समितीची कार्ये :**

१) तीन महिन्यातून एकदा बैठक घेण्यात येईल आणि त्यावेळी प्रगतीचा आढावा तसेच आवश्यक असणारे सहाय्य/सुधारणा याबाबतची कार्यवाही करेल.

२) शैक्षणिक गुणवत्ता सुधारणे व ती वरच्या पातळीवर टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक कार्यक्रमांची सुयोग्य आणि स्पष्ट आखणी करेल आणि दिशा देईल.

३) विविध कार्यक्रमांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध भूमिका, आंतरक्रिया आणि पद्धती स्पष्ट करेल.

४) प्रत्येक प्रक्रियेचे निष्पत्ती दर्शक तयार करतील.

५) वर आखलेल्या विविध कार्यक्रमांना विषयाचा आशय, अध्यापन शास्त्र इत्यादीबाबत नैपुण्य असलेल्या संस्थांकडून शैक्षणिक सहाय्य आवश्यक असू शकतील. गाभा समिती अशा संस्थांचा शोध घेऊन त्यांची सहायता घेण्याबाबत कार्यपद्धती निश्चित करेल.

६) वैयक्तिक तसेच संस्थात्मक स्तरावर क्षमता विकसित करणे सर्वाधिक महत्त्वाचे असल्याने गाभा समिती यासाठी आराखडा, नियोजन आणि कृती कार्यक्रम तयार करेल.

**२) विभागस्तरावर प्रादेशिक विद्या प्राधिकरणे** :

प्रत्येक महसूल विभागामध्ये एक प्रादेशिक विद्या प्राधिकरणाची स्थापना करण्यात येईल. मुख्य विद्या प्राधिकरण व विभागीय विद्या प्राधिकरणासाठी पुनर्रचनेनंतर सध्याच्या संस्थांचे बदललेले स्वरुप खालील तक्त्याप्रमाणे राहतील.

| अ. क्र. | विभागीय कार्यालय | वर्तमान संस्था | पुनर्रचनेनंतरची संस्था |
|---|---|---|---|
| १. | पुणे | विद्या प्राधिकरण | विद्या प्राधिकरण मुख्यालय (विज्ञान, गणित व इंग्रजी विषय वगळून इतर सर्व विषय तत्वज्ञ) |
| २. | नागपूर | SISE | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नागपूर (विज्ञान व गणित तत्वज्ञ) |
| ३. | अमरावती | DIET | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, अमरावती |
| ४. | औरंगाबाद | SIEM | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद (आंग्लभाषा तत्वज्ञ) |
| ५. | नाशिक | DIET | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नाशिक |
| ६. | मुंबई | IVGS | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई (व्यवसाय मार्गदर्शन तत्वज्ञ) |

येथे असेही स्पष्ट करण्यात येत आहे की, पुणे येथे विद्या प्राधिकरण मुख्यालय असल्याकारणाने तेथे प्रादेशिक विद्या प्राधिकरणाची आवश्यकता नाही. तथापि पुणे जिल्ह्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) वेगळ्याने राहील. तसेच अमरावती व नाशिक येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) मध्ये प्रादेशिक विद्या प्राधिकरणासाठी तयार करण्यात आलेली ६ विषयांची १२ पदे पदस्थापित करण्यात येतील. प्रत्येक प्रादेशिक प्राधिकरणामध्ये शैक्षणिक सक्षमीकरणाचे वातावरण निर्माण होण्यासाठी किमान ३० शैक्षणिक पदे असावी, असा विचार केला गेला. म्हणून प्रत्येक प्रादेशिक प्राधिकरणाला आधीच उपलब्ध संस्थांशी जोडले गेल्याने या संस्थांमध्ये नव्याने सहचर्य (synergy) निर्माण करावे लागणार नाही. अधिक अंतरावर असलेल्या जिल्ह्यांतील त्यांच्या विभागामध्येच प्रादेशिक प्राधिकरणाची सोय करण्यात येणार असल्यामुळे यापूर्वी शिक्षक किंवा अधिकारी हे पुण्याला यायचे, त्या सर्वांचा येण्या–जाण्याचा खर्च व वेळ वाचणार आहे. अतः अशा प्रकारच्या प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या संकल्पनेने कमीतकमी मनुष्यबळ वापरून व कमीतकमी आर्थिक व्यय करून अधिकाधिक शैक्षणिक लाभ घेता येईल.

सर्व प्रादेशिक विद्या प्राधिकरणांमध्ये प्रमुखांची पदस्थापना विभागातंर्गत अधिकाऱ्यांकडून अर्ज मागवून निवड पद्धतीने करण्यात येतील. त्याच संवर्गातील उमेदवारांचे अर्ज न आल्यास किंवा निवडीमध्ये योग्य उमेदवार न मिळाल्यास एक स्तर कमी दर्जाच्या अधिकाऱ्याने हे पद भरण्यात येईल.

**३) पुनर्रचित प्राधिकरणाच्या पदांची संरचना** :

विद्या प्राधिकरण, पुणे मुख्यालय येथे संचालकांचे १ पद राहील व २ सहसंचालकांची पदे राहतील. सदर पदांशिवाय पुणे येथील मुख्यालय ठिकाणी तसेच नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक व मुंबई येथील प्रादेशिक प्राधिकरणाची संरचना पुढील तक्त्यात स्पष्ट केल्याप्रमाणे राहील.

## भाग –१ : विद्या प्राधिकरण, पुणे मुख्यालय पदांची संरचना

| अ. क्र. | मुख्य विभाग व उपविभाग | उपसंचालक | वर्ग – अ | वर्ग – ब | अधिक्षक (वर्ग –ब) | लिपिक/डाटा एंट्री ऑपरेटर | वर्ग–क–विषय सहायक/ प्रतिनियुक्तीद्वारा शाळा/ क्षेत्रीय कार्यालयाकडून | कंत्राटी नियुक्तीने शासनाबाहेरील लोकांना CSR च्या मदतीने | वर्ग–४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| **१)** | **मानव संसाधन (HRD)** | | | | | | | | |
| १.१ | आस्थापना | | १ | १ | २ | ६ | ० | ० | ५ |
| १.२ | लेखा | | १ (लेखा) | १ (लेखा) | ० | ८ | ० | ० | १ |
| १.३ | वसतिगृह | १ | ० | ० | १ | २ | ० | ० | १ |
| १.४ | CPD (शिक्षक/अधिकारी) | | १ | १ | ० | २ | २ | १ | |
| १.५ | ग्रंथालय | | ० | ० | ० | ३ | ० | ० | १ |
| १.६ | SSA, RMSA | | १ | २ | ० | ३ | २ | ० | १ |
| **२)** | **समन्वय** | | | | | | | | |
| २.१ | अभ्यासक्रम विकसन | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.२ | मूल्यमापन | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.३ | संशोधन | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.४ | संकीर्ण | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.५ | विज्ञान | १ | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.६ | इंग्रजी | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.७ | गणित | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.८ | व्यवसाय मार्गदर्शन व प्रशिक्षण | | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| **३)** | **आय.टी. व प्रसार माध्यम** | | | | | | | | |
| **४)** | **भाषा** | | | | | | | | |
| ४.१ | मराठी | | १ | २ | ० | १ | ३ | १ | |

| अ. क्र. | मुख्य विभाग व उपविभाग | उपसंचालक | वर्ग – अ | वर्ग – ब | अधिक्षक (वर्ग –ब) | लिपिक/डाटा एंट्री ऑपरेटर | वर्ग–क–विषय सहायक/ प्रतिनियुक्तीद्वारा शाळा/ क्षेत्रीय कार्यालयाकडून | कंत्राटी नियुक्तीने शासनाबाहेरील लोकांना CSR च्या मदतीने | वर्ग–४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ४.२ | उर्दू | | १ | २ | ० | १ | ३ | १ | |
| ४.३ | इतर भाषा | | ० | ० | ० | ० | १० | ० | |
| **५)** | **सामाजिक शास्त्र, कला व क्रीडा** | | | | | | | | |
| ५.१ | कला विभाग व क्रीडा समन्वय | १ | १ | २ | ० | २ | २ | १ | |
| ५.२ | सामाजिक शास्त्र (इतिहास, भूगोल, ना. शास्त्र) | | १ | २ | ० | २ | २ | १ | |
| **६)** | **सेवापूर्वशिक्षण, बालशिक्षण, मानसशास्त्र** | | | | | | | | |
| ६.१ | सेवापूर्व शिक्षण | १ | १ | १ | १ | २ | ० | १ | १ |
| ६.२ | बालशिक्षण, मानसशास्त्र | | १ | २ | | | | | |
| **७)** | **समता** | | | | | | | | |
| ७.१ | लैंगिक परस्परावलंबन, धार्मिक परस्परावलंबन, जातीय परस्परावलंबन, CWSN, शाळाबाह्य मुले, शालेय व्यवस्थापन समिती | १ | २ | ५ | ० | २ | ५ | २ | २ |
| **८)** | **आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष** | ० | २ | ४ | ० | २ | ४ | २ | १ |
| | **एकूण** | **७** | **२४ (१ पद लेखा)** | **३६ (१ पद लेखा)** | **५** | **४८** | **४३** | **१५** | **३२** |

## भाग – २ : विभागीय विद्या प्राधिकरणे

| अ. क्र. | विभागीय विद्या प्राधिकरण | समाविष्ट विभाग | उपसंचालक | वर्ग – अ | वर्ग – ब | लेखाधिकारी/अधीक्षक (वर्ग –ब) | लिपिक/डाटा एंट्री ऑपरेटर | वर्ग–क–विषय सहायक/ प्रतिनियुक्तीद्वारा शाळा/ क्षेत्रीय कार्यालयाकडून | कंत्राटी नियुक्तीने शासनाबाहेरील लोकांना CSR च्या मदतीने | वर्ग–४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | विभागीय विद्या प्राधिकरण, नागपूर (राज्य गणित व विज्ञान संस्था) | विज्ञान | | २ | ३ | ० | २ | ३ | २ | |
| | | गणित | | २ | ३ | १ | २ | ३ | २ | |
| | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | इंग्रजी | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ६ |
| | | सामाजिक शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | उर्दू | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | आय. टी. | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | **एकूण** | | **१** | **४** | **११** | **१** | **४** | **११** | **४** | **६** |
| २ | विभागीय विद्या प्राधिकरण (DIET अमरावती) | इंग्रजी | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | गणित | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | विज्ञान | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | सामाजिक शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | उर्दू | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | आय. टी. | | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | **एकूण** | | **०** | **०** | **६** | **०** | **०** | **६** | **०** | **०** |
| ३ | विभागीय विद्या प्राधिकरण, औरंगाबाद (राज्य आंग्लभाषा संस्था) | इंग्रजी | | २ | ३ | १ | ३ | ३ | २ | |
| | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | गणित | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ६ |
| | | विज्ञान | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | सामाजिक शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |

| अ. क्र. | विभागीय विद्या प्राधिकरण | समाविष्ट विभाग | उपसंचालक | वर्ग – अ | वर्ग – ब | लेखाधिकारी/अधीक्षक (वर्ग –ब) | लिपिक/डाटा एंट्री ऑपरेटर | वर्ग–क–विषय सहायक/प्रतिनियुक्तीद्वारा शाळा/क्षेत्रीय कार्यालयाकडून | कंत्राटी नियुक्तीने शासनाबाहेरील लोकांना CSR च्या मदतीने | वर्ग–४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | उर्दू | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | आय. टी. | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | **एकूण** | | **१** | **२** | **९** | **१** | **३** | **९** | **२** | **६** |
| ४ | विभागीय विद्या प्राधिकरण, नाशिक (DIET नाशिक) | इंग्रजी | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० |
| | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | गणित | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | विज्ञान | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | सामाजिक शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | उर्दू | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | आय. टी | | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | **एकूण** | | **०** | **०** | **६** | **०** | **०** | **६** | **०** | **०** |
| ५ | विभागीय विद्या प्राधिकरण, मुंबई (व्यवसाय, मार्गदर्शन व निवड संस्था) | मार्गदर्शन | १ | २ | २ | १ | ३ | ५ | २ | ६ |
| | | कार्यानुभव | | ० | १ | ० | ० | २ | १ | |
| | | इंग्रजी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | गणित | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | विज्ञान | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | सामाजिक शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | उर्दू | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | आय. टी. | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | **एकूण** | | **१** | **२** | **१०** | **१** | **३** | **१४** | **३** | **६** |

**टीप** :

१) प्रत्येक विषयाची संबंधित पदे संबंधित विषयामध्ये तज्ज्ञ असलेल्या व्यक्तींमधूनच भरण्यात येतील. काही लोक संबंधित विषयाची पदव्युत्तर पदवी नसताना सुद्‌धा अनुभवाने पारंगतता आत्मसात केलेले असतात. प्रतिनियुक्ती किंवा कंत्राटी पद्‌धतीने अशा व्यक्तींची निवड केली जाईल.

२) बालभारतीच्या विद्याशाखेतील सर्व लोक विद्या प्राधिकरणामध्ये योग्य पदांवर पदस्थापित केले जातील. हे लोक सेवानिवृत्त होईपर्यंत विद्या प्राधिकरणामध्ये कार्य करतील. त्यांचे वेतन व भत्ते बालभारतीकडूनच अदा केले जातील. हे लोक सेवानिवृत्त होईपर्यंत ज्या पदांवर कार्य करतील ती पदे विद्या प्राधिकरणामार्फत इतर मार्गांनी भरली जाणार नाहीत.

३) वर्ग 'अ' व वर्ग 'ब' मधील क्रिडांची पदे क्रीडा विभागातील अधिकारी, बालशिक्षणाची पदे महिला व बालविकास विभागाचे अधिकारी (तसेच काही उत्सुक व होतकरू उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, तहसिलदार, ग. वि. अ.) यांमधून संबंधित विषयांची आवड असणाऱ्या व्यक्तींमधून निवड प्रक्रिया अवलंबून भरण्यात येतील.

४) समता विभागातील उपसंचालक व वर्ग 'अ' ची पदे व स्वयंसेवी संस्था सदस्य सोडून बाकीची सर्व पदे सर्व शिक्षा अभियानाचे राज्य, जिल्हा व तालुकास्तरीय लोकांमधून निवड प्रक्रिया अवलंबून भरण्यात येतील.

५) विद्या परिषद व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेमध्ये सध्या मंजूर असलेल्या पदांमधून काम सुरू करण्यात येईल. अधिकच्या पदांच्या आवश्यकतेबाबत संबंधित विभागाकडे नवीन पदनिर्मितीचा प्रस्ताव अथवा अनावश्यक पदे रद्‌द करून अत्यावश्यक पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

६) विद्या प्राधिकरण तसेच प्रादेशिक विद्या प्राधिकरणांची सर्व पदे निवड पद्‌धतीने एका वेळी ५ वर्षांकरिता विभागीय अधिकारी व शिक्षकांमधून भरण्यात येतील. पाच वर्ष संपल्यावर सर्व पदांकरिता फेरनिवड करण्यात येईल. आधीचे अधिकारी/शिक्षक पुन्हा अर्ज करू शकतात. निवड झाल्यावर त्यांची पदस्थापना पुन्हा ५ वर्षांकरिता करण्यात येईल. त्यासाठी आवश्यकतेनुसार वेगळ्या पद्‌धतीने नियमावली करण्यात येईल.

**४) विद्या प्राधिकरणाची कार्ये** :

i) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुणवत्तेच्या परिभाषेचा अभ्यास करून राज्यातील शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी Benchmark निश्चित करणे. या बेंचमार्कमध्ये कालपरत्वे वेळोवेळी आवश्यकतेनुसार बदल करणे.

ii) निश्चित केलेल्या बेंचमार्कच्या प्राप्तीसाठी

- अभ्यासक्रम विकसन
- पाठ्यक्रम विकसन
- पाठ्य व इतर साहित्य विकसन
- शिक्षक व अधिकारी यांचे सातत्यपूर्ण व्यावसायिक विकसन.
- मूल्यमापन प्रक्रिया विकसन
- अडचणींवर मात करण्यासाठी संशोधन करणे.

वरील सर्व बाबींसाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञान/संगणक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे.

iii) बेंचमार्क प्राप्तीसाठी सर्व स्तरावर स्पष्टता यावी यासाठी स्पष्ट क्षमता संपादणूक पातळी (Learning Indicators) परिभाषित करून त्यांचे Continuous and Comprehensive Education (CCE) किंवा अन्य मूल्यमापन प्रक्रियेशी सहसंबंध स्पष्ट करणे.

iv) अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्य व इतर साहित्य विकसित करत असताना तसेच शिक्षक व अधिकारी व्यवसायिक विकसन कार्यक्रम आखत असताना क्षमतामूलक विचारांकडे लक्ष देणे. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत १००% मुलांना शिक्षण द्यावयाचे आहे. परंतु ते राबवत असताना बरेचसे शिक्षक व अधिकाऱ्यांना १००% मुले शिकू शकतात यावर विश्वास नसल्याचे जाणवले. त्याच्या मुळाशी क्षमता बद्दलचे समज अपुरे असणे असेही जाणवले. त्यामुळे माणसाचे चार शरीर प्रकार, विविध धर्म प्रकार, विविध जाती प्रकार, विविध आर्थिक वर्ग, विविध भौगोलिक जन्मस्थान व रहाण्याचे ठिकाण तसेच शहरी व ग्रामीण रहिवास इत्यादी असल्यावर ही माणसे समान असतात हे पटणे सक्षमीकरणाचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. यासाठी विद्या प्राधिकरणाने निरंतर कार्य करणे. या सर्व प्रकारच्या माणसांचे परस्परावलंबनाची संकल्पना समजल्याने क्षमतेची संकल्पना अधिक स्पष्ट होईल हे ध्यानात ठेवणे. क्षमता विभागाच्या कार्याचा उल्लेख करताना यावर विस्तृत चर्चा केली जाईल.

v) अध्ययन व विकासाच्या विविध संधींसाठी साहित्य तयार करणे. उदा. मुक्त दूरस्थ अध्ययन, स्वयं-अध्ययन, गट व केंद्रस्तरावर चर्चा, online स्वयं-अध्ययन एवं चर्चा प्रमाणपत्र प्रदान किंवा या सर्वांचे विविध combination.

vi) वरील सर्व तसेच जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था **(District Institute of Educational Continuous Professional Development- DIECPD) डायटचे नवीन नाव)** व तालुका आणि केंद्र स्तरावरील साधन व्यक्ती तसेच शिक्षक सक्षमीकरणाच्या सर्व घटकांची क्षमता समृद्धी करणे.

vii) हे सर्व प्रभावीपणे आणि निरंतर करता यावे यासाठी विद्या प्राधिकरण स्वतःच्या सदस्यांची निवड व त्यांचे सातत्यपूर्ण व्यवसायिक विकासाची योजना आखेल जेणेकरून प्राधिकरण स्तरावर भविष्यात केव्हाही मरगळ तयार होणार नाही. या प्रकारचे नित्य नवीन शिकण्याची परंपरा आर्थिक लाभाला न जोडता ज्ञान प्राप्तीच्या लाभाला जोडली जाईल.

viii) यात विद्या प्राधिकरण यशस्वी होत आहे किंवा नाही याचे मोजमाप बेंचमार्कच्या हिशोबाने मुले प्रगत होत आहेत की नाही हेच राहील. अतः मुलांच्या प्रगतीच्या मूल्यमापनातून प्राधिकरण स्वतःचे यश किंवा अपयश ठरवेल.

ix) पुनर्रचित विद्या प्राधिकरणाच्या विविध विभागांच्या कार्याचे विस्तृत विवरण तयार करण्यात येईल हे विवरण भविष्याचे प्राधिकरण तथा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बेंचमार्कच्या आधारावर प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र तयार करण्याच्या हेतूने तयार करण्यात येईल. त्यासाठी पुनर्रचित प्राधिकरणामध्ये निवड प्रक्रिया अवलंबून रुजू झालेल्या सदस्यांचे सक्षमीकरण अगत्याचे असणार आहे. या सक्षमीकरण प्रक्रियेच्या दरम्यान साधारण सहा महिन्यांनी विभागवार विस्तृत कार्यविवरण तयार होईल. त्यावेळी शासन मान्यतेने हे विवरण प्रसिद्ध केले जाईल.

### ५) निवड समित्यांची स्थापना :

विद्या प्राधिकरणाचे मुख्यालयाच्या ठिकाणी व प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या ठिकाणी विषयनिहाय सक्षमीकरणासाठी योग्य व्यक्तींची निवड होणे आवश्यक आहे, जेणेकरून सदर प्राधिकरणांना त्यांच्या कामाचे उद्दिष्ट गाठता येऊ शकेल. सदर प्राधिकरणांवर तसेच संसाधन समूहामध्ये योग्य व्यक्तींची निवड करण्यासाठी निवड समितीची स्थापना करणे

आवश्यक आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे निवड समित्यांची स्थापना करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे–

**५.१) राज्यस्तरीय निवड समिती :**

**५.१.१. राज्यस्तरीय निवड समितीची रचना :**

प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय निवड समितीची स्थापना करण्यात येत आहे. त्याची संरचना खालीलप्रमाणे राहील.

अध्यक्ष – प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

सहअध्यक्ष – आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

सदस्य सचिव – संचालक, विद्या प्राधिकरण

सदस्य – विद्या प्राधिकरणातील अधिकारी

सदस्य – DIET मधील अधिकारी

सदस्य – जिल्हा प्रशासनाचे अधिकारी

सदर समितीमधील सदस्यांची निवड अध्यक्ष व सहअध्यक्ष करतील.

**५.१.२. समितीची कार्ये :**

राज्यस्तरीय निवड समितीची कार्यक्षेत्र व कार्यप्रक्रिया खालीलप्रमाणे राहील :

a) विद्या परिषदेतील नियमित सेवेतून नियुक्ती, प्रतिनियुक्ती, CSR च्या मदतीने कंत्राटी पद्धतीने नियुक्ती व राज्य संसाधन समूहातील सदस्यांची नियुक्तीसाठी निवड या समितीचे कार्यक्षेत्र राहील.

b) वर्षातून किमान एकदा निवड प्रक्रिया राबविणे. परंतु आवश्यकतेनुसार एकापेक्षा अधिक वेळा ही प्रक्रिया राबविता येईल.

c) तक्ता १ मध्ये दिल्याप्रमाणे विविध संवर्ग व विषयातील लोकांकडून जाहिरात देऊन online पद्धतीने अर्ज मागविणे.

d) आलेल्या अर्जांची छाननी करून आणि आवश्यकता भासल्यास मुलाखत किंवा अन्य प्रक्रिया जसे : सादरीकरण, प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे इ. अवलंबून उमेदवारांची निवड करणे.

e) निवड करताना एकमेव निकष 'सर्वाधिक शाळांमध्ये बदल घडविण्यात आलेले यश' राहील. या निकषामध्ये पात्र असलेल्या व्यक्तींचा प्राधान्यक्रम खालील निकषांच्या आधारावर लावण्यात यावा.

i) संबंधित विषयामध्ये पदव्युत्तर डिग्री

ii) मराठी भाषेमध्ये अस्खलित संभाषण कौशल्य

iii) संशोधन, प्रशिक्षण/घटकसंच निर्मिती/संगणक शिक्षणमधील पात्रता किंवा अनुभव

iv) प्राथमिक /उच्च प्राथमिक शाळेत शिकवण्याचा अनुभव.

v) माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळेत शिकवण्याचा अनुभव.

जी व्यक्ती शालेय शिक्षणाशी थेट संबंधित नाही त्यांच्यासाठी त्यांच्या कार्यक्षेत्रात सर्वाधिक गांव/अंगणवाडी आरोग्य उपकेंद्रात घडविण्यात आलेले बदल हा निकष एकमेव निकष राहील.

तथापि नव्याने (३ वर्षापेक्षा कमी सेवा) नेमणूक झालेले इतर विभागातील अधिकाऱ्यांनी अर्ज केल्यास त्यांची फक्त स्वप्रेरणा व ऊर्जा पाहून समितीस योग्य वाटल्यास निवड करता येईल.

f) विद्या परिषदेत नियुक्तीचे अधिकार शासनास असल्यामुळे निवडीसाठी उपयुक्त उमदेवारांची संख्या रिक्त जागांपेक्षा जास्त असल्यास रिक्त जागांच्या २ पट पर्यंत नावे शासनास अनुसंशित करता येईल. अशी अनुसंशा करताना उमेदवारांचे प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**५.२) जिल्हास्तरीय निवड समिती :**

**५.२.१. जिल्हास्तरीय निवड समितीची रचना :**

प्रत्येक जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय निवड समितीची स्थापना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

अध्यक्ष – मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

सहअध्यक्ष – जिल्ह्यांतील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी,

सदस्य सचिव – प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (DIECPD) अर्थात DIET चे एक प्राचार्य

सदस्य – शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक

सदस्य – मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्याकडून नामनिर्देशित एक गट शिक्षणाधिकारी

सदस्य – जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (DIECPD) अर्थात DIET ची एक Faculty

**५.२.२. जिल्हास्तरीय निवड समितीची कार्ये :**

जिल्हा निवड समितीचे कार्यक्षेत्र व कार्यप्रक्रिया खालीलप्रमाणे राहील.

a) ही समिती डायटमध्ये प्रतिनियुक्तीद्वारे भरण्यात येणारी पदे तसेच जिल्हा संसाधन समूहासाठी व्यक्तींची निवड करेल.

b) निवड यादी आयुक्त, शिक्षण विभाग, पुणे यांच्या मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

c) निवडीचे निकष व बैठकीची वारंवारता राज्य निवड समितीसारखीच राहील.

**५.३) तालुकास्तरीय निवड समिती :**

**५.३.१. तालुकास्तरीय निवड समितीची रचना :**

या समितीचे अध्यक्ष सहाय्यक गट शिक्षणाधिकारी (नियुक्त झाल्यानंतर) राहतील. या पदावर नियुक्ती होईपर्यंत गट शिक्षणाधिकारी या समितीचे अध्यक्ष राहतील. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील–

अध्यक्ष – सहाय्यक गटशिक्षणाधिकारी (नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या पदावर नियुक्तीनंतर) तोपर्यंत गटशिक्षणाधिकारी

सहअध्यक्ष – गटशिक्षणाधिकारी (सहाय्यक गटशिक्षणाधिकारी नियुक्तीनंतर)

सदस्य – गटामधील एक प्रतिनिधी

सदस्य – सहाय्यक गटशिक्षणाधिकारी अथवा सध्या गट शिक्षणाधिकारी नामनिर्देशित करतील असे त्या तालुक्यातील एक शिक्षण विस्तार अधिकारी

सदस्य – सहाय्यक गटशिक्षणाधिकारी अथवा सध्या गट शिक्षणाधिकारी नामनिर्देशित करतील असे त्या तालुक्यातील दोन केंद्रप्रमुख.

**५.३.२. समितीची कार्ये :**

ही समिती फक्त गट संसाधन समूहातील व्यक्तींची निवड करेल. निवडीचे निकष व बैठकांची वारंवारता राज्य समिती सारखीच राहील. केंद्र स्तरावर कोणतीही निवड समिती राहणार नाही.

**६) जिल्हास्तर, तालुकास्तर व केंद्र स्तरावरील सक्षमीकरणाची व्यवस्था :**

**६.१) सक्षमीकरणाची जिल्हास्तरावरील व्यवस्था :**

**६.१.१. जिल्हास्तरीय शैक्षणिक व्यावसायिक विकास संस्थेची (DIECPD) संरचना :**

जिल्हास्तरीय शैक्षणिक व्यावसायिक विकास संस्थेची रचना विद्यापरिषदेच्या रचनेप्रमाणे (विषयनिहाय) केली जाईल. त्यातले १–२ सदस्य हे समन्वय आणि मूल्यमापनाची जबाबदारी पार पाडतील. रिक्त असलेली सर्व पदे लोकसेवा आयोगाकडून भरेपर्यंत प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील. यापुढे राज्य लोकसेवा आयोगाकडून पदे भरताना विषय व्यवस्थेनुसार भरण्यात येतील. विषय व्यवस्थेनुसार डायट स्तरावर भाषा, गणित, विज्ञान, इंग्रजी, समावेशी शिक्षण आणि ICT या विषयासाठी प्रत्येकी ३ कार्यक्षम (एक नियमित सेवा व २ प्रतिनियुक्ती) उपक्रमशील तज्ज्ञांची गरज भासणार आहे. सध्या मंजूर पदे यासाठी पुरेशी पडणार नसल्यामुळे प्रत्येक डायटमध्ये १२ अतिरिक्त शैक्षणिक पदे निर्माण करण्यात येतील व ज्या ठिकाणी उर्दू भाषेसाठी काम करणे आवश्यक आहे, त्या ठिकाणी उर्दू भाषेसाठी अतिरिक्त २ पदे अशी काही ठिकाणी १४ पदे प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील. ११ राजपत्रित पदे आणि अतिरक्त १२ अथवा काही ठिकाणी १४ असे मिळून २३ अथवा २५ लोक प्रत्येक जिल्हास्तरीय संस्थेमध्ये कार्यान्वित राहतील. जिल्हास्तरीय संस्थेमधील लिपिकांची २ पदे व लघुलेखकाचे १ पद कमी करण्यात येईल. बाकीची ९ किंवा यथास्थिती ११ पदे इतर पदांच्या समायोजनातून निर्माण करण्यात येतील.

DIECPD मध्ये प्राचार्याचे पद रिक्त असल्यास तेथील पदस्थापित ज्येष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता किंवा त्याच जिल्ह्यात पदस्थापित शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक किंवा निरंतर) यांच्यामधून अर्ज मागवून सर्वात कार्यक्षम व परिणामकारक अधिकाऱ्यांची निवड राज्यस्तरीय समितीद्वारे करून अतिरिक्त प्रभार देण्यात येईल.

**६.१.२. जिल्हास्तरीय शैक्षणिक व्यवसायिक विकास संस्थेची कार्ये :**

१) जिल्हास्तरीय संस्था यापूर्वी करीत असलेल्या कार्यासह खालील कामेसुद्धा पार पाडतील.

- केंद्रप्रमुख आणि तालुकास्तरीय साधन व्यक्ती यांना क्षमता वृद्धीसाठी संधी उपलब्ध करून देईल.
- शिक्षक, केंद्रप्रमुख, तालुकास्तरीय साधन व्यक्ती यांना संदर्भ साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी सहाय्य करेल.

- राज्यस्तरीय मुक्त दूरस्थ अध्ययनासाठी संपर्क केंद्राचे संचलन करण्यासाठी मदत करेल.
- जिल्हास्तरीय संस्थेमध्ये साधन केंद्र विकसित करेल.
- विषयनिहाय चर्चासत्रांचे नियोजन व आयोजन करेल.
- व्यवस्थापन शास्त्रानुसार शिक्षकांच्या गरजा निश्चित करण्यासाठी संशोधन उपक्रम राबवेल.
- शाळास्तरावरील समस्या जाणून घेण्यासाठी शाळांना भेटी देईल. त्याचा हेतू शाळांची तपासणी करणे नसून शाळास्तरावरील विविध समस्या जाणून घेणे हा आहे.

२) जिल्हास्तरीय शैक्षणिक व्यावसायिक विकास संस्था प्रमुखांचे खालील बाबींसंदर्भात सक्षमीकरण असेल.

- शिक्षकांच्या गरजा निश्चित करण्यासाठी सक्षम करणे. केंद्रप्रमुखांनी जिल्हास्तरीय संस्थेकडे त्याप्रमाणे मागणी करावी.
- विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीचे विश्लेषण करण्यास शिक्षकांना मार्गदर्शन करणेसाठी सक्षम करणे.
- वर्गकार्याचे निरीक्षण आणि प्रत्याभरण करण्यासाठी सक्षम करणे.
- अध्यापन पद्धतीतील बदलांबाबत सहाय्य, प्रोत्साहन व संसाधनांची उपलब्धता करून घेण्यासाठी सक्षम करणे.
- **केंद्र संमेलनांना प्रोत्साहन** : संकलित माहिती व आधारित विषयपत्रिका तयार करणे (शिक्षकांच्या गरजा, वर्गकार्य निरीक्षणातील नोंदी), शिक्षकांमधील संवाद, चांगल्या पद्धतींचा प्रसार इत्यादी; क्षमता समृद्धी कार्यशाळेतील प्रतिसादांचा पाठपुरावा यासाठी सक्षम करणे.
- **शाळेचे शैक्षणिक नियोजन** : वयानुरूप प्रवेश, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळेतील प्रवेश यासह शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अध्ययनाबाबत स्वतः काढलेले निष्कर्ष याबाबत केंद्रप्रमुखांनी करावयाची निरीक्षणे.

### ६.२) सक्षमीकरणाची तालुकास्तरीय व्यवस्था :

तालुका हा जिल्ह्याच्या तुलनेत अधिक एकसंघ असतो. तसेच शाळांपर्यंत संपर्क साधणे तुलनेने सोपे असते. साधन व्यक्ती असलेले गट साधन केंद्र शिक्षकांसाठी अपेक्षित आहे. ज्यामध्ये शिक्षकांसाठी प्रशिक्षण, बैठका, चर्चासत्र, वाचनालय, आंतरजाल इत्यादी सुविधा असतील.

#### ६.२.१. गट साधन केंद्राची रचना :

गट साधन केंद्राचे प्रमुख सहाय्यक गट शिक्षणाधिकारी राहतील. जिल्ह्यात उपलब्ध शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांमधून अर्ज मागवून जिल्हा निवड समितीद्वारे त्यांची निवड करण्यात येईल व आयुक्त शिक्षण यांची मान्यता मिळाल्यावर त्यांची पदस्थापना करण्यात येईल. ही नियुक्ती एकावेळी ५ वर्षांकरिता राहील.

गट साधन केंद्रात भाषा, इंग्रजी, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, ICT या विषयासाठी प्रत्येकी ३ अशा १८ व्यक्ती व समावेशी शिक्षणाचे ७ धरून एकूण २५ व्यक्ती कार्य करतील. या १८ व्यक्तींमध्ये त्या गट साधन केंद्रात सध्या कार्यरत ६ विषय साधन व्यक्ती, २ विशेष साधन व्यक्ती व

५ मोबाईल शिक्षक यांचा समावेश राहील. गट साधन केंद्राचे प्रमुख शिक्षण विस्तार अधिकारी या दर्जाचे अधिकारी राहतील. इतर शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या तुलनेत हे पद गुणवत्तेसाठी ओळखले जावे म्हणून या पदास 'सहाय्यक गट शिक्षणाधिकारी' असे संबोधले जाईल. तालुक्याच्या गुणवत्तेची जबाबदारी गट शिक्षणाधिकारी यांची असल्याने गट साधन केंद्र त्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करेल.

**६.२.२. गट साधन केंद्राची कार्ये** :

- शिक्षकांनी व्यक्त केलेल्या गरजा व स्वतः शोधलेल्या स्थानिक गरजांवर आधारित संपर्क वर्ग व प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे.
- केंद्र बैठकांना उपस्थित राहणे.
- शाळा स्तरावर शिक्षकांना सहाय्य करण्यासाठी (आणि स्वतःच्या माहितीसाठी) शाळांना भेटी देणे.
- शिक्षकांना अध्ययन अध्यापन साहित्य तयार करण्यासाठी मदत करणे.
- केंद्र प्रमुख तथा केंद्रस्तरीय संसाधन समूह सोबत तसेच जि. शि. व प्र. संस्थेबरोबर संपर्क ठेवणे.
- शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी वार्षिक योजना आखणे.
- गट साधन केंद्रातील सदस्यांना जबाबदारीचे वाटप करणे.

**६.३) सक्षमीकरणाची केंद्र स्तरावरील व्यवस्था** :

केंद्र प्रमुखाची भूमिका ही प्रामुख्याने शैक्षणिक कामे करण्याची असते तरी प्रत्यक्षात त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय कामे करावी लागत आहेत. यापुढे त्यांनी शक्यतो प्रशासकीय कामे करू नयेत. त्यांनी खालील कामे प्राधान्याने करावीत.

**६.३.१. शाळा व शिक्षकांशी निगडित कार्य** :

केंद्र प्रमुखांनी खालील ४ प्रकारची कामे करणे अपेक्षित आहे.

- शाळा भेटी आणि वर्ग निरीक्षण
- केंद्र संमेलने आयोजित करणे
- समूह साधन केंद्र कार्यरत करणे
- शाळेच्या शैक्षणिक नियोजनासाठी मदत होईल अशा तऱ्हेने सांख्यिकीय माहितीचे व्यवस्थापन करणे.

**६.३.२. मुख्याध्यापकांशी निगडित कार्य** :

केंद्र प्रमुखाचा शाळेच्या मुख्याध्यापकाशी (जेथे आहे तेथे) सुसंवाद असणे आवश्यक आहे. शाळेतील शिक्षकांची मुख्याध्यापकांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा असते आणि अशावेळी मुख्याध्यापकाला केंद्र प्रमुखाची गरज भासू शकते. ज्या शाळा लहान आहेत आणि दोनच शिक्षक आहेत त्या ठिकाणी केंद्र प्रमुखाला मुख्याध्यापकाची भूमिका घेणे आवश्यक ठरते.

**६.३.३. इतर संस्था आणि व्यक्तींशी समन्वय** :

- गटसाधन केंद्रासोबत समन्वय, सुसंवाद आणि संपर्क ठेवणे.

- शिक्षकांच्या गरजांची काळजीपूर्वक पडताळणी करून गटसाधन केंद्राला सादर करणे. या गरजा दोन प्रकारच्या असू शकतील. तातडीच्या गरजा, कदाचित कमतरता/उणिवा आणि दीर्घकालीन गरजा. (शिक्षकांशी केलेल्या चर्चेनुसार)
- केंद्र प्रमुखाला शिक्षकांच्या गरजांचे स्थानिक स्तरावर निराकरण करता नाही आले तर तो गटसाधन केंद्रातील लोकांशी दूरध्वनी, व्हॉट्स ॲप, इ-मेलद्वारे संपर्क साधेल.
- चांगल्या पद्धती, नवनवीन कल्पना, सर्जनशील अध्ययन अध्यापन साहित्य इत्यादींचा कोष गट-साधन केंद्रावर तयार करण्यास मदत करणे.
- जवळच्या इतर केंद्रप्रमुखांशी संसाधनांच्या उपलब्धतेबाबत संपर्कात राहील. आपल्या केंद्रातील शिक्षकांच्या व शाळांच्या गरजा लक्षात घेऊन इतर केंद्रामध्ये उपलब्ध साहित्याचा वापर करून त्यांची पूर्तता करणे.

**७) संसाधन समूहाची संकल्पना :**

काही लोक आपल्या क्षेत्रात यशस्वीरित्या कार्य करीत असतात. अशा व्यक्ती स्वतःच्या वर्तमान कार्यात खूप समाधानी असतात. म्हणून ते वर्तमान कार्य न सोडता मार्गदर्शक म्हणून काम करण्यास तयार असतात. काही वेळा कौटुंबिक कारणामुळे या व्यक्तींना शासनाकडे उपलब्ध पद धारण करणे शक्य होत नाही. तथापि, त्यांचा ज्ञान आणि अनुभव दांडगा असतो. म्हणून त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ करून घेणे समाजासाठी उपयुक्त असते. काही वेळा मान्य पदांची मर्यादा असल्यामुळे सर्व प्रकारच्या तज्ज्ञांसाठी पदे उपलब्ध होत नाहीत.

या प्रकारच्या व्यक्तींच्या समूहाला संसाधन समूह म्हणून संबोधण्यात येत आहे. हा समूह विविध स्तरावर कायमस्वरूपी कार्यरत असेल. शिक्षक शिक्षणाच्या सक्षमीकरणासाठी आयोजित करावयाच्या कार्यशाळा, परिसंवाद, प्रशिक्षणे यासाठी जशी आवश्यकता भासेल तसे संसाधन समूहातील तज्ज्ञांना पाचारण करण्यात येईल. या संसाधन समूहात खालील व्यक्तींचा समावेश असेल-

i) शिक्षक, शैक्षणिक संस्थांतील लोक, प्रशासनातील लोक,

ii) राज्य व राष्ट्रीय स्तरावर शिक्षण क्षेत्रात यशस्वी झालेल्या व्यक्ती,

iii) शिक्षण संशोधनात तसेच ज्ञानाच्या क्षेत्रात मूलभूत योगदान देणाऱ्या व्यक्ती,

iv) नेतृत्व, कला, क्रीडा व कार्यानुभव क्षेत्रात समृद्ध व अनुभवक्षम व्यक्ती,

v) समावेशी शिक्षणात यशस्वी व्यक्ती.

या व्यक्तींना शासन ठरवेल त्याप्रमाणे मानधन अनुज्ञेय राहील. मानधन साधारणपणे दर दिवसाच्या हिशोबात ठरविण्यात येईल. मानधनाबाबत राज्य शासन नवीन धोरण ठरवेपर्यंत विविध संस्थांमध्ये प्रचलित मानधनाचे दर संसाधन गटातील सदस्यांना लागू राहतील. अशाप्रकारे जिल्हा स्तरावर, गट स्तरावर व केंद्र स्तरावर संसाधन समूह कार्यरत राहतील.

**राज्य संसाधन समूह :**

राज्यस्तरीय निवड समितीमार्फत राज्य संसाधन समूहाची निवड करण्यात येईल. राज्य संसाधन समूहामधील एका व्यक्तीस महिन्यातून साधारणपणे पाच दिवस पाचारण करण्यात येईल.

**जिल्हा संसाधन समूह** :

जिल्हा निवड समितीमार्फत जिल्हा संसाधन समूहाची निवड करण्यात येईल. जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (सध्याचे डायट) या ठिकाणी जिल्हा संसाधन समूह एकत्रित येईल. जिल्हा संसाधन समूहामधील एका व्यक्तीस महिन्यातून साधारणपणे पाच दिवस पाचारण करता येईल.

**गट संसाधन समूह** :

तालुका निवड समितीमार्फत गट संसाधन समूहाची निवड करण्यात येईल. जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (सध्याचे डायट) या ठिकाणी अथवा गटशिक्षणाधिकारी कार्यालयात गट संसाधन समूह एकत्रित येईल. जिल्हा संसाधन समूहामधील एका व्यक्तीस महिन्यातून साधारणपणे पाच दिवस पाचारण करता येईल.

**केंद्र संसाधन समूह** :

केंद्र संसाधन समूहात भाषा, इंग्रजी, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र व ICT या सहा विषयांसाठी प्रत्येकी २ असे उपक्रमशील शिक्षक ज्यांना या विषयातील तज्ज्ञता अवगत आहे व ज्यांनी स्वतःची वर्ग आणि शाळा ज्यांनी प्रगत केली आहे यांची निवड करण्यात येईल. असे १२ शिक्षक सर्वसाधारणपणे महिन्यातून २ दिवस केंद्र संसाधन समूहात कार्य करतील. ते इतर शिक्षकांना समृद्ध आणि सक्षम करतील. या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत सहपत्रामध्ये दिल्याप्रमाणे सर्व २२ घटक किंवा त्यापेक्षा अधिक मार्ग सुचल्यास त्या सर्वांचा विविध वेळी उपयोग केला जाईल. त्यामध्ये प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन अनुभुतिस व 'मागेल तेव्हा मागेल तसे' प्रशिक्षणास प्राधान्य दिले जाईल. तसेच, केंद्र संमेलनाचे ठिकाण त्याच केंद्रातील कोणतेही गाव किंवा शाळा असू शकेल. उद्दिष्ट मात्र स्पष्ट असेल मुलांना आनंदाने शिकण्यासाठी मदत करणे.

**केंद्र संसाधन समूहाची रचना** :

१) या पातळीवर सहाय्यक गटशिक्षण अधिकारी शिवाय अन्य कोणतेही पूर्णवेळ पद निर्माण करण्यात येणार नाही. प्रत्येक विषयासाठी २ व्यक्ती 'पाहिजे तेव्हा' या तत्त्वावर कार्य करतील.

२) एका महिन्यात साधारणपणे तीन दिवस पाचारण करण्यात येईल.

केंद्रस्तरावरील संसाधन समूहातील व्यक्तींची निवड तालुकास्तरावर होऊ शकते. तथापि, प्रत्येक तालुक्यात केंद्रांची संख्या अधिक असल्यामुळे केंद्रस्तरावरील सर्व व्यक्तींची निवड तालुकास्तरावर होईलच असे नाही. तथापि, काही व्यक्तींची निवड दोनही स्तरावर होऊ शकते. सदर व्यवस्थेस या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. या व्यक्ती प्रत्येक महिन्यात पाच दिवस शाळेतून बाहेर राहण्याची शक्यता आहे. अशा व्यक्ती शाळेत नसल्यावरसुद्धा मुलांच्या स्वशिक्षणाची व्यवस्था करू शकतात. असे गृहित धरण्यात येत आहे. स्वशिक्षणाची व्यवस्था न करू शकणाऱ्या व्यक्तींची एकापेक्षा अधिक स्तरावर निवड करण्यात येऊ नये. काही व्यक्तींची एकापेक्षा अधिक स्तरावर निवड केली गेल्यास त्यांच्या शाळेच्या अनुपस्थितीच्या काळात पर्यायी व्यवस्था सुद्धा करता येणे शक्य आहे. दोन्हीपैकी कोणताही एक पर्याय आवश्यक राहील.

८) **मूल्यमापन** :

प्रत्येक संस्थेचे तसेच त्यामधील कार्यरत व्यक्तींचे मूल्यमापन राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण, राज्यस्तरीय संपादणूक सर्वेक्षण, राज्यस्तरीय पायाभूत व संकलित चाचण्या, त्रयस्थ संस्था मूल्यमापन इत्यादींमधून प्राप्त मुलांचे संपादणूक पातळीच्या आधारावर करण्यात येईल. त्यासाठी वेगळ्याने विस्तृत दिशा निर्देश देण्यात येतील.

पाच वर्षांकरिता पदस्थापित करण्यात आलेल्या व्यक्तींची निष्पत्ती कोणत्याही वर्षाच्या मूल्यमापनात अपेक्षेपेक्षा फारच कमी असल्यास राज्यस्तरीय निवड समितीच्या शिफारशीनंतर त्यांना इतरत्र पदस्थापित करण्यात येईल व अशा पद्धतीने रिक्त झालेल्या पदावर पुन्हा निवड प्रक्रिया करण्यात येईल.

वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण– २०१५/प्र.क्र.४१/अर्थ–१, दिनांक २.६.२०१५ अन्वये विभागांतर्गत पदांचे समायोजन करून घेण्याचे अधिकार संबंधित विभागास प्रदान करण्यात आले आहेत. त्या अधिकाराचा वापर करून हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६१०१८१७०६४६५२२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nand kumar

Digitally signed by Nandkumar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education And Sports, postal code = 400032
St = Maharashtra,
2.5.4.20 = c98b875883c76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, cn=Nandkumar
Date : 2016.10.19. 12:42:03 + 05'30'

**(नंद कुमार)**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीसाठी सादर,**


१. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन, यांचे प्रधान सचिव
२. मा. मंत्री शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३. मा. मुख्य सचिव, यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र शासन
४. मंत्रालयीन विभागातील सर्व अ.मु.स./प्र.स./सचिव यांचे स्वीय सहायक

**प्रति,**

१. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
३. सर्व संचालक, शिक्षण विभाग
४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
५. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था)
६. सर्व शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक/जिल्हा परिषद

सहसंचालक, (प्रशासन अंदाज व नियोजन) आयुक्त (शिक्षण) कार्यालय यांनी हा शासन निर्णय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावा.

## ६) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे



## ७) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे :

महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ अन्वये दि. १ जानेवारी १९६६ रोजी स्थापन झाली. १९७६ पासून 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ' असे नामाभिधान केले असून मंडळाचे कार्य अधिनियम/नियमांच्या आधारे चालते. राज्य मंडळाचे मुख्य कार्यालय पुणे येथे असून आठ विभागीय मंडळांमार्फत कामकाज चालते. मंडळाचे अध्यक्ष हे शिक्षण संचालक दर्जाचे अधिकारी असतात.

**राज्य मंडळाचे प्रमुख अधिकार व कर्तव्ये**

१) राज्य शासनाला सर्वसाधारणपणे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाशी संबंधित असलेल्या धोरणविषयक बाबींवर व विशेष करून खालील बाबींवर सल्ला देणे.

   अ) माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणाचा आकृतिबंध आखणे.

   ब) माध्यमिक शाळांमध्ये आणि उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये शिक्षणाचा समान दर्जा राखणे.

   क) माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणात राष्ट्रीय धोरणे व राज्याचे धोरण यांमध्ये समन्वय राखणे.

   ड) माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण, विद्यापीठातील शिक्षण आणि प्राथमिक शिक्षण यांमध्ये समन्वय ठेवणे.

२) अभ्यासक्रम व पाठ्यक्रम निर्धारित करण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सर्व इयत्तांसाठी तपशीलवार पाठ्यक्रम तयार करणे.

३) अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके तयार करणे व मंजुरी देणे.

४) शिक्षक वर्ग, इमारती, फर्निचर, साधने, लेखनसामग्री आणि माध्यमिक शाळांना आणि उच्च माध्यमिक विद्यालयांना लागणाऱ्या इतर गोष्टी यांच्या संबंधात प्रमाणभूत गरजा विहित करणे.

५) अंतिम परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देणे. (एस.एस.सी. व एच.एस.सी.)

६) गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या, विद्यावेतने, पदके, बक्षिसे आणि इतर पारितोषिके सुरू करणे व देणे आणि त्यासाठी शर्ती विहित करणे.

७) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा शैक्षणिक दर्जा कायम राखला जात असल्याबाबतची निश्चिती करून घेण्यासाठी शिक्षण संचालक किंवा शिक्षण विभागाचे इतर अधिकारी यांच्याकडून विशेष अहवाल व माहिती मागविणे आणि विभागीय मंडळाने मान्यता दिलेल्या कोणत्याही माध्यमिक शाळेकडून, उच्च माध्यमिक विद्यालयांकडून कोणतीही माहिती मागविणे.

८) अंतिम परीक्षेसाठी नियमित आणि खाजगी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंबंधीच्या सर्वसाधारण शर्ती विहित करणे. उपस्थिती आणि वर्तणूक यासंबंधीच्या ज्या शर्ती पूर्ण करण्यात आल्यावर विद्यार्थ्याला अशा कोणत्याही परीक्षेसाठी प्रवेश मिळेल आणि त्या परीक्षेला बसण्याचा हक्क प्राप्त होईल त्या शर्ती विनिर्दिष्ट करणे.

९) मृत्यूपत्रित दाने, देणग्या, दाननिधी, विश्वस्त व्यवस्था आणि कोणत्याही मालमत्तेची किंवा तिच्यातील हितसंबंधाची अथवा तिच्यातील हक्काची इतर हस्तांतरणे स्वीकारणे.

१०) वरील खंड (९) मध्ये उल्लेखिलेली कोणतीही मालमत्ता, हितसंबंध किंवा हक्क धारण करणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे व त्यांचा व्यवहार करणे.

११) विभागीय मंडळांनी मान्यता दिलेल्या माध्यमिक शाळांकडे (आणि कनिष्ठ महाविद्यालयांकडे) विहित फीची मागणी करणे व ती स्वीकारणे.

१२) विभागीय मंडळांनी मान्यता दिलेल्या परिसंस्थांतील विद्यार्थ्यांच्या शारीरिक, नैतिक व सामाजिक कल्याणाच्या प्रवर्धनासाठी उपाययोजनांची शिफारस करणे आणि त्यांच्या निवासस्थानाबाबतच्या व शिस्तीबाबतच्या शर्ती विहित करणे.

१३) राज्य मंडळाच्या आणि विभागीय मंडळाच्या कार्यालयात (सभापती, सचिव, सह–सचिव किंवा साहाय्यक सचिव वगळून) अधिकारी व कर्मचारी नेमणे आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती यांचे विनियमन करणे.

१४) राज्य मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या लाभार्थ भविष्यनिर्वाह निधी स्थापन करणे.

१५) राज्य मंडळाशी व विभागीय मंडळांशी संबंधित वार्षिक वित्तीय विवरणे मान्य करणे व राज्य शासनाला वार्षिक अर्थसंकल्पाच्या मंजुरीसाठी शिफारस करणे.

१६) विभागीय मंडळाच्या कामकाजाचे सर्वसाधारण निरीक्षण करणे व त्यावर देखरेख ठेवणे आणि त्यांच्या लेख्यांचे नियतकालिक निरीक्षण करणे.

१७) अभ्यासक्रमाचे व शिक्षण देण्याच्या व परीक्षेच्या पद्धतीचे मूल्यमापन करण्याच्या व तीत सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी सांख्यिकीय व अन्य संशोधन करणे.

१८) खुला शालेय पाठ्यक्रम धरून वेगवेगळ्या माध्यमांद्वारे, अंतिम परीक्षा घेतली जाणारे टपाली पाठ्यक्रम व इतर औपचारिक पाठ्यक्रम चालविणे.

१९) मंडळ अधिनियमांखालील आपली कामे कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशा समित्यांची नेमणूक करणे.

२०) मंडळ अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणण्यासाठी विनियम करणे.

२१) राज्य मंडळ आणि विभागीय मंडळे व त्यांच्या समित्या यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि मंडळ अधिनियमान्वये आणि त्याखालील विनियमान्वये जिची तरतूद करण्यात आली असेल अशी केवळ राज्यमंडळ, विभागीय मंडळे व त्यांच्या समित्या यांच्याच संबंधातील कोणतीही इतर बाब यांच्याशी संबंधित उपविधी तयार करणे.

२२) मंडळ अधिनियमान्वये किंवा त्याखालील त्यास प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे किंवा सोपविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

२३) मंडळ अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व कृती व गोष्टी करणे.

## ८) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे :

महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या वतीने या परिषदेतर्फे विविध परीक्षा घेण्यात येतात. या परीक्षा राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक आकांक्षा पूर्ण करून त्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच व्यावसायिक कौशल्ये संपादित करण्याच्या उद्देशाने घेतल्या जातात. बदलत्या काळाबरोबर अशा शैक्षणिक परीक्षांबरोबर प्रज्ञाशोध, गुणवत्ता विकासासाठी शिष्यवृत्ती परीक्षा तसेच व्यावसायिक स्वरूपाच्या परीक्षा सुरू करण्यात आलेल्या आहेत.

वरील विविध स्वरूपांच्या परीक्षा १९६८ पर्यंत शिक्षण संचालनालयाच्या 'ह' शाखेमार्फत घेतल्या जात असत. १९६८ मध्ये या परीक्षांचे नियोजन व आयोजन अधिक प्रभावी व परिणामकारकरीत्या होण्याच्या दृष्टीने शिक्षण संचालनालयान्तर्गत 'शासकीय परीक्षा मंडळ' स्थापन करण्यात आले.

सदर परीक्षांचे नियोजन करण्यासोबतच शैक्षणिक दर्जाचा विकास व मूल्यमापनाची विश्वासार्हता दृढ करण्याची तसेच प्रश्नपत्रिकांचे संपादन, परीक्षांसंबंधीची प्रक्रिया व मूल्यमापन पद्धती यांमध्ये भरीव सुधारणा घडवून आणण्याची जबाबदारी शासकीय परीक्षा मंडळावर सोपविण्यात आली.

शासन निर्णय क्र. एसपीइ/१०९५/(१०४/९५)/माशि–८, दिनांक ६ एप्रिल १९९६ नुसार 'शासकीय परीक्षा मंडळ' ऐवजी 'महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ' असे नामकरण करण्यात आले. परीक्षा मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक व व्यावसायिक स्वरूपाच्या परीक्षांना मिळणारा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाचे निगमनिकाय स्वरूपाचे स्वायत्त परिषदेत रूपांतर करण्याचा मनोदय होता. त्यानुसार १५ ऑगस्ट २००२ पासून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद स्थापन करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पुढील परीक्षा घेतल्या जातात.

१) पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (M.S.S.)

२) माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (H.S.S.)

३) राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (राज्यपातळी) (N.T.S.)

४) राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून प्रवेश परीक्षा (R.I.M.C.)

५) वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (G.C.C.)

६) अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा (२००४ अभ्यासक्रम)

७) प्रशिक्षित शिक्षक प्रमाणपत्र परीक्षा (टी. टी. सी.)

८) विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षा (शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांसाठी)

९) शारीरिक शिक्षण प्रमाणपत्र परीक्षा (सी. पी. एड.)

१०) शिक्षक पात्रता परीक्षा (टी.ई.टी.)

**विभागीय परीक्षा (शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांसाठी)**

अ) लिपिक संवर्गासाठी खातेनिहाय परीक्षा

उद्देश : खात्याच्या कामकाजाची व नियमांची माहिती अवगत करून देण्यासाठी

पात्रता : सेवेत असलेले व प्रशिक्षण पूर्ण केलेले लिपिक

अर्ज करण्याची पद्धती : विभागप्रमुखांकडून आयुक्त, म. रा. परीक्षा परिषद, पुणे १ यांचेकडे

माध्यम : मराठी

विषय : एकूण ५, गुण १०० प्रत्येकी

ब) पर्यवेक्षक पदासाठी अर्हता परीक्षा

पात्रता : मुख्य लिपिक असणे आवश्यक आहे.

अर्ज करण्याची पद्धती : विभागप्रमुखांकडून आयुक्त, म. रा. परीक्षा परिषद, पुणे १ यांच्याकडे

माध्यम : मराठी

विषय : एकूण ४, गुण १०० प्रत्येकी

क) सहायक शिक्षण उपनिरीक्षक व तत्सम अधिकाऱ्यांसाठी अर्हता परीक्षा

पात्रता : सहायक शिक्षण उपनिरीक्षक व तत्सम अधिकारी

अर्ज करण्याची पद्धती : विभागप्रमुखांकडून आयुक्त, म. रा. परीक्षा परिषद, पुणे १ यांच्याकडे

माध्यम : मराठी

विषय : एकूण ४, गुण १०० प्रत्येकी

याशिवाय शासनाचे इतर विभाग/कार्यालय यांनी विनंती केल्यास परीक्षा परिषद त्यांच्या परीक्षांचे आयोजन करते.


१) १९६८ पूर्वी – शिक्षण संचालनालय

२) १९६८ शासकीय परीक्षा मंडळ

३) १९९६ महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ

४) २००२ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद




साहाय्यक आयुक्त – वर्ग १, पदे – ३

मू. अ. – मूल्यमापन अधिकारी – वर्ग २, पदे – ७

स. वा. शा. नि. – सहायक वाणिज्य शाळा निरीक्षक – वर्ग २, पद – १

## ९) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे :

**'बालभारती' – इ. १ली ते ८वी :**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाची स्थापना २७ जानेवारी १९६७ रोजी झाली. शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावरील म्हणजे **इयत्ता १ ली ते ७ वी** (आणि आता **इयत्ता ८ वी**) या इयत्तांसाठी आवश्यक ती पाठ्यपुस्तके तसेच अन्य शैक्षणिक साहित्य राज्यात सर्वांकरिता प्रकाशित करणे हे मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. याव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने तयार केलेल्या माध्यमिक स्तरावरील पाठ्यपुस्तकांची छपाई, तसेच त्यांचे वितरण हे कामही मंडळाकडे आहे. शालेय विद्यार्थ्यांची संख्या आणि त्यांच्यातील वैविध्य लक्षात घेतल्यानंतर मंडळाच्या कामाची व्याप्ती केवढी प्रचंड आहे हे लक्षात येते.

पाठ्यपुस्तक मंडळाची स्थापना होण्यापूर्वी पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम प्रामुख्याने खाजगी प्रकाशकांच्याद्वारे होत असे. परंतु कोठारी आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्यानंतर या कामासाठी देशात विशेष स्वायत्त संस्था स्थापन व्हाव्यात हा विचार पुढे आला. या विचारातून महाराष्ट्र राज्यात 'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ' ही स्वायत्त संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेची नोंदणी सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० खाली शासनाच्या पुढाकाराने करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याचे माननीय शिक्षणमंत्री हे मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात तर शिक्षण राज्यमंत्री हे पदसिद्ध उपाध्यक्ष असतात. शिक्षण विभागातील शिक्षण संचालक या पदाशी समकक्ष असणारे एक अधिकारी हे मंडळाचे संचालक असतात. मंडळाच्या धोरणविषयक सर्व बाबी नियामक मंडळ आखते. नियामक मंडळावर काही शासकीय सदस्य आणि अन्य काही अशासकीय सदस्य असतात. राज्यातील शिक्षणतज्ज्ञ, विविध विषयांतील तज्ज्ञ, लेखक, संशोधक, अनुभवी शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, चित्रकार इत्यादी क्षेत्रांतील मंडळींचे सहकार्य मंडळाला आवश्यक असते आणि वेगवेगळ्या स्वरूपात मंडळ त्याचा लाभ घेते.

**उद्दिष्टे :**

१) प्रत्येक विद्यार्थ्याला मिळणाऱ्या **शिक्षणाची गुणवत्ता समान** असली पाहिजे. विद्यार्थी शहरातील एखाद्या मोठ्या शाळेत जावो वा वाडीवस्तीतील एखाद्या लहानशा शाळेत जावो, त्याच्या हातात पडणारे शैक्षणिक साहित्य सारखेच दर्जेदार असले पाहिजे.

२) तसेच सर्वांना परवडतील अशा किमतीत पाठ्यपुस्तके उपलब्ध झाली पाहिजेत ही देखील मंडळाची एक मुख्य जबाबदारी आहे. राज्यात ही जबाबदारी पार पाडण्यासाठी मंडळ सदैव प्रयत्नशील राहिले आहे.

**पाठ्यपुस्तकांच्या लेखन–संपादनाची कार्यपद्धती**

शालेय अभ्यासक्रमाला शासनाची मान्यता मिळाल्यानंतर आणि त्याच्या कार्यवाहीचा कार्यक्रम शासनाने निश्चित केल्यानंतर त्या क्रमाने नवीन अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तकांच्या लेखनाचे काम मंडळ सुरू करते. पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी मंडळाची समृद्ध अशी यंत्रणा आहे. अभ्यासक्रमात जेवढे विषय असतात त्या सर्व विषयांसाठी मंडळात विशेष अधिकारी तसेच तज्ज्ञांच्या समित्या आहेत. विषय समित्यांवर त्या त्या विषयातील साधारणत: पाच ते सहा तज्ज्ञ व्यक्ती असतात. त्यात विद्यापीठीय, महाविद्यालयीन प्राध्यापक, तसेच प्राथमिक शिक्षक व अन्य काही शिक्षणतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ असतात. राज्यातील सर्व विभागांना त्यात प्रतिनिधीत्व राहील याकडे लक्ष पुरविले जाते. प्रत्येक विषयासाठी मंडळात स्वतंत्र अधिकारी आहेत. हे अधिकारी त्या त्या विषय समितीचे सदस्य–सचिव म्हणून काम पाहतात. मंडळनिर्मित पाठ्यपुस्तके ही लहान मुलांसाठी असल्यामुळे त्यातील कलात्मक सजावटीचा भाग अतिशय महत्त्वाचा असतो. पाठ्यपुस्तकातील चित्रे

आशयाला अनुसरून, किती प्रमाणात, कुठे असावी याचीही तपशीलवार सूचना दिलेली असते. चित्रकाराने काढलेल्या चित्रामध्ये आशयाच्या इतर कोणत्याही त्रुटी राहू नयेत याचीही काळजी घेतली जाते. अशा प्रकारे अंतिमरीत्या तयार झालेले हस्तलिखित कलात्मक सजावट करून त्यानंतर निर्मिती आणि इतर प्रक्रियांतून जाते. मंडळाचा स्वतंत्र निर्मिती विभाग असून या विभागामार्फत दरवर्षी छपाईचे काम केले जाते.

**बालभारती संशोधन विभाग : अध्यक्ष SCERT चे संचालक, सचिव संशोधन अधिकारी :**

पाठ्यपुस्तक मंडळाच्या नामाभिधानात उल्लेख केल्याप्रमाणे मंडळात अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक यांच्या संशोधनासंबंधीचे कार्य चालते. त्यासाठी मंडळात स्वतंत्र संशोधन विभाग आहे. या विभागात एक संशोधन अधिकारी, एक संशोधन सहायक व एक लिपिक असा कर्मचारी वर्ग आहे.

मंडळाचे संशोधन कार्य संशोधन सल्लागार परिषदेच्या मार्गदर्शनाखाली चालते. या परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक असतात. त्याशिवाय ७ पदसिद्ध व १४ अपदसिद्ध सदस्यांचा समावेश संशोधन सल्लागार परिषदेमध्ये असतो. मंडळाचे संशोधन अधिकारी हे सदस्य-सचिव असतात.

राज्यात संशोधनाचे वातावरण निर्माण व्हावे, मंडळालाही संशोधनाचा उपयोग व्हावा याकरिता मंडळाने संशोधन प्रकल्प आर्थिक साह्य योजना १९७० पासून कार्यान्वित केली आहे. या योजनेअंतर्गत दरवर्षी सुमारे ४० ते ५० प्रकल्पांना आर्थिक साहाय्य केले जाते. प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षकांना हे प्रकल्प एक वर्षाच्या कालावधीसाठी देण्यात येतात. याशिवाय मंडळातर्फे मोठ्या व्याप्तीचे व मोठ्या कालावधीचे प्रकल्प घेण्यात येतात.

मंडळातर्फे संशोधकांना तसेच शिक्षण क्षेत्रातील जिज्ञासूंना उपयुक्त व्हावी याकरिता संशोधन प्रकाशने तयार करण्यात येतात. त्याचे विनामूल्य वितरण करण्यात येते.

**मंडळाची अन्य प्रकाशने :**

मुलांसाठी खेळ, बालगोष्टी, बालगीते, शिक्षकांची आत्मचरित्रे, कथा स्वातंत्र्याची, वंद्य वंदे मातरम्, शिल्पकार स्वातंत्र्याचे, गोष्ट स्वातंत्र्यलढ्याची इ.

**किशोर मासिक :**

महाराष्ट्रातील मुलांची ज्ञान आणि मनोरंजनाची गरज भागविण्यासाठी मंडळाने 'किशोर' हे मासिक सुरू केले आहे. मुलांची वाचनाची तसेच निर्मिती क्षमतेची गरज हे मासिक भागवते. उत्कृष्ट साहित्य, आशय संपन्नता, आकर्षक चित्रमय स्वरूप ही या मासिकाची वैशिष्ट्ये आहेत. मंडळाची पाठ्यपुस्तके उत्तम दर्जाची असल्याचे मत अनेक स्तरांवरून व्यक्त झाले आहे. मंडळाच्या किशोर मासिकाला राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवरील अनेक पारितोषिके मिळाली आहेत. असे असले तरी मंडळाची प्रकाशने सर्व दृष्टीने आदर्श आहेत असा मंडळाचा दावा नाही. कारण पुस्तकात सुधारणा करण्याची गरज सातत्याने निर्माण होत असते आणि म्हणूनच एकदा तयार झालेले पुस्तक पुन्हा पुन्हा संस्कारित होत असते.

## १०) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई :

केंद्र शासन पुरस्कृत व जागतिक बँक साहाय्यित जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प योजना टप्प्याटप्प्याने स्त्री साक्षरतेत मागासलेल्या जिल्ह्यांमध्ये किंवा ज्या जिल्ह्यात संपूर्ण साक्षरता कार्यक्रम पूर्ण झाला आहे अशा जिल्ह्यात अंमलात आणण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. त्यास अनुसरून पहिल्या टप्प्यात औरंगाबाद, लातूर, नांदेड, उस्मानाबाद व परभणी ह्या पाच जिल्ह्यांमध्ये 'जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प' जून १९९४ पासून कार्यान्वित करण्यास शासनाने मान्यता दिली होती. या जिल्ह्यात जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प योजनांचा आराखडा सूक्ष्म नियोजन पद्धतीने तयार केलेल्या प्रकल्प अहवालानुसार करण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य स्तरावर 'महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद'

या स्वायत्त संस्थेची स्थापना शा.नि.क्र.पी.आर.ई. १०९३/६८०७/प्राशि–३, दि. ७–५–९४ अनुसार करण्यात आली. 'महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद' ही संस्था सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० व मुंबई विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये पंजीकृत करण्यात आली आहे. या संस्थेच्या च.ज.ण. ला शासनाची मान्यता असून त्यानुरूप या संस्थेचे कार्य चालते. सन २००१ मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियानाची सुरुवात केली. राज्यात या अभियानाची अंमलबजावणी या संस्थेमार्फत केली जाते.

**कार्य :**

१) प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आवश्यक त्या कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करणे.

२) प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी प्रकल्प कालावधीत प्रत्येक वर्षीचे लक्ष्य विहित करणे व या लक्ष्याप्रमाणे कार्यक्रमाचे मूल्यमापन करणे.


३) संस्था उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, शिक्षक संघटना व इतर समर्पण वृत्तीचे कार्यकर्ते यांचा सहभाग मिळविणे.

४) सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

५) संस्थेच्या मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनच्या तरतुदीनुसार राज्य आणि जिल्हा स्तरावर योजनांची आणि उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करणे.

६) संस्थेच्या मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनच्या तरतुदीनुसार प्रकल्प जिल्ह्यातील योजनांचे कार्यान्वयन/नियोजन आणि योजनांतर्गत पदनिर्मिती या संदर्भातील सर्व अधिकार परिषदेकडे आहेत. या योजनांची कार्यवाही व पदे भरण्यासंबंधीची सर्व जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या मदतीने केली जाते.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद



## ११) महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, भडकलगेट, औरंगाबाद (मीपा – MIEPA)

### १) स्थापना –

महाराष्ट्रातील शिक्षण विभागातील विविध स्तरांवरील अधिकारी यांना शैक्षणिक नियोजन आणि आस्थापना याविषयी उद्बोधन व प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने शालेय शिक्षण विभाग निर्णय क्रमांक पीआरई/१०९३/६७०७/प्राशि–३, दिनांक ७ मे १९९४ अन्वये, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा) या संस्थेची औरंगाबाद येथे स्थापना केली आहे. ही संस्था राज्यस्तरीय असून तिला स्वायत्त संस्थेचा दर्जा देण्यात आला आहे. संस्था अधिनियम, १८६० अन्वये संस्थेची नोंदणी झाली असून संस्था नोंदणी क्रमांक एमएच औरंगाबाद ४३/९५, दिनांक १७–१०–१९९५ असा आहे.

### २) उद्‌दिष्टे –

(१) अनौपचारिक आणि प्रौढ शिक्षणासह शालेय शिक्षणाच्या संबंधात नियोजन व प्रशासनाची गुणवत्ता सुधारणे. (२) सर्वांसाठी शिक्षण हे ध्येय गाठण्यासाठी शैक्षणिक प्रशासकांकरिता प्रशिक्षण अभ्यासक्रम विकसन विकसित करणे. (३) सर्व शिक्षण मोहिमेच्या उद्‌दिष्ट प्राप्तीसाठी शैक्षणिक नियोजन आणि प्रशासनावर प्रशिक्षण घटक संच विकसित करणे. (४) महिला व बालकल्याण आरोग्य शिक्षण यांसारख्या विविध विभागांच्या कार्यात गावपातळीवर समन्वय घडवून आणणे. (५) प्रशासकीय आणि वित्तीय पद्‌धती/प्रक्रियेचे प्रशिक्षण. (६) शाळांसाठी परिणामकारक पर्यवेक्षण आणि मूल्यमापनासाठी नावीन्यपूर्ण पद्‌धती विकसित करणे. (७) जनजागृतीसाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि फोक मिडियाचा प्रभावी वापर करणे. (८) लिंगभाव जागृती कार्यक्रम शिक्षणातील समानता व गुणवत्ता साध्य करणे. (९) किमान अध्ययनक्षमता पद्‌धतीच्या संदर्भात पद्‌धती आणि तंत्रे यामध्ये प्रशिक्षण.

### ३) पाच दिवसीय अल्प मुदतीचा गरजाभिमुख अभ्यासक्रम – लाभार्थी –

(अ) महाराष्ट्र शिक्षण सेवा गट (अ) – शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक/निरंतर प्राचार्य, शासकीय विद्यानिकेतन, सहाय्यक संचालक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील ज्येष्ठ अधिव्याख्याता आणि समकक्ष अधिकारी.

(ब) महाराष्ट्र शिक्षण सेवा गट (ब) – उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विज्ञान सल्लागार रेक्टर/वॉर्डन शासकीय विद्यानिकेतन, राजपत्रित मुख्याध्यापक, अधीक्षक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिव्याख्याता आणि समकक्ष अधिकारी.

(क) महाराष्ट्र शिक्षण सेवा गट (क) – शिक्षणविस्तार अधिकारी, विज्ञान पर्यवेक्षक, केंद्रप्रमुख, शासकीय अध्यापक विद्यालयातील शिक्षक आणि समकक्ष अधिकारी.

### ४) पाच दिवसीय अल्पमुदतीचा गरजाभिमुख अभ्यासक्रम – विषय

**सर्व शिक्षा अभियान :**

(१) उद्‌दिष्टे, स्वरूप व उपक्रम (२) शिक्षण हमी योजना व पर्यायी नावीन्यपूर्ण शिक्षण (३) यथार्थपूर्ण आराखडा. (४) वार्षिक कृती आराखडा व अंदाजपत्रक (५) माहिती संकलन प्रपत्रे व संगणकीकरण (६) गट/समूह साधन केंद्र, शाळा अनुदान व कार्यवाही (७) नवोपक्रम व कार्यवाही (८) अपंग एकात्म शिक्षण (९) शाळा इमारत देखभाल, दुरुस्ती व बांधकाम (१०) कुटुंब सर्वेक्षण व पटनोंदणी मोहीम (११) शिक्षक पदे व वर्गखोल्या निश्चिती (१२) केंद्र शाळा अभिलेखे (१३) समाजाचा सहभाग (१४) म. प्रा. शि. प. वित्तीय नियमावली (१५) दूरस्थ शिक्षण.

**शैक्षणिक नियोजन :**

(१) सूक्ष्म नियोजन (२) शैक्षणिक विकासाची दर्शके (३) माहिती व तंत्रज्ञान (४) प्रकल्प पद्‌धती व कृती संशोधन (५) कोहर्ट विश्लेषण (६) शाळा प्रतवारी (७) शालेय तपासणी (८) पर्यावरण शिक्षण व जल संधारण (९) शालेय आरेखन (१०) पटनोंदणी व शिक्षक प्रक्षेपणे (११) गशिअ/शिविअ यांचा जॉब चार्ट (१२) पर्ट/सीपीएम (१३) ग्राम/वॉर्ड शिक्षण समिती (१४) प्लॅन व नॉन प्लॅन योजना (१५) निरंतर शिक्षण केंद्र सबलीकरण (१६) साक्षरता व


लोकसंख्या शिक्षण (१७) वंचित घटकांचे शिक्षण (१८) मुख्याध्यापक–अधिकार व कर्तव्ये (१९) शालेय व सहशालेय उपक्रम (२०) संस्थानिहाय नियोजन (२१) पाठ निरीक्षण नियोजन व कार्यवाही (२२) अध्यापक विद्यालय तपासणी (२३) संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन (TQM) (२४) अध्यापक विद्यालय डी.एड. प्रथम वर्ष प्रवेश (२५) दृक्‌श्राव्य साधन निर्मिती व वापर (२६) शिक्षक प्रशिक्षण नियोजन व कार्यवाही (२७) वसतिगृहाचे व्यवस्थापन.

**शैक्षणिक व्यवस्थापन :**

(१) वेळेचे व्यवस्थापन (२) माध्यमिक शाळा संहिता (३) कार्यालयीन व्यवस्थापन (४) शिक्षण विभागातील संरचना व कार्यपद्धती (५) राष्ट्रीय पातळीवरील शैक्षणिक संस्था–परिचय व कार्यपद्धती (६) राज्य पातळीवरील शैक्षणिक संस्था – परिचय व कार्यपद्धती (७) विभागीय पातळीवरील शैक्षणिक संस्था – परिचय व कार्यपद्धती (८) विविध शैक्षणिक योजना (९) डायट – रचना व कार्यपद्धती (१०) गोपनीय अहवाल व कार्यवाही (११) माहितीचा अधिकार (१२) लोकआयुक्त/न्यायालयीन प्रकरणे (१३) सेवापुस्तिका नोंदी, पडताळणी व कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता सूची (१४) आरक्षण अनुशेष व बिंदू नामावली (१५) विधानसभा/विधान परिषद तारांकित प्रश्न, लक्षवेधी (१६) नवीन शाळा परवानगी, मान्यता, मंडळ मान्यता (१७) प्राथमिक शिक्षण अधिनियम (१८) महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम, १९८१ म.ना.से. वेतन नियम १९८१ व सुधारित वेतन नियम, १९९८.

**कार्ये :** संस्थेमार्फत शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसाठी (महाराष्ट्र शिक्षण सेवा गट अ, गट ब व गट क) अल्प मुदतीच्या गरजाभिमुख प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. या प्रशिक्षणामध्ये सर्व शिक्षा अभियान, शैक्षणिक नियोजन, शैक्षणिक व्यवस्थापन, वित्त व लेखा तसेच व्यक्तिमत्त्व विकास या अंतर्गत विविध विषयांवर अभ्यासक्रम तयार करून त्यांचे प्रशिक्षण दिले जाते.

**रचना**




**संस्थेचे नियामक मंडळ :** अध्यक्ष, मा. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

सदस्य सचिव – संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद

सदस्य –
१) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
२) शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
३) अध्यक्ष, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
४) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
५) जिल्हाधिकारी, औरंगाबाद.

## १२) जवाहर बालभवन, मुंबई :

### पार्श्वभूमी –

मुलांशी सुसंवाद साधण्याचे काम बालभवन ही संस्था करत असते. परंतु बऱ्याचदा असे घडते की, आपल्या लहानपणी जे अनुभव आपल्याला मिळालेले नसतात, ज्या गोष्टीला आपण वंचित झालेलो असतो, तीच गोष्ट आपल्या मुलांच्या आयुष्यात त्यांना मिळावी अशी प्रत्येक पालकाची इच्छा असते. आपल्याला काय हवे आहे त्यापेक्षा मुलांना काय हवे आहे, त्यांना काय आवडते, त्यांची प्रतिभा कोणत्या कलेत जागृत होते त्यासाठीच विविध कलादालने, विविध उपक्रम, विविध शिबिरे, विविध मेळावे यांचे आयोजन केले जाते. मुलांची स्वजागृती निर्माण होऊन त्यांच्या कलेचा विकास साधावा, मुलांमध्ये आत्मविश्वास जागृत व्हावा, भावी आयुष्यात मुले नुसती परीक्षार्थी न राहता अभ्यासार्थी राहावी यासाठी खेळाच्या माध्यमातून हसतखेळत त्यांचे मन रमवत विविध कलांचा आस्वाद त्यांना घेता यावा व बालपणीचा काळ आनंददायी व्हावा यासाठी बालभवनाची निर्मिती झाली. हे कार्य घरी आणि शाळेतही घडू शकते. परंतु शाळांतील शिस्त व वेळेचे बंधन यामुळे मुलांच्या अभिव्यक्तीवर व स्वातंत्र्यावर मर्यादा येतात व त्यांचा सर्वांगीण व्यक्तिविकास काही अंशी खुंटतो.

मुलांना नाचणे, गाणे, चित्र काढणे, रंगवणे, बागडणे, मातीत खेळणे, प्रयोग करणे हे आवडते. संस्कारक्षम व संवेदनक्षम बालवयातील मुलांना कृतिशील करता करता त्यांच्यात दडलेल्या कलागुणांचा, प्रतिभेचा विकास नकळतपणे घडविणे हे फक्त बंदिस्त चौकटी नसलेल्या बालभवनाच्या मोकळ्या वातावरणामध्येच शक्य होते.

बालभवन म्हणजे मुक्तांगण. वेळापत्रक नाही, तास नाही घंटा नाही, अभ्यासक्रम नाही, आवडीनुसार हवे ते करण्याची संधी, मुलांच्या सर्जनशीलतेला, कल्पकतेला, स्वनिर्मितीला, नवीन आविष्काराला चालना देणारी संस्था म्हणजे बालभवन.

फुला–फुलांवर प्रेम करणाऱ्या पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेतून जवाहर बालभवनची निर्मिती झाली. मुंबईतील गिरगाव चौपाटीच्या समोरील रमणीय जागेत संस्थेची कोनशिला दि. २४ मे १९५० रोजी तत्कालीन उपपंतप्रधान श्री. वल्लभभाई पटेल यांच्या शुभहस्ते बसविली गेली. दि. २४ फेब्रुवारी १९५२ रोजी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेद्रप्रसाद यांनी बालभवनचे उद्घाटन केले. संस्थेचे पूर्वीचे बोधचिन्ह सिंहाचे **दात मोजणारा भरत व बोधवाक्य 'महतस्तेजसो बीजम्'** होते.

१९७७ साली बालभवनचे व्यवस्थापन 'महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन मंडळ' या नोंदणीकृत व स्वायत्त अशा मंडळाकडे सोपविण्यात आले. राज्याचे शिक्षणमंत्री – अध्यक्ष व शिक्षण राज्यमंत्री – उपाध्यक्ष म्हणून लाभलेल्या नियामक मंडळामध्ये शासकीय पदाधिकारी यांच्याबरोबर कला क्षेत्रातील नामांकित व्यक्ती अशासकीय सदस्य आहेत. याशिवाय राज्याच्या शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीचेही विविध कामकाजाला मार्गदर्शन मिळत असते. १९७७ साली मंडळाने पूर्वीचे बोधचिन्ह बदलून राष्ट्रीय फूल **'कमळ'** आणि बालकवींच्या कवितेतील 'आनंदी आनंद गडे' ही सोपी सुटसुटीत काव्यपंक्ती बोधवाक्य म्हणून स्वीकारली आहे.

**बालभवन प्रशासकीय रचना :**

महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन, मुंबई हे **१९७६–७७ पासून शालेय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली** कार्यरत असून खालील पदे अस्तित्वात आहेत.

१) संचालक, म.शि.से. वर्ग – अ

२) कार्यक्रम अधिकारी, म.शि.से. वर्ग – ब

३) प्रभारी अधिकारी

४) सहायक प्रभारी अधिकारी

५) लेखालिपिक

६) लिपिक, टंकलेखक

७) कलाशिक्षक

८) वाङ्मय कला निदेशक

९) शोभायमान कला निदेशक

१०) शिल्पकला निदेशक

११) संगीत निदेशक

१२) शिपाई (चतुर्थ श्रेणी कर्मचारी) – ३ पदे

१३) पहारेकरी – २ पदे

१४) सफाईगार – १ पद

१५) नाट्यकलानिर्देशक – १ पद

जवाहरलाल बालभवन, मुंबई ही राज्यस्तरीय संस्था असून राज्यात प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे अंतर्गत ७७ बालभवने विविध जिल्ह्यात असून दरवर्षी रु. ५,०००/– अनुदान शिक्षणाधिकारी यांचेमार्फत दिले जाते.

**बालभवनचे प्रवेश :**

बालभवनमध्ये ६ ते १६ वयोगटातील मुलांना सहजपणे प्रवेश मिळतो. बालभवनचे सदस्य होण्यासाठी अत्यंत कमी फी आकारण्यात येते. याशिवाय बालभवनची विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय सुविधा असून मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती भाषेतील उपयुक्त पुस्तके मुलांना घरी वाचण्यासाठी मिळतात व त्यासाठी अल्प अनामत रक्कम घेतली जाते.

**विविध कार्यक्रम :**

१) आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन – समूहगान, समूहनृत्य, कवितालेखन, वक्तृत्वस्पर्धा, नाट्यवाचन, प्रश्नमंजूषा (Science Quiz Contest), हस्तलिखित तयार करणे इत्यादी विविध स्पर्धांचे वर्षभरात आयोजन केले जाते.

२) सप्तांत वर्ग/अंशकालीन वर्ग – संगीत, नृत्य, संगणक, कराटे, स्केटिंग, वादन (कॅसिओ)

३) निवासी शिबिरे – नाट्यसंस्कार शिबीर, सहजीवन संस्कार शिबीर, बालमेळा इत्यादी

४) राष्ट्रीय सण व उत्सव साजरे करणे – स्वातंत्र्यदिन, शिक्षकदिन, दहीहंडी कार्यक्रम, ख्रिसमस, प्रजासत्ताक दिन इत्यादी दिनविशेषांतर्गत कार्यक्रम आयोजित केले जातात.

५) वृक्षारोपण कार्यक्रम, वृक्षदिंडी, पुस्तकप्रदर्शन, आरोग्य शिबीर, मुलांसाठी व पालकांसाठी व्याख्यानांचेही आयोजन केले जाते.

६) राखी तयार करणे, गणपतीमूर्ती, मखर, आकाशदिवे, पणत्या, रांगोळ्या इत्यादी विशेष कार्यशाळांचे आयोजनही केले जाते.

अन्य कार्यक्रमांतर्गत इंधन बचत पंधरवडा निमित्त चित्रकला स्पर्धा, बालदिन, वर्धापन दिनानिमित्त चित्रकला, शिल्पकला, हस्तकला स्पर्धा, रस्त्यावरील उपेक्षित मुले, अपंग मुले, आदिवासी भागातील मुले यांच्यासाठी सुद्धा विशेष शिबिराचे आयोजन केले जाते.

दरवर्षी हिवाळी व उन्हाळी सुट्ट्यांमध्ये विशेष छंदवर्गाचे आयोजन एप्रिल–मे महिन्यात केले जाते. उन्हाळी छंद वर्गाला प्रचंड प्रतिसाद मिळतो. यामध्ये हस्त, चित्र, शिल्पकलांबरोबरच ॲरोबिक्स, भरतनाट्यम्, कराटे, स्केटिंग, कॅलिग्राफी, पेंटिंग, विज्ञान प्रयोग, स्टेनग्लास पेंटिंग, मेंदी ब्युटी, सॉफ्ट टॉईज, शिवणकाम–भरतकाम अशा विविध कलांचे छंदवर्ग चालविले जातात.

**राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात सहभाग –**

(१) बालदिनानिमित्त बालमेळावा – १३ ते २० नोव्हेंबर नवी दिल्ली येथील कार्यक्रमात मुले सहभागी होतात.

(२) बालश्री स्पर्धा – 'बालश्री' पुरस्कारासाठी (प्राथमिक फेरी) (१) राज्यस्तर (२) आंतरराज्य (Zonal Level) (३) National Level राष्ट्रीय स्तरावर स्पर्धांचे आयोजन होते. ही स्पर्धा ४ विविध क्षेत्रांत निवडण्यात येते.

१) सृजनात्मक कला Creative Art

२) सृजनात्मक लेखन Creative Writing

३) विज्ञान संशोधन Creative Science

४) रंगमंच कला Performing Art

खरं म्हणजे 'पद्मश्री' पुरस्काराप्रमाणे 'बालश्री' पुरस्कारासाठी ९ ते १६ वयोगटातील विद्यार्थ्यांना कलाआविष्काराच्या सादरीकरणाची संधी देऊन त्यातील राष्ट्रीय पातळीवरील निवडलेला विद्यार्थी 'बालश्री' पुरस्कार राष्ट्रपती भवनामध्ये स्वीकारतो. त्यामुळे ही स्पर्धा नसून निवड आहे असे समजले जाते.

(३) Young Environmentalist Conference - राष्ट्रीय बालभवन, नवी दिल्ली तर्फे ३ ते ४ दिवसांची बालवैज्ञानिकांची परिषद देशातील मोठ्या शहरात आयोजित केली जाते. त्यानिमित्त प्रत्येक राज्यातील २ विद्यार्थ्यांना विज्ञानविषयक लेख, माहिती सादर करणे, परिषदेमध्ये प्रयोग करणे, निरीक्षणे, सहल इत्यादींमध्ये सक्रिय सहभागाची संधी व वैज्ञानिक विचारांचे आदान प्रदान करण्याची संधी मिळते.

बालकांच्या जीवनात आनंद फुलवणारी व भावी पिढी घडविण्यात योगदान देणारी बालभवने ही एक चळवळ म्हणून विकसित व्हावी.

❑❑❑

**जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था District Institute Educational Continuous Professional Development (DIECPD) या संस्थेची पुनर्रचना व बळकटीकरण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक डायट-२०१८/प्र. क्र. १७/२०१८/प्रशिक्षण.**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २७ एप्रिल, २०१८

**वाचा :** १) मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे D.O. Letter No.४६-१/२०१७-EE.९, दि. २९ ऑगस्ट, २०१७.

२) मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे DIET सक्षमीकरण संदर्भात, दि. ७ सप्टेंबर, २०१७ च्या मार्गदर्शक सूचना.

**प्रस्तावना :**

भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचना २०१६ नुसार देशभरातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या पुनर्रचनेमध्ये एकवाक्यता यावी म्हणून काही मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. यामध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (महाराष्ट्र विद्या प्राधिकरण), जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (DIECPD), गटसाधन केंद्रे (BRC) व शहरसाधन केंद्रे (URC) समूहसाधन केंद्रे (CRC) यामध्ये समन्वयाची सुस्पष्ट भूमिका महत्त्वाची असल्याने अधोरेखित करण्यात आले आहे. त्यादृष्टीने सुस्पष्ट संरचना विकसित केली जावी असे स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रशिक्षण गरजा निश्चित करणे त्यानुसार प्रशिक्षण घटकसंच विकसित करणे, प्रशिक्षणाची वार्षिक दिनदर्शिका विकसित करणे , प्रशिक्षणाची परिणामकारकता वाढविणे या कामी सर्व यंत्रणांची भूमिका व भविष्यवेधी दृष्टी (Vision) महत्त्वाची ठरणार असल्याचे सूचित करण्यात आले आहे. विविध विषयात तज्ज्ञत्व असणारे तज्ज्ञमार्गदर्शक, संशोधक, विद्यापीठातील मार्गदर्शक या संदर्भ समूहांचा प्रभावी वापर करून गरजाभिमुख संदर्भ साहित्य, अभ्यासक्रम साहित्य विकसित करण्याच्या दृष्टीने राज्य स्तरावर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (महाराष्ट्र विद्या प्राधिकरण) व जिल्हा स्तरावर राज्य शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था यांनी महत्त्वाचे योगदान देण्याविषयीची बाबही अधोरेखित करण्यात आली आहे. या सर्व संस्थांच्या कामकाजामध्ये समन्वय राखण्यासाठी संस्थांच्या बळकटीकरणासाठी पुर्नरचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

विविध शासन निर्णयान्वये मंजूर असलेल्या पदांनुसार तसेच मनुष्यबळ विकास मंत्रालय भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्थांमध्ये विभागांची पुढीलप्रमाणे चार विभागामध्ये रचना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभाग |
|---|---|
| १. | शिक्षक शिक्षण विभाग<br>इंग्रजी, मराठी, गणित, उर्दू, विज्ञान, व सामाजिक शास्त्र विभाग [Teacher Education Department (English, Marathi, Mathematics, Urdu, Science and Social Science Department] |
| २. | व्यवसाय विषय शिक्षण, सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास प्रशिक्षण (सीपीडी), व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग [Vocational Subject Education, Continuous Professional Development Training (CPD), Vocational Guidance and Physiological Guidance Department] |
| ३. | संशोधन, क्षेत्रीय आंतरक्रिया, समता विभाग [Research, Field Interaction, Equity Department] |
| ४. | अभ्यासक्रम विकसन व मूल्यमापन, शैक्षणिक व माहिती तंत्रज्ञान, संदर्भ साहित्य विकसन विभाग [Curriculum Development and Evaluation, Educational and Information Technology, Reference Material Development Department] |

वरील विभागांव्यतिरिक्त राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (महाराष्ट्र विद्या प्राधिकरण) स्तरावर असलेले विभाग / विषय जिल्हा स्तरावर राबविण्याकरिता मदत करणे

**२. जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्थांची कार्ये :**

i. जिल्ह्यातील १०० टक्के मुलांची (CWSN सह) पटनोंदणी व उपस्थिती याकरिता शाळांमध्ये अध्ययनपूरक वातावरण निर्माण करणे.

ii. राज्य प्रशिक्षण धोरणानुसार जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी गरजाभिमुख व मागणीनुसार प्रशिक्षण उपक्रमांची वार्षिक दिनदर्शिका विकसित करून प्रभावी अंमलबजावणी करणे.

iii. विद्यार्थी संपादणूक चाचणी, शासकीय व अशासकीय संस्थांनी केलेली सर्वेक्षणे यावरून जिल्ह्याची शैक्षणिक सद्यस्थिती विश्लेषण करून आवश्यकतेनुसार जिल्हास्तरीय कृतिकार्यक्रमांची निर्मिती व अंमलबजावणी करणे.

iv. देशपातळीवरील, राज्यपातळीवरील, विविध शैक्षणिक संशोधने यांच्या निष्कर्षानुसार जिल्ह्यात शैक्षणिक कृतिकार्यक्रमांची रचना करणे. जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी शैक्षणिक संशोधन करणे.

v. जिल्ह्यातील सेवापूर्व प्रशिक्षणाची गुणवत्ता संवर्धन व सनियंत्रण करणे.

vi. शिक्षक व क्षेत्रीय अधिकारी यांच्या व्यावसायिक विकासासाठी प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे.

vii. विविध शैक्षणिक अध्ययन अनुभव, शैक्षणिक यशोगाथा, प्रयोग यांचे आदान-प्रदान करण्यासाठी शैक्षणिक संस्कृती विकसित करणे.

viii. जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी विविध पातळ्यांवरील क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नियमित नियोजन व आढावा बैठका घेऊन गुणवत्ता विषयक कामकाज आढावा, मार्गदर्शन व सहाय्य करणे.

ix. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी गटसाधन केंद्र (BRC) व समूहसाधन केंद्र (CRC) व शहरसाधन केंद्रे (URC) मधील मनुष्यबळाचे क्षमता संवर्धन व सनियंत्रण करणे.

x. महाराष्ट्र विद्या प्राधिकरण व प्रादेशिक विद्या प्राधिकरण यांचेकडील निर्देशाप्रमाणे जिल्ह्यातील पूर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सक्षमीकरणासाठी शिखर संस्था म्हणून निर्धारित केलेली व जिल्ह्याची शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनसाठी आवश्यक कृतिकार्यक्रम राबविणे व अनुषंगिक सर्व शैक्षणिक व प्रशासनिक कार्ये करणे.

xi. जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांसाठी श्रेणीसुधार कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

xii. विविध प्रशिक्षणांचे प्रभावी व्यवस्थापन, नियोजन व अनुधावन जिल्ह्यातील शिक्षक, क्षेत्रीय अधिकारी यांचे सक्षमीरकण करण्यासाठी कार्य करणे.

xiii. विविध शासकीय व अशासकीय संस्था (NGO) यांच्या सहकार्याने शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनाचे विविध उपक्रम राबविणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१८०४२७१७२४१५०१२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**Nand Kumar**

Digitally signed by Nand Kumar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou= School Education And Sports Department, postalCode=400032, St = Maharashtra, 2.5.4.20=c98b875883c76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, serial Number = dcd3577ebf0e05e2a8b57095c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a362ebc5, cn = Nand Kumar
Date : 2018.04.27. 17:27:23 + 05'30'

**(नंद कुमार)**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री
२. मा. मंत्री, (शालेय शिक्षण)
३. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सह सचिव/उप सचिव शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), पुणे.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
९. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१०. प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था सर्व
११. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
१२. निवड नस्ती (प्रशिक्षण)

❑❑❑

# ३. महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण - २०११

**महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण.**

**महाराष्ट्र शासन**
**समान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : टीआरएन - ०९/प्र. क्र. ३९/०९/१२-अ.**
दिनांक : २३ सप्टेंबर, २०११

**वाचा** : १) केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण विभागाचे कार्यालयीन ज्ञापन क्र. १३०२४/१/२००८-टीआरजी-१, दि. ५.९.२००८.

२) यशदा या संस्थेचे अ.शा.पत्र क्र. बीओएसटी - एडीएम/२०११/एसटीपी, दि. ६/४/२०११

**प्रस्तावना** :

राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरिता राज्यातील सर्व कर्मचारीवृंद यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय व तांत्रिक बदलांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना सामोरे जाणे व प्रशासनामध्ये बदलासाठी आवश्यक असणारी लवचीकता साध्य करणे यासाठी देखील सर्व स्तरावर प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. सध्या प्रशिक्षण देण्याचे कार्य विविध स्तरावर असल्याने, त्यामध्ये एकसूत्रता आणून सध्याच्या प्रशिक्षण संस्था अद्ययावत करणे आवश्यक आहे. यादृष्टीने महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण ठरविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

राज्य प्रशिक्षण धोरणाच्या मध्यवर्ती कल्पनेत खालील बाबी समाविष्ट आहेत- सर्वांसाठी प्रशिक्षण असेल, प्रशिक्षण निरंतर दिले जाईल, गरजांवर आधारित प्रशिक्षण देण्यात येईल, राज्याच्या मानव संसाधन विकासाबरोबर प्रशिक्षण जोडले जाईल, सध्या अस्तित्वात असलेल्या प्रशिक्षण सोयी-सुविधांचे बळकटीकरण व योग्य वापर करण्यात येईल. 'यशदा' ही शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत राहील, राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्था यशदाला संलग्न असतील, आवश्यकतेनुसार राज्य, विभागीय व जिल्हा प्रशिक्षण संस्थांची निर्मिती करणे, सर्व प्रशिक्षण संस्थांना स्वायत्तता देणे, विभाग ते कार्यालय स्तरापर्यंत प्रशिक्षण व्यवस्थापकांची नेमणूक करणे, प्रशिक्षणाला अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा नियमांशी निगडित करणे, प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यासंदर्भात आराखडा तयार करणे व आराखड्यावर आधारित प्रशिक्षणासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करणे. प्रशिक्षण धोरण योजना ही योजनांतर्गत योजना म्हणून राबविणे. महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरणसंबंधाने शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

**१. प्रशिक्षण धोरण राबविण्यासाठीची व्यवस्था :**

**१.१** राज्य प्रशिक्षण धोरण कार्यान्वित करण्यासाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य प्रशिक्षण कृती दल (State Training Task Force) स्थापन करण्यात येत असून त्यामध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील.

**मुख्य सचिव – अध्यक्ष**

अ.मु.स./प्र.स. (सेवा), सामान्य प्रशासन विभाग–उपाध्यक्ष

अ.मु.स./प्र.स./सचिव (प्र.सु.व र. व का.), सामान्य प्रशासन विभाग–सदस्य असतील.

अ.मु.स./प्र.स./सचिव, ग्राम विकास विभाग–सदस्य

अ.मु.स./प्र.स./सचिव, नगर विकास विभाग–सदस्य

अ.मु.स./प्र.स./सचिव, महसूल–सदस्य

अ.मु.स./प्र.स./सचिव, वित्त–सदस्य

अ.मु.स./प्र.स./सचिव, नियोजन–सदस्य

अ.मु.स./प्र.स./सचिव, सार्वजनिक आरोग्य–सदस्य

अ.मु.स./प्र.स./सचिव, शालेय शिक्षण–सदस्य

पोलिस महासंचालक–सदस्य

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख)–सदस्य

महासंचालक, यशदा–सदस्य सचिव

या कृतिदलाची भूमिका खालीलप्रमाणे असेल व सदर दलाची बैठक अध्यक्षांच्या मान्यतेने आवश्यकतेनुसार घेण्यात येईल. सदर दलाची बैठक वर्षातून कमीत कमी दोन वेळा घेण्यात येईल.

**(अ)** राज्याच्या मानव संसाधन विकासामध्ये प्रशिक्षण धोरणाला योग्य स्थान मिळण्याबाबत प्रयत्न करणे.

**(ब)** राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्याकरिता प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रोत्साहन देणे.

**(क)** राज्यातील सर्वोच्च कृतिदल म्हणून काम करताना प्रशासनातील प्रशिक्षण प्रक्रियेबाबत मूल्यमापन करून धोरणात्मक निर्णय घेणे.

**(ड)** राज्याची प्रशिक्षण क्षमता मजबूत करण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर निधी उभारण्यासाठी प्रमुख प्रतिनिधी म्हणून काम पहाणे.

**१.२** यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेला राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्था संलग्न करण्यात येत असून यापुढे यशदा ही 'शिखर प्रशिक्षण संस्था' म्हणून कार्यरत राहील. राज्यातील प्रशिक्षण संस्थासाठी विविध गुणवत्ता मानके निश्चित करणे, पायाभूत व बढती नंतरच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करणे, विषयवस्तू (Content) बाबत मार्गदर्शन करणे, कृति संशोधनासाठी मार्गदर्शन करणे, परिणामकारक प्रशिक्षणांसाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करणे, मूल्यमापन करणे इ. कामे देखील यशदा करेल.

**१.३** यशदामध्ये स्वतंत्र राज्य प्रशिक्षण नियोजन व मूल्यमापन यंत्रणा [State Training Planning nnd Evaluation Agency (STPEA)] स्थापन करण्यात येत असून यशदा राज्याच्या प्रशिक्षणाचे नियोजन व मूल्यमापन यांची जबाबदारी पार पाडील. सदर यंत्रणा त्रयस्थ यंत्रणा म्हणून विभागाच्या प्रशिक्षण संस्थांचे व प्रशासकीय प्रशिक्षण संस्थांचे नियतकालिकपणे वार्षिक मूल्यमापन करेल.

**१.४** राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्था प्रशिक्षण नियोजन व सनियंत्रण कक्ष [ Training Planning and Monitoring Cell (TPMC)] स्थापन करतील, त्या संस्थेतील प्रशिक्षणाचे नियोजन तसेच प्रशिक्षणाच्या निविष्ठा (Input), प्रक्रिया व प्रशिक्षणाचे परिणाम यांचे सनियंत्रणाची जबाबदारी संबंधित कक्ष सांभाळेल.

**१.५** प्रत्येक शासकीय विभाग, पंचायत राज संस्था, मंडळे व मिशन युनिट हे राज्य ते स्थानिक स्तरापर्यंत प्रत्येक कार्यालयात शक्यतो आस्थापनेवर नियंत्रण असणारा प्रशिक्षण व्यवस्थापक नेमण्याची कार्यवाही करतील. प्रशिक्षण व्यवस्थापक संबंधित विभागाच्या/कार्यालयाच्या संबंधित स्तरासाठी कर्मचारी/अधिकारी यांच्या प्रशिक्षण समन्वयाचे काम करणे, संस्थांचे प्राथमिक सर्वेक्षण करणे, प्रत्येक योजना व कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी काही आर्थिक तरतूद आहे का ते शोधणे, विभागामध्ये प्रशिक्षण देण्याकरिता अर्थसंकल्पीय तरतूद प्राप्त करून घेण्यासाठी प्रस्ताव तयार करणे, संस्थेसाठी ५ वर्षांची प्रशिक्षण रूपरेषा व वार्षिक प्रशिक्षण आराखडा तयार करणे, प्रत्येक पदाला आनुषंगिक अशा प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण अहवाल तयार करणे आदी कामे करतील. तसेच कर्मचाऱ्यांची योग्य प्रशिक्षणासाठी निवड करणे, सेवाप्रवेश, पदोन्नती व बदलीचेवेळी, तसेच ५ ते ७ वर्षात एकदा उजळणी प्रशिक्षण मिळावे यासाठीची व्यवस्था तयार करणे व अंमलात आणणे, प्रत्यक्षात पार पडलेल्या प्रशिक्षणाबाबत नोंद घेऊन प्रशिक्षकांशी चर्चा करुन प्रशिक्षणाचे संनियंत्रण करणे, प्रशिक्षित लोकसेवकांमधून उत्तम प्रशिक्षक शोधून त्यांचे एक दल बनविणे आणि संस्थेतील विशेष तज्ज्ञांचे प्रशिक्षण घेऊन त्यांना प्रशिक्षण घेण्याबाबत प्रमाणित करणे. सल्लागार व तज्ज्ञांची निवड करून त्यांचेमार्फत हस्तपुस्तिका व प्रशिक्षण साहित्याची निर्मिती करणे तसेच ऑन दि जॉब प्रशिक्षण घेण्याचा प्रयत्न करणे, प्रशिक्षण कार्यक्रम व प्रत्यक्ष कामकाज यांचा समन्वय साधणे इ. कार्ये करतील.

**२. प्रशिक्षणाचे प्रकार :**

**२.१** राज्य शासकीय कर्मचाऱ्यांस तांत्रिक प्रशिक्षण, प्रशासनिक व सेवांतर्गत प्रशिक्षण तसेच काही विशिष्ट प्रवर्गांसाठी विदेशातील प्रशिक्षण देखील देण्यात येईल.

**२.२ तांत्रिक प्रशिक्षणाची रचना व अंमलबजावणीचा आराखडा :** सदर प्रशिक्षण संबंधित विभागाच्या आणि त्या विभागाच्या अधिनस्त संस्थांच्या मूळ तांत्रिक कामकाजाशी संबंधित असेल. तांत्रिक प्रशिक्षणाची आखणी, विकसन, नियोजन, समन्वय, अंमलबजावणी तसेच प्रशिक्षणार्थीचे मूल्यमापन करून त्यांना प्रमाणित करण्याची जबाबदारी प्रत्येकि विभाग आणि त्यांच्या अस्तित्वात असलेल्या प्रशिक्षण संस्थांची राहील. अशा संस्थांना अधिक बळकट करण्यात येऊन त्यांना स्वायत्तता व अधिकार देण्यात येईल. बदलीने नियुक्ती झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाचे स्वरूपानुसार काम करण्यासाठी विशिष्ट ज्ञानाची आवश्यकता असल्यास, अशा अधिकाऱ्यांना विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील प्रशिक्षण संस्थांमध्ये सक्तीने प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे. संबंधित विभागांनी तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी वार्षिक प्रशिक्षण आराखडा करून खर्चाची तरतूद करावी.

**२.३ प्रशासनिक व सेवांतर्गत प्रशिक्षणाची रचना तसेच अंमलबजावणीचा आराखडा :** सदर प्रशिक्षण हे ज्ञान कौशल्य व दृष्टिकोन यामधील यथायोग्य बदलासाठी राहील. हे प्रशिक्षण सर्व विभागांच्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक असेल. (लोक प्रशासन, सामाजिक बांधीलकी, प्रकल्प व्यवस्थापन, सुप्रशासन, व्यवस्थापकीय कौशल्य, अर्थसंकल्पीय बाबी, मनुष्यबळ विकास-आस्थापनाविषयक कामकाज, संबंधित कायदे, संगणक प्रशिक्षण इ.)

सदर प्रशिक्षण, प्रशासनाची सर्वसाधारण क्षमता बांधणी, प्रेरणा व सुयोग्य कामकाजासाठी अतिशय महत्त्वाचे असल्याने सर्व पदांवरील कर्मचाऱ्यांना सदर प्रशिक्षण सक्तीने देण्यात यावे. या प्रशिक्षणाची जबाबदारी शिखर प्रशिक्षण संस्था आणि प्रशिक्षणाची बांधणी, आखणी, तज्ज्ञप्रशिक्षक तयार करणे, मूल्यमापन, परीक्षेचे वेळापत्रक ठरविणे व प्रमाणपत्रे देणे आदी कामे पाहाणारी राज्य विकास संस्था म्हणून यशदाकडे व विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था तसेच जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण केंद्राकडे असेल. हे प्रशिक्षण सर्व पदांवरील कर्मचाऱ्यांना विशेषत: त्या पदावर नियुक्त झाल्यानंतर सक्तीचे असेल.

महाराष्ट्र राज्यातील सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या टप्प्यांवर प्रशिक्षण देण्यात येईल. कनिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचा कालावधी दिवसांपेक्षा एकूण तासात ठरविणे आवश्यक राहील.

**(अ) पायाभूत प्रशिक्षण कालावधी :** गट अ – सहा आठवडे, गट ब – सहा आठवडे, गट क – दोन आठवडे व गट ड – एक आठवडा

**(ब) पदोन्नतीनंतरचा प्रशिक्षण कालावधी :** गट अ – दोन आठवडे, गट ब – दोन आठवडे, गट क – एक आठवडा व गट ड – तीन दिवस (२१ तास)

**(क) उजळणी प्रशिक्षण कालावधी :** या प्रकारचे प्रशिक्षण किमान ५ ते ७ वर्षांतून एकदा ५ दिवसांसाठी देण्यात येईल परंतु ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी सदर कालावधीत दुसरे कोणतेही प्रशिक्षण घेतले नसेल, त्याच अधिकारी व कर्मचारी यांना सदरचे प्रशिक्षण देण्यात येईल.

**(ड) बदलीनंतरचे प्रशिक्षण कालावधी :** या अंतर्गत ज्या अधिकारी व कर्मचारी यांची विभागाबाहेर बदली होते तसेच बदलीनंतर त्यांच्या कामाच्या स्वरूपात बदल होतो फक्त त्याच अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रशिक्षणाचा कालावधी १ ते ३ दिवसांसाठी असेल (७ ते २१ तास).

**(इ) नवीन विषयाची तोंडओळख प्रशिक्षण (Orientation Training) :** या प्रशिक्षणाचा कालावधी १ ते ३ दिवसांसाठी असेल (७ ते २१).

वरील उजळणी प्रशिक्षण वर्ग अ व ब मधील अधिकाऱ्यांना पायाभूत प्रशिक्षणानंतर कमीतकमी ४ वर्षानंतर मात्र ६ वर्ष पूर्ण होण्यापूर्वी देण्यात यावे. नवीन विषयांची तोंडओळख करण्यासाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करणे अपेक्षित राहील.

**२.४ विदेशातील प्रशिक्षण :** मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्य प्रशिक्षण कृतिदल विशिष्ट संवर्गासाठी विदेशातील प्रशिक्षण देण्यासंबंधी धोरण ठरवेल व निर्णय घेईल.

**३. प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यासाठीची व्यवस्था व प्रशिक्षण संस्थांची कार्ये :**

**३.१ शासकीय विभागांच्या सर्व स्तरावरील प्रशिक्षण संस्था** आवश्यतेनुसार विभागाचा कार्यात्मक अभ्यास करतील. प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण करतील. विभागीय व व्यावसायिक परीक्षा आयोजित करतील. विभागाचे कार्यक्रम व योजना यांच्यासाठी सर्व पातळीवरील लोकांना सामाविष्ट करून विशेष कार्यशाळा घेतील. विभागासाठी मॅन्युअल्स् व प्रशिक्षण साहित्य तयार करतील. विभागांच्या प्रशिक्षकांसाठी विषयानुसार प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करतील. विभागाशी संबंधित विषयात संशोधन करतील. आवश्यकतेप्रमाणे विभागाचे कार्यक्रम व योजना यांचे विभाग प्रमुखांच्या वतीने मूल्यमापन करतील. त्याचप्रमाणे प्रत्येक विभागाचे बिझनेस प्रोसेस रिइंजिनिरींग करतील तसेच शासकीय धोरण, योजना व कार्यक्रमात उचित बदल आणण्यासाठी शासनाला शिफारस करतील. सदरच्या प्रशिक्षण संस्था संबंधित विभागांच्या त्या स्तरावरील विभाग प्रमुखांच्या नियंत्रणाखाली राहतील. सर्व शासकीय विभागांच्या प्रशिक्षण संस्थांचे मूल्यमापन वरिष्ठ प्रशिक्षण संस्था म्हणून यशदा करेल.

**३.२ प्रशासनिक व सेवांतर्गत प्रक्रिया** : ही तीन स्तरावर कार्यान्वित केली जाईल.

**(अ)** पहिल्या म्हणजे राज्य स्तरावर यशदा ही शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून खालीलप्रमाणे कार्य करेल.

विविध विषयांबाबत प्रशिक्षक तयार करण्याकरिता प्रशिक्षण आयोजित करणे. तसेच प्रशिक्षण व्यवस्थापकांना सखोल प्रशिक्षण देणे, संगणक व माहिती तंत्रज्ञानामध्ये विकेंद्रित प्रशिक्षण देण्यसााठी म्हणून संस्था म्हणून काम पाहण्याखेरीज राज्य आयोजित संशोधनासाठी सेवा सल्ला देणे. राज्य संसाधन संस्था म्हणून काम पाहणे आणि

महाराष्ट्र राज्याची व्हर्च्युअल ॲकॅडमी म्हणून दूरस्थ व ई–शिक्षणासाठी राज्य यंत्रणा तसेच प्रलेख व प्रशिक्षण साहित्याची निर्मिती व प्रसारण करणे. राज्य शासनाच्या सर्व विभागांनी तयार केलेल्या माहितीचा डाटाबेस तयार करणारी संग्रह संस्था म्हणून काम पाहणे यशदाला प्रशासकीय अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्याबाबत आवश्यक ती पावले उचलली जातील व त्यासाठी वाढीस जमीन देण्यात येईल. तसेच शासकीय योजनांचा आवश्यकतेनुसार शासनाच्या वतीने आढावा व मूल्यमापन करून आवश्यक त्या शिफारसी करण्यामध्ये व प्रशिक्षण मूल्यमापनामध्ये यशदाची मुख्य भूमिका राहील. तसेच विभागाचे बिझनेस प्रोसेस रिइंजिनिअरींगचे काम हाती घेणे त्या विभागाच्या कामामध्ये कशी सुधारणा करता येईल हे प्रस्तावित करणे व त्याचप्रमाणे विभागांना मार्गदर्शन करणे. ज्या विभागांच्या लोकांशी प्रत्यक्ष संपर्क येतो अशा विभागांसाठी हे काम प्राधान्याने घेतले जाईल.

**(ब)** दुसऱ्या म्हणजे विभागीय मुख्यालयाच्या स्तरावर विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था राहतील. त्यांची कार्ये/भूमिका पुढीलप्रमाणे असेल.

विभागीय मुख्यालयात असलेल्या वर्ग–ब व क च्या लोकसेवेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेणे. तसेच विशेष योजना व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडलेल्या गटाकरिता विभागवार विशेष कार्यशाळा आयोजित करणे, संबंधित विभागातील स्थानिक स्वराज्य संस्था व शासनाचे अंगीकृत व्यवसाय यांच्या प्रशिक्षण गरजा पूर्ण करण्यासाठी क्षेत्रीय संस्थांना प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे. त्याखेरीज राज्य स्तरावर संशोधनासाठी माहिती सामग्रीचे विकसन, यशदा व राज्यशासनाशी संपर्क साधणे व मूल्यमापन करणे.

सदरच्या प्रशिक्षण संस्ता संबंधित विभागीय आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली राहतील.

**(क)** प्रशिक्षण प्रक्रियेचा तिसरा व अंतिम स्तर सर्व जिल्ह्यामधील जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण केंद्र असतील. जिल्हा प्रशिक्षण पथक विकेंद्रित प्रशिक्षणाचे महत्त्वाचे काम करतील आणि त्यांची भूमिका पुढीलप्रमाणे असेल–

प्रत्येक जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण केंद्रात एक विषयतज्ज्ञांचा गट असेल. जिल्ह्याची पार्श्वमूभी व गरज लक्षात घेऊन जिल्हा केंद्रित प्रशिक्षण विषयांची सूची निश्चित करण्यात येईल व त्याप्रमाणे जिल्हा प्रशिक्षण संस्थांची रचना करण्यात येईल. सदर गटांचे प्रशिक्षण हे यशदा. विभागीय प्रशिक्षण संस्था किंवा विविध प्रशिक्षण संस्थांमध्ये आयोजित करण्यात येईल आणि यशदाचे प्रशिक्षणार्थींचे प्रतिनिधी व यशदा मान्यताप्राप्त प्रशिक्षक हे जिल्हा प्रशिक्षण संस्थांना मार्गदर्शन करून या गटाच्या कामाबद्दल संबंधित प्रादेशिक संस्था व यशदा यांना अवगत करतील.

जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या सर्व प्रशिक्षण संस्थांचे मूल्यमापन यशदा करेल. जिल्हा स्तरावरील प्रशिक्षण संस्था संबंधित जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली राहतील.

**३.३** उपरोक्त त्रिस्तरीय प्रशिक्षण संस्था टप्प्याटप्प्याने स्थापन करण्यात येतील. ज्या प्रशासकीय विभागांचे मुख्यालयाच्या ठिकाणी व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी सद्यस्थितीत प्रशासकीय प्रबोधिनी नाही तेथील सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या खात्यांच्या प्रशिक्षण संस्था, विद्यापीठ अन्य स्वायत्त संस्था किंवा खाजगी संस्था यांना प्रशासकीय प्रशिक्षण संस्था म्हणून तात्पुरता किंवा कायम दर्जा देणे व तात्पुरता दर्जा दिलेल्या संस्थांच्या जागी प्रथम टप्प्याटप्प्याने स्वतंत्र प्रशासकीय प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या जातील. संबंधित संस्थांना शासन जागा उपलब्ध करून देईल व लागणारी आर्थिक तरतूद संबंधित विभाग करेल. व त्यापुढील कालावधीत सर्व खात्यांसाठी प्रशिक्षण संस्था टप्प्याटप्प्याने स्थापना केल्या जातील. सबंधित संस्थांना शासन जागा उपलब्ध करून देईल व लागणारी आर्थिक तरतूद संबंधित विभाग करेल.

३.४ राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्थांनी सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अंतर्गत किंवा मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अंतर्गत नोंदणी करून स्वायत्ता देण्यात येईल. प्रशिक्षणाची गुणवत्ता राखण्यासाठी सर्व स्वायत्त प्रशिक्षण संस्थांच्या नियामक मंडळावर व कार्यकारी मंडळावर शासन व यशदाचे प्रतिनिधीत्व राहील. या संस्थांना शासनाकडून अनुदान देण्यात येईल. मात्र अशा संस्थांनी खर्चात काटकसर तसेच प्रायोजित प्रशिक्षण कार्यक्रम प्रकल्प व सल्ला सेवा यामधून निधी उभारण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे करणे आवश्यक राहील.

३.५ राज्य शिखर प्रशिक्षण संस्थेने व खात्यांच्या राज्यस्तरीय संस्थांनी केवळ प्रशिक्षण संस्था म्हणून नव्हे तर महत्त्वाचे संसाधन केंद्र, थिंक टँक, प्रशासकीय व विभागाच्या कार्याशी संबंधित संशोधन व प्रलेखन केंद्र, तंत्रज्ञान विस्तार केंद्र, शासनाच्या योजनांचे मूल्यमापन यंत्रणा, खात्यांच्या बिझनेस रिइंजिनिअरिंग करणाऱ्या संस्था तसेच संकलित तथ्यांच्या आधारावर अभ्यासपूर्वक ध्येय धोरणे सुचविणाऱ्या संस्था म्हणून कार्यरत व्हाव्यात असेही अभिप्रेत आहे. विभागीय स्तरावरील प्रशासकीय/खात्यांच्या प्रशिक्षण संस्था तसेच जिल्हा स्तरावरील प्रशासकीय/खात्यांच्या प्रशिक्षण संस्था या कामात राज्य शिखर प्रशिक्षण संस्था व खात्यांच्या राज्यस्तरीय संस्थांना मदत करतील.

४. **दूरस्थ प्रशिक्षण प्रणाली :** यशदा ही राज्य विकास संस्था व दृक्‌श्राव्य अकादमी म्हणून संबंधित विभागाच्या प्रशिक्षण संस्थांमार्फत प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करेल. गट अ, ब व क साठी प्रशिक्षण अनिवार्य करण्याचे प्रस्तावित असल्यामुळे पारंपरिक/सामान्य प्रशिक्षण घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या फार मोठ्या प्रमाणात राहणार आहे. सबब दूरस्थ प्रशिक्षण प्रणाली परिणामकारक राहील. या प्रयोजनार्थ प्रादेशिक व जिल्हास्तरावरील प्रशिक्षण संस्थांचा दूरस्थ केंद्र म्हणून दृक्‌श्राव्य (Video Confererencing) परिसंवाद, संगणकाद्वारे प्रशिक्षण, संगणकाद्वारे मूल्यमापन व संगणकाद्वारे प्रमाणपत्रे देणे इ.साठी वापर करता येईल. या केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी यशदा ही संस्था (Virtual Academy) म्हणून काम पाहील.

५. **प्रशिक्षणाशी संबंधित मनुष्यबळ :**

५.१ प्रशिक्षणात गुणवत्ता राखण्यासाठी सर्व विभागांनी प्रशिक्षणासंबंधित मनुष्यबळाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक ठरेल. या अंतर्गत नियमित प्रशिक्षक व प्रतिनियुक्तीवरील प्रशिक्षक या पदांसाठी लागणारी अभिक्षमता व क्षमता असणाऱ्या व्यक्तींची निवड होण्याच्या दृष्टीने विशिष्ट चाळणी प्रक्रिया व योग्य प्रेरणा देणारे लाभ निश्चित करावे. ज्यामुळे एम.फिल.पी.एच.डी., सेट, नेट व प्रशिक्षण अनुभव असणाऱ्या व्यक्ती नियमित प्रशिक्षक होण्यास इच्छुक राहतील व योग्य शासकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर या सेवांकडे आकर्षित होतील. प्रशिक्षणात सातत्य राखण्यासाठी प्रशिक्षण संस्थांना २५% पर्यंत नियमित प्रशिक्षक नियुक्त करण्यास उद्युक्त करावे व २५% साठी प्रत्यक्ष क्षेत्रावरील अनुभव असणारे प्रतिनियुक्ती वरील प्रशिक्षक आणि उर्वरित ५०% गरजा बाहेरील प्रशिक्षकांद्वारे पूर्ण करण्यात याव्यात. ज्यामध्ये सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा, करारावरील प्रशिक्षकांचा तसेच पाहुणे प्रशिक्षक यांचा समावेश असेल. त्याचप्रमाणे प्रशिक्षण संस्थांना नियतकालिकपणे प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षक विकास कार्यक्रम आयोजित करण्याबाबत व प्रशासकीय संशोधन करण्यासाठी देशांतर्गत व देशाबाहेर संधी तसेच शैक्षणिक पात्रता वाढीसाठी रजा उपलब्ध करून देण्यास प्रोत्साहन देण्यात यावे.

५.२ प्रशिक्षण संस्थांकडे प्रतिनियुक्तीवर येणाऱ्या प्रशिक्षकांसाठी मूळ वेतनाच्या ३० टक्के प्रशिक्षण भत्ता अनुज्ञेय राहील. मात्र अशा प्रशिक्षकांना प्रतिनियुक्ती भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

६) **अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण व सेवा नियमांची सांगड :** प्रशिक्षणाला जाणिवपूर्वक कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या व्यावसायिक प्रगती बरोबर जोडले जाणे आवश्यक आहे. त्यामुळे एखादा अधिकारी/कर्मचारी पायाभूत प्रशिक्षण जोपर्यंत पूर्ण करत नाही तोपर्यंत त्यांना नियमित पदस्थापना न देता परिविक्षाधीन अधिकारी मानण्यात यावे. प्रत्येक

५ ते ७ वर्षाच्या गटात किमान पाच दिवसांचे एक प्रशिक्षण होणे पदोन्नतीसाठी आवश्यक आहे. दरवर्षी वेतनवाढ देताना त्या कर्मचाऱ्यांचे आवश्यक ते प्रशिक्षण पूर्ण केले किंवा कसे याची तपासणी करणे आवश्यक राहील.

वरिष्ठांद्वारे प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन होऊनसुद्धा संबंधित व्यक्ती अपवादात्मक परिस्थिती वगळता गैरहजर राहिली तसेच सूट मिळण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मान्यता न घेतल्यास म. ना. से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी. तसेच संबंधित प्रशिक्षणासाठी एका प्रशिक्षणार्थीला येणारा खर्च त्या व्यक्तीच्या पगारातून कपात करून संबंधित प्रशिक्षण संस्थेच्या खात्यावर वसुली म्हणून वरिष्ठाद्वारे जमा करून या वसुलीची नोंद त्या व्यक्तीच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी. प्रशिक्षणविषयक उपरोक्त उल्लेखित बंधनकारक बाबींचा यथावकाश सेवा नियमांमध्ये समावेश करणे संबंधित विभागांना आवश्यक राहील. प्रत्येक प्रशिक्षणाच्या शेवटी प्रशिक्षणार्थीचे मूल्यमापन करणे आणि त्यांची यशस्विता प्रमाणित करणे अनिवार्य राहील व ज्या प्रशिक्षणार्थींना विहित गुण मिळणार नाहीत त्यांना स्वखर्चाने ते प्रशिक्षण पुन्हा करावे लागेल. तसेच प्रत्येक प्रशिक्षकाबाबत, एकूण प्रशिक्षणाबाबत, रहाण्याच्या व इतर सोयी सुविधांबाबत प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी प्रशिक्षणार्थीकडून मूल्यमापन करून घेण्यासाठी Feedback System चालू करण्यात येईल.

दिर्घ कालावधीचे व विदेशी प्रशिक्षणापूर्वी प्रशिक्षणार्थीला सक्षम प्राधिकाऱ्याबरोबर बंधपत्र लिहून द्यावे लागेल व त्याप्रमाणे नंतर प्रशिक्षणार्थी नोकरी सोडत असेल तर प्रशिक्षणावर खर्च झालेली रक्कम सदर प्रशिक्षणार्थीकडून वसूल करून संबंधित प्राधिकाऱ्याला शासनाकडे जमा करावी लागेल. देश विदेशातील विशेष प्रशिक्षण, निरंतर शिक्षण व संशोधन संधी यासाठी उपरोल्लेखीत संबंधित प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य राहील.

प्रशिक्षण संस्थांनी नामनिर्देशन मागविले असतांना आपत्ती, निवडणूक, जनगणना, कायदा व सुव्यवस्था या परिस्थितीव्यतिरिक्त विभागाने नामनिर्देशन न केल्यास तसेच सूट मिळण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडून (सक्षम प्राधिकारी म्हणजे त्या त्या विभाग/कार्यालयाचे वरिष्ठ कार्यालय असेल) मान्यता न घेतल्यास सक्षम प्राधिकाऱ्याकडून संबंधित अधिकाऱ्यांवर म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या अध्ययन रजेसाठी (Study Leave) काय धोरण असावे याबाबत राज्य प्रशिक्षण कृतिदल (STTF) यांना शिफारस करण्याचे अधिकार राहतील.

७. **लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण :** पंचायत राज्य संस्थांचे प्रतिनिधी, आमदार आणि मंत्रीगण यांचे देखील प्रशिक्षण संबंधित स्तरावरील प्रशिक्षण संस्थांना आयोजित करणे आवश्यक राहील. विस्तृत आदेश वेळोवेळी निर्गमित केले जातील.

८. **आर्थिक तरतूद :** प्रत्येक शासकीय विभाग वर्षाच्या सुरुवातीला प्रशिक्षण आराखडा तयार करेल व त्यानुसार त्या आर्थिक वर्षाच्या, त्या शासकीय विभागाच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करेल. राज्य प्रशिक्षण नियोजन व मूल्यमापन यंत्रणेसाठी लागणारी आर्थिक तरतूद तसेच प्रशासनिक व सेवांतर्गत प्रशिक्षण आणि प्रशिक्षणार्थींच्या परीक्षा/प्रमाणपत्रे यासाठीची यशदास व विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था तसेच जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण केंद्रासाठी लागणारी आर्थिक तरतूद त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात सामान्य प्रशासन विभागामार्फत करण्यात येईल. सदर प्रशिक्षण धोरण योजना ही योजनांतर्गत योजना म्हणून राबविण्यात येईल.

९. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०९२३१७२१३५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रत्नाकर गायकवाड)**
**मुख्य सचिव**

**प्रती :**

१. महालेखापाल महाराष्ट्र – १ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२. महालेखापाल महाराष्ट्र – २ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३. महालेखापाल महाराष्ट्र – १ (लेखा परीक्षा), मुंबई
४. महालेखापाल महाराष्ट्र – २ (लेखा परीक्षा), नागपूर
५. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
६. पोलिस महासंचालक, मुंबई
७. प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन भवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन, नागपूर, ४४०००१
८. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव / खाजगी सचिव
९. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव / खाजगी सचिव
१०. मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक
११. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव (सेवा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१३. महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे – ४११ ००७
१४. उप सचिव, साप्रवि/१२–अ यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१५. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये/प्रशिक्षण संस्था
१६. निवड नस्ती–१२–अ, साप्रवि, मंत्रालय, मुंबई

❑❑❑

**राज्यातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी**
**यांचे नवीन प्रशिक्षण धोरण...**

## महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
### शासन निर्णय क्रमांक : टिसीएम २०१३/(७१/१३)/प्रशिक्षण

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : २९ जानेवारी, २०१४.

**वाचा : १) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम २००९.**
**२) राज्य प्रशिक्षण धोरण २०११**

**प्रस्तावना :**

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या धोरणानुसार राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळांमार्फत सुमारे १.८० कोटी विद्यार्थ्यांना सुमारे ६.७० लाख शिक्षकांकडून शिक्षण देण्यात येत आहे.

२. शिक्षण विभागांतर्गत प्रशिक्षणाशी निगडित एकूण ७ राज्यस्तरीय संस्था खालीलप्रमाणे कार्यरत आहेत :
   i) दृक् श्रवण शिक्षण संस्था, पुणे (सन १९४८),
   ii) व्यवसाय मार्गदर्शन संस्था, मुंबई (सन १९५०)
   iii) राज्य शिक्षणशास्त्र संस्था (सन १९६४)
   iv) राज्य आंग्ल भाषा अध्यापन संस्था, औरंगाबाद (सन १९६५)
   v) राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर (सन १९६८)
   vi) शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष, वरळी, मुंबई (सन १९७२)
   vii) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद

   याशिवाय प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक **जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था DIET** (एकूण ३३) कार्यरत आहेत.

३. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार १९८४ साली 'राज्य शिक्षणशास्त्र संस्थेची' NCERT च्या धर्तीवर पुनर्रचना करून **'महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे' (SCERT)** ची स्थापना करण्यात आली.

४. गेल्या काही काळामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये खालीलप्रमाणे अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडल्या आहेत.
   i) 'भारतीय राज्य घटनेमध्ये' दुरुस्ती करून, ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण (इ. १ली ते ८वी) मिळावे यासाठी **'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम २००९'** अंमलात आणण्यात आला आहे.
   ii) शिक्षकांचे प्रशिक्षणासाठी जागतिक स्तरावर नवीन तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. (उदा. संगणक, टॅबलेट, व्हीडीओ कॉन्फरन्स इ.)

iii) मुलांना जागतिक दर्जाचे, समाजोपयोगी, रोजगारभिमुख दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी अभ्यासक्रमामध्येही मोठा बदल करण्यात येत आहे.

iv) मुलांमध्ये सर्जनशीलता, नैतिकता व कल्पकता निर्माण व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणावर उपाययोजना करण्यात येत आहेत.

v) **'राज्य प्रशिक्षण धोरण २०११'** द्वारे प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिनस्त असलेल्या **सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना पायाभूत प्रशिक्षण व सेवांतर्गत प्रशिक्षण देणे बंधनकारक करण्यात आले असून** प्रत्येक विभागाने त्यांच्या योजनांतर्गत निधीतून १% इतका खर्च हा प्रशिक्षणावर करण्याची मुभा प्रशासकीय विभागांना देण्यात आली आहे.

५. उपरोक्त सर्व संस्थांनी गेल्या २–३ दशकामध्ये अत्यंत उत्कृष्ट काम केलेले असले तरीही वरील घडामोडी पाहता त्यांचे काम व व्यवस्थापनामध्ये कालानुरूप बदल करणे व शिक्षकांना प्रभावी व उपयुक्त प्रशिक्षण देण्याची गरज निर्माण झालेली आहे. सध्या राज्यस्तरीय संस्थांमध्ये आर्थिक तरतुदी व मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे त्याचा पुरेपूर वापर होत नाही. तसेच त्यांचे प्रयत्नही अपुरे पडत आहेत.

६. शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत शिक्षकांचे प्रशिक्षणासाठी सध्या प्रामुख्याने खालील योजनांतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे :

i) सर्व शिक्षा अभियान

ii) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान

iii) TEAB (Teacher Education Appraisal Board)

७. निरनिराळ्या योजनांमधून उपलब्ध होणाऱ्या निधीतून शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना योग्य काळानुरूप व सक्षम करणारे प्रशिक्षण कसे देता येईल हा प्रश्न अनेक दिवसांपासून शासनाच्या विचाराधीन होता. सर्व बाबींचा विचार करून शासनाने विभागाचे **'नवीन प्रशिक्षण धोरण'** स्वीकारण्याचा पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

सर्व प्रकारच्या प्रशिक्षणासाठी राज्य स्तरावर **'महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे'** (Maharashtra State Council of Educational, Research and Training) (SCERT) येथून पुढे **'विद्या परिषद'** ही राज्यातील प्रशिक्षणाची शिखर संस्था म्हणून कार्यरत राहील व **जिल्हा स्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था** (District Insitiute of Education and Training) DIET – डायट जिल्ह्याची शिखर संस्था म्हणून काम करतील.

२. **'विद्या परिषद (SCERT)'** व **'जिल्हा संस्था DIET'** यांची कामे, कर्तव्ये व जबाबदाऱ्या प्रामुख्याने खालीलप्रमाणे राहतील :

i) शिक्षक, अधिकारी/ कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाच्या गरजा (Training Need) निश्चित करणे.

ii) शिक्षणाच्या गरजा लक्षात घेता प्रशिक्षणाच्या पद्धती (Training Methodology), कालावधी (Duration), निवासी/ अनिवासी इ. निश्चित करणे.

iii) प्रत्येक कार्यक्रमासाठी आवश्यक ती उत्कृष्ट दर्जाची अदययावत साधनसामग्री (Course Meterial) तयार करून घेणे.

iv) उत्कृष्ट व दर्जेदार प्रशिक्षक (Master Trainers) शोधणे व तयार करणे इ. त्यांचे गुणवत्ता व योग्यतेनुसार वर्गीकरण करणे इ.

v) प्रशिक्षणाचे वार्षिक वेळापत्रक (Annual Calendar) तयार करून दर्जेदार व प्रभावी प्रशिक्षण उपलब्ध करून घेणे.

३. शिक्षक, अधिकारी/ कर्मचारी यांना दर्जेदार व प्रभावी प्रशिक्षण उपलब्ध होण्यासाठी 'विद्या परिषद SCERT' व 'जिल्हा संस्था DIETS ' यांनी योग्य ती सर्व उपाययोजना करावी. उदा. वार्षिक आराखडा तयार करणे, चांगले प्रशिक्षक तयार करणे, चांगले स्थळ शोधणे, उपलब्ध होणाऱ्या आर्थिक तरतुदीप्रमाणे वार्षिक नियोजनामधून अग्रक्रमाने प्रशिक्षण हाती घेणे, झालेल्या प्रशिक्षणाचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन करणे इ.

४. प्रशिक्षण देताना 'विद्या परिषद (SCERT)' व 'जिल्हा संस्था DIETS' यांनी खालील मुद्द्यांचा प्रामुख्याने विचार करावा.

i) उत्कृष्ट व दर्जेदार शिक्षक (मास्टर ट्रेनर्स) हे २ ते ३ वर्षांसाठी निश्चित करण्यात यावेत. त्यात वारंवार बदल करू नये. मास्टर ट्रेनर्स निवडताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षकाचा विचार व्हावा. (याबाबत स्वतंत्र शासन निर्णय काढण्यात येईल.

ii) प्रशिक्षणाचे स्थळ चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक आहे. यासाठी 'विद्या परिषद (SCERT)' व 'जिल्हा संस्था DIETS' च्या स्वतःच्या इमारतीचा प्रामुख्याने विचार व्हावा.

iii) निवासी प्रशिक्षकासाठी राहणे व जेवणाची उत्तम सोय असणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यकतेप्रमाणे CSR अंतर्गत खाजगी उद्योजकांची मदत घ्यावी किंवा खाजगी इंजिनिअरींग कॉलेज इ. यांच्या होस्टेलची मदत घ्यावी.

५. राज्यामध्ये शिक्षक, अधिकारी/कर्मचारी यांना प्रभावी व दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे **'उच्चस्तरीय सुकाणू समिती'** स्थापित करण्यात येत आहे.

**अ) संरचना :**

| | | |
|---|---|---|
| i) | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | अध्यक्ष |
| ii) | संचालक, यशदा, पुणे | सदस्य |
| iii) | आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| iv) | संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद | सदस्य |
| v) | सचिव, माहिती व तंत्रज्ञान | सदस्य |
| vi) | आयुक्त, क्रीडा महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| vii) | नामांकित प्रशिक्षण संस्थांचे प्रतिनिधी (२) | सदस्य |
| viii) | संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद | सदस्य-सचिव |

**ब) कार्यकक्षा :**

i) 'विद्या परिषद (SCERT)' व 'जिल्हा संस्था DIETS' कडून विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल असे प्रशिक्षणाचे विषय व क्षेत्र निवडणे.

ii) प्रशिक्षणाचा वार्षिक आराखडा अंतिमरीत्या तयार करून त्यास मान्यता देणे.

iii) सर्व प्रशिक्षण दर्जेदार व प्रभावी राहील यासाठी सर्व उपाययोजना करणे.

iv) उत्कृष्ट व दर्जेदार प्रशिक्षक (मास्टर ट्रेनर्स) तयार करणेसाठी आवश्यक ते धोरण तयार करणे.

v) 'विद्या परिषद (SCERT)' व 'जिल्हा संस्था DIETS' संस्थेवर योग्य ते नियंत्रण ठेवणे, त्यांना मार्गदर्शन देणे इ.

vi) उपलब्ध निधीचा योग्य, पुरेपूर व गुणात्मक वापर व्हावा यासाठी सर्व उपाययोजना करणे.

६. **उच्चस्तरीय सुकाणू समितीने** अंतिम केलेल्या वार्षिक आराखड्याप्रमाणे प्रभावी व दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी राज्य व जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे **'कार्यकारी अंमलबजावणी समिती'** स्थापन करण्यात येत आहे.

**अ) राज्यस्तरीय कार्यकारी/अंमलबजावणी समिती :**

| | | |
|---|---|---|
| i) | आयुक्त, शिक्षण | अध्यक्ष |
| ii) | संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद | सह अध्यक्ष |
| iii) | राज्य प्रकल्प संचालक, | सह अध्यक्ष |
| iv) | शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) | सदस्य |
| v) | शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| vi) | अध्यक्ष, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ | सदस्य |
| vii) | यशदा YASHADA प्रतिनिधी | सदस्य |
| viii) | सहसंचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद | सदस्य |
| ix) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (२) (प्रत्येक २ वर्षांनी नवीन प्रतिनिधी निवडला जाईल.) | सदस्य |
| x) | सहसंचालक (शिक्षक शिक्षण), महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद | सदस्य सचिव |

**ब) जिल्हास्तरीय कार्यकारी अंमलबजावणी समिती :**

| | | |
|---|---|---|
| i) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| ii) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | उपाध्यक्ष |
| iii) | जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| iv) | जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | सदस्य |
| v) | विद्या परिषद, पुणे प्रतिनिधी | सदस्य |
| vi) | शाळा मुख्याध्यापक प्रतिनिधी (२) (प्रत्येक २ वर्षांनी नवीन प्रतिनिधी घेणे आवश्यक.) | सदस्य |
| viii) | ज्येष्ठ अधिव्याख्याता (उपप्राचार्य). जि. शि. व प्र. सं. | सदस्य सचिव |

**क) वरील दोन्ही समित्यांची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :**

i) **उच्चस्तरीय सुकाणू समितीने** अंतिम केलेल्या आराखड्याप्रामणे सर्व प्रशिक्षण दर्जेदार व प्रभावी राहतील यासाठी सर्व उपायोजना करणे व दक्षता घेणे.

ii) प्रत्येक प्रशिक्षणामध्ये निवडलेले सर्व प्रशिक्षणार्थी हजर राहतील यासाठी करावयाची उपाययोजना. सर्व प्रशिक्षणार्थी यांना उत्कृष्ट दर्जाची आवश्यक ती साधनसामग्री (कोर्स मटेरियल) उपलब्ध करून देणे.

iii) **उच्चस्तरीय सुकाणू समितीने** निवडलेल्या त्रयस्थ संस्थेमार्फत सर्व प्रशिक्षणाचे मूल्यमापन करून घेणे इ.

७. राज्यातील इतर संस्थांनी उदा. (i) दृक् श्रवण शिक्षण संस्था, पुणे, (ii) व्यवसाय मार्गदर्शन संस्था, मुंबई, (iii) राज्य आंग्ल भाषा अध्यापन संस्था, औरंगाबाद, (iv) राज्य विज्ञान संस्था, नागपूर, (v) शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष, वरळी, मुंबई, (vi) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद यांनीसुद्धा 'विद्या परिषद (SCERT)' यांचेशी सल्लामसलत करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली वरीलप्रमाणे 'वार्षिक वेळापत्रक (Annual Calendar)' तयार करावे व त्यास **राज्यस्तरीय कार्यकारी/ अंमलबजावणी समिती** व **सुकाणू समितीची** मान्यता मिळवावी.

८. प्रशिक्षणासाठी एकूण उपलब्ध निधीपैकी २० टक्के निधी 'विद्या परिषद (SCERT)', 'जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIETS)' व इतर प्रशिक्षण संस्थांना नावीन्यपूर्ण प्रशिक्षणासाठी मागणीप्रमाणे **सुकाणू समितीच्या** मान्यतेने उपलब्ध करून देण्यात येईल. उर्वरित ८० टक्के निधी राज्य शासनाने ठरविलेल्या धोरणाप्रमाणे निश्चित प्रशिक्षण कार्यक्रमावर खर्च करण्यात येईल.

९. 'विद्या परिषद (SCERT)' , 'जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIETS)' व इतर संस्थांनी वार्षिक आराखड्याप्रमाणे दर ३ महिन्याकरिता आवश्यक निधीची मागणी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (MPSP) /शासनाकडे करावी. दोन महिन्याचे प्रशिक्षण संपल्यावर संबंधित संस्थांनी प्रशिक्षणाचे मूल्यांकनाचा (संख्यात्मक व गुणात्मक) अहवाल खर्चाच्या तपशीलासह MPSP व राज्य शासनाला सादर करावा. झालेल्या प्रशिक्षणाची गुणवत्ता व खर्चाचे प्रमाण पाहून MPSP/शासन पुढील ३ महिन्यासाठी निधी उपलब्ध करून देईल.

१०. इथून पुढे उपरोक्त प्रमाणे सर्व निधी 'विद्या परिषद SCERT' यांना वितरित करण्यात येईल. 'विद्या परिषद (SCERT)' यांना निधीचा योग्य तो विनियोग करून त्याचा हिशोब ठेवणे आवश्यक राहील.

११. राज्यामध्ये प्रशिक्षणाची गुणवत्ता दिवसेंदिवस वाढेल यासाठी 'विद्या परिषद (SCERT)' , 'जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIETS)' मध्ये काम करणारे सर्व अधिव्याख्याता, वरिष्ठ अधिव्याख्याता, प्राचार्य यांनी दरवर्षी कमीतकमी दोन राज्योपयोगी/विद्यार्थ्यांना सहाय्यभूत ठरणारे संशोधन प्रकल्प सादर करणे अनिवार्य राहील. याशिवाय स्वतंत्रपणे विस्तृत आदेश निर्गमित करण्यात येतील.

१२. सर्व प्रशिक्षण संस्थांनी तयार केलेल्या व राज्यस्तरीय सुकाणू समितीने मान्य केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रम विभागाच्या व इतर सर्व शासनाच्या अधिकृत वेबसाईटवर टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०१२९१६००१६८०२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**Phansekar Reena V**

Digitally signed by Phansekar Reena V
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education And Sports Dept, postal code = 400032, St = Maharashtra, cn=Phansekar Reena V
Date : 2014.01.29. 16:06:10 + 05'30'

**(री. वि. फणसेकर)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई
५. सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे
९. आयुक्त, क्रीडा महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
११. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१२. संचालक, यशदा, पुणे.
१३. संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई
१४. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. अध्यक्ष, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
१७. सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
२०. सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र
२१. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२२. निवड नस्ती (माशि–४).

❑❑❑

# ४. राज्याचे क्रीडा धोरण - २०१२

**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ याची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : क्रीडाधो–२०११/प्र.क्र.५५/११/क्रीयुसे–१,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : १४ जून, २०१२.

**प्रस्तावना :**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे हे जाणून क्रीडा धोरण जाहीर करणारे, महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. खेळाच्या पुरेशा सुविधा निर्माण करण्यासाठी राज्याने पुढाकार घेतलेला आहे. सन १९९६ व २००१ च्या क्रीडा धोरणामध्ये अनुक्रमे खेळाडू व खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता या बाबी केंद्रभूत करून क्रीडा धोरण तयार करण्यात आले होते. यानंतर राज्याचे सन २००८ मध्ये राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेचे केलेले आयोजन, सन २०१० मधील दिल्ली येथील राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धेचे आयोजन, विविध खेळात आंतरराष्ट्रीय स्तरावर देशातील खेळाडूंची पदक प्राप्ती व एकंदरीतच क्रीडा क्षेत्रात झालेले लक्षणीय बदल विचारात घेऊन नवीन क्रीडा धोरण आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यासाठी मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०.२.२०१० च्या शासन निर्णयान्वये एका समितीची नियुक्ती करण्यात आली होती. समितीने क्रीडा क्षेत्राशी निगडित विविध घटक (खेळाडू, संघटना, संस्था, क्रीडाप्रेमी नागरिक, क्रीडा मार्गदर्शक इत्यादी) यांच्याशी विचारविनिमय करून धोरणाचा प्रारूप मसुदा शासनास सादर केला होता. त्यानुसार राज्याचे सर्वंकष नवीन क्रीडा धोरण घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय :**

या शासननिर्णयाद्वारे राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ घोषित करण्यात येत असून, त्याची अंमलबजावणी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. यामध्ये पुढील बाबी समाविष्ट राहतील:

१) सदर धोरणमध्ये क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती, खेळाडूंचे प्रशिक्षण, प्रोत्साहन व देय सवलती तसेच क्रीडा विकासाचे काम करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देण्याची महत्त्वाची भूमिका आहे.

२) सदर धोरणात समाविष्ट बाबींचा सविस्तर तपशील सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केला आहे.

३) या धोरणाच्या अंमलबजावणीकरिता प्रत्येक घटकासाठी अग्रक्रमानुसार स्वतंत्रपणे अंमलबजावणी प्रक्रिया (लागू असेल त्यानुसार वित्तीय आकृतिबंधासह) स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे निर्देशित करण्यात येईल. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

४) या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार प्रशासकीय सूचना स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात येतील.

५) शासनाच्या सध्या सुरू असलेल्या जे क्रीडाविषयक कार्यक्रम/उपक्रम/योजनांत सुधारणा किंवा बदल करणे आवश्यक वाटत नाही त्यांचा समावेश या धोरणात स्वतंत्रपणे केलेला नाही. सदर कार्यक्रम/उपक्रम/योजना पूर्ववत सुरू राहतील.

६) सदर धोरण पथदर्शक असून त्यात यथायोग्य बदल वेळोवेळी शासन मान्यतेने करण्यात येतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१२०६१४१००७११०५०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सतीश जोंधळे)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत –**

१) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

२) मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,

३) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र–१/२, मुंबई/नागपूर,

६) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र –१/२, मुंबई/नागपूर.

७) नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई

८) वित्त विभाग (व्यय–५), मंत्रालय, मुंबई

९) उप सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

१०) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),

११) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)

१२) मा. मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

१३) मा. राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

१४) निवड नस्ती (क्रीयुसे–१, क्रीयुसे–२ व क्रीयुसे–३)

# परिशिष्ट– अ

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **प्रास्ताविक** | | |
| **महाराष्ट्राचे क्रीडा धोरण– एक दृष्टिक्षेप** | | |
| १) क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती | | |
| १.१ | क्रीडांगणाचे आरक्षण | |
| १.२ | क्रीडा साहित्य अनुदान | |
| १.३ | राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करणे. | |
| १.४ | तालीम, कुस्ती केंद्रांचा विकास करणे. | |
| १.५ | विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुल बांधकाम सुविधांचा वापर, देखभाल दुरुस्ती वा वाणिज्य प्रयोजन | |
| १.६ | आमदार स्थानिक विकास निधितून क्रीडाविषयक उपक्रमासाठी सहाय्य | |
| १.७ | राज्य क्रीडा विकास निधी व जिल्हा क्रीडा विकास निधीची स्थापना. | |
| १.८ | क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य करणे. | |
| २) आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तराचे खेळाडू घडविणे व अत्याधुनिक प्रशिक्षणाकरिता आर्थिक सहाय्य | | |
| २.१ | क्रीडा प्रबोधिनी | |
| २.२ | अनिवासी क्रीडा अकादमीची स्थापना | |
| २.३ | आदिवासी क्रीडा स्पर्धा व क्रीडा प्रबोधिनी स्थापना | |
| २.४ | राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन | |
| २.५ | तालुका, जिल्हा व राज्य क्रीडा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करणे. | |
| ३) खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव | | |
| ३.१ | खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव | |
| ३.२ | जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये प्रावीण्य मिळविणाऱ्या शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान | |
| ३.३ | क्रीडा शिक्षकांना प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कार व उच्च पदावरील सेवेतील संधी | |
| ३.४ | खेळाडूंना स्पर्धा, प्रशिक्षण शिबीरे तसेच सराव करतेवेळी अपघात/इजा झाल्यास वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहाय्य | |
| ३.५ | आतंरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावर शालेय, ग्रामीण (पायका) व महिला क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना शिष्यवृत्ती | |
| ३.६ | वयोवृद्ध खेळाडू मानधनात वाढ | |

| अ. क्र. | | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | ३.७ | कुस्तीगीरांच्या मानधनात वाढ | |
| | ३.८ | खेळाडूंसाठी गौरव, प्रोत्साहन व बक्षिसे | |
| | ३.९ | आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे. | |
| | ३.१० | आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, मार्गदर्शकांचे शुल्क इ. करिता आर्थिक मदत करणे. | |
| | ३.११ | क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू कुस्तीगीर यांना द्यावयाच्या सवलती, पुरस्कार नियमावलीत बदल. | |
| | ३.१२ | नागपूर येथील आमदार निवास कक्षाचे हिवाळी अधिवेशन वगळता खेळाडू निवासाकरिता वापर. | |
| | ३.१३ | खेळाडूंना शासकीय, निमशासकीय सेवेत आरक्षण व थेट नियुक्ती | |
| ४) क्रीडा वातावरण निर्मिती | | | |
| | ४.१ | स्पोर्टस नर्सरीची स्थापना | |
| | ४.२ | क्रीडा वाङ्ःमय निर्मिती, क्रीडा वस्तुसंग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना | |
| | ४.३ | क्रीडा अभियान | |
| | ४.४ | शालेय विद्यार्थ्यांमध्ये योगासनांचे महत्त्व जागविणे | |
| | ४.५ | स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षण व क्रीडा समितीची स्थापना | |
| | ४.६ | खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता | |
| | ४.७ | क्रीडाविषयक योजनांमध्ये सुधारणा | |
| | ४.८ | महानगरपालिका, नगरपालिका खेळ व संघ दत्तक घेणे, क्रीडाविषयक बाबींवर ५ टक्के खर्च करणे. | |
| ५) क्रीडा महोत्सवांचे आयोजन | | | |
| | ५.१ | शाळांचा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग | |
| | ५.२ | शालेय क्रीडा स्पर्धा | |
| | ५.३ | क्रीडा महोत्सव, क्रीडा दिन–क्रीडा सप्ताह साजरा करणे. | |
| | ५.४ | छ. शिवाजी चषक कबड्डी स्पर्धा, खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा, के. भाई नेरुरकर चषक, खो–खो व व्हॉलीबॉल चषक स्पर्धा सहाय्यक अनुदानात वाढ करणे, मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन | |
| ६) तांत्रिक मनुष्यबळाचा विकास | | | |
| | ६.१ | खेळांसाठी जादा तासिका उपलब्ध करून देणे तसेच क्रीडा या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करणे. | |
| | ६.२ | क्रीडा संहिता तयार करणे. | |
| | ६.३ | शारीरिक शिक्षण सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती | |
| | ६.४ | शैक्षणिक संस्थांना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता | |
| | ६.५ | क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीर | |
| | ६.६ | क्रीडा विभागाचे सक्षमीकरण | |

| अ. क्र. | | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ७) क्रीडा विद्यापीठाची स्थापना | | | |
| | ७.१ | महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळ स्थापन करणे. | |
| | ७.२ | क्रीडा विद्यापीठाची स्थापना करणे. | |
| ८) राज्यातील क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन | | | |
| | ८.१ | एकविध खेळाच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन | |
| | ८.२ | महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना आर्थिक सहाय्य देणे. | |
| | ८.३ | क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग | |
| | ८.४ | क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण व सहाय्यक अनुदान इ. करिता क्रीडा प्रकारांची वर्गवारी करणे. | |
| ९) राज्यात साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन | | | |
| | ९.१ | महाराष्ट्र स्टेट ॲडव्हेंचर स्पोर्टस् सेंटरची स्थापना करणे. | |
| | ९.२ | साहसी खेळांच्या क्रीडा सुविधांची निर्मिती करणे. | |
| | ९.३ | साहसी खेळाच्या स्पर्धा, प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांचे आयोजन | |
| | ९.४ | साहसी क्रीडा पुरस्कार | |
| | ९.५ | साहसी खेळांच्या राज्य संघटना, संस्थां व खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणे. | |
| | ९.६ | साहसी खेळांच्या विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना क्रीडा साहित्यासाठी अनुदान देणे. | |
| १०) क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीच समितीची स्थापना | | | |
| | १०.१ | क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना | |
| ११) राज्याचे क्रीडा धोरण ठरविण्यासाठी नियुक्त केलेली समिती व विशेष सहाय्य | | | |

# प्रास्ताविक

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे हे जाणून क्रीडा धोरण जाहीर करणारे, महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. खेळाच्या पुरेशा सुविधा निर्माण करण्यासाठी राज्याने पुढाकार घेतलेला आहे. सन १९९६ व २००१ च्या क्रीडा धोरणामध्ये **खेळाडू व खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता** या बाबीं केंद्रभूत करून क्रीडा धोरण तयार करण्यात आले होते.

राज्याचे क्रीडा धोरण २००१ व त्यानंतर हे क्रीडा क्षेत्रात झालेले विविध बदल राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धा २००८ चे पुणे येथील आयोजन, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०१० दिल्ली यांचे आयोजन व इतर आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील देशाची प्रगती त्याचबरोबर श्री. भिष्मराज बाम यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती आढावा समितीने शासनास सादर केलेल्या शिफारशींचा विचार करून, राज्याच्या क्रीडा क्षेत्राच्या प्रगतीकरिता, नवीन क्रीडा धोरण ठरविण्यास सहाय्यभूत होणाऱ्या सर्वंकष शिफारशी करण्यासाठी दि. २० फेब्रुवारी २०१० रोजी मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली होती. राज्यातील क्रीडाप्रेमी नागरीक, खेळाडू, एकविध क्रीडा संघटना, क्रीडा संस्था तसेच विधान मंडळाच्या सदस्यांच्या सूचना विचारात घेऊन समितीने क्रीडा धोरणाचा मसुदा अहवाल शासनास सादर केला होता. धोरण समितीने सादर केलेला मसुदा विचारात घेऊन राज्याचे क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आले आहे.

खेळाच्या क्षेत्राचा विकास करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड असणे आवश्यक असल्याने राज्यातील क्रीडा प्रशिक्षकांसाठी अद्ययावत तंत्रज्ञानाची ओळख, चर्चासत्र, परिसंवादाचे आयोजन करणे, क्रीडा विद्यापीठाची स्थापना करून क्रीडा विषयक अभ्यासक्रमात सुसूत्रता, संशोधन, राज्य क्रीडा विकास निधी सक्षम करणे, साहसी खेळांना प्रोत्साहन, क्रीडाविषयक पायाभूत सुविधांचा विकास, क्रीडा वातावरण निर्मिती, इ. बाबींचा विचार या क्रीडा धोरणात करण्यात आलेला आहे.

राज्य क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य रहावे, नागरिकांमध्ये व्यायामाची आवड जोपासावी, राज्यातील खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडाविषयक तंत्रशुद्ध प्रशिक्षण, खेळाच्या दर्जात सुधारणा, खेळांडूचा गौरव, दर्जेदार क्रीडा सुविधा या बाबी केंद्रबिंदू मानून खेळांडूसाठी हितावह योजना राज्यात राबविण्यासाठी क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आलेले आहे.

# महाराष्ट्राचे क्रीडा धोरण-एक दृष्टिक्षेप

राज्याच्या क्रीडा संस्कृतीचे जतन करून या परंपरेचा वारसा चालविण्याकरीता तसेच बदलत्या काळानुसार आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा लक्षात घेऊन या स्पर्धेस सामोरे जाण्याकरिता क्रीडा क्षेत्राच्या सक्षमीकरणाची आवश्यकता आहे. सदर बाब दृष्टीपुढे ठेवून राज्य शासनाने नवीन क्रीडा धोरण तयार करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयास अनुसरून नियुक्त करण्यात आलेल्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार राज्याचे क्रीडा धोरण तयार करण्यात आलेले आहे. क्रीडा धोरण २०१२ मध्ये समाविष्ट प्रमुख बाबी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये | समाविष्ट बाबी |
|---|---|---|
| १) | क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती | • राज्यात खेळांच्या पायाभूत सुविधांचा विकास.<br>• राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण<br>• खाजगी संस्थांना क्रीडा सुविधा निर्मितीकरिता भरीव आर्थिक सहाय्य.<br>• कुस्ती केंद्रांचा विकास. |
| २) | आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीयस्तराचे खेळाडू घडविणे व अत्याधुनिक प्रशिक्षणाकरिता आर्थिक सहाय्य | • खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्पर्धेची पूर्वतयारी करण्याकरिता खेळांची वर्गवारी करून अर्थसहाय्य.<br>• राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंकरिता राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन.<br>• राज्यातील क्रीडा प्रबोधिनींचे सक्षमीकरण |
| ३) | खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव | • आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडू व मार्गदर्शकांना रोख पारितोषिके व थेट नोकरीची संधी.<br>• खेळाडूंचा गौरव करण्याकरिता देण्यात येणाऱ्या पुरस्कार रकमेत वाढ.<br>• राज्य क्रीडा विकास निधीत वाढ. |
| ४) | क्रीडा वातावरण निर्मिती | • क्रीडा वस्तुसंग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना.<br>• स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये क्रीडा समितीची स्थापना. |
| ५) | क्रीडा महोत्सवांचे आयोजन | • विद्यापीठ स्पर्धांना विशेष महत्त्व<br>• आतंरशालेय क्रीडा स्पर्धा आयोजनाकरिता भरीव आर्थिक सहाय्य.<br>• स्पर्धेत सहभागी होणाऱ्या शाळांना अर्थसहाय्य. |
| ६) | तांत्रिक मनुष्यबळ विकास | • शाळेतील शिक्षकांसाठी प्रगत सेवांतर्गत प्रशिक्षण व्यवस्था.<br>• शैक्षणिक संस्थांना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता. |
| ७) | क्रीडा विद्यापीठाची स्थापना | • राज्यातील सर्व शारीरिक शिक्षण महाविद्यालयांचे संनियंत्रण.<br>• क्रीडा विद्यापीठांतर्गत क्रीडा व्यवस्थापनाच्या विविध अभ्यासक्रमांची सुरुवात.<br>• क्रीडा संशोधन व क्रीडा वाङ्मय निर्मितीस प्रोत्साहन. |
| ८) | राज्यातील क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन | • महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेअंतर्गत विविध क्रीडा संघटना व क्रीडा संस्था यांना अर्थसहाय्य.<br>• एकविध खेळाच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन. |
| ९) | राज्यात साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन | • साहसी खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात महाराष्ट्र स्टेट ॲडव्हेंचर स्पोर्ट्स सेंटरची स्थापना. |
| १०) | क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना | • क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समिती |

## १) क्रीडाविषयक पायाभूत सुविधांची निर्मिती :

### १.१) क्रीडांगणांचे आरक्षण :

सर्वांसाठी सदृढता, हा क्रीडा धोरणाचा गाभा असून समाजातील प्रत्येक नागरिक, अबालवृद्ध हे सदृढ असणे आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती, औद्योगिक वसाहती आदि क्षेत्रामध्ये क्रिडांगण व मनोरंजनासाठी राखीव भूखंडाची आरक्षणे भविष्यामध्ये बदलण्यात येऊ नयेत. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था/प्राधिकरण/शासन यांनी त्यांच्या अखत्यारितील अशी मैदाने तात्काळ अद्ययावतपणे विकसित करुन आजुबाजूच्या परिसरातील शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, क्रीडा संस्था, वसाहती, खेळाडू, नागरिक यांना उपलब्ध करून द्यावीत. ज्या सहकारी, खाजगी, उद्योग समुह संस्थांना शासनामार्फत जमीन उपलब्ध करुन दिली आहे, त्या सहकारी संस्थातील मोकळी जागा इतर खेळाडूंना खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच क्लबच्या उपलब्ध क्रीडा सुविधांचा उपयोग करून घेण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांकडून नाममात्र फी आकारून दुपारी १२ ते ४ या वेळात उपलब्ध करून देण्यात याव्यात. उपलब्ध क्रीडा सुविधांचा वापर करण्याबाबत सामंजस्य करार करताना अटी व शर्ती जाचक असू नयेत. तसेच शाळांना क्रिडांगणाची नोंदणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडे सक्तीची करण्यात येईल.

### १.२) क्रीडा साहित्य अनुदान :

खेळाडूंना दैनंदिन सराव क्रीडास्पर्धा, प्रशिक्षण तसेच विद्यार्थ्यांना खेळाची आवड निर्माण करण्यासाठी खेळांचे साहित्य अत्यावश्यक आहे. शासनामार्फत क्रिडांगण विकास योजना, गाव तेथे क्रिडांगण, व्यायामशाळा विकास या योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेतून शैक्षणिक व क्रीडा संस्थांना खेळाच्या सुविधा, व्यायामशाळेचे बांधकाम व व्यायामाचे अद्ययावत साहित्य इ.साठी अनुदान देण्यात येते.

शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक्रम, चाचण्या इ.साठी पुरेसे साहित्य संस्थांमध्ये असणे अत्यावश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, क्रीडा संस्था यांच्याकरिता क्रीडा साहित्य अनुदानाची योजना अंमलात आणण्यात येईल.

विभागीय, जिल्हा तसेच तालुका स्तरावर जेथे शासनाची क्रीडा संकुले तयार झालेली आहेत तेथे उत्कृष्ट दर्जाचे क्रीडा साहित्य व क्रीडा गणवेश सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यासाठी संकुलाच्या जागेचा वापर करण्यात येईल. ज्यामुळे संकुलाला प्रत्यक्ष भेट देणाऱ्यांच्या संख्येतही वाढ होईल तसेच खेळाडूंना सवलतीच्या दरात क्रीडा साहित्य उपलब्ध होईल.

### १.३) राज्यातील क्रीडा सुविधांचे सर्वेक्षण करणे :

महाराष्ट्र राज्याला क्रीडा संस्कृतीचा मोठा वारसा असून क्रीडा धोरण राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे तसेच क्रीडाविषयक पायाभूत सुविधा निर्माण व विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे. राज्यातील व्यायामशाळा, क्रीडांगणे, जलतरण तलाव, विविध खेळांची मैदाने, इ. सुविधांची माहिती संकलित करून जतन करणे आवश्यक आहे. क्रीडा विभागामार्फत सर्वेक्षणाची विशेष मोहिम हाती घेण्यात येईल. विशेष अनुदान देऊन क्रीडा सुविधा सर्वेक्षणाची माहिती संगणकीकृत करण्यात येईल.

### १.४) तालीम, कुस्ती केंद्रांचा विकास करणे :

ग्रामीण व शहरी भागात कुस्ती खेळाची विशेष आवड आहे. हा खेळ प्रामुख्याने माती व गादी विभागात खेळला जातो. मातीच्या आखाडा/तालीम यांची विशेष ओळख सर्वत्र आहे. कुस्तीच्या तंत्रात झालेले बदल लक्षात घेऊन आखाडा/तालमीचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. यासाठी खालील उपाय योजना करण्यात येतील.

- मातीचे आखाड्यांचे बांधकाम, तालमींच्या दुरुस्ती व मॅट्रस घेण्याकरिता क्रीडा मंडळे, कुस्ती कलेच्या विकासाचे कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांना रु. ७.०० लक्ष अर्थ सहाय्य देण्यात येईल.

- तालीम/आखाड्याच्या ठिकाणी आधुनिक प्रशिक्षणासाठी उपकरणे, मसाज सेंटर, सोना स्टीम बाथ, स्मार्ट फुल, जेंकुझी इत्यादी सुविधा विकसित करण्यासाठी अर्थ सहाय्य देण्यात येईल.
- आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू लगतच्या तीन वर्षात निर्माण करणाऱ्या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

**१.५) विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुल बांधकाम सुविधांचा वापर, देखभाल दुरुस्ती व वाणिज्य प्रायोजन :**

राज्यात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत क्रीडा सुविधा निर्मितीसाठी विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत विभागीय क्रीडा संकुल रु. २४ कोटी, जिल्हा क्रीडा संकुल रु. ८ कोटी, तालुका क्रीडा संकुल रु. १ कोटी बांधकाम अनुदान देण्यात येते. संकुलाचे बांधकाम विशिष्ट कालमर्यादेत पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. बांधकामाचे वाढते दर व निश्चित करण्यात आलेली अनुदान मर्यादा या बाबी पहाता संकुलांना पूर्णतः अनुदान एकाच वेळी देणे आवश्यक आहे. हाती घेतलेला प्रकल्प प्रथमतः पूर्णत्वास नेण्यासाठी बांधकामाचे उर्वरित अनुदान समित्यांना तत्परतेने उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच बांधकाम दर वाढत असल्याने अनुदान दराचे पुर्नमुल्यांकन शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून दोन वर्षांनी करण्यात येईल.

**सुविधांचा वापर :** संकुलामधील क्रीडा सुविधा खेळाडूंसाठी दैनंदिन सराव, प्रशिक्षण स्पर्धा यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. या सुविधा खेळाडूंना माफक दरात मिळण्यासाठी दर निश्चित करावेत. क्रीडा उपक्रमाव्यतिरिक्त अन्य बाबीसाठी भाड्याचे वेगळे दर निश्चित करण्यात येतील.

खाजगी प्रायोजकांनी संकुलामध्ये क्रीडा अकादमी स्थापन करण्यासाठी पुढे यावेत यासाठी प्रतिष्ठित समूहांना पुढाकार घेण्याबाबत उद्युक्त करणे आवश्यक आहे. अशा प्रायोजकांनी त्यांचे प्रशिक्षक, क्रीडा साहित्य, सुविधा वापरांचे दर, खेळाडू निवास, इत्यादी बाबत संकुल समित्यांशी करार करावेत. स्थानिक खेळाडूंना यासाठी विशेष आरक्षण ठेवण्यात येईल. यामुळे संकुलाचा वापर, उत्पन्नाची साधने तसेच तज्ज्ञ प्रशिक्षकांचे मार्गदर्शन संकुलामध्ये मिळण्याची सुविधा उपलब्ध होतील.

**देखभाल–दुरुस्ती** : शासकीय अनुदानातून क्रीडा संकुल निर्मितीसाठी शासन अनुदान देते. संकुल समित्यांना देखभाल दुरुस्ती व इतर आवर्ती खर्च भागविण्यासाठी विभागीय संकुल रुपये १५.०० लाख, जिल्हा क्रीडा संकुल रु.१०.०० लाख व तालुका क्रीडा संकुल रु.३.०० लाख (वेतन व भत्यासह) देण्याची सध्याची तरतूद आहे.

वीज, पाणीपट्टी, नगरपालिका व महानगरपालिका यांचे कर, संकुलाची स्वच्छता व सुरक्षा, संकुलाचा वापर, देखभाल–दुरुस्ती इत्यादीवर होणारा दैनंदिन खर्च करणे क्रमप्राप्त आहे. शासनाने बांधकामासाठी गुंतकविलेल्या आर्थिक तरतुदींचा विचार करता सुविधा सुस्थितीत दीर्घायुषी जतन होण्यासाठी संकुलाचा वापर, देखभाल–दुरुस्ती इ. दैनंदिन खर्चासाठी खालील प्रमाणे वाढीव अनुदान प्रतिवर्षी देण्यात येईल.

| | |
|---|---|
| विभागीय क्रीडा संकुल | रु. २५.० ० लाख |
| जिल्हा क्रीडा संकुल | रु. १ ५.०० लाख |
| तालुका क्रीडा संकुल | रु. ३.०० लाख |

**वाणिज्यिक प्रयोजनातून संविधांचा विकास :** वाणिज्यिक प्रयोजनातून संकुलाची निर्मिती करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे शासनाने निर्गमित केली आहेत. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा. (BOT) व पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) इत्यादी माध्यमातून संकुलासाठी खाजगी गुंतवणूकदार मिळवून आधुनिक संकुले उभी करण्यात येतील.

संकुलामध्ये कीडा सुविधा विकसित करण्यात येत आहे. त्याशिवाय संकुल क्षेत्रात उपहार गृहे, क्लब हाऊस इत्यादी सुविधा विकसित करण्यात येतील. खेळाडूंना माफक दरात संकुलातील सुविधा उपलब्ध होण्यासाठी क्रीडा उपक्रमाव्यतिरिक्त बाबींसाठी संकुले भाड्याने देताना वाढीव दर आकारण्यात येतील.

**बृहन्मुंबई क्रीडा प्राधिकरणाची स्थापना करणे :**

बृहन्मुंबई शहराकरिता क्रीडा सुविधा निर्मितीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतील.

- मुंबईमध्ये बृहन्मुंबई क्रीडा प्राधिकरणाची स्थापना करून त्या अंतर्गत वार्डनिहाय क्रीडा संकुले तसेच मुंबई शहर, उपनगर व नवी मुंबई या जिल्ह्यांसाठी जिल्हा क्रीडा संकुले त्याची उभारणी करण्यात येईल.
- मुंबई येथे विकसित करण्यात येणाऱ्या क्रीडा सुविधांमध्ये विविध खेळांच्या क्रीडा अकादमी कार्यान्वित करण्यात येतील. खाजगी प्रायोजकांचे सहकार्य घेऊन दर्जेदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना नित्य प्रशिक्षण देण्यात येईल.
- कांदिवली येथील शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या जागेवर आंतरराष्ट्रीय स्पर्धा संयोजनाच्या दृष्टीने विभागीय क्रीडा संकुलाची निर्मिती करण्यात येईल. या सुविधा विकसित करताना बांध, वापरा व हस्तांतरित करा. (BOT) व पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) माध्यमातून सुविधा निर्मिती करण्यात येतील.
- बृहन्मुंबई प्राधिकरण स्थापना करून त्यांच्या कार्यकक्षेमध्ये मुंबई येथील मैदानाचा सुयोग्य वापर, क्रीडा अकादमींचे कार्यान्वय, संकुलांची बांधकामे, क्रीडांगणावरील अतिक्रमण हटवणे, क्रीडा विकासासाठी सहाय्यभूत असणाऱ्या बाबी अंतर्भूत करण्यात येतील.
- मुंबई येथील क्रिडांगणाचा सुयोग्य वापर करण्यासाठी उदा. ब्रेबॉन, स्टेडियम, पुरंदरे स्टेडियम इ. जिमखाने वापरासाठी क्रीडा प्राधिकरणाचे सनियंत्रण राहील.

**राज्य क्रीडा विकास समितीची पुनर्रचना** : महाराष्ट्र स्पोर्ट्स इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन अंतर्गत योजनाबद्ध क्रिडा सुविधा निर्माण करण्यासाठी व त्याचा आढावा घेण्यासाठी राज्य क्रीडा विकास समितीची स्थापना करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. या समितीची व्यापकता पाहता त्यांची पुनर्रचना करण्यात येईल. यामध्ये मा. मंत्री, (क्रीडा) – अध्यक्ष, मा. राज्यमंत्री, –उपाध्यक्ष, मा. प्रधान सचिव– नियोजन, वित्त व क्रीडा– सदस्य. तसेच संचालक क्रीडा हे सदस्य सचिव असतील. या समितीला राज्य क्रीडा विकास समितीप्रमाणेच कार्यकक्षा व अधिकार राहतील.

**१.६) आमदार स्थानिक विकास निधीतून क्रीडाविषयक उपक्रमासाठी आर्थिक सहाय्य :**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत क्रीडाविषयक उपक्रम व बाबींमध्ये सध्याच्या तरतुदींखेरीज खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येतील.

- व्यायामशाळा बांधकाम व साहित्य तसेच क्रिडांगण विकास इ. बाबींसाठी मर्यादा रु. ७.०० लक्ष करण्यात येईल.
- खेळाडूंना वैयक्तिक क्रीडा साहित्य खरेदी करण्यासाठी रु. १.०० लाखपर्यंत अर्थसहाय्य देण्यात यावे. आंतरराष्ट्रीय कामगिरी केलेल्या खेळाडूंना याचा लाभ देण्यात येईल.
- खेळाडूंना इजा, दुखापत, वैद्यकीय उपचारासाठी रु. २.०० लाख कमाल मर्यादेत अर्थसहाय्य करण्यात येईल.

आमदार स्थानिक विकास निधीतून क्रीडास्पर्धांसाठी खालील मर्यादेत अर्थसहाय्य देण्यात येईल.

| अ. क्र. | स्पर्धा | अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| १) | स्थानिक क्रीडा स्पर्धा तसेच क्रीडा मंडळ, क्रीडा संस्था यांनी अधिकृत संघटनेच्या मान्यतेने आयोजित केल्या जाणाऱ्या निमंत्रित जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धा. | रु. १.०० |
| २) | जिल्हा क्रीडा स्पर्धा<br>(अधिकृत संघटनेद्वारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धा) | रु. २.०० |

| अ. क्र. | स्पर्धा | अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| ३) | राज्य क्रीडा स्पर्धा<br>(अधिकृत संघटनेद्वारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धा ) | रु. ४.०० |
| ४) | राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा<br>(अधिकृत संघटनेद्वारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धा ) | रु. ५.०० |
| ५) | आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा<br>(अधिकृत संघटनेद्वारा आयोजित अजिंक्यपद स्पर्धा तसेच शासकीय स्पर्धा ) | रु. १०.०० |

**१.७) राज्य क्रीडा विकास निधी व जिल्हा क्रीडा विकास निधीची स्थापना** :

**अ) राज्य क्रीडा विकास निधी** : राज्य व जिल्हा स्तरावर क्रीडा विकासाचे उपक्रम परिणामकारकरित्या राबविणे, राज्यातील प्रतिभावान खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाची कामगिरी करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी राज्य क्रीडा विकास निधी उभारण्याबाबत दिनांक ३ सप्टेंबर २००३ शासन निर्णयान्वये निर्णय घेतलेला आहे.

राज्य क्रीडा विकास निधीचे उत्पन्नाचे स्रोत राज्य शासनाकडून प्रतिवर्षी ५०.०० लक्ष अश्व शर्यतीचे एका दिवसाचे उत्पन्न (मुंबई शर्यत), विविध औद्योगिक प्रतिष्ठाने वा वाणिज्य प्रतिष्ठाानातर्फे देण्यात येणाऱ्या देणग्या, जिल्ह्यामधून जिल्हापरिषद, महानगरपालिका व नगरपालिकेमार्फत जिल्हा विकास निधिमध्ये जमा होणाऱ्या रकमेपैकी ४० टक्के रक्कम, जिल्हा विकास निधीमध्ये शैक्षणिक संस्थाकडून जमा होणाऱ्या निधीपैकी ४० टक्के रक्कम व प्रदर्शनीय सामने, सांस्कृतिक कार्यक्रम इ. उपक्रमामधून जमा होणारा निधी अशी आहेत. खालील उपाय योजनेद्वारे राज्य क्रीडा विकास निधी सक्षम करण्यात येईल.

- राज्य शासनाकडून प्रतिवर्षी रुपये ३.०० कोटी अनुदान.
- विशेष क्रीडा लॉटरीचे प्रकाशन करुन जमा होणारे उत्पन्न
- औद्योगिक व वाणिज्य प्रतिष्ठानाकडून देणग्या स्वीकारण्यात येतील व अशा देणागीदारांना आयकरामध्ये विशेष सवलत देण्यात येईल.
- मुंबई येथील शासनाच्या नियंत्रणाखाली क्रिडांगणाच्या भाड्यापोटी जमा होणारी रक्कम.
- खाजगी शिक्षण संस्था, नांदणीकृत संस्था यांना शासनाच्या मालकीच्या जमीनी भाडेपट्टा किंवा मालकीने दिली असल्यास सदर संस्थेद्वारे उत्पन्नाचे स्रोत मिळविण्यासाठी क्रिडांगणावर आयोजित उपक्रमाच्या (उदा. व्यापारी प्रदर्शन, लग्न समारंभ, गरबा इत्यादी) भाड्यापोटी मिळणाऱ्या उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम.

**ब) जिल्हा क्रीडा विकास निधीची स्थापना** : खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्याकरिता विविध उपक्रम, प्रशिक्षण शिबिरे, साहित्य तसेच वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या अडीअडचणींकरिता तात्काळ आर्थिक सहाय्य करणे आवश्यक आहे. राज्य क्रीडा विकास निधीच्या धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यासाठी क्रीडा विकास निधी स्थापन करण्यात येईल. या निधीसाठी शासनाकडून रु. ५.०० लक्ष इतक्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. औद्योगिक व वाणिज्य प्रतिष्ठानाकडून देणग्या स्वीकारण्यात येतील व अशा देणगीदारांना करांमध्ये विशेष सवलत देण्यात येईल.

**१.८) क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य करणे** :

खेळाडू तयार होण्यासाठी अद्ययावत क्रीडा सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. केंद्र शासनामार्फत या सुविधा निर्माण करण्यासाठी अनुदान देण्याची योजना सन २००५-०६ या वर्षांपासून बंद करण्यात आलेली आहे. नियोजन आयोगाने क्रीडा सुविधा निर्मितीमध्ये राज्यशासनांनी पुढाकार घ्यावा असे केंद्र शासनाच्या क्रीडा मंत्रालयास सूचित

केलेले आहे. सद्यस्थितीत केंद्र शासनाकडून नवीन प्रकल्पांना अनुदान देण्यात येत नाही. शैक्षणिक संस्था, कटक मंडळे, सेवाभावी संस्था, क्रीडा संस्था, नगर परिषदा, महानगरपालिका, ग्रामपंचायती यांना प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अर्थ सहाय्य केंद्रशासनाच्या पूवीच्या योजनेत देण्यात येत होते. याच धर्तीवर राज्य शासनामार्फत क्रीडा सुविधा निमिर्ती योजना आखण्यात येईल यामध्ये राज्य शासन व संस्था यांचा ७५:२५ या प्रमाणात हिस्सा राहील. त्यामुळे क्रीडा संस्कृती जोपासण्यास मदत होईल. खालील बाबीसाठी नवीन योजनेत अनुदान देण्यात येईल.

| अ. क्र. | प्रकल्पाचा प्रकार | अपेक्षित अंदाजित खर्च | राज्यशासन अनुदान मर्यादा | संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १) | क्रीडांगण विकसित करणे | | | |
| | फुटबॉल/क्रिकेट/हॉकी इ. खेळांची प्रमाणित आकाराची मैदाने | १०.०० | ७.५० | २.५० |
| | प्रमाणित आकाराचे आठ लेन्सच्या धावनपथासह ग्रास/सिंडर ट्रॅक इ. | २०.०० | १५.०० | ५.०० |
| | प्रमाणित आकाराचे सिमेंट क्राँक्रिट बास्केटबॉल कोर्ट (पोस्ट व बोर्डसह) | १०.०० | ७.५० | २.५० |
| | प्रमाणित आकाराचे (मुरुम) टेनिस कोर्ट | १०.०० | ७.५० | २.५० |
| | प्रमाणित आकाराचे व्हॉलीबॉल मैदान | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| २) | बंदिस्त प्रेक्षागृह | | | |
| | ४० × २५ ×१२.५ मी. आकारापेक्षा कमी नसलेले (फ्लोअरिंगसह) चेंजींग रुम्स, स्वचछतागृहे व प्रसाधनगृहासह | १२०.०० | ९०.०० | ३०.०० |
| | ३५× १९ × १२.५ मी. आकारापेक्षा कमी नसलेले (फ्लोअरिंगसह) | ९०.०० | ६७.५० | २२.५० |
| | १७ × १७ × ७ मी. आकारापेक्षा कमी नसलेले (फ्लोअरिंगसह) | ४०.०० | ३०.०० | ११.० |
| ३) | क्रीडा सुविधा | | | |
| | १८० × १०० मी. मैदान आणि आठ लेन्सच्या धावनपथ, चेंजिंग रुम, प्रसाधनगृह इ. | ३६.०० | २७.०० | ९.०० |
| | १८० × १०० मी. आकारापेक्षा कमी नसलेले मैदान ग्रास/सिंडर सहा लेनचा धावनपथ, चेंजिंग रुम, प्रसाधनगृह इ. | ३०.०० | २२.५० | ७.५० |
| | जलक्रीडा सुविधा, साहसी खेळांची सुविधा व साहित्य जलतरण तलावाव्यतिरिक्त (बोट हाऊस, जे.टी.ई व क्लाईंबिंग वॉल,) | ५०.०० | ३७.५० | १२.५० |
| | स्केटिंग रिंक (आऊट डोअर) सिमेंट काँक्रीट फ्लोअरिंग आकार ४० × २० मी. | १०.०० | ७.५० | २.५० |
| | वेलोड्रम (प्रमाणित आकाराचा) | ५०.०० | ३७.५० | १२.५० |
| | शूटिंग रेंज | ५०.०० | ३७.५० | १२.५० |
| | ॲस्ट्रॉटर्फ हॉकी क्रीडांगण | ७५.०० | ५६.२५ | १८.७५ |
| | लॉन टेनिस | २०.०० | १५.०० | ५.०० |

**ब) क्रीडा साहित्यासाठी अनुदान** : खेळाडूंना नित्य नियमाने सराव, क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना स्पर्धा, प्रशिक्षण इत्यादीकरिता क्रीडा साहित्याची आवश्यकता आहे. खेळ व अनुषंगिक साहित्य, प्रशिक्षण उपकरणे इत्यादीसाठी संस्थांना सहाय्य केल्यास खेळाडूंच्या कामगिरीचा दर्जा उंचावण्यास सहाय्य होईल. संस्थांकडे स्थावर उत्पन्नाची साधने उपलब्ध नाहीत ही बाब विचारात घेता, खालील क्रीडा प्रकारांचे क्रीडा साहित्य राज्य शासन व संस्था यांना ७५:२५ या प्रमाणात देण्यात येईल.

**क्रीडा साहित्यासाठी अुनदान मर्यादा**

(रुपये लाखात)

| अ. क्र. | क्रीडा प्रकार | क्रीडा साहित्य | अनुदान मर्यादा | राज्यशासन अनुदान मर्यादा | संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १) | ॲथलेटिक्स | थाळी, गोळा, भाला, ॲथलेटिक्स मार्किंग कोन्स, स्टार्टींग ब्लॉक्स, रिले बॅटन्स, हर्डल्स, हायजम्प व पोलव्हॉल्ट क्रॉसबार, लांब, उंच उडी व पोलव्हॉल्ट टेक ऑफ बोर्ड, हायजंप व पोलव्हॉल्ट पिट, गोळा टो बोर्ड, हर्डल्स, स्टार्टर रोर्स्टम, स्पाईक इ. | १०.०० | ७.५० | २.५० |
| २) | फुटबॉल | फुटबॉल, गोलकिपर, ग्लोव्हज, कोन, फुटबॉल, नेट, किकिंग बोर्ड, गोलपोस्ट, कॉर्नर फ्लॅग, रेफरी फ्लॅग | ४.०० | ३.०० | १.०० |
| ३) | हॉकी | हॉकी, गोलकिपर कीट, हॅण्ड ग्लोव्हज, हॉकी टर्फ वॉल, गोल पोस्ट सेट, प्रॅक्टिस नेट, स्टीक केस, स्टीक यु ब्लेड, कार्बन, फायबर ग्लास, हिटींग बोर्ड, कोन, शिनगार्डस | ४.०० | ३.०० | १.०० |
| ४) | टेनिस | टेनिस बॉल, टेनिस नेट, टेनिस लॉन पोल, (स्लिवस सहित) | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| ५) | बॅडमिंटन | बॅडमिंटन नेट, बॅडमिंटन पोल | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| ६) | वेटलिफ्टिंग, पॉवरलिफ्टिंग | रबर कोटेड बारबेल सेट, वेटलिफ्टिंग बेल्ट, वेटलिफ्टिंग प्लॅटफॉर्म | ४.०० | ३.०० | १.०० |
| ७) | कुस्ती | कुस्ती मॅट (१२ × १२ मी. सेट सिंथॅटिक कव्हरसह) | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| ८) | व्हॉलिबॉल | व्हॉलिबॉल, व्हॉलिबॉल नेट, व्हॉलिबॉल पोल, ॲटीना फायबर ग्लास | ०.७५ | ०.५६ | ०.१९ |
| ९) | खो खो | पोल (टीकवूड) १० नग | ०.२५ | ०.१८ | ०.०६ |
| १०) | बॉक्सिंग | ग्लोव्हज टेन ऑन्स रेड ब्ल्यू, पंचिंग पॅड, पंचिंग बॅग, हेड गियर रेड-ब्ल्यू, पंचिंग ग्लोव्हज, बॉक्सिंग रिंग | ०.७५ | ०.५६ | ०.१९ |
| ११) | रस्सीखेच | १.५'' रस्सी | ०.२५ | ०.१८ | ०.०६ |

| अ. क्र. | क्रीडा प्रकार | क्रीडा प्रकार | अनुदान मर्यादा | राज्यशासन अनुदान मर्यादा | संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १२) | हॅण्डबॉल | हॅण्डबॉल, गोलपोस्ट, नेट | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| १३) | जलतरण | पाम पुलर, किक बोर्ड, पुल वॉय, लाईफ जॅकेट, बॅरल फ्लोट, आर्म फ्लोट लेन, लाईफ वॉय, फ्लोटलेन, डॉयव्हिंग बोर्ड, डॉयव्हिंग बोर्ड स्टॅन्ड | ५.०० | ३.७५ | १.२५ |
| १४) | जिम्नॅस्टिक्स | बॅलन्सिंग बिम, अनइव्हन बार, हॉरिझॉन्टल बार, पॉमेल हॉर्स, पॅरलल बार, रोमन रिंग, व्हॉल्टिंग टेबल, जिम्नॅस्टिक्स बेंचेस, बीट बोर्ड–फाईव्ह स्प्रिंग्स, थ्रीज स्प्रिंग्स, बॉल बार्स फॉर टू सेक्शन, रोमन रिंग्ज, स्पॉटिंग बेल्ट, फ्लोअर प्लेट, मुशरुम हॉर्स, स्पेअर पॉमेल, ट्रॅम्पोलिन, फ्लोअर एक्सरसाईज मॅट, रिदमिक साहित्य. (रोप, बॉल, रिबन, क्लब) | १५.०० | ११.२५ | ३.७५ |
| १५) | कबड्डी | सिंथेटिक मॅट्स | ४.०० | ३.०० | १.०० |
| १६) | बास्केटबॉल | बास्केटबॉल, नेट, पोल | ४.०० | ३.०० | १.०० |
| १७) | टेबलटेनिस | टेबल, रोबो (Multy program) | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| १८) | तायक्वांदो, ज्युदो, कराटे | मॅट्स | ४.०० | ३.०० | १.०० |
| १९) | मल्लखांब | पोल, रोप | १.०० | ०.७५ | ०.२५ |
| २०) | शूटिंग | इलेक्ट्रॉनिक पुली, टारगेट, एअर रायफल, एअर पिस्टल, लाईटस्टॅण्ड, रायफलस्टॅण्ड, पॅलेट | १०.०० | ७.५० | २.५० |
| २१) | तिरंदाजी | तिरंदाजी खेळासाठी पुरक साहित्य | २.०० | १.५० | ०.५० |

वरील नमूद क्रीडा प्रकार उदाहरणार्थ दिलेले असून कालानुरूप बदल, उपाय योजना, क्रीडा प्रकार, साहित्य व अनुदान मर्यादा यामध्ये सुधारणा करण्यात येईल.

## २) आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तराचे खेळाडू घडविणे व अत्याधुनिक प्रशिक्षणाकरिता आर्थिक सहाय्य :

### २.१) क्रीडा प्रबोधिनी :

राज्य शासनामार्फत विविध जिल्ह्यांत ११ क्रीडाप्रबोधिनी कार्यरत आहेत. यामध्ये एकूण ७५० विद्यार्थ्यांची क्षमता आहे. प्रचलित पद्धतीत निवड प्रक्रियेद्वारे या प्रबोधिनीत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. परंतु सदर प्रबोधिनीत संपूर्ण क्षमतेमध्ये विद्यार्थी सहभागी झाल्याचे दिसत नाही. या योजनेची व्यापक प्रसिद्धी तसेच प्रचलित निवड पद्धत शिथिल करणे अत्यावश्यक आहे. यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतील. प्रबोधिनीच्या प्राचार्य पदासाठी क्रीडा क्षेत्रातील व्यक्तीची नेमणूक करण्यात येईल.

- बॅटरी ऑफ टेस्ट (निवड चाचण्या) पद्धतीचे पूनर्मूल्यांकन करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नियुक्त करण्यात येईल. नवीन क्रीडा धोरण समितीने अहवाल सादर केल्यानंतर पुढील तीन महिन्यात तज्ज्ञ समितीद्वारे अहवाल सादर करण्यात येईल.
- क्रीडा प्रबोधिनीत थेट प्रवेश देताना राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व केलेल्या, खेळाडूंचा विचार होईल. तसेच राज्यस्तरावरील स्पर्धेत १४ व १७ वर्षे वयोगटात प्रथम तीन क्रमांक संपादन करणाऱ्या खेळाडूंना सरळ प्रवेश देण्यात येईल.
- खेळाडूचा प्रवेश रद्द करण्याबाबत वयोमर्यादा निश्चित करत असताना १४ ते २० वर्षे या कालावधीत मिळविलेले प्रावीण्य व भविष्यात होणारी प्रगती याबाबत विचार करुन प्रवेश रद्द करण्यात येईल.
- क्रीडा प्रबोधिनीमध्ये मानधनावर नियुक्त केलेल्या क्रीडा मार्गदर्शकांना मासिक रु. २५०००/- इतके मानधन देण्यात येईल. पाच वर्षे त्याच्या कामाचे मूल्यमापन करुन मुदतवाढ देण्यात येईल.
- क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरीची अपेक्षा करताना आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण तज्ज्ञांमार्फत देणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावरील नामांकित विदेशी प्रशिक्षकांची नियुक्ती केल्याने खेळाडूंच्या कामगिरीचा दर्जा उंचावण्यात मदत होईल. याकरिता मार्गदर्शकांना आकर्षक मानधन, ३० ते ६० दिवसांपर्यंतचे प्रगत प्रशिक्षण इ. बाबींचा विचार करण्यात येईल.
- आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंना प्रतिमाह शिष्यावृत्ती देण्यात येईल.
- क्रीडा प्रबोधिनी/क्रीडापीठ, पुणे येथील संकुलात नियमित आंतरराष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.
- प्रत्येक क्रीडा विभागात क्रीडा प्रबोधिनी निर्माण करणे.

**२.२) अनिवासी क्रीडा अकादमीची स्थापना** :

खेळाडूंना स्थानिक स्तरावर खेळाच्या उत्तम सुविधा व तांत्रिक प्रशिक्षण नियमित दिल्यास खेळाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल. पालक आपल्या पाल्यांना घरापासून लांब ठेवण्यास तयार नसतात, यासाठी स्थानिक स्तरावर अनिवासी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात येईल. अनिवासी क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्याबाबत व विद्यार्थ्यांना क्रीडा प्रबोधिनीमध्ये अनिवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश देण्यात येईल.

- स्थानिक स्तरावरील खाजगी पंजीकृत मान्यताप्राप्त क्रीडा विकासाचे कार्य करण्याऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनिवासी क्रीडा अकादमीची स्थापन करण्यास मान्यता देण्यात येईल. अशी मान्यता देताना या संस्थेकडे मागील तीन ते पाच वर्षे क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले असणे आवश्यक आहे. संस्थेने ज्या खेळाच्या क्रीडा अकादमीची मागणी केली आहे त्या खेळासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा जसे प्रशिक्षण सुविधा, तज्ज्ञ प्रशिक्षक, क्रीडा साधनसामग्री असणे आवश्यक आहे.
- अनिवासी प्रबोधिनीतील खेळाडूंना रुपये १०० दैनिक आहार भत्ता, प्रशिक्षकासाठी किमान रुपये १५,००० मासिक मानधन तसेच सहाय्यकास रु. ५०००/- मासिक मानधन देण्यात येईल.
- अनिवासी क्रीडा प्रबोधिनीचा व्यवस्थापन खर्च, विद्युत खर्च, क्रीडांगण देखभाल दुरुस्ती इत्यादीसाठी रु. ५०००/- दरमहा दिले जातील.
- क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंना खेळाचा गणवेष व क्रीडा साहित्य खरेदी, स्पर्धेचा प्रवास खर्च, दैनिक भत्ता, निवास व भोजन यासाठी अनुज्ञेय देय रक्कम अनिवासी क्रीडा प्रबोधिनींना देण्यात येईल.

- अनिवासी क्रीडा प्रबोधिनी मंजूर केलेल्या संस्थांनी अनुदान विनियोग, योग्य कार्यन्वयन इत्यादी न केल्यास अशा संस्थांना एक महिना पूर्व नोटीस देऊन मान्यता रद्द केली जाईल.

शासनाने विकसित केलेल्या तालुका, जिल्हा, विभागीय क्रीडा संकुलामध्ये संकुल समितीद्वारे अनिवासी क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्यात येईल तसेच महानगरपालिका क्षेत्रामध्ये लोकसंख्येच्या आधारे अनिवासी क्रीडा प्रबोधिनी सुरू करण्यात येतील.

**२.३) आदिवासी क्रीडा स्पर्धा व क्रीडा प्रबोधिनी स्थापना :**

राज्यात आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थांना क्रीडा व शारीरिक शिक्षणासाठी बी.पी.एड. पदवीधारक शिक्षक नियुक्त करणे गरजेचे आहे. शारीरिक शिक्षणाचे तांत्रिक ज्ञान/माहिती देणे साठी अर्हताप्राप्त शारीरिक शिक्षक असणे आवश्यक आहे.

या खेळाडूंच्या जिल्हा व राज्यस्तरापर्यंत स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. खेळाडूंच्या क्रीडा कामगिरीचा दर्जा उंचावण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या नियंत्रणात दैनंदिन अद्ययावत प्रशिक्षणासाठी क्रीडा प्रबोधिनीची स्थापना करण्यात येईल.

**२.४) राज्यस्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन :**

खेळाडूंच्या क्रीडाविषयक कामगिरीमुळे देशांच्या व राज्याच्या नावलौकीकात भर पडत आहे. खेळाडू घडविण्यासाठी खेळाच्या पायाभूत सुविधा, क्रीडा मार्गदर्शकांचे मार्गदर्शन, सराव व प्रशिक्षणासाठी पुरेसे साहित्य, प्रशिक्षणाचा कृती आराखडा, खेळातील कौशल्यांवर प्रभुत्व येण्यासाठी सराव, नियमित प्रशिक्षण, स्पर्धा, खेळाडूंच्या सकारात्मक मानसिकतेसाठी मानसोपचार तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आहार तज्ज्ञ, मसाजिस्ट, दुखापतीवर इलाजासाठी फिजिओथेरपीस्ट इ. बाबींचे मार्गदर्शन खेळाडूंना पुरविणे आवश्यक आहे.

जागतिक नामांकित स्पर्धांमध्ये नवनवीन उच्चांक प्रस्थापित होतात तसेच विविध तंत्रांच्या आधुनिक उपकरणांचा वापर करून खेळाडूंची कामगिरी उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंसाठी दर्जेदार नामांकित प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, समतोल आहार तसेच नियमित प्रशिक्षण या गोष्टींवर लक्ष केंद्रित करून प्रशिक्षणाचा कृती कार्यक्रम हाती घेण्यात येईल.

- तज्ज्ञ क्रीडा प्रशिक्षकांच्या नियंत्रणाखाली खेळाडूंचा दर्जा वाढविणे. देशी, विदेशी प्रशिक्षकांच्या करार पद्धतीने सेवा उपलब्ध करून घेणे. मानधनाचे दर, प्रशिक्षकांचा दर्जा व त्यांची मागणी इ. बाबींचा विचार करण्यात येईल.
- खेळाडूंसाठी राज्यस्तरावर तीस दिवसांचे वर्षातून दोन वेळा प्रशिक्षणाचे आयोजन.
- शिबिरासाठी खेळाडूंची निवड अंतिम करण्यासाठी पाच जणांची समिती नियुक्त करण्यात येईल. यामध्ये संचालक, क्रीडा व युवक सेवा, संबंधित एकविध खेळ संघटनेचे सचिव अथवा त्यांचे प्रतिनिधी, महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचा प्रतिनिधी, संबंधित खेळाचा अर्जुन/शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त खेळाडू, संबंधित खेळांचे मार्गदर्शक राहतील.
- प्रशिक्षणार्थी खेळाडूंची निवड करताना राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी खेळाडू, राज्यस्तर स्पर्धेतील प्रावीण्यधारक तसेच उदयोन्मुख खेळाडूंना संधी देण्यात येईल.
- राज्यातील विविध खेळांच्या एकविध संघटनांच्या खुल्या गटातील पुरुष/महिला खेळाडू, तसेच भारतीय शालेय खेळ महासंघामध्ये १७ व १९ वर्षे वयोगटातील राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी खेळाडू इ. चा समावेश शिबिरामध्ये केला जाईल.
- प्रशिक्षण शिबिरादरम्यान खेळाडूंचा आहार रु. २५०/-, निवास रु. २५०/- व पूरक आहारासाठी रु. ५०/- याप्रमाणे प्रत्येक खेळाडूवर खर्च करण्यात यावेत. तसेच प्रवासाची रक्कम देण्यात येईल.
- खेळाडूंना क्रीडा गणवेश व ट्रॅकसूट इ. साठी प्रति खेळाडू रु. २०००/- देण्यात येतील.

- प्रशिक्षणादरम्यान क्रीडा साहित्य व प्रशिक्षण उपकरणासाठी रु. ७५,०००/- तसेच क्रीडांगण देखभाल, मैदान सेवक व सादील खर्च इ. साठी रु. २५,०००/- देण्यात येतील.
- खालील खेळांची प्रशिक्षण शिबीरे आयोजित करण्यात येतील. इतर क्रीडा प्रकाराबाबत भविष्यात विचार केला जाईल.

  **प्रशिक्षणासाठी निवडलेले प्रथम टप्प्यातील क्रीडा प्रकार** : १) ॲथलेटिक्स, २) जलतरण, ३) कबड्डी, ४) आर्चरी, ५) सेलिंग, ६) रोईंग, ७) खो-खो, ८) हॉकी, ९) जिम्नॅस्टिक्स (रिदॅमिकसह), १०) शूटींग, ११) बॅडमिंटन, १२) कुस्ती, १३) टेबलटेनिस, १४) लॉनटेनिस, १५) व्हॉलीबॉल या खेळांसाठी प्राधान्याने शासनाने तरतूद उपलब्ध करुन द्यावी.

**२.५) तालुका, जिल्हा व राज्य क्रीडा प्रशिक्षण केंद्रांची स्थापना करणे** :

**अ) जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र** : जिल्हास्तरावर जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करून खेळाडूंना नियमित प्रशिक्षण देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. तालुका स्तरावर नियमित प्रशिक्षणासाठी तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करावीत. त्यासाठी पुरेसे अर्थसहाय्य देण्यात येईल.

- जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केद्रांतर्गत शिबीरांदम्यान दैनंदिन प्रशिक्षणासाठी येणाऱ्या प्रत्येक शिबिरार्थींना अल्पोपहारासाठी प्रतिदिन रु. ५०/-, क्रीडा साहित्य, प्रशिक्षक मानधन, मैदान, सेवक, सादील खर्च इ. साठी रु.१.०० लक्ष देण्यात येईल.
- क्रीडा स्पर्धा, खेळाडू गणवेश, दैनंदिन अल्पोपहार, क्रीडा साहित्य, निवास खर्च, प्रवास इ. बाबीवरील खर्च अनुज्ञेय ठरवून आर्थिक तरतूद करण्यात रु. ५.०० लक्ष येईल.
- तालुका व जिल्हा क्रीडा संकुलातील सुविधा प्राधान्याने या उपक्रमासाठी वापरण्यात येतील.
- जिल्ह्यातील क्रीडा शिक्षक, मार्गदर्शक तसेच क्रीडा संस्थांमधील प्रशिक्षकांसाठी चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा तसेच उजळणी वर्गाचे नियमित आयोजन करण्यात येईल.
- जिल्हास्तरावर विविध खेळांचे नियमित प्रशिक्षण व वर्षातून दोन वेळा किमान २० दिवसांचे शिबिरांचे आयोजन केले जाईल.

**ब)** विभागीय क्रीडा संकुलांमध्ये दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण झालेल्या आहेत. या सुविधांचा वापर दैनंदिन प्रशिक्षण तसेच राज्यस्तरीय क्रीडा प्रशिक्षणासाठी नियमित करण्यात यावा. विभागीय संकुलात आयोजित करण्यात येणाऱ्या क्रीडा प्रशिक्षणासाठी जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राप्रमाणे निधी उपलब्ध करून दिला जाईल.

## ३) खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव :

### ३.१) खेळाडूंना प्रोत्साहन, सवलती व गौरव :

**राज्य राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी विशेष गुण सवलत** : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व क्रीडा कामगिरीकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणारे दहावी व बारावी इयत्तेतील शालेय खेळाडू विद्यार्थ्यांना २५ जादा गुण देण्याबाबत केलेल शिफारशीच्या अनुषंगाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. ४ जून २००७ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. शासन व संघटनाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या राज्य, राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी खेळाडूंना २५ गुण देण्यात येतात.

क्रीडा विभागामार्फत तालुका, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय या स्तरावर स्पर्धा घेण्यात येतात. तर संघटनामार्फत जिल्हा व थेट राज्यस्पर्धा घेण्यात येतात. संघटनांनी दाखल केलेल्या खेळाडूंच्या याद्यांमध्ये काही जिल्ह्यांचा संपूर्ण संघच दहावी किंवा बारावीच्या विद्यार्थ्यांचा असल्याचे आढळून आले आहे. यावरून असे निष्पन्न होते की, खेळाशी, खेळभावनेशी तसेच स्पर्धेतील संघाच्या कामगिरीशी तडजोड करून केवळ क्रीडा सवलत गुण घेण्यासाठी संघाची

निवड केली जात आहे. यामध्ये मोठा गैरप्रकार झाल्याची उदाहरणे देखील पुढे आली आहेत. या सर्व प्रकारांवर एकंदरीतच २५ क्रीडा सवलत गुण विद्यार्थ्यांना देण्यामागचा उद्देश सफल होत नसल्याचे आढळून आले आहे.

एकविध खेळ मान्यताप्राप्त संघटनांद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनाच दहा गुण देण्यात यावे. तसेच सांघिक/वैयक्तिक खेळात प्रथम तीन क्रमांकाच्या खेळाडूना २५ गुण व चार ते आठ क्रमांकात असणाऱ्या संघातील खेळाडूंना २० गुण देण्यात यावे व राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडू २५ गुणांची क्रीडा गुणांची सवलत देण्यात येईल.

शालेय राज्यस्तरीय स्पर्धेतील सहभागी होणाऱ्या खेळाडूंना २० क्रीडा गुण, प्रावीण्यधारक इ. प्रथम तीन क्रमांकाच्या संघातील खेळाडूंना तसेच राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी खेळाडूना २५ क्रीडा गुणांची सवलत देण्यात येईल. तसेच विभागस्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धामध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना १० गुण देण्यात येतील.

दहावी–बारावीप्रमाणे १ली ते ९वी पर्यंत आणि ११वी इयत्तेच्या विद्यार्थ्यांना देखील विशेष क्रीडा गुण सवलतीत सामील केले तर विद्यार्थ्यांना खेळापासून पालकवर्ग अभ्यासाच्या कारणावरून परावृत्त करणार नाही आणि विद्यार्थी खेळाचा सराव नियमितपणे खंड न पडता करू शकतील. तसेच शाळांचा आंतरशालेय स्पर्धेतील १०० टक्के सहभाग होण्याच्या दृष्टीने मदत होईल. यासाठी शालेय क्रीडा स्पर्धामध्ये विविध स्तरावर सहभागासाठी विशेष क्रीडागुण देण्यात यावे. हे गुण त्या विद्यार्थ्याला पुढील वर्गात प्रवेश देण्यासाठी तसेच एकूण टक्केवारीमध्ये जमा करावे. हे विशेष गुण पहिली ते नववी व अकरावीच्या खेळाडूंना देण्यात येतील.

इयत्ता १ ली ते ८ वीसाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्यात आली आहे. त्यानुसार व्यापक अध्ययन प्रक्रियेचे सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि वर्तनातील दृश्यरूप किंवा वर्तन निष्पत्ती या दोन उद्दिष्टांवर भर देणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. सर्वंकष मूल्यमापनामध्ये आकारिक मूल्यमापन आणि संकलित मूल्यमापन पद्धतीचा समावेश केला आहे. शारीरिक शिक्षणाच्या परीक्षेमध्ये जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय खेळाडूंना अनुक्रमे २५, ५०, ७५ व १०० अधिक गुण देण्यात येतील.

**३.२) जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये प्रावीण्य मिळविणाऱ्या शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान :**

शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा कौशल्य दाखविण्याकरिता स्पर्धा महत्त्वपूर्ण आहेत. जिल्हास्तरावरील स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांनी सहभाग घेऊन खेळाडूंना संधी उपलब्ध करण्यासाठी शाळांना प्रोत्साहित करणे आवश्यक असल्याने प्रचलित योजनेचे पुर्नमूल्यांकन करण्यात यावे. शासनाच्या वतीने आवश्यक असल्याने प्रचलित योजनेचे पुर्नमूल्यांकन करण्यात यावे. शासनाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय, आंतरशालेय सर्व खेळांमधील वैयक्तिक प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन करणाऱ्या सांघिक प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या शाळांचे गुणांकन करून १४,१७ व १९ वर्षाखालील मुले–मुली वयोगटातील सर्वोत्कृष्ट शाळांना प्रत्येक गटासाठी प्रथम क्रमांक रु. १,००,०००/– द्वितीय क्रमांक रु. ७५,०००/– व तृतीय क्रमांक रु. ५०,०००/– अनुदान देण्यात येईल.

संबंधित शाळांतील प्रथम तीन क्रमाकांपर्यंत आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदकविजेते खेळाडू तयार झाले तर ७.०० लाख रुपयांचे पारितोषिक शाळेत देण्यात यावे व चार ते दहा क्रमांकापर्यंत आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदकविजेते खेळाडू तयार झाले तर ३.०० लाख रुपयांचे पारितोषिक शाळेस देण्यात यावे. तसेच राष्ट्रीय स्पर्धेतील पदकविजेते खेळाडू तयार झाले तर २.०० लाख रुपयांचे पारितोषिक शाळेस देण्यात येतील

प्रोत्साहन अनुदान संस्थेने खेळाडूंचे प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, गणवेश, रोख पारितोषिक इ. बाबींवर खर्च करणे बंधनकारक राहील. अनुदानाचा विनियोग अहवाल १ वर्षात करणे आवश्यक आहे. तीन वर्षांनी याचे पुर्नमूल्यांकन करण्यात येईल.

**३.३) क्रीडा शिक्षकांना प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कार व उच्च पदावरील सेवेतील संधी :**

अ) शाळांमधील क्रीडा शिक्षक, क्रीडा व शारीरिक शिक्षण विकासाचे काम करीत आहेत त्यांना अधिक उत्साहाने काम करण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचे व योगदानाचे मूल्यमापन घेऊन त्यांचा गौरव होणे आवश्यक आहे. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शारीरिक शिक्षण शिक्षकास जिल्हा व राज्य स्तरावर प्रतिवर्षी उत्कृष्ट क्रीडा शिक्षक पुरस्कार देण्यात यावा. महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात यावेत. या पुरस्काराचे स्वरूप राज्य स्तरावर रु. ५०,०००/– रोख, गौरवपत्र व स्मृतिचिन्ह व जिल्हास्तरावर रु. १००००/– रोख, गौरवपत्र व स्मृतिचिन्ह असे असावे. तथा शिक्षण विभागाच्या आदर्श पुरस्कारासाठी राज्य व जिल्हा स्तरावर देण्यात येणाऱ्या पुरस्कार रकमा देण्यात येतील.

ब) महाराष्ट्र शासनाने एच.डी.एड्. 'बी. पी. एड.' बी एड (शारीरिक शिक्षण) अर्हता प्राप्त शिक्षकांना वेतन सेवाज्येष्ठता व सेवाशर्तीच्या इतर बाबींकरिता बी.एड. पात्रतेशी समकक्ष समजण्यात यावे असा निर्णय घेतलेला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे आयोजित गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी या पदांच्या परीक्षेस बसण्यास बी. पी. एड. अर्हता प्राप्त शिक्षकांनाही पात्र समजण्यात यावे. तसेच जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील असलेल्या माध्यमिक शाळांमध्ये बी. एड. अर्हता प्राप्त शिक्षकांप्रमाणेच बी. पी. एड. अर्हता प्राप्त शिक्षकांनाही सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीचा लाभ दिला जाईल.

**३.४) खेळाडूंना स्पर्धा, प्रशिक्षण शिबीरे तसेच सराव करतेवेळी अपघात/इजा झाल्यास वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहाय्य :**

खेळाडूंना त्यांच्याकडे असलेले कौशल्य, क्षमता यामध्ये वाढ करण्यासाठी सातत्याने स्पर्धा, प्रशिक्षण शिबीरे, सरावाच्या माध्यमातून दैनंदिन कृती कार्यक्रम आखून नियोजनबद्ध सराव करावा लागतो. या दरम्यान त्याला गंभीर इजा, दुखापत होऊन त्यांच्या भविष्याच्या जडणघडणीमध्ये परिणाम होतो. काही खेळाडूंची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची व सर्वसामान्य असते. यावेळी अचानक उद्भवलेल्या अपघातासाठी आर्थिक खर्च, तात्काळ इलाज अथवा उपचार न केल्यास त्याच्या भविष्यावर होणारा परिणाम इ. बाबी विचारात घेता अपघातग्रस्त खेळाडूंना आर्थिक साहाय्य देणे आवश्यक आहे.

शालेय क्रीडा स्पर्धा, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर सहभागी होणारे खेळाडू तसेच एकविध क्रीडा संघटनाद्वारे आयोजित होणाऱ्या राज्य व राष्ट्रीय स्तरावर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना याचा लाभ देण्यात यावा. तसेच वयोवृद्ध नामवंत खेळाडूंनासुद्धा वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक सहाय्य करण्यात येईल.

**अपघातग्रस्त खेळाडूंना आर्थिक सहाय्य देण्याची मर्यादा :**

अ) खेळातून गंभीर स्वरूपाची दुखापत/अपघात/इजा झाल्यास कमाल रु. ५.०० लाख किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या पन्नास टक्के.

ब) खेळाडूस किरकोळ स्वरूपाची दुखापत झाल्यास कमाल रु. २.०० लाख पर्यंत किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या पन्नास टक्के.

क) वयोवृद्ध नामवंत खेळाडूंना वैद्यकीय उपचारासाठी रु. ३.०० लाख किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या पन्नास टक्के.

**३.५) आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय स्तरावर शालेय, ग्रामीण (पायका) व महिला क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना शिष्यवृत्ती :**

भारतीय शालेय खेळ महासंघाद्वारे आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये पदक तालिकेत महाराष्ट्र राज्य गेली पाच वर्षे अव्वल स्थानावर आहे. खेळाडूने केलेल्या कामगिरीचा गौरव व प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या

वतीने खेळाडूंना शिष्यवृत्ती देण्यात येते. राष्ट्रीय स्पर्धेतील शालेय ग्रामीण, महिला क्रीडा स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करून राष्ट्रीय स्पर्धेतील कामगिरीसाठी प्रथम रु. ९,०००/- द्वितीय रु. ७,२००/- तृतीय रु. ५,४००/- व सहभाग रु. ३,०००/- तसेच आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतील प्रथम रु. २४,०००/- द्वितीय रु. १८,०००/- तृतीय रु. १२,०००/- व सहभाग रु. ९,०००/- इतकी वार्षिक शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतलेला आहे. खेळाडूने संपादन केलेल्या प्राविण्याबद्दल अनुज्ञेय असणारी शिष्यवृत्ती खेळाडूला तात्काळ उपलब्ध करून देणेत येईल. प्रचलित शिष्यवृत्तीमध्ये दर तीन वर्षांनी २५ टक्क्यांनी वाढ करण्यात येईल.

**३.६) वयोवृद्ध खेळाडू मानधनात वाढ :**

खेळाडूंनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आदर सर्वतोपरी करणे आवश्यक आहे. वयोवृद्ध खेळाडूंना मानाने जगता यावे यासाठी प्रचलित मानधनात वाढ करण्यात येईल.

| अ. क्र. | स्पर्धा स्तर | प्रचलित दर | नवीन दर |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रीय स्तर | रु. १५००/- | रु. ३०००/- |
| २. | आंतरराष्ट्रीय स्तर | रु. ३०००/- | रु. ६०००/- |
| ३. | हिंद केसरी, रुस्तमे-ए-हिंद, भारत केसरी, महान भारत किताब, महाराष्ट्र केसरी | रु. ४०००/- | रु. १०,०००/- |

**३.७) कुस्तीगीरांच्या मानधनात वाढ :**

कुस्तीगिरांच्या परंपरेचा ऐतिहासिक वारसा राज्याने जपण्यासाठी शासनाने कुस्तीसाठीच्या प्रोत्साहन योजना राबविलेल्या आहेत. कुस्तीगिरांचा विशेष आहार व प्रोत्साहन देण्यासाठी मानधनाच्या मर्यादा सुवर्ण-२०००, रौप्य रु. १५००/- व कास्य रु. १०००/- विविध गटातील प्रावीण्यधारक तसेच सहभागी खेळाडूंना रु. ५००/- मानधन प्रतिमहा करण्यात येत आहे.

**३.८) खेळाडूंसाठी गौरव व प्रोत्साहन व बक्षिसे :**

आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय क्रीडा कामगिरी करून राज्याचे नाव लौकिक करणाऱ्या खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक यांना गौरव प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन सन्मानित करणे आवश्यक आहे. अन्य राज्यात ऑलिम्पिक, आशियाई, राष्ट्रकुल तसेच नॅशनल गेम्स इ. स्पर्धांमधील पदक विजेत्या खेळाडूंना रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने अशा स्पर्धांमधील पदक विजेत्या खेळाडूंनाही नजीकच्या काळात रोख पारितोषिके देऊन गौरविले आहे. कायमस्वरूपी रोख पारितोषिकांची योजना खालीलप्रमाणे कार्यान्वित करण्यात येईल.

(रुपये लाखात)

| अ. क्र. | स्पर्धा | सुवर्ण | रौप्य | कास्य |
|---|---|---|---|---|
| १. | आलिंपिक स्पर्धा | १००.०० | ७५.०० | ५०.०० |
| २. | विश्व अजिंक्यपद स्पर्धा | ३०.०० | २०.०० | १०.०० |
| ३. | एशियन गेम्स | १०.०० | ७.५० | ५.०० |
| ४. | राष्ट्रकुल स्पर्धा | १०.०० | ७.५० | ५.०० |
| ५. | युवा राष्ट्रकुल स्पर्धा, एशियन चँपियनशीप | ७.०० | ५.०० | ३.०० |

| अ. क्र. | स्पर्धा | सुवर्ण | रौप्य | कास्य |
|---|---|---|---|---|
| ६. | नॅशनल गेम्स | ५.०० | ३.०० | २.०० |
| ७. | युथ ऑलिंपिक ज्यु. एशियन, ज्युनिअर विश्व अजिंक्यपद, शालेय आशियाई स्पर्धा | ३.०० | २.०० | १.०० |
| ८. | पॅराऑलिंपिक स्पर्धा | ३०.०० | २०.०० | १०.०० |
| ९. | पॅराएशियन स्पर्धा | ३.०० | २.०० | १.०० |

(क्रीडा मार्गदर्शक/प्रशिक्षक यांनाही रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येईल.)

**३.९) आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे :**

राज्यातील खेळाडू एकविध खेळ संघटनेच्या तसेच नामांकित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होतात. या खेळाडूंचा प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इ. खर्चाच्या ७५ टक्के किंवा रु. १,००,०००/- या मर्यादेत अर्थसहाय्य देण्यात येईल.

**३.१०) आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, मार्गदर्शकांचे शुल्क इ. करिता आर्थिक मदत करणे :**

खेळाडूला आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक कामगिरीसाठी सामोरे जाताना स्पर्धापूर्व प्रशिक्षण आधुनिक क्रीडा साहित्य, प्रशिक्षण उपकरणे, देश-विदेशामधील तज्ज्ञ क्रीडा प्रशिक्षकांचे मार्गदर्शन तसेच समतोल आहार इ. बाबींवर आर्थिक तरतुदी अभावी खेळाडूंची वैयक्तिक कामगिरी उंचावण्यावर परिणाम होऊ नये याकरिता सहाय्यक अनुदानाची योजना खालीलप्रमाणे सुधारित करण्यात आली आहे.

- क्रीडा साहित्य आयात करणे, गणवेश इ. बाबींसाठी रु. २.०० लाखापर्यंत अनुदान.
- देशविदेशातील प्रशिक्षण, निवास, भोजन, प्रवास, मार्गदर्शकांचे शुल्क यांना प्रतिवर्षी रु. ५.०० लाखपर्यंत देण्यात येईल.
- ऑलिंपिक, जागतिक अजिंक्यपद, एशियन गेम्स, तसेच एकविध खेळ संघटनेच्या आशियाई स्पर्धा, राष्ट्रकुल व युवा राष्ट्रकुल, युथ ऑलिंपिक ज्यु. एशियन, ज्युनिअर विश्व अजिंक्यपद, शालेय आशियाई/राष्ट्रीय स्पर्धा इ. मध्ये सहभाग घेतलेला असावा.
- देशी-विदेशी नामांकित प्रशिक्षकांना दोन-तीन वर्षासाठी आकर्षक मानधन देऊन करार करावा राज्यातील राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी प्रशिक्षणाच्या कृतिकार्यक्रमाद्वारे प्रथम टप्प्यात शूटिंग, ॲथलेटिक्स, कुस्ती, खेळांना प्राधान्य देण्यात येईल.
- युथ ऑलिंपिक ज्यु. एशियन, ज्युनिअर विश्व अजिंक्यपद, शालेय आशियाई/राष्ट्रीय स्पर्धा (१७ व १९ वयोगट) तसेच एकविध खेळ संघटनेच्या राष्ट्रीय स्तरावरील अजिंक्यपद स्पर्धेत गत तीन वर्षात किमान दोन सुवर्णपदक धारण करणाऱ्या खेळाडूस विदेशामध्ये प्रशिक्षण, मार्गदर्शकांचे शुल्क, निवास, भोजन, प्रवास इ.करिता रु. २.०० लाखापर्यंत अनुदान देण्यात येईल.

**३.११) क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू कुस्तीगीर यांना द्यावयाच्या सवलती, पुरस्कार नियमावलीत बदल :**

**अ)** खेळाडूंनी केलेल्या कामगिरीचा गौरव म्हणून केंद्र शासनाकडून दिले जाणारे अर्जुन, द्रोणाचार्य, राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, ध्यानचंद पुरस्कार तसेच राज्य शासनाच्या जीवन गौरव पुरस्कार, शिवछत्रपती पुरस्कार (खेळाडू, संघटक), उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता, विशेष, एकलव्य पुरस्कार तसेच हिंद केसरी, रुस्तमे-ए-हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी किताब प्राप्त खेळाडूंना पुरस्कार तसेच प्रवास सवलत देण्याची योजना शासनाद्वारे कार्यान्वित आहे अशा खेळाडूंना खालील सवलती दिल्या जातील.

- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, सिडको इ. शासकीय प्रकल्पात केंद्र व राज्य शासनाचे क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू तसेच हिंद केसरी, रुस्तमे–ए–हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी किताब प्राप्त खेळाडूंना सदनिकांसाठी आरक्षण ठेवण्यात येईल. क्रीडा संचालनालयाच्या शिफारशींसह शासनाच्या नगर विकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.
- केंद्र व राज्य शासनाचे क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू तसेच हिंद केसरी, रुस्तमे–ए–हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी किताब प्राप्त खेळाडूंना प्रवासात मोफत एस.टी. सवलत देण्यात येईल.
- शासकीय विश्रामगृहामध्ये वर्ग 'अ' दर्जाच्या अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या दराने आरक्षण दिले जाईल.
- शासकीय सेवेत कार्यरत असणाऱ्या खेळाडूस सदर पुरस्काराने सन्मानित केल्यास आगाऊ दोन वेतनवाढी देण्यात याव्यात. तसेच अशा खेळाडूंना दैनंदिन सराव, प्रशिक्षण, स्पर्धा इत्यादीकरिता कामकाजातून विशेष सवलत देण्यात येतील.
- केंद्र व राज्य शासनाचे क्रीडा पुरस्कार विजेते खेळाडू यांचा अनुभवाचा इतर खेळाडूंना लाभ मिळावा यादृष्टीने असे खेळाडू क्रीडा प्रशिक्षण देण्यास इच्छुक असल्यास त्यांना दैनंदिन कामकाजातून अर्धवेळ सवलत देण्यात येईल. संकुले, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रे ही ठिकाणे प्रशिक्षणासाठी प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात येतील.

**ब) पुरस्कार नियमावलीत बदल** :

- राज्याच्या क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, खेळाडू, संघटक यांचा यथोचित गौरव करण्यासाठी राज्य क्रीडा पुरस्कार देण्यात येतात. खेळाडू पुरस्कारासाठी गत पाच वर्षाच्या कामगिरीचा विचार करून सर्वोत्कृष्ट तीन वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाते. सांघिक क्रीडा प्रकारात ९० व वैयक्तिक क्रीडा प्रकारात १२५ गुण प्राप्त खेळाडूंना पात्र ठरविण्यात येते. सांघिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारात खेळले जाणाऱ्या खेळांचा समावेश (उदा. शूटींग) तसेच बुद्धिबळ या खेळामध्ये ग्रँड मास्टर किताब धारक खेळाडू पुरस्कारासाठी पात्र ठरत नाही. यासाठी पुरस्कार नियमावलीत बदल करण्यासाठी त्रिसदस्यीय समितीची स्थापना करण्यात येईल. ऑलिम्पिक व आशियाई स्पर्धेतील खेळांच्या पुरस्कार क्रीडा प्रकारात समावेश करण्यात येतील.
- **पुरस्कार रकमेत वाढ** :
  अ) जीवन गौरव पुरस्कार – रु. २.०० लक्ष
  ब) शिवछत्रपती पुरस्कार (खेळाडू, संघटक), उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक,
  जिजामाता, विशेष, एकलव्य पुरस्कार – रु. १.०० लक्ष
  क) जिल्हा क्रीडा पुरस्कार – गुणवंत खेळाडू,
  कार्यकर्ता, मार्गदर्शक रु. ०.१० लक्ष
- **सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार** : केंद्र शासनाकडून सर्वोत्कृष्ट खेळाडूचा सन्मान करण्यासाठी ''राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार'' देऊन प्रतिवर्षी गौरविण्यात येते. या धर्तीवर महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट खेळाडूला पुरस्कार म्हणून रु. १.५० लक्ष, सन्मान चिन्ह देण्यात येईल. खेळाडूंची कामगिरी आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचा व राज्याचा लौकिक वाढविणारी असणे आवश्यक आहे.

**३.१२) नागपूर येथील आमदार निवास कक्षाचे हिवाळी अधिवेशन वगळता खेळाडू निवासाकरिता वापर** :

नागपूर येथील आमदार निवासाचे कक्ष बंध हिवाळी अधिवेशन वगळता इतर कालावधीमध्ये क्रीडा विभागातर्फे मान्यता प्राप्त क्रीडा संघटना यांचे द्वारा आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय तसेच राज्यस्तरावर आयोजित क्रीडा स्पर्धा यासाठी रु. १५० प्रतीदिन प्रती कक्ष याप्रमाणे आरक्षित करून वापरण्यात येईल.

**३.१३) खेळाडूंना शासकीय निमशासकीय सेवेत आरक्षण व थेट नियुक्ती :**

खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रातील सेवेत ५ टक्के आरक्षण तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतलेला आहे. राज्य शासनाच्या अधिपत्याखालील विभागात खेळाडू या योजनेचा लाभ घेत आहेत. गट अ व गट ब च्या सेवेत थेट नियुक्ती देताना ऑलिम्पिक, एशियन गेम्स, विश्व अजिंक्यपद, राष्ट्रकुल स्पर्धा मधील प्रावीण्यधारक खेळाडू वर्ग अ साठी तसेच एशियन चॅम्पियनशीप, ज्यु. विश्व अजिंक्यपद, युवा राष्ट्रकुल इ. स्पर्धेतील प्रावीण्यधारक खेळाडू वर्गासाठी पात्र समजण्यात येईल.

पोलीस सेवा प्रवेश अधिनियमामध्येही खेळाडूंना पोलीस भरतीत विशेष आरक्षण ठेवलेले आहे. या नियमावलीत अखिल भारतीय विद्यापीठांचे स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केलेले खेळाडू पात्र ठरतात. यामध्ये पात्रता निकषातील स्पर्धेमध्ये विभागीय विद्यापीठ प्रतिनिधीत्व केलेले खेळाडू पोलीस भरतीसाठी पात्र समजण्यात यावेत. तसेच शासकीय सेवेतील वर्ग 'क' व 'ड' साठी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेतील प्रावीण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंना पात्र ठरविण्यात येईल.

**४) क्रीडा वातावरण निर्मिती :**

**४.१) स्पोर्ट्स नर्सरीची स्थापना :**

बालवयात मुलांना खेळाची आवड निर्माण करणे, मैदानाशी नाते जोडणे मनोरंजनातून खेळाची माहिती करून देणे यासाठी स्पोर्टस नर्सरीची स्थापना करणे आवश्यक आहे. शासनमान्य नोंदणीकृत खाजगी संस्थांना स्पोर्टस नर्सरी स्थापन करण्यासाठी आर्थिक मदत देऊन प्रोत्साहित करण्यात येतील.

स्पोर्टस् नर्सरीमध्ये ३ ते १२ वयोगटाच्या मुलांना प्रवेश देण्यात यावा. लहान मुलांचे ३ ते ७ व ८ ते १२ अशा दोन गटात विभागणी करून प्रशिक्षण दिल्यास ते अधिक उपयुक्त ठरेल. सायंकाळ सत्रात स्पोर्टस् नर्सरी कार्यान्वित कराव्यात. प्रशिक्षक मानधन, क्रीडा साहित्य, व्यवस्थापन, क्रीडांगण देखभाल यासाठी सहाय्यक अनुदान देण्यात येईल तसेच सदर स्पोर्टस् नर्सरीच्या अभ्यासक्रमामध्ये जनरल फिटनेस, मनोरंजनात्मक खेळ, जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स इ. खेळांचा समावेश असावा. तसेच प्रत्येक खेळाच्यासुद्धा स्वतंत्र स्पोर्टस् नर्सरी सुरू करण्यात याव्यात जेणेकरून लहान वयातच मुलांना खेळाची आवड निर्माण होईल व तंत्रशुद्ध प्रशिक्षणसुद्धा देता येईल. अंगणवाडीच्या धर्तीवर क्रीडा नर्सरी योजना चालू करण्यात येईल.

नगरपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका यांनी बाग, मनोरंजन केंद्र व खेळासाठी आरक्षित असलेल्या सार्वजनिक जागांमध्ये स्पोर्टस् नर्सरी विकसित करण्यात याव्यात. नगर विकास विभागाने यासंदर्भातील नियम निर्गमित करावेत. ग्रामीण भागासाठी जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायतीची मैदाने व पायका योजनेअंतर्गत विकसित केलेल्या मैदानांचा वापर केला जाईल.

**४.२) क्रीडा वाङ्मय निर्मिती, क्रीडा वस्तुसंग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना :**

**अ) क्रीडा वाङ्मय निर्मिती :** खेळाडूंना खेळाच्या नियमाबरोबरच मानसशास्त्र, आहारशास्त्र, वैद्यकशास्त्र, प्रेरणा देणारे वाङ्मय, दुखापतीवर इलाज, शारीरिक क्षमता विकसित करणाऱ्या शास्त्रोक्त पद्धती, व्यायामाचे महत्त्व, खेळाडूंच्या स्तरनिहाय कामगिरीचे उच्चांक व विकासाच्या नोंदी, खेळातील कौशल्याची शास्त्रोक्त माहिती, शरीररचना शास्त्र. इ. ची. माहिती क्रीडा वाङ्मयाच्या माध्यमातून खेळाडूंना देणे अत्यावश्यक आहे. क्रीडा वाङ्मयामध्ये पुस्तके, सी. डी. कॅसेट, फोटोग्राफी इ.च्या निर्मितीची नितांत गरज आहे.

क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ, प्रशिक्षक, साहित्यिक हे आपल्या अनुभवाच्या आधारावर तंत्रशुद्धपणे विविध क्रीडा प्रकार व साहसी खेळांची पुस्तके त्याचबरोबर सी. डी., कॅसेट, फोटोग्राफी इ. तयार करू इच्छितात अशा व्यक्ती/संस्थांना आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

या क्षेत्रातील कार्य करणाऱ्या खेळाडू प्रशिक्षक यांना संशोधनाची ओळख, अभ्यास, संदर्भ साहित्य वाचण्यासाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. जिल्हा व तालुका स्तरावर क्रीडा ग्रंथालयाची निर्मिती करण्यात यावी या ठिकाणी संगणक व इंटरनेटची सुविधा असावी.

त्यासाठी आवश्यक ती स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात यावी. प्रत्येक शाळेस रु. १०,०००/-चे अनुदान देण्यात येईल. तसेच राज्यशासनाची सुरुवातीची जी योजना आहे ती अद्ययावत करण्यात येईल. या योजनेअंतर्गत क्रीडा वाङ्मय, फिल्म अथवा आवश्यक बाबी खरेदी करण्यासाठी तज्ज्ञ समितीची नियुक्ती करण्यात यावी व तिच्या शिफारशीनंतरच शाळांनी ते खरेदी करावे.

ब) **क्रीडा वस्तुसंग्रहालय व क्रीडा ग्रंथालयाची स्थापना :** शिवछत्रपती क्रीडा नगरी, बालेवाडी येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संकुलामध्ये अद्ययावत क्रीडा ग्रंथालय व भव्य क्रीडा वस्तुसंग्रहालय उभारण्यात यावे. यासाठीची आर्थिक तरतूद करण्यात यावी. देशाच्या व राज्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी बहुमोलाचे योगदान असणाऱ्या खेळाडू मान्यवरांच्या आठवणी यामध्ये जपण्यात येतील. या वस्तुसंग्रहालयासाठी भेटवस्तू देण्याचे आवाहन केले जाईल.

**४.३) क्रीडा अभियान :**

क्रीडा हा शालेय शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे. शिक्षणाबरोबरच खेळाचे महत्त्व जपणे अत्यावश्यक आहे. शिक्षणाचे महत्त्व सामाजिक व आर्थिक विकासाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक असल्याने शासनाने सर्व शिक्षा अभियान शिक्षणाच्या प्रगतीसाठी हाती घेतलेले आहे. या अभियानाअंतर्गत मिळणाऱ्या निधीतून क्रीडा अभियानाची स्वतंत्रपणे योजना तयार करण्यात यावी. या योजनेमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा, क्रीडा साहित्य, प्रशिक्षण, क्रीडा महोत्सव, शिक्षकांचे क्रीडाविषयक चर्चासत्र, क्रीडा सुविधांचा विकास इ. बाबींचा विकास करण्यासाठी अनुदान देण्यात यावे. शाळांमधील जे विद्यार्थी क्रीडांगणावर खेळावयास येतात अशा विद्यार्थ्यांसाठी क्रीडा अभियान योजना राबविण्यात याव्यात. तसेच ज्याप्रमाणे सर्व शिक्षा अभियानाअंर्तगत विद्यार्थ्यांना आहार दिला जातो त्यातूनच खेळाडूंना पौष्टिक आहार देण्यात येईल. सर्व शिक्षा अभियान ही योजना केंद्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असल्याने केंद्र शासनाच्या मान्यतेने योग्य ते बदल करण्यात येतील.

**४.४) शालेय विद्यार्थ्यांमध्ये योगासनांचे महत्त्व जागविणे :**

शालेय विद्यार्थ्यांचा ताणतणाव कमी करणे, विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता लवचीकपणा तसेच निरोगी जीवनासाठी योगासनाच्या माध्यमातून सर्वांगीण व्यायाम देणे आवश्यक आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी मानधनावर योग शिक्षक नेमण्याचा निर्णय घेण्यात येईल.

**४.५) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिक्षण व क्रीडा समितीची स्थापना :**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत असणाऱ्या विविध समित्यांमध्ये शिक्षण समिती कार्यान्वित आहे. शारीरिक शिक्षण व क्रीडा हा शिक्षणाचा अविभाज्य घटक असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये या विषयाचे महत्त्व, अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, मूलभूत सोयी-सुविधा यांचा वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य, शारीरिक सुदृढता याबाबतची जाणीव प्रभावीपणे होण्यास सहाय्य होण्यासाठी नगरपालिका, महानगरपालिका, पंचायत समिती व जिल्हा परिषदा यांचे स्तरावर शिक्षण व क्रीडा समितीची स्थापना करण्यात येईल.

**४.६) खेळाद्वारे सर्वांसाठी सुदृढता :**

**अ) शासकीय-निमशासकीय, सहकारी संस्था, औद्योगिक प्रतिष्ठानांमधील कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन** : देशाच्या व राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये आरोग्य संपन्न मनुष्यबळ प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या परिणाम करत आहे. राज्यातील प्रत्येक नागरिक सुदृढ होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. वृद्ध नागरिकांमध्ये आरोग्य संपन्न जीवनाचे महत्त्व बिंबवण्यासाठी सर्वांगीण विकास साधण्याकरिता क्रीडा स्पर्धा व खेळ यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शासकीय, निमशासकीय विभाग, साखर कारखाने, सहकारी संस्था, सूत गिरण्या, महामंडळे, औद्योगिक प्रतिष्ठाने या ठिकाणी कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन संबंधित विभागामार्फत करण्यात यावे. कर्मचाऱ्यांची शारीरिक तंदुरुस्ती व कार्यक्षमता वाढीस लागून उत्पादकता वाढीस लागेल.

**ब) नागरिकांमध्ये खेळांची व व्यायामाची आवड निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविणे** : जागतिकीकरणाच्या स्पर्धेत नागरिकांच्या जीवन शैलीवर परिणाम होऊन ताणतणाव वाढत आहे. व्यायाम व शारीरिक हालचालींच्या अभावी नागरिकांना दुर्धर आजारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे. नागरिकांमधील मानसिक तणाव कमी होऊन शारीरिक तंदुरुस्ती विकसित करण्यासाठी खाली उपक्रमाचे आयोजन करण्यात येईल.

१) नागरी विकास आराखड्यातील राखीव भूखंडावर क्रीडांगण/खेळाच्या सुविधा विकसित करण्यासाठी संबंधित प्राधिकरण नियोजनात्मक विकासाचा आराखडा तयार करून सुविधा विकसित करून नागरिकांना उपलब्ध करून देता येईल.

२) नोंदणीकृत गृह निर्माण संस्था, वसाहतीमधील खुल्या जागेवर व्यायाम व मनोरंजनात्मक खेळांच्या सुविधा विकसित करण्यात येतील.

३) उद्यानांच्या ठिकाणी जॉगर्स पार्क, योगकेंद्र तसेच खुले व्यायाम साहित्य बसविण्यात येतील.

४) नागरिकांना सायकलिंग, सामूहिक कवायती, गीरीभ्रमण, शारीरिक तंदुरुस्तीच्या चाचण्याठचे आयोजन, पारंपरिक खेळांचे आयोजन करून प्रोत्साहित करण्यात येईल. सदर उपक्रमाचे आयोजन राष्ट्रीय, राज्य सण, उत्सव व क्रीडा सप्ताहा या निमित्ताने करण्यात येईल.

**४.७) क्रीडा विषयक योजनांमध्ये सुधारणा :**

**अ) जलतरण तलाव** : जलतरण हा सर्वांग सुंदर व्यायाम असल्याने नागरिकांसाठी पोहण्याच्या सुविधा निर्माण व्हाव्यात, जलतरण पटूंना सराव, स्पर्धा इ. करिता जलतरण तलाव निर्मिती केली जाते. बांधकाम, पाणीशुद्धीकरण यंत्रणा इ. बाबींचा खर्च विचार करता येणारा सहाय्यक अनुदानासाठी राज्य शासन व नोंदणीकृत संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था यांचा वाटा ८० : २० या प्रमाणात राहील. ५० मी × २१ मी साठी कमाल रु. १.२० कोटी, २५ मी × २१ मी साठी कमाल रु. ६०.०० लाख, २५ मी × १३ मी साठी कमाल रु. ५०.०० लाख अनुदान देण्यात येईल.

**ब) व्यायामशाळा विकास अनुदान** : व्यायामाची आवड जतन करण्यासाठी ग्रामीण व नागरी भागात व्यायामशाळा साहित्यासाठी रु. २.०० लाखाच्या मर्यादेत सहाय्यक अनुदान देण्यात येत आहे. बांधकाम व व्यायाम साहित्याचे दरात वाढ झाली असल्याने ही मर्यादा रु. ७.०० लाख करण्यात येईल.

**क) क्रीडांगण विकास योजना** : राज्यात विविध खेळांची सुयोग्य क्रीडांगणे तयार व्हावीत यासाठी २०० मी/४०० मी. धावनमार्ग, विविध खेळांची क्रीडांगणे समपातळीत करणे, क्रीडांगणास कुंपण, प्रसाधनगृह, भांडारगृह, पाणी पुरवठा व्यवस्था इ. करिता नोंदणीकृत शैक्षणिक व क्रीडा संस्थांना दर्जेदार सुविधा निर्मितीसाठी होणारा खर्च विचारात घेता

या योजनेची मर्यादा रु. ७.०० लक्ष पर्यंत वाढविण्यात येईल. या योजनेतून शैक्षणिक संस्थांना विविध खेळांचे क्रीडा साहित्य, तायक्वांदो, ज्युदो, कराटे, जिम्नॅस्टिक्स, कुस्ती कबड्डी तसेच उंच उडी मॅट घेण्याचा अंतर्भाव करण्यात येईल. यासाठी मर्यादा रु. ३.०० लाख राहील. एकच संस्था वारंवार अनुदान घेणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

ड) **गाव तेथे क्रीडांगण व व्यायामशाळा** : गाव तेथे क्रीडांगण व व्यायामशाळा या योजनेमधून बांधकाम, क्रीडांगण समपातळीत करणे व त्याभोवती कुंपण यासाठी या योजनेतून सहाय्य केले जाते. या योजनेचे उद्दिष्ट क्रीडांगण विकास व व्यायामशाळा विकास या योजनेतून पूर्ण करता येते. केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पंचायत युवा खेळ व क्रीडा अभियान या योजनेतून ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर क्रीडा विषयक किमान पायाभूत सुविधा निर्माण करण्याची योजना कार्यरत आहे. त्यामुळे गाव तेथे क्रीडांगण व व्यायामशाळा विकास ही योजना बंद करण्यात येईल.

**४.८) महानगरपालिका, नगरपालिका खेळ व संघ दत्तक घेणे, क्रीडा विषयक बाबीवर ५ टक्के खर्च करणे** :

महानगरपालिका, नगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात क्रीडा विकासाच्या उद्दिष्टांसाठी राज्याच्या पहिल्या धोरणात सुचविलेल्या शिफारशी नगरविकास विभागाने दि. ९ मार्च १९९८ च्या शासन निर्णयान्वये लागू केल्या आहेत. यामध्ये विकास आराखड्यातील क्रीडांगणासाठी आरक्षित असलेल्या जमिनीचा विकास, क्रीडांगणावरील अतिक्रमणे काढणे, क्रीडांगण विकसित करणे, विविध खेळांच्या खेळाडूंना बक्षिसे, खेळ किंवा संघ दत्तक घेणे इ. बाबींवर खर्च करण्यास मंजुरी दिली आहे.

बहुतांशी नगरपरिषदेमध्ये खेळ अथवा संघ दत्तक घेण्याच्या बाबींवर कार्यवाही झाली नसल्याने, या धोरणात खेळाडूंचा दर्जा सुधारण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे उद्दिष्ट असून खेळाडूंना तंत्रशुद्ध प्रशिक्षण, आवश्यक साहित्य, दर्जेदार सुविधा, प्रोत्साहनात्मक मानधन देण्याबाबत महानगरपालिका व नगरपालिका यांनी पुढाकार घ्यावा. नगरविकास आराखड्यातील क्रीडांगणासाठी राखीव क्षेत्रे मर्यादित कालावधी निश्चित करून विकसित करावीत. महापौर, नगराध्यक्ष यांनी विशेष लक्ष देऊन नगरपालिका क्षेत्रातील क्रीडा कृती कार्यक्रम निश्चित करावा प्रतिवर्षी एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के क्रीडाबाबींवर खर्च करण्यासाठी बंधन करण्यात येईल. नगरपालिका व महानगरपालिका यांनी क्रीडांगण विकसित करण्यासाठी राखून ठेवलेल्या भूखंडावर क्रीडाविषयक सुविधा प्राधान्याने विकसित कराव्यात हे भूखंड अन्य प्रयोजनासाठी वापरण्यात येऊ नये.

बृहन्मुंबई विशेष कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत क्रीडा संकुल उभारण्याचा विशेष कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. मुंबई हे राजधानीचे व मोठी नागरीवस्ती असणारे शहर असून नामांकित खेळाडूंचे निवास या परिक्षेत्रात येतात. या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय दर्जाची सुविधा सराव व प्रशिक्षणासाठी उपलब्ध होतील. उद्योन्मुख खेळाडूंना खेळाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका व प्रशासनाने निश्चित कालावधीत (दोन वर्षात) संकुल उभारावीत. अन्यथा राज्य शासनाने विशेष अधिकाराचा वापर करून क्रीडांगणासाठी राखीव ठेवलेल्या जागा संकुल उभारण्यासाठी ताब्यात घेण्यात येतील.

## ५) क्रीडा महोत्सवांचे आयोजन :

### ५.१) शाळांचा क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग :

शाळांनी विद्यार्थ्यांना आंतरशालेय स्पर्धेमध्ये खेळण्याची संधी उपलब्ध करून देणे. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीसाठी अनिवार्य आहे. प्रत्येक शाळांनी क्रीडा विभागामार्फत राज्यात आयोजित करण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घ्यावा, तसेच त्यासाठी शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यास प्रवृत्त करावे, जेणे करून शाळेची गुणवत्ता वाढून विद्यार्थ्यांच्या अंगातील क्रीडा गुणांना वाव मिळेल. प्राथमिक शाळांना स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी सद्यस्थितीत

शासन अनुदान दिले जात नाही. यामुळे राज्यातील प्राथमिक शाळा क्रीडा स्पर्धेपासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून क्रीडाविषयक विकासाच्या सुविधा तसेच स्पर्धांसाठी प्रवास खर्च, क्रीडा गणवेश, स्पर्धेदरम्यान अल्पोपहार व भोजन इ. बाबींवरील खर्च ग्राह्य धरण्यात यावा व यासाठी तरतूद करण्यात येईल.

क्रीडा संचालनालयामार्फत विविध क्रीडा स्पर्धा तालुका, जिल्हा विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावर आयोजित केल्या जातात. माध्यमिक शाळांना व शैक्षणिक संस्थांना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याकरिता विशेष क्रीडा अनुदानाची तरतूद करण्यात येत आहे. यात क्रीडा साहित्य, स्पर्धासाठी प्रवास खर्च, खेळाडूंच्या आहारासाठी दैनिक भत्ता इ. बाबी ग्राह्य धरण्यात येईल. राष्ट्रीय स्तर ते तालुका हा स्पर्धा आयोजनाचा घटक असून या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी झालेला खर्च शासन मान्य समजण्यात येईल.

**५.२) शालेय क्रीडा स्पर्धा** :

अ) महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागातर्फे तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, विभागस्तरीय व राज्यस्तरीय अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. क्रीडा खात्यातील मनुष्यबळ, खेळांची संख्या व आर्थिक तरतूद पाहता स्पर्धांचे आयोजन योग्य प्रकारे करण्यास अनेक अडचणी येत आहेत. यासाठी खेळांची संख्या मर्यादित करणेत येत आहे.

- क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारे प्रतिवर्षी आयोजित होणाऱ्या शालेय महिला, ग्रामीण (पायका), साई इत्यादी क्रीडा स्पर्धांचे वेळापत्रक प्रत्येक वर्षी दिनांक २० जून पर्यंत प्रसिद्ध करण्यात यावे. तसेच या स्पर्धेतील राज्य व राष्ट्रीय प्रावीण्य प्राप्त खेळाडू व शाळांची नावे कीडा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.
- ऑलिम्पिक स्पर्धेत अंतर्भूत असणारे महत्त्वाचे खेळ तसेच राज्यातील महत्त्वाचे पारंपरिक खेळ (ब–गट) यामध्ये (कबड्डी, खो–खो, कुस्ती व मल्लखांब) अशी वर्गवारी करण्यात यावी आणि ऑलिंपिकेतर मान्यता प्राप्त खेळ हे तिसऱ्या गटात (क–गट) असावेत.
- महाराष्ट्र राज्याला पुढील पाच वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करता येईल असे 'ब' गटातील खेळ निवडून त्यांचा 'अ' गटात समावेश करावा. 'अ' गटातील खेळांवर विशेष लक्ष देऊन सर्व आवश्यक बाबींना प्राधान्य देण्यात येईल.
- आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात येईल.
- साहसी खेळांना जगभरात महत्त्व प्राप्त झाले असून याद्वारे मुलांमध्ये साहसी वृत्तीची वाढ होणे. नेतृत्व गुणांचा विकास, व्यक्तिमत्त्व विकास इ. फायदे होतात. साहसी खेळांमध्ये स्पर्धात्मक पातळीवर अतिशय कमी खेळ खेळले जात असून स्पोर्ट क्लाईबिंग हा खेळ जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात स्पर्धात्मकदृष्ट्या खेळला जातो. शालेय विद्यार्थ्यांसाठी स्पोर्ट्स क्लाईबिंगच्या सुविधा विकसित करून स्पर्धा आयोजित करण्यात येतील.
- भारतीय शालेय खेळ महासंघाच्या आयोजित राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा तसेच इतर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये राज्याचा संघ सहभागी होण्यासाठी विविध स्तरावरील अनुदानाचे दर मर्यादेत वाढ करण्यात येत आहे. तसेच प्रत्येक पाच वर्षांनी यामध्ये कालानुरूप सुधारणा करण्यात येतील.
- भारतीय शालेय खेळ महासंघाच्या विद्यमाने आयोजित राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा तसेच इतर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये राज्याचा संघ सहभागी होण्यासंबंधी विविध स्तरावरील अनुदानाचे दर सांघिक खेळासाठी रु. ५०/– प्रति संघ व वैयक्तिक क्रीडा प्रकारातील प्रत्येक बाबी साठी रु. २५/– प्रति खेळाडू अशी फी आकारण्यात येईल. महानगर,

नगरपालिका परिक्षेत्रातील शैक्षणिक संस्था व इंग्रजी माध्यमांच्या शाळांना सुधारित फी दर लागू करण्यात येतील. तसेच जिल्हा क्रीडा परिषद संलग्न शुल्क प्रति वर्षी ठरविण्याचा अधिकार जिल्हा क्रीडा परिषदेला राहील. जमा निधी जिल्हा क्रीडा परिषदेने जिल्ह्यातील क्रीडा स्पर्धा आयोजन व क्रीडा विकासासाठी वापरावा.

सद्यस्थितीत राज्यस्तरीय क्रीडास्पर्धा व राष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरासाठी भोजन व निवासासाठी रु. १५०/– तरतूद आहे. स्पर्धा या चांगल्या वातावरणात आयोजित करणे आवश्यक असल्याने स्पर्धेच्या खर्चाच्या मर्यादेत खालीलप्रमाणे वाढ करण्यात येईल.

| **स्पर्धा** | **स्तर** | **प्रचलित दर प्रतिखेळ** | **समितीने शिफारस केलेले दर प्रतिखेळ** |
|---|---|---|---|
| शालेय क्रीडा स्पर्धा | तालुका | ५००/– | १०,०००/– |
| | जिल्हा | २५००/– | १५,०००/– |
| | विभागीय | २५००/– | १५,०००/– |
| | राज्य | विशिष्ट नियमानुसार | विशिष्ट नियमानुसार |
| | राष्ट्रीय | – | रु. १०.०० लक्ष |

(टीप : विशिष्ट नियमानुसार म्हणजेच स्पर्धामधील खेळाडू सहभागी संख्या यांचा भोजन व निवास खर्च प्रतिदिन रु. १५०/– राज्यस्पर्धा संयोजनासाठी रु. १.०० लक्ष) व राष्ट्रीय स्पर्धा आयोजनासाठी रु. १०.०० लक्ष)

महिला व साई स्पर्धा जिल्हा व राज्यस्तर घेण्यात येतात. राज्यात जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर अनुक्रमे स्पर्धा घेतल्या जातात. तसेच पायका क्रीडा स्पर्धा जिल्हा राज्य स्तरावर घेतल्या जातात यावेळी भारतीय क्रीडा प्राधिकरण, केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेले अनुदान अपुरे असल्याने वरील नमूद केल्याप्रमाणे विभाग व राज्य स्तरावरील स्पर्धासाठी अनुदान देण्यात येईल.

काही खेळांना अल्प प्रतिसाद असतो अशा खेळांना अनुदान देताना प्रत्यक्ष खर्चाचा विचार करण्यात येईल. जिल्ह्यात प्रचलित असणाऱ्या खेळांना भरघोस प्रतिसाद असतो यावेळी स्पर्धांवर होणारा खर्च अनुदान मर्यादेपेक्षा अधिक असतो, अशा वेळी जिल्ह्यासाठी अनुदान मंजूर करताना विचार करण्यात येईल. उदा. क्रिकेट, फूटबॉल, ॲथलेटिक्स, हॉकी, जलतरण, बॅडमिंटन आदी खेळांना किमान जिल्हा स्तरावर रु. ३०,०००/– इतके अनुदान करण्यात यावे. महानगरपालिका परिक्षेत्रामधील शाळांना क्रीडा स्पर्धेसाठी स्वतंत्र जिल्हास्तर दर्जा देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. राज्यातील काही महानगरपालिका अशा स्पर्धा आयोजनावरील खर्च करीत नाहीत, याची अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी नगर विकास विभागामार्फत स्वतंत्र आदेश महानगरपालिकांना निर्गमित करण्यात येतील. महानगरपालिकांना शासनाच्या आंतरशालेय क्रीडा स्पर्धा आयोजन करणे बंधनकारक करण्यात येईल.

**ब) शासकीय/निमशासकीय सेवेतील खेळाडूंना सवलती** : शासकीय/निमशासकीय सेवेतील खेळाडूंना स्पर्धा, प्रशिक्षण शिबीर इ.मध्ये सहभागी होता यावे यासाठी रजा/अग्रीम वेतनवाढी याबाबतचे प्रचलित शासन निर्णयात कालसुसंगत बदल करण्यात येतील.

**क) खेळाडूंच्या पालकांना रजा सवलती** : अधिकृत राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये सहभाग घेणाऱ्या अल्पवयीन, किशोरवयीन व महिला खेळाडूचे सोबत त्यांचे पालक देखील उपस्थित राहतात. शासकीय, निमशासकीय सेवेतील पालकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा कालावधीत सर्व प्राथम्याने विशेष रजा देऊन तो

सेवाकालावधी समजण्यात यावा. तर राज्यस्तर सहभागासाठी देय रजा सर्व देण्यात याव्यात. खाजगी व्यवस्थापनात काम करणाऱ्या खेळाडूंच्या पालकांना त्यांचे आस्थापनांनी विशेष रजा मंजूर करावी.

**५.३) क्रीडा महोत्सव, क्रीडा दिन – क्रीडा सप्ताह साजरा करणे** :

**अ) क्रीडा महोत्सव** : खेळाच्या माध्यमातून आनंददायी वातावरण निर्माण होऊन खेळामुळे ताण–तणाव कमी करणे शक्य आहे. तसेच क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून मुलांमध्ये खेळाची आवड निर्माण करणे, सामाजिक एकोपा, मनोरंजन यासाठी खेळ आवश्यक आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून खेळाच्या विकासाला चालना देता येणे शक्य आहे. विविध स्पर्धांचे आयोजन केल्याने क्रीडा संस्कृतीच्या वाढीस पूरक वातावरण तयार होईल. शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थी किमान एका सांघिक क्रीडा प्रकारामध्ये व तीन वैयक्तिक क्रीडा प्रकारामध्ये सहभागी झाला पाहिजे. प्रतिवर्षी शाळांमध्ये क्रीडा महोत्सव आयोजित करणे आवश्यक आहे. या महोत्सवामध्ये आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून स्पर्धेतील प्रावीण्य प्राप्त खेळाडूंचा गौरव करण्यात यावा.

**ब) क्रीडा दिन–क्रीडा सप्ताह साजरा करणे** : मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिवस २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येतो. तसेच दि. १२ ते १८ डिसेंबर हा कालावधी क्रीडा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. क्रीडा दिन व क्रीडा सप्ताह खेळाडूंना अधिक प्रेरणादायी ठरावा यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा सन्मान, अनुभवी खेळाडूंच्या कडून नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासाठी चर्चासत्र, परिसंवाद, प्रदर्शनीय सामने, खेळांची तंत्रशुद्ध माहिती, प्रशिक्षकांचे अनुभव, क्रीडा विषयक संशोधन साहित्याची ओळख, नागरिकांमध्ये व्यायामाचे महत्त्व जागविण्यासाठी विविध उपक्रम, सायकल रॅली यांचे आयोजन करण्यात यावे.

क्रीडा सप्ताह दरम्यान ३ ते ५ कि.मी.ची. दौड आयोजित करावी. यामध्ये समाजातील प्रतिष्ठित नागरिक, लोकप्रतिनिधी, खेळाडू, विद्यार्थी, क्रीडाप्रेमी, क्रीडा संघटक, क्रीडा मंडळे इ. चा समावेश असावा. प्रत्येक तालुक्यासाठी क्रीडा दिन रु. १०,०००/– व क्रीडा सप्ताहासाठी रु. २५,०००/– अनुदान देण्यात येईल.

शाळेच्या माध्यमातून जास्तीत जास्त खेळाडूंचा सहभाग क्रीडा स्पर्धांमध्ये असणे आवश्यक आहे. खेळाडूंना जिल्हा क्रीडा संकुलामधील सुविधा सरावासाठी सवलतीच्या दरात सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

**५.४) छत्रपती शिवाजी चषक कबड्डी स्पर्धा, खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा, कै. भाई नेरुरकर चषक खो–खो व व्हॉलीबॉल चषक स्पर्धा सहाय्यक अनुदानात वाढ करणे मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन** :

राज्यातील खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंच्या समवेत खेळण्याची संधी मिळावी, त्याचा दर्जा पहाता यावा. राज्यात क्रीडा वातावरण चांगले राहण्यासाठी छत्रपती शिवाजी चषक स्पर्धा व खाशाबा जाधव कुस्ती स्पर्धा या राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. ग्रामीण व शहरी भागात खो–खो व व्हॉलीबॉल हे खेळ मोठ्या प्रमाणात खेळले जातात. राज्यात या खेळांचा प्रचार व प्रसार व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी कै. भाई नेरुरकर चषक खो–खो व व्हॉलीबॉल चषक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

खेळाडूंना सकस आहार, निवास व्यवस्था, प्रेक्षक गॅलरी, प्रवास खर्च, पारितोषिके, आयोजनावरील खर्च पाहता वरील प्रत्येक स्पर्धेसाठी रु. ५०.०० लक्ष अनुदान देण्यात येईल. हॉकी या खेळाच्या स्पर्धा घेण्यात याव्यात. तसेच व्यायामाची नागरिकांमध्ये आवड निर्माण करून त्यांना तंदुरुस्ती अजमावता यावी. खेळातील सहभाग वाढावा यासाठी मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन व्यापक स्वरूपात करण्यात यावे. खेळातील सहभाग वाढावा यासाठी मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन व्याक स्वरूपात करण्यात यावे. राज्यस्तरावर रु. ५०.०० लक्ष अनुदान देण्यात येईल. तालुका व जिल्हास्तरावर असे उपक्रम भव्य प्रमाणात खाजगी संस्था व शासन यांच्या सहभागातून घेण्यात येतील.

### ६) तांत्रिक मनुष्यबळाचा विकास :

#### ६.१) खेळांसाठी जादा तासिका उपलब्ध करून देणे तसेच क्रीडा व विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करणे :

अ) **वेळापत्रकात क्रीडा विषयांच्या किमान तासिका** : इयत्ता १ली ते १०वी तील विद्यार्थ्यांसाठी वेळापत्रकात क्रीडा या विषयासाठी आठवड्याला किमान ५ तासिका अशी यशपाल कमिटीची शिफारस आहे. खेळाच्या तासिका क्रीडा या विषयासाठीच उपयोगात आणाव्यात. अनेक शाळांमध्ये असे दिसून आले आहे की शिक्षण विभागाकडे मंजुरीसाठी देण्यात आलेल्या वेळापत्रकात जरी आठवड्याला पाच तासिका क्रीडा विषयासाठी राखून ठेवलेल्या असल्या तरी प्रत्यक्षात या तासिकांच्या वेळेमध्ये इतर विषयांच्या तासिका घेण्यात येतात. शिक्षण विभागाने या वेळापत्रकांची प्रभावी अंमलबजावणी करून आठवड्याला किमान पाच तासिका क्रीडा विषयासाठीच उपयोगात आणाव्यात तसेच खेळासाठी पोषक शरीर रचनेची गरज पाहता वेळापत्रकांना मंजुरी देताना सकाळच्या सत्रातील शाळांना पहिल्या तासिका आणि दुपारच्या सत्रातील शाळांना शेवटच्या तासिका क्रीडा विषयासाठी राखीव ठेवाव्यात. अशाप्रकारे दररोज किमान एक तासिका खेळासाठी अनिवार्य करण्यात येतील.

ब) **शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचे पुनर्मूल्यांकन** : प्राथमिक व माध्यमिक शिक्षणामध्ये शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचा अंतर्भाव आहे. अभ्यासक्रमातून खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने विविध खेळांचे नियम, पूरक व्यायाम, खेळाडूंचा आहार, क्रीडा मानसशास्त्र, शरीरशास्त्र, दुखापती यांची माहिती देण्यात यावी तसेच प्रात्यक्षिक स्वरूपात मैदानी खेळ, जलतरण, जिम्नॅस्टिक व योगा अशा मूलभूत खेळांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमाचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात येईल. या समितीमध्ये क्रीडा मानसशास्त्रज्ञ, आहारतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, खेळाची विशेष माहिती असणाऱ्या सदस्यांचा समावेश करण्यात येईल.

#### ६.२) क्रीडा संहिता तयार करणे :

राज्य शासनाच्या क्रीडा संचालनालयामार्फत प्रतिवर्षी शालेय, ग्रामीण (पायका), महिला क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येतात. या स्पर्धांसाठी शासनमान्य संहिता सद्यस्थितीत नाही. यामुळे तांत्रिक अडचणी, दंडात्मक कार्यवाही, तक्रार निवारण, खेळाडूंचे हक्क इ.साठी संहिता असणे आवश्यक आहे.

खेळाडूंकडे असणाऱ्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी ते विकसित करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. यामध्ये सराव, प्रशिक्षण, विविध स्पर्धांमध्ये सहभाग घ्यावा लागतो, अशा वेळी शैक्षणिक अभ्याक्रमाकडे दुर्लक्ष होते. स्पर्धा, शिबीरे, प्रशिक्षण दरम्यान घटक चाचण्या आयोजित होत असतात. या कार्यकालातील शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी खेळाडूंना विशेष सवलत देणे अत्यावश्यक आहे. मुख्याध्यापकांचे अधिकार, शारीरिक शिक्षकांची कर्तव्ये व त्यांच्या कामाचे मूल्यमापन व खेळाडू विद्यार्थ्यांचे हक्क यांची माहिती होण्यासाठी शिक्षण संहितेच्या धर्तीवर क्रीडा संहिता तयार करण्यात येईल.

शारीरिक शिक्षण व खेळ या विषयांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. (उदा. शारीरिक शिक्षण तासिका इतर विषयांसाठी देणे, शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम अर्हताधारक शिक्षकांकडून शिकवला न जाणे, शाळांचा स्पर्धा सहभाग, शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम अंमलबजावणी, क्रीडा साहित्य व मैदान उपलब्धता, स्पर्धेसाठी वयाचे दाखले, खेळाडूना मिळणाऱ्या मूलभूत सोई सुविधा इ.) यासाठी शिक्षण संचालनालयाप्रमाणे क्रीडा संचालनालयाच्या अधीनस्त कार्यालयांना वरील बाबी तपासणीचे अधिकार देण्यासंदर्भात क्रीडा संहितेत अंतर्भाव करण्यात येईल. क्रीडा संहिता तयार करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नियुक्त करण्यात येईल. समितीचे क्रीडा संचालक, शिक्षण संचालक व क्रीडा संघटना व क्रीडा शिक्षक संघटना यांचे प्रत्येकी २ प्रतिनिधी असतील. नवीन क्रीडा धोरण समितीने अहवाल सादर केल्यानंतर पुढील सहा महिन्यात तज्ज्ञ समितीद्वारे तयार होणारी क्रीडा संहिता तात्काळ

लागू करून त्यास वैधानिक दर्जाही देण्यात येईल व शाळा तपासणीचे अधिकार जिल्हा क्रीडा अधिकारी/तालुका क्रीडा अधिकारी यांना देण्यात येतील.

**६.३) शारीरिक शिक्षण सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती** :

**अ)** केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम (Right of Children for free and compulsory education Act 2009 (No. 35. 2009) केंद्र शासनाने पारित केला आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्यासाठी, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे.

इयत्ता १ ली ते ८ वीसाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्यात आली आहे. त्यानुसार व्यापक अध्ययन प्रक्रियेचे सातत्यपूर्ण मूल्यमापन आणि वर्तनातील दृश्यरूप किंवा वर्तन निष्पत्ती या दोन उद्दिष्टांवर भर देणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. सर्वंकष मूल्यमापनामध्ये आकारिक मूल्यमापन आणि संकलित मूल्यमापन पद्धतीचा समावेश केला आहे.

व्यापक अध्ययन प्रक्रियेत अभ्यासक्रमातून खेळाडू घडविण्याच्या दृष्टीने विविध खेळांचे नियम, पूरक व्यायाम, खेळाडूंचा आहार, क्रीडा मानसशास्त्र, शरीरशास्त्र, दुखापती याची माहिती देण्यात यावी. वर्तनातील दृश्यरूप किंवा वर्तन निष्पत्ती यामध्ये प्रात्यक्षिक स्वरूपात मैदानी खेळ, जलतरण, जिम्नॅस्टिक व योगा अशा मूलभूत खेळांना प्राधान्य देऊन त्यांचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात येईल.

१० वी व १२ वी च्या परीक्षांमध्ये शारीरिक शिक्षणाचे महत्त्व जागवण्यासाठी परीक्षा मंडळाद्वारा घेतल्या जाणाऱ्या (उदा. विज्ञान) लेखी व प्रात्यक्षिक स्वरूपाच्या परीक्षा प्रतिवर्षी आयोजित करण्यात येतात याच धर्तीवर, शारीरिक शिक्षण या विषयाच्या परीक्षा घेण्यात येतील.

**६.४) शैक्षणिक संस्थांना मानधनावर क्रीडा मार्गदर्शक नियुक्तीस मान्यता** :

खेळांचे प्रशिक्षण तज्ज्ञांमार्फत दिल्यास खेळाडूंना मूलभूत प्रशिक्षण मिळून त्यांच्यामधील सुप्त गुणांना चालना मिळेल. शाळांमध्ये क्रीडाविषयक अनुकूल वातावरण निर्माण करण्याबरोबरच शैक्षणिक संस्थांमध्ये असलेल्या सुविधा खेळाडूंना प्रशिक्षणासाठी वापरणे आवश्यक आहे. शाळेमध्ये वेळापत्रकाव्यतिरिक्त शाळा सुरू होण्यापूर्वी व शाळा सुटल्यानंतर सकाळी व संध्याकाळी शाळेमध्ये क्रीडा संस्कृती रुजविण्यासाठी क्रीडा प्रशिक्षण देण्यासाठी क्रीडा मार्गदर्शकाची नेमणूक करावी अथवा जे क्रीडा शिक्षक शाळेच्या वेळेव्यतिरिक्त शाळेमध्ये क्रीडा प्रशिक्षण देऊ शकतील अशा क्रीडा मार्गदर्शकांना किमान रु. ५०००/– दरमहा मानधन देण्यात येईल व अशा शाळांमध्ये वेगवेगळ्या खेळाच्या ॲकेडमीज सुरू करण्यात याव्यात. त्यास शिक्षण व क्रीडा विभागाकडून मान्यता देण्यात येईल.

शाळांमध्ये जे चार खेळ शिकविले जातात व ज्या शाळा सलग ४ ते ५ वर्षे राज्यस्तर स्पर्धेत सहभागी होत आहेत. अशा शाळातील मानधनावरील नियुक्त केलेल्या क्रीडा मार्गदर्शकाचे मानधन देण्यात येईल.

**६.५) क्रीडा शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीर** :

खेळामधील बदललेले आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षणाच्या पद्धती, खेळामधील कौशल्याची ओळख, नवीन खेळांची ओळख, खेळांची शास्त्रोक्त माहिती वेळोवेळी शिक्षकांना करून देणे आवश्यक आहे. तालुका, जिल्हा, विभाग, राज्यस्तरावर क्रीडा शिक्षकांच्या ज्ञानामध्ये भर पडावी व वेळोवेळी क्रीडा क्षेत्रामध्ये होणारे बदल अवगत होण्यासाठी दरवर्षी किमान दहा दिवसांचे उजळणी वर्ग क्रीडा विभागामार्फत नियमितपणे आयोजित करण्यात येतील.

राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेने प्राथमिक शिक्षकांसाठी व शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमिक विभागाने माध्यमिक शिक्षकांसाठी ही योजना राबवावी.

**६.६) क्रीडा विभागाचे सक्षमीकरण** :

क्रीडा व युवक संघ संचालनालयाचे मुख्यालय पुणे येथे असून मुंबई, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, लातूर या आठ विभागाच्या ठिकाणी विभागीय उपसंचालक कार्यालये, ३५ जिल्ह्यांच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालये व ३१ तालुक्यांमध्ये तालुका क्रीडा अधिकारी कार्यालये कार्यरत आहेत.

क्रीडा संचालनालयाच्या नियंत्रणाखाली, शालेय क्रीडा स्पर्धा यामध्ये (४४ खेळ), ग्रामीण (पायका), १० खेळ, महिला व १२ खेळ व साई १० खेळ इत्यादी खेळांच्या गटनिहाय स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी, पंचायत युवा क्रीडा व खेळ अभियानमधील प्रतिवर्षी २८०० ग्रामपंचायत व ३५ पंचायत समित्यांच्या परिक्षेत्रात किमान क्रीडा सुविधांचा विकास, युवक कल्याण विषयक उपक्रमांचा विस्तार विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलाची उभारणी, खेळाडू शारीरिक क्षमता चाचण्या, क्रीडा प्रबोधिनीचे व्यवस्थापन इ. महत्त्वपूर्ण कामे करण्यात येतात. क्रीडा स्पर्धांचे संयोजन संकुल व पंचायत खेळ क्रीडा अभियान अंतर्गत क्रीडाविषयक पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी पुरेशा मनुष्यबळाची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत संचालनालयाच्या आस्थापनेवर ६२१ पदे मंजूर आहेत. क्रीडा व युवक सेवा संचालनालयात तसेच मंत्रालयीन स्तरावर क्रीडा–युवा धोरणाचे प्रभावी अंमलबजावणीसाठी रिक्त पदे भरण्यात येतील. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार नवीन पदे निर्माण करण्यात येतील.

क्रीडा विभागाअंतर्गत क्रीडा धोरण व युवा धोरणाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी जलदगतीने होण्यासाठी अतिरिक्त पदे निर्माण करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत अधिकारी व कर्मचारी वर्ग पुरेसा नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. क्रीडा विभागातील मंत्रालयीन स्तरावर सचिव–१, उपसचिव–३, कक्ष/अवर सचिव–१२, सहाय्यक–१२, लेखापाल–१, तसेच अन्य प्रशासकीय कर्मचारीवर्ग असणे आवश्यक आहे.

- क्रीडा संचालनालयाच्या संचालक पदी, भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी नियुक्त करण्यात येतात. शिक्षण संचालनालय, आरोग्य संचालनालय, नगर विकास संचालनालय, सार्वजनिक बांधकाम विभाग येथे संबंधित विभागातील अधिकारी पदोन्नतीने विभाग प्रमुख म्हणून नियुक्त केला आहे. क्रीडा संचालक या पदावर क्रीडा विभागातील वरिष्ठ अधिकारी पदोन्नतीने नियुक्त करण्यात येतील.

शासनाच्या विविध योजना राबविण्यासाठी प्रत्येक स्तरावरील कार्यालयामध्ये खालील प्रमाणे कर्मचारी वर्ग आकृतिबंध निश्चित करण्यात येईल.

- **तालुकास्तर** : तालुका क्रीडा अधिकारी–१, (गट–ब), क्रीडा मार्गदर्शक–२, क्रीडा अधिकारी–१, कनिष्ठ लिपीक–१, शिपाई १ व मैदान सेवक–१ तालुका क्रीडा अधिकारी वगळता अन्य पदे मानधनावर भरण्यात येतील.
- **जिल्हास्तर** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी–१, क्रीडा अधिकारी–३, क्रीडा मार्गदर्शक–३, वरिष्ठ लिपीक–१, कनिष्ठ लिपीक १, शिपाई–१ अशी पदे साधारण मंजूर आहेत. जिल्हा स्तरावर याशिवाय खालील पदे भरणे गरजेचे आहे. सहाय्यक जिल्हा क्रीडा अधिकारी–१, भांडारपाल–१, क्रीडा अधिकारी–२, मुख्यलिपीक–१, संख्यालिपीक–१, वाहनचालक–१, सफाई कामगार–१, चौकीदार–१, मैदान सेवक–३ इत्यादी.
- **विभागीयस्तर** : विभागीय क्रीडा कार्यालयामध्ये उपसंचालक–१, क्रीडा अधिकारी–१, कार्यालयीन अधीक्षक–१, मुख्य लिपीक–१, लघुलेखक (निम्नश्रेणी)–१, वरिष्ठ लिपीक–२, कनिष्ठ लिपीक–२, वाहनचालक–१, शिपाई–२ अशी

पदे मंजूर आहेत. याशिवाय विभागीय कार्यालयात खालील पदे भरण्यात यावी. क्रीडा अधिकारी–१, कनिष्ठ लिपीक–१, चौकीदार–१, क्रीडा अधिकारी–१, वरिष्ठ लिपीक–१, शिपाई–१ अशी जादा पदे नियुक्त करण्यात येतील.

- **संचालनालय स्तर** : क्रीडा धोरण, युवा धोरणाअंतर्गत येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच पंचायत खेळ क्रीडा अभियान कक्ष इ.साठी क्रीडा अधिकारी–५, मुख्य लिपीक–३, वरिष्ठ लिपिक–५, कनिष्ठ लिपिक–१०, शिपाई–५ इ. अतिरिक्त पदे निर्माण करण्यात येतील.
- क्रीडा व युवकसेवा संचालनालयाच्या आस्थापनेवर वर्ग–अ दर्जाच्या अधिकाऱ्यांना वाहन उपलब्ध करून देण्यात यावे. वाहन चालक मानधनावर नियुक्त करण्यात यावा.
- क्रीडा मार्गदर्शक या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना पदोन्नती देऊन प्रशासकीय कामकाज देण्यात येते. यामुळे यांचा क्रीडाविषयक अनुभव खेळाडूंना प्रशिक्षणासाठी देता येत नाही. केंद्र शासनाच्या क्रीडा प्राधिकरण अंतर्गत कार्यरत असणाऱ्या क्रीडा मार्गदर्शकांच्या वर्गवारीच्या धर्तीवर राज्यातील क्रीडा मार्गदर्शकाचे वर्गीकरण करण्यात यावे. क्रीडा मार्गदर्शक हा एन.आय.एम. पदविकाधारक ही अर्हता आवश्यक राहील.

## ७) क्रीडा विद्यापीठाची स्थापना

### ७.१) महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळ स्थापन करणे :

महाराष्ट्र राज्यातील बहुतांश युवक सध्या महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर आपले शिक्षण पूर्ण करत आहेत. राज्यात २० विद्यापीठे व १० अभिमत विद्यापीठामध्ये सुमारे ८० लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयीन विद्यापीठ स्तरावर शिक्षण घेत असलेल विद्यार्थ्यांना क्रीडा संवर्धनाकरिता विशेष अशा सवलती अथवा अनुदानाच्या योजना राज्य शासनाकडून राबविण्यात येतील.

राज्यातील युवा समक्ष करण्याकरिता क्रीडा व शारीरिक शिक्षण हे माध्यम अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याकरिता शालेय शिक्षणाप्रमाणे महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणामध्ये त्याचा समावेश असणे आवश्यक आहे. याकरिता खालील बाबी कार्यान्वित करण्यात येतील.

- मा. कुलगुरुंच्या, राज्यस्तरीय उच्चस्तर समितीच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळ स्थापन करण्यात येईल.
- महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा मंडळाने प्रतिवर्षी विद्यापीठ अंतर्गत खेळाडूंसाठी स्पर्धा, प्रशिक्षण शिबिरे व क्रीडा विकास उपक्रमाचे आयोजन करावे. संलग्नीत विद्यापीठांनी विद्यार्थी संख्येनुसार किमान शुल्क निश्चित करून विशेष निधी संकलित करावा. शासनाद्वारे यासाठी सहाय्यक अनुदान दिले जाईल.
- या मंडळाचा कार्यभार कार्यान्वयन करण्यासाठी संलग्नीत विद्यापीठांमधून प्रतिनियुक्तांवर प्राध्यापक/कर्मचारी नियुक्त करावेत.
- राज्य शासनाकडून सदर समितीच्या नियंत्रणाखाली राज्यातील विद्यापीठांमध्ये प्रतिवर्षी अश्वमेध क्रीडा स्पर्धा आयोजन करण्यात येईल. त्यासाठी स्पर्धा आयोजनासाठी रु. २०.०० लक्ष अर्थसहाय्य देण्यात येईल.
- राज्य क्रीडा विद्यापीठाची स्थापना करण्यात येत आहे. क्रीडा विद्यापीठाची स्थापना करताना खालील बाबींचा साकल्याने विचार करण्यात येईल.

### ७.२) क्रीडा विद्यापीठाची स्थापना करणे :

खेळाच्या विकासास सहाय्यभूत बाबींचा साकल्याने विचार करण्यासाठी मध्यवर्ती केंद्र असणे आवश्यक आहे. शारीरिक शिक्षण, क्रीडाविषयक अभ्यासक्रम, खेळाविषयक तंत्रज्ञानाची आधुनिक माहिती, संशोधन, राज्यातील शारीरिक

शिक्षण महाविद्यालय अभ्यासक्रमात सुसूत्रता इत्यादी विषयात प्रगती साधण्यसाठी राज्यात क्रीडा विद्यापीठाची स्थापना करणे गरजेचे आहे. विषयधिनिष्ठ विद्यापीठांची स्थापना देशात व राज्यात झालेली आहे. (उदा. राज्यातील कृषी विद्यापीठे, पशू संवर्धन विद्यापीठ, नागपूर, विधी विद्यापीठ, बेंगलोर इ.)

राज्यात १२० शारीरिक शिक्षण महाविद्यालये (बीपीई/एमपीएड) आहेत. ही महाविद्यालये राज्यातील विविध ८ विद्यापीठांना संलग्न आहेत.

१) क्रीडा विद्यापीठासाठी किमान ४० ते ५० एकर जागा उपलब्धता विद्यार्थी, क्रीडाप्रेमी, खेळाडू इ. व्यक्तींसाठी जाण्या–येण्यास सुयोग्य होईल अशी उपलब्ध करून देण्यात येईल.

२) विभागीय क्रीडा संकुलांची स्थापना करण्यात येत असून यामध्ये क्रीडाविषयक बांधकाम सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. क्रीडा विद्यापीठाची स्थापना करताना या सुविधांचा वापर क्रीडा विद्यापीठासाठी करण्यात येईल. यामुळे क्रीडा बांधकामासाठी अधिकचा खर्च होणार नाही.

३) राज्यात बीपीएड/एमपीएड महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमामध्ये सुसूत्रता आणून एकच अभ्यासक्रम निश्चित करण्यात येईल.

४) शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक सुविधा निर्माण करण्यात येतील.

५) क्रीडा विद्यापीठाची स्थापना करताना प्रशासकीय कामकाज तसेच अभ्यासक्रम राबविण्यासाठी प्रारुप तसेच अभ्यासक्रमाच्या दृष्टीने निर्माण करावयाच्या सुविधा इ.साठी मा. कुलगुरू (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येईल. जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करून सुविधा व अभ्यासक्रमविषयक व्याप्ती इ. कामकाज गतीमानतेने करण्यात येईल. विद्यापीठांतर्गत आवश्यक प्रशासकीय रचना तसेच मनुष्यबळाची नियुक्ती आवश्यक तरतुदींसह केली जाईल.

६) एन. आय. एस. धर्तीवर क्रीडा मार्गदर्शक घडविण्यासाठी एम.आय.एस. अभ्यासक्रम सुरू करण्यात येईल.

## ८) राज्यातील क्रीडा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन

### ८.१) एकविध खेळाच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन :

**अ) प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यासाठी आर्थिक सहाय्य** : राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढ करण्यामध्ये, तसेच खेळाचा प्रचार व प्रसार करण्यामध्ये एकविध खेळ संघटना मोलाचा वाटा उचलतात. राज्य संघटनांद्वारा राष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतात. त्यांना अर्थसहाय्य देण्याची सध्या योजना आहे. यामध्ये सुधारणा करून एकविध खेळ संघटनासाठी किमान ५ दिवसांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करणे अनिवार्य करावे. प्रशिक्षण शिबिरासाठी खेळाडू, मार्गदर्शक यांना प्रतिदिन रु. १५०/– निवास व भोजन खर्च तसेच प्रवास खर्च, मैदान सेवकांसाठी व सादील खर्च, वैद्यक खर्च व इतर बाबींसाठी अनुदान रु. ५,०००/– देण्यात येईल.

**ब) एकविध खेळाच्या राज्य संघटनांना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहन अनुदानात वाढ :** एकविध खेळाच्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाना विविध खेळात नेत्रदीपक कामगिरी बजावण्यासाठी संबंधित खेळांच्या राज्य संघटनांना प्रोत्साहन देण्यासाठी यामध्ये भरीव स्वरूपात वाढ करण्यात येईल. वैयक्तिक व सांघिक गटातील पदक धारक खेळाडूंना प्रत्येकी सुवर्ण रु. २००००/– रौप्य रु. १५,०००/– कांस्य रु. ५०००/– देण्यात येईल.

**क) अधिकृत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धाकरिता राज्याचा संघ सहभागी करण्यासाठी राज्य संघटनांना सहाय्य** : अधिकृत राष्ट्रीय स्पर्धेत राज्याचा संघ सहभागी होण्यासाठी राज्यसंघटनांना आर्थिक सहाय्याच्या मर्यादेत खालीलप्रमाणे वाढ करण्यात येईल.

- राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाचे भाडे, राज्य परिवहन मंडळाचे सवलत दराचे भाडे.
- खेळाचा गणवेश रु. ५००/– ट्रॅकसूटसाठी रु. ५००/– प्रति खेळाडूस देण्यात येईल.
- खेळाडू, व्यवस्थापक व मार्गदर्शक यांना प्रवास व स्पर्धा कालावधीसाठी हातखर्ची भत्ता प्रतिखेळाडू रु. १०० देण्यात येईल.

**८.२) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेमार्फत क्रीडा संस्थांना आर्थिक सहाय्य देणे :**

महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्था, एकविध संघटना बळकट करण्यासाठी क्रीडा स्पर्धा, क्रीडा साहित्य, निर्वाह अनुदान इत्यादी बाबींसाठी शासनामार्फत अनुदान देण्यात येत आहे. या अनुदान मर्यादेत खालीलप्रमाणे बदल करण्यात येतील.

| अ. क्र. | संस्था | बाब | प्रचलित अनुदान मर्यादा | नवीन अनुदान दर |
|---|---|---|---|---|
| १. | राज्य संघटना | निर्वाह अनुदान | राज्य संघटनेशी संलग्न प्रत्येक जिल्ह्यामागे रु. १०००/– किंवा प्रत्येक खर्चाच्या ५० टक्के | राज्य संघटनेशी संलग्न प्रत्येक जिल्ह्यामागे रु. ५०००/– किंवा प्रत्येक खर्चाच्या ५० टक्के |
| | | क्रीडा साहित्य | रु. ५०००/– | रु. २५,०००/– |
| २. | जिल्हा संघटना | निर्वाह अनुदान | रु. ५०००/– | रु. २०,०००/– किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के |
| | | क्रीडा साहित्य | रु. ५०००/– | रु. २०,०००/– किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के |
| ३. | स्थानिक मंडळे, क्रीडा संस्था | निर्वाह अनुदान | रु. ५००/– | रु. ३,०००/– किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के |
| | | क्रीडा साहित्य | रु. २०००/– | रु. ३,०००/– किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के |
| ४. | राज्य संघटना, क्रीडा मंडळे | स्पर्धा अनुदान | अ) राज्यस्तरीय स्पर्धा रु. १.०० लाख<br>ब) राष्ट्रीय स्पर्धा रु. २.०० लाख<br>क) आंतरराष्ट्रीय स्पर्धा रु. २.०० लाख | अ) राज्यस्तरीय अजिंक्यपद खुला गट स्पर्धा रु. ४.०० लाख व इतर गटासाठी रु. २.०० लाख<br>ब) राष्ट्रीय अजिंक्यपद खुला गट स्पर्धा रु. ८.०० लाख इतर गटासाठी तसेच शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा रु. ५.०० लाख<br>क) अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा रु. २०.०० लाख |

**८.३) क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग :**

क्रीडा विकासात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग वाढविण्यासाठी शासनाचे निर्णय आहेत. राज्यात आयोजित होणाऱ्या विविध स्पर्धांना प्रोत्साहन व उत्तेजन मिळावे या हेतूने औद्योगिक प्रतिष्ठाने, सहकारी संस्था, कारखाने, बँका, महामंडळे,

वाणिज्यिक प्रतिष्ठाने यांनी क्रीडा विकासात काम करणाऱ्या मान्यता प्राप्त स्वयंसेवी संस्थांना प्रायोजकत्व देऊन आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्यासाठी सहाय्य करणे, क्रीडा साहित्य आयात करणे, खेळाडूंच्या परदेशी प्रशिक्षणाचा खर्च करणे आहे.

मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालये, बँका, संस्था इ. च्या निदर्शनास ही बाब आणून देणे आवश्यक आहे. राज्य क्रीडा विकास निधी, जिल्हा क्रीडा परिषद, संकुल समित्या यांना क्रीडा उपक्रमासाठी संबंधित प्राधिकरणाने सहाय्य करावे. प्रतिवर्षी क्रीडा विकासाच्या बाबींवर खर्च करणे प्राधिकरणांना बंधनकारक करण्यात येईल. शासनामार्फत याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येईल.

**८.४) क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण व सहाय्यक अनुदान इ. करिता क्रीडा प्रकारांची वर्गवारी करणे** :

ऑलिंपिक, आशियाई स्पर्धेतील क्रीडा प्रकार तसेच राज्यातील पारंपरिक खेळ यांच्यावर लक्ष केंद्रित करून भविष्यात नामांकित स्पर्धेत पदक मिळविण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम हाती घेण्याची आवश्यकता आहे. यामध्ये सहाय्यक अनुदान, प्रशिक्षण या बाबींचा विचार करून खालीलप्रमाणे खेळांची वर्गवारी करण्यात येईल.

- ऑलिम्पिक स्पर्धेत अंतर्भूत असणारे महत्त्वाचे खेळ तसेच राज्यातील महत्त्वाचे पारंपरिक खेळ (ब–गट) यामध्ये (उदा. कबड्डी, खो–खो, कुस्ती व मल्लखांब) अशी वर्गवारी करण्यात येईल. आणि इतर खेळ हे तिसऱ्या गटात (क–गट) असावेत.
- महाराष्ट्र राज्याला पुढील पाच वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करता येईल असे 'ब' गटातील खेळ निवडून त्यांचा 'अ' गटात समावेश करावा. अ गटात समावेश झालेल्या खेळांवर विशेष लक्ष देऊन सर्व बाबींमध्ये (सहाय्यक अनुदान, प्रशिक्षण) प्राधान्य देण्यात येईल.

| क्रीडा प्रकारांची वर्गवारी | | |
|---|---|---|
| **अ गट** | **ब गट** | **क गट** |
| ॲथलेटिक्स | ॲथलेटिक्स | कॅनॉईंग ॲण्ड कयाकिंग |
| तिरंदाजी | तिरंदाजी | कॅरम |
| ॲक्वेटिक्क | ॲक्वेटिक्क | बॉडी बिल्डिंग |
| बॅडमिंटन | बॅडमिंटन | आट्यापाट्या |
| बॉक्सिंग | बॉक्सिंग | स्केटिंग, रोलर स्केटिंग |
| बास्केटबॉल | बास्केटबॉल | रिंग टेनिस |
| सायकलिंग | सायकलिंग | बेसबॉल |
| जिम्नॅस्टिक्स | जिम्नॅस्टिक्स (ऑर्टीस्टीक, रिटॅमिक इ. म्पोलिन) | शूटींग बॉल |
| हॅण्डबॉल | हॅण्डबॉल | ब्रीज |
| – | ज्युदो | क्रिकेट |
| कबड्डी | कबड्डी | धोबॉल |
| खो–खो | खो–खो | रोलबॉल |
| टेनिस | टेनिस | योगासने |
| शूटिंग | शूटिंग | डॉजबॉल |

| अ गट | ब गट | क गट |
|---|---|---|
| रोईंग | रोईंग | कॉर्कबॉल |
| टेबल टेनिस | टेबल टेनिस | नेटबॉल |
| | ट्रायथलॉन | सिकई |
| व्हॉलीबॉल | व्हॉलीबॉल | वुशु |
| | वेटलिफ्टिंग | कराटे |
| कुस्ती | कुस्ती | किक बॉक्सिंग |
| हॉकी | हॉकी | रस्सीखेच |
| | तायक्वांदो | बुद्धिबळ |
| फूटबॉल | फूटबॉल | स्कॅश |
| | मल्लखांब | सायकलपोलो |
| | तलवारबाजी | पॉवरलिफ्टिंग |
| | सेलिंग | ब्रिलियर्ड्स |
| | सॉफ्टबॉल | याटिंग |
| | | बॉल बॅडमिंटन |
| | | वेटलिफ्टिंग |
| | | स्कूल गेम्स मधील खेळ |

**९) राज्यात साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन :**

**९.१) महाराष्ट्र स्टेट ॲडव्हेंचर स्पोर्ट्स सेंटरची स्थापना करणे :**

महाराष्ट्र राज्याला समृद्ध असा वारसा आहे. यामध्ये ७२० किलोमीटरचा समुद्र किनारा, सह्याद्रीच्या पर्वत रांगा, सातपुडा पर्वत ज्यामध्ये १६४८ मीटर उंचीचे कळसूबाई शिखर, पाचगणीचे पठार, चिखलदरा, लोणारचे सरोवर, मेळघाट, ताडोबा, नागझिरा इत्यादी महत्त्वपूर्ण ठिकाणे आहेत. या भौगोलिक विविधतेचा वापर साहसी क्रीडा प्रकारांच्या विकासासाठी करता येणे शक्य आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर साहसी क्रीडा प्रकाराला विशेष महत्त्व देण्यात आलेले आहे. या साहसी क्रीडा प्रकारातून महाराष्ट्र राज्यातील अनेक खेळाडुंनी राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावर किर्तीमान स्थापित केलेले आहे.

महाराष्ट्र राज्याची भौगोलिक परिस्थिती ही साहसी क्रीडा प्रकारासाठी पूरक आहे. राष्ट्रीय स्तरावर नियमित होणारे स्पर्धात्मक क्रीडा प्रकार, केंद्र शासनाद्वारे साहसी क्रीडा प्रकाराला पुरस्कृत करणाऱ्या योजना इ. विचार करता साहसी क्रीडा प्रकार तीन भागात विभागल्या जातात १) जल क्रीडा प्रकार २) वायु क्रीडा प्रकार ३) स्थल क्रीडा प्रकार या तीन प्रकारामध्ये स्पर्धात्मक व अस्पर्धात्मक (मनोरंजनात्मक) अशा बाबी आहेत.

साहसी क्रीडा प्रकारामुळे नेतृत्वगुणांचा विकास, धैर्य, चिकाटी, कल्पकता, साहसी वृत्ती, निसर्गाशी एकरूपता, सकारात्मकता, सांघिक भावना रुजणे, समन्वय इत्यादी बाबींचा विकास होतो. विदेशामध्ये साहसी खेळांचा वापर शाळेमध्ये तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यामध्ये, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या क्षमतांच्या वाढीसाठी केला जातो. आपत्ती व्यवस्थापनासाठी साहसी खेळांची अतिशय गरज आहे व यातील तंत्रे जगभरातील पोलिस दले, लष्कर तसेच सर्व निमलष्करी दले शिकतात व याचा वापर करतात.

महाराष्ट्र राज्याची भौगोलिक परिस्थिती ही साहसी उपक्रमांना पोषक अशी आहे. भारतामध्ये एरो स्पोर्टस, वॉटर स्पोर्ट्स, व माऊंटनिअरिंग ॲन्ड अलाईड स्पोर्ट्स या तिन्ही प्रकारासाठी अद्याप एकत्रित अशी कोणतीही प्रशिक्षण संस्था कार्यरत नाही. वॉटर स्पोर्टससाठी गोव्यामध्ये प्रशिक्षण संस्था (नॅशनल इन्स्टिटयुट ऑफ मरीन स्पोर्ट्स, गोवा) कार्यरत आहे. माऊंटनिअरिंग ॲन्ड अलाईड स्पोर्ट्ससाठी डायरेक्टरेट ऑफ माऊंटनिअरिंग ॲन्ड अलाईड स्पोर्ट्स (DMAS) मनाली (हिमाचल प्रदेश), नेहरू इन्स्टिटयुट ऑफ माऊंटेनिअरींग, (NIM), उत्तर काशी (उत्तरांचल), हिमालयीन माऊंटेनिरींग इन्स्टिटयुट (HMI) दार्जिलिंग, (पश्चिम बंगाल), जवाहर इन्स्टिटयुट ऑफ माऊंटनिअरिंग बटोट, (JIM) (जम्मु – काश्मिर) या संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमध्ये लाईफ सेव्हींग कोर्स, पॉवर बोट हॅडलिंग कोर्स, स्कूबा डायव्हींग, स्नार्कलिंग, ॲडव्हेंचर कोर्स, माऊंटेनिरींग कोर्स, हॉटएअर बलून हॅन्डलिंग कोर्स इ. अभ्यासक्रम राबविले जातात. राज्यातील खेळाडूंना या प्रशिक्षणाची सुविधा राज्यात नसल्याने वंचित रहावे लागते, या करिता राज्यात **ॲडव्हेंचर स्पोर्ट्स सेंटरची स्थापना करण्यात येईल.** या केंद्रामध्ये खालील उपक्रम राबविण्यात येतील.

- एरो स्पोर्ट्स, वॉटर स्पोर्ट्स व माऊंटनिअरिंग ॲन्ड अलाईन स्पोर्ट्स, स्पोर्ट क्लाईंबिंक या सर्व साहसी खेळाचे प्रशिक्षण राबविणे.
- साहसी खेळांच्या सुविधा सेंटरमध्ये विकसित करणे.
- साहसी क्रीडा व पर्यटन महोत्सव आयोजित करणे व पर्यटनाला चालना देणे.
- साहसी खेळांच्या मार्गदर्शनासाठी प्रशिक्षण अभ्यासक्रम कार्यान्वित करणे.
- राज्यामध्ये साहसी क्रीडाप्रकारांना चालना देणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना मान्यता, परवाना देणे.
- साहसी क्रीडा स्पर्धांचे आयोजन व नियमन करणे.
- नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशिक्षित करणे.
- साहसी खेळांचा प्रसार व प्रचार करणे. इ.
- लाईफ सेव्हिंग्ज जीवन रक्षक अभ्यासक्रम राबविणे.

तरुणांमध्ये साहसविषयी भावना रुजविणे, सर्वसामान्य युवकांसाठी साहसी खेळाची उपलब्धता करून देणे, आंतरराष्ट्रीय स्तराच्या साहसी स्पर्धांसाठी युवकांना तयार करणे, छोट्या छोट्या साहसी पर्यटनाला चालना देणे, साहसी पर्यटनाच्या माध्यमातून युवकांना सेवासंधी उपलब्ध करून देणे, पोलीस अग्नीशामक व औद्योगिक व्यवसायातील अतितात्कालिन व आपत्कालीन सेवा देणारी तुकडी तयार करण्यासाठी प्रशिक्षण देणे, साहसी क्रीडेच्या क्षेत्रामध्ये हे सेंटर नियंत्रण संस्थेच्या रूपाने कार्य करेल. या सेंटरमध्ये विकसित करावयाच्या सुविधा व व्यवस्थापनासाठी आर्थिक तरतूद केली जाईल.

**९.२) साहसी खेळांच्या क्रीडा सुविधांची निर्मिती करणे** :

राज्यातील भौगोलिक विविधता साहसी खेळांच्या सुविधा निर्मितीसाठी अनुकूल आहे. या भौगोलिक विविधतेचा वापर करून राज्यामध्ये ठिकठिकाणी साहसी खेळांच्या सुविधा निर्माण करता येतील यामध्ये धरणे, तलाव, समुद्र किनारा, नदी या ठिकाणी वॉटर स्पोर्ट्सच्या सुविधा तसेच डोंगर रांगामध्ये गिर्यारोहणाच्या व एरोस्पोर्ट्सच्या सुविधा निर्माण करता येतील. क्रीडा संकुले, मनोरंजन केंद्र, उद्याने, पर्यटन स्थळे इ. ठिकाणी कृत्रिमरीत्या साहसी क्रीडा सुविधा निर्माण करणे शक्य आहे.

साहसी खेळांच्या क्रीडा सुविधा मध्ये क्लाईंबिंग वॉल, बोल्डर पार्क, डायनो, डायरोप, डायरोप कोर्स, ऑबस्टॅकल कोर्स, बंजी जम्पींग इ. सुविधा विकसित करणे आवश्यक आहे. तसेच भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेवून जल क्रीडा प्रकारामधील कॅनांईंग, वॉटर स्कीईंग, रोईंग, याटिंग, स्क्युबा डायव्हिंग, सेलिंग इ. व वायु क्रीडा प्रकारांमधील पॅरा ग्लायडिंग, पॅरासेलिंग, हॉट एअर बलुनिंग इ., तसेच स्थल क्रीडा प्रकार स्पोर्ट क्लाईंबिंग, रॉक क्लाईंबिंग, ट्रेकिंग, माऊंटन सायकलिंग, ऑल टेरेन बाइक, झोप लाइन इ. सुविधा निर्माण करण्यासाठी सर्वेक्षणद्वारे जागांची निश्चिती

करून सुविधा विकसित करण्यात याव्यात. सुविधा विकसीत करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, संकुल समितीना अनुदान देण्यात येईल. पर्यटन विभागाचे सहकार्याने साहसी क्रीडा प्रकारांच्या सुविधा विकसित केल्यास पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल.

अ) विभागीय क्रीडा संकुलामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्लाईंबिंग वॉल, ॲडव्हेंचर स्पोर्टस् पार्कची निर्मिती तसेच जिल्हा क्रीडा संकुलामध्ये राष्ट्रीय दर्जाची क्लाईंबिंग वॉल, ॲडव्हेंचर पार्कची निर्मिती करण्यात यावी. महानगरपालिका, नगरपालिका यांनी खेळ, उद्यान/बालनगरीसाठी आरक्षित ठेवलेल्या जागेवर साहसी खेळांच्या सुविधा उभारण्यात येतील.

ब) नोंदणीकृत संस्था, साहसी क्रीडा संस्था, संघटना यांना क्लाईबिंग वॉल व साहसी खेळाच्या सुविधा विकसित करण्यासाठी अनुदान देण्यात येईल.

क) क्रीडांगण विकास योजनेअंतर्गत विविध खेळांच्या सुविधा निर्माण करणे तसेच व्यायामशाळा बांधकाम व साहित्यासाठी क्रीडा विभागामार्फत अनुदान देण्यात येते या योजनेअंर्तगत साहसी खेळाच्या निर्मिती तसेच त्यांच्या प्रशिक्षण, स्पर्धांसाठी आवश्यक अनुदान देण्याची तरतूद करण्यात येईल.

**९.३) साहसी खेळाच्या स्पर्धा, प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांचे आयोजन** :

मुलांमध्ये धैर्य, चिकाटी, सांघिक भावना, सुप्त गुणांना चालना देऊन सर्वांगीण विकास करण्यासाठी साहसी खेळांच्या बाबीं अधिक फायदेशीर आहेत. साहसी खेळाचा विकास होण्यासाठी राज्यामध्ये जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध स्पर्धा प्रशिक्षण आयोजन करणे आवश्यक आहे तसेच साहसी सप्ताह साजरा करण्यात यावा यामध्ये सेलिंग, पॅराग्लायडिंग, स्पोर्टस व रॉक क्लाईबिंग, समुद्र व खाडी पोहणे, टूर द फ्रान्सच्या धर्तीवर टूर द महाराष्ट्र सायकलिंग स्पर्धाचे आयोजन करण्यात येईल.

**९.४) साहसी क्रीडा पुरस्कार** :

राज्याचे नांव आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करणाऱ्या खेळाडूंना, मार्गदर्शक, क्रीडा संघटक यांना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यामध्ये खाडी पोहणे, गिर्यारोहन, शिडाच्या होडीतून समुद्र प्रवास, सायकलिंग जगप्रवास, मोटोक्रॉस, पॅराग्लायडिंग, पॅराजंपिंग, आईसस्केटींग या साहसी क्रीडा प्रकारातील बाबींसाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा विशेष पुरस्कार देण्याची तरतूद आहे.

साहसी खेळांमध्ये एरो स्पोर्टस्, वॉटर स्पोर्टस् व माऊंटनिअरींग ॲन्ड अलाईड स्पोर्टस् या तीन प्रकारांचा समावेश आहे. या प्रकारांमध्ये विविध बाबींचा अंतर्भाव असून त्या सर्वस्वी भिन्न आहेत. (उदा. पॅराग्लायडिंग, पॅरासेलिंग, हॉट एअर बलुनिंग, वॉटर स्कीईंग, सेलिंग, तसेच स्पोर्ट क्लाईबिंग इ.)

पुरस्कार देताना एरोस्पोर्टस् व वाँटर स्पोर्टस्, माऊंटेनिअरिंग व अलाईड स्पोर्टस यांचा स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल. साहसी क्रीडा पुरस्कार देताना तीन बाबींसाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येतील. तसेच स्पोर्ट क्लाईविंग हा क्रीडा प्रकार स्पर्धात्मक असून राज्य-राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळला जात आहे. या खेळामध्ये प्राविण्य संपादन करणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. या खेळाचा समावेश पुरस्कार नियमावलीच्या क्रीडा प्रकारात केला जाईल व यासाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येईल. साहसी उपक्रमांतील कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा विशेष पुरस्कार हा शिवछत्रपती राज्य क्रीडा साहसी पुरस्कार या नावाने प्रतिवर्षी देण्यात येईल.

**९.५) साहसी खेळांच्या राज्य संघटना, संस्था व खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणे** :

राज्यात साहसी खेळाला प्रोत्साहन, प्रचार व प्रसार स्पर्धेच्या माध्यमातून करण्याचे कार्य नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थांद्वारे चालू आहे. या संस्थांना महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद यांच्या सहाय्यक अनुदान योजनेतून आर्थिक मदत करण्यासाठी नियमामध्ये बदल करण्यात येतील. हिमालयातील गिर्यारोहण मोहीमांना रु. ४.०० लक्ष मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

**९.६) साहसी खेळांच्या विकासाचे कार्य करणाऱ्या संस्थांना क्रीडा साहित्यासाठी अनुदान देणे** :

राज्यात साहसी खेळा मधील उपक्रमासाठी लागणारे साहित्य महाग असल्याने संस्थांना सहाय्य करणे गरजेचे आहे यामुळे विविध संस्था पुढाकार घेऊन विकासात्मक कार्य करतील. सद्यस्थितीत या खेळाच्या क्रीडा साहित्यासाठी अनुदान देण्यात येत नाही. राज्यशासन व क्रीडा संस्था यांचे ७५:२५ हिश्याच्या प्रमाणात रु. ५०.०० लक्ष मर्यादेत अनुदान देण्यात येईल. गत तीन वर्षात साहसी खेळात कार्य करणाऱ्या संस्थांना याचा लाभ दिला जाईल.

**१०) क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना** :

**१०.१) क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना** :

क्रीडा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी राज्यात होण्यासाठी क्रीडा योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा, प्रचलित योजनांमध्ये सुधारणा तसेच क्रीडा धोरणातील शिफारशी शासनाकडून मान्य करुन घेणे. इत्यादी महत्त्वपूर्ण बाबींसाठी ''क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समितीची स्थापना'' करणे आवश्यक आहे. या समितीची रचना खालीलप्रमाणे असेल. तसेच क्रीडा धोरण तयार करताना ज्या सदस्यांचा गठीत समितीमध्ये सहभाग होता त्या सदस्यांना अंमलबजावणी समितीत प्राधान्य देण्यात येईल. समितीच्या बैठका वर्षातून किमान चार वेळा आयोजित करून क्रीडा धोरणाचा आढावा घेण्यात येईल. कालानुरूप बदल करण्याच्या शिफारसी ही समिती वेळोवेळी करेल.

**क्रीडा धोरण अंमलबजावणी उच्चस्तरीय समिती रचना**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य |
| सहाध्यक्ष | मा. मंत्री, क्रीडा व युवक कल्याण |
| उपाध्यक्ष | मा. राज्यमंत्री, क्रीडा व युवक कल्याण |
| सदस्य सचिव | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीड़ा विभाग |
| सदस्य | विधान सभा सदस्य - ८ (विधानसभा अध्यक्षांनी शिफारस केलेले)<br>विधान परिषद सदस्य - २ (विधान परिषद सभापतींनी शिफारस केलेले)<br>खासदार प्रतिनिधी - २ (मा. मुख्यमंत्र्यांनी शिफारस केलेले) |
| | प्रधान सचिव - वित्त, प्रधान सचिव - नियोजन |
| | क्रीडा धोरण उपसमिती अध्यक्ष |
| | शिक्षण संचालक/सहसंचालक |
| | अर्जुन पुरस्कारार्थी - २, शिवछत्रपती पुरस्कारार्थी - खेळाडू २, संघटक - २ |
| | क्रीडा संचालनालयाचे प्रतिनिधी - २ (संचालक व सहसंचालक) |

(क्रीडा धोरण तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समिती मधिल विधान सभा/विधान परिषद सदस्यांना प्राधान्य देण्यात येईल.) क्रीडा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर समिती नियुक्त करण्यात यावी या समितीनी वर्षातून दोन बैठका घेवून राज्यस्तरीय समितीला अहवाल द्यावा.

**वित्तीय व्यवस्था :** कोणत्याही देशाची प्रगती याच्या मनुष्यबळ विकासावर अवलंबून असते हे तत्त्व लक्षात घेवून, क्रीडा क्षेत्रावर होणारा शासनाचा खर्च हा खर्च न मानता ती मानवी संसाधन विकासासाठी अत्यावश्यक असणारी गुंतवणूक मानण्याचे राज्य शासनाने ठरविले आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाचे क्रीडा धोरण २०१२ अंतर्गत घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२०१२-२०१७) अंदाजित रु.१४३४.७१ कोटी इतका निधी क्रीडा विकासासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. यासाठी प्रचलित योजनांमध्ये सुधारणा करतानाच काही नवीन योजना लागू करण्यात येतील. त्याची कार्यवाही स्वतंत्रपणे केली जाईल.

❑❑❑

# ५. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम - २००९

RNI No. MAMBIL/200937831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार – ब

(वर्ष ३ : अंक ८४) मंगळवार, ऑक्टोबर ११, २०११/आश्विन १९, शके १९३३ (पृष्ठे ६३)

किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १४९**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक–अ आणि एक–ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : ११ ऑक्टोबर, २०११.

## अधिसूचना

क्र.पीआरई–२०१०/प्र.क्र.२१२(बी)/पीई–१. ज्याअर्थी, भारत सरकारने, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९, (२००९ चा ३५) (यात यापुढे ज्याचा निर्देश 'उक्त अधिनियम' असा केला आहे) दिनांक १ एप्रिल २०१० पासून अंमलात आणला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाखाली नियम करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३८ ची पोट–कलमे (१) व (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :

परिशिष्ट – एक

## भाग – एक

## प्रारंभिक

**(१) संक्षिप्त नाव, विस्तार व प्रयुक्ती :**

१) या नियमांस, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ असे म्हणावे.

२) ते, संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू असतील.

३) हे नियम, राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**(२) व्याख्या :**

१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, ––

(क) **'अधिनियम'** याचा अर्थ, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ (२००९ चा ३५) असा आहे.

(ख) **'विद्याविषयक वर्ष'** याचा अर्थ, शासनाने, शालेय कामकाज व प्रत्यक्ष अध्यापन यासाठी शासनाने घोषित केलेला कालावधी विचारात घेऊन, संबंधित जिल्ह्याच्या किंवा महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्याने किंवा निरीक्षकाने मंजूर व घोषित केलेल्या दोन विद्याविषयक सत्रांचा समावेश असणारे वर्ष, असा आहे.

(ग) **'अंगणवाडी'** याचा अर्थ, भारत सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाच्या एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत स्थापन केलेले अंगणवाडी केंद्र, असा आहे;

(घ) **'बालक'** याचा अर्थ, ६ ते १४ वर्षे या वयोगटातील कोणतीही व्यक्ती, असा आहे;

**स्पष्टीकरण** : अधिसूचनेमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १) यामध्ये किंवा अधिसूचनेमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे विकलांग असलेल्या किंवा अध्ययन करण्यास अक्षम असलेल्या, किंवा अध्ययन काठिण्य असलेल्या बालकांच्या संबंधात, उच्च वयोमर्यादा १८ वर्षे ही असेल.

(ङ) **'वंचित गट'** याचा अर्थ, राज्य शासनाने अधिसूचनेत व्याख्या केल्याप्रमाणे असलेला गट, असा आहे;

(च) **'प्राथमिक शाळा'** याचा अर्थ, जेथे इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे किंवा त्यापैकी कोणत्याही इयत्तेपर्यंतचे शिक्षण दिले जाते ते केंद्र, असा आहे;

(छ) **'प्राथमिक शाळेतील शिक्षक'** याचा अर्थ, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी यथोचितरित्या नियुक्त केलेली व्यक्ती असा असून त्यामध्ये मुख्याध्यापक किंवा समूह समन्वयक यांचा समावेश होतो.

(ज) **'मूल्यमापन'** याचा अर्थ, विद्यार्थ्यांच्या बाबतीतील अर्थ, विद्याविषयक प्राधिकरणाने विहित केलेल्या मानक दर्जानुसार त्यांच्या नैपुण्याची पातळी ठरविणे असा आहे आणि संस्था व विविध पदांवर नियुक्त्या केलेल्या व्यक्ती यांच्या बाबतीतील अर्थ, त्या प्रभारी असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सरासरी नैपुण्य पातळीसह त्यांच्या कार्यक्षमतेची पातळी ठरविणे, असा आहे.

(झ) **'नमुना'** याचा अर्थ, या नियमांसोबत जोडलेला नमुना, असा आहे.

(ज) **'शासन'** याचा अर्थ , महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ट) **'स्थलांतर करणारी बालके'** याचा अर्थ, जेथे त्यांनी नाव नोंदवलेले असेल त्या शाळेच्या ठिकाणापासून नव्या ठिकाणी एका शैक्षणिक सत्रापेक्षा कमी कालावधीत त्यांच्या पालकांसोबत किंवा अन्यथा स्थलांतर करणारी बालके, असा आहे;

(ठ) **'शाळेत न जाणारे बालक'** याचा अर्थ, ज्याने एकतर शाळेत प्रवेश घेतलेला नसेल किंवा ज्याने प्रवेश घेऊन सुद्‌धा प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले नसेल असे ६ ते १४ या वयोगटातील बालक असा असून, यामध्ये एका महिन्यापेक्षा अधिक काळ सातत्याने अनुपस्थित राहणाऱ्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा समावेश होतो;

(ड) **'नजीकची शाळा'** याचा अर्थ, समुचित शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे, संबंधित बालकाच्या निवासस्थानापासून इयत्ता पहिली ते पाचवीसाठी, १ कि.मी. अंतराच्या आत व ६ ते ११ वर्षे वयाची किमान २० बालके उपलब्ध असलेली आणि इयत्ता सहावी ते आठवीसाठी, ३ कि.मी. अंतराच्या आत व इयत्ता ५ वी मध्ये २० बालके उपलब्ध असलेली शाळा, असा आहे;

(ढ) **'तासिका'** याचा अर्थ, शासनाच्या निदेशांनुसार एखाद्या वर्गामध्ये एखादा विषय शिकविण्यासाठी शाळेच्या वेळापत्रकात दर्शविलेला किमान किंवा कमीत कमी कालावधी असा आहे;

(ण) **'विद्यार्थी संचयी अभिलेख'** याचा अर्थ, सर्व समावेशक व निरंतर मूल्यमापनावर आधारित असलेला बालकाच्या प्रगतीचा अभिलेख, असा आहे;

(त) **'शाळेचे नकाशा रेखन'** याचा अर्थ, शाळेत सहजपणे पोहोचण्यासाठी, भौगोलिक अंतर आणि भाषिक, प्राकृतिक व सामाजिक अडथळे कमी करण्याकरिता शाळेचा आराखडा तयार करणे व त्यानुसार शाळेचे स्थान ठरविणे, असा आहे;

(थ) **'अभ्यासक्रम'** याचा अर्थ, विशिष्ट वयोगटातील बालकांच्या शिक्षणाचा विचार करून, केंद्र व राज्य शासनाने, वेळोवेळी निश्चित केलेल्या शैक्षणिक धोरणानुसार, शासनाने मान्य केलेली वर्गनिहाय विषय योजना व त्यामधील प्रत्येक विषयाचा तपशीलवार आशय आणि ज्ञान, कौशल्ये, मूल्ये व अभिवृत्ती यांसह अपेक्षित असलेली अध्ययन निश्चिती, असा आहे;

(द) **'गणवेश'** याचा अर्थ, शाळेच्या विद्यार्थ्यांनी अंगिकारावयाची वर्तणूक व शिस्त या संबंधातील अपेक्षित मानकांचा योग्य विचार करून संबंधित शाळा समितीने ठरविलेला पोषाख, असा आहे.

२) या नियमांमध्ये वापरलेले परंतु यामध्ये व्याख्या न केलेले, पण अधिनियमामध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या अधिनियमामध्ये त्यांना नेमून दिले आहेत तेच अर्थ असतील.

## भाग – दोन
## बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा अधिकार

**(३) कलम ४ च्या तरतुदींच्या प्रयोजनार्थ विशेष प्रशिक्षण** :

१) स्थानिक प्राधिकरण, राज्य शासनाने याबाबतीत अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्याकडून केल्या जाणाऱ्या सर्वेक्षणाच्या साधनांद्‌वारे, जी बालके शाळेत जात नाहीत अशी बालके, दरवर्षी निश्चित करील आणि वयानुसार त्यांना वर्गामध्ये प्रवेश देईल, ते गरजेनुसार, पुढील पद्‌धतीने विशेष प्रशिक्षण आयोजित करील :

(क) विशेष प्रशिक्षण हे, अधिनियमाच्या कलम २९ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या विद्याविषयक प्राधिकरणाने मान्यता दिलेली व विशेष करून तयार केलेली वयानुरूप अध्ययन साधने व साहित्य यावर आधारलेले असेल;

(ख) असे प्रशिक्षण, शाळेच्या जागेत भरवलेल्या वर्गांमधून किंवा शाळेच्या नेहमीच्या वेळेव्यतिरिक्त इतरवेळी, सुरक्षित निवासी सुविधा असलेला अधिकृत निगडित पाठक्रम म्हणून आयोजित केलेल्या वर्गांमधून देण्यात येईल;

(ग) असे प्रशिक्षण, प्राधान्याने, शाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षकांकडून किंवा विशेषतः त्या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या शिक्षकांकडून देण्यात येईल;

(घ) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, अशा प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी निर्धारित करील.

२) अशा बालकाला वयानुरूप वर्गात प्रवेश दिल्यानंतर व विशेष प्रशिक्षणादरम्यान आणि त्याने/तिने विशेष प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर, शिक्षक हे, विद्याविषयक व भावनाविषयक या दोन्ही दृष्टीने त्याचे/तिचे वर्गाबरोबर समाकलन करून देण्यास मदत करण्याकरिता आवश्यक असलेले विशेष लक्ष त्याच्याकडे/तिच्याकडे देतील.

३) १) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (म.रा.शै.सं.प्र.प.) यांच्याकडून पुढील बाबी विचारात घेऊन हा विशेष प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्यात येईल.

(क) अध्ययन साहित्यामध्ये वाढ करणे;

(ख) शिक्षकांचे प्रशिक्षण;

(ग) बालकांच्या मूल्यमापनासंबंधातील वैज्ञानिक पद्धती.

२) जेथे विशेष प्रशिक्षण देण्याबाबतचा आराखडा हा शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे हे पुढील बाबी विचारात घेऊन करतील.

(च) विशेषतः या प्रयोजनासाठी शिक्षकांची नियुक्ती करणे;

(छ) स्थानिक प्राधिकरणाने शाळेत न जाणाऱ्या बालकांचे केलेले सर्वेक्षण;

(ज) अशा बालकाच्या प्रगतींना सहाय्य करणारी पर्यवेक्षकीय व्यवस्था;

(ङ) वित्तीय तरतूद

## भाग – तीन
## राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरण यांची कर्तव्ये

**(४) कलम ६ च्या प्रयोजनार्थ क्षेत्रे किंवा हद्दी** :

१) राज्य शासन किंवा यथास्थिती स्थानिक प्राधिकरण पुढील निकषांची पूर्तता करण्यासाठी, वस्तीनजीकच्या क्षेत्रांमध्ये किंवा हद्दीच्या आत नजीकची शाळा स्थापन करील :

(क) इयत्ता पहिली ते पाचवी यामध्ये शिकणाऱ्या बालकांबाबत वस्ती नजीकच्या एक किलोमीटर एवढ्या चालत जाण्यायोग्य अंतराच्या आत व ६ ते ११ वर्षे वयोगटातील किमान २० बालके उपलब्ध असतील तेथे शाळा स्थापन केली जाईल;

(ख) इयत्ता सहावी ते आठवी यामध्ये शिकणाऱ्या बालकांबाबत, वस्तीनजीकच्या तीन किलोमीटर एवढ्या चालत जाण्यायोग्य अंतराच्या आत व इयत्ता ५ वी मध्ये किमान २० बालके उपलब्ध असतील तेथे शाळा स्थापन केली जाईल;

२) डोंगराळ क्षेत्राच्या बाबतीत किंवा दुर्गम क्षेत्रांच्या बाबतीत राज्य शासनास पोटनियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किमान अंतरामध्ये यथायोग्य बदल करता येईल आणि ज्यांना आपल्या शाळांमध्ये पुढील प्राथमिक शिक्षण घेण्याची सुविधा नाही अशा त्या क्षेत्रामधील बालकांकरिता, शासनाकडून किंवा स्थानिक प्राधिकरणाकडून चालविल्या जाणाऱ्या शाळा उपलब्ध करून देता येतील.

३) जेथे पोटनियम १) अंतर्गत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नजीकच्या शाळेच्या क्षेत्रांमध्ये किंवा हद्दीच्या आत शाळा उपलब्ध नाही अशा, राज्यशासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या लहान वाड्यांमधील बालकांकरिता आणि नियम ४ (१) (क) च्या कक्षेत येणाऱ्या बालकांकरिता राज्यशासन किंवा स्थानिक प्राधिकरण पोटनियम (१) अंतर्गत विनिर्दिष्ट केलेल्या हद्दी शिथिल करून, शाळेमध्ये प्राथमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ मोफत परिवहन, निवास सुविधा व अन्य सुविधा यांची पुरेशी व्यवस्था करील.

४) अधिकतम लोकसंख्या असलेल्या क्षेत्रांमध्ये (शहरी व निमशहरी क्षेत्रे) राज्यशासन किंवा स्थानिक प्राधिकरण, उक्त क्षेत्रातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांचे प्रमाण लक्षात घेऊन एकपेक्षा जास्त नजीकच्या शाळा स्थापन करील.

५) स्थानिक प्राधिकरण, प्रत्येक वसाहतीकरिता अथवा क्षेत्राकरिता एक नजीकची शाळा नेमून देईल आणि ते जनतेच्या माहितीकरिता प्रसिद्ध करील.

६) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १) यामध्ये व्याख्या करण्यात आलेल्या अशा ज्या विकलांग बालकांना शाळेत प्रवेश घेता येत नाही त्या बालकांबाबत राज्यशासन किंवा स्थानिक प्राधिकरण, त्या बालकांना शाळेत जाता यावे व प्राथमिक शिक्षण पूर्ण करता यावे या दृष्टीने, त्यांचे प्रमाण विचारात घेऊन यथोचित व सुरक्षित परिवहन व्यवस्था करील.

७) (क) शासन किंवा स्थानिक प्राधिकरण, कोणत्याही बालकास कोणत्याही कारणास्तव शाळेत जाण्यापासून रोध होणार नाही आणि त्याला किंवा तिला आपले प्राथमिक शिक्षण भाषिक, सामाजिक किंवा सांस्कृतिक भेदांमुळे पूर्ण करण्यात अडथळा येणार नाही याबद्दल खात्री करील;

(ख) नजीकच्या शाळेमध्ये शिक्षणाचे यथोचित माध्यम उपलब्ध असेल तर त्या शाळेत स्थलांतरित बालकांची नावनोंदणी करण्यात येईल;

(ग) नजीकच्या शाळेमध्ये शिक्षणाचे यथोचित माध्यम उपलब्ध नसेल तर, स्थानिक, प्राधिकरण, शाळेत हजर होण्यासाठी परिवहन सुविधा किंवा हंगामी निवासी वसतिगृह व अन्य सुविधा पुरविल.

**(५) कलमे ८ व ९ यांच्या प्रयोजनार्थ राज्यशासन व स्थानिक प्राधिकरण यांची कर्तव्ये** :

१) कलम २ च्या खंड (ढ) च्या उप-खंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या, राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या शाळेमध्ये, कलम १२ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख) अनुसार कलम २ च्या खंड (ढ) च्या उप-खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शाळेमध्ये तसेच कलम १२ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग) अनुसार कलम २ च्या खंड (ढ) च्या उप-खंड (तीन) व (चार) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शाळेमध्ये हजर होणाऱ्या बालकास मोफत पाठ्यपुस्तके, लेखन साहित्य व गणवेश मिळण्यास ते हक्कदार असेल :

परंतु, विकलांग बालकास विशेष विद्याविषयक व मदत साहित्य देखील मोफत पुरविले जाईल.

**स्पष्टीकरण** : कलम १२ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख) अनुसार प्रवेश घेतलेल्या बालकांबाबत आणि कलम १२ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग) अनुसार प्रवेश घेतलेल्या बालकाबाबत मोफत साहित्य पुरविण्याची जबाबदारी अनुक्रमे कलम २ च्या खंड (ढ) च्या उप-खंड (दोन) मध्ये आणि कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (तीन) व (चार) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शाळेची असेल :

परंतु या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे शासनावर, आवश्यक शासन निर्णय प्रसिद्ध करून आणखी कोणत्याही विशिष्ट गटासाठी किंवा सर्व बालकांसाठी अशा प्रकारचे आणि कोणतेही अतिरिक्त असे हक्काचे साहित्य घोषित करण्यास निर्बंध घातला जातो, असा त्याचा अर्थ लावला जाणार नाही.

३) शासन व स्थानिक प्राधिकरण नजीकची शाळा स्थापन करण्याच्या प्रयोजनार्थ शासनाने या संदर्भात अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्यांनी करावयाच्या शाळेच्या नकाशा रेखनाबाबत हमी देईल आणि दुर्गम क्षेत्रामध्ये राहणारी बालके, विकलांग बालके, वंचित गटातील बालके, समाजाच्या दुर्बल घटकांतील बालके, शाळेत न जाणारी बालके, जी शाळा सोडून गेलेली आहेत अशी बालके यासह त्या क्षेत्रातील सर्व बालके निश्चित करण्यासाठी आणि त्याच्याविषयीची सांख्यिकीय माहिती मिळविण्यासाठी नियत दिनांकापासून एक वर्षाच्या आत आणि त्यानंतर प्रत्येक वर्षी सर्वेक्षण करील.

४) राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण कोणत्याही बालकास शाळेमध्ये जात, वर्ग, धर्म अथवा लिंग याविषयी अपशब्द वापरले जाणार नाहीत याची सुनिश्चिती करील.

५) कलम ८ चा खंड (ग) आणि कलम ९ चा खंड (ग) यांच्या प्रयोजनार्थ, राज्यशासन किंवा यथास्थिती, स्थानिक प्राधिकरण वंचित गटातील किंवा दुर्बल घटकातील किंवा शोषित घटकातील कोणत्याही बालकाबाबत वर्गामध्ये मधल्या वेळेच्या जेवणाच्या सुट्टीत, मैदानावर, पिण्याच्या पाण्याच्या, सामान्य सुविधा ठिकाणावर किंवा सामाईक प्रसाधन सुविधा वापरताना आणि प्रसाधनगृहे व वर्गखोल्या स्वच्छ करताना भेदभाव केला जाणार नाही अथवा त्या बालकास वेगळे ठेवले जाणार नाही, याची सुनिश्चिती करील.

**(६) कलम ९ च्या खंड (ध) च्या प्रयोजनांसाठी स्थानिक प्राधिकरणाने बालकांचा अभिलेख ठेवणे** :

१) स्थानिक प्राधिकरण अभिलेख व्यवस्था पद्धती विकसित करील आणि या संदर्भात शासनाने अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्याने घरोघरी जाऊन करावयाच्या सर्वेक्षणामार्फत किंवा शाळेची नोंदवही आणि/किंवा केंद्रित गटातील चर्चा यांसारख्या साधनांमार्फत, आपल्या अधिकारक्षेत्रातील सर्व बालकांचा, त्यांच्या जन्मापासून ते ती १४ वर्षे वयाची होईपर्यंतचा सर्व अभिलेख ठेवील.

२) पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला अभिलेख प्रत्येक वर्षी अद्ययावत केला जाईल.

३) पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला अभिलेख, पारदर्शकरीतीने ठेवण्यात येईल. सरकारी जागेमध्ये ठेवला जाईल आणि कलम ९ च्या खंड (ड) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी व कलम ८ अनुसार विशेष प्रशिक्षणाच्या प्रयोजनांसाठी वापरण्यात येईल.

४) पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अभिलेखामध्ये प्रत्येक बालकाबाबतची पुढील माहिती अंतर्भूत असेल,

(क) नाव, लिंग, जन्मदिनांक (असल्यास जन्म प्रमाणपत्र क्रमांक), जन्मठिकाण;

(ख) माता-पित्याचे किंवा पालकाचे नाव, पत्ता, व्यवसाय बालकाशी असलेले नाते;

(ग) बालकाने वयाच्या सहाव्या वर्षांपर्यंत हजेरी लावलेली पूर्व-प्राथमिक शाळा अथवा अंगणवाडी केंद्र (ठिकाणाच्या तपशीलासह)

(घ) ज्या प्राथमिक शाळेमध्ये बालकाने प्रवेश घेतलेला असेल त्या शाळेचे नाव, पत्ता इत्यादींसह तिचा तपशील;

(ङ) बालकाचा कायमचा आणि सध्याचा निवासाचा पत्ता;

(च) ज्या वर्गात बालक शिकत असेल तो वर्ग (६ ते १४ वर्षे वयोगटातील बालके) आणि जर स्थानिक प्राधिकरणाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात शिक्षणामध्ये खंड पडला असेल तर, असा खंड पडण्यामागील कारण;

(छ) अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ड) च्या अर्थांतर्गत बालक दुर्बल घटकातील आहे किंवा कसे (असल्यास, तपशील देणे);

(ज) अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ध) च्या अर्थांतर्गत बालक वंचित गटातील आहे किंवा कसे (असल्यास, तपशील देणे);

(झ) स्थलांतर, विरळ लोकवस्ती, वयानुरूप प्रवेश, विकलांगता, परिवहन सुविधा, घरी जाऊन शिक्षण देणे, या कारणांमुळे बालकांकरिता पुरविणे आवश्यक असलेल्या विशेष सुविधांचा अथवा निवासविषयक सुविधांचा तपशील.

५) (क) शाळा सोडून गेलेल्या किंवा एक महिन्यापेक्षा अधिक काळ गैरहजर राहिलेल्या बालकांना शोधून काढण्यासाठीचे एक साधन म्हणून पद्धती विकसित करण्यात येईल.

(ख) स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेत येणाऱ्या क्षेत्रामधील ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांची नावे, पहिले व दुसरे सत्र सुरू होण्याआगोदर प्रत्येक शाळेत जाहीरपणे प्रदर्शित केलेली आहेत याबद्दल स्थानिक प्राधिकरण सुनिश्चिती करील.

**स्पष्टीकरण** : विकलांग व्यक्तींसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १) याच्या कलम २ ची पोटकलमे (२६) व (२७) यांच्या प्रयोजनार्थ, विकलांग बालके १८ वर्षे वयाची होईपर्यंत प्रत्येक वर्षी त्यांच्याविषयी माहिती मिळवणे आवश्यक राहील.

## भाग – चार
## शाळा व शिक्षक यांच्या जबाबदाऱ्या

**(७) कलम १२ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग) च्या प्रयोजनांसाठी दुर्बल घटकातील व वंचित गटातील बालकांना प्रवेश देणे** :

१) कलम २ च्या खंड (ढ) च्या उपखंड (तीन) व (चार) मध्ये निर्दिष्ट केलेल्या म्हणजेच विनिर्दिष्ट प्रवर्गातील शाळा अथवा कोणत्याही प्रकारचे सहाय्य व अनुदान न मिळणाऱ्या विना-अनुदानित शाळा, या गोष्टींची सुनिश्चिती करतील की, कलम १२ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग) अनुसार प्रवेश दिलेल्या बालकांना सापत्नभावाची वागणूक दिली जाणार नाही त्यांना वर्गामध्ये इतर बालकांपासून वेगळे ठेवले जाणार नाही अथवा त्यांचे वर्ग इतर बालकांसाठी भरवण्यात येणाऱ्या वर्गाच्या ठिकाणांपेक्षा व वेळेपेक्षा वेगळ्या ठिकाणी व वेळी भरवण्यात येणार

नाहीत, त्यांच्याकरिता व इतर बालकांकरिता जादा वर्गाव्यतिरिक्त कोणतेही कार्यक्रम स्वतंत्रपणे राबविण्यात येणार नाहीत.

२) कलम २ च्या पोटकलम (ढ) च्या खंड (तीन) व (चार) मध्ये निर्दिष्ट केलेल्या म्हणजेच विनिर्दिष्ट प्रवर्गातील शाळा किंवा कोणत्याही प्रकारचे सहाय्य वा अनुदान न मिळणाऱ्या विना–अनुदानित शाळा या गोष्टींची सुनिश्चिती करतील की, कलम १२ च्या पोटकलम (१)च्या खंड (ग) अनुसार प्रवेश दिलेल्या बालकांना हक्काचे मोफत साहित्य आणि पाठ्यपुस्तके, गणवेश, ग्रंथालय यासारख्या सुविधा, माहिती व तंत्रज्ञान सुविधा, पाठ्येतर कार्यक्रम व खेळ या बाबींसंबंधात कोणत्याही प्रकारे इतर बालकांपेक्षा वेगळी वागणूक दिली जाणार नाही.

३) नियम ४ च्या पोटनियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली नजीकच्या शाळांची क्षेत्रे किंवा हद्‌दी कलम १२ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग) अनुसार देण्यात येणाऱ्या प्रवेशांना लागू असतील.

परंतु, कलम १२ च्या पोटकलम (१) च्या खंड (ग) मध्ये निर्दिष्ट केलेली बालकांसाठीच्या जागांची आवश्यक टक्केवारी भरून काढण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यकता भासल्यास, शाळा शासनाच्या पूर्व मान्यतेने ती मर्यादा वाढवील.

**(८) कलम १२ च्या पोटकलम (२) च्या प्रयोजनांसाठी प्रत्येक बालकामागे केलेल्या खर्चाची राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती** :

१) राज्यशासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या त्याच्या मालकीच्या अथवा याचे नियंत्रण असलेल्या सर्व शाळांच्या बाबतीत, प्राथमिक शिक्षणाकरिता किंवा शासनाच्या स्वतःच्या निधीतून केंद्र सरकाने अथवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाने पुरविलेल्या निधीतून शासनाने केलेला एकूण वार्षिक आवर्ती खर्च, भागिले, अशा सर्व शाळांमध्ये पटनोंदणी केलेल्या बालकांची एकूण संख्या म्हणजे शासनाने प्रत्येक बालकामागे केलेला खर्च होय.

**स्पष्टीकरण** : प्रत्येक बालकामागील खर्च ठरविण्याच्या प्रयोजनाकरिता, कलम २ च्या पोटकलम (ढ) च्या खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शाळा जसे विनिर्दिष्ट प्रवर्गातील शाळा अथवा कोणत्याही प्रकारचे सहाय्य वा अनुदान न मिळणाऱ्या शाळा आणि अशा शाळांमध्ये पटनोंदणी केलेली बालके यावर शासनाने अथवा स्थानिक प्राधिकरणाने केलेल्या खर्चाचा अंतर्भाव केला जाणार नाही.

२) कलम २ च्या पोटकलम (ढ) च्या खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेली प्रत्येक शाळा जसे विनिर्दिष्ट प्रवर्गातील शाळा अथवा कोणत्याही प्रकारचे सहाय्य वा अनुदान न मिळणाऱ्या शाळा, कलम १२ च्या पोटकलम (२) अन्वये तिला प्रतिपूर्ती म्हणून मिळालेल्या रकमेच्या बाबतीत एक स्वतंत्र बँक खाते ठेवील प्रतिपूर्तीची रक्कम की, शाळेने प्रत्येक बालकामागे केलेल्या खर्चाची प्रत्यक्ष रक्कम आणि पोटनियम (१) अन्वये तरतूद केलेली प्रत्येक बालकामागील खर्चाची रक्कम यापैकी जी कमी असेल तेवढ्या रकमेएवढी असेल.

**(९) कलम १४ च्या प्रयोजनार्थ वयाचा पुरावा म्हणून स्वीकार करण्याजोगे दस्तावेज** :

जेथे जेथे, जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (१९६९ चा १८) अन्वये जन्माचा दाखला उपलब्ध नसेल तेथे तेथे, पुढील दस्तावेजांपैकी कोणताही एक दस्तावेज हा शाळांमध्ये प्रवेश घेण्याच्या प्रयोजनांसाठी बालकाच्या वयाचा पुरावा असल्याचे मानण्यात येईल :

(क) बालकाच्या जन्म ठिकाणाच्या संबंधात रुग्णालयाने किंवा सहाय्यकारी परिचारिका व प्रसाविका यांनी केलेली नोंद किंवा ठेवलेला अभिलेख;

(ख) अंगणवाडी अभिलेख;

(ग) हा अभिलेख उपलब्ध नसेल तर, वंचित गटातील किंवा दुर्बल घटकातील बालकाच्या बाबतीत जन्मदिनांक नमूद करणारे बालकाच्या एकतर मातेचे किंवा पित्याचे प्रतिज्ञापत्र, गावच्या सरपंचाने किंवा स्थानिक शाळेच्या मुख्याध्यापकाने किंवा शहरी वा निमशहरी क्षेत्राच्या बाबतीत शासनाने या सबंधात अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले आई–वडिलांचे किंवा पालकाचे बालकाच्या वयाचे प्रतिज्ञापत्र.

**स्पष्टीकरण** : अशा बाबतीत, बालकाला शाळेत प्रवेश देणाऱ्या अधिकाऱ्याहून वरिष्ठ दर्जाचा अधिकारी, जन्माच्या दाखल्याऐवजी स्वीकार करण्याजोगे बालकाचे इतर दस्तावेज हे वस्तुतः मिळू शकत नाहीत याची खातरजमा करील.

**(१०) कलम १५ च्या प्रयोजनार्थ, प्रवेशासाठी वाढीव कालावधी** :

१) प्रवेशाचा वाढीव कालावधी हा, शाळेचे विद्याविषयक वर्ष सुरू होण्याच्या दिनांकापासून पहिले सत्र संपण्यापूर्वीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत असेल.

२) वाढीव कालावधीपर्यंत संपल्यानंतरदेखील बालकाला शाळेत दाखल करून घेता येईल. तथापि तो किंवा ती, शाळेच्या प्रमुखाने निर्धारित करावयाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने, नियम ३ खाली तयार केलेल्या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत विशेष प्रशिक्षणाच्या मदतीने अभ्यास पूर्ण करण्यास हक्कदार असेल.

**(११) कलम १८ च्या प्रयोजनार्थ, शाळांची मान्यता** :

१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या शाळेव्यतिरिक्त स्थापन केलेली प्रत्येक शाळा (किंवा जिल्हा शासनाची परवानगी मिळाली आहे किंवा मान्यता मिळाली आहे अशी कोणतीही शाळा) **या नियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या कालावधीत,** त्याच्या अनुपालनाच्या किंवा अन्यथा अनुसूचीमध्ये विहित केलेल्या मानकांच्या व प्रमाणकांच्या संबंधात, संबंधित जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे नमुना क्र. १ मधील स्वतःचे प्रतिज्ञापत्र करील आणि ती शाळा पुढील शर्ती पूर्ण करील. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर देखील शासनाच्या मान्यतेशिवाय व परवानगीशिवाय शाळा चालविण्यात येत असेल तर, त्या शाळेस अधिनियमाच्या कलम १८(५) अन्वये द्रव्यदंडाची शिक्षा आणि तसेच तिला कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल.

**शर्ती** : (क) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) अन्वये किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० (१९५० चा मुंबई २४) अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेकडून शाळा चालविणे;

(ख) कोणत्याही व्यक्तीच्या, व्यक्तींच्या गटाच्या किंवा संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या लाभासाठी शाळा न चालविणे;

(ग) शाळा, भारताच्या संविधानातील अधिष्ठित मूल्यांशी सुसंगत असणे;

(घ) शालेय इमारती व इतर संरचना तसेच क्रीडांगणे ही केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनांसाठी वापरणे;

(ड) शाळा ही, राज्य शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या तपासणीसाठी खुली असणे;

(च) शाळेने, शिक्षण संचालक किंवा जिल्हा शिक्षणाधिकारी यांना वेळोवेळी आवश्यक असतील असे अहवाल व माहिती सादर करणे व शाळेच्या मान्यतेसंबंधातील शर्तींची सातत्याने परिपूर्ती करण्यासाठी व शाळेच्या कामकाजातील उणिवा दूर करण्यासाठी निर्गमित करण्यात येतील अशा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या सूचनांचे अनुपालन करणे;

२) नमुना–१ मध्ये मिळालेले प्रत्येक स्वयं प्रतिज्ञापन, जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडून ते मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत, सूचना फलक, संकेतस्थळ इत्यादींवर प्रदर्शित करून सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येईल.

३) जिल्हा शिक्षणाधिकारी, स्वयं प्रतिज्ञापन मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत अनुसूचीमध्ये विहित केलेली मानके व प्रमाणके आणि पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या शर्ती यांची परिपूर्ती करण्यासाठी ज्या शाळांनी नमुना–१ मध्ये दावा सांगितला असेल अशा शाळांची जागेवर जाऊन तपासणी करील. उक्त अधिकारी, एकतर स्वतः किंवा त्याला दुय्यम असलेल्या अधिकाऱ्यामार्फत अशा परिपूर्तीबाबत पडताळणी करील आणि विहित नमुन्यामध्ये अहवाल तयार करील.

४) पोटनियम (३) मध्ये निर्देश केलेली तपासणी पार पाडल्यानंतर, जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडून तपासणी अहवाल सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येईल आणि अनुसूचीमध्ये विहित केलेली मानके, प्रमाणके व शर्ती यांच्याशी अनुरूप असल्याचे आढळून आलेल्या शाळांना, जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडून, तपासणीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत, नमुना २ मध्ये मान्यता देण्यात येईल.

५) ज्या शाळा, अनुसूचीमध्ये विहित केलेल्या मानकांशी व पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या शर्तींशी अनुरूप नसतील त्या शाळांची, जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडून, तशा आशयाच्या शासकीय/जाहीर आदेशाद्वारे, सूची तयार करण्यात येईल आणि नंतरच्या अडीच वर्षांमधील कोणत्याही वेळी पोटनियम (३) खालील अहवाल, अशा शाळांच्या प्राधिकाऱ्यांना सादर केल्यानंतर, त्या शाळांना मान्यता मिळण्याकरिता प्रत्यक्ष जागेवर येऊन तपासणी करण्यासाठी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

६) ज्या शाळा, या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीन वर्षानंतर, अनुसूचीमध्ये विहित केलेली मानके व प्रमाणके आणि पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या शर्ती यांचे अनुपालन करण्यात कसूर करतील त्या शाळा कार्य करण्याचे बंद होतील.

७) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या शाळेव्यतिरिक्त स्थापन झालेली प्रत्येक शाळा (किंवा जिल्हा शासनाची परवानगी मिळाली आहे किंवा मान्यता मिळाली आहे अशी कोणतीही शाळा) मान्यतेकरिता अर्हता ठरण्यासाठी अनुसूचीमध्ये विहित केलेली मानके व प्रमाणके आणि पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या शर्ती यांचे अनुपालन करील. राज्य शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने स्थापन केलेल्या, त्यांची मालकी असलेल्या किंवा नियंत्रण असलेल्या शाळा, या अधिनियमाच्या प्रारंभापासून ३ वर्षाच्या कालावधीत अनुसूचीमध्ये विहित केलेली मानके व प्रमाणके आणि पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या शर्ती यांचे अनुपालन करतील याची खातरजमा करणे ही राज्यशासनाची जबाबदारी असेल.

८) शाळांना मान्यता देणे किंवा नाकारणे या संबंधातील शासनाचे सर्व प्रचलित नियम यापुढेही अंमलात असतील. तसेच जेथे, शाळेच्या नकाशा रेखनाच्या आधारावर, शाळेची प्रत्यक्ष गरज असल्याचे आढळून आले असेल केवळ त्याच ठिकाणी, जर शाळांनी, अनुसूचीमध्ये विहित केलेल्या आवश्यक मानके व प्रमाणके आणि पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या शर्ती यांचे अनुपालन केले असेल तर त्या शाळांना मान्यता किंवा परवानगी देण्यात येईल.

९) स्थानिक प्राधिकरणांनी चालवलेल्या शाळांमधील पायाभूत सुविधांचा दर्जा व शिक्षणाचा दर्जा सुधारण्यामध्ये अशासकीय संघटना व इतर संस्था यांना सहभागी करून घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल.

१०) शिक्षकांसाठी व शाळांसाठी सर्वंकष मूल्यमापन पद्धतीची अंमलबजावणी करण्यात येईल हे मूल्यमापन, स्वयं– मूल्यमापन, सूक्ष्म मूल्यमापन इत्यादींसारख्या विविध मार्गांनी करण्यात येईल. बाह्य मूल्यमापनदेखील नियतकालाने करण्यात येईल व अशा दोन मूल्यमापनांमध्ये निघून गेलेला कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल.

**(१२) कलमे (१२)३ व १८(३) च्या प्रयोजनार्थ शाळांची मान्यता काढून घेणे :**

१) जेथे, जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यास स्वतःहून किंवा कोणत्याही व्यक्तीकडून मिळालेल्या कोणत्याही निवेदनावरुन, कलम १२ खाली मान्यता मिळालेल्या शाळेने, मान्यता मिळण्यासाठीच्या एका किंवा अनेक शर्तींचे उल्लंघन केले असेल किंवा अनुसूचिमध्ये विहित केलेली मानके व प्रमाणके यांची परिपूर्ती करण्यास कसूर केली असेल असे मानण्यास कारण असेल तेथे, तो, त्याच्या समजुतीप्रमाणे कारणांची नोंद करील व त्यानंतर :

(क) मान्यता देण्याच्या शर्तींचा भंग केल्याचे विनिर्दिष्ट करून शाळेला एक नोटीस देईल व एका महिन्याच्या आत तिचे स्पष्टीकरण मागवील;

(ख) स्पष्टीकरण समाधानकारक असल्याचे आढळून आले नाही किंवा कोणतेही स्पष्टीकरण अटी घातलेल्या कालावधीत मिळाले नाही तरी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याला, शिक्षणतज्ज्ञ नागरी समाजातील प्रतिनिधी, प्रसारमाध्यमे व शासकीय प्रतिनिधी यांचा समावेश असणाऱ्या तीन ते पाच सदस्यांच्या समितीकडून शाळेची तपासणी करण्याची व्यवस्था करता येईल आणि ती समिती, योग्य चौकशी करील व मान्यता चालू ठेवण्यासाठीच्या किंवा मान्यता काढून घेण्यासाठीच्या आपल्या शिफारशींसह आपला अहवाल जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याला सादर करील;

(ग) जिल्हा शिक्षणाधिकारी, आपल्या अभिप्रायांसह तो अहवाल शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे व त्यांची एक प्रत, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगालाही पाठवील;

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, आपला निर्णय, शिक्षण संचालनालयामार्फत जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याला कळवील.

३) जिल्हा शिक्षणाधिकारी, शालेय विभाग व क्रीडा विभागाच्या निर्णयाच्या आधारे, शाळेला दिलेली मान्यता रद्द करणारा आदेश देईल. मान्यता रद्द करण्याचा आदेश, लगतनंतरच्या विद्याविषयक वर्षापासून अंमलात येईल आणि मान्यता रद्द केलेल्या शाळेतील बालकांना ज्या नजीकच्या शाळेत प्रवेश देण्यात येईल ती नजीकच्या शाळा विनिर्दिष्ट करील. जिल्हा शिक्षणाधिकारी, बालकांचा तपशीलवार माहितीसह प्रवेश द्यावयाच्या बालकांची सूची अगोदरच संबंधित नजीकच्या शाळांनाही देईल.

## भाग – पाच
## शाळा व्यवस्थापन समिती

**(१३) कलम २१ च्या प्रयोजनार्थ, शाळा व्यवस्थापन समितीची रचना व कार्ये :**

१) कायम विनाअनुदानित शाळेव्यतिरिक्त प्रत्येक शाळेत, नवीन विद्याविषयक वर्ष सुरू झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत, शाळेच्या क्षेत्र/हद्दीमध्ये एक शाळा व्यवस्थापन समिती घटित करण्यात येईल व ती प्रत्येक दोन वर्षांनी पुनर्घटित करण्यात येईल.

२) शाळा व्यवस्थापन समिती ही, इयत्ता १ली ते ८वी च्या वर्गासाठी (शाळा ज्या प्रशासकीय आकृतिबंधामध्ये) नमूद केलेली कार्य पार पाडील.

३) दोन विद्यार्थ्यांना, ज्यांपैकी किमान एक मुलगी असेल, सदस्य म्हणून स्वीकृत सदस्यांना मतदान करण्याचे अधिकार नसतील.

४) अशा समितीचे ५० टक्के सदस्य हे, महिला असतील.

५) शाळा व्यवस्थापन समितीच्या संख्येपैकी पंच्च्याहत्तर टक्के सदस्य हे, बालकांचे माता व पिता किंवा पालक यांच्यामधील असतील. त्यांची, शाळेत होणाऱ्या माता वा पित्यांच्या बैठकीमध्ये निवड केली जाईल किंवा त्यांना निवडून दिले जाईल.

६) दुर्बल व वंचित गटांतील बालकांच्या माता व पिता यांना तसेच तीन वेगवेगळ्या स्तरांवर (उच्च, मध्यम व कमी) नैपुण्य दाखविणाऱ्या बालकांच्या माता वा पिता यांना सुद्धा पुरेसे प्रतिनिधित्व देण्यात येईल.

७) शाळा व्यवस्थापन समितीच्या संख्येपैकी उर्वरित पंचवीस टक्के सदस्य हे, स्थानिक प्राधिकरणाचे निवडून आलेले प्रतिनिधी, व्यवस्थापनाचे सदस्य, मुख्याध्यापक किंवा वरिष्ठ शिक्षक, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ किंवा बाल विकास तज्ज्ञ यांच्यामधून निवडले जातील.

८) शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी चालवलेल्या शाळांच्या बाबतीत, शाळा व्यवस्थापन समितीची अध्यक्षपदीय व्यक्ती, बालकांचे माता वा पिता यांच्यामधून निवडण्यात येईल. अनुदानित शाळांच्या बाबतीत, व्यवस्थापनाचा प्रतिनिधी अध्यक्षपदी असेल.

९) शाळेचा मुख्याध्यापक किंवा ज्या शाळेत मुख्याध्यापक नसेल तेथे शाळेचा वरिष्ठतम शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचा पदसिद्ध सदस्य–सचिव असेल आणि निवडणुकीसंबंधातील सर्व काम पार पाडील तो किंवा ती शाळा व्यवस्थापन समितीच्या मासिक बैठकी घेण्यासाठी जबाबदारदेखील असेल.

१०) शाळा व्यवस्थापन समिती महिन्यातून किमान एक बैठक घेईल आणि बैठकीची कार्यवृत्ते व निर्णय यांच्या योग्यप्रकारे नोंदी ठेवण्यात येतील व त्या जनतेसाठी उपलब्ध करण्यात येतील.

११) शाळा व्यवस्थापन समिती, ही एकतर स्वतः किंवा तिच्या उप–समित्यांमार्फत, कलम २१ च्या पोटकलम (२) च्या खंड (क) ते (घ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्याशिवाय पुढील कार्ये पार पाडील :

(क) अधिनियमामध्ये सांगितलेल्या बालकाचा हक्क तसेच राज्यशासन, स्थानिक प्राधिकरण, शाळा, माता वा पिता आणि पालक यांची कर्तव्ये यांविषयी शाळेच्या नजीक राहणाऱ्या जनतेला सोप्या व कल्पक मार्गाने माहिती कळविणे.

(ख) कलम २४ पोटकलम (१) चे खंड (क) आणि (ड) व कलम २८ यांच्या अंमलबजावणीची खातरजमा करणे.

(ग) कलम २७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कर्तव्याखेरीज इतर अशैक्षणिक कर्तव्ये शिक्षकांवर लादली जात नाहीत याचे संनियंत्रण करणे.

(घ) नजीकच्या शाळेत सर्व बालके नाव नोंदणी करतील व सातत्याने उपस्थित राहतील याची खातरजमा करणे.

(ड) अनुसूचीमध्ये विहित केलेली मानके व प्रमाणके यांचे पालन केले जाते किंवा कसे यावर संनियंत्रण ठेवणे.

(च) बालकाच्या हक्कांमधील, विशेष करून बालकांचा मानसिक व शारीरिक छळ, प्रवेश नाकारणे आणि कलम ३ च्या पोटकलम (२) नुसार मोफत हक्कांविषयीची उचित तरतूद यांमधील कोणतेही बदल स्थानिक प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देणे;

(छ) कलम ४ च्या प्रयोजनांसाठी, गरजा निश्चित करणे, योजना तयार करणे आणि अमंलबजावणीबाबत संनियंत्रण करणे;

(ज) विकलांग बालके ओळखणे व त्यांची नाव नोंदणी यावर संनियंत्रण ठेवणे आणि अध्ययन साहित्य व इतर सुविधा यांची उपलब्धता करणे व प्राथमिक शिक्षणातील त्यांच्या सहभागाची व प्राथमिक शिक्षण पूर्ण करीत असल्याबाबतची खातरजमा करणे;

(झ) शाळेतील माध्यान्ह भोजन व इतर शासकीय योजना यांच्या अंमलबजावणीबाबत सनियंत्रण ठेवणे;

(ञ) शाळेच्या जमा व खर्चाचा वार्षिक लेखा तयार करण्याची व्यवस्था करणे.

(ट) शाळेत स्थापन केलेल्या बाल पंचायतींच्या अहवालाद्वारे बालकांचे मत जाणून घेणे;

**(१४) कलम २२ च्या प्रयोजनासाठी, शाळा विकास योजना तयार करणे** :

१) शाळा व्यवस्थापन समिती ही अधिनियमान्वये ज्या वित्तीय वर्षात ती पहिल्यांदा घटित करण्यात आली असेल ते वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी किमान तीन महिने अगोदर एक शाळा विकास योजना तयार करील.

२) शाळा विकास योजनेमध्ये, तीन वार्षिक उपयोजनांसह एक त्रिवार्षिक योजना असेल.

३) शाळा विकास योजनेत पुढील तपशील अंतर्भूत असतील.

(क) प्रत्येक वर्षासाठी, वर्गनिहाय नाव नोंदणीचे अंदाज;

(ख) उक्त अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांनुसार, इयत्ता पहिली ते पाचवी आणि इयत्ता सहावी ते आठवीसाठी स्वतंत्रपणे विचारात घेतलेल्या इतर नियुक्त्यांखेरीज प्रमुख शिक्षक, विषय शिक्षक व अर्धवेळ शिक्षक यांच्यासह अतिरिक्त शिक्षकांची, तीन वर्षांच्यावरील कालावधीसाठी, आवश्यक संख्या;

(ग) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व प्रमाणके यांनुसार, तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी, विचारात घेतलेल्या व अद्ययावत असलेल्या आवश्यक त्या अतिरिक्त पायाभूत सुविधा व साधनसामग्री;

(घ) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेली विशेष प्रशिक्षण सुविधा पुरविण्याची अतिरिक्त गरज, मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश अशांसारखे बालकांचे हक्क यांसहित वरील खंड (ख) आणि (ग) यांच्या संबंधात, तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधीकरिता वर्ष-निहाय अतिरिक्त वित्तीय गरजा आणि अधिनियमान्वये शाळेच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी इतर कोणत्याही अतिरिक्त गरजा;

(ड) शाळेत न जाणाऱ्या बालकांसाठी विशेष प्रशिक्षणाची व्यवस्था करण्याकरिता व शिक्षकांची वाढीव दीर्घ रजा, प्रसूति रजा, विशेष रजा, सवलती या कालावधीमध्ये अतिरिक्त शिक्षकांची आवश्यकता.

(च) दुर्बल घटक, वंचित घटक यांमधील बालकांसाठी व विकलांग बालकांसाठी शैक्षणिक पुनर्वसन व्यवस्था.

४) शाळा विकास योजनेवर, शाळा व्यवस्थापन समितीची अध्यक्षपदीय व्यक्ती, उपाध्यक्षपदी असलेली व्यक्ती व सदस्य-सचिव यांची स्वाक्षरी असेल आणि ज्या वित्तीय वर्षात ती योजना तयार करावयाची असेल ते वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी स्थानिक प्राधिकरणाकडे सादर करण्यात येईल.

## भाग – सहा
## शिक्षक

**(१५) कलम २३(१) च्या प्रयोजनांसाठी किमान अर्हता :**

१) कलम २३ च्या पोटकलम (१) अनुसार अधिसूचित केलेले विद्याविषयक प्राधिकरण, अशा अधिसूचनेपासून तीन महिन्यांच्या आत, प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यासाठी पात्र असणाऱ्या व्यक्तींकरिता किमान अर्हता निर्धारित करील.

२) पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या विद्याविषयक प्राधिकरणाने निर्धारित केलेली किमान अर्हता, कलम २ च्या खंड (ढ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक शाळेला लागू असेल.

**(१६) कलम २३(२) च्या प्रयोजनांसाठी किमान अर्हता शिथिल करणे :**

शासन अधिनियमाच्या प्रारंभापासून सहा महिन्यांच्या आत कलम २ च्या खंड (ढ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सर्व शाळांसाठी, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मानकांनुसार राज्यात आवश्यक असलेल्या शिक्षकांचा आणि शिक्षकांचे शिक्षण या संबंधातील पाठ्यक्रम किंवा प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक असलेल्या संस्थांच्या संख्येचा अंदाज घेईल. जर, आवश्यक असलेल्या अंदाजित शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी अशा संस्थांची संख्या अपुरी असल्याचे आढळून आले असेल किंवा शिक्षकांच्या अंदाजित संख्येपेक्षा उपलब्ध शिक्षकांची संख्या कमी असेल तर, शासन, शिक्षक म्हणून नियुक्ती करण्यासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता शिथिल करण्याकरिता केंद्र सरकारला निवेदन देईल.

**(१७) कलम २३(२) च्या परंतुकान्वये किमान अर्हता संपादन करणे :**

१) शासन, कलम २ च्या खंड (ढ) चे उपखंड (एक) व (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व प्रकारच्या शाळांमधील जे शिक्षक, अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी, नियम १३ च्या पोटनियम (२) खाली निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करीत नसतील असे सर्व शिक्षक, अधिनियमाच्या प्रारंभापासून किंवा यथास्थिती कलम २३ च्या पोटकलम (२) नुसार त्यांच्या नियुक्त्यांच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीमध्ये अशी किमान अर्हता संपादन करतील याची खातरजमा करण्यासाठी, शासकीय अनुदानित व विनाअनुदानित शिक्षक प्रशिक्षण संस्थांच्या मदतीने, शिक्षक प्रशिक्षणाच्या पुरेशा सुविधा पुरवील.

**(१८) कलम २३(३) च्या प्रयोजनासाठी किंवा यथास्थिती शिक्षकांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या शर्ती :**

१) राज्य शासन, किंवा यथास्थिती स्थानिक प्राधिकरण केवळ शिक्षकांचा व्यावसायिक व कायमस्वरूपी संवर्ग तयार करण्यासाठी नोकरीस असलेल्या शिक्षकांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि वेतन व भत्ते विनिर्दिष्ट करील.

२) विशेषकरून पोटनियम (१) ला कोणतीही बाधा न आणता सेवेच्या अटी व शर्तीमध्ये पुढील मानके विचारात घेण्यात येतील :

(क) कलम २१ खाली घटित केलेल्या शाळा व्यवस्थापन समितीच्या संदर्भात शिक्षकांचे उत्तरदायित्व.

(ख) अध्यापनाच्या व्यवसायामध्ये दीर्घकालीन टिकून राहण्यास सहाय्यभूत ठरणाऱ्या तरतुदी.

**(१९) कलम २४(१) च्या खंड (ड) च्या प्रयोजनासाठी शिक्षकांनी पार पाडावयाची कर्तव्ये :**

१) कलम २४ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कर्तव्यांचे योग्यरितीने पालन करण्यासाठी आणि कलम २९ पोटकलम (२) च्या खंड (ज) मधील आवश्यकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने शिक्षक, प्रत्येक बालकासाठी, छात्राचे संकलित नोंदपत्रक अंतर्भूत असणारी एक फाईल ठेवील व ती कलम ३० च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेले पूर्णतः प्रमाणपत्र देण्यासाठी एक आधार असेल.

२) कलम २४ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) ते (ड) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यांव्यतिरिक्त शिक्षक, आपल्या नियमित अध्यापनात व्यत्यय येऊ न देता त्याला/तिला नेमून दिलेली पुढील कर्तव्ये पार पाडील :

(क) प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभाग घेणे.

(ख) अभ्यासक्रम विकसन, पाठ्यक्रम विकसन, प्रशिक्षण रचना, पाठ्यपुस्तके विकसन व मूल्यमापन प्रक्रिया विकसन यांमध्ये सहभाग घेणे.

(ग) परिसरातील शाळेत न जाणाऱ्या मुलांचा शोध घेणे व नजीकच्या शाळेत त्यांची नावनोंदणी करण्याची सुनिश्चिती करणे;

(घ) शाळेत नावनोंदणी झालेल्या बालकांच्या उपस्थितीबाबत सुनिश्चिती करणे.

**(२०) कलम २४(३) च्या प्रयोजनांसाठी शिक्षकांकरिता तक्रार निवारण यंत्रणा** :

१) जो, त्याच्या किंवा तिच्या सेवा शर्तींबाबत व्यवस्थापनाने घेतलेल्या कोणत्याही निर्णयाने पिडित असेल असा शिक्षक किंवा कर्मचारी याला, अथवा ज्यास –

(क) व्यवस्थापनाने दिलेल्या आदेशाद्वारे सेवेतून बडतर्फ करण्यात आले असेल किंवा पदावरून काढून टाकण्यात आले असेल किंवा ज्याची सेवा अन्यथा समाप्त करण्यात आली असेल किंवा ज्याचा दर्जा कमी करण्यात आला असेल; अथवा

(ख) कोणत्याही पदावर पदोन्नतीद्वारे नियुक्ती करतेवेळी व्यवस्थापनाकडून डावलण्यात आले असेल– अशा शिक्षकाला किंवा कर्मचाऱ्याला, अपील करण्याचा अधिकार असेल आणि अशा आदेशाच्या किंवा अधिक्रमणाच्या विरुद्ध त्याला, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. ३) याच्या कलम ८ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल.

२) अशाप्रकारे दाखल केलेल्या अपिलांचे, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. ३) याच्या कलमे ८, ९, १०, ११, १२, १३ व १४ च्या तरतुदी आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) नियम, १९८१ यांच्या नियम ३९ व ४३ यांद्वारे नियमन करण्यात येईल.

**(२१) कलम २५ च्या प्रयोजनांसाठी प्रत्येक शाळेमध्ये विद्यार्थी–शिक्षक प्रमाण राखणे** :

**१)** शासनास किंवा यथास्थिती, स्थानिक प्राधिकरणास **प्रत्येक वर्षाच्या ३१ जुलै रोजी,** मंजूर शिक्षक संख्येपेक्षा अधिक शिक्षक असलेल्या शाळांतील शिक्षकांची पुनर्नियुक्ती करता येईल.

(१) जर शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने अथवा कर्मचाऱ्याने कलम २५ च्या पोटकलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन केल्यास, तो किंवा ती शिस्तभंगाच्या कारवाईस व्यक्तिशः पात्र असेल.

## भाग – सात
## प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व तो पूर्ण करणे

**(२२) कलम २९ च्या प्रयोजनांसाठी विद्याविषयक प्राधिकरण** :

१) कलम २९ च्या प्रयोजनासाठी शासन विद्याविषयक प्राधिकरण अधिसूचित करील.

२) जिल्हा व गट स्तरावर शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने, शिक्षणतज्ज्ञ, अधिशिक्षक, विद्यैकनिष्ठ, तज्ज्ञ, संशोधक, अशासकीय संघटना, प्रायोगिक शाळा, माध्यमिक व प्राथमिक शिक्षक आणि इतर यांच्यातील सदस्यांना निमंत्रित करून अथवा निश्चित प्रक्रियेद्वारे त्यांची निवड करून, विद्याविषयक जिल्हा आणि गट साधन संघ स्थापन करण्यात येईल.

३) विद्याविषयक प्राधिकरण, अभ्यासक्रम आणि मूल्यमापन कार्यपद्धती विहित करील. हे प्राधिकरण प्रत्येक वर्गासाठी अध्ययन फलनिष्पत्ती विहित करील. ज्यामध्ये ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि वृत्ती यांचा समावेश असेल. अभ्यासक्रमात बालभवन, विज्ञान मेळावे, कलाजथ्ये, संगीत जथ्ये, क्रीडा संघ इत्यादींसारख्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हितावह असणाऱ्या उपक्रमांचादेखील समावेश केला जाईल.

४) विद्याविषयक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, पुणे (म.रा.पा.नि.अ.सं.मं.) यांच्या सहकार्याने पाठ्यपुस्तके तयार करतील आणि राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (रा.शै.तं.सं.), व बालचित्रवाणी, पुणे, यांच्या सहकार्याने इतर अध्यापन–अध्ययन पद्धती तयार करतील.

५) विद्याविषयक प्राधिकरण, शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबतचे विविधस्वरूपी कार्यक्रम विकसित करील. तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गट साधन केंद्रे, विद्याविषयक जिल्हा साधन संघ आणि विद्याविषयक गट साधन संघ इत्यादींमध्येदेखील ती क्षमता विकसित करील. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ठराविक कालावधीत शिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांचे मूल्यमापन करून त्यात आवश्यक त्या सुधारणा करील.

६) अर्थपूर्ण आणि नावीन्यपूर्ण शाळांना परवानगी देण्यासाठी विद्याविषयक प्राधिकरण, त्यांच्याकरिता मार्गदर्शक सूची तयार करील.

७) महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, (म.शै.नि.प्र.सं.) औरंगाबाद यांच्या सहयोगाने विद्याविषयक प्राधिकरण, सर्वांगीण शालेय गुणवत्ता निर्धारणाचा कार्यक्रम नियमितरित्या अवलंबिण्यासाठी तयार करील व गट स्तरावर गटशिक्षण अधिकारी विस्तार अधिकारी व गटसाधन संघ आणि विद्याविषयक प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येतील असे अन्यजण यांच्याकडून या कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाईल.

८) विद्याविषयक प्राधिकरणासह राज्यातील सर्व राज्य, जिल्हा आणि गट स्तरावरील शैक्षणिक संस्थांचे मूल्यमापन ठरावीक काळाने करण्यात येईल. हे मूल्यमापन ठरविल्याप्रमाणे अंतर्गत व बाह्य अभिकरणांकडून केले जाईल व अशा मूल्यमापनाचा अहवाल जनतेसाठी खुला ठेवला जाईल. दोन मूल्यमापनांमधील कालावधी पाच वर्षांपेक्षा जास्त असणार नाही.

**(२३) कलम ३० च्या प्रयोजनासाठी प्रमाणपत्र प्रदान करणे** :

१) प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र, शाळा किंवा गट किंवा जिल्हा स्तरावर असे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एक महिन्याच्या आत दिले जाईल.

२) पोटनियम (१) मध्ये निर्देशिलेल्या या प्रमाणपत्रात –

(क) कलम २९ मध्ये विहित केलेल्या अध्ययन पातळ्यांनुसार संबंधित बालकाने सर्व अभ्यास पाठ्यक्रम पूर्ण केल्याबाबत प्रमाणित केले जाईल.

(ख) बालकाच्या विद्यार्थी संकलित नोंदपत्रकाचा समावेश असेल आणि त्यामध्ये बालकाच्या विहित अभ्यास पाठ्यक्रम पलीकडील कृतीक्षेत्रांमधील संपादणूकदेखील विनिर्दिष्ट केलेली असेल. त्यामध्ये संगीत, नृत्य, साहित्य, क्रीडा इत्यादी यांमधील संपादणुकींचा उल्लेख असेल. या नोंदपत्रकाचा आराखडा महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद तयार करील.

## भाग – आठ
## बालकांच्या हक्कांचे संरक्षण

**(२४) कलम ३१ च्या प्रयोजनासाठी राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे कार्यपालन :**

१) राज्य बालहक्क संरक्षण आयोग बालकांसाठी एक हेल्पलाईन सुरू करील की, जिच्याशी एस.एम.एस., दूरध्वनी अथवा पत्राद्वारे किंवा अशा अन्य कोणत्याही सुविधेद्वारे त्यांना संपर्क करणे शक्य होईल. आयोग पिडित बालकांना किंवा त्यांच्या पालकांना तक्रार नोंदविण्यासाठी व्यासपीठ म्हणून काम करील. या अधिनियमाखालील हक्कांच्या उल्लंघनासंदर्भात अशाप्रकारे तक्रार नोंदवली जाईल की, तक्रारदाराच्या नावाची नोंद होईल पण ती जाहीर केली जाणार नाही.

**(२५) कलम ३४ च्या प्रयोजनासाठी राज्य सल्लागार परिषद घटित करणे आणि तिची कार्ये :**

१) राज्य सल्लागार परिषद एक अध्यक्ष व चौदा सदस्य मिळून बनलेली असेल.

२) शासनाचे शालेय शिक्षण मंत्री व शालेय शिक्षण राज्यमंत्री हे परिषदेचे अनुक्रमे अध्यक्ष व उपाध्यक्ष असतील.

३) परिषदेचे सदस्य हे, प्राथमिक शिक्षण व बालविकास या क्षेत्रातील ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तींमधून राज्य शासनाकडून पुढीलप्रमाणे नियुक्त करण्यात येतील :

(क) किमान चार सदस्य हे, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्याक यांच्यापैकी असावेत;

(ख) किमान एक सदस्य, विशेष गरजा असलेल्या मुलांकरिताच्या शिक्षणाचे विशेषीकृत ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तींपैकी असावा,

(ग) एक सदस्य , पूर्व–प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील विशेषीकृत ज्ञान असलेल्या व्यक्तींपैकी असावा,

(घ) किमान दोन सदस्य हे, अध्यापक शिक्षणाच्या क्षेत्रातील विशेषीकृत ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव असलेल्या व्यक्तींपैकी असावेत;

(ड) अशा सदस्यांच्या पन्नास टक्के सदस्य महिला असाव्यात.

४) शासनाचे शालेय शिक्षण (ड) विभाग, परिषदेच्या बैठकीसाठी आणि तिच्या अन्य कार्यांसाठी प्रमाणबद्ध सहकार्य देईल.

५) परिषदेचे कामकाज करण्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे असेल :

(एक) अध्यक्षाला योग्य वाटेल अशा वेळी परिषदेच्या बैठका नियमितपणे होतील. परंतु तिच्या शेवटच्या आणि पुढच्या बैठकीमध्ये तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटलेला असणार नाही.

(दोन) परिषदेची बैठक अध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली होईल. कोणत्याही कारणासाठी जर अध्यक्ष परिषदेच्या बैठकीस उपस्थित राहू शकला नाही तर तो आपल्यावतीने परिषदेच्या उपाध्यक्षास त्या बैठकीचा अध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करील. परिषदेच्या बैठकीस किमान ५० टक्के सदस्य उपस्थित असल्यास त्या बैठकीची गणपूर्ती झालेली आहे, असे समजले जाईल.

६) परिषदेच्या सदस्यांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे असतील :

(क) प्रत्येक अशासकीय सदस्य, ज्या दिनांकास तो पदग्रहण करील, त्या दिनांकापासून दोन वर्षांच्या मुदतीकरिता पदावर राहील.

परंतु कोणताही सदस्य दोन मुदतींच्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीसाठी पदावर राहणार नाही.

(ख) एखाद्या सदस्याबाबत सिद्ध झालेल्या गैरवर्तणुकीच्या अथवा अक्षमतेच्या कारणावरून किंवा पुढीलपैकी एक अथवा अनेक घटना घडल्या तर शासनाच्या आदेशानुसार त्या सदस्यास पदावरून काढून टाकता येईल :

१) त्याला दिवाळखोर घोषित केला असल्यास, किंवा

२) काम करणे नाकारल्यास किंवा तो काम करण्यास लायक नसल्यास, किंवा

३) तो विकल मनाचा असल्यास आणि सक्षम न्यायालयाने तसे घोषित केल्यास,

४) त्याने पदाचा गैरवापर केल्याने सार्वजनिक हिताच्या दृष्टीने त्याचे पदावर राहणे हितावह नसल्यास, किंवा

५) सक्षम न्यायालयाने त्याला नैतिक अधःपतनाच्या गुन्ह्यात दोषी ठरविलेले असल्यास किंवा

६) परिषदेकडून बैठकींना अनुपस्थित राहण्याची संमती घेतल्याशिवाय तो सलग दोन बैठकींना अनुपस्थित राहिला असल्यास.

(ग) कोणत्याही सदस्यास बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय पदावरून काढून टाकले जाणार नाही.

७) समित्यांच्या अथवा आयोगांच्या अ-शासकीय सदस्यांच्या आणि अशा अन्य प्रवर्गांतील व्यक्तींच्या संबंधात शासनाने काढलेल्या आदेशांने अनुसरून परिषदेचे सदस्य हे कार्यालयीन दौरा आणि प्रवासासाठी प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र असतील.

**परिशिष्ट - दोन**

## नमुना - १

## शाळा मान्यतेसाठी स्व-प्रतिज्ञा पत्र व अर्ज

**(पहा नियम ११ चा पोटनियम (१))**

प्रति,
जिल्हा शिक्षणाधिकारी
जिल्ह्याचे व राज्याचे नाव
महोदय/महोदया,

मी, सन २०________________ या शालेय वर्षांच्या प्रारंभापासून ________________ स (शाळेचे नाव) मान्यता मिळण्यासाठी, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या अनुसूचीमध्ये विहित केलेली मानके व प्रमाणके यांच्या अनुपालनासंबंधात एक प्रतिज्ञापत्र व प्रपत्रातील अर्ज यासोबत पाठवत आहे.

सहपत्रे :

ठिकाण :

दिनांक :

**आपला विश्वासू,**

**अध्यक्ष /व्यवस्थापक**

**शाळा व्यवस्थापन समिती**

**क) शाळेचा तपशील** :

१) शाळेचे नांव

२) पत्रव्यवहाराचा पत्ता

३) गाव/शहर

४) तालुका

५) जिल्हा

६) पिनकोड

७) दूरध्वनी क्रमांक (एस.टी.डी. कोडसह)

८) ई–मेल (असल्यास)

९) फॅक्स क्रमांक

१०) जवळच्या पोलीस ठाण्याचे नाव

**ख) सर्वसाधारण माहिती** :

१) शाळा स्थापना वर्ष

२) शाळा प्रथमतः सुरू केल्याचा दिनांक

३) शाळेचे विद्याविषयक सत्र

४) शाळेची वेळ–पूर्ण वेळ

५) शाळेची वेळ– अर्धवेळ

प्रत्येक वर्गासाठी विद्याविषयक शिक्षणाची वेळ

६) प्रत्येक वर्गासाठी माध्यान्ह भोजनाची वेळ

७) प्रत्येक वर्गासाठी क्रीडा व शारीरिक शिक्षणाची वेळ

८) न्यास/सोसायटी/व्यवस्थापन समितीचे नाव

९) नोंदणी क्रमांक

(क) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये

(ख) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये

१०) न्यास/सोसायटी/व्यवस्थापन समिती यांची नोंदणी कोणत्या कालावधीपर्यंत वैध आहे?

११) न्यास/सोसायटी/व्यवस्थापन समिती ही खाजगी मालकीची नसल्याबाबत पुरावा आहे का? संस्था खाजगी मालकीची नसल्यास प्रतिज्ञा पत्रावर सदस्यांच्या पत्त्यांसह त्यांच्या यादीची एक प्रत सोबत जोडावी.

१२) शाळेचे व्यवस्थापक, अध्यक्ष, सचिव यांचे नाव व कार्यालयीन पत्ता

| **नाव** | **पदनाम** | **पत्ता** | **दूरध्वनी क्रमांक (कार्यालय/ निवास)** |
|---|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** | **(४)** |
| | | | |

१३) मागील तीन वर्षातील एकूण उत्पन्न व खर्च तसेच शिल्लक किंवा तूट :

| **वर्ष** | **उत्पन्न** | **खर्च** | **शिल्लक/तूट** |
|---|---|---|---|
| **(१)** | **(२)** | **(३)** | **(४)** |
| | | | |

**ग) शाळेचे स्वरूप आणि क्षेत्र** :

१) शिक्षणाचे माध्यम

२) शाळेचा प्रकार

३) कितवीपासून कितवीपर्यंत वर्ग आहेत, नमूद करा.

४) शाळा अनुदानित असल्यास, अनुदानाचे प्रमाण व अनुदान देणाऱ्या अभिकरणाचे नाव

५) शाळा मान्यताप्राप्त आहे का?

६) मान्यता असल्यास, मान्यता देणारा प्राधिकारी, मान्यता क्रमांक

७) शालेय इमारत स्वतःच्या मालकीची आहे किंवा ती भाड्याच्या इमारतीत चालविली जाते का?

८) शालेय इमारत किंवा इतर सुविधा वा क्रीडांगणे ही केवळ शैक्षणिक आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी वापरली जातात का?

९) शाळेचे एकूण क्षेत्रफळ (चौरस मीटरमध्ये)

१०) बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ (चौरस मीटरमध्ये)

११) वर्गखोल्यांची एकूण संख्या

१२) अध्यापनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनांसाठी वापरल्या जाणाऱ्या खोल्यांची संख्या

१३) क्रीडांगणाचे क्षेत्रफळ (चौरस मीटरमध्ये)

**घ) पटनोंदणी** :

| **तपशील** | **इयत्ता** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ ली | २ री | ३ री | ४ थी | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी |
| विद्यार्थी संख्या | | | | | | | | |
| तुकड्यांची संख्या | | | | | | | | |
| मंजूर शिक्षक संख्या | | | | | | | | |

उपरोक्त शिक्षकांव्यतिरिक्त मुख्याध्यापकाचे पद असेल तर त्यांचे नाव व शैक्षणिक अर्हता द्यावी.

**ड) भौतिक सुविधांचा तपशील व वेतन स्थिती :**

| अ. क्र. | खोल्या | संख्या | सरासरी आकार |
|---|---|---|---|
| १. | वर्गखोली | | |
| २. | कार्यालय खोली/सामान खोली/मुख्याध्यापक खोली | | |
| ३. | स्वयंपाक घर/भांडार | | |
| ४. | मुलामुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह, प्रसाधनगृहांच्या स्वच्छ व आरोग्यदायी स्थितीत वापर करण्यासाठी व त्यांची देखभाल करण्यासाठी पुरेशा पाण्याची सुविधा | | |
| ५. | पिण्याच्या पाण्याची सुविधा | | |

या सुविधांची उपलब्धता असल्याबाबत शालेय व्यवस्थापन समितीने प्रमाणित करावे.

**च) इतर सुविधा :**

१) सर्व सुविधा विना अडथळा उपलब्ध आहेत का?

२) अध्ययन–अध्यापन साहित्य (सोबत यादी करावी.)

३) क्रीडा व खेळ साहित्य (सोबत यादी द्यावी.)

४) ग्रंथालयातील पुस्तक सुविधा :

i) पुस्तके (पुस्तकांची संख्या)

ii) नियतकालिके/वर्तमानपत्रे

५) पिण्याच्या पाण्याच्या सुविधेचे प्रकार आणि संख्या

६) स्वच्छता विषयक स्थिती

i) संडास आणि मुतारी यांचा प्रकार

ii) मुलांसाठी स्वतंत्र असलेल्या मुताऱ्यांची/शौचालयांची संख्या

iii) मुलींसाठी स्वतंत्र असलेल्या मुताऱ्यांची/शौचालयांची संख्या

**छ) अध्यापक कर्मचारीवर्गाचा तपशील :**

१) प्राथमिक/उच्च प्राथमिक स्तरावर अध्यापन करणाऱ्या कर्मचारी वर्गाची माहिती (प्रत्येक शिक्षकाचा स्वतंत्र तपशील द्यावा.)

| अ. क्र. | शिक्षकाचे संपूर्ण नाव | वडिलांचे नाव/पती/पत्नीचे नाव | जन्म–दिनांक | शैक्षणिक अर्हता | व्यावसायिक अर्हता | प्रशिक्षित किंवा अप्रशिक्षित | अध्यापन अनुभव | नियुक्तीचा दिनांक | नेमून दिलेला वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |

२) प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही स्तरावर अध्यापन करणाऱ्या कर्मचारी वर्गाची माहिती. (प्रत्येक शिक्षकाचा स्वतंत्र तपशील द्यावा.)

| अ. क्र. | शिक्षकाचे संपूर्ण नाव | वडिलांचे नाव/पती/ पत्नीचे नाव | जन्म– दिनांक | शैक्षणिक अर्हता | व्यावसायिक अर्हता | प्रशिक्षित किंवा अप्रशिक्षित | अध्यापन अनुभव | नियुक्तीचा दिनांक | नेमून दिलेला वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |

३) मुख्याध्यापक (प्रत्येक मुख्याध्यापकाचा तपशील स्वतंत्रपणे द्यावा.)

| अ. क्र. | मुख्याध्यापकाचे संपूर्ण नाव | वडिलांचे नाव/पती/ पत्नीचे नाव | जन्म– दिनांक | शैक्षणिक अर्हता | व्यावसायिक अर्हता | प्रशिक्षित किंवा अप्रशिक्षित | अध्यापन अनुभव | नियुक्तीचा दिनांक | नेमून दिलेला वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |

**ज) अभ्यासक्रम व पाठ्यक्रम :**

१) वर्गनिहाय अभ्यासक्रमाचा आणि पाठ्यक्रमाचा तपशील (इयत्ता ८ वी पर्यंत)

२) विद्यार्थ्यांसाठी वापरली जाणारी मूल्यमापन पद्धत

३) शाळेतील विद्यार्थ्यांना इयत्ता ८ वी पर्यंत कोणत्याही मंडळाची बाह्यपरीक्षा देण्यास भाग पाडले जाते किंवा कसे–

- प्रमाणित करण्यात येते की, शाळेने या अर्जासोबत जिल्हा शिक्षण माहिती पद्धतीनुसार आधार सामग्रीच्या नमुन्यात देखील माहिती सादर केली आहे.
- प्रमाणित करण्यात येते की, जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी वेळोवेळी देण्यास भाग पाडलेले असे अहवाल व माहिती सादर करण्याची शाळा मान्यतेच्या शर्तींची सातत्याने परिपूर्ती करण्याबाबत व शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्याबाबत खातरजमा करण्यासाठी समुचित प्राधिकरण किंवा जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या अशा सूचनांचे पालन करण्याची हमी शाळा देत आहे.
- प्रमाणित करण्यात येते की, समुचित प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला तपासणीसाठी शाळा खुली असेल.
- प्रमाणित करण्यात येते की, या अधिनियमाच्या अंमलबजावणी संदर्भातील शाळेचे सर्व अभिलेखे जिल्हा शिक्षण प्राधिकाऱ्याने वा समुचित प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास तपासणीसाठी केव्हाही उपलब्ध असतील आणि केंद्र सरकार/राज्यशासन/स्थानिक संस्था/किंवा संसद/राज्य विधानसभा/पंचायत किंवा यथास्थिती महानगरपालिका यांच्या प्रति असलेली तिची किंवा त्याची बंधने पूर्ण करणारे प्रशासन यांना सहाय्यभूत ठरण्यासाठी आवश्यक असेल अशी सर्व माहिती शाळा पुरविल.

स्वाक्षरी

अध्यक्ष/व्यवस्थापक

ठिकाण : शाळा व्यवस्थापन समिती

## नमुना – दोन

**ग्राम** :

**दूरध्वनी** :

**ई–मेल** : **फॅक्स** :

**जावक क्र** :

**जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय**

**(जिल्हा/राज्य यांचे नाव)**

**क्रमांक** : **दिनांक** :

**व्यवस्थापक** :

**विषय** : बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोटनियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

**माननीय महोदय/महोदया,**

आपल्या दिनांक _______________ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी याआधारे –

मी ______________________________ दिनांक _______________

पासून दिनांक _______________ पर्यंत तीन वर्षांच्या कालावधीसाठी इयत्ता _____________ ते इयत्ता _____________

करिता ______________________________ (शाळेचे नाव, पत्त्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे** :

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२) बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.

३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल. परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४) परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५) संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता–पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही;

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षांच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील; आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९) शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ
- एकूण बांधकाम क्षेत्र
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ
- वर्गखोल्यांची संख्या
- कार्यालय–नि–भांडार–नि–मुख्याध्यापकाची खोली
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे – जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर.
- अध्यापन–अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तिसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारींकडे पाठवण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक ______________ असा आहे, या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे;

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही बदल असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९) जोडपत्र 'तीन' नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

**आपला विश्वासू,**

**जिल्हा शिक्षणाधिकारी**

---

## नमुना – तीन
## (पहा नियम २३)

प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी ______________________________

याने/हिने बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील कलम २९ मध्ये विहित केलेल्या निकषांनुसार आपले इयत्ता आठवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले आहे. त्याने/तिने इयत्ता आठवीपर्यंतची अर्हता व विद्याविषयक कौशल्ये प्राप्त केली आहेत.

**शाळेचा शिक्का** **मुख्याध्यापक**

........................................................

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**सही**
**संजय कुमार**
**शासनाचे प्रधान सचिव**

❑❑❑

# ६. शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकातील २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

**शिक्षण हक्क अधिनियमानुसार दुर्बल व वंचित घटकातील २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया प्रभावीपणे राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : आरटीई–२०१६/प्र.क्र.४१५/एस.डी–१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : १० जानेवारी, २०१७

**संदर्भ** : १) केंद्र शासनाची अधिसूचना दिनांक २७/८/२००९.

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१०/प्र.क्र. २१२ (बी)/पीई–१, दिनांक ११/१०/२०११.

३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१२/प्र.क्र.११२/पीई–१, दिनांक १५/०३/२०१३.

४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अधिसूचना क्रमांक पीआरई २०१४/प्र.क्र.४५/पीई–१, दिनांक १५/०५/२०१४.

**प्रस्तावना** :

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम २००९ राज्यामध्ये दिनांक १ एप्रिल, २०१० पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमांतर्गत शासन अधिसूचना दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ अन्वये तयार केलेले नियम लागू करण्यात आलेले आहेत. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता वेळोवेळी शासन निर्णय व अधिसूचना निर्गमित करण्यात आलेले आहेत.

**२)** या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक ०१ मार्च, २०११ व दिनांक २५ एप्रिल, २०१६ अन्वये विद्या प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना घोषित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे राज्य बाल हक्क आयोगाची शासन निर्णय दिनांक ०४ जुलै, २००७ रोजी स्थापना करण्यात आली आहे. तसेच, प्राथमिक शिक्षणाची व्याख्या व स्तर (१ ली ते ८ वी) Elementary Cycle मध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २४ मार्च, २०१५ व दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ अन्वये पारित करण्यात आला आहे.

**३)** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२ (१)(सी)नुसार दुर्बल व वंचित घटकातील बालकांना विना अुनदानित व कायम विना अनुदानित शाळांमध्ये (non-minority schools-Unaided, Parmanent Unaided) किमान २५ टक्के प्रवेश ठेवण्याची तरतूद आहे. तसेच अशा प्रवेशित बालकांचे प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची तरतूद आहे. दिनांक १५ मार्च, २०१३ च्या शासन अधिसूचनेन्वये

२५ टक्के प्रवेशाबद्दलचे नियम व याबाबतची कार्यपद्धती विहित केलेली आहे. तसेच दिनांक १५ मे, २०१४ च्या अधिसूचनेन्वये ऑनलाईन प्रवेश पद्धतीने करावयाची कार्यपद्धती विहित केलेली आहे. तथापि, २५ टक्के जागांवर प्रवेशासंदर्भातील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविण्यात यावी. तसेच, नागरिकांमध्ये या प्रक्रियेबाबत अधिक जागरूकता होण्यासाठी उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

सन २०१६-१७ पासून २५ टक्के प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. सदर प्रवेश प्रक्रियेमधील येणाऱ्या अडचणी दूर करून ती प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**अ) प्रवेश प्रक्रिया प्रसिद्ध करण्याबाबत** :

१) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या २५ टक्के प्रवेशाकरिता पात्र असणाऱ्या शाळांची यादी प्रथमतः निश्चित करावी. तसेच या शाळांची यादी व संपूर्ण ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा कालावधीनिहाय तपशील स्थानिक वृत्तपत्रामध्ये बातमीद्वारे जाहीर करावा.

२) २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस पात्र असणाऱ्या सर्व शाळांनी या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणे अनिवार्य राहील.

३) २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस पात्र असणाऱ्या सर्व शाळांनी २५ टक्के प्रवेशाबाबतच्या माहितीचा फलक शाळेच्या दर्शनी भागात नागरिकांना सहज दिसेल अशा पद्धतीने लावावा.

४) या माहितीची फलकावर (२५% प्रवेशाकरीता असणारी वेबसाईट) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा कालावधी, प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक माहितीचा समावेश असावा.

५) त्याचप्रमाणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी या प्रवेश प्रक्रियेची अधिक माहिती नागरिकांना मिळण्यासाठी संबंधित नपा/मनपाग्रामपंचायत/पंचायत समिती यांना सूचना देऊन नपा/मनपाग्रामपंचायत/पंचायत समितीच्या फलकावर याबाबतची योग्य ती प्रसिद्धी करावी. तसेच महत्त्वाच्या ठिकाणी २५ टक्के प्रवेशाबाबतची माहिती देणारी भित्तिपत्रके/बॅनर लावण्यात यावेत. त्यामध्ये प्रवेशासाठी आवश्यक लागणारी कागदपत्रे, प्रवेशाचे वेळापत्रक, मदत केंद्रांची नावे तसेच शाळानिहाय इयत्ता १ ली किंवा पूर्व प्राथमिक वर्गातील प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के प्रवेशांतर्गत उपलब्ध होणाऱ्या जागासंदर्भात इ. सविस्तर माहिती असावी. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या पोर्टलवर माहिती अपलोड करावी. तसेच video clip तयार करून पोर्टलवर/यु-ट्यूबवर टाकावी.

६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी या संदर्भात वेळोवेळी पत्रकार परिषदा घेऊन आवश्यक माहिती सर्वांना द्यावी व याबद्दलची संबंधित घटकांमध्ये जागृती करावी.

**ब) प्रवेश प्रक्रियेकरिता नियोजित कालावधी** :

१) सन २०१७-१८ पासून दरवर्षी प्रवेश प्रक्रिया ही जानेवारी पासून सुरू करून एप्रिल अखेरपर्यंत पार पाडण्यात यावी. प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक **परिशिष्ट ''अ''** प्रमाणे राहील. सदर वेळापत्रकामध्ये शिक्षण संचालक (प्राथ.) हे प्रवेश प्रक्रियेचा आढावा घेऊन आवश्यकतेप्रमाणे बदल करू शकतील.

२) शाळा नोंदणी करण्यासाठी किमान १५ दिवसांचा कालावधी देण्यात यावा. २५ टक्के प्रवेश प्रक्रिया लागू असलेल्या सर्व पात्र शाळांनी याकरिता नोंदणी करणे बंधनकारक आहे. या शाळांनी अधिनियमातील १२(l)(c) नुसार तसेच दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित शाळेने २५ टक्के प्रवेशाकरिता प्रवेश स्तर (Entry Level) नोंदवावेत. प्रवेशस्तर (Entry Level) शाळेने ठरवावा.

३) शाळा नोंदणीबाबत शाळा प्रमुख, अधिकारी यांचे प्रशिक्षण, मदत केंद्रांमार्फत घेण्यात यावे. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी राज्यातील जिल्हानिहाय मदत केंद्रांची यादी जाहीर करावी.

४) प्रवेश प्रक्रियेदरम्यान शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अधिनस्त क्षेत्रात पुरेशा मदत/सहाय्य केंद्रांची स्थापना करावी.

५) पालकांना ऑनलाईन अर्ज करताना येणाऱ्या समस्या तसेच शाळांना ऑनलाईन नोंदणी करताना येणाऱ्या समस्या विचारात घेऊन त्यावर आधारित प्रशिक्षणाचे नियोजन करावे. या करिता छोटे व्हीडिओज किंवा पोर्टलवर मराठीमध्ये सूचना उपलब्ध करून द्याव्यात.

६) ऑनलाईन प्रक्रियेत शाळेने केलेल्या नोंदणीची पडताळणी संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी करावी. ज्या शाळा २५ टक्के प्रवेशाकरिता पात्र आहेत परंतु नोंदणी करत नाहीत किंवा Entry Level स्तरावरील एकूण प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागा उपलब्ध करून देणार नाहीत अशा शाळांना शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी तात्काळ मान्यता काढण्याबाबत तसेच नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्याबाबत नोटिसा द्याव्यात.

७) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया प्रतिवर्षी जानेवारीमध्ये सुरू करून सर्व फेऱ्या एप्रिल अखेर पूर्ण कराव्यात. मुलांच्या ऑनलाईन प्रवेशाबाबतचे संदेश (निवड झालेल्या/निवड न झालेल्या मुलांबाबत) विहित वेळेत पालकांना दिले जातील याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. जेणेकरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

८) दिनांक १५ मार्च, २०१३ च्या अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे प्रवेशासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे पुढील प्रमाणे आहेत.

   i) जन्माचे प्रमाणपत्र व वास्तव्याचा पुरावा (अनिवार्य). (भाडे तत्त्वावर राहणाऱ्या पालकांच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनाम्याची प्रत आवश्यक)

   ii) सामाजिक वंचित घटक (पालकांचा जातीचा दाखला अनिवार्य) (परराज्यातील जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.)

   iii) आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पालकांचा उत्पन्नाचा दाखला (उत्पन्नाचा दाखला रु. १ लाखापेक्षा कमी उत्पन्न)

   iv) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ४० टक्के पेक्षा जास्त अपंगत्वाचे प्रमाणपत्र.

९) पालकांनी संगणकीय ऑनलाईन माहिती भरताना बालकाचे नावातील/आडनावातील किरकोळ चुका गृहीत धरून शाळांना प्रवेश नाकारता येणार नाही. पालकांनी कोणतेही कागदपत्र अपलोड करू नये. शाळांनी मुलांनी सादर केलेले कागदपत्र व जन्मप्रमाणपत्र पाहून त्यानुसार शाळेच्या दस्ताऐवजावर/रजिस्टरमध्ये (दाखल्यावर) आवश्यक त्या नोंदी कराव्यात व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सूचित करावे.

१०) उत्पन्नाचा दाखला प्रवेश प्रक्रिया सुरू होणाऱ्या एक वर्षापूर्वीच्या आर्थिक वर्षातील असावा, उदा. सन २०१७–१८ मध्ये प्रवेश घेताना पालकांचे सन २०१५–१६ या वर्षातील उत्पन्नाचा दाखला प्रवेशाकरिता ग्राह्य समजण्यात यावा. उत्पन्नाचे दाखले हे संबंधित प्राधिकरण (तहसिलदार कार्यालय) यांनी प्रमाणित केलेले असावेत. हे दाखले पुन्हा तपासण्याचे अधिकार शाळांना असणार नाहीत. आर्थिक दुर्बल घटकातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या उत्पन्नाच्या दाखल्याची पडताळणी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने संबंधित तहसील कार्यालयाशी करावी. ज्या पालकांचे उत्पन्नाचे दाखले बनावट निघतील अशा पालकांच्या पाल्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील व त्यांच्यावर कायदेशीर कारावाई करण्यात येईल.

११) प्रवेश दिलेल्या मुलांचे शाळेपासून ते घरापर्यंतचे हवाई अंतर हे गुगल मॅपने निश्चित केलेले असल्याने प्रत्यक्षात त्यामध्ये काही ठिकाणी भौगोलिक परिस्थितीनुसार तफावत येण्याची शक्यता आहे. सबब शाळा निवडताना अंतराची बाब लक्षात घेऊन शाळेची निवड पालकांनी काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे.

१२) ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना घराचा अचूक पत्ता तसेच खात्रीशीर कागदपत्रे जोडून फॉर्म भरण्याची संपूर्ण जबाबदारी पालकांवर राहील. जर विद्यार्थ्याची निवड एकापेक्षा अधिकच्या शाळांमध्ये झाली असेल तर प्रवेश मिळालेल्या शाळांपैकी कोणत्याही एका शाळेत वेळापत्रकात नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीत प्रवेश घेणे आवश्यक आहे. शाळेमध्ये प्रवेश घेतल्यानंतर सदरचा प्रवेश अन्य कुठल्याही २५ टक्के प्रवेशपात्र शाळेत बदलून दिला जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेअंतर्गत एखाद्या शाळेत प्रवेश निश्चित झालेल्या बालकाने त्या शाळेत प्रवेश न घेतल्यास त्या बालकास त्या वर्षातील पुढील प्रवेश फेऱ्यांच्या लॉटरीमध्ये सहभागी केले जाणार नाही.

१३) २५ टक्के ऑनलाईन प्रवेशाअंतर्गत प्रवेश निश्चित झालेल्या विद्यार्थ्यांची संपूर्ण तपासणी करूनच शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी शाळेला यादी पाठवावी. सदर शाळांनी पाठविलेल्या यादीमधील मुलांना विहित मुदतीत प्रवेश देणे बंधनकारक आहे. विहित मुदतीनंतर शाळेच्या अथवा पालकांच्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

१४) सदर प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन करण्यात यावी, जेणेकरून अद्ययावत माहिती प्रशासनाकडे नेहमीच उपलब्ध राहील. प्रवेशाकरिता दिलेल्या यादीतील मुलांचे प्रवेश वेळापत्रकात नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीत न झाल्यास संबंधित शाळांवर मान्यता काढून घेण्याची नोटीस बजावण्यात यावी.

१५) संगणक प्रणालीमधून प्रवेश पात्र मुलांची यादी पाठवितांना खालील बाबी लक्षात घेण्यात याव्यात.

१५.१) शाळेच्या २५ टक्के मधील प्रवेश क्षमतेपेक्षा अधिक १ किमी आतील विद्यार्थ्यांचे अर्ज आल्यास त्या अर्जांमधून प्रवेश क्षमता एवढ्या विद्यार्थ्यांची निवड लॉटरी पद्धतीने करण्यात यावी. तथापि १ किमी च्या आतील विद्यार्थ्यांचे अर्ज प्रवेश क्षमतेपेक्षा कमी आले असल्यास त्या सर्व विद्यार्थ्यांची नावे प्रवेश यादीत घेण्यात यावीत.

१५.२) १५.१ च्या पातळीवर प्रवेश क्षमतेतील काही जागा उरल्यास १ ते ३ किमी मधील विद्यार्थ्यांचे अर्ज लॉटरीसाठी विचारात घेण्यात यावे. तथापि, बिंदू १५.१ धरून या पातळीवर सुद्धा प्रवेश क्षमता पूर्ण होत नाही एवढे कमी अर्ज आल्यास या पातळीवरील सर्व विद्यार्थ्यांची नावे प्रवेश यादीत घेण्यात यावीत.

१५.३) १५.१ व १५.२ नंतर उरलेल्या जागेसाठी ३ किमी पेक्षा अधिक अंतरातील अर्जांचा विचार करण्यात यावा. तथापि विद्यार्थ्यांच्या वाहतुकीचा खर्च संबंधित पालकांना करावा लागेल.

१६) एखाद्या शिक्षण संस्थेच्या एकाच आवारात इ. १ ली ते ४ थी पर्यंत मान्यता असलेली एक शाळा असेल व तेथेच इ. ५ वी ते १० वीपर्यंत मान्यता असलेली दुसरी शाळा असल्यास Elementary Cycle नुसार इ. १ली ला २५ टक्के प्रवेश प्रक्रियेअंतर्गत दिलेले प्रवेश पुढे त्याच संस्थेच्या त्याच परिसरातील (एकाच आवारातील) इ. ५वी ते १०वी पर्यंत असलेल्या शाळेत इ. ५ वी ते ८ वी करिता नियमित राहतील. त्याकरिता या शाळेत इ. ५ वी करिता वेगळ्याने प्रवेश प्रक्रिया राबविण्याची आवश्यकता नाही. मात्र इ. ५ वीतील उर्वरित सर्वसाधारण प्रवेश प्रक्रिया करताना २५ टक्केच्या प्रमाणात जागा रिक्त ठेवणे शाळेस बंधनकारक राहील.

१७) २५ टक्के प्रवेश प्रक्रियेची यशस्वी अंमलबजावणी होण्याकरिता प्रवेश स्तर (Elementary Cycle) ते इयत्ता ८ वी पर्यंत याकरिता पात्र असलेल्या शाळांनी प्रत्येक वर्गामध्ये २५ टक्के प्रवेश हे या प्रक्रियेतील लाभार्थी विद्यार्थ्यांसाठीच राहतील याची दक्षता शाळा प्रशासनाने घेणे आवश्यक राहील. या प्रवेश प्रक्रियेतून येणाऱ्या

विद्यार्थ्यांची गळती होणार नाही तसेच ही मुले शिक्षणापासून वंचित होणार नाहीत याचे सामाजिक दायित्व शाळा प्रशासनाचे राहील. २५ टक्के प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारे वेगळी/सापत्न वागणूक अथवा भेदभाव केला जाणार नाही याची दक्षता शाळा प्रशासनाने घेणे अनिवार्य राहील.

१८) २५ टक्के प्रवेश प्रक्रियेमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती शासनातर्फे प्रतिवर्षी निश्चित केलेल्या दरानुसार शाळांना करण्यात येईल.

१९) ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत प्रवेशित विद्यार्थी संख्या विचारात घेऊन त्या शाळेस शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार करावयाच्या रक्कमेच्या प्रतिपूर्तीची गणनादेखील सिस्टिममध्ये करण्यात यावी. जेणेकरून शाळांना प्रतिपूर्तीसाठी पुन्हा वेगळ्याने तपशीलवार प्रस्ताव शिक्षणाधिकारी कार्यालयास सादर करण्याची आवश्यकता असू नये. शासनाने शासन निर्णयानुसार निर्धारित केलेल्या दरानुसार अथवा शाळेने निश्चित केलेले दर यापैकी जे कमी असेल त्या दराने अनुज्ञेय राहील. फीची प्रतिपूर्ती शाळांना केल्यानंतर पालकांना SMS द्वारे कळविण्यात यावे.

२०) शिक्षण हक्क कायद्यानुसार २५% प्रवेशांतर्गत पटसंख्येनुसार प्रत्येक वर्गात उपलब्ध असणाऱ्या जागा व भरलेल्या जागा याची माहिती शाळांनी भरावी. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात इ. १ ली ते इ. ५ वी पर्यंत २५% प्रवेशातंर्गत भरलेल्या व निश्चित उपलब्ध जागांची माहिती भरावी. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार २५% इतक्या जागा रिकाम्या ठेवणे अनिवार्य राहील. तसेच, या जागा सर्वसाधारण गटातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्यावर्तीत/वर्ग करता येणार नाहीत. जागा रिकाम्या राहिल्यास शासन त्याची प्रतिपूर्ती करणार नाही त्यामुळे संबंधित शाळेचे नुकसानच होईल.

२१) **ऑनलाईन २५ टक्के प्रवेशप्रक्रिया राबविताना NIC तर्फे तयार करण्यात आलेल्या सॉफ्टवेअरमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात याव्यात.**

अ) २५ टक्के प्रवेशाकरिता नोंदणी करताना शाळांनी आकारत असलेल्या शुल्काबद्दलची माहिती दर्शविण्यात यावी.

ब) शाळांनी प्रवेश स्तराचा वयोगट २३ जानेवारी २०१५ च्या शासन निर्णयानुसार भरावा. सन २०१७-१८ या वर्षी इ. १ लीमध्ये प्रवेश घेणाऱ्या बालकाचे दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी किमान वय ५.४ इतके असेल. त्यामुळे सॉफ्टवेअरमध्ये ५.४ वर्षे वयाच्या आधीची बालके इ. १ लीमध्ये नोंदविली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

क) शाळेने प्रवेशाची ऑनलाईन नोंद केल्यानंतर पालकांना प्रवेश निश्चित झाल्याची पावती देण्यासाठी सुविधा उपलब्ध करावी.

ड) प्रवेश अर्ज कमीतकमी माहिती असलेला सुटसुटीत करण्यात यावा. त्यामध्ये विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव व वडिलांचे संपूर्ण नाव व आईच्या नावाचा तसेच प्रवेश ज्या वर्गात घेणार आहे त्या वर्गांचा व केवळ आवश्यक बाबींचाच समावेश असावा.

इ) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार २५% प्रवेशातंर्गत शाळांमध्ये इ. १ ली ते ५ वी पर्यंत दिलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांची अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, आर्थिकदृष्ट्या मागास व दिव्यांग या वर्गवारीनिहाय माहिती ऑनलाईन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०११०१६२४२५८५२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**Suvarna S Kharat**

Digitally signed by Suvarna S Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra
ou=School And Education Department,
postal Code=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=8a98fc3c5a45c818668168cffd366aced9a44c59607f616a36d403a80c74d0df,
cn=Suvarna S. Kharat
Date: 2016:12:07 12:29:35 + 05'30'

**(डॉ. सुवर्णा खरात)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग
२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
३) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
४) मा. मंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी
५) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १.
६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे १.
७) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
८) संचालक, अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) संचालक, बालभारती, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
१०) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
११) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
१२) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ सर्व.
१३) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व.
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, सर्व.
१५) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर शिक्षण)/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका/कटक मंडळे सर्व.
१६) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सर्व
१७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने)

## परिशिष्ट – अ

## RTE २५% ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१७–१८

| वेळापत्रक | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | बाब | कालावधी | दिवस |
| १. | शाळा नोंदणी | १६/०१/२०१७ ते ०३/०२/२०१७ | १९ |
| २. | पालकांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे | ०५/०२/२०१७ ते २१/०२/२०१७ | १७ |
| ३. | पहिली लॉटरी काढणे | २७/०२/२०१७ आणि २८/०२/२०१७ | १ |
| ४. | विहित मुदतीत पालकांनी शाळेत जाऊन प्रवेश घेणे | ०१/०३/२०१७ ते ०९/०३/२०१७ | ९ |
| ५. | प्रवेश घेण्याच्या विहित मुदतीनंतर शाळांनी रिक्त पदाची माहिती तपासून उर्वरित रिक्त जागा दर्शविणे | १०/०३/२०१७ ते ११/०३/२०१७ | २ |
| ६. | दुसरी लॉटरी | १४/०३/२०१७ आणि १५/०३/२०१७ | १ |
| ७. | विहित मुदतीत पालकांनी शाळेत जाऊन प्रवेश घेणे. | १६/०३/२०१७ ते २१/०३/२०१७ | ६ |
| ८. | विहित मुदतीनंतर शाळांनी रिक्त पदाची माहिती तपासून उर्वरित रिक्त जागा दर्शविणे | २२/०३/२०१७ आणि २३/०३/२०१७ | २ |
| ९. | तिसरी लॉटरी | २४/०३/२०१७ आणि २५/०३/२०१७ | १ |
| १०. | विहित मुदतीत पालकांनी शाळेत जाऊन प्रवेश घेणे. | २७/०३/२०१७ आणि ०१/०४/२०१७ | ६ |
| ११. | विहित मुदतीनंतर शाळांनी रिक्त पदाची माहिती तपासून उर्वरित रिक्त जागा दर्शविणे | ०३/०४/२०१७ ते ०६/०४/२०१७ | ४ |
| १२. | चौथी लॉटरी | ०७/०४/२०१७ ते ०८/०४/२०१७ | १ |
| १३. | विहित मुदतीत पालकांनी शाळेत जाऊन प्रवेश घेणे | १०/०४/२०१७ ते १५/०४/२०१७ | ६ |
| १४. | विहित मुदतीनंतर शाळांनी रिक्त पदाची माहिती तपासून उर्वरित रिक्त जागा दर्शविणे | १७/०४/२०१७ ते १८/०४/२०१७ | २ |
| १५. | पाचवी लॉटरी | १८/०४/२०१७ ते २०/०४/२०१७ | १ |
| १६. | विहित मुदतीत पालकांनी शाळेत जाऊन प्रवेश घेणे | २१/०४/२०१७ ते २७/०४/२०१७ | ७ |
| १७. | विहित मुदतीनंतर शाळांनी रिक्त पदाची माहिती तपासून उर्वरित रिक्त जागा दर्शविणे | २८/०४/२०१७ ते २९/०४/२०१७ | २ |

❑❑❑

# ७. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम (प्राथ./माध्य.)

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष सन २०१५-१६ पासून अंमलबजावणी करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : शैगुवि २०१५/(८०/१५) एस.डी.६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २२ जून, २०१५.

**वाचा : १) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९.**
**२) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११.**
**३) शासन निर्णय क्रमांक : पीआरई २०१०/(१३०/१०)/प्राशि-५, दि. २० ऑगस्ट, २०१०.**
**४) शासन निर्णय क्रमांक : संप्रप २००७/(६५/०७)/प्राशि-५, दि. २६ एप्रिल, २००७.**

**प्रस्तावना :**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ हा १ एप्रिल, २०१० पासून देशभरात लागू झालेला आहे. त्यामधील प्रकरण २, कलम ३ नुसार, ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क मिळालेला आहे. या कायद्यामुळे शिक्षण प्रक्रियेत अनेक कालसुसंगत बदल होत असून त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे. मात्र काही बदलांबाबत समाजामध्ये गैरसमजही निर्माण झाले आहेत. वयानुरूप इयत्तेत प्रवेश, विद्यार्थ्यास एका वर्षापेक्षा अधिक काळ एका इयत्तेत न ठेवणे, इयत्ता ८वी पर्यंत कोणत्याही मंडळाची सार्वत्रिक परीक्षा पुढील वर्गात जाण्यासाठी द्यावी न लागणे, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीचा अवलंब यासारख्या बदलांमुळे शैक्षणिक गुणवत्तेवर विपरित परिणाम होईल असा जनमानसात समज निर्माण झाला आहे. हा समज तातडीने दूर करणे आवश्यक आहे.

एका संस्थेच्या वार्षिक शैक्षणिक सद्यस्थिती सर्वेक्षण अहवालात मागील पाच वर्षात इयत्ता ५वी च्या विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेमध्ये ९४ टक्क्यांवरून ७४ टक्क्यांवर घसरण झाल्याचे निराशाजनक चित्र दिसून येते. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी घेतलेल्या राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षणामध्ये (SLAS) इयत्ता ५वी च्या विद्यार्थ्यांना भाषा विषयातील सरासरी संपादणूक ५३ टक्के व गणित विषयातील सरासरी संपादणूक ५१ टक्के असल्याचे आढळून आले आहे. या सर्वेक्षणात भाषा विषयात सिंधुदुर्ग जिल्हा सर्वोत्कृष्ट (६७ टक्के) व सर्वात मागे सोलापूर जिल्हा (३४ टक्के) तर गणित या विषयामध्ये सर्वोत्कृष्ट जिल्हा भंडारा (६१ टक्के) व सर्वात मागे औरंगाबाद जिल्हा (३४ टक्के) असल्याचे आढळून आले आहे. या आकडेवारीवरून विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीमध्ये राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता असल्याचे स्पष्ट होते. तसेच राज्यातील एकूणच शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता ही चिंतेची बाब आहे हे यावरून दिसते.

शिक्षण हक्क कायद्यातील कलम २९ (२) (ह) नुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीद्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञान, आकलन आणि उपयोजन क्षमतांची पडताळणी करणे आवश्यक आहे. कायद्यातील या अपेक्षा आणि तरतुदी विचारात घेऊन दिनांक २० ऑगस्ट,२०१० च्या शासन निर्णयानुसार राज्यात इयत्ता पहिली ते आठवीसाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती लागू केली आहे. त्यानुसार शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम/कृती, प्रयोग/प्रात्यक्षिके, प्रकल्प, स्वाध्याय, तोंडी काम, लेखी चाचणी इ. द्वारे विद्यार्थ्यांच्या संपादणुकीची पडताळणी शाळास्तरावर वेळोवेळी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील अडचणी समजून घेऊन त्या दूर करण्याचे प्रयत्न होत आहेत. अपेक्षित संपादणूक पातळीपेक्षा मागे असलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मार्गदर्शन करून अपेक्षित संपादणूक पातळीपर्यंत आणण्याचा प्रयत्न आहे.

वाचन, लेखन, संख्याज्ञान आणि संख्यांवरील क्रिया या क्षमतांची संपादणूक, प्रभुत्व पातळीकडे जाण्यासाठी आवश्यक ठरते. या मूलभूत क्षमतांची परिपूर्ण तयारी झाल्यास ज्ञानग्रहण आणि आकलनाचा मार्ग सुलभ होतो. त्याकडे दुर्लक्ष झाल्यास शैक्षणिक गुणवत्ता विकासाचा पाया कच्चा राहतो. हे विचारात घेऊन वाचन, लेखन, संख्याज्ञान आणि संख्यांवरील क्रियांमध्ये राज्यात एकसुद्धा मूल अप्रगत राहू नये यासाठी संपूर्ण राज्यात प्रत्येक विद्यार्थ्याच्या पायाभूत संपादणुकीची नियमित पडताळणी करून शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी गरजाधिष्ठित कृतिकार्यक्रमाची आखणी करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ज्या इयत्तेत बालक शिकत आहे त्या इयत्तेच्या क्षमतांचीही संपादणूक वेळच्या वेळी तपासून व मदत करून अप्रगत विद्यार्थ्यांची संख्या कमी करीत जाणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राज्यामध्ये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**१) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाचा हेतू :**

१.१) प्रत्येक विद्यार्थ्याने वयोगटानुरूप अपेक्षित क्षमता प्राप्त केली आहे किंवा नाही याची तपासणी शैक्षणिक प्रगती चाचण्यांद्वारे करून ज्या विषयामध्ये/क्षमतेमध्ये विद्यार्थ्यांना अडचणी असतील त्यासाठी कृतिकार्यक्रम आखून अंमलबजावणी करणे. जेणेकरून प्रत्येक विद्यार्थी प्रभुत्व पातळीकडे वाटचाल करू शकेल.

१.२) या प्रक्रियेत शिक्षकाला मदत करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे.

१.३) शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.

१.४) कार्यक्रमाच्या सुरुवातीची दोन वर्षे इयत्ता पहिली ते आठवीमधील प्रत्येक विद्यार्थ्याची भाषा व गणित या विषयातील क्षमतांच्या संपादणुकीची नियमितपणे पडताळणी करणे व शिक्षकाला आवश्यक सहाय्य करणे.

१.५) विद्यार्थ्यांच्या अध्ययनास व शिक्षकाच्या सुलभीकरणाच्या भूमिकेस सुयोग्य दिशा देणे.

१.६) वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याची संपादणूक पातळी वाढविण्यासाठी शिक्षकांना प्रेरणा व साहाय्य देणे.

१.७) या गोष्टी साध्य करण्यासाठी शिक्षणव्यवस्थेतील प्रत्येक घटकाचे सबलीकरण करणे.

**शासन निर्णय :**

**'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' सन २०१५-१६ पासून राज्यात सुरू करण्यात येत असून त्या अंतर्गत राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमाच्या मान्यताप्राप्त शाळांमधून इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रथम भाषा व गणित या विषयाच्या शैक्षणिक प्रगती चाचण्यांचे आयोजन करण्यात येईल. याबाबतच्या कार्यवाहीची रूपरेषा पुढीलप्रमाणे राहील.**

**अ) सर्व नियमित विद्यार्थ्यांना किमान अपेक्षित क्षमता अवगत असायलाच हवी. याबाबत सर्व विद्यार्थ्यांच्या क्षमता संपादणुकीची खात्री शैक्षणिक प्रगती चाचणीद्वारे केली जाईल. या क्षमतांमध्ये एकही मूल अप्रगत राहणार नाही**

**यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्यासाठी शासन, प्रशासन, शालेय व्यवस्थापन विशेष प्रयत्न करणार असून शिक्षकांनी त्याची मुख्य जबाबदारी घेणे आवश्यक आहे.**

**ब) गुणवत्ता तपासणे आणि सुधारणे हा या चाचण्यांचा हेतू आहे.**

**क) राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षणामध्ये (SLAS : State Learning Achievement Survey) मूलभूत क्षमतांबरोबर संबंधित इयत्तेच्या अपेक्षित सर्व क्षमतांच्या प्रगतीबाबत तपासणी केली जाईल. या यादृच्छिक (random sample) पद्धतीने होतील.**

**ड) जे विद्यार्थी अनियमित असतात त्यांचा शाळेतील नियमित सहभाग शाळा व्यवस्थापन समितीच्या सहभागाने वाढविणे ही शिक्षक व मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे. नियमित असून अप्रगत असतील अशा विद्यार्थ्यांना संबंधित इयत्तेच्या अखेरीस तक्त्यात निश्चित केलेल्या शैक्षणिक प्रगती चाचणीतील क्षमता येणे अनिवार्य आहे. तसेच सर्वसाधारण व प्रगत विद्यार्थ्यांना संबंधित इयत्तेच्या सर्व क्षमता येणे अपेक्षित असून याबाबतची खातरजमा (SLAS) मधून तपासली जाईल.**

**इ) सन २०१६-१७ च्या संपादणुकीमध्ये तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अपेक्षित वाढ होणे आवश्यक आहे. म्हणजेच या कार्यक्रमाच्या माध्यमातून अप्रगत विद्यार्थी आणि साधारण व प्रगत विद्यार्थी या दोघांच्याही संपादणुकीमध्ये वाढ होणे बंधनकारक आहे.**

**फ) सन २०१३-१४ मध्ये इयत्ता पाचवीकरिता SLAS हाती घेण्यात आला होता. राज्यात पहिल्यांदाच सर्व इयत्तांसाठी SLAS सन २०१५-१६ पासून महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेमार्फत करण्यात येईल. त्यामुळे पुढील तक्त्यात सन २०१५-१६ मध्ये SLAS च्या रकान्यात इयत्ता पाचवी वगळून अन्य इयत्तांसाठी पहिले असे नमूद केले आहे. सन २०१५-१६ मध्ये इयत्ता पाचवीमध्ये सन २०१३-१४ च्या तुलनेत ५ टक्के वाढीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.**

**२) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची कार्यपद्धती :**

२.१) शाळेत दाखल झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने वयोगटानुरूप अपेक्षित शैक्षणिक क्षमता संपादित केली आहे किंवा नाही याची पडताळणी शैक्षणिक प्रगती चाचणीद्वारे घेण्यात येईल.

२.२) सुरुवातीची दोन वर्षे प्रथम भाषा व गणित या दोन विषयांच्या चाचण्या घेण्यात येतील.

२.३) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या मान्यताप्राप्त शाळांतील इ.१ली ते ८वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात तीन राज्यस्तरीय शैक्षणिक प्रगती चाचण्यांचे आयोजन करण्यात येईल. यामध्ये एक पायाभूत चाचणी व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामधील संकलित मूल्यमापनाच्या दोन सत्रांत परीक्षा (चाचण्या) अशा एकूण ३ परीक्षा घेण्यात येतील.

२.४) या व्यतिरिक्त त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने प्रथम सत्राअखेरीस एक व द्वितीय सत्राअखेरीस एक अशा दोन यादृच्छिक (random sample) चाचण्या निवडक शाळांमध्ये होतील.

२.५) पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापनाच्या दोन सत्रांत परीक्षा व २.४ मध्ये नमूद केलेल्या त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने घेतल्या जाणाऱ्या चाचण्यांचे आराखडे, आयोजन व अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यामार्फत केली जाईल.

२.६) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनामधील (CCE) संकलित मूल्यमापनातील इतर विषयांच्या परीक्षा व आकारिक मूल्यमापनातील सर्व विषयांच्या चाचण्या याबाबतची अंमलबजावणी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन बाबतच्या दि. २०-८-२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे करण्यात येईल.

२.७) चाचणी आयोजनाचे वेळापत्रक :

| क्रमांक | उपक्रम तपशील | कालावधी | स्तर |
|---|---|---|---|
| १) | चाचणी विकसन कार्यशाळा (कार्यप्रेरणा प्रशिक्षणाच्या माध्यमातून) | दि. १५ जूनपर्यंत | राज्य |
| २) | पथदर्शी चाचणी (निवडक शाळांमध्ये करण्यात येईल) | दि. १६ ते २३ जून दरम्यान | राज्य |
| ३) | चाचणी अंतिमीकरण (पथदर्शी चाचण्यांचे पुनर्विलोकन करून अंतिमीकरण केले जाईल) | दि. २४ जून ते ३ जुलै दरम्यान | राज्य |
| ४) | पर्यवेक्षकीय त्रयस्थ संस्थेचे उद्बोधन | दि. ५ ते १० जुलै दरम्यान | राज्य |
| ५) | शिक्षकांचे उद्बोधन | दि. १२ ते १७ जुलै दरम्यान | तालुका |
| ६) | पायाभूत चाचणी व चाचणीमधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांच्या नोंदी शाळास्तरावर | दि. २० ते ३१ जुलै दरम्यान | शाळा |
| ७) | पायाभूत चाचणीचे निष्कर्ष सर्वांना कळविणे. | दि. १४ ऑगस्टपर्यंत | राज्य |
| ८) | शिक्षकांनी केंद्रप्रमुखांकडे प्रशिक्षणाची मागणी नोंदविणे | दि. २१ ऑगस्टपर्यंत | केंद्र |
| ९) | केंद्रप्रमुख यांनी गटशिक्षणाधिकारी यांचेकडे प्रशिक्षणाची मागणी नोंदविणे. | दि. २६ ऑगस्टपर्यंत | तालुका |
| १०) | आवश्यकतेनुसार प्रशिक्षणाचे आयोजन. (केंद्रप्रमुख, शिक्षक प्रशिक्षक, गट/जिल्हास्तरीय यंत्रणा/डाएट/ एस.सी.ई.आर.टी.च्या मदतीने व म.प्रा.शि.प.च्या सहकार्याने) | दि. ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर दरम्यान | केंद्र/ तालुका |
| ११) | संकलित मूल्यमापन १ सत्रांत परीक्षा व त्यामधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांच्या नोंदी शाळास्तरावर | दि. १६ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान | शाळा |
| १२) | त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन (चाचणी क्र. २ निवडक शाळांमध्ये) | दि. १६ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान | शाळा |
| १३) | संकलित मूल्यमापन २ सत्रांत परीक्षा व त्यामधील विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांच्या नोंदी शाळास्तरावर | दि. ०१ ते १५ एप्रिल दरम्यान | शाळा |
| १४) | त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने मूल्यमापन (यादृच्छिक चाचणी निवडक शाळांमध्ये) | दि. ०१ ते १५ एप्रिल दरम्यान | शाळा |

२.८) **परीक्षांचे स्वरूप (बाल शिक्षण हक्क कायद्यात नमूद केलेल्या मूल्यमापन पद्धतीनुसार) :** या चाचण्या बालकांची समज व क्षमता तपासतील. लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक अशा तीनही प्रकाराच्या प्रश्नांचा समावेश चाचणीमध्ये असेल. मूलभूत क्षमता आणि त्या त्या इयत्तेत अपेक्षित असणाऱ्या मुख्य क्षमता यांचा या चाचणीत समावेश असेल. या चाचण्या ग्रेडेड असतील. या तीनही चाचण्यांचे विकसन राज्यस्तरावरून करण्यात येईल.

**२.८.१) पायाभूत चाचणी**

- इयत्ता २री ते ८वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी चाचणी असेल.
- मागील इयत्तेपर्यंतच्या मूलभूत क्षमता व त्या त्या इयत्तेच्या प्रमुख क्षमतेवर आधारित चाचणी असेल.

- इयत्ता २री ते ८वी च्या सर्व विद्यार्थ्यांची चाचणीद्वारा स्तरनिश्चिती करून गुणवत्ता कार्यक्रम आखण्यासाठी शिक्षक, शाळा, केंद्र, तालुका स्तरांवर चाचणीचा उपयोग होईल.
- CCE च्या दि. २०/८/२०१० च्या शासन निर्णयातील संकलित मूल्यमापनाच्या इयत्तानिहाय भारांशाप्रमाणे चाचणीतील गुण असतील.

**२.८.२) संकलित मूल्यमापन १ सत्रांत परीक्षा :**

- इयत्ता १ ली ते ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी चाचणी असेल.
- मागील इयत्तेपर्यंतच्या मूलभूत क्षमता आणि पहिल्या सत्राअखेरपर्यंतच्या क्षमतांचे काही प्रश्न चाचणीत असतील.
- मूलभूत क्षमतेच्या गुणवत्तेत वाढ होत आहे की नाही तसेच प्रथम सत्रापर्यंतच्या क्षमतांमध्ये काही त्रुटी राहिल्या आहेत का हे या चाचणीतून समजेल.
- CCE च्या दि. २०-०८-२०१० च्या शासन निर्णयातील संकलित मूल्यमापनाच्या इयत्तानिहाय भारांशाप्रमाणे चाचणीतील गुण असतील.

**२.८.३) संकलित मूल्यमापन २ सत्रांत परीक्षा :**

- इयत्ता १ली ते ८वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी चाचणी असेल.
- मूलभूत क्षमता, पहिल्या आणि दुसऱ्या सत्राखेरपर्यंतच्या क्षमतांचे काही प्रश्न चाचणीत असतील.
- मूलभूत क्षमतेच्या आणि संकलित मूल्यमापन १ च्या गुणवत्तेत वाढ होत आहे की नाही तसेच द्वितीय सत्रापर्यंतच्या क्षमतांमध्ये काही त्रुटी राहिल्या आहेत का हे या चाचणीतून समजेल.
- CCE च्या दि. २०-०८-२०१० च्या शासन निर्णयातील संकलित मूल्यमापनाच्या इयत्तानिहाय भारांशाप्रमाणे चाचणीतील गुण असतील.

**३) सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये घ्यावयाच्या चाचणी परीक्षांमागील उद्दिष्टे :**

**१) सन २०१५-१६**

| **चाचणी** | **शैक्षणिक प्रगती चाचणी** | | **SLAS चाचणी** | |
|---|---|---|---|---|
| **व्याप्ती** | **१०० टक्के विद्यार्थी** | | **यादृच्छिक** | |
| **संपादणूक उद्दिष्टे** | | | | |
| **इयत्ता** | **भाषा** | **गणित** | **भाषा** | **गणित** |
| पहिली | इयत्ता पहिलीला पायाभूत चाचणी होणार नाही. संकलित १ व २ या चाचण्या अध्ययन अनुभवाचा भाग म्हणून होतील. | | | |
| दुसरी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |

| चाचणी | शैक्षणिक प्रगती चाचणी | | SLAS चाचणी | |
|---|---|---|---|---|
| व्याप्ती | १०० टक्के विद्यार्थी | | यादृच्छिक | |
| संपादणूक उद्दिष्टे | | | | |
| इयत्ता | भाषा | गणित | भाषा | गणित |
| तिसरी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| चौथी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| पाचवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | ५८ टक्के | ५५ टक्के |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| सहावी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| सातवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| आठवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | पहिले | पहिले |
| | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये पायाभूत चाचणीच्या सरासरी संपादणुकीत संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |

२)  सन २०१६-१७

| | सर्व नियमित विद्यार्थी | | SLAS | |
|---|---|---|---|---|
| इयत्ता | भाषा | गणित | भाषा | गणित |
| पहिली | इयत्ता पहिलीला पायाभूत चाचणी होणार नाही. संकलित १ व २ या चाचण्या अध्ययन अनुभवाचा भाग म्हणून होतील. | | | |
| दुसरी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान व बेरीज - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| तिसरी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज व वजाबाकी - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| चौथी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी व गुणाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये २०१५-१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६-१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| पाचवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार - यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. | सन २०१५-१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. |

| | सर्व नियमित विद्यार्थी | | SLAS | |
|---|---|---|---|---|
| **इयत्ता** | **भाषा** | **गणित** | **भाषा** | **गणित** |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५–१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६–१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये २०१५–१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६–१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| सहावी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | सन २०१५–१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. | सन २०१५–१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५–१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६–१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये २०१५–१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६–१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| सातवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज व वजाबाकी, गुणाकार व भागाकार यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | सन २०१५–१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. | सन २०१५–१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५–१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६–१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये २०१५–१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६–१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |
| आठवी | वाचन, आकलन, लेखन व उपयोजन – यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | संख्याज्ञान, बेरीज व वजाबाकी, गुणाकार व भागाकार यात एकही मूल अप्रगत राहणार नाही. | सन २०१५–१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. | सन २०१५–१६ च्या सरासरी संपादणुकीत १० टक्के वाढ. |
| | इतर क्षमतांमध्ये २०१५–१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६–१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | इतर क्षमतांमध्ये २०१५–१६ च्या संकलित २ चाचणीच्या सरासरी संपादणुकीत २०१६–१७ च्या संकलित २ पर्यंत १० टक्के वाढ. | | |

- सन २०१७–१८ पासून राज्यात एक सुद्धा मूल अप्रगत राहणार नाही. कोणत्या चाचण्या चालू ठेवायच्या याबाबतचा निर्णय तेव्हाच्या परिस्थितीनुसार घेण्यात येईल. तसेच त्यानंतर दरवर्षी SLAS अहवालामध्ये प्रत्येक इयत्तेच्या सरासरी संपादणुकीत ५ टक्के वाढ करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात येत आहे.
- वरील क्षमता संपादणुकीमधून प्रमाणीकृत विशेष गरजा असणाऱ्या मुलांना वगळण्यात येत आहे. फक्त शिक्षकांच्या मनात विशेष गरजा (गतिमंद, अध्ययन अक्षम, इत्यादी) वाटणाऱ्या परंतु योग्य प्राधिकाऱ्याद्वारा प्रमाणित (Certified) न करण्यात आलेल्या मुलांना त्यात गृहीत धरले जाणार नाही. तथापि, शिक्षकाला एखाद्या मुलाला प्रमाणित करून घेणे गरजेचे वाटल्यास त्याविषयी गटशिक्षणाधिकारी यांना कळवावे. जिल्हा प्रशासनाने सर्व शिक्षा अभियानाच्या मदतीने पुढील सहा महिन्यात त्या मुलांना तपासून योग्य तो निर्णय कळवावा. प्रत्येक बालक त्याच्या क्षमतांच्या जास्तीत जास्त पातळीपर्यंत शिकणे या शिक्षण हक्क कायद्यातील व्याख्येवरून प्रमाणित विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या संपादणुकीचे वेगळे मापदंड शासनाच्या विचाराधीन असून त्यावर स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल. विद्यार्थी गतिमंद व अध्ययन अक्षम असल्यास ते सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणे शिकू शकतात हा विश्वास शिक्षकांनी बाळगावा व त्या विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत देऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणावे.

**४. चाचण्यांचे विश्लेषण** :

- पायाभूत चाचणी –A
- संकलित मूल्यमापन १ सत्रांत परीक्षा –A + B
- संकलित मूल्यमापन २ सत्रांत परीक्षा – A + B + C

A मागील इयत्तेपर्यंतच्या मूलभूत क्षमतेवर प्रश्न

B पहिल्या सत्रापर्यंतच्या क्षमतेवर काही प्रश्न

C दुसऱ्या सत्रापर्यंतच्या क्षमतेवर काही प्रश्न

**५. त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने घ्यावयाच्या यादृच्छिक चाचण्या** :

- त्रयस्थ संस्थेच्या सहभागाने तीन चाचण्या घेण्यात येतील. (त्रयस्थ संस्था मूल्यमापन शिक्षक, अधिकारी व त्रयस्थ व्यक्ती)
- संकलित मूल्यमापन एकच्या वेळेस व संकलित मूल्यमापन दोन च्या वेळेस या चाचण्या यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या शाळांमध्ये, यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या इयत्तांसाठी व यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या होतील. या विद्यार्थ्यांना ही एकच परीक्षा द्यावी लागेल याची दक्षता घेण्यात येईल.
- संकलित मूल्यमापन १ सत्रांत परीक्षा व संकलित मूल्यमापन २ सत्रांत परीक्षेच्या प्रश्नपत्रिका या SCERT ने बनवलेल्या असतील.
- त्रयस्थ संस्थेची निवड राज्यस्तरावरून जाहिरात देऊन करण्यात येईल. चाचणी घेण्यासाठी त्रयस्थ संस्थेमार्फत जाणाऱ्या व्यक्ती या शासनाने दिलेल्या निकषांनुसार असणे आवश्यक आहे. त्रयस्थ संस्था राज्याने विकसित केलेली चाचणी वापरेल.

**६.** त्रयस्थ संस्था, शिक्षक व अधिकारी अशांनी घेतलेल्या त्रिपक्षीय यादृच्छिक चाचणीचे महत्त्व या चाचण्यांचा उपयोग राज्यातील प्रत्येक बालक प्रगती करीत आहे किंवा नाही ते पाहण्यासाठी आवश्यकता जोखून गुणवत्ता कार्यक्रम आखण्यासाठी, तसेच व्यवस्थेचे मूल्यमापन करीत राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी होणे अपेक्षित आहे.

शिक्षक, अधिकारी व समाज हे या प्रक्रियेतील महत्त्वाचे घटक आहेत. या चाचण्या प्रामाणिकपणे घेतल्या जाणे, माहितीचे संकलन व विश्लेषण काटेकोरपणे होणे आणि चाचण्यांमधील निष्पत्तीचा शिक्षक–अधिकारी–समाज या सर्वांकडून संपूर्ण स्वीकार होणे त्यासाठी आवश्यक आहे. या तीनही घटकांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन काम केले तरच हे शक्य आहे. त्यासाठी त्रिपक्षीय टीमद्वारे यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या शाळांमध्ये मूल्यमापन करणे, त्यातील माहितीचे विविध पद्धतीने विश्लेषण करणे आणि त्या आधारे धोरणे व कार्यक्रम याबाबतचे निर्णय घेणे आवश्यक आहे. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विविध स्तरांवरील प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि महानगरपालिका आयुक्त यांच्यापैकी ज्यांना यात सहभागी व्हायचे असेल असे सर्वजण त्यांच्या उपलब्धतेनुसार या प्रक्रियेतील अधिकारी या घटकामध्ये सहभागी होतील. त्यामुळे सर्वांना प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळण्यास तसेच समस्यांचे वेळच्या वेळी निराकरण होण्यास मदत होईल.

**७) चाचणी घेतल्यानंतर करावयाची कार्यवाही** :

७.१) पायाभूत चाचणी व संकलित मूल्यमापनाच्या दोन सत्रांत परीक्षा घेणे व उत्तरपत्रिका तपासण्याची जबाबदारी शिक्षकांची राहील.

७.२) चाचणीतील विद्यार्थी प्रतिसादाचे संगणकीकरण करण्यासाठी राज्यस्तरावरून संगणक प्रणाली विकसित करण्यात येईल. त्यामध्ये राज्यस्तरावरील विश्लेषणासाठी विद्यार्थिनिहाय आणि विषयनिहाय एकूण गुणांची नोंद शिक्षक करतील.

७.३) शाळा व केंद्र पातळीवर नोंदी केल्यास विद्यार्थी कोणत्या क्षमतेमध्ये मागे आहे ते समजेल. त्यानुसार जे विद्यार्थी क्षमतेत मागे आहेत त्यांच्यासाठी विषयनिहाय व क्षमतानिहाय कृतिकार्यक्रम तयार करून त्यांना अपेक्षित संपादणूक पातळीपर्यंत आणता येईल.

७.४) चाचणीचा इयत्तानिहाय व विषयनिहाय दर्जा निश्चित करणे यासाठी पुढील सूत्र वापरावे.

$$\text{शेकडा पातळी} = \frac{(\text{सर्व विद्यार्थ्यांच्या गुणांची बेरीज} \times १००)}{(\text{पटसंख्या} \times \text{चाचणीचे कमाल गुण})}$$

७.५) सर्व वर्गांच्या शेकडा प्रमाणानुसार शाळेचे विषयनिहाय शेकडा प्रमाण काढावे.

$$\text{शाळेचे शेकडा प्रमाण} = \frac{(\text{सर्व विद्यार्थ्यांच्या गुणांची बेरीज} \times १००)}{(\text{पटसंख्या} \times \text{चाचणीचे कमाल गुण})}$$

७.६) विषयनिहाय शेकडा प्रमाणाची सरासरी काढून शाळेचा एकत्रित दर्जा निश्चित करावा.

७.७) शाळेच्या शेकडा प्रमाणानुसार शाळेला खालीलप्रमाणे गुणवत्ता श्रेणी द्यावी.

- ८१ ते १०० टक्के – अ
- ४१ ते ६० टक्के – क
- ० ते ४० टक्के – ड

**वरील श्रेणी ही माझी समृद्ध शाळा किंवा ग्राम विकास विभागाने दिलेल्या मूल्यमापन साधनापेक्षा वेगळी श्रेणी आहे हे लक्षात घ्यावे.**

७.८) केंद्राचे शेकडा प्रमाण = $\frac{\text{केंद्रातील सर्व शाळांच्या सरासरी शेकडा प्रमाणांची बेरीज}}{\text{एकूण शाळांची संख्या}}$

७.९) केंद्राच्या शेकडा प्रमाणानुसार केंद्राला मुद्दा क्र. ४.७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्रेणी द्यावी.

७.१०) गटाचे शेकडा प्रमाण = $\frac{\text{गटातील सर्व शाळांच्या सरासरी शेकडा प्रमाणांची बेरीज}}{\text{एकूण शाळांची संख्या}}$

७.११) गटाच्या शेकडा प्रमाणानुसार गटाला मुद्दा क्र. ४.७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्रेणी द्यावी. (जिल्ह्याची आणि राज्याची शेकडा पातळीसुद्धा काढावी.)

**८) अहवाल संकलन :**

राज्यस्तरावर दोन प्रकारचे अहवाल संकलित केले जातील. १) निष्पत्ती अहवाल २) प्रक्रिया अहवाल

८.१) निष्पत्ती अहवाल : प्रत्येक चाचणीअंती मुलांचे गुण संगणकात भरण्यापलीकडे शिक्षकांना अन्य कोणतेही अहवाल द्यावे लागणार नाहीत याची काळजी घेतली जात आहे. निष्पत्ती अहवाल पूर्णपणे एससीईआरटीद्वारा तयार होत असलेल्या आज्ञावलीतून तयार होणार आहे. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश राहील.

८.१.१) राज्यात एकूण विद्यार्थी, चाचणीत सहभागी विद्यार्थी, त्यात ४० टक्के पेक्षा कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या.

८.१.२) राज्यात गुणवत्ता श्रेणीनिहाय शाळांची संख्या

८.१.३) राज्यात गुणवत्ता श्रेणीनिहाय केंद्र व गटांची संख्या

८.१.४) जिल्हानिहाय U-DISE गुणवत्ता श्रेणीतील केंद्र आणि गटांची संख्या व गटांची नावे

८.१.५) अप्रगत विद्यार्थिविहिन शाळा संख्या

८.१.६) वरीलप्रमाणे अहवाल प्रत्येक चाचणीअंती एका महिन्याच्या आत शासनास सादर करण्यात यावा.

प्रक्रिया अहवाल : हा अहवाल मासिक स्वरूपाचा असेल. हा अहवालसुद्धा एससीईआरटीने शासनास सादर करावयाचा आहे. यात खालील बाबींचा समावेश असावा.

**गुणवत्ता कक्षांची बैठक :**

- **जिल्हा गुणवत्ता कक्ष : ३६ पैकी झालेली बैठक संख्या**
- **तालुका (गट/शहर साधन केंद्र) गुणवत्ता कक्ष – ४०८ पैकी झालेली बैठक संख्या**
- **महानगरपालिका गुणवत्ता कक्ष– २३ पैकी झालेली बैठक संख्या**

**मागील तीन महिन्यात न झालेल्या गुणवत्ता कक्षांच्या बैठका–**

- **जिल्हा गुणवत्ता कक्ष – संख्या व नावे**
- **तालुका गुणवत्ता कक्ष – जिल्हानिहाय संख्या व नावे**
- **महानगरपालिका गुणवत्ता कक्ष – संख्या व नावे**

शिक्षकांद्वारे प्रशिक्षणाची मागणी : जिल्हानिहाय प्रशिक्षणाची मागणी करणाऱ्या शिक्षकांची संख्या, मागणीप्रमाणे प्रशिक्षण दिलेल्या शिक्षकांची संख्या, प्रशिक्षणाने समाधानित झालेल्या शिक्षकांची संख्या यामध्ये डाएट / एससीईआरटी इत्यादींनी मागणी नसताना काही प्रशिक्षण घेतले असल्यास ते यात गृहीत धरू नये.

**अधिकाऱ्यांद्वारे प्रशिक्षणाची मागणी : जिल्हानिहाय प्रशिक्षणाची मागणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या, मागणीप्रमाणे प्रशिक्षण दिलेल्या अधिकाऱ्यांची संख्या, प्रशिक्षणाने समाधानित झालेल्या अधिकाऱ्यांची संख्या, यामध्ये डाएट/एससीईआरटी यांनी मागणी नसताना काही प्रशिक्षण घेतले असल्यास ते यात गृहीत धरू नये.**

**डिजिटल शाळा करण्याचे लक्ष्य – जिल्हा परिषदा व महानगरपालिका यांनी केलेल्या डिजिटल शाळांची संख्या**

**कार्पोरेट/स्वयंसेवी संस्थांनी दत्तक घेतलेल्या शाळांची संख्या जिल्हा परिषद व महानगरपालिकानिहाय एकूण शाळांपैकी दत्तक घेतलेल्या शाळांची संख्या.**

**Activity Based Learning (ABL) शाळा करण्याचे लक्ष्य : जिल्हा परिषदा व महानगरपालिका यांनी केलेल्या ABL शाळांची संख्या**

**ISO ९००० शाळा करण्याचे लक्ष्य : जिल्हा परिषदा व महानगरपालिका यांनी ISO ९००० केलेल्या शाळांची संख्या**

**याशिवाय प्रत्येक जिल्ह्याने केलेल्या गुणवत्ता विकासाच्या कामाबाबत दर महिन्याला साधारण १०० शब्दांत महिती द्यावी.**

८.२.१०) विभागातील प्रत्येक संचालनालयातील गुणवत्ता कक्षांनी मागील महिन्यात केलेल्या कार्याचा अहवाल एससीईआरटीमार्फत द्यावा.

८.२.११) एससीईआरटीने मागील महिन्यात स्वतः केलेल्या कामाचा अहवाल द्यावा.

शिक्षण हक्क कायद्याच्या अनुषंगाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०११ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेतील व्याख्या (ज) नुसार मूल्यमापन याचा अर्थ, विद्यार्थ्यांच्या बाबतीतील अर्थ, विद्याविषयक प्राधिकरणाने विहित केलेल्या मानक दर्जानुसार त्यांच्या नैपुण्याची पातळी ठरविणे असा आहे आणि संस्था व विविध पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्ती यांच्या बाबतीतील अर्थ, त्या प्रभारी असलेल्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सरासरी नैपुण्य पातळीसह त्यांच्या कार्यक्षमतेची पातळी ठरविणे, असा आहे.
यानुसार आपापल्या कार्यक्षेत्रातील शाळांची गुणवत्ता सुधारणे ही अधिकाऱ्यांची जबाबदारी राहील. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेत त्यांचा सुलभकाच्या भूमिकेत सक्रिय सहभाग असणे अपेक्षित आहे.

**१०) विद्यार्थ्यांच्या क्षमता संपादणुकीसाठी कृतिकार्यक्रमाची आखणी :**

१०.१) प्रत्येक विद्यार्थिनिहाय वयोगटानुसार प्रत्येक विषयनिहाय क्षमता संपादणुकीसाठी शिक्षकाने कृतिकार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करावयाची आहे. ४० टक्के पेक्षा कमी गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक मूल शिकेल या उद्देशाने आधुनिक अध्ययन–अध्यापन पद्धतीवर आधारित विशेष कृतिकार्यक्रम विकसित करावयाचा आहे.

१०.२) एखाद्या वर्गात ४० टक्केपेक्षा अधिक विद्यार्थी एखाद्या विषयामध्ये अप्रगत (४० टक्के पेक्षा कमी गुण मिळवणारे) असतील तर त्या शिक्षकाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर स्वयंअध्ययनाचा कृतिकार्यक्रम तयार करून द्यावा. शिक्षकास सदरहू विषयामध्ये प्रशिक्षणाची गरज असल्यास तशी मागणी त्याने केंद्रप्रमुखांकडे नोंदवावी.

१०.३) या शासन निर्णयामध्ये सुरुवातीस दिलेल्या क्षमता संपादणुकीचे उद्दिष्ट पहाता, प्रत्येक वर्गात अप्रगत, साधारण आणि प्रगत या तीन स्तरावरच्या मुलांना शिकण्यास प्रवृत्त करावयाचे आहे. राज्यातील सर्व

शिक्षक प्रशिक्षित असल्यामुळे त्यांना अशा परिस्थितीत बहुवर्ग/बहुस्तर अध्यापन करावे लागते हे ज्ञात आहे. तसेच बालमानसशास्त्रीयदृष्ट्या त्यांना हे ही ज्ञात आहे की, प्रत्येक मूल स्वतःच्या गतीने शिकते. वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते म्हणून सर्व शिक्षकांनी बहुवर्ग/बहुस्तर अध्यापन तंत्रामध्ये पारंगत होण्यासाठी त्याची उजळणी करून घ्यावी.

१०.४) शिक्षणामध्ये बोलीभाषा विषयक प्रयोग– राज्यामध्ये साधारण ६० वेगवेगळ्या बोली भाषांचा उपयोग होतो. प्रमाण मराठी भाषेखेरीज इतर भाषा बोलणाऱ्या मुलांना शिकण्यात अडचणी निर्माण होतात. बरेचसे शिक्षक या अडचणींतून मार्ग काढतात. मुलांच्या भाषेतील शब्द शिकून व वापरून काही शिक्षक मुलांच्या बोलीभाषेचा आदर करतात, काही शिक्षक द्विभाषिक शब्दकोश तयार करतात व यासारख्या अन्य मार्गांनी मुलांशी जवळीक निर्माण करतात आणि मग मुले शिकायला लागतात. इतर मातृभाषांची, बोली भाषांची, परिसर भाषांची मुले वर्गात आढळल्यास शिक्षकांनी स्वतःहून मार्ग शोधावा. इतर राज्यांच्या सीमेवरील जिल्ह्यांमध्ये बोलल्या जाणाऱ्या इतर प्रमाण भाषांचा समावेश या साठ भाषांमध्ये नाही. कानडी द्विभाषिक पुस्तके असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये यावर काही काम सुरू झाले आहे. त्याचप्रमाणे राज्यातील आदिवासी क्षेत्रात बोलल्या जाणाऱ्या १६ परिसर भाषांमध्ये मुलांच्या वाचनासाठी द्विभाषिक पुस्तके तयार केली जात असून ती त्या त्या भागातील सर्व शाळांना पुरविली जाणार आहेत. द्विभाषिक किंवा बहुभाषिक वर्गव्यवस्थापनासाठी ब्ल्यू प्रिंट तयार करणे शक्य आहे. शिक्षकांनी तशी मागणी नोंदवल्यास राज्य पातळीवरून ते तयार करून पुरविले जाईल.

१०.५) प्रत्येक शाळेतील शिक्षकांनी संघ भावनेतून कार्य करावयाचे आहे. एखादा शिक्षक अध्ययन अध्यापनात कमकुवत राहिल्यास पूर्ण शाळेची गुणवत्ता खालावते. तेव्हा अशा शिक्षकांची नावे जाहीर न करता शाळेची गुणवत्ता राखली जाईल याची काळजी घ्यावी. तसेच, संबंधित शिक्षकांनी लक्षात घ्यावे की इतर व्यक्तींकडून शिकण्याची पहिली पायरी सर्वांत जवळ उपलब्ध असलेल्या व्यक्तीकडून असते. त्यामुळे कोणतीही अडचण भासल्यास शाळेतीलच एखाद्या शिक्षकाकडून शिकण्यास प्राधान्य द्यावे. याने संघभावना व एकोपा निर्माण होईल आणि शाळेची गुणवत्तासुद्धा सुधारेल.

## ११) शिक्षकांना सहाय्यभूत प्रशिक्षण कार्यकृती :

११.१) केंद्रप्रमुखांनी प्रत्येक वर्ग आणि विषयांमध्ये एकसुद्धा अप्रगत विद्यार्थी राहणार नाही याकरिता शिक्षकांद्वारे विकसित करण्यात येत असलेला कृतिकार्यक्रम तयार करण्यास मदत करावयाची आहे. तसेच शिक्षकांनी प्रशिक्षणाची मागणी केल्यास तसे प्रशिक्षण स्वतःच्या पातळीवर शिक्षक प्रशिक्षकांद्वारा उपलब्ध करून द्यावयाचे आहे. असे प्रशिक्षण स्वतःच्या पातळीवर आयोजित करणे शक्य न झाल्यास त्याची मागणी गटशिक्षणाधिकारी यांचेकडे करावयाची आहे.

११.२) राज्यात काही ठिकाणी ज्ञानरचनावादास धरून बहुवर्ग/बहुस्तर अध्यापन करण्याची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. अशा ठिकाणी एकसुद्धा अप्रगत विद्यार्थी नाही. त्याचप्रमाणे प्रगत विद्यार्थीसुद्धा अधिक प्रगती करीत आहेत या अप्रगत विद्यार्थ्यांना पुढे घेऊन जात असताना प्रगत विद्यार्थी दुर्लक्षिले जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. राज्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी यांना अशा शाळांचा अभ्यासदौरा तथा कार्यप्रेरणा प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच केंद्रप्रमुखांनाही जिल्हास्तरावर अशाच पद्धतीचे कार्यप्रेरणा प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे. इतरांना असेच प्रशिक्षण घ्यावे असे वाटल्यास त्यांनी तसे नियोजन करावे.

शासनाकडून काही मदत हवी असल्यास त्याची मागणी जिल्ह्यातील गुणवत्ता कक्षामार्फत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे (एससीईआरटी) यांचेकडे नोंदवावी.

११.३) गटातील सर्व शिक्षक सर्व विषयाच्या विषयज्ञानात, अध्यापन पद्धतीत व बालमानसशास्त्रात सक्षम राहतील ही जबाबदारी गटशिक्षणाधिकाऱ्यांची आहे. यापैकी कोणत्याही बाबतीत शिक्षक/केंद्रप्रमुखाकडून प्रशिक्षणाची मागणी आल्यास त्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी गटशिक्षणाधिकारी यांची राहील. हे प्रशिक्षण त्यांनी शिक्षणाधिकारी आणि डाएट/एससीईआरटी/सक्षम अशासकीय संस्था यांच्या मदतीने घेता येईल.

११.४) शिक्षकांना समृद्ध करण्यासाठी त्यांच्या मागणीनुसार प्रशिक्षण देण्यात येणार आहे. एखाद्या केंद्रातील, तालुक्यातील काही शिक्षक ज्या बाबींचे प्रशिक्षण मागतील त्या बाबतीत तेथे प्रशिक्षणे आयोजित होतील.

११.५) गटशिक्षणाधिकारी/डाएट/एससीईआरटी यांनी प्राप्त मागणीप्रमाणे प्रशिक्षणाचा आराखडा तयार करावयाचा आहे. त्याकरिता कोणत्या प्रकारच्या प्रशिक्षणाची मागणी येऊ शकते याचा अंदाज घेऊन आगाऊ तयारी करणे योग्य राहील. इंटरनेटवर बरेचसे ओपन सोर्सेस, वाचन साहित्य, व्हिडिओ क्लिप, ॲक्टिव्हिटीज उपलब्ध आहेत. राज्यातील बऱ्याच स्वयंसेवी संस्थांनीसुद्धा असेच भरपूर साहित्य संकेत स्थळांवर उपलब्ध करून दिले आहे. त्या सर्वांची लिंक डाएट/एससीईआरटी यांनी स्वतःच्या वेबसाईटवर उपलब्ध करून द्यावी. त्याशिवाय शिक्षक/अधिकारी/डाएट/एससीईआरटी यांनी स्वतःहून आवश्यक व्हिडिओ/साहित्य तयार करून व्हॉट्सॲप/वेबसाईटच्या माध्यमातून प्रसारित करावेत. यासाठी एससीईआरटी पातळीवर तंत्रस्नेही शिक्षक आणि संस्थांचा एक कार्यगट तयार केला जाणार असून त्यासाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

**१२) नवोपक्रम शाळांमधून उत्कृष्ट प्रशिक्षक** :

१२.१) सन २०१५-१६ मध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत नवोपक्रमामध्ये प्रत्येक केंद्रपातळीवर एका शाळेची निवड करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने दि. २१ एप्रिल, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्या शाळेतून एका उपक्रमशील शिक्षकास गणित व भाषेसाठी प्रशिक्षक म्हणून तयार करावयाचे आहे. या माध्यमातून राज्यास उत्कृष्ट प्रशिक्षक मिळतील.

१२.२) याप्रकारे निवडलेल्या शिक्षकांना प्रगल्भ करण्यासाठी एससीईआरटी पातळीवर विस्तृत योजना आखण्यात यावी व त्यास राज्यशासनाची मंजुरी घ्यावी.

१२.३) याप्रकारे राज्यभरामध्ये तयार झालेल्या वेगवेगळ्या विषयांच्या प्रशिक्षकांची यादी एससीईआरटीच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावी. जेणेकरून केंद्र, गट व जिल्हा पातळीवर प्रशिक्षण आयोजित करताना पुरेसे प्रशिक्षक उपलब्ध होतील. प्रशिक्षकांची यादी अंतिम करण्यापूर्वी व प्रशिक्षकाचे नाव यादीमध्ये समाविष्ट करण्यापूर्वी प्रत्येक प्रशिक्षकाचे निवडीच्या पुरेशा कारणासह प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा.

**१३) पर्यवेक्षण/सुलभीकरण/Mentoring**

१३.१) मुलांना शिकवण्याची पूर्ण जबाबदारी शिक्षकांची असल्याने वर्गामध्ये शिकविण्याची पद्धत, साहित्याचा वापर इत्यादीबद्दल शिक्षकास संपूर्ण स्वातंत्र्य देण्यात येईल.

१३.२) सद्यस्थितीत सर्वसाधारणपणे ज्याला पर्यवेक्षण संबोधले जाते त्याचे किमान आठ प्रकार असू शकतात ते म्हणजे : १) तपासणी २) सनियंत्रण ३) पर्यवेक्षण ४) मार्गदर्शन ५) मदत ६) समुपदेशन ७) सुलभीकरण

८) मेंटरींग या प्रत्येकाचे वेगवेगळे अर्थ आहेत. याविषयी सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणेला MoT (Management of Training) चे प्रशिक्षण दिले जाईल. पर्यवेक्षकीय यंत्रणेनी यातले शेवटचे चार प्रकार वापरावेत. सुरुवातीचे चार प्रकार गुणवत्तावाढीस फारसे पोषक नाहीत.

१३.३) मुलांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांची गुणवत्ता तपासावी. शिक्षकांनी तयार केलेली कागदपत्रे त्यांच्या स्वतःच्या मदतीसाठी असतात. फक्त त्या कागदपत्रांवर अवलंबून राहू नये. मुलांना प्रश्न विचारताना ते बालमानसशास्त्रीयदृष्ट्या योग्य पद्धतीने विचारावेत. एखादे मूल प्रश्नाचे उत्तर देण्यास असमर्थ असेल असे त्याच्या देहबोलीवरून कळत असल्यास अशा मुलांना अवघड प्रश्न विचारू नयेत. तरीसुद्धा अवघड प्रश्न विचारल्यास आणि त्याला प्रश्नाचे उत्तर न जमल्यास मुलाची गळती होण्याची शक्यता आहे. त्यांना सोपा प्रश्न विचारून, यशाचा आनंद देऊन, त्यांचा आत्मविश्वास वाढवता येतो.

१३.४) वर्गाध्यापन करताना शिक्षकांनी अप्रगत, साधारण आणि प्रगत अशा तीनही प्रकारच्या विद्यार्थ्यांकडे योग्य प्रमाणात लक्ष द्यावयाचे आहे. ते करीत असताना एकाच शैक्षणिक साहित्याचा वापर करून शिकविणे शक्य नाही हे प्रकर्षाने लक्षात ठेवावे.

१३.१) प्रत्येक मूल स्वतःच्या गतीने शिकते, त्यामुळे प्रत्येक मुलाबद्दलचे नियोजन दररोज बदलणार आहे. त्यामुळे मासिक, त्रैमासिक, सहामाही, वार्षिक नियोजनासारख्या ढोबळ कागदपत्रावर अनाठायी भर देऊ नये. अशा प्रकारची कागदपत्रे ठेवण्याबद्दल शिक्षकांना स्वातंत्र्य द्यावे. मात्र शिक्षकांना वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याचे विषयज्ञान, समज, आवडी-निवडी, कल या बालमानसशास्त्रीय बाबी (प्रत्येकी किमान पाच) आणि त्या मुलाच्या अध्ययनाच्या दृष्टीने त्यांचा उपयोग माहित असावयास हवा. सदरच्या बाबी शिक्षकास माहित असल्याबद्दलची खात्री पर्यवेक्षीय यंत्रणेने मूल आणि शिक्षकाशी संवाद साधून करून घ्यावी. त्यासाठी कोणत्याही कागदपत्राची मागणी शिक्षकांकडे करू नये.

१३.२) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती वापरात असल्यामुळे सत्राच्या निकालाची पडताळणी फक्त कागदपत्रे तपासून शक्य नाही. त्यामुळे सत्राअखेरच्या निकालास मान्यता देण्याची प्रथा बंद करण्यात यावी.

**१४) प्रशासकीय व व्यवस्थापकीय मदत** :

१४.१) मुलांना शिक्षकच शिकविणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे शिक्षकांना मुलांसोबत पुरेसा वेळ मिळावा ही प्रशासन/व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. तसेच शिक्षकांमध्ये अध्ययन-अध्यापन कौशल्ये निर्माण करणे व त्यांना पुरेसे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही सुद्धा प्रशासन/व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. शासनाकडून सर्व शिक्षा अभियानांतर्गत सर्व शाळांना यापूर्वी विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आले आहे. सातारा जिल्ह्यातील कुमठे बीट मधील ४० पैकी ३९ शाळा या साहित्याचा सर्जनात्मक पद्धतीने वापर करून आणि त्यात थोडी भर घालून काम करीत आहेत. त्यामुळे या शाळांमध्ये एकही विद्यार्थी अप्रगत नाही. तसेच प्रगत आणि साधारण विद्यार्थी सुद्धा प्रगती करत आहेत. यावरून शासनाचे असे मत आहे की, शाळांना अतिरिक्त साहित्य पुरविले नाही तरीही तीनही गटातील विद्यार्थ्यांची प्रगती करत असताना अप्रगत विद्यार्थिविहीन शाळा निर्माण करणे शक्य आहे.

१४.२) सध्या राज्यामध्ये डिजिटल शाळा तयार करण्याची एक लाट दिसून येते. प्रेरित शिक्षकांकडून लोकसहभागातून मोठ्या प्रमाणावर घडत आहे. यात Corporate Social Responsibility (CSR) अंतर्गत बराच सहभाग मिळत आहे. शासनसुद्धा राज्यनिधीला लोकसहभागाची जोड देऊन आगामी २-३ वर्षात राज्यातील सर्व शाळा

डिजिटल होतील अशी योजना आखत आहे. बऱ्याच जिल्हा परिषदांनीसुद्धा याबाबतीत स्वतःचे लक्ष्य ठरविले आहे.

१४.२.१) डिजिटल शाळा चळवळ : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना राज्य शासन शैक्षणिक व प्रशासकीय कामासाठी Tablet उपलब्ध करून देणार आहे. या सर्व शाळांनी लोकसहभागामधून LCD Projector/ मोठा TV Screen उपलब्ध करून घेतल्यास अशी शाळा डिजिटल शाळा म्हणून काम करण्यास तयार होईल. ज्या शाळा लोकसहभागामधून LCD Projector/ मोठा TV Screen उपलब्ध करून घेतील अशा शाळांना शासनाकडून प्रोत्साहनात्मक आणखी एक Tablet उपलब्ध करून दिला जाईल.

१४.२.२) राज्यशासन जवळपास १७०० केंद्र शाळांमध्ये इंटरनेट सुविधांसह मोठा TV Screen प्रथम टप्प्यात सर्व शिक्षा अभियान अंतर्गत उपलब्ध करून देत आहे. त्याचा वापर ऑनलाइन व ऑफलाईन पद्धतीने करता येणार आहे. त्यामध्ये भरपूर शैक्षणिक ॲप्लिकेशन असणार आहेत. या सुविधांचा वापर शैक्षणिक व प्रशासकीय कामासाठी करण्यात येईल.

१४.२.३) राज्यात ग्रामीण व शहरी भागात ४०८ गट/शहर साधन केंद्र सुरू आहेत. त्या सर्व ठिकाणी पूर्ण वेळ इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. तसेच ८००० माध्यमिक शाळांमध्ये ICT चे केंद्र असून त्याठिकाणीही इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे चाचण्यांची माहिती भरणे, विविध डाटा बेसमध्ये माहिती या ठिकाणावरून भरता येईल.

१४.२.४) आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात पुष्कळ शैक्षणिक ई–साहित्य विविध संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यामध्ये भारत सरकारच्या www.nroer.gov.in, www.ncert.org इत्यादी वेबसाइट्स आहेत. हे ज्ञान सर्वांसाठी खुले असले पाहिजे या तत्त्वाने काम करणाऱ्या काही संस्थांचे साहित्य (शिक्षक व बालकांसाठी उपयोगी) त्यांच्या वेबसाइटवर मोफत उपलब्ध आहे. शासनासोबत ज्यांनी काम केलेले आहे किंवा करीत आहेत अशा संस्थांच्या वेबसाईटसची माहिती येथे दिलेली आहे. शासनाने जाहिरात देऊन इतर संस्थांना निमंत्रित केले आहे. त्यापैकी ज्यांच्या अशा उपयुक्त वेबसाइट असतील त्यांची माहिती नंतर पुन्हा देण्यात येईल.

खाजगी/स्वयंसेवी क्षेत्रातील www.khanacademy.org, www.ceque.org, www.navnirmitilearning.org, www.quest.org.in, www.arvindguptatoys.com, www.pragatshikshansanstha.org, www.palakneet. org, www.rayatshikshan.edu इत्यादीचा समावेश यात आहे. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट २ पहावे. सातारा जिल्ह्यातील कुमठे बीट मधील शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या उपक्रमावर आधारित शैक्षणिक व्हिडिओ यु–ट्यूबवर पुढील लिंकवर उपलब्ध आहेत. www.youtube.com/watch?v=oPMoM५LXwjk, www. youtube.com/watch?v=eTBkiMvt६६०, www.youtube.com/watch?v=u२ddvG३Ano, www.youtube. com/watch?v= p४YfRMftK८M. या सर्व संकेतस्थळाच्या व यु–ट्यूबच्या शैक्षणिक उपयोगाच्यादृष्टीने लिंक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी तंत्रस्नेही शिक्षकांचा एक गट महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथे स्थापित करण्यात येईल. याबाबतचा शासन निर्णय स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

१४.३) मुलांना स्वतःच्या गतीने शिकण्यासाठी Activity Based Learning (ABL) ही उत्तम पद्धती पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यामध्ये चांगली रुजली आहे. राज्यस्तरावर प्राप्त माहितीप्रमाणे ती वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये पुढीलप्रमाणे पसरत आहे.

१४.३.१) ठाणे जिल्हा परिषदेच्या मदतीने सर्व वर्ग १ ली ते ४ थी च्या शाळा

१४.३.२) पुणे जिल्ह्यातील इंदापूर आणि पुरंदर गटातील शाळा

१४.३.३) विदर्भ वैधानिक विकास महामंडळाच्या वतीने विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यातील २५ शाळा.

१४.३.४) गोंदिया जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून रु. १४ लाखाचा वापर.

१४.३.५) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून रु. ७५ लाखाचा वापर करून १६६ शाळा

१४.४) मागील वर्षी वाचन, लेखन व गणित विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली आहे. याचे परिणाम स्वरूप प्रकट वाचन करू शकणाऱ्या मुलांच्या संख्येत १५% नी वाढ झालेली दिसते तर समजपूर्वक वाचन, स्वलेखन आणि श्रुतलेखन या भाषा अध्ययनाच्या क्षमतांमध्ये १७% ते २०% नी वाढ झाली आहे. गणिताच्या मूलभूत क्षमतांमध्ये संख्या ओळख असणाऱ्या मुलांच्या संख्येत १७% ते २०% वाढ झालेली दिसते तर संख्यांवरील क्रिया म्हणजे बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार सोडवू शकणाऱ्या मुलांच्या संख्येत १०% ते १५% नी वाढ झाली आहे.

१४.५) राज्यातील बऱ्याच शाळा ISO ९००० प्रमाणित आहेत. पुणे व औरंगाबाद जिल्ह्यात सर्वाधिक शाळा ISO ९००० प्रमाणित झाल्या असून गडचिरोली जिल्ह्यातसुद्धा एक शाळा ISO ९००० प्रमाणित झाली आहे. ISO ९००० शाळेसाठी दाखला मिळविणे खर्चिक बाब आहे. परंतु स्वखर्चातून करण्यात येत असलेल्या प्रयत्नांना शासनाचा पाठिंबा राहील. कारण यामुळे शाळेतील शिक्षकांना काम करण्याचे एक लक्ष्य प्राप्त होते व ते प्रेरित होतात.

१४.६) चंद्रपूर आणि पालघर मधील जिल्हा परिषदांनी क्रियाशील शिक्षक व अधिकाऱ्यांची निवड करून त्यांच्या मदतीने इतर शिक्षकांच्या मदतीकरिता त्यांच्या गरजांचा शोध घेतला आहे. पुणे महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या नेतृत्वाखाली कार्पोरेट्स आणि स्वयंसेवी संस्था मिळून शिक्षकांना सतत मदतीची व्यवस्था उपलब्ध करून देत आहेत.

१४.७) राज्यशासन माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थी, शिक्षक आणि शाळा या सर्वांची माहिती वर्षातून एकदाच गोळा करणार आहे. यापुढे शिक्षकांकडून वर्षभर माहिती न मागविता प्रशासन चालविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळे यापूर्वी विविध संचालनालयाकडून वर्षातून १३० प्रकारची मागविण्यात येणारी माहिती कमी प्रमाणात मागवावी लागणार आहे.

१४.८) काही जिल्हा परिषदा शिक्षकांची रजा मंजुरी सुरळीत करण्यासाठी व शाळाभेट अहवाल सादरीकरण इत्यादीसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करीत आहेत.

१४.९) वरील बाबी शिक्षकांना निवांतपणे मुलांसोबत उपयोगी वेळ देण्यासाठी सहाय्यभूत ठरत आहेत. प्रत्येक जिल्हा आणि गट पातळीवर शासन निर्णय शिप्रयो २२१४/प्रक्र ५३/२०१४/प्रशिक्षण दि. २१ नोव्हेंबर, २०१४ अन्वये गुणवत्ता कक्ष निर्माण करण्यात आला आहे. या कक्षाने वरीलप्रमाणे विचार करून शिक्षकांसाठी सुलभकाची भूमिका पार पाडावी.

**१५) शिक्षक/अधिकाऱ्यांचा सन्मान :**

१५.१) शिक्षण हक्क कायदा यशस्वीपणे राबविणे राष्ट्रीय जबाबदारी आहे. ती जबाबदारी पार पाडण्यासाठी सर्वात महत्त्वाचा घटक शिक्षक आहे. त्यासोबत त्यांना सहाय्यभूत ठरणारी यंत्रणा आहे. त्यामुळे ही राष्ट्रीय

जबाबदारी पार पाडण्यात यशस्वी झालेल्या व्यक्तींचा सन्मान व्हायला हवा. त्यासाठी पहिला निकष अप्रगत विद्यार्थिविहीन वर्ग तयार करणे हा राहील. दुसरा निकष, हे करत असताना साधारण आणि प्रगत मुलांच्या प्रगतीत कोणतीही बाधा येऊ न देणे हे राहील. या दोनही निकषात पात्र ठरलेल्या सर्व शिक्षकांचा सन्मान केला जाईल. असे मूल्यांकन वर्षातून एकदा केले जाईल आणि दरवर्षी पात्र शिक्षकांचा सन्मान केला जाईल.

१५.२) सन्मानाची सर्वात नजिकची पातळी शाळा व्यवस्थापन समिती राहील. केंद्र, गट, जिल्हा व राज्य पातळीवर सन्मान करावयाचे ठरल्यास प्रत्येक पातळीवर वरील दोन निकषासह अन्य निकष जोडले जातील.

१५.३) मूल्यमापनाचा मूळचा घटक शाळा असल्यामुळे मुख्याध्यापक यांचा सन्मान करण्यात येईल. त्याचप्रमाणे एखाद्या केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी किंवा गट शिक्षणाधिकारी यांचा त्यांचे अखत्यारित सन्मान घेणाऱ्या कार्यरत शिक्षक व शाळा यांची संख्या व टक्केवारी विचारात घेऊन सन्मान दिला जाईल. याबाबत स्वतंत्ररित्या शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

**१६) शिक्षक/अधिकारी यांचे कार्याचे मूल्यमापन :**

दरवर्षी प्रत्येक शिक्षक आणि अधिकारी यांचे मूल्यमापन करून गोपनीय अहवाल तयार केला जातो. सन्मानासाठी ठरविलेल्या निकषाच्या आधारे गोपनीय अहवाल लिहिण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येईल. यापूर्वी कामाच्या मूल्यमापनाचा मापनात्मक (Measurable) निर्देशांक नव्हता. त्यामुळे गोपनीय अहवाल Subjective असायचा तो यापुढे Objective राहील.

**१७) शिक्षक/अधिकारी यांचे Job Chart (कार्यसूची)चे पुनर्विलोकन :**

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात शिक्षक आणि सर्व पातळीवरील अधिकारी यांचे Job Chart (कार्यसूचीचे) पुनर्विलोकन करण्यात येईल. साधारण आणि प्रगत विद्यार्थ्यांची प्रगती कमी होऊ न देता अप्रगत विद्यार्थिविहीन महाराष्ट्र राज्य या उद्देशानुसार सर्वांच्या Job Chart मध्ये योग्य ते बदल करण्यात येतील.

**१८) विभागीय संरचना आणि शिखर संस्थांचा अभ्यास :**

शिक्षण हक्क कायदा, २००९ आल्यानंतर विभागाची प्रशासकीय संरचना त्यास साजेशी आहे किंवा त्यामध्ये काही बदलाची आवश्यकता आहे या हेतूने वैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास करण्यात येईल. त्याचप्रमाणे शिखर शैक्षणिक संस्थांच्या अभ्यासासाठी युनिसेफने मदत सुरू केली आहे. अभ्यासाअंती आवश्यकतेप्रमाणे पुनर्रचना व बळकटीकरण करण्याचे नियोजन करण्यात येईल.

**१९) शिक्षकांच्या पदस्थापनेत समतोल राखणे :**

**U-DISE वरून काही वेळा दिसून येते की, स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रमाणात कमी शिक्षक तर काही शाळांमध्ये अतिरक्त शिक्षक असतात. असे निदर्शनास आल्यास संबंधित प्राधिकाऱ्यांनी तात्काळ शिक्षकांचे समायोजन करून समतोल साधावा अन्यथा अशा बाबी राज्य शासनाच्या निदर्शनास आल्यास राज्यपातळीवरून कार्यवाही करण्यात येईल.**

**२०) चाइल्ड ट्रॅकिंग सिस्टिम :**

२०.१) राज्यातील अधिकांश मुलांचे आधारकार्ड तयार करण्यात आले असून उर्वरित मुलांचे आधारकार्ड मिळविण्यासाठीची मोहीम शासन निर्णय दि. २२/०४/२०१५ अन्वये हाती घेण्यात आली आहे. पुढील दोन महिन्यात सर्व मुलांना आधारकार्ड मिळवून दिली जातील अशी अपेक्षा आहे.

२०.२) त्याबरोबरच NIC च्या मदतीने शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी इत्यादी बाबतची डाटाबेस माहिती आज्ञावली तयार करण्यात येत आहे. विभागातील सर्व प्राधिकाऱ्यांनी सर्व मुलांचे आधारक्रमांकासह या आज्ञावलीत डाटा एन्ट्री करावी.

२०.३) NIC च्याच मदतीने एससीईआरटीमार्फत राज्यस्तरीय चाचणीत प्रत्येक मुलाला मिळणाऱ्या गुणांचे ट्रॅकिंग करण्यासाठी आज्ञावली तयार करण्यात येत आहे. प्रत्येक चाचणीनंतर या सिस्टिममध्ये प्रत्येक मुलाच्या गुणांची डाटा एन्ट्री करावयाची आहे. या गुणांची डाटा एन्ट्री झाल्यावर प्रत्येक मुलाचा अध्ययन संपादणूक स्तर सर्व स्तरावर कळणार आहे. त्यामुळे राज्यात फक्त Child Tracking System तयार होत नसून Child Educational Quality Tracking System सुद्धा तयार होत आहे. या प्रणालीमुळे मुले शाळेत नियमित येत आहेत किंवा नाहीत यासोबतच ते शिकत आहेत की नाही हे लक्षात येणार आहे. शिकत नसलेल्या मुलांची हजेरी वाढवयाची आहे की अन्य उपाययोजना करावयाच्या या बाबी शाळा पातळीवरच्या कृतिकार्यक्रमात दिसून येतील.

**२१) Bio - Metric हजेरी व्यवस्था :**

सर्व विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या हजेरीसाठी प्रत्येक शाळा पातळीवर Bio - Metric उपस्थिती व्यवस्था करण्यात येईल.

**२२) शाळाबाह्य मुले :**

२२.१) शाळेत कधीही दाखल न झालेली मुले – राज्यात काही मुले अजूनही शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल नाहीत. त्यांची नावेसुद्धा हजेरी पटावर नाहीत. अशा मुलांचे सर्वेक्षण स्थानिक पातळीवर घेण्यात यावे. राज्य शासनसुद्धा सर्वेक्षण मोहीम हाती घेणार आहे. याबाबतचा शासन निर्णय ओससी ४४१५/(१०२/१५) एसडी ४, दिनांक २० मे, २०१५ राजी निर्गमित करण्यात आला आहे. अशी मुले शोधल्यावर लगेच त्यांचे आधार क्रमांक मिळविण्यात येऊन ज्या शाळेच्या परिसरात ते दिसले त्या शाळेच्या हजेरी पटावर व U–DISE मध्ये त्यांची नावे नोंदविण्यात यावीत.

**२२.२) अनियमित मुले – अनियमित मुलांचे दोन प्रकार करता येतील. एक जे शाळेत नियमित हजर राहत नाहीत. परंतु शाळेच्या परिसरातच (गावात/वॉर्डात) राहतात. दुसरी मुले जी शाळेत अनियमित असतात आणि कुटुंबासह स्थलांतरित होतात.**

**२२.३) शाळेच्या परिसरातच राहणारी अनियमित मुले – अशा मुलांचे शाळेत न येण्याच्या कारणांपैकी महत्त्वाचे एक कारण शिक्षकांबद्दल भिती असू शकेल. वरवर काहीही आर्थिक किंवा कौटुंबिक कारण दिसत असेल तरी अशा मुलांबद्दल शिक्षणतज्ज्ञ किंवा समुपदेशकांकडून सखोल चौकशी करून घ्यावी. त्याने या मुलांना शाळेच्या नियमित प्रवाहात दाखल करणे शक्य होईल. शिक्षकांच्या भीतीमुळे अनियमित असल्यास आणि संबंधित शिक्षकांबद्दल माहिती मिळाल्यास त्यांचे नाव गुप्त ठेवून त्यांचे सुद्धा समुपदेशन करण्यात यावे. त्यांना विविध विषयांचे प्रशिक्षण घेण्यास प्रेरित करावे.**

**२२.४) स्थलांतरित होणारी अनियमित मुले –**

**२२.४.१) काही मुले पालकांसोबत इतर ठिकाणी स्थलांतरित होतात. स्थलांतराचे ठिकाण राज्यात किंवा राज्याबाहेर असू शकेल. त्यांचा स्थलांतरणाचा दिनांक साधारणपणे शिक्षकांना माहिती असतो. अशा मुलांसाठी आजतागायत साधारणपणे दोन प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. एक, गावातच हंगामी निवासी वसतिगृह तयार करून मुलांचे स्थलांतर थांबविणे. अशी**

**वसतिगृहे राज्यात बीड, नंदुरबार व अन्य जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतराच्या काळात सुरू केली जातात. काही वेळा वसतिगृह मंजूर करण्यामध्ये विलंब झाल्यामुळे मुले स्थलांतरित झाल्यावर वसतिगृह उघडली जातात. अशा वसतिगृहांचा स्थलांतरण थांबविण्यासाठी काहीच उपयोग होत नाही. याबाबतीत असा आदेश देण्यात येत आहे की, मागील वर्षी ज्या ठिकाणी वसतिगृह सुरू करण्यासाठी ज्या तारखेपासून आणि जेवढ्या क्षमतेसाठी प्रस्ताव आले होते त्यास त्याच तारखा आणि क्षमतेसाठी आताच मंजुरी द्यावी. याबाबतची उचित कार्यवाही महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडून करण्यात यावी. मात्र वसतिगृह सुरू केल्यापासून एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष वसतिगृह सुरू केल्याची तारीख आणि प्रत्यक्ष प्रवेश घेतलेल्या मुलांबद्दल माहिती प्राप्त करून त्याची शहानिशा करून (मुलांचे आधार क्रमांक) घ्यावी.**

२२.४.२) दुसरी उपाययोजना जी आजतागायत फार प्रभावीपणे राबविली जाऊ शकली नाही. ती म्हणजे मुले. स्थलांतर होऊन ज्या शाळेच्या परिसरात जातील त्या शाळेत प्रवेश घेऊन शिक्षण घ्यावे. Child Tracking System विकसित होत असल्यामुळे प्रत्येक मुलाला मुळच्या शाळेच्या ठिकाणी शिक्षण हमी कार्ड Education Guarantee Card देण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे. या कार्डामध्ये मुळच्या शाळेत मुलाने प्राप्त केलेल्या विषयनिहाय क्षमता, मुळच्या शाळेचा U-DISE Code आणि स्थलांतराच्या ठिकाणच्या शाळेचा U-DISE Code, त्या शाळेचा पूर्ण पत्ता, मुख्याध्यापकाचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी माहिती नमूद केली जाईल. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास सुद्धा या मुलाच्या आगमनाची तारीख इत्यादी माहिती पुरविली जाईल.

२२.५) शिक्षण हक्क कायद्यातंर्गत राज्याने केलेल्या नियमात ३० दिवस सतत गैरहजर मुलांना सुद्धा शाळाबाह्य मानले आहे. अशा मुलांची नावे शाळेच्या हजेरी पटावर असल्यास किंवा हजेरीपटावरून कमी केलेली असल्यास त्यांची नावे सुद्धा Child Tracking System मध्ये घेण्यात यावी. या मुलांचे सुद्धा आधारक्रमांक मिळविण्यात यावेत.

२२.६) काही उत्साही शिक्षकांनी मुलांना लोकसहभागातून Tablet मिळवून दिले आहेत. या Tablet चा वापर घरातील टीव्हीला जोडून शिकण्याच्या सरावासाठी सुद्धा करतात. याने संपूर्ण कुटुंब त्या शैक्षणिक कृतीत सहभागी होत आहे. शाळेच्या परिसरात राहणाऱ्या अनियमित मुलांसाठी अशा प्रकारे विविध प्रयोग करण्यात यावेत. यातून अनियमित मुलांना शिकविण्यासाठी काही चांगले मार्ग मिळण्याची शक्यता आहे.

२२.७) वरील विविध प्रकारच्या शाळाबाह्य मुलांना नियमित शाळेत त्यांच्या वयोगटानुरूप वर्गात दाखल करून विशेष प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या वर्गशिक्षकाची राहणार आहे.

## २३) कार्पोरेट/स्वयंसेवी संस्थांचा सहभाग :

कार्पोरेट/स्वयंसेवी संस्थांचा शाळा विकास, विद्यार्थी विकास, संस्थांचे सक्षमीकरण इत्यादी बाबींसाठी सहकार्य व सहभाग घेण्याकरिता राज्य शासनाने दिनांक ९ जून, २०१४ व १३ फेब्रुवारी, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. तसेच दिनांक २४ जुलै,२०१४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक गुणवत्तेच्या अनुषंगाने स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून पथदर्शी तत्त्वावर नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे. या सर्व माध्यमातून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांत कार्पोरेट व स्वयंसेवी संस्थांचा सहभाग व सहकार्य घेण्यात यावे. कार्पोरेट/स्वयंसेवी संस्थांचा सहभाग व योगदानात सुसूत्रता आणण्यासाठी स्वतंत्र निवेदनाद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

**२४) विविध समांतर कार्यक्रमाची अंमलबजावणी :**

राज्याच्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन कार्यक्रमाची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी व त्यामध्ये सक्रीय सहभागी होऊन त्यास बळकट करण्याकरिता राज्यातील सर्व प्राधिकारी यांना आवाहन करण्यात येत आहे. विविध प्राधिकारी स्थानिक पातळीवर वेगवेगळे शैक्षणिक कार्यक्रम राबवितात. सदरचे कार्यक्रम भावनिक पातळीवर विचार करून सरसकट न राबविता त्यामध्ये सुसंगतपणा व सुसूत्रता आणण्यासाठी यापुढील काळात खालील बाबी लक्षात घेऊन त्याप्रमाणे गरजेनुसार नवीन कार्यक्रम राबविण्याबाबत विचार व्हावा. (वाचा : परिशिष्ट १)

२४.१) प्रगत, साधारण व अप्रगत मुलांचा विचार करून त्या प्रत्येकाचे शिक्षण होईल याची काळजी घ्यावी.

२४.२) शिक्षकांना त्यांच्या मागणीनुसार व व्यक्तिगत गरज विचारात घेऊन प्रशिक्षण दिले जावे. शिक्षकांच्या शैक्षणिक स्वातंत्र्यावर गदा येणार नाही याची नोंद घ्यावी.

२४.३) शिक्षकांना मुलांसोबत वर्गामध्ये भरपूर वेळ मिळाला पाहिजे त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची अशैक्षणिक व इतर कामे लादू नयेत. तसेच शिक्षक शाळेबाहेर राहणार नाहीत याची काळजी घ्यावी. अथवा गुणवत्तावाढीच्या कामाच्या पूर्ततेसाठी अतिरिक्त माहिती मागविली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

२४.४) वरील बाबी विचारात घेऊन, विविध प्राधिकारी यांना स्थानिक पातळीवर शैक्षणिक कार्यक्रम राबवावयाचे झाल्यास त्याबाबत संबंधित स्तरावरील गुणवत्ता कक्षात चर्चा करावी व त्या कार्यक्षेत्रातील शिक्षक व अधिकाऱ्यांचा सहभाग घेऊन निर्णय घ्यावा.

**२५) खर्च तरतूद** :

पायाभूत चाचणी, संकलित मूल्यमापन १ व २ मधील चाचणी, त्रयस्थ संस्थेमार्फतच्या चाचण्या, चाचणीचे संगणकीकरण, माहितीचे विश्लेषण, अहवाल निर्मिती इत्यादिसाठी आवश्यक आर्थिक तरतूद राज्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल.

**वरील प्रमाणे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक प्रगती चाचण्या सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व माध्यमाच्या मान्यताप्राप्त शाळांमधून इयत्ता पहिली ते आठवीमधील सर्व विद्यार्थांसाठी लागू राहतील. एक वर्षानंतर सदर कार्यक्रमाचा आढावा घेऊन आवश्यक ते बदल करण्यात येतील.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०६२४१२२१३५९२२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**Nand kumar**

Digitally signed by Nandkumar
DN: c=IN, o=All India Service, ou= IAS
postal code = 110001, St = Maharashtra,
serial Number = dcd3577ebf0e05e2a8b5709
5c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a3
62ebc5, cn = Nand kumar
Date : 2015.08.04. 17:22:32 + 05'30'

**(नंद कुमार)**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट – एक

## या शासन निर्णयामागची तत्त्वे आणि विश्लेषण

**प्रमुख तत्त्व** : शिक्षकांना संकल्पनात्मकदृष्टया समृद्ध करणे. शिक्षकांच्या संकल्पनांमध्ये विषयज्ञान, बालमानसशास्त्र आणि अध्यापन शास्त्र या तीन घटकांना समावेश असणे आवश्यक आहे. गुणवत्ता विकासाची योजना भावनिक स्तरावर न करता बौद्धिक स्तरावर करणे म्हणजे कार्यकारणभावाचे विश्लेषण करून चिन्हित केलेल्या समस्यांवर उपाययोजना करणे. म्हणजेच तर्कशुद्ध पद्धतीने वैज्ञानिक दृष्टिकोनाचा वापर करून योजना आखणे.

> ''उपाययोजना दोन पातळ्यांवर होतात. एक भावनिक पातळी व दुसरी बौद्धिक पातळी. काही मुले लिखाण व वाचनामध्ये मागे पडत आहेत म्हणून लिखाणाचे व वाचनाचे कार्यक्रम घेणे हा भावनिक पातळीवरील निर्णय झाला.''– **एका शिक्षकाचे मनोगत**

### १. गुणवत्ता वाढीसाठी विभिन्न अभियान चालवणे –

विद्यार्थ्यांस एका इयत्तेमधील शिक्षण पूर्ण करण्यासाठी एक वर्ष लागते. म्हणजेच विद्यार्थ्यांस पदवीपर्यंत १५ वर्षे लागतात. हे माहीत असून देखील शिक्षणक्षेत्रात गुणवत्तेसाठीचे अभियान चालवले जाते. अभियान काही ठरावीक काळापुरते चालवले गेल्यास यशस्वी होते. परंतु, शिक्षण ही एक निरंतर प्रक्रिया आहे. त्यामुळे गुणवत्तावाढीचे कार्यक्रम सातत्यपूर्ण सुरू असणे आवश्यक आहे. दीर्घकालीन उद्दिष्टासाठीचा कार्यक्रम काही काळापुरता असल्यास तो राबवू नये. परंतु, तोच कार्यक्रम दीर्घकालीन प्रक्रियेचा भाग असल्यास तो राबविण्यास हरकत नाही.

### २. सरसकट राबविणे –

शिक्षणामध्ये विद्यार्थी मागे राहिले की लेखन–वाचन प्रकल्प राबविणे वर–वर योग्य असल्याचे दिसते. परंतु, खोलात गेल्यास उणीवा जाणवायला सुरुवात होते. एका संस्थेच्या अहवालानुसार राज्यात वर्ष २०१०–११ साली पाचव्या वर्गातील ९४% मुलांना दुसऱ्या वर्गाचा मजकूर वाचता येत होता. तेच प्रमाण २०१४–१५ साली घसरुन ७४% इतके झाले. म्हणजे वाचन करू शकणाऱ्या मुलांचे प्रमाण २०% नी घसरले आहे. यामध्ये सुधारणा करावयाची असल्यास काय करावे? सरसकट लेखन–वाचन प्रकल्प राबविल्यास ७४% मुले ज्यांना वाचता येते त्यांचा वेळ वाया जाणार व ते पुढच्या बाबी शिकण्यापासून वंचित राहणार. परिणामी त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. चाललो होतो शैक्षणिक गुणवत्ता वाढवायला आणि उलटेच करून बसलो असे काही घडायला नको याची काळजी घेण्यात यावी.

त्याचप्रमाणे काही शिक्षक वर्गात असलेल्या मुलांकडे लक्ष देऊन भाषा, गणित हे विषय शिकविण्यावर जास्तीचा भर देण्याचे कार्य करीत असतील आणि अशा शिक्षकांनासुद्धा लेखन, वाचन प्रकल्प राबवावा लागला तर त्यांचाही वेळ वाया जाईल. पुन्हा परिणाम उलटा होईल. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता विकासाचा कोणताही कार्यक्रम हाती घेतांना खूप विचारपूर्वक काम करावे लागेल. लेखन–वाचन प्रकल्प विचारपूर्वक केल्यास फक्त त्याच विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करावे लागेल ज्या विद्यार्थ्यांना लिहिता–वाचता येत नाही. मुलांची मातृभाषा निराळी असल्यामुळे अडचणी असतील तर मातृभाषेतून लिपीपरिचय करून पद्धतशीरपणे प्रमाणभाषेकडे नेणारे अध्यापन शास्त्र त्या कार्यक्रमात वापरावे लागेल. ते करीत असताना जे शिक्षक विद्यार्थिनिहाय लक्ष द्यायला शिकले नाहीत, अशाच शिक्षकांच्या वर्गातील लेखन–वाचनामध्ये मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांकडेच लक्ष द्यावे. विद्यार्थिनिहाय लक्ष केंद्रित करणाऱ्या शिक्षकांच्या वर्गात लेखन–वाचनामध्ये मागे राहणारे विद्यार्थी असले तरी त्या मुलांसाठी प्रकल्प राबवू नयेत. बालमानसशास्त्र समजणारा शिक्षक ते कार्य स्वतःहून करू शकेल यावर आपला विश्वास असायला हवा.

राज्यात एका शिक्षिकेला नव्याने इयत्ता तिसरीचा वर्ग शिकवण्यास मिळाला. सदरच्या वर्गावरील त्यापूर्वीच्या शिक्षकाने त्या वर्गातील एका मुलीला मतिमंद घोषित करून ती काही शिकू शकणार नाही असा विश्वास पसरवला होता. नव्या शिक्षिकेला त्या मुलीमध्ये कोणतीही अडचण जाणवली नाही. फक्त जुन्या शिक्षिकेसोबत न शिकता गेलेल्या तिच्या वेळेची तूट भरून काढण्याची आवश्यकता भासली. – **शिक्षकाने जबाबदारीने विद्यार्थ्यांच्या क्षमतांवर शिक्कामोर्तब करावे.**

३. **शिक्षकांनी अधिक वेळ द्यावा –**

वरील बॉक्स वाचल्यानंतर कोणत्या शिक्षकाचा अधिक वेळ कामाचा आहे हे स्पष्ट होते. कोणत्याही शिक्षकाने अधिक वेळ मुलांना शिकविल्यास मुलांचे शिक्षण सुधारणार असा विश्वास ठेवणे योग्य नाही. शिक्षकाला बालमानसशास्त्र, अध्यापन शास्त्र आणि विषयज्ञान असेल तरच वेळेचा जास्त उपयोग मुलांना होईल अन्यथा नाही. परंतु, वरील तीन बाबींची जाण असलेल्या शिक्षकांना–विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी जास्त वेळ द्या असे सांगण्याची वेळच येणार नाही.

४. **वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळांच्या भेटी वाढवाव्यात –**

येथे सुद्धा भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांचे बालमानसशास्त्र, अध्यापन शास्त्र, विषयज्ञान आणि मानसशास्त्राविषयीचे ज्ञान तसेच उपयोजन क्षमतेवर त्या भेटीचा नफा–तोटा अवलंबून राहणार आहे.

एका शाळेतील चौथीच्या वर्गात केंद्रप्रमुख शिरले. त्यांना दाखवून द्यायचे होते की ते केंद्रप्रमुख असल्यामुळे शिक्षकांपेक्षा मोठे आहेत. त्यांनी सर्वात कमी आत्मविश्वास असणाऱ्या दोन मुलींना एक–एक करून उभे केले. त्यांना त्यांच्या मते अवघड (म्हणजे पाच अक्षरी) शब्द वाचायला सांगितले. त्या दोन्ही मुलींना ते जमले नाही. मुलींना तसेच शिक्षिकेला काही येत नाही इत्यादी सांगत दाटून–दपटून ते निघून गेले. ते गेल्यानंतर एक मुलगी म्हणाली, – असा कसा हा माणूस. दुसऱ्या दिवशी दोन्ही मुली वर्गात गैरहजर राहिल्या.– **आपली प्रत्येक कृती ही शिक्षण क्षेत्रातील संबंधित सर्व घटकांनी विचारपूर्वक करावी.**

५. वरील भेटीचा शैक्षणिक फायदा झाला असे म्हणता येणार नाही. शिक्षिकेला अधिकाऱ्यांना हाताळता आले नाही तर त्या दोन्ही मुलींची गळती होणारच. शासन एकेका विद्यार्थ्याला शाळेत आणण्यासाठी जमीन–आसमान एक करणार आणि असे अधिकारी शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांना शाळेबाहेर फेकणार. त्यामुळे जर अधिकाऱ्यांना खालील शब्दांमधील फरक लक्षात येईल आणि त्याप्रमाणे ते वागतील तरच त्यांच्या भेटी सत्कारणी लागणार आहेत. अन्यथा त्यांनी शाळाभेट न दिलेलीच चांगली.

६. **अधिक मूल्यमापन केल्यास मुले अधिक शिकतील –**

वरच्या बॉक्समध्ये केंद्रप्रमुखाने केलेल्या मूल्यमापनातून मुले अधिक शिकतील असे वाटत नाही. त्या मुलींच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण होऊन त्या शिकण्यापासून परावृत्त होतील. शिष्यवृत्ती परीक्षेबद्दल सुद्धा असेच एक बालमानसशास्त्रीय विश्लेषण करता येते. अभ्यासात पुढे असणारी मुले वरच्या काठिण्यपातळीचे गणित सोडवण्याचा आनंद घेतील, तर अभ्यासात मागे असणारे विद्यार्थी अधिक कठीण पातळीचे गणित पाहून गणित हा विषयच त्यांच्या आवाक्याबाहेर आहे असा विचार करतील. कोणतेही मूल्यमापन मुलांना शिकण्यासाठी मदत करणारे असायला हवे. त्यांच्या भावना दुखावणारे नसावे. मुलांच्या संपादणूक पातळीची जाण शिक्षकांना असतेच. शिक्षकांना त्यांची माहिती असूनसुद्धा मुले मागे राहतात.

मुलांना पूर्ण स्वातंत्र्य देत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याकरिता दुसरी उपाययोजना बौद्धिक पातळीवरील आहे. मुले अनेक दिवस शाळेत जातात, शिक्षक त्यांना शिकवतात तरीदेखील मुलांना शिकण्यात अनेक अडथळे येतात. त्यामागील कारण शोधून शास्त्रीय पद्धतीने त्यावर उपाय करणे ही बौद्धिक पातळीवरील उपाययोजना आहे. या पद्धतीच्या वापराने समस्या सुटणे शक्य आहे अन्यथा आपण समस्येमध्येच गुरफुटून जाऊ आणि तिथेच गरगरत राहू.**– गुणवत्तापूर्ण शिक्षण या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे.**

७. शिक्षकांच्या हातात जेवढी तंत्रे आहेत ती सगळी वापरल्यानंतरसुद्धा ही परिस्थिती असते. त्यामुळे शिक्षकाला अधिक तंत्रे शिकण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांच्या अधिक मूल्यमापनाची आवश्यकता नाही. तसेच, एखादा विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा पास होऊ शकेल किंवा त्याचा आनंद घेईल असे त्याच्या शिक्षकाला वाटत असल्यासच त्या विद्यार्थ्याला परीक्षेला बसवावे. येथेसुद्धा सरसकटचा नियम अयोग्य आहे.

८. **वयानुरूप वर्गांमध्ये दाखल केलेली मुले** –
अशा मुलांना शिक्षकांनी अधिक वेळ देऊन शिकवण्याचा विचार असतो. मग ही मुले नियमित वर्गामध्ये असताना शिकतात की नाही याचा विचार करावयाची गरज आहे. त्याने बाहेरून शिकलेले ज्ञान व स्वतःचे स्वतः शिकण्यासाठी अवगत केलेली पद्धत वापरून, त्याचा आत्मसन्मान जपत त्याला शिकविण्याचे तंत्र शिक्षकांनी शिकले पाहिजे. वर्गातील दिलेल्या वेळेचा उपयोग मुलाला होत नसल्यास त्यांच्या आयुष्याचा तेवढा वेळ आपण वाया घालवतो असा होईल. नियमित वर्गामध्ये जाणारा वेळ मुलाला उपयोगाचा वाटत नसल्यास ते मूल शाळा सोडून देईल.

९. **शाळाबाह्य मुले** –
सर्वेक्षण करून या मुलांना शाळेत आणल्यानंतरसुद्धा वरीलप्रमाणे वर्तन राहिल्यास ते मूल शाळेत नियमित येणार नाही. त्यामुळे आजच्या घटकेला शाळाबाह्य मुलांना प्रवाहात आणण्यासाठी काही ठोस उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे.

१०. **स्थलांतरित होणारी मुले** –
सध्याचा विचार हा स्थलांतरित मुलांना स्थलांतरित ठिकाणच्या शाळेत घालण्याचा आहे. त्या ठिकाणीसुद्धा शिक्षकाला बहुस्तरीय शिक्षण जमत नसल्यास या विचाराचा काहीच फायदा होणार नाही. त्यामुळे नवीन विचार करावयाची गरज आहे.

२. **अभ्यासात मागे राहणारी मुले** –
पाचव्या वर्गापर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जर लिहिता–वाचता येत नसल्यास त्या वर्गाला शिकवणाऱ्या शिक्षकाला वाचन–लेखन कार्यक्रमाचे प्रशिक्षण देणे योग्य असा सरसकट नियम लावता येणार नाही. पुढील बॉक्स पहा. या प्रकरणात त्या मुलांना चौथ्या वर्गापर्यंत शिकवणाऱ्या शिक्षकांचे शोध घेऊन त्या शिक्षकांना बालमानसशास्त्र, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अध्यापन शास्त्र शिकवण्याची गरज आहे.

सध्या राज्यामध्ये एका पाचवीच्या वर्गामध्ये प्रत्यक्ष घडत असलेली ही गोष्ट – एकूण ४९ मुले असलेल्या वर्गात चार महिन्यापूर्वी १७ मुलांना अक्षर ओळखसुद्धा नव्हती. पण आता तेवढेतरी विद्यार्थ्यांना यायला सुरुवात झाली आहे. चार महिन्यात मुले शिकू शकतात तर चार वर्षात का नाही? असा प्रश्न त्या वर्गाच्या शिक्षकाने केला. **असे आत्मपरीक्षण प्रत्येक शिक्षकाने करणे गरजेचे आहे.**

### ३. आदिवासी मुले –

राज्यात स्पष्ट दिसते की, नंदुरबार, नाशिक, अमरावती, ठाणे, गडचिरोली जिल्हे गणित आणि भाषा या दोन्ही विषयांमध्ये मागासलेले आहेत. एका स्वयंसेवी संस्थेच्या सर्वेक्षणानुसार ते भाषेपेक्षा गणितामध्ये जास्त मागासलेले आहेत. त्यामुळे शिक्षकांना गणिताचेच अधिक प्रशिक्षण देणे चांगले असे म्हणता येणार नाही. कारण सदरहू परिसरात मोठ्या प्रमाणात मराठी भाषा बोलली जात नसल्यास गणितामध्ये मागे राहण्याचे कारणसुद्धा मुलांना भाषा न समजणे हे असू शकते.

शिक्षक प्रशिक्षण – वरील बाबींचा विचार करता स्पष्ट आहे की, राज्य किंवा जिल्हा किंवा तालुका आणि केंद्रपातळीपर्यंतसुद्धा सरसकट शिक्षक प्रशिक्षण देता येणार नाही. सध्याचे प्रशिक्षण त्याप्रमाणे आयोजिले जाते. मग आश्चर्य नाही की, शिक्षक या प्रशिक्षणांना विरोध करतात. अशा प्रशिक्षणानी शिक्षकांना मदत तर मिळत नाही. उलट त्यांना वर्गात कमी वेळ मिळण्याची खंत असते. जसे मुलांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन शिक्षकांनी मुलांना शिकवायचे आहे. तसेच, शिक्षकांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन प्रशासन आणि प्रशिक्षण यंत्रणेने त्यांना मदत करावयाची आहे.

### ४. शिक्षकांना प्रेरित करणे –

इतरांनी सांगून कोणीच प्रेरित होत नाही. प्रेरणा नेहमी आतून असते. त्यामुळे वर्गातील मुलांना स्वतःचे मूल समजून शिकवा या व अशा वाक्यांनी काही होणार नाही. आजतागायत प्राप्त ज्ञानाच्या आधारावर माणसांना प्रेरित करणे सहज सोपी गोष्ट नाही. काही वेळा वरिष्ठ पदावर असलेल्या मंडळींनादेखील ते जमत नाही. मग त्यांना उपलब्ध असलेल्या काही अधिकाराची भाषा ते बोलायला सुरुवात करतात. कारवाई करणार, सस्पेंड करणार किंवा डिसमिस करून टाकणार असे ते बोलतात. पण नंतर तसे ते करत नाहीत. असे शब्द आणि वाक्य भावनिक पातळीवरची आहेत. त्यामुळे मानसिक वातावरण खराब होते आणि मानवीयता वितळते. तसेही शिस्त आणि अपील नियमांमध्ये कारवाई करण्याबद्दल उल्लेख नाही.

### ५. गुणवत्तेमध्ये मागे असल्याबद्दल कारवाई करणे –

सुरुवातीला आपण पाहिले की, गुणवत्ता मिळवणे ही दीर्घकाळाची बाब आहे. कारवाई करणे ही क्षणिक बाब आहे. त्यामुळे दोन्हीचा संबंध लावता येणार नाही असे तात्त्विकरित्या दिसते.

**नापास न करण्याचा नियम आणि गुणवत्ता ढासळणे –**

शिक्षण हक्क कायद्याचा हा सर्वात विवादित मुद्दा आहे. बरेच लोक नापास न करणे आणि पास करणे या दोन्हीला सारखेच समजतात त्यामुळे सुद्धा विवाद वाढताना दिसतो. खरे तर हा नियम निसर्गाच्या जन्म आणि मृत्यूच्या नियमानुकूल आहे. प्रत्येक माणूस जन्मल्यानंतर वयानुरूप शरीराने मोठा होतो, तो तरुण होतो, वयस्कर होतो म्हातारा होतो आणि त्यानंतर मृत्यू पावतो. जन्माला आलेली सर्व माणसे साधारणपणे १०० वर्षांनी मरण पावतात. माणूस त्यांच्या समवयस्क लोकांसोबत जगतो आणि मरणही पावतो. त्यामुळे त्याला इतर वयातील लोकांसोबत ठेवणे नैसर्गिक नियमांच्या विरोधात असून त्याच्यासाठी ती शिक्षा आहे. त्याला शिक्षा करायची नाही म्हणून नापास करायचे नाही. शिक्षण हक्क कायदा येण्यापूर्वी नापास करण्याचा नियम होता. बऱ्याच लोकांना नापास केले गेले. शाळेत नापास होणाऱ्या लोकांचे पास होणाऱ्या लोकांपेक्षा वय किती वर्षांनी कमी असते असा प्रश्न विचारला तर या प्रश्नालाच लोक विनोद म्हणतील, आपण शाळेत एखाद्या व्यक्तीला नापास केले तरी निसर्गाला ते मान्य नाही. आपण नापास करूनसुद्धा ते आपल्या सोबतच जगणार आहेत म्हणजेच ते पास होण्याच्या लायकीचे आहेत. तरीदेखील आपणाला ते नापास होण्याच्या लायकीचे दिसतात. सबब, आपण निसर्गाच्या नियमाच्या विरुद्ध असल्यामुळे एकूण शिक्षण आणि

मूल्यमापन इत्यादीबाबतची प्रक्रिया तपासून घेण्याची गरज आहे. ते तपासता येत नसल्याने सध्याची शिक्षणव्यवस्था नापास ठरत आहे. मग शिक्षणव्यवस्थेतील लोकांना घरी पाठवायचे का? तसे आजतागायत झाले नाही आणि पुढेही होणार नाही. आपण व्यवस्थेला सुधारण्याचा प्रयत्न करतो जसे व्यवस्थेला कायम ठेवून सुधारण्याची संधी देतो. तसेच, मुलांना वयानुरूप वर्गात ठेवून शिकण्याची संधी देणे हा आहे नापास न करण्याचा नियम. व्यवस्थेमध्ये कुवत तयार झाल्यास अशी मुले क्वचितच दिसतील.

## परिशिष्ट – २

## शिक्षक, अधिकारी व बालकांसाठी उपयुक्त वेबसाइट्स

ज्ञान सर्वांसाठी खुले असले पाहिजे या तत्त्वाने काम करणाऱ्या काही संस्थांचे साहित्य (शिक्षक व बालकांसाठी उपयोगी) त्यांच्या वेबसाइटवर मोफत उपलब्ध आहे. शासनासोबत ज्यांनी काम केलेले आहे किंवा करीत आहेत अशा संस्थांना वेबसाईटसची माहिती खाली उदाहरणादाखल नमूद केलेली आहे. शासनाने जाहिरात देऊन इतर संस्थांना निमंत्रित केले आहे. त्यापैकी ज्यांच्या अशा उपयुक्त वेबसाइट असतील त्यांची माहिती नंतर पुन्हा देण्यात येईल.

**नवनिर्मिती लर्निंग फाऊंडेशन (www.navnirmitilearning.org.) :**

नवनिर्मिती संस्था २००० सालापासून जि.प., न.प., म.न.पा व आदिवासी भागातील शाळा, SSC, CBSE, ICSE, IGCSE शाळांमध्ये गणिताच्या सार्वत्रिकीकरणाचे काम करीत आहेत. वास्तव परिस्थितीत प्रत्येक मूल गणित शिकू शकते हे या शिक्षकांनी सिद्ध केलेले आहेत. नवनिर्मिती टीमने भारतभरात, दक्षिण आफ्रिकेत आणि टर्कीमध्ये मिळून सुमारे २०००० शिक्षकांच्या गणित कार्यशाळा घेतल्या आहेत. प्रत्येक मूल गणित शिकेल अशी पद्धत प्रत्यक्ष वर्गात वापरण्यासाठीच्या शिक्षक हस्तपुस्तिका, मूल्यमापन संच, इयत्ता १ ते ४ च्या मुलांसाठी वर्कबुक्स, ५ ते ८ मधील ज्या मुलांचा पाया कच्चा आहे अशांसाठी सेतू कोर्स कृती व अभ्यासपुस्तिका, अपूर्णांक व चिन्हांकित संख्या बुकलेट्स असे प्रत्यक्ष कार्यक्रमातून तयार व यशस्वी झालेले साहित्य इंग्रजी, मराठी व हिंदीतून freely downloadable form मध्ये उपलब्ध आहे. विज्ञान–भूगोल–भूमिती–अंकगणित यांचा एकात्मिक अनुभव देणाऱ्या, मुलांनी स्वतः साहित्य बनवून करण्याच्या दिवसाच्या खगोलशास्त्राच्या – wow प्रयोगांचे व्हिडिओज व पुस्तिका हिंदी, इंग्रजी व मराठीतून day time astronomy या विभागात उपलब्ध आहेत.

**Centre for Equity and Quality in Universal Education :**

www.ceque.org व्यापक स्तरावर गुणवत्ता शक्य आहे, हा विश्वास आधी व्यवस्थेच्या आणि प्रत्येक व्यक्तीच्या मनात आवश्यक आहे या विचाराने ही ना नफा तत्त्वावरील संस्था कार्यरत आहे. चांगले काम करणाऱ्या शिक्षकांच्या वर्गातील अनुभव व्हिडिओच्या स्वरूपात तयार करणे, अशा व्हिडिओजची एक बँक तयार करणे, त्यावर चर्चा व देवाणघेवाण होईल असे व्यासपीठ निर्माण करणे, त्याद्वारे शिक्षकांचे समृद्धीकरण होणे असा उद्देश ठेवून काम चालू आहे. या वेबसाइटवरील Teacher Pages या विभागात भाषा, गणित, भूगोल, विज्ञान इ. अनेक विषयांवर प्रत्यक्ष वर्गात शिक्षक करीत असलेल्या कामांचे व्हिडिओ उपलब्ध आहेत.

**क्वेस्ट :** www. quest.org.in.

QUEST ही संस्था गेली आठ वर्षे प्राथमिक बालशिक्षण, प्राथमिक शिक्षण व शिक्षक–शिक्षण या क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेच्या www.quest.org.in. शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक संसाधने, मोफत उपलब्ध करून दिली आहेत. वेबसाईटच्या होम पेज वरील Teacher Area या विभागात अनेक उपयुक्त लिंक आहेत. शिक्षक अभ्यास मंडळाचे व्यासपीठ या पानावर सुमारे ३०० सदस्य शिक्षण विषय चर्चा करतात. संस्थेमार्फत वेबसाईटच्या माध्यमातून शिक्षकांसाठी गणित व

भाषा शिक्षणाचा ऑनलाईन कोर्स मराठीतून चालवला जातो. तसेच अनेक शिक्षणविषयक लेख साईटसवर उपलब्ध आहेत. या शिवाय वर्गांतर्गत प्रक्रिया दाखवणाऱ्या सुमारे ७० व्हिडिओ क्लिप उपलब्ध आहेत. मुलांसाठी इंग्रजी व मराठीतून ऑडिओ गोष्टीही उपलब्ध आहेत.

**प्रगत शिक्षण संस्था** : www. pragatshikshansanstha.org शिक्षण क्षेत्रात गेली ३० वर्षे कार्यरत असणारी प्रगत शिक्षण संस्था अनेक बाबतीत पथदर्शी संस्था आहे. संस्थेचा इतिहास व व्यक्ती यांचे काम वाचण्यासारखे आहे. संशोधन व संसाधने या टॅब मध्ये शिक्षकांनी केलेली कृती संशोधने, नवोपक्रम, फेलोशिपचे अहवाल उपलब्ध आहेत. तसेच संस्थेची प्रकाशने, प्रथम भाषेच्या २ फिल्म्स, बालवाडीच्या १६ फिल्म्स, इंग्रजी शब्द–भांडार वाढविण्यासाठी असणाऱ्या उपक्रमांची जि. प. शाळेत चित्रित केलेली फिल्म Here is a Tree - Part 1 व 2 असे सर्व शैक्षणिक साहित्य व शिक्षणविषयक अनेक लेख मोफत उपलब्ध आहेत. CLLC ग्रंथालयातील सुमारे १०० भाषा विषयक संदर्भ ग्रंथांची यादी पहायला मिळेल. कमला निंबकर बालभवन या टॅबमध्ये मुलांनी केलेले वार्षिक प्रकल्प, पर्यावरण प्रकल्प, ICT चे प्रकल्प तसेच मुलांचे लिखाण व के. एन. बी. बुलेटीन वाचायला मिळेल. ब्लॉग्स मध्ये शाळेतील उपक्रम वाचायला मिळतील.

**पालकनीती** : www.palakneeti.org पालकनीती हे मुळात संवादासाठीचं व्यासपीठ. १९८७ पासून पालकनीतीनं शिक्षण आणि पालकत्वासंबंधी अनेक मूलभूत मुद्द्यांवर मांडणी केली आहे. २००४ पासूनचे अंक व त्यातील जवळपास २००० लेख पालक–शिक्षक आणि इतर जिज्ञासूंसाठी www.palakneeti.org या संकेतस्थळावर विषयनिहाय उपलब्ध आहेत. मुलांच्या आणि त्यांच्या सोबत आपल्याही वाढण्या–घडण्याच्या संदर्भातला समृद्ध आणि मूलभूत विचारांचा साठा या लेखांच्या रूपानं आपल्याला सापडेल. शिक्षणाचे माध्यम, शिक्षण हक्क कायदा, शिक्षणातले बदलते प्रवाह आणि इतर सामाजिक प्रश्नांची चर्चा पालकनीतीच्या संवादकीय आणि लेखांमध्ये आहे. यातील सर्व लेख UNICODE मध्ये असल्याने आपण शोधा हा पर्याय वापरून आपण विषयानुसार, शीर्षकानुसार किंवा शब्दानुसार लेख शोधू शकतो व freely download करू शकतो. पानाच्या खालच्या भागात काही निवडक, वेचक लेख आपल्याला – **हे जरूर वाचा** या विभागात वाचायला मिळतील. तसेच उत्साही लेखक आपलं लिखाण–**आपले लेखन पाठवा** यावर click करून पालकनीतीकडे पाठवू शकतात.

**रयत शिक्षण संस्था** : rayatshikshan.edu रयत शिक्षण संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात फार मोलाचा वाटा सुमारे १०० वर्षांपूर्वीपासून उचललेला आहे. त्यांचे शैक्षणिक काम, प्रकल्प यांची माहिती वेबसाइटवर आहे. धोरणात्मक, शैक्षणिक व प्रशासकीय बाबींची थोडक्यात व सोप्या शब्दात मराठीतून माहिती देण्याऱ्या पुस्तिका वेबसाइटवर आहेत. उदा. ज्ञानरचनावाद म्हणजे काय?, शिक्षण हक्क कायदा, माझी समृद्ध शाळा इ.

**अरविंद गुप्ता** : arvindguptatoys.com अरविंद गुप्ता व त्यांची टीम गेली अनेक वर्षे मुलांच्या विज्ञान शिक्षणामध्ये काम करीत आहे. मुलांना प्रयोग करीत करीत विज्ञान शिकता यावे यासाठी सातत्याने विज्ञान खेळणी/प्रयोग निर्माण करीत आहेत. कोणतीही गोष्ट/जेव्हा मुलं हाताने करतात तेव्हा ती गोष्ट मुलांना सहज समजते हेच तत्त्व डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी मुलांच्या आनंददायी शिक्षणासाठी परिसरात सहज उपलब्ध होणारे साहित्य वापरून १००० विज्ञान खेळणी/प्रयोग बनविले आहेत. या सर्व प्रयोगांच्या छोट्या फिल्म्स निर्माण करून त्या यु–ट्युबवर उपलब्ध करून दिल्या आहेत. जगभरातून ३०००० लोक रोज या फिल्म्स वापरतात. मुलांना प्रयोग सहज करता यावेत यासाठी सर्व प्रयोगांचे ११००० फोटो सुद्धा ठेवले आहेत.

शिक्षक, पालक, बालक व प्रत्येक शिक्षणप्रेमीसाठी अनेक विषयांवरची, अनेक भाषांमधील ५००० पुस्तके या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. यात इंग्रजी, हिंदी, मराठी व संमिश्र भाषांमधील पुस्तके आहेत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : शै. गु. वि. २०१५/(११५/१५)/एस.डी. ६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२
दिनांक : ०७ जुलै, २०१५

**वाचा : शासन निर्णय, शैगुवि २०१५/(८०/१५), एस. डी. ६, दिनांक २२ जून, २०१५.**

**शासन परिपत्रक :**

शासन निर्णय दिनांक २२ जून, २०१५ अन्वये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून करणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर आदेशाचा हेतू हा विद्यार्थ्यांच्या गणित व प्रथम भाषा या विषयाची शैक्षणिक प्रगती तपासणे करिता चालू शैक्षणिक वर्षामध्ये विविध चाचण्या घेणे व त्यामध्ये सुधारणा करणे करिता शिक्षक व अधिकारी यांना त्यांचे गरजेनुसार संकेतस्थळ, व्हिडिओ यासारख्या नवीन स्रोतांचा वापर करणेसाठी त्यांना स्वातंत्र्य देणे हा आहे.

सदरहू शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे गणित व मराठी विषय सुधारण्याकरिता काही **महत्त्वाचे मुद्दे** पुढीलप्रमाणे आहेत. त्याचे अवलोकन करून शिक्षण क्षेत्राशी संबंधित व्यक्तींनी त्याचा अवलंब करावा असे वाटते.

**गणित**

१. विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाच्या आकलन क्षमतेमध्ये सुधारणा करणेसाठी विद्यार्थ्यांची गणित विषयासंबंधीची समज, कौशल्ये, विचार क्षमता इत्यादी तपासण्यासाठी काही वेगळ्या प्रकारच्या प्रश्नांचा अंतर्भाव चाचण्यांमध्ये केला आहे. विद्यार्थ्यांना कदाचित या प्रकारच्या प्रश्नांचे अनुभव या आधी मिळाले नसतील. त्यामुळे अशा प्रकारच्या प्रश्नांच्या चाचणीपूर्वी सराव करून शिक्षकांनी जरूर घ्यावा. त्यामुळे विद्यार्थ्यांना ते प्रश्न चाचणीमध्ये सोडविणे सोपे होईल. सदरचे प्रश्न गोपनीय नाहीत परंतु, चाचणीतील विशिष्ट प्रश्नांची उत्तरे पाठ करून घेऊ नयेत, याची दक्षता घ्यावी.

२. विद्यार्थ्यांची संख्याबाबतची समज लक्षात घेताना केवळ त्यांचे संख्येचे वाचन/लेखन तपासून भागत नाही. विद्यार्थ्यांस एखादी संख्या वाचण्यास किंवा लिहिण्यास सांगितली तर त्यातील संख्येनुसार ती त्याला एकक–दशक–शतक या स्थानानुसार वाचता/लिहिता आली पाहिजे. विद्यार्थ्यांना अंकाचे स्थान समजून देण्यासाठी शिक्षकांनी काड्यांचे गठ्ठे, मणी, माळा यांचा वापर करावा. तसेच एक, दहा, शंभर, पाचशे व एक हजाराच्या खोट्या नोटा जमवून अथवा मुलांच्या मदतीने कार्डांवर लिहून संख्या तयार करणे, जमिनीवर अथवा पाटीवर आखलेल्या कोष्टकामध्ये ती मांडणी व त्यानुसार संख्या अंकात लिहिणे ती वाचणे याचा पुन्हा–पुन्हा सराव करून घ्यावा.

३. मुलांना वरील प्रकारचे अनुभव/प्रात्यक्षिक देऊन चाचणीपूर्वी सराव जरूर करून घ्यावा. आपण या चाचण्या चांगला निकाल दाखवण्यासाठी आपणही चाचणी घेत नाही तर सदरच्या चाचण्या या आपण सध्या अध्यापन व अध्ययन या क्षेत्रामध्ये कोणत्या टप्प्यावर आहोत याचे आकलन करून घेण्यासाठी घेत आहोत. जेणेकरून आपणांस पुढील कामाची आखणी करणे सोपे जाईल. निकाल चांगला यावा यासाठी चाचण्यांमधीलच प्रश्नांची उत्तरे पाठ करून घेऊ नका. चाचण्यांमधील प्रश्न पहा व त्याचा मार्गदर्शका सारखा वापर करावा. चाचण्यांमधील प्रश्न पहा, संख्या बदलून, प्रश्न बदलून त्याप्रकारचे प्रश्न सोडवून घ्या. मुलांची समज वाढू द्या.

४. विद्यार्थ्यांची गणित विषयाची समज वाढण्यासाठी पुढील प्रकारच्या प्रात्यक्षिकांचा समावेश करता येईल–

- एखाद्या गणिताविषयी चिंतन/मनन करून त्याचे उत्तर लिहिण्याचे किंवा लेखी चाचण्यांमध्ये विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहून काढणे.
- प्रतिकांचा वापर करून संख्या वाचून/लिहून दाखविणे किंवा संख्या वाचन/लिहून प्रतीके सांगणे.
- त्रिकोण, चौकोन, आयत यामधील चौकटी मोजून गुणाकार करणे.
- टेलरिंगटेप/मोजपट्टीच्या साहाय्याने लांबी मोजणे, परिमिती मोजणे.
- कोनमापकाच्या साहाय्याने कोन मोजणे व दिलेल्या मापाचा कोन काढणे.
- कंपासच्या साहाय्याने वर्तुळ काढणे.
- रंगवलेला भाग अंश छेद रूपात व दशांशात लिहिणे, सांगितलेला अपूर्णांक रंगवणे.

विद्यार्थ्यांची गणित विषयाची लेखी परीक्षा घेत असताना फक्त गणिताची समज आणि गणिताचे उत्तर आले किंवा नाही आले इतकेच शिक्षकाने तपासावे. उत्तरामध्ये मांडणी, रीत, शुद्धलेखन यातील काहीही तपासायचे नाही. त्या करिता इयत्ता दुसरी व तिसरीच्या मुलांसाठी एक एक प्रश्न वाचत ते प्रश्न त्यांना समजावून सांगावेत त्यानंतर त्यांना सोडविण्यास सांगावेत. अगदी आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गरज असेल तेथे प्रश्न वाचून दाखवावेत.

**प्रथम भाषा**

भाषा ऐकून समजणे, बोलता येणे, वाचून समजणे आणि भाषा लिहिता येणे ही भाषा विकासाची चार प्रमुख अंगे आहेत. पायाभूत चाचणीतून या चारही अंगाचा विकास कसा करता येईल याबाबतची चाचपणी व्हावी असा उद्देश आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांची भाषा विषयासाठी तोंडी व लेखी असे दोन्ही प्रश्न–प्रकारात चाचणी घेण्यात यावी.

भाषेच्या विकासासाठी विद्यार्थ्याची आठ ते दहा मिनिटे तोंडी चाचणी घेऊन त्यामध्ये त्याला विविध प्रश्न विचारावेत. वर्गात जास्त पटसंख्या असणाऱ्या शिक्षकांनी रोज पाच ते सहा विद्यार्थी या प्रमाणात आठवडाभर तोंडी चाचणी घ्यावी.

विद्यार्थ्यांच्या प्रकट वाचनाचे निरीक्षण करणे हा भाग तोंडी चाचणीत नव्यानेच प्रस्तुत करण्यात येत आहे. सदरचे निरीक्षण कसे करावे या विषयीच्या सविस्तर सूचना तोंडी चाचणी सोबतच्या प्रश्नावली सोबत पाठवण्यात येणार आहेत. (वाचणे म्हणजे लेखी मजकुराचा अर्थ लावणे आणि लिहिणे म्हणजे आपल्या मनातील विचार, भावना लिहून व्यक्त करणे असा अर्थ लक्षात घेऊन सदरची प्रश्नावली बनवण्यात आली आहे.)

वाचन आणि लेखनही औपचारिक शिक्षणाची साधने आहेत. त्यांच्यावर पुरेसे प्रभुत्व नसेल तर इतर शालेय विषय शिकतानाही अडचणी येतात. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याला समजून वाचता येणे आणि स्वतःच्या मनाने लिहिता येणे हे आपले ध्येय आहे.

प्रथमच वाचायला शिकलेल्या विद्यार्थ्यास त्यांच्या अनुभव विश्वातील मजकूर वाचायला मिळणे, त्याचे आकलन त्यास होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे इयत्ता पाचवीपर्यंत ग्रामीण व शहरी मुलांसाठी एकाच कठीण पातळीचे पेपर तू वेगवेगळ्या विषयावरील मजकूर चाचणीत वापरण्यात आले आहेत. शहरातील एखाद्या विद्यार्थ्यास सार्वजनिक बागेविषयीचा मजकूर समजायला सोपा वाटेल तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यास गावातील जत्रा, गोष्ट, बातमी, जाहिरात, कविता या बाबतचा विवरणात्मक उतारा असे विविध लेखन प्रकार मुलांना 'वाचून आकलन' या प्रश्नात दिले आहेत. सदर प्रश्नाचा सराव करीत असताना शिक्षकांनी त्यांचे परिसारातील विविध मजकुराचे लिखाण करावे व त्याचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घ्यावा.

साधारणपणे विद्यार्थ्याच्या घरामध्ये बोलली जाणारी भाषा व शाळेमध्ये शिक्षणासाठी वापरली जाणारी भाषा यामध्ये बरेच अंतर आहे. विद्यार्थी त्याचे विचार, भावना लिखाणाच्या स्वरूपातून अभिव्यक्त करीत असताना उपरोक्त दोन्ही

भाषांचा वापर करतो. त्यावेळी शिक्षकांनी असे लिखाण चुकीचे मानून न घेता विद्यार्थ्यांस त्याच्या लिखाणातून काय म्हणायचे आहे हे समजून घ्यावे. मुलांची अभिव्यक्ती कशी तपासावी या बाबतची सविस्तर माहिती चाचणीसोबत दिली आहे.

अशा प्रकारच्या चाचण्यांचे आयोजन केल्यामुळे वर्गातील अध्यापन व अध्ययन या प्रक्रियेला दिशा प्राप्त होईल.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०८०४१२०२४५८१२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**Nand kumar**

Digitally signed by Nandkumar
DN: c=IN, o=All India Service, ou= IAS
postal code = 110001, St = Maharashtra,
serial Number = dcd3577ebf0e05e2a8b5709
5c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a3
62ebc5, cn = Nand kumar
Date : 2015.08.04. 12:05:59 + 05'30'

**(नंद कुमार)**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत**– मा. मंत्री शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

**प्रत**– माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव

१. आयुक्त (शिक्षण) आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद), पुणे
४. शिक्षण संचालक, (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, पुणे
६. शिक्षण संचालक (अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण), शिक्षण संचालनालय, पुणे
७. आयुक्त महानगरपालिका (सर्व)
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
९. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग
१०. मुख्याधिकारी सर्व नगरपालिका/नगरपरिषद
११. शिक्षण निरीक्षक उत्तर/दक्षिण/पश्चिम
१२. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
१३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर) जिल्हा परिषद (सर्व)
१४. शिक्षणाधिकारी/शिक्षण प्रमुख/प्रशासनाधिकारी, महानगरपालिका (सर्व)

## महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
### शासन निर्णय क्रमांक : शैगुवि २०१६/(२९–२०१६)/एस.डी.६

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२,
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१६.

**पार्श्वभूमी :**

सन २०१५–१६ मध्ये सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शिक्षण सचिव यांना काही इतर बाबींसह खालील नमूद बाबी (Key Result Areas) साध्य करण्याचे उद्‌दिष्ट दिले होते.

१. राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या मूल्यांकनात राज्याला प्रथम तीन क्रमांकात आणणे.

२. दहावीपर्यंत मुलींच्या गळतीचे प्रमाण ५ टक्केच्या खाली आणणे.

यातील पहिल्या मुद्द्याच्या अनुषंगाने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम आखण्यात आला व त्यानुसार दिनांक २२ जून, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**१. 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' :**

या कार्यक्रमाचा हेतू खालीलप्रमाणे आहे.

१.१ प्रत्येक विद्यार्थ्याने वयोगटानुरूप अपेक्षित क्षमता प्राप्त करणे.

१.२ याची तपासणी शैक्षणिक प्रगती चाचण्यांद्वारे करून ज्या विषयामध्ये/क्षमतेमध्ये विद्यार्थ्यांना अडचणी असतील त्यासाठी कृतिकार्यक्रम आखून अंमलबजावणी करणे. जेणेकरून प्रत्येक विद्यार्थी प्रभुत्व पातळीकडे वाटचाल करू शकेल.

१.३ कार्यक्रमाच्या सुरुवातीची दोन वर्षे फक्त भाषा व गणित या विषयातील क्षमता संपादणुकीसाठी विशेष लक्ष पुरविणे.

१.४ या प्रक्रियेत शिक्षकाला मदत करणे व शिक्षकांच्या सुलभीकरणाच्या भूमिकेस सुयोग्य दिशा देणे.

१.५ या गोष्टी साध्य करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक घटकांचे सबलीकरण करणे.

१.६ शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.

**२. 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रमाची उपलब्धी :**

'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या शासन निर्णयामुळे 'शिकलेले मूल दाखवा' असे स्पष्ट आदेश शासनातर्फे देण्यात आलेले आहेत. सन २०१५–१६ या शैक्षणिक वर्षात 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या कार्यक्रमामुळे शिक्षण व्यवस्थेमधील झालेले सकारात्मक बदल व परिणाम स्पष्टपणे जाणवू लागले आहेत.

२.१ कुमठे बीट जि. सातारा या बीटमधील ४० शाळांमध्ये यशस्वीपणे राबविण्यात येत असलेले ज्ञानरचनावाद पद्‌धतीने शिक्षण हे सर्वदूर प्रसिद्‌ध झाले आहे. तेथून अनुभवाने शिकून ज्ञानरचनावाद पद्‌धतीने शिकविण्याच्या पद्‌धतीमध्ये बहुतांश प्राथमिक शाळांमध्ये बदल दिसत असून राज्यामध्ये ४१,८८४ इतक्या शाळांमध्ये ज्ञानरचनावाद रुजविण्यास यश मिळाले आहे.

२.२ Activity based learning ऊर्फ कृतियुक्त शिक्षण या पद्धतीचा उपयोग ११,०५८ शाळांमध्ये होत आहे.

२.३ ISO Certification च्या माध्यमातून अनेक शाळा स्वत:चा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करताना दिसत असून, राज्यातील १,८१९ इतक्या शाळा ISO Certified झाल्या आहेत.

२.४ शिक्षकांचे सत्कार सार्वत्रिक झाले असून शाळा स्तर, केंद्र स्तर व गट स्तरावर देखील शिक्षकांना सन्मानित केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

२.५ टेक सॅव्ही ग्रुप हा तंत्रज्ञानाची आवड असणारा शिक्षकांचा ग्रुप तयार झालेला असून यामार्फत वेबसाईट, शैक्षणिक साहित्य, शैक्षणिक व्हिडिओ, फिल्म्स, डॉक्युमेंट्स तयार केले जात आहेत. राज्यात आज रोजी ३५,००० इतक्या शिक्षकांनी टेक सॅव्ही ग्रुपमध्ये नोंदणी केलेली आहे.

२.६ शैक्षणिक विकासासाठी लोकसहभागाची चळवळ खऱ्या अर्थाने घडताना दिसत असून लोकसहभागातून समृद्ध शाळा करण्यासाठी सर्व घटक प्रयत्नशील असल्याचे दिसत आहे. आजपावेतो लोकसहभागातून अंदाजे रु. ९०.०० कोटी इतका निधी जमा झाला असून शाळा डिजिटल करण्याकडे विशेष प्रयत्न होत असल्याचे आढळून येत आहे. राज्यात मागील वर्षात सुमारे १५ हजार शाळा लोकसहभागातून Digital झाल्या आहेत.

शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी देखील निरंतर प्रयत्न होताना दिसत आहेत. स्थलांतर रोखण्यास मोठ्या प्रमाणात यश आले असून स्थलांतरित मुलांसाठी Education Guarantee Card तयार करण्यात आलेले आहे. शाळाबाह्य मुले शाळेत येतील व शिकतील यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न सुरू आहेत. मागील वर्षी बुलडाणा जिल्ह्यातील मेहकर तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा आणि राधानगरी या राज्यातील तीन तालुक्यांनी शाळाबाह्य मुले विरहित तालुके (६ ते १४ वयोगट) घोषित केले आहेत.

**३. माध्यमिक स्तरावर गळतीचे प्रमाण :**

३.१ गतवर्षी या विषयावर विविध बैठकांमध्ये चर्चा करण्यात आली. सुरुवातीस चर्चेत फक्त प्रशासकीय मुद्दे/कारणे, जसे काही शाळा फक्त दहावीत १००% निकाल दाखवण्याच्या हेतूने कच्च्या मुलांना इयत्ता ९वीत मुद्दामहून नापास करतात, तर काही शाळांमध्ये दहाव्या इयत्तेत नववीपेक्षा कमी तुकड्या मंजूर असल्याने त्या शाळांना मुलांना नवव्या इयत्तेत नापास करावे लागते, आठव्या इयत्तांपर्यंत नापास न करण्याचे धोरण असल्यामुळे कच्ची मुले नवव्या इयत्तेत पोहोचतात त्यामुळे ती नापास होतात इत्यादी कारणे बैठकांमध्ये चर्चे दरम्यान मांडण्यात आली.

३.२ तथापि शाळांनी नवव्या इयत्तेत नापास केल्यावरसुद्धा तीच मुले फॉर्म नं. १७ भरून दहावी इयत्ता पास होतात हे कशावरून? असेही काही प्रश्न लोकांकडून विचारण्यात आले. काहींनी याच्याशी निगडित गैर प्रकारांबाबतसुद्धा चर्चा केली. तसेच फॉर्म नं. १७ भरणारी बरीच मुले काही ठरावीक शाळांमधूनच का बसतात, असाही प्रश्न उपस्थित केला गेला.

३.३ मुलांचे नापास होण्याचे कारण काहीही असो, परंतु नवव्या इयत्तेत मोठ्या प्रमाणावर मुले नापास होत असल्यामुळे नवव्या इयत्तेनंतर गळतीचे प्रमाण मोठे आहे हे स्पष्ट आहे. ही बाब खालील आकड्यांवरून अधिक स्पष्ट होते. (Source - U-DISE 2015-16)

३.३.१ सन २०१३-१४ मध्ये नवव्या इयत्तेत नापास मुलांची संख्या - २,५९,०००

३.३.२ सन २०१४-१५ मध्ये नवव्या इयत्तेत नापास मुलांची संख्या - २,४५,०००

३.४ तसेच दहाव्या वर्गात वर्षभर बसून परीक्षेस न बसणाऱ्या मुलांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

३.४.१ सन २०१३-१४ - १,०२,५६६

३.४.२ सन २०१४-१५ - १,४४,८०१

३.५ याशिवाय दहाव्या इयत्तेच्या परीक्षेत बसल्यानंतर नापास होणाऱ्या मुलांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

३.५.१ सन २०१३–१४ – १,५१,६९१

३.५.२ सन २०१४–१५ – १,३८,२६१

अर्थात वरील सर्व मुले वेळच्या वेळी पास झाली असती तर सन २०१३–१४ मध्ये २,५९,००० मुलांची तर सन २०१४–१५ मध्ये २,४५,००० मुलांची गळती रोखता आली असती. यामधून काही मुले फॉर्म नं. १७ इत्यादी भरून पास होत असतील. तरीसुद्धा या सर्व संख्यांचे ढोबळ विश्लेषण करणे उपयोगाचे ठरेल.

३.६ राज्यात साधारणपणे दरवर्षी २० लाख मुले पहिल्या वर्गात दाखल होतात. सन २०१३–१४ साली सर्व बोर्ड मिळून १५,१२,७८७ मुले दहावीच्या परीक्षेस बसली. म्हणजेच ४,८७,२१३ मुले गळली. त्याची टक्केवारी २४.३६ टक्के होती. त्याचप्रमाणे सन २०१४–१५ मध्ये १५,४९,७४४ मुले दहावीच्या परीक्षेस बसली. अर्थात त्यावर्षी गळतीचे प्रमाण २२.५१ टक्के होते.

३.७ नवव्या आणि दहाव्या इयत्तेपर्यंत पोहोचलेली सर्व मुले पास झाली तर सन २०१३–१४ मध्ये १६,१५,३१५ मुले व सन २०१४–१५ मध्ये १६,९४,५४५ मुले पास झाली असती. तेव्हा गळतीचे प्रमाण त्या वर्षांमध्ये क्रमशः १९.२३ टक्के व १५.२७ टक्के राहिले असते. दहा वर्षांपूर्वी मुलांची संख्या कमी होती असे गृहित धरले तरी सध्या इयत्ता १०वी पर्यंत गळतीचे प्रमाण १२ ते १५ टक्के आहेच.

३.८ काही बैठकांमध्ये माध्यमिक शिक्षणातील मुले आर्थिक परिस्थितीमुळे शाळा सोडतात किंवा शिक्षण पूर्ण करू शकत नाहीत अशी कारणे समोर आली. त्याचे विश्लेषण करणे योग्य राहील.

गरीब परिस्थितीतील मुलांसाठी माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेणे अवघड जाते. आठव्या वर्गापर्यंत लागणाऱ्या बऱ्याच गोष्टी जसे पुस्तके, गणवेश, माध्यान्ह भोजन इ. मोफत असतात. नवव्या वर्गात अचानक या सर्व बाबी बंद होतात. तसेच त्यापैकी बऱ्याच मुलांना माध्यमिक शाळेसाठी बाहेरील गावी जाणे येणे सुद्धा करावे लागते. या सर्व कारणांनी काही मुले शाळेत दाखलच होत नाहीत तर काही दाखल झालेली मुले नियमित हजर राहू शकत नाहीत. या पुढील काळात या अडचणींवर आपणास मात करावयाची आहे. यासाठी वेगवेगळ्या मुलांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे पर्याय असू शकतील. यासाठी समाजातील प्रत्येकाने आपापल्या सजगतेचा वापर करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत राज्यातील एकही मूल माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहू नये याची काळजी घेण्यात यावी.

जी मुले शाळेत नियमित हजर राहून सुद्धा नापास होतात त्याचेही कारण बऱ्याच वेळा गरिबी असल्याचे सांगितले जाते. ते मान्य करण्यासारखे नाही. राज्यात वर्ष २०१३–१४ व २०१४–१५ मध्ये क्रमशः ५,१३,२५७ व ५,२८,०६२ मुले या प्रकारात मोडतात. त्यांचे पालक गरीब असतीलही परंतु ती मुले शाळेत नियमित हजर राहिले याचाच अर्थ त्या गरीब पालकांनी स्वतः अतिरिक्त मेहनत करून व इतर कौटुंबिक खर्च कमी करून आपल्या मुलाला नियमित शाळेत पाठवले आहे. अशा पालकांच्या मुलांच्या नापासीचे कारण गरिबी सांगणे फक्त चुकीचे नसून त्या पालकाच्या कौटुंबिक प्रगतीसाठी सुरू असलेल्या प्रामाणिक प्रयत्नावर खीळ घालणे सुद्धा आहे. त्यामुळे सर्वांना विनंती करण्यात येते की, स्वतःच्या विचारांमध्ये या व अशा बाबतीत अधिक स्पष्टता आणावी. जी मुले माध्यमिक शाळेत येतात, परंतु इयत्ता ९वी अथवा इयत्ता १०वी मध्ये जे शिक्षणातून बाहेर पडतात त्याला कारण गरिबी असू शकत नाही. अशा मुलांसाठी पालकांनी केलेला प्रयत्न यशस्वी व्हावा यासाठी शिक्षण यंत्रणेने सुद्धा आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करायला पाहिजे. पालक आपले योगदान १०० टक्के देत असतील तर यंत्रणेने ५०० टक्के योगदान द्यावयास हवे. जी मुले गरिबीमुळे शाळेतच येत नाहीत त्यांच्यासाठी वेगळा विचार करण्याची गरज

आहे. परंतु वरील ५ लाखापेक्षा अधिक मुलांची गळती थांबवावयाची असल्यास गुणवत्तावाढ हा एकमेव उपाय आहे हे स्पष्ट आहे.

**४. National Achievement Survey :**

सन २०१५ मध्ये १० व्या इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी, 'राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान एवं प्रशिक्षण परिषद (NCERT)' द्वारे हे सर्वेक्षण देशातील जवळ-जवळ सर्व राज्यांमध्ये काही निवडक शाळांमध्ये करण्यात आले. यातील महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक दृष्टीने काही ठळक मुद्दे खालीलप्रमाणे आहेत. National Achievement Survey अंतर्गत प्रथम भाषा, मानवीय शास्त्र, विज्ञान, गणित व इंग्रजी या विषयांची परीक्षा घेण्यात आली. एकूण ४०० गुणांपैकी मुलांच्या कामगिरीबाबतचे विवेचन खालीलप्रमाणे आहे :

४.१ ५० टक्केपेक्षा अधिक प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या मुलांची टक्केवारी

१. प्रथम भाषा - ७३%

२. मानवीय शास्त्र - (Humanities) - २६%

३. विज्ञान - २२%

४. गणित - २२%

५. इंग्रजी - १९%

वरीलपैकी ७५ टक्के पेक्षा अधिक प्रश्नांची योग्य उत्तरे देणाऱ्या मुलांची टक्केवारी भाषेत ३०% होती. परंतु इतर विषयांमध्ये २% किंवा शून्य होती. याचाच अर्थ भाषेमध्ये मुलांची प्रगती इतर विषयांपेक्षा चांगली आहे. मानवीय शास्त्र, इंग्रजी, गणित व विज्ञानामध्ये विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

४.२ व्यवस्थापननिहाय गुणवत्ता : (हे गुण ४०० पैकी आहेत)

| अ.क्र. | विषय | स्थानिक स्वराज्य संस्था | खाजगी अनुदानित | पूर्णपणे खाजगी स्वयंअर्थसहाय्य |
|---|---|---|---|---|
| १) | प्रथम भाषा | २६३ | २६३ | २६१ |
| २) | मानवीय शास्त्र | २४१ | २४९ | २५७ |
| ३) | विज्ञान | २४४ | २४४ | २५३ |
| ४) | गणित | २४३ | २५३ | २६१ |
| ५) | इंग्रजी | २४७ | २४६ | २५४ |

वरील तक्त्यावरून पूर्णपणे खाजगी स्वयं अर्थसहाय्यित शाळा भाषा विषय वगळता अन्य विषयांमध्ये तुलनात्मकदृष्ट्या चांगले दिसतात. मात्र शासकीय व अनुदान प्राप्त होणाऱ्या शाळा गणित व मानवीय शास्त्र वगळता सारख्याच पातळीवर दिसतात. गणित व मानवीय शास्त्र या दोन विषयांमध्ये खाजगी अनुदानित शाळांची कामगिरी चांगली दिसते.

४.३ प्रवर्गनिहाय गुणवत्ता :

| अ.क्र. | विषय | SC | ST | OBC | Others |
|---|---|---|---|---|---|
| १) | प्रथम भाषा | २५७ | २६० | २६४ | २६५ |
| २) | मानवीय शास्त्र | २४४ | २६१ | २५० | २५१ |

| अ.क्र. | विषय | SC | ST | OBC | Others |
|---|---|---|---|---|---|
| ३) | विज्ञान | २४४ | २५० | २४६ | २४५ |
| ४) | गणित | २५३ | २५५ | २५५ | २५५ |
| ५) | इंग्रजी | २४४ | २५३ | २४८ | २४९ |

अनुसूचित जमातीमधील मुले साधारणपणे सर्व विषयांमध्ये पुढे आहेत. ही परिस्थिती सर्वसाधारण विद्यार्थ्यांपेक्षा वेगळी आहे. परंतु अनुसूचित जातीतील मुले सर्व विषयांमध्ये मागे आहेत.

४.४ शहरी/ग्रामीण क्षेत्रातील गुणवत्ता :

| अ.क्र. | विषय | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|---|
| १) | प्रथम भाषा | २६० | २६८ |
| २) | मानवीय शास्त्र | २५४ | २४४ |
| ३) | विज्ञान | २४७ | २४४ |
| ४) | गणित | २५७ | २५० |
| ५) | इंग्रजी | २४९ | २४७ |

वरील तक्त्यावरून स्पष्ट आहे की प्रथम भाषा वगळता इतर सर्व विषयांमध्ये ग्रामीण भागातील मुले शहरी भागातील मुलांपेक्षा पुढे आहेत.

४.५ लिंगानुसार गुणवत्ता

| अ.क्र. | विषय | मुले | मुली |
|---|---|---|---|
| १) | प्रथम भाषा | २५९ | २६७ |
| २) | मानवीय शास्त्र | २५० | २५१ |
| ३) | विज्ञान | २४६ | २४६ |
| ४) | गणित | २५६ | २५४ |
| ५) | इंग्रजी | २४८ | २४९ |

निष्कर्ष : गणित वगळून इतर सर्व विषयांमध्ये मुली मुलांपेक्षा पुढे किंवा बरोबरीला आहेत.

४.६ विषयनिहाय सरासरी व त्याची इतर बोर्डांसोबत तुलना

| अ.क्र. | विषय | महाराष्ट्र | CBSE | ICSE | केरळ | कर्नाटक |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्रथम भाषा | २६३ | २८९ | ३०२ | २७७ | – |
| २) | मानवीय शास्त्र | २५० | २९३ | २९० | २६७ | २६६ |
| ३) | विज्ञान | २४६ | २९८ | ३४२ | २७६ | २६६ |

| अ.क्र. | विषय | महाराष्ट्र | CBSE | ICSE | केरळ | कर्नाटक |
|---|---|---|---|---|---|---|
| ४) | गणित | २५५ | २८६ | ३१५ | २५५ | २६० |
| ५) | इंग्रजी | २४८ | ३१९ | ३७२ | २५० | २५९ |

## ५. Benchmarking :

वरील तक्त्यावरून दिसते की, आपले राज्य इतर काही राज्यांपेक्षा तसेच CBSE आणि ICSE पेक्षा मागे आहे. देशात प्रथम क्रमांक आणण्यासाठी राज्याला मेहनत करण्याची गरज आहे. अलीकडच्या काळात राज्य बोर्ड आणि CBSE ची बरीच तुलना व्हायला लागली आहे. पुणे येथे ४ जून, २०१६ रोजी सर्व शिक्षण अधिकारी (माध्यमिक) व डायट प्राचार्यांच्या सभेत या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेत सर्व संचालकसुद्धा उपस्थित होते. राज्याने पुढे जाण्यासाठी काही बेंचमार्क ठरवावे आणि ते CBSE च्या पेक्षा थोडे पुढे असावे असे मान्य झाले आहे. त्यामुळे पुढील ३ वर्षात राज्याची सर्व विषयांची सरासरी राष्ट्रीय निष्पत्ती सर्वेक्षणात ३०० गुणांची असायला हवी हे ठरले.

याच बैठकीत जागतिक पातळीवर विभिन्न देशांच्या गुणाक्रमावरसुद्धा चर्चा करण्यात आली. जगाच्या पाठीवर PISA (Programme for International Students Assessment) च्या आधारे देशांचे गुणानुक्रम ठरवले जातात. ही टेस्ट ३ वर्षांतून एकदा घेतली जाते. PISA च्या आधारावर युरोपमधील फिनलँड हा देश प्रथम क्रमांकावर आहे. (सन २०००, २००३) अलीकडच्या काळात सन २०१२ मध्ये PISA मध्ये फिनलँड ५ व्या क्रमांकावर आला आहे. पहिले ४ क्रमांकावर आशिया खंडातील ४ देश (साऊथ कोरिया, जपान, हाँगकाँग व सिंगापूर) आहेत. आशिया खंडातील देश जगाच्या पातळीवर वरचे क्रमांक पटकावत असतील तर भारताला किंवा महाराष्ट्राला सुद्धा ते शक्य आहे अशीही चर्चा झाली. मात्र ३०० गुणांची सरासरी प्राप्त केल्यावर पुढील बेंचमार्क निश्चित करावयाचे ठरले.

## ६. शासन निर्णय :

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाच्या राज्यातील गतवर्षीचे प्राथमिक शिक्षणातील साध्य विचारात घेता प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा कार्यक्रम माध्यमिक स्तरासाठीसुद्धा लागू करावा ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

६.१ राज्यात माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था प्राथमिक शिक्षणाशी तुलना करता खूप वेगळी आहे. राज्यातील माध्यमिक शिक्षण हे बहुतांशी खाजगी व्यवस्थापनांच्या सहकार्याने दिले जात आहे. राज्यात माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच उच्च शिक्षण सर्वदूर करण्यामध्ये खाजगी व्यवस्थापनांचा मोठा वाटा आहे. राज्यातील एकूण २२,७५६ माध्यमिक शाळांपैकी १,६१० शाळा शासन व स्थानिक स्वराज्य संस्था, २१,१४६ शाळा खाजगी व्यवस्थापनाद्वारे चालविल्या जातात. राज्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षकांपैकी ९,४७१ शिक्षक शासन व स्थानिक स्वराज्य संस्थेतील असून १,४८,६३२ शिक्षक खाजगी संस्थांतील आहेत. खाजगी व्यवस्थापनांतर्फे चालविण्यात येणाऱ्या बहुतांशी शाळा शासन अनुदानित असून काही शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरू आहेत.

सदरहू शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व मंडळांशी संलग्नित माध्यमिक शाळांकरिता प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र – माध्यमिक स्तर हा कार्यक्रम राज्यामध्ये सन २०१६–१७ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येत आहे.

६.२ प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र – माध्यमिक स्तर कार्यक्रमाचा हेतू :

६.२.१ माध्यमिक शाळांतील प्रत्येक (१०० टक्के) विद्यार्थ्यास माध्यमिक शिक्षण पूर्ण करता येईल याकरिता सर्व आवश्यक सहाय्य करणे.

६.२.२ माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची गळती शून्यावर आणणे.

६.२.३ प्रत्येक विद्यार्थ्याने अपेक्षित क्षमता प्राप्त केली आहे किंवा नाही याची तपासणी शैक्षणिक प्रगती चाचण्यांद्वारे करून ज्या विषयांमध्ये/क्षमतेमध्ये विद्यार्थ्यांना अडचणी असतील त्यासाठी कृतिकार्यक्रम आखून अंमलबजावणी करणे.

६.२.४ प्रत्येक माध्यमिक शिक्षकाला त्याच्या सुलभीकरणाच्या भूमिकेस दिशा देणे व मदत करणे.

६.२.५ सुरुवातीला प्रथम भाषा व गणित या विषयातील क्षमतांची संपादणूक वाढविण्यासाठी विशेष लक्ष देणे.

६.२.६ माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय निष्पत्ती सर्वेक्षणामध्ये सरासरी ३०० गुण प्राप्त करता येतील याकरिता प्रयत्न करणे.

६.२.७ माध्यमिक स्तरावरील शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी पोषक वातावरण तयार करणे.

६.३ चाचण्या व परीक्षा :

६.३.१ प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र सन २०१६–१७ या वर्षापासून इयत्ता ९वी व १०वी तील सर्व विद्यार्थ्यांसाठी गणित व इंग्रजी या विषयांच्या पायाभूत चाचण्यांचे आयोजन करण्यात येईल. ही पायाभूत चाचणी मागील इयत्तांच्या अभ्यासक्रमापर्यंत राहील. पायाभूत चाचणी ही नैदानिक चाचणीचे कार्य करील त्याचे विश्लेषण करून एकही मूल अप्रगत राहणार नाही यासाठी शासन, प्रशासन व शालेय व्यवस्थापन विशेष प्रयत्न करणार असून शिक्षकांनी त्यांची मुख्य जबाबदारी घेणे आवश्यक आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कच्चे दुवे दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे. जेणेकरून त्या वर्षात परीक्षेत मुले प्रामाणिकपणे पास होऊ शकतील.

वरील क्षमता संपादणुकीमध्ये प्रमाणिकृत विशेष गरजा असणाऱ्या मुलांना वगळण्यात येत आहे. तथापि दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती संदर्भात दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यानुसार दिव्यांग मुलांना शैक्षणिक सुविधा/सवलती देणे अनिवार्य आहे.

६.४ इयत्ता ९वी चे मूल्यमापन :

६.४.१ इयत्ता ९वी मधील अनुत्तीर्ण होणाऱ्या मुलांना पुनर्परीक्षेची संधी :

इयत्ता १०वी मध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्याप्रमाणे पुनर्परीक्षेची संधी दिली जाते. त्याचप्रमाणे इयत्ता ९वी मध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला देखील पुनर्परीक्षेची संधी दिली जाईल. जूनच्या पहिल्या आठवड्यात ही पुनर्परीक्षा शाळा स्तरावर होईल. कोणत्याही विद्यार्थ्यास शाळेचा १०वी चा निकाल उत्तम लागावा अथवा इयत्ता १०वी मध्ये तुकड्या नाहीत या कारणास्तव शाळेस विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करता येणार नाही. १००% मुले माध्यमिक शाळेत येतील, १००% मुले शिकतील व प्रामाणिकपणे पास होतील यासाठी शिक्षकांनी काम करावे.

तथापि सर्व प्रकारची मेहनत करून सुद्धा एखाद्या विद्यार्थ्याची संपादणूक पातळी उत्तीर्ण होण्याच्या पातळीवर न आल्यास त्यास अनुत्तीर्ण करावे. तरीसुद्धा ते लक्षात असू द्यावे कि शिक्षण व्यवस्था विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्याच्या लायकीचे तयार करण्यासाठी आहे.

६.४.२ इयत्ता ९वी करिता मूल्यमापनाची योजना :

इयत्ता ९वी व १०वी च्या अभ्यासक्रमाच्या मूल्यमापनाची योजना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत निश्चित केली जाते. इ. १०वी साठी जी मूल्यमापन योजना आहे, तीच इ. ९वी साठी लागू आहे. तथापि, अनेक शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षक याबाबत अनभिज्ञ असल्याने या योजनेनुसार उत्तीर्ण होणारी मुलेही इ. ९वी मध्ये नापास केली जातात. यामुळे

इ. १०वी च्या मूल्यमापन योजनेची अंमलबजावणी शाळांनी इ. ९वी साठी तंतोतंत करणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना इ. ९वी मध्येच इ. १०वी च्या मूल्यमापन पद्धतीचा सराव होईल.

६.४.३ इयत्ता ९वी मधील अंतर्गत मूल्यमापन :

ज्या विषयांचे अथवा विषयाच्या काही अंशाचे मूल्यमापन अंतर्गत मूल्यमापन पद्धतीने होते त्याबाबत ते वस्तुनिष्ठ करण्याची जबाबदारी शाळाप्रमुख व शिक्षकांची आहे. तोंडी परीक्षा अथवा प्रात्यक्षिक परीक्षेचे अंतर्गत मूल्यमापनात दिले जाणारे गुण जवळपास शंभर टक्के दिले जातात असा अनुभव आहे. तसेच त्यासाठी घ्यावयाच्या मूल्यमापन चाचणीद्वारा घेतले जात नाहीत असे निदर्शनास येते. त्यामुळे अंतर्गत मूल्यमापनासाठी वापरली जाणारी चाचणी ही अगोदरच संबंधित शिक्षकांकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे व त्यानंतरच अंतर्गत मूल्मापन केले जाणे आवश्यक आहे. त्यामुळे मूल्यमापनात अचूकता तर येईलच परंतु, हे मूल्यमापन गंभीरतेने केले जाते याची जाणीव विद्यार्थ्यांना होईल. त्यामुळे अंतर्गत मूल्यमापनाकडे पाहण्याचा विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा दृष्टिकोनही बदलेल.

६.५ परीक्षेची भीती दूर करणे :

माध्यमिक स्तरावरील अनुत्तीर्ण होण्यामध्ये बऱ्याचवेळा विद्यार्थ्यांमध्ये असलेली परीक्षेची भीती हे कारण असते. विद्यार्थ्यांमध्ये असलेला हा न्यूनगंड दूर करण्याचे महत्त्वाचे काम शिक्षकांना व शाळेला करावे लागेल. प्रत्येक मूल शिकू शकते व इयत्ता १०वी उत्तीर्ण होऊ शकते हा आत्मविश्वास स्वत:मध्ये तसेच विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे.

६.६ शाळेच्या शैक्षणिक कामगिरीचे मोजमाप :

शाळेची शैक्षणिक कामगिरी ही बहुतांशी इयत्ता १०वी च्या निकालावरून आजपावेतो ठरविली जात असे. तथापि यापुढे माध्यमिक शाळेची शैक्षणिक कामगिरीचे मोजमाप ही इयत्ता ९वी व इयत्ता १०वी मध्ये प्रवेशित विद्यार्थी वजा संबंधित इयत्तांमध्ये दाखला घेऊन सोडून गेलेले विद्यार्थी पैकी किती विद्यार्थी उत्तीर्ण झाले या आधारावर करण्यात येईल.

## ७. गणित, विज्ञान व इंग्रजी या विषयांकडे विशेष लक्ष :

इयत्ता १०वी चा निकाल विचारात घेतल्यास गणित, विज्ञान व इंग्रजी या तीन विषयात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून येते. मुलांना ज्या विषयांमध्ये शिकण्याचा आनंद मिळत नाही त्याच विषयांमध्ये मुले अनुत्तीर्ण होतात. तसेच शिक्षकांना जेव्हा शिकवण्याचा आनंद मिळत नाही तेव्हाच विद्यार्थ्यांना संबंधित शिक्षकांचे वर्ग कंटाळवाणे वाटतात. शिकण्यात व शिकविण्यात आनंद मिळावा या हेतूने या तीन विषयांमध्ये शिक्षकांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त ठरतील असे साहित्य/ॲप/व्हिडिओ/वेबसाईट तयार करण्यात येईल. हे तीनही गणित व विज्ञान हे विषय Activity Based पद्धतीने शिकविण्यावर भर दिला जावा. या विषयांचे अनेक व्हिडिओज इंटरनेटवर, संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या विषयांची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी या हेतूने विविध उपक्रम शाळा स्तरावर, गट स्तरावर आयोजित करण्यात यावेत. खाली विषयवार तपशील देण्यात येत आहे.

७.१ विज्ञान :

७.१.१ मागील वर्षी न्यास या संस्थेच्या मदतीने माध्यमिक स्तरावर विज्ञान विषयाचे प्रशिक्षण देण्यात आले. नंतर प्रत्येक तालुक्यात किमान एक अपूर्व विज्ञान मेळावा घेण्यात आला. अपूर्व विज्ञान मेळाव्यासाठी शासनाकडून कोणताही अतिरिक्त खर्च न करता यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले. न्यास संस्थेद्वारे प्रशिक्षण प्राप्त शिक्षकांनी या मेळाव्यात अधिक सहभाग घेतल्याची माहिती शासन स्तरावर

आहे. तसेच प्रत्येक तालुक्यात एका मेळाव्याचे नियोजन असताना लातूरच्या उपसंचालकाने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक शाळेत हा मेळावा आयोजित केला. नांदेड, लातूर व उस्मानाबाद सारख्या आर्थिक दुष्काळी जिल्ह्यांचे प्रत्येक शाळेत हा मेळावा यशस्वी झाला तेव्हा मेळाव्या पलीकडे जाऊन प्रत्येक वर्गामध्ये ज्या त्या संकल्पना शिकविताना विज्ञानाचे प्रात्यक्षिक करण्याबाबत विचार मांडण्यात आले. त्यामुळे या वर्षापासून विज्ञान शिक्षण प्रत्येक शाळेत प्रात्यक्षिकाद्वारे करण्यात यावे असे निर्देशित करण्यात येत आहे. अपूर्व विज्ञान मेळावा पाहिलेल्या लोकांना हे माहितच आहे की त्यात खर्चिक साधन सामग्रीची आवश्यकता भासत नाही. प्रादेशिक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (राज्य विज्ञान व गणित संस्था) नागपूर या संस्थेने न्यास व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानच्या मदतीने सर्व शाळांमध्ये वरीलप्रमाणे विज्ञान शिकवले जाईल यासाठी सर्व शाळेतील शिक्षकांना मदत करावी.

ज्या शाळा व संस्थांकडे पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध आहे त्यांनी विज्ञानासाठी विशेष प्रयोगशाळांची स्थापना करावी. राज्यातील निवडक डायटमध्ये विज्ञान केंद्र स्थापित करण्यात आले आहे. काही तालुके व जिल्हा पातळीवरसुद्धा विज्ञान केंद्र स्थापित करण्यात आली आहेत. आपल्या विद्यार्थ्यांची या केंद्रांना शैक्षणिक सहली काढण्यात याव्यात. विज्ञानासाठी बऱ्याच कमी खर्चिक कीटसुद्धा विभिन्न ठिकाणी उपलब्ध आहेत. त्यासुद्धा शाळा विकत घेऊ शकतात. त्याचप्रमाणे काही संकेतस्थळावर ५०,००० पेक्षा अधिक विज्ञानाशी निगडित व्हिडिओज उपलब्ध आहेत. Google Search केल्याने ते मोफत उपलब्ध होतील.

७.१.२ विज्ञान परिसरात उपलब्ध असतेच. एका प्रशिक्षकाच्या म्हणण्यानुसार शैक्षणिक साहित्य वातावरणात किंवा पैशाने उपलब्ध होत नाही ते शिक्षकांच्या डोक्यात असते. तेव्हा ज्ञानी लोकांकडून शिकून शिक्षकांनी स्वत:ला प्रगल्भ करावे आणि माध्यमिक स्तरावरील विज्ञान शिक्षण आनंददायी होईल याची काळजी घ्यावी.

परिसरामध्ये घडणाऱ्या घटनांविषयी विद्यार्थ्यांना जिज्ञासा निर्माण होऊन त्या घटनेमागील कार्यकारण भाव जाणून घेण्याची संधी उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती वाढविणे आणि विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुलभ व विकासात्मक होण्यासाठी तसा दृष्टिकोन हेतूपूर्वक निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी शाळेतील विज्ञानाचे अध्यापन करताना संकल्पना स्पष्ट करणाऱ्या निरीक्षणे, कृती, प्रात्यक्षिके यावर भर देऊन विद्यार्थ्यांचे विज्ञानाचे अध्ययन होणे आवश्यक आहे.

७.१.३ विज्ञान शिक्षणाबाबत निर्देश :

७.१.३.१ विज्ञानाचे अध्ययन प्रयोगशाळेमध्ये प्रात्यक्षिकांद्वारे विद्यार्थ्यांद्वारे घडले पाहिजे.

७.१.३.२ विज्ञान विषयाच्या प्रात्यक्षिकांद्वारे अध्यापनासाठी किमान १ घड्याळी तासिकांचे नियोजन वेळापत्रकात करावे.

७.१.३.३ ज्या ठिकाणी विज्ञानाच्या विविध संकल्पना स्पष्ट करताना प्रयोगशाळा अपुरी पडते, अशा वेळी विज्ञान विषयातील विविध संकल्पना स्पष्ट करताना निसर्गातील तसेच दैनंदिन घडामोडीतील दाखले प्रयोगशाळेबाहेरही दिले गेले पाहिजेत.

७.१.३.४ विज्ञान आणि गणित या विषयांच्या तासिका वाढवाव्यात. त्यासाठी कार्यानुभव, समाजसेवा या विषयांची सांगड विज्ञान आणि गणित या विषयांतील अभ्यासक्रमाशी घालून तसा बदल कार्यानुभव, समाजसेवा यांच्या विषयांत करावा.

७.१.३.५ विद्यार्थ्यांच्या परिसरामध्ये उपलब्ध असलेल्या व वापरात असलेल्या साधनसामग्रीच्या पाठीमागील वैज्ञानिक तत्त्व ओळखण्यास प्रवृत्त करणे व त्यास मदत करणे.

७.१.३.६ विज्ञानाची प्रात्यक्षिक परीक्षा ही अभ्यासक्रमाशी सुसंगत असावी. त्यासाठी विद्यार्थ्यांचे घेण्यात येणारे प्रात्यक्षिक कार्य हे अभ्यासक्रमाशी सुसंगत ठेवावे. इ. ९वी व १०वी ची प्रात्यक्षिक परीक्षा (२० गुण) ही बहिस्थ परीक्षकांकडून घेण्यात यावी.

७.१.३.७ विज्ञान अध्यापनामध्ये शिक्षकांनी मुक्त प्रश्न विचारून विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला वाव द्यावा.

७.१.३.८ अपूर्व विज्ञान मेळाव्याचे आयोजन दरवर्षी प्रत्येक शाळेमध्ये व्हावे.

७.१.३.९ प्रत्येक शाळांमध्ये वैज्ञानिक जत्रा, आकाश दर्शन, विज्ञान संग्रहांना भेटी, विज्ञान कट्टा, प्रश्नमंजुषा, विज्ञान कोडी, वैज्ञानिक सहल इ. उपक्रम राबवावेत.

७.१.३.१० फिरती विज्ञान व गणित प्रयोगशाळांचा लाभ विद्यार्थ्यांना देण्यात यावा. तसेच विविध वैज्ञानिक स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग घेऊन वैज्ञानिक उपक्रमांचे जसे : आकाश दर्शन, स्लाईड-शो इ. चा लाभ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावा.

७.१.३.११ राष्ट्रीय अविष्कार अभियान, अटल टिंकरिंग लॅब संदर्भातील शासन निर्णयानुसार माध्यमिक शाळा विज्ञान या विषयामध्ये विकसित व्हाव्यात.

७.२ गणित :

गणित विषयाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात अकारण भीती निर्माण झालेली दिसून येते. त्यामुळे इंग्रजी पाठोपाठ गणितामध्ये अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात होते. गणिताविषयीची भीती विद्यार्थी माध्यमिक स्तरावर आल्यावर होते, असे नाही. याचे मूळ प्राथमिक शिक्षणापासूनचे आहे. प्राथमिक स्तरावर गणित विषयाच्या ज्या मूलभूत क्रिया आणि संकल्पना स्पष्ट आणि दृढ होत नसल्यामुळे या विषयाची विद्यार्थ्यांच्या मनात नावड निर्माण होते आणि पर्यायाने त्या विषयाचा शिक्षकसुद्धा नावडीचा होतो. ही गणित विषयाची नावड अधिक होत जाऊन विद्यार्थ्यांचे त्या विषयाकडे दुर्लक्ष होते. परिणामी तो विषय त्या विद्यार्थ्यांसाठी काठिण्यपातळीचा ठरतो व त्याचा परिणाम त्या विषयात अनुत्तीर्ण होणे, असा होतो. अनुत्तीर्ण होण्याच्या भीतीपोटी त्या विषयाविषयी भीती निर्माण होते.

विद्यार्थ्यांना गणिताच्या मूलभूत क्रिया आणि संकल्पना स्पष्ट व दृढ न होण्याचे आणखी एक कारण असे आहे की, बऱ्याच संकल्पना विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनाच ज्ञात झालेल्या नसतात. त्यामुळे तो विषय अधिक आनंददायी व रंजक करण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. त्यासाठी गणित विषयाच्या संकल्पना शिक्षकांनी अगोदर स्पष्ट करून घेतल्यास या विषयाचे अध्यापन व अध्ययन आनंददायी, रंजक पद्धतीने करता येईल. तसेच विद्यार्थ्यांच्या गणिताविषयीच्या मूलभूत क्रिया आणि संकल्पना स्पष्ट आणि दृढ होतील. त्यामुळे प्राथमिक स्तरापासूनच या विषयाकडे अधिक लक्ष देऊन विषयाची आवड आपल्याला निर्माण करता येते. त्यासाठी माध्यमिक स्तरावर खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

७.२.१ प्रत्येक माध्यमिक शाळेमध्ये गणित-भूमिती प्रयोगशाळा असणे आवश्यक आहे. या प्रयोगशाळेसाठी परिसरात उपलब्ध असणाऱ्या वस्तू, साधने यांचा जास्तीत जास्त उपयोग करावा. जेणेकरून गणित व भूमितीचे अध्यापन आनंददायी, रंजक करता येईल आणि प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्रिया व संकल्पना स्पष्ट व दृढ होतील.

७.२.२. गणित व भूमिती विषयाच्या अध्यापनाची दैनंदिन व्यवहाराशी सांगड घालून विद्यार्थ्यांचे अध्ययन घडवून आणल्यास हा विषय दैनंदिन जीवनात किती उपयुक्त आहे याचा अनुभव विद्यार्थ्यांना येईल आणि त्या विषयाची आवड निर्माण होईल. त्यासाठी शाळेने आपल्या परिसरामध्ये आठवडा बाजार, बँका, पोस्ट ऑफिस, किराणा मालाची दुकाने, शाळेतील संचयिका यांना भेटी देणे तसेच शाळेतील व घरातील छोट्या छोट्या आर्थिक व्यवहाराची जबाबदारी विद्यार्थ्यांकडे सोपविता येईल.

७.२.३ घराचे रंगकाम करताना क्षेत्रफळ मोजण्याची प्रत्यक्ष अनुभूती देणे, शाळेत विविध खोल्यांचे क्षेत्रफळ मापन करण्यास देऊन प्रत्यक्ष अनुभूती देता येईल. शाळेतील तसेच घरातील पाण्याच्या साठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या आकाराच्या टाक्यांचे क्षेत्रफळ व पाण्याचे मापन करण्याची अनुभूती देता येईल. वेगवेगळ्या खेळांची मैदाने आखताना विद्यार्थ्यांचा सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना भौमितिक आकार व मैदानाचे आकारमान काढणे, त्यातून मीटर, सेंटीमीटर इ.ची. संकल्पना स्पष्ट करणे इ. सर्व गोष्टी सहज व आनंददायी पद्धतीने करता येऊ शकतील.

७.२.४ माध्यमिक स्तरावर गणित व भूमिती विषयासाठी २० गुण अंतर्गत मूल्यमापनाचे आहेत. सदरचे मूल्यमापन हे वस्तुनिष्ठ पद्धतीने होण्याची आवश्यकता आहे. परंतु तसे न होता ढोबळपणे हे गुण पैकीच्या पैकी देण्याची वृत्ती निर्माण झालेली आहे. त्यामुळे त्या मूल्यमापनाचा हेतू साध्य होत नाही. माध्यमिक स्तरावर अध्यापन करणारे शिक्षक अनेकवेळा प्राथमिक स्तरावरून आलेल्या विद्यार्थ्यांना मूलभूत क्रियाही येत नाहीत, अशा प्रकारची तक्रार करीत असतात. यामध्ये किती वास्तवता आहे, हे शिक्षकांनाच कळू शकेल. परंतु, फक्त तक्रार करून भागणार नाही, तर यावर शिक्षकांनी माध्यमिक स्तरावर प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत क्रिया व संकल्पना येण्यासाठी पूर्वतयारी वर्ग घेणे आवश्यक वाटते. माध्यमिक स्तरावर अंतर्गत मूल्यमापनातील २० टक्के (२० गुणांसाठी) मूलभूत क्रियांवरील चाचणी विद्यार्थ्यांची घेता येईल. जेणेकरून विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये अंतर्गत मूल्यमापनाविषयी गांभीर्य निर्माण होईल.

७.२.५ इ. ९वी पर्यंतच्या या विषयाच्या मूल्यमापनामध्ये लेखी परीक्षेत उच्च प्राथमिक अभ्यासक्रमावर आधारित मूल्यमापनासाठी १० टक्के भारांश ठेवावा. त्यामुळे विद्यार्थ्यांच्यामध्ये मूलभूत संकल्पना आणि क्रिया यांचा सराव होत राहील व त्या अधिक स्पष्ट व दृढ होत राहतील. तसेच आपण अगोदरच्या शिकलेल्या भागावरचे मूल्यमापनावरील प्रश्न असल्यामुळे परीक्षेची भीती कमी होण्यास मदत होईल. तसेच गळती रोखण्यासही मदत होईल.

७.२.६ इ. १०वीच्या मुख्य परीक्षेसाठी कौशल्य व उपाययोजना या उद्दिष्टांसाठी प्रचलित पद्धतीपेक्षा ७० टक्के भारांश इ. १०वीच्या अभ्यासक्रमावर कौशल्य आणि उपाययोजना या उद्दिष्टावर असावा. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना गणित व भूमिती विषयाचा अभ्यास करून उच्च शिक्षण घ्यावयाचे आहे, त्यांना या गुणांसाठी झटावे लागेल.

वरीलप्रमाणे माध्यमिक स्तरावर मूल्यमापनाची योजना अवलंबविल्यास ३० गुण हे त्याने स्वत: मिळवलेले असतील. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल, कॉपी केली जाणार नाही.

७.२.७ गणित विषयाच्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून अनेक संकेतस्थळांवर जसे खान अॅकॅडमी, K१२ सारख्या उपलब्ध असलेल्या माहिती, ज्ञान, व्हिडिओज, इ. चा. उपयोग करावा.

७.२.८ प्रश्नमंजुषा स्पर्धा, गणिती कोडी, गणित तज्ज्ञांचे चरित्र अनुभव आणि त्यांच्या संशोधनाची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे अशा गणित तज्ज्ञांची जयंती, पुण्यतिथी साजरी करून त्या दिवशी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणित–भूमितीच्या विविध प्रतिकृती, तक्ते, कोडी इ. ची. प्रदर्शने भरविण्यात यावीत.

७.२.९ मागील वर्षी आय. आय. टी, मुंबईच्या मदतीने माध्यमिक स्तरावर गणिताचे प्रशिक्षण दिले गेले. राज्यातील शिक्षकांमधून जाहिरातीने अर्ज मागवून परीक्षा पद्धतीने निवड केल्यानंतर प्रशिक्षक तयार करण्याचे काम आय. आय. टी, मुंबईकडून करण्यात येत आहे.

७.२.१० आय. आय. टी., मुंबई आणि प्रादेशिक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (राज्य विज्ञान व गणित संस्था) नागपूर यांनी या कार्यात शाळा व शिक्षकांना मदत करावी.

७.३ इंग्रजी :

इंग्रजी ही परकीय भाषा असली तरी ती रोजगाराची तसेच व्यवहार कौशल्याची भाषा झालेली आहे. त्यामुळे मातृभाषेबरोबरच सध्याच्या जगामध्ये इंग्रजी भाषेलाही महत्त्व प्राप्त झाले आहे. अलीकडे इंग्रजी ही भाषा म्हणून न शिकविता ती विषय म्हणून शिकविली जाते. त्यामुळे इंग्रजीतील वाचन, लेखन, भाषण आणि संभाषण या कौशल्यांचा विकास होत नाही. त्यामुळे विद्यार्थी दररोजच्या व्यवहारामध्ये या भाषेचा सहजपणे वापर करताना दिसत नाहीत. एवढेच नव्हे तर शिक्षकही या भाषेचा सहजपणे वापर करू शकत नाहीत. या भाषेविषयीची विद्यार्थ्यांच्या मनामध्ये असलेली भीती दूर करणे आवश्यक आहे. माध्यमिक शालांत परीक्षेचे निकालाचे अवलोकन केले असता या विषयामध्ये दोन ते अडीच लाख विद्यार्थी अनुत्तीर्ण होताना दिसत आहेत. म्हणून इंग्रजीच्या बाबतीत वर्गातील अध्ययनाची प्रक्रिया रंजक, आनंदी आणि सहज होईल अशी काळजी इंग्रजी शिक्षकांनी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील सुविधा विद्यार्थ्यांना आपण पुरवू शकतो.

७.३.१. शाळेमध्ये इंग्रजी गीते, गोष्टी, नाटके, कार्टुन्स, पुस्तके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके इत्यादींचा खजीना उपलब्ध करणे आवश्यक आहे.

७.३.२. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून अनेक ई–पुस्तके, व्हिडीओ शाळेत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले पाहिजेत तसेच उपलब्ध संकेतस्थळांची माहितीसुद्धा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली पाहिजे.

७.३.३. प्रत्येक शाळेत इंग्रजीसाठी विद्यार्थ्यांच्या प्रमाणात स्वतंत्र इंग्रजी प्रयोगशाळा निर्माण करून विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेतील प्रमाणित उच्चार आणि भाषण–संभाषण करण्याची सवय वाढीस लागण्यास मदत करावी. यामुळे विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची भीती दूर होऊन आत्मविश्वास वाढील लागेल.

७.३.४ प्रत्येक शाळेत प्रत्येक इयत्तेसाठी आठवड्यातून काही तासिका स्पोकन इंग्रजीसाठी राखून ठेवाव्यात व त्या कालावधीत विद्यार्थ्यांचा पुरेसा सराव घ्यावा.

७.३.५ भाषिक कौशल्यानुसार मूल्यमापनाची योजना असावी.

७.३.६ स्पोकन इंग्रजीसाठी किमान एक जोड तासिका असावी.

७.३.७ इंग्रजी शिक्षकाने विद्यार्थ्यांबरोबर वर्गात तसेच वर्गाबाहेर इंग्रजीतूनच संभाषण करावे. तसेच शाळेतील विविध कार्यक्रम व समारंभाचे वेळी केले जाणारे निवेदन हे मातृभाषेबरोबरच इंग्रजीतूनही करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.

७.३.८ माध्यमिक शालांत परीक्षेत विद्यार्थी इंग्रजी विषयामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी या विषयाचे कमीत कमी आवश्यक (Minimum Essentials) तयार करून त्या आधारे विद्यार्थ्यांचे अध्ययन घडवावे.

७.३.९ मुलांचे English Language Learning Clubs तयार करता येतील जेणेकरून मुले स्वत: नवीन साहित्य इ. शोधतील, एकमेकांशी बोलतील व एकमेकांकडून शिकतील.

७.३.१० मागील ४ वर्षापासून ब्रिटीश कौन्सिल सोबत राज्य शासनाने केलेल्या कराराप्रमाणे राज्यात माध्यमिक स्तरासाठी ४०० उच्च दर्जाचे शिक्षक तयार झाले असून ८० मेंटर्स तयार करण्यात आले आहेत. या वर्षापासून प्रादेशिक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (राज्य विज्ञान व गणित संस्था) औरंगाबाद सोबत या सर्व प्रशिक्षक व मेंटर्सला जोडून त्यास संस्थांतर्गत स्वरूप देण्यात येत आहे. अर्थात इंग्रजीत निरंतर व्यावसायिक विकासासाठी (Continuous-Professional Development) एक सशक्त व्यवस्था तयार झाली आहे. या व्यवस्थेने शाळांना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करावे.

७.४ Digital School, e-learning :

पॅरा क्र. २.६ मध्ये नोंदल्याप्रमाणे राज्यात सुमारे १५ हजारच्या शाळा Digital झाल्या आहेत. काही–काही तालुके आता १०० टक्के डिजिटल होण्याकडे वाटचाल करीत आहेत. वाशिम जिल्ह्यातील कारंजालाड या तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांच्या म्हणण्यानुसार तालुक्यात जिल्हा परिषदच्या एकूण १४५ प्राथमिक शाळा आहेत. त्यापैकी २५च्या सुमारास शाळा मोठ्या असून बाकीच्या लहान (कमी मुले असलेल्या) शाळा आहेत. यात सर्व २५ शाळा Digital झाल्या असून लहान शाळांमध्ये प्रत्येक ४ मुलांमागे एक Tablet देण्यात आले आहेत. तसेच प्राथमिक स्तरावरील सर्व शिक्षकांनी स्मार्टफोन घेतला असून त्यास Screen Enlarger व Sound Amplifier लावून २० मुलांपर्यंतच्या वर्गात शैक्षणिक साहित्य म्हणून वापरत आहेत. अशा पद्धतीने मोबाईल फोनच्या वापर करणाऱ्या शाळांना Mobile-Digital शाळा म्हणून संबोधण्यात येत आहे. राज्यात १३ जिल्हे Mobile Digital झाले आहेत. ही गोष्ट झाली प्राथमिक स्तरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची.

माध्यमिक स्तरावरील ICT@school या योजनेंतर्गत ८५०० शाळांमध्ये आय.सी.टी. लॅब तयार करण्यात आल्या असून सुरुवातीच्या ५०० लॅब आता Phase out झाल्या आहेत. या वर्षी १५०० अतिरिक्त शाळांमध्ये आय सी टी लॅब स्थापन केल्या जातील. टप्प्याटप्प्याने सर्व शाळांमध्ये आय सी टी लॅब करण्याची योजना आहे. परंतु त्याची पूर्णत्वाची तारीख स्पष्ट नाही. त्यामुळे पालक, विद्यार्थी व शिक्षक, लोकसहभाग व CSR मधून जिल्हा परिषद शाळांनी केलेल्या प्रयत्नांसारखे माध्यमिक शाळांनीसुद्धा प्रयत्न करण्याची गरज आहे. सर्व शिक्षकांनी आपले मोबाईल फोन शैक्षणिक साहित्य म्हणून वापरावे. माध्यमिक स्तरावर मुलांकडेसुद्धा मोबाईल फोन असल्यास त्यांचाही वापर शैक्षणिक साहित्य म्हणून वापरण्यात यावे. यापुढील काळात मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक साहित्य e-learning च्या माध्यमातून मिळणार असल्यामुळे चार मुलांमागे एक Tablet या विचारावर सर्व शाळांनी काम करावे, असे सुचविण्यात येत आहे.

मात्र प्रत्येक शाळेच्या प्रत्येक शिक्षकाने तंत्रज्ञानाचा वापर करण्यास तातडीने शिकून घ्यावे व आपआपल्या विषयांचे किमान २० टक्के शिक्षण शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून तंत्रज्ञानाच्या वापरातून करावे. आवश्यकता असल्यास मार्गदर्शनासाठी आपल्या जिल्ह्यातील Tech savvy Teachers यांचेशी संपर्क साधावा. पॅरा क्र. २.५ मध्ये नोंदवल्याप्रमाणे राज्यात ३५ हजारच्या सुमारास Tech savvy Teachers आहेत.

ओपन सोर्स अनेक संस्थांनी तयार केलेला आहे. उदा. एन.सी.ई.आर.टी., कर्नाटक राज्य माध्यमिक शिक्षा अभियान, या ओपन सोर्सचा शिक्षकांनी विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया सुलभ व गतिमान होण्यासाठी उपयोग करावा.

७.५ अध्ययन – अध्यापन प्रक्रिया :

प्रत्येक मूल अद्वितीय (Unique) असते. तसेच प्रत्येक मूल शिकू शकते. हा मानसशास्त्रीय विचार विचारात घेऊन अध्ययन-अध्यापन प्रक्रिया घडवून आणणे हे शिक्षकांचे महत्त्वाचे कार्य आहे. शिक्षकांनी शिकविण्याची भूमिका न ठेवता वर्गामध्ये विद्यार्थ्यांसाठी सुलभकाची (facilitator) भूमिका बजाविण्याची गरज निर्माण झालेली आहे. कारण शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना शिकवू शकत असेल तर आतापर्यंत सर्व मुले शिकली असती. याचाच अर्थ विद्यार्थ्यांचे शिकणे हेच महत्त्वाचे आहे. हा मानसशास्त्रीय विचार विचारात घेऊन अध्ययन-अध्यापन प्रक्रिया घडवून आणणे हे शिक्षकाचे महत्त्वाचे कार्य आहे. तसेच प्रत्येक विषयाची अध्ययनाची पद्धती आणि गती ही देखील वेगवेगळी असू शकते. तथापि, योग्य पद्धत वापरली तर विषयांचे अध्ययन आकलन आणि जलद गतीने (Accelerated Learning) होण्यासही मदत होऊ शकते. त्यामुळे यापुढे पारंपरिक पद्धतीने अध्ययन-अध्यापन प्रक्रिया न करता ज्ञान, अनुभव आणि परिसरावर आधारित नवीन पद्धती शिक्षकाने विकसित करून अध्ययन करणे महत्त्वाचे आहे. तसेच यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला अभ्यासक्रम आणि हस्तपुस्तिका यांचा उपयोग करता येईल. यामध्ये विद्यार्थिकेंद्रित, ज्ञानरचनावाद (Constructivism) वर आधारित शिक्षण (Activity Based Learning) इ. पद्धतींचा उपयोग करणे अनिवार्य आहे. तसेच या पद्धतींना आधुनिक तंत्रज्ञानाचे जसे : माहिती तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे. यापैकी कोणतीही अथवा अन्य कोणतीही उपयुक्त पद्धती वापरून विद्यार्थ्यांची मदत करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य शिक्षकाला राहील. ज्या आधारे प्रत्येक मूल शिकू शकते हा आत्मविश्वास शिक्षकामध्ये येऊ शकेल आणि आपण शिकू शकतो हा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये येईल. याची जाणीव शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटकानेही करून घेणे आवश्यक आहे.

७.५.१ सर्व भाषाविषयासंदर्भात पाठ्यपुस्तकाबाहेरील अनुभव देणे आवश्यक आहे.

७.५.२ सर्व विषयांच्या मूल्यमापनानंतर प्रत्याभरणासाठी स्थान असावे.

७.५.३ सर्व विषयांच्या बाबतीत प्रात्यक्षिक पद्धतीला अध्यापनात स्थान असावे.

७.६ जलद गतीने शिक्षण (Accelerated Learning Method) :

देशात प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता आजच्या स्थितीला चांगली नाही. हे सर्वांना मान्य आहे. मात्र ही स्थिती अशीच रहावी हे कोणालाही मान्य नाही. त्यामुळे देशभरामध्ये तसेच महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यास बऱ्याच अंशी यश सुद्धा मिळत आहे. याने काही वर्षानंतर माध्यमिक स्तरावर गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त झालेली मुले मिळतील. परंतु आजच्या स्थितीला इयत्ता ८वा वर्ग शिकूनसुद्धा बऱ्याच मुलांची खरी शैक्षणिक पातळी कमी असण्याची शक्यता आहे. देशाच्या इतर राज्यांमध्ये ही मुले इयत्ता ४थी किंवा ५वीच्या पातळीवर दिसून आले आहेत. पुण्यात सुद्धा काही शाळांमध्ये

हीच स्थिती दिसली आहे. अध्ययनात मागे राहिलेली अशीच मुले इयत्ता १ली किंवा १० वीत अनुत्तीर्ण होत असावीत.

परंतु प्राथमिक पातळीवर ज्या पद्धतीने गुणवत्ता सुधार होण्यास सुरुवात झाली आहे त्याच पद्धतीने माध्यमिक पातळीवरसुद्धा गुणवत्ता सुधार होऊ शकते. या पद्धतीत ज्ञानरचनावाद जसे दिसते तसेच ते माध्यमिक स्तरावर दिसणार नाही. परंतु तत्त्व तेच आहे, ''मूल स्वत:हून शिकते.'' या तत्त्वाचा तग धरून वेगवेगळ्या संस्थांनी वेगवेगळ्या पद्धती विकसित केल्या आहेत अशा किमान ३ संस्थांद्वारे राज्यात वेगवेगळ्या पद्धती अंमलात आणल्यास आणि त्यापैकी एखादी पद्धत काही शिक्षकांना भावल्यास व दुसरी पद्धत इतर काही शिक्षकांना तसेच तिसरी पद्धत उरलेल्या शिक्षकांना भावल्यास त्यांना भावलेली पद्धत वापरण्याची मुभा राहील. या पद्धती पाहून विचारात घेऊन राज्यातील शिक्षक नवीन पद्धत सुद्धा विकसित करू शकतात. त्याचे स्वागत करण्यात येईल. अट एकच राहील. मुलांची वाढलेली शिकण्याची गती, ती गती एवढी वाढायला पाहिजे की माध्यमिक शाळेत शिकताना मूल अशिक्षित, पहिली, दुसरी, तिसरी, चौथी अथवा कोणत्याही पातळीचे असो दहावीची परीक्षा प्रामाणिकपणे पास व्हायला पाहिजे. वरील तीन संस्थांपैकी एका संस्थेला एका वर्षात ४.५ (साडे चार) वर्षांच्या शिक्षणाची तूट भरून काढण्यात यश आले असल्याचा अनुभव आहे.

७.७ यशस्वी माध्यमिक शाळा व त्यांना भेटी :

या शासन निर्णयामध्ये ज्या प्रकारच्या शाळेची अपेक्षा केली जात आहे अर्थात शाळा जेथे;

७.७.१ इयत्ता नववीला प्रवेशित एक सुद्धा विद्यार्थ्यांची गळती होत नाही तसेच अनुत्तीर्ण होत नाही.

७.७.२. ती सर्व मुले (१००%) दहावीत प्रवेशित होऊन परीक्षेस बसून उत्तीर्ण होतात.

७.७.३ जेथे मुलांना शिकणे आवडते. नुसतं उत्तीर्ण होण्याच्या दबावाखाली शिकणे घडत नाही.

७.७.४ सोयी सुविधा जसे विज्ञान, गणित, इंग्रजी इ. विषयांची प्रयोगशाळा योग्य पद्धतीची आहे.

अशा शाळांची यादी प्रत्येक जिल्ह्याने तयार करावी व इतर शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक व संस्था चालकांनी या शाळांना भेटी द्याव्यात. या शाळांची यादी बोर्ड तसेच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे च्या पोर्टलवर अपलोड करण्यात यावी.

## ८. उच्च प्राथमिक शाळेनंतर अप्रवेशित मुले व माध्यमिक स्तरावर अनियमित मुले :

विविध कारणांची उच्च प्राथमिक शाळा पूर्ण करून सुद्धा मुले माध्यमिक शाळांमध्ये प्रवेश घेत नाहीत. प्रवेश घेतल्यानंतर सुद्धा काही मुले अनियमित राहतात. अशा मुलांबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

८.१ Mother School ची संकल्पना

प्राथमिक स्तरावर प्रत्येक घरातील मुले कोणत्या शाळेत जातील हे जवळ-जवळ स्पष्ट असते. माध्यमिक शाळांमध्ये मात्र जवळच्या मोठ्या क्षेत्रामधून मुले शिकायला येतात. ग्रामीण भागात ज्या शाळेत ज्या गावातील सर्वाधिक मुले शिकत असतील अशा शाळांना यापुढे Mother School संबोधण्यात येईल. त्या गावात काही मुले उच्च प्राथमिक शिक्षण पूर्ण करून सुद्धा अप्रवेशित राहिल्यास त्या मुलास शोधून पटावर आणण्याची जबाबदारी सदर Mother School ची राहील. जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) व गटशिक्षणाधिकारी यांनी प्रत्येक गावासाठी Mother School निश्चित करावे व त्या शाळांच्या माध्यमातून इयत्ता ८वी पास सर्व (१००%) विद्यार्थी कोणत्या तरी शाळेत इयत्ता ९वीत दाखल होतील याची खात्री करावी. १००% मुलांच्या प्रवेशाची शहानिशा करण्यासाठी ''सरल'' संगणक प्रणालीचा वापर करण्यात यावा.

८.२ अनियमित हजेरीची मुले व शिकण्यात मागे राहणारी मुले/समता मूलक विचार :

मुलांचे अनियमित हजेरीमागे बरीच कारणे असू शकतात. प्रत्येक मुलाचे कारण वेगळे राहणार, त्याचा अभ्यास करून योग्य ती उपाययोजना करावी जेणेकरून मूल पुन्हा नियमित होऊ शकेल.

८.२.१ माणसांची ४ प्रकारची शरीरे असतात. स्त्री, पुरुष, तृतीय पंथी व विशेष गरजा असणारी तरीसुद्धा ही सर्व माणसेच असतात. त्याचप्रमाणे मुले सुद्धा ४ प्रकारच्या शरीरात आढळतात. पण ती सर्व मुलेच असतात.

८.२.२ याच प्रकारे मुलांच्या आई–वडिलांचे बरेच धर्मप्रकार असतात. परंतु सर्व धर्मातील आई–वडिलांची मुले ही मुलेच असतात.

८.२.३ मुलांचे आई–वडिलांचे बरेच जातींचे प्रकार असतात. तरीसुद्धा सर्व जातीच्या आई–वडिलांची मुले ही मुलेच असतात.

८.२.४ मुलांचे आई–वडील गरीब किंवा श्रीमंत असतात तरीसुद्धा त्यांची मुले ही मुलेच असतात.

८.२.५ मुलांचे आई–वडील ग्रामीण किंवा शहरी भागातील असतात किंवा शिक्षित वा अशिक्षित असतात. तरीसुद्धा त्यांची मुले ही मुले असतात.

कोणत्याही प्रकारच्या अडचणीमुळे मुले अनियमित किंवा अभ्यासात मागे असतील तर त्या अडचणी दूर करताना मुलांना फक्त मूल म्हणून समजावे असे समजल्याने अडचण दूर करणे सोपे होईल. १००% मुले शिकू शकतात. मुलामध्ये कोणताही भेद नाही. प्रत्येक मूल शिकू शकते हा आत्मविश्वास शिक्षकांच्या मनात निर्माण होणे आवश्यक आहे.

८.३ अडचणी दूर करताना अवलंबण्याचे विविध मार्ग खालीलप्रमाणे असू शकतात.

८.३.१ सामाजिक संस्थांचा सहभाग घेणे.

८.३.२ बालविवाह रोखण्यासाठी जाणीव पथनाट्य, व्हिडिओ, लघुचित्रपट इत्यादींच्या माध्यमातून पालकांमध्ये जाणीव जागृती निर्माण करणे.

८.३.३ 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा संदेश प्रत्यक्ष अंमलात येण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे.

८.३.४ मीना राजू मंच, किशोरी उत्कर्ष मंच यासारखे कार्यक्रम राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये सुरू करणे.

मुलींना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये सहभागी करून घेण्यासाठी तसेच मुला–मुलींमधील लिंगभेद कमी करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान या राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सुरू करण्यात आलेले किशोरी उत्कर्ष मंच, मीनाराजू मंच हे कार्यक्रम राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये सुरू करावेत.

८.३.५ किशोरवयीन मुला–मुलींना विशेष मार्गदर्शन

माध्यमिक वयोगटातील विद्यार्थ्यांना आरोग्य, स्वच्छता या विषयांचे महत्त्व पटवून देणे, तसेच किशोरवयीन समस्यांबद्दल परिचित करणे याकरिता विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**९. अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तक, वर्गाध्यापन व मूल्यमापन :**

परिच्छेद क्र. ४ व ५ वर नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय निष्पत्ती सर्वेक्षणात मुलांनी पुढील ३ वर्षात ४०० पैकी किमान

सरासरी ३०० गुण मिळवायला पाहिजेत. त्यापुढील काळात जागतिक पातळीवरील better performing देशांबरोबरच महाराष्ट्र राज्याची मुले सुद्धा दिसायला पाहिजेत. हे होण्यात काही अडचण आहे काय असे विचार करून पाहिल्यास अडचण दिसून येत नाही. खोलात विचार करून पाहिल्यास ही अडचण राज्यात ज्या पद्धतीचे अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तक, वर्गाध्यापन व मूल्यमापन इत्यादी स्वीकारलेले आहे त्यात असली पाहिजे. या मुद्द्यावर बोर्डात विद्वत्त मंडळासोबत चर्चा करण्यात आली. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील वरील पाचही बाबी ठरवल्या गेलेल्या उद्दिष्टात सरमिसळ होताना स्पष्ट दिसत होत्या. त्या चर्चेतील काही मतांचा येथे उल्लेख करणे उपयोगी ठरेल.

१. शिक्षणातून फक्त डॉक्टर, इंजिनियर, CA सारखे मोजकेच व्यावसायिक बनणे अपेक्षित नाही.
२. शिक्षणातून वरील व्यावसायिकांशिवाय काही मुले कौशल्याधिष्ठित व्यवसायाकडे वळतील अशी उद्दिष्टे ठरवली आहेत.
३. बोर्डाच्या शिक्षणाचे उद्दिष्ट फक्त CBSE सोबत स्पर्धा करणे आहे काय? असा प्रश्न काहींच्या मनात आला.
४. NEET आणि राज्याच्या CET मधील तफावतीबद्दल बरीच वेगवेगळी मते आली.

राज्याचे शिक्षण राज्याची वैशिष्ट्ये जोपासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य असलेले शिक्षण असायला हवे. तसे केल्याने राज्यातील मुले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मूल्यमापनात मागे पडणार नाही. असे करत असताना राज्यातील मुले व शिक्षक यांच्यावर भरपूर विश्वास ठेवावा लागेल. एखाद्या बाबतीत मुले मागे पडत असतील तर त्या मुद्द्यावर शिक्षकांसोबत चर्चा करून शिक्षकांचे क्षमता विकसनाचे कार्यक्रम हाती घ्यावे लागतील. परिच्छेद क्र. ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अशा क्षमता विकासनाचे कार्यक्रम विकसित करण्यासाठी पुरेशा राज्यस्तरीय संस्था उपलब्ध आहेत. यदाकदाचित त्या संस्थांना एखादे कार्य अवगत नसेल तर राष्ट्रीय किंवा आवश्यकतेप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावरील मार्गदर्शक उपलब्ध करून घेणे शक्य आहे.

निश्चित केलेले बेंचमार्क प्राप्त करण्यासाठी सर्वांनी कामास लागावे. त्याप्रमाणे अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तक, इतर शैक्षणिक साहित्य, वर्ग व वर्गाबाहेरील अभ्यासक्रिया आणि मूल्यमापन सुधारित करण्यात यावे. मागील वर्षाच्या इयत्ता १० व्या वर्गाच्या प्रश्नपत्रिकेत एक प्रश्न पाठ्यक्रमातील होते परंतु पाठ्यपुस्तकाबाहेरील होते. त्या प्रश्नास पाठ्यक्रमाबाहेरील असल्याबाबत बरीच चर्चा झाली. यावरून राज्यात सध्या संकल्पना आधारित शिक्षण न देता पाठ्यपुस्तकाधारित शिक्षण दिले जात आहे असे दिसते. या व अशा बाबी सुधारण्याची आवश्यकता आहे. त्यावर शैक्षणिक प्राधिकरण आणि बोर्डाने अभ्यास मंडळामार्फत तातडीने कार्य करण्याची आवश्यकता आहे. हे कार्य पुढील शैक्षणिक सत्राचे आत पूर्ण करून घेण्यात यावे. हे केल्याशिवाय बेंचमार्क प्राप्त करणे शक्य होणार नाही हे सुद्धा लक्षात ठेवावे.

**१०. अभ्यासक्रम आणि ग्रेडेड विषय :**

इ. १०वी मधील अभ्यासक्रम हा इ. ६वी ते इ.९वी पर्यंतच्या अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत झालेला असावा. म्हणेजच इ.१०वी मध्ये नवीन बाबींचे अध्ययन करणे ही समस्या विद्यार्थ्यांसमोर राहणार नाही व सर्व संकल्पनांचे दृढीकरण होण्यास मदत होईल.

अभ्यासक्रमातील अनेक संकल्पना, आशय हा प्रत्येक इयत्तेमध्ये पूर्णत: न देता फक्त ओळख या स्वरूपात दिला जातो. तसे न करता ती संकल्पना पूर्ण स्पष्ट करावी. यासाठी एकूण अभ्यासक्रमातील संकल्पना कमी केल्या तरी चालतील. इयत्तांमधील अभ्यासक्रम एकमेकांशी सुसंगत असावा.

बेंचमार्क सारखे उद्दिष्ट स्पष्ट झाल्यावर ते उद्दिष्ट राज्यातील मुलांना सहजरित्या तणावविरहित वातावरणात प्राप्त करणे शक्य होईल यासाठी सुद्धा लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. या स्पष्टतेनंतर अभ्यासक्रमात ग्रेडेड विषयांचे स्थानसुद्धा स्पष्ट होऊन जाईल. कौशल्य मुलांच्या अंगी असते. एखाद्या संकल्पनेचे ज्ञान असूनही ते अंगी न उतरणे शक्य आहे. यामुळे कौशल्य विकासाचे उद्दिष्ट असलेल्या विषयांची लेखी परीक्षा घेणे योग्य नाही. ते कौशल्य मुलाच्या अंगी प्रत्यक्ष पाहणेच योग्य राहील. मूल्यमापनाची पद्धत ठरवत असताना या व अशा बाबींचा विचार करण्यात यावा.

या आधी बोर्ड परीक्षेशिवाय बाहेरील कोणतेही मूल्यमापन नसावयाचे. बोर्डाच्या परीक्षेत अधिकाधिक निकाल येणे हे एखाद्या शाळेच्या गुणवत्तेचे मोजमाप असावयाचे. त्यामुळे शाळेला एखादे गुण देण्याचे अधिकार दिले आणि त्याच्या बोर्डाच्या निकालाशी संबंध जोडल्यास शाळेच्या अधिकारातील मुलांना १०० टक्के गुणदान करून निकाल वाढवण्याकडे कल असावयाचा. मग ती गुणवत्ता मुलामध्ये असो की नसो. परंतु यापुढे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील मूल्यमापन गुणवत्तेचा खरे मोजमाप होणार असल्यामुळे बोर्डाच्या निकालाचे महत्त्व कमी होणार आहे. त्यामुळे आंतरिक परीक्षांमध्ये सुद्धा प्रामाणिक गुणदान करण्याकडे कल वाढणार आहे. हे लक्षात घेता ग्रेडेड विषयांचे सुद्धा आंतरिक मूल्यमापन करणे योग्य राहील काय हे तपासून पाहण्यात यावे.

**११.** मुख्य विषयांव्यतिरिक्त ग्रेडेड विषयांचा विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण असू नये. त्यानुसार ग्रेडेड विषयांचे अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तक यामध्ये आवश्यक तो बदल करण्यात यावा. इंग्रजी या विषयाचे महत्त्व विचारात घेऊन प्राथमिक मध्ये स्पोकन इंग्लिश या उपक्रमास उत्तम प्रतिसाद मिळत आहे. माध्यमिक स्तरावर देखील विद्यार्थ्यांना इंग्रजीमध्ये बोलता येण्याचा आत्मविश्वास निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**१२. खाजगी व्यवस्थापन, शाळा व्यवस्थापन समिती, पालक शिक्षक संघ, माता शिक्षक संघ यांचा सहभाग :**

शाळेच्या विकासामध्ये किंबहुना शाळेच्या विकासात्मक नियोजनामध्ये सर्वाधिक महत्त्वाची भूमिका शाळा व्यवस्थापनाची/ शाळा व्यवस्थापन समितीची असते. शाळा व्यवस्थापनांनी शैक्षणिक गुणवत्तेकरिता विविध कार्यक्रम सुरू करण्यासाठी पुढाकार घेणे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी काही कल्याणकारी उपक्रम राबविण्यास देखील सुरुवात करावी. माध्यमिक शाळांतील गरजू असलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने अथवा CSR च्या सहकार्याने विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, शालेय साहित्य, गणवेश इ. गोष्टी उपलब्ध करण्यासाठी शाळा व्यवस्थापनांनी प्रयत्न करावे.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती पालकांना व विशेष करून विद्यार्थ्यांच्या मातांना समजावी याकरिता प्रत्येक शाळेमध्ये पालक शिक्षक संघ व माता शिक्षक संघांच्या बैठकांचे आयोजन व्हावे. यामध्ये शैक्षणिक प्रगतीबाबत पालकांना संबोधित केले जावे. तसेच विद्यार्थ्यांच्या अडचणी पालकांच्या निदर्शनास आणून दिल्या जाव्यात. पालक व शिक्षक या दोघांनी संयुक्तरित्या विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्याची भूमिका पार पाडावी.

**१३. प्रशासकीय व व्यवस्थापकीय मदत :**

माध्यमिक शिक्षण हे काळाशी सुसंगत असावे या हेतूने तसेच ते उच्च शिक्षण व उच्च प्राथमिक शिक्षण यांच्यामधील शिक्षणाचा स्तर असल्याने माध्यमिक शिक्षणामध्ये शासन स्तरावरून देखील राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, ICT, Vocationalization for Secondary Education, Inclusive Education at Secondary Stage, Girls Hostel या योजना केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेल्या आहेत.

१. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान

२. ICT

३. Vocationalization for Secondary Education

४. Inclusive Education at Secondary Stage

५. Girls Hostel

आय सी टी या योजनेअंतर्गत राज्यातील शासकीय व खाजगी अनुदानित शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापन करण्यात येतात. या प्रयोगशाळांच्या उभारणीकरिता ५ वर्षाकरिता केंद्र व राज्य शासनाकडून आर्थिक सहाय्य केले जाते. परंतु ५ वर्षानंतर याच प्रयोगशाळांच्या देखभाल दुरुस्तीकरिता तसेच या प्रयोगशाळा अधिक सुसज्ज बनविण्याकरिता शाळा स्तरावरून प्रयत्न करण्यात यावे.

### १४. माध्यमिक स्तरावर कौशल्याधिष्ठित शिक्षणाची सुरुवात :

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत व्यवसाय शिक्षण माध्यमिक स्तर ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत व्यवसाय विषय माध्यमिक स्तरावर मुख्य विषय म्हणून शिकण्याची मुभा आहे. तूर्त ही योजना केवळ शासकीय शाळांसाठी लागू असून सर्व खाजगी अनुदानित व स्वयं अर्थसहाय्य शाळांमध्ये, स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर व्यवसाय विषय सुरू करण्याबाबतचे धोरण शासनाच्या विचाराधीन आहे.

### १५. शिक्षक, अधिकारी, खाजगी व्यवस्थापन, शाळा व्यवस्थापन समिती यांचा सन्मान :

विद्यार्थ्यांना शिकविणे, शैक्षणिकदृष्ट्या प्रगत करणे यामध्ये सर्वांत महत्त्वाचा घटक शिक्षक आहे. शिक्षकांच्या सन्मानाची सर्वात नजिकची पातळी शाळा व्यवस्थापन/शाळा व्यवस्थापन समिती राहील. इयत्ता ९वीमध्ये विद्यार्थ्यांची गळती रोखणे व आवश्यक संपादणूक क्षमता प्राप्त करणे तसेच इयत्ता १०वी मध्ये १००% विद्यार्थी इयत्ता १०वीच्या परीक्षेसाठी प्रविष्ट करणे व आवश्यक संपादणूक क्षमता प्राप्त करणे. या निकषात पात्र ठरणाऱ्या सर्व शिक्षकांचा सन्मान केला जाईल.

मुख्याध्यापक, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी यांचा त्यांच्या अखत्यारित सन्मान घेणाऱ्या कार्यरत शिक्षक व शाळा यांची संख्या व टक्के विचारात घेऊन सन्मान दिला जाईल.

### १६. शिक्षकांच्या सभा, मुख्याध्यापक, विषय संघटनांच्या बैठका :

तालुका स्तरावर विषयनिहाय शिक्षकांचे क्लब तयार करण्यात यावे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत ब्रिटीश कौन्सिल प्रशिक्षणामध्ये इंग्रजी भाषेच्या शिक्षकांचे अनेक क्लब जिल्ह्यांमध्ये कार्यरत झाले आहेत. तसेच मेंटॉर व मेंटी कन्सेप्ट देखील यशस्वी झालेला आहे. अन्य विषयांसाठी देखील याचप्रकारे विषयनिहाय क्लब व मेंटॉर, मेंटी तयार करण्यात यावे.

### १७. सहशालेय उपक्रम तसेच क्रीडा विषयास महत्त्व :

१७.१ जसजसे देशांमध्ये सुबत्ता (श्रीमंती) येते तसतसे देश क्रीडा क्षेत्रामध्ये पुढे जात असतात. क्रीडा क्षेत्रामध्ये पुढे जाण्याचे सर्वोत्कृष्ट मोजमाप ऑलिंपिक पदक मिळवणे हे होय. बाकीच्या सर्व पातळीवरील पदके भारत देशातील खेळाडू मिळवतात परंतु ऑलिंपिक पदक मिळवण्यात आपल्या देशाला अवघड जात होते. परंतु अलीकडच्या काळात देशाला तेथेही पदक मिळण्यास सुरुवात झाली आहे. राष्ट्रीय स्पर्धेमध्ये दिल्ली राज्याला सर्वाधिक सुवर्ण पदक मिळत असले तरी आपल्या राज्याला देखील यात सर्वाधिक पदके मिळतात. तेव्हा ऑलिंपिकमध्ये देश यशस्वी होताना आपल्या राज्याचा त्यात सिंहाचा वाटा असायला हवा. यासाठी शालेय क्रीडा स्पर्धा व विविध क्रीडा संघांच्या स्पर्धेमध्ये राज्य पातळीवरून सुसूत्रता आणण्यात येत आहे. Potential असलेल्या खेळाडूंची कमी वयातच निवड करून आपल्या शाळेत होतकरू खेळाडू असल्यास त्यांचे स्वप्न ऑलिंपिक पदक पर्यंत वाढवावे व अशा खेळाडूंबाबत माहिती तालुका व जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना द्यावी.

१७.२ खेळाचे महत्त्व आरोग्य व शरीर सौष्ठवसाठी आहे. त्यामुळे आपल्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला कोणत्यातरी

खेळाबद्दल आवड तयार होईल याची काळजी घ्यावी. एखाद्या खेळाची आवड निर्माण झाली तरी आयुष्य जगत असताना प्रत्येक वेळी व प्रत्येक ठिकाणी प्रत्येक मुलाच्या आवडीची खेळाची सोयीसुविधा उपलब्ध असेलच असे नाही. अशा वेळी सुद्धा आरोग्य व शरीर सौष्ठवाची आवश्यकता असतेच. त्यामुळे मुलांमध्ये खेळांसह सहज करता येण्याजोगे विविध शारीरिक व्यायाम प्रकार तसेच योग याची सवय लागेल याची काळजी घेण्यात यावी. मा. पंतप्रधानांनी मुलांशी बोलत असतांना ''प्रत्येक मुलाने रोज किमान एक तास घाम येईल असा व्यायाम करावा'' असे संदेश दिले आहेत. याप्रमाणे सर्व शाळांनी कार्यवाही करावी.

**१८. Child Educational Quality Tracking System :**

प्राथमिक प्रमाणेच माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता देखील Child Educational Quality Tracking System तयार होत असून या प्रणालीमुळे मुले शाळेत नियमित येत आहेत किंवा नाहीत या सोबतच ते शिकत आहेत की नाहीत हे लक्षात येईल.

**१९. बायोमेट्रीक हजेरी व्यवस्था :**

सर्व विद्यार्थी व शिक्षक यांच्या हजेरीसाठी प्रत्येक शाळा पातळीवर बायोमेट्रिक व्यवस्था निर्माण करण्यात यावी.

**२०. कार्पोरेट/स्वयंसेवी संस्थांचा सहभाग :**

स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय, वाचन प्रेरणा, समृद्ध वाचनालय, सुसज्ज गणित, विज्ञान व भाषा प्रयोगशाळा, अभ्यासिका कक्ष, ई–लर्गिंग कक्ष, आय सी टी प्रयोगशाळा, व्यवसाय विषयक प्रयोगशाळा, समुपदेशक केंद्र, भौतिक सुविधा, पाणी व शौचालय सुविधा इ. करिता कार्पोरेट व स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने शाळांनी सुसज्ज व समृद्ध बनण्याकरिता प्रयत्न करावेत.

**२१. SS-२०१६ प्रमाणीकरण (शाळा सिद्धी) :**

या संदर्भात राष्ट्रीय स्तरावर शाळा सिद्धी हा कार्यक्रम शाळांचे मूल्यमापन व मानके निश्चित करण्याकरिता गतवर्षापासून सुरू करण्यात आलेला आहे. राज्यातील सर्व शाळा यामध्ये सहभागी होऊन शाळांचे मूल्यमापन व मानके निश्चित करून घेणे गरजेचे आहे. राज्यामध्ये हा कार्यक्रम समृद्ध शाळा या नावाने सुरू करण्यात आलेला असून त्या संदर्भातील शासन निर्णय दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

परिच्छेद क्र. २.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मागील वर्षी १८१९ शाळा ISO ९००० झाल्या आहेत. राज्यात एकूण १ लाख ७ हजार शाळा असून या सर्व शाळा पुढील ५ वर्षात प्रमाणित व्हाव्यात असे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून या वर्षाकरिता २०००० शाळांचे लक्ष्य आहे. त्यामुळे सर्व शाळांना यात सहभागी होऊन स्वतःला SS-२०१६ प्रमाणित करून घ्यावे यासाठी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परीक्षण च्या पोर्टल मध्ये अधिकची माहिती मिळेल.

**२२. प्रामाणिकपणे उत्तीर्ण होण्याचा अर्थ :**

शिक्षित झाल्यावर व प्रमाणपत्र घेतल्यावर जीवन जगत असतांना त्या शिक्षणाचा उपयोग करता येणे यास प्रामाणिकपणाने उत्तीर्ण होणे असे म्हणता येईल. तथापि ते फक्त शिकलेल्या संकल्पनांचे उपयोजन एवढेच नव्हे. हे मूल नोकरीसाठी एखाद्या मुलाखतीत गेल्यास मुलाखतीच्या वेळी त्याच्याकडे असलेल्या प्रमाणपत्राएवढे शिक्षणाचे प्रमाण त्या मुलामध्ये दिसले पाहिजे. अर्थात प्रामाणिकपणे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण त्या मुलात दिसले पाहिजे.

राष्ट्रीय पातळीवर एका चर्चासत्रात राष्ट्रीय मुक्त विद्यालयास फक्त प्रमाणपत्र देणारी संस्था समजण्यात येत असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. प्रतिभागींच्या मते प्रमाणित करणारी संस्था ही एखाद्या व्यक्तीने शिकून मिळविलेल्या ज्ञान आणि कौशल्याला प्रमाणित करणारी संस्था आहे. परंतु लोकांचे कल काहीही न शिकता प्रमाणपत्र

घेण्याकडे आहे. ही परिस्थिती भयावह आहे. तसेही अशा प्रमाणपत्राचा जीवनात उपयोग होत नाही. शालेय स्तरावर ही बाब मुलांच्या लक्षात आणणे योग्य राहील. प्रमाणपत्र असले की नोकरी मिळेल अशी काही परिस्थिती सध्याच्या युगात नाही. तसेच कोणास काही विशेष येत असल्यास ते प्रमाणित करून घेणे ही चांगली बाब आहे. राष्ट्रीय मुक्त विद्यालयाद्वारे एका मूर्तीकाराचे मूल्यांकन करून Ph.D. दिल्याचे सांगण्यात आले. त्या व्यक्तीस लेखन वाचन येत नाही. त्यामुळे त्यांनी कोणती Ph.D ची थीसिस जमा केली नाही तरी सुद्धा त्यांना Ph.D ची डिग्री दिली गेली. काही वेळा ज्ञान संपादन न करता थीसिस जमा करून मिळवलेल्या एखाद्या डिग्रीपेक्षा उपरोक्त डिग्रीत जास्त प्रामाणिकपणा आहे.

**२३. स्वच्छ विद्यालय पुरस्कार व किशोरवयीन मुलींचे आरोग्य :**

केंद्र शासनाने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून स्वच्छ विद्यालय पुरस्कार हा कार्यक्रम सुरू केला असून यासंदर्भातील शासन निर्णय दिनांक १ जुलै, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. राज्यातील सर्व माध्यमिक शाळांनी या पुरस्काराकरिता अर्ज करणे आवश्यक असून स्वच्छतेच्या जाणिवा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे. माध्यमिक शाळांतील मुलींकरिता किशोरवयीन मुलींच्या आरोग्यासंदर्भात देखील आवश्यक मार्गदर्शन मुलींना होणे गरजेचे आहे.

शाळा स्वच्छ ठेवणे आणि मुले तसेच शिक्षकांमध्ये स्वच्छतेच्या सवयी लावण्यासाठी दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णय प्रमाणे कार्यवाही करावी.

**२४. लोकसहभाग :**

लोकसहभागातून समृद्ध शाळा हा शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. माध्यमिक शाळांनी देखील अधिक लोकसहभाग मिळविण्याकरिता प्रयत्नशील असावे व त्यामधून शाळांचा विकास करावा. समाजातील तांत्रिक व कौशल्याधिष्ठित असलेल्या मनुष्यबळाचा शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये सहभाग वाढवावा.

**२५. पालक भेट आणि समुपदेशन :**

माध्यमिक शाळेत ज्या गावातून/परिसरातून मुले येतात त्या गावात मुख्याध्यापक/शिक्षक आणि संस्थाचालक यांनी दर आठवड्यातून एका ठिकाणी प्रत्यक्ष पालकांच्या गावात/परिसरात पालक भेटीचे नियोजन करावे. यामध्ये प्रत्येक गांव/परिसर मुख्याध्यापक, शिक्षक आणि संस्थांचालक यांनी दत्तक घेतल्यास या पालक भेटीला अधिक महत्त्व प्राप्त होईल व परिसराला शैक्षणिक नेतृत्व मिळेल. त्यासाठी पूर्व कल्पना शाळेच्या सुरुवातीलाच पालकांना व विद्यार्थ्यांना देणे. यामुळे शाळा आणि पालक यांचे संबंध दृढ होतीलच पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत प्रत्यक्ष पालकांशी चर्चा करता येते. शाळेत मुले उपस्थित राहण्यापासून ते त्याच्या शिक्षणातील प्रगती व अडी अडचणीसंदर्भात पालकांचे समुपदेशन करणे सुलभ होते. त्यामुळे उपस्थितीत वाढ होईलच तसेच शाळाबाह्य मूल राहणार नाही यासाठी मदत होईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची गळतीही होणार नाही. तसेच संबंधित गाव/परिसरातील पालकांची शाळेतील भौतिक सुविधा उपलब्ध करण्यास मदत होईल.

**२६. विद्यार्थी/विद्यार्थिनींची सुरक्षा :**

विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि गुणवत्ता यासाठी त्यांची सुरक्षितता ही अतिशय महत्त्वाची असते. ग्रमीण भागातील शाळांमध्ये विविध वाड्या-वस्त्यांमधून तसेच शहरी भागात शहरातील विविध भागातून विद्यार्थी येत असतात. विद्यार्थी शाळेत येण्यापासून ते घरी पोहोचेपर्यंत त्यांच्या सुरक्षिततेची काळजी शाळांनी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी पालकांशी चर्चा करून शाळेत आणणे आणि शाळेतून निघतांना त्यांच्या वाहनापर्यंत अथवा अन्य सुविधांपर्यंत त्यांना पोहोचवणे

(विशेषतः मुलींच्या संदर्भात) याबाबत मुख्याध्यापकांनी शिक्षकांच्या व पालकांच्या सहकार्याने नियोजन करावे. जसे बापूसो शिंदे विद्यालय, चिखली, ता. वाई, जि. सातारा या शाळेत मुलांना विशेषतः एस. टी. आगार अथवा अन्य वाहनांमध्ये बसवण्याची जबाबदारी शिक्षकांनी स्वीकारलेली आहे.

**२७. मार्गदर्शन व समुपदेशन :**

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी किशोरवयीन असल्याने त्यांची मानसिकता समजून घेणे खूप गरजेचे आहे. याकरिता मार्गदर्शन व समुपदेशाची (Guidance and Counseling) ची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांना भविष्यात करिअरसाठी उपलब्ध असणाऱ्या प्रवेशाच्या संधी, स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे कसे जावे याबद्दलची तयारी यासाठी मार्गदर्शन व समुपदेशनाचे कार्यक्रम शाळा स्तरावर आयोजित करावे. तसेच UPSC, MPSC, NEET, JEE इ. स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाण्याकरिता विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक सहकार्य व मार्गदर्शन देखील शाळा स्तरावरच उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करावे.

**२८. निष्पत्ती अहवाल :**

निष्पत्ती अहवाल दिवाळी सुट्टीनंतरच देणे. जेणे की, मुलांची प्रगती लक्षात येण्यास मदत होईल व मार्च मध्ये होणाऱ्या परीक्षेपर्यंत त्यांना आवश्यक शैक्षणिक सहाय्य, सहकार्य करणे शक्य होईल.

२८.१ इयत्ता ९ वी मधील पटांवरील १००% मुले पास होणार असे सांगणाऱ्या शाळा संख्या...

२८.२ इयत्ता १० वी मधील पटांवरील १००% मुले पास होणार असे सांगणाऱ्या शाळा संख्या ....

२८.३ आपल्या कार्यक्षेत्रातील सर्वेक्षण पूर्ण केलेल्या शाळा संख्या....

२८.४ सर्वेक्षित १००% मुलांची नोंदणी केलल्या शाळा संख्या....

**२९. प्रक्रिया अहवाल :**

२९.१ Mother School संकल्पनेसाठी १००% गावांची मॅपिंग केलेल्या तालुक्यांची संख्या....

२९.२ शाळांनी घेतलेल्या पालक सभांची संख्या :

२८.२.१ शाळा पातळीवर.....

२८.२.२ गाव पातळीवर ......

(मदर स्कूलने गाव पातळीवर पालक सभा घेणे अपेक्षित आहे.)

२९.३ विज्ञान

२९.३.१ प्रत्येक संकल्पनेसाठी e-learning /प्रात्यक्षिक/प्रयोगशाळा वापरणाऱ्या शाळांची संख्या ........पैकी.....

२९.३.२ विज्ञान मेळावे आयोजित केलेल्या शाळांची संख्या.....

२९.४.३ सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा असलेल्या शाळांची संख्या......

२९.३.४ विज्ञान शिक्षणासाठी SISE कडून मदतीच्या मागणी केलेल्या शाळांची संख्या....

२९.४ गणित

२९.४.१ प्रत्येक संकल्पनेसाठी e-learning /प्रात्यक्षिक/प्रयोगशाळा वापरणाऱ्या शाळांची संख्या ....... पैकी ....

२९.४.२ गणित मेळावे आयोजित केलेल्या शाळांची संख्या ......

२९.४.३ सुसज्ज गणित प्रयोगशाळा असलेल्या शाळांची संख्या......

२९.४.४ गणित शिक्षणासाठी SIEM कडून मदतीच्या मागणी केलेल्या शाळांची संख्या....

२९.५ इंग्रजी

२९.५.१ Spoken English साठी e-learning इ. वापरणाऱ्या शाळांची संख्या....

२९.५.२ Spoken English साठी विशेष तासिका ठेवणाऱ्या शाळांची संख्या .....

२९.५.३ English Language Learning Club (ELLC) सुरू केलेल्या शाळांची संख्या....

२९.५.४ इंग्रजी शिक्षणासाठी SIEM कडून मदतीच्या मागणी केलेल्या शाळांची संख्या...

२९.३ इतर शाळांना भेटी केलेल्या

२९.६.१ शाळा संख्या......

२९.६.२ शिक्षक संख्या....

**३०. पर्यवेक्षकीय जबाबदारी :**

शाळा स्तरावर गुणवत्तेची जबाबदारी शाळा स्तरावर गुणवत्ता कक्षाची राहील. तसेच तालुका, जिल्हा व राज्य स्तरावरील संनियंत्रण हे तालुका, जिल्हा व राज्य स्तरावरील गुणवत्ता कक्षाची राहील. प्राथमिक व माध्यमिक करिता एकच गुणवत्ता कक्ष राहील.

प्रक्रिया व निष्पत्ती अहवाल सादर करण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील. त्यांनी संचालक (माध्यमिक) यांना अहवाल सादर केल्यावर संचालकांनी त्याच्या आधारे आपले पुढील कृती कार्यक्रम आखावे. त्याच प्रमाणे कृतिकार्यक्रम तयार करून राबविण्यासाठी अहवालाच्या प्रती अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे तसेच संचालक, विद्या प्राधिकरण यांना पाठवावे. तसेच हा शासन निर्णय सर्व माध्यमांच्या राज्य मंडळाशी संलग्नित शाळांना लागू राहील.

या कृतिकार्यक्रमांची अंमलबजावणी शाळांनी त्यांच्या पातळीवर करावी. यापेक्षा वेगळा कृतिकार्यक्रम शाळा राबवत असल्यास त्याची माहिती अधिकाऱ्यांना द्यावी.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१६०९१७१५०८४३८५२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

**(नंद कुमार)**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव

३) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे खाजगी सचिव.

४) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव

५) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक

६) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
७) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
८) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई
९) अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१२) संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
१३) संचालक, प्रौढ शिक्षण, पुणे
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१५) आयुक्त, सर्व महानगरपालिका
१६) सर्व विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
१७) सर्व विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
१८) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१९) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद सर्व.
२०) शिक्षण निरिक्षक मुंबई (पश्चिम, दक्षिण व उत्तर)
२१) प्रशासन अधिकारी, महानगरपालिका सर्व
२२) संचालक, विज्ञान संस्था, नागपूर
२३) संचालक, आंग्लभाषा संस्था, औरंगाबाद
२४) सर्व डायट प्राचार्य
२५) सर्व गटशिक्षणाधिकारी
२६) सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक (शिक्षणाधिकारी, माध्यमिक यांचे मार्फत)
२७) शालेय शिक्षण विभागातील सर्व सहसचिव, उपसचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी
२८) निवड नस्ती, एसडी–६.

❑❑❑

# ८. सरल प्रणाली

**शाळा, शिक्षक विद्यार्थी या सर्वांची माहिती सरल (SARAL-Systematic Administrative Reforms for Achieving Learning By Students) या संगणक प्रणालीद्वारे भरून घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संगण १०१५/प्र.क्र. १९/संगणक**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : ३ जुलै २०१५.

वाचा : १) **शासन परिपत्रक क्रमांक : शैसांमा–२०१२/प्र.क्र. २६/१२/सांख्यिकी कक्ष, दि. ३० मे २०१२.**
२) **शासन निर्णय क्रमांक : शैसांमा–२०१२/प्र.क्र. ११६/१२/सांख्यिकी कक्ष, दि. २८ जानेवारी २०१३.**
३) **शासन निर्णय क्रमांक : प्राशिधो–२०१३/(प्र.क्र १०/२०१३)/प्राशि–१, दि. १८ एप्रिल २०१३.**
४) **शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण–२०१३/प्र.क्र, ९६/आरटीई, दि. १४ नोव्हेंबर २०१३.**
५) **शासन निर्णय क्रमांक : शैगुवि–२०१५/(८०/१५) एसडी ६, २२ जून, २०१५**

**प्रस्तावना :**

विविध प्रकारच्या शैक्षणिक व प्रशासकीय नियोजनासाठी विभिन्न स्वरूपाच्या सांख्यिकीय माहितीची गरज असते. अशा माहितीची विविध पातळींवरून, शाळांकडून सातत्याने मागणी केली जाते. ही माहिती वेगवेगळ्या स्तरावर कागदावर (Hard copy) उपलब्ध असते. सदर माहिती संगणकावर सॉफ्ट कॉपीच्या स्वरूपात एकत्रितरित्या संकलित नसते. यामुळे शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख यांचा भरपूर वेळ ही माहिती गोळा करणे, संकलित करणे यासाठी खर्ची पडतो. यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर स्टेशनरी वाया जाते. मनुष्य तास वाया जातात. शिक्षकांचा, मुख्याध्यापकांचा बराच वेळ माहिती तयार करणे, ती गोळा करणे या अशैक्षणिक कामामध्ये जातो. त्यामुळे त्यांना अध्ययन–अध्यापनासाठी पुरेसा वेळ उपलब्ध होत नाही. त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होतो.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम २७ नुसार शिक्षकांना केवळ दशवार्षिक जनगणना, आपत्कालीन परिस्थितीमुळे उद्भवलेली स्थिती व निवडणुका याखेरीज अशैक्षणिक कामे देता येणार नाहीत.

या अधिनियमाच्या कलम ३ नुसार सर्व मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या अधिनियमातील कलम २९ नुसार मुलांना बालकेंद्री व बालस्नेही पद्धतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी व त्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करण्याकरिता शिक्षकांचा संपूर्ण वेळ अध्ययन–अध्यापन प्रक्रियेसाठी उपयोगी येणे आवश्यक आहे.

दरवर्षी भारत सरकारच्या युडायस या प्रणालीनुसार ३० सप्टेंबर या संदर्भांकित दिनांकास राज्यातील सर्व शाळांकडून माहिती संकलित केली जाते. यामधील माहिती ही केवळ सांख्यिकीय स्वरूपात असून ती मर्यादित प्रमाणात उपलब्ध होते. त्यामध्ये विद्यार्थिनिहाय माहिती उपलब्ध होत नाही. शालेय शिक्षण विभागाकरिता विविध प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेणे, प्रभावी नियोजन करणे, आर्थिक तरतुदीचे नियोजन करणे, सनियंत्रणासाठी अचूक व निर्धारित वेळेत सांख्यिकीय माहिती

प्राप्त करून घेणे गरजेचे असते. मात्र युडायस या प्रणालीमधून प्राप्त माहिती या सर्व बाबींकरिता पुरेशी नसते. त्यामुळे शिक्षकांकडून वर्षभर वेळोवेळी माहिती मागवावी लागते.

त्याचप्रमाणे राज्यात आधार कार्ड नोंदणीचे कार्य मोठ्या प्रमाणावर घेण्यात आले असून विद्यार्थ्यांचे (६ ते १८ वर्षे वयोगट) आधार कार्ड नोंदणीची मोहीम शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१५/प्र.क्र.४९/एसडी–१, दि. २१ एप्रिल, २०१५ अन्वये हाती घेण्यात आली आहे. सध्या ७० टक्के विद्यार्थ्यांची नोंदणी झाली असली तरी येत्या काही महिन्यात ती १०० टक्के पर्यंत पोहोचणार आहे. १८ पेक्षा अधिक वयोगटातील लोकांचे आधारकार्ड नोंदणी जवळजवळ पूर्ण झालेली आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याबंद्दल अचूक माहिती संगणकीकृत करून त्याचे ट्रॅकिंग करणे शक्य झाले आहे. मुले आणि शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती भरल्याने त्यांच्याबद्दल सांख्यिकीय माहिती संगणकाद्वारे आपोआप प्राप्त होणार आहे. त्यामुळे सांख्यिकीय माहिती भरण्याच्या त्रुटी कमी होणे शक्य झाले आहे. तसेच मूलनिहाय, व्यक्तिनिहाय, संस्थानिहाय व शाळानिहाय एकदा माहिती भरली की फक्त नव्याने शाळेत दाखल होणारी मुले, नव्याने सेवेत येणारे शिक्षक/कर्मचारीवृंद, नवीन शाळा व नवीन संस्था याबद्दलच माहिती भरावी लागणार आहे. शाळेतून पास होणारी मुले, सेवानिवृत्ती इत्यादी कारणांनी कमी होणारे शिक्षक व कर्मचाऱ्यांची माहिती संगणक स्वत:हून काढणार असल्यामुळे माहिती भरण्याची प्रक्रिया पहिले वर्ष सोडल्यास येणाऱ्या काळात खूप सोपी होणार आहे. अशी संगणकीकृत माहिती उपलब्ध असल्यावर तिमाही, सहामाही, वार्षिक माहिती मागविण्याची गरज संपणार आहे. कारण ती संगणकामधून उपलब्ध होणार आहे.

या सर्व बाबींचा लाभ घेऊन माहिती देणे, माहिती संकलित करणे आणि माहितीचे विश्लेषण करणे या कामांमधून शिक्षक व पर्यवेक्षिय यंत्रणेची शक्य तितक्या लवकर सोडवणूक करून त्यांचा अधिकाधिक वेळ मुलांच्या शिक्षणाची गुणवत्ता वाढीसाठी जाणे अपेक्षित आहे. राज्याने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम दि. २२ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सुरू केला आहे. त्यामध्ये शिक्षकांकडून दरवर्षी १३० प्रकारची मागविली जाणारी माहिती कमी करण्याबद्दल उल्लेख सुद्धा करण्यात आला आहे. शैक्षणिक गुणवत्तावाढीच्या दृष्टीने आवश्यक अशा प्रशासकीय सुधारणेसाठी संगणकीय प्रणाली विकसित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील प्रत्येक मान्यताप्राप्त शाळेची, त्या शाळेमध्ये कार्यरत मान्यताप्राप्त, शिक्षकांची, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची, या शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती ऑनलाईन भरण्यासाठी राष्ट्रीय सूचना–विज्ञान केंद्र (NIC) पुणे यांच्या माध्यमातून सरल (SARAL- Systematic Adminstrative Reforms for Achievment of Learning By Students) ही संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

या संगणक प्रणालीचा विविध स्तरावर पुढीलप्रमाणे उपयोग होणार आहे.

१. बहुतांश माहिती आवश्यकतेनुसार वर्षातून एकदाच ऑनलाईन भरण्याची सुविधा या संगणक प्रणालीमध्ये आहे. त्यामुळे शिक्षक व क्षेत्रीय अधिकारी यांचेकडून वर्षभर सातत्याने माहिती मागविणे, गोळा करणे व ती संकलित करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ, स्टेशनरी, निधी व वेळेची बचत होणार आहे.

२. एकदा संकलित केलेली माहिती आवश्यकतेनुसार फक्त अद्ययावत (Updates) केल्यास पूर्ण माहिती पुन: नव्याने दरवर्षी भरण्याची गरज आहे.

**३. संस्थाची माहिती (Institute database) :** राज्यामध्ये प्राथमिक शाळा व मोठ्या प्रमाणावर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा या खाजगी व्यवस्थापनामार्फत चालविल्या जातात. या सर्व खाजगी व्यवस्थापनामार्फत संस्थांद्वारा चालविण्यात येणाऱ्या शाळांची व संस्थांची कोणतीही माहिती एकत्रितरित्या संकलित स्वरूपात उपलब्ध होत नाही. त्यामुळे संस्था विषयक बाबींसंबंधी निर्णय घेण्यात अडचणी निर्माण होतात. या संस्थांची माहिती ऑनलाईन भरण्यासाठी संकेत स्थळावर संस्था नोंदणी (Sanstha Registration) ची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

३.१ यामध्ये संस्थाविषयी सर्व माहिती, समिती पदाधिकाऱ्यांचा तपशील, संस्थेच्या धर्मादाय कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या प्रमाणपत्रांचा तपशील, अधिकृत पदाधिकाऱ्यांचा तपशील व संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांची संख्यात्मक माहिती संस्था स्तरावर भरून घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

३.२ संस्था ऑनलाईन रजिस्टर झाल्यानंतर त्या त्या जिल्ह्यामध्ये शाळा लॉग इन ला शाळा स्वत:ची माहिती भरताना आपली स्वत:ची संस्था आपल्या शाळेस जोडून घेणार आहे. अशा प्रकारे संस्थेच्या सर्व शाळा या संबंधित संस्थेस जोडल्या जातील.

३.३ या कार्यपद्धतीमुळे प्रत्येक संस्थाचालकास आपल्या शाळा, शिक्षक व विद्यार्थी यांची सर्व प्रकारची माहिती ऑनलाईन उपलब्ध होणार आहे. त्यामुळे संस्थांना आपल्या शाळांची सर्व सांख्यिकीय माहिती उपलब्ध झाल्यामुळे पुढील प्रगतीसाठी नियोजन करण्यास मदत होणार आहे.

४. **शाळांची माहिती (School database) :** शाळा विषयक माहितीमध्ये शाळा प्रकार, व्यवस्थापन, शाळा मान्यता, माध्यम, पत्ता, संपर्क व्यक्तीचे नाव, त्याचा भ्रमणध्वनी क्रमांक, पूर्व प्राथमिक शिक्षणाची सुविधा, शाळा तपासणी, शाळांना मिळालेले अनुदान, त्याचा विनियोग, विविध प्रकारच्या समित्या, त्यामधील सदस्यांचा तपशील, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची माहिती, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, मोफत साहित्याचा पुरवठा, दुर्बल घटक व वंचित गटातील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश, माध्यान्ह भोजन योजना, शाळांमधील भौतिक सुविधांची स्थिती, विविध प्रकारच्या खेळांची व साहित्याची उपलब्धता, शाळेमध्ये उपलब्ध असणाऱ्या इतर सोयी (उदा. संगणक प्रयोगशाळा, आयसीटी प्रयोगशाळा इ.) विद्यार्थी वाहतूक व्यवस्था, शाळेमध्ये वर्गनिहाय तुकडीनिहाय दैनंदिन वेळापत्रक, शैक्षणिक व सहशालेय उपक्रम, शिकविले जाणारे विषय, शैक्षणिक शुल्क विषयक माहिती, विविध बँक खात्याचा तपशील अशा विविध प्रकारची माहिती संकलित केली जाणार आहे.

या माहितीचा उपयोग शिक्षक, पालक, मुख्याध्यापक, पर्यवेक्षकीय यंत्रणेस पुढील प्रमाणे करता येणार आहे.

४.१ सदर माहितीमधून शाळेची सद्यस्थिती समजणार आहे. त्यानुसार निकषावर आधारित शाळेच्या गरजा स्पष्ट होतील. त्यावर आधारित आवश्यक असलेल्या बाबींचे नियोजन करून आराखडा तयार करता येणार आहे.

४.२ वर्गवार व विषयावर अध्यापनाची सद्यस्थिती मुख्याध्यापक, पालक यांना प्राप्त होणार आहे.

४.३ शिक्षकांकडे सोपविण्यात आलेले विषय, अध्यापनाचा कार्यभार, इ. विषयक माहिती मुख्याध्यापकांना, पालकांना मिळणार आहे.

४.४ अक्षांक्ष, रेखांशानुसार शाळांच्या भौगोलिक स्थानाविषयी माहिती प्राप्त होणार असल्याने प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांची गरज निश्चित करून शाळा आरेखन (School mapping) करण्यास मदत होणार आहे.

४.५ शिक्षक हक्क कायद्यातील अनुसूचीनुसार निकषांची पूर्तता करणाऱ्या शाळांची माहिती प्राप्त होणार असून सर्व शाळा शिक्षण हक्क कायद्यास अनुरूप (RET Compliant) करण्यासाठी आवश्यक ते नियोजन व अंमलबजावणी करण्यास या माहितीचा उपयोग होणार आहे. तसेच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठीही सदरची माहिती उपयुक्त ठरणार आहे.

५. **शिक्षक/शिक्षकेतर माहिती (Teaching-non teaching staff database) :** कर्मचाऱ्यांच्या माहितीसंबंधी (staff-portal) वर कार्यरत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची, त्यांच्या सेवेच्या सर्व तपशीलाची माहिती ऑनलाईन घेतली जाणार आहे. शिक्षकांची शैक्षणिक, व्यावसायिक अर्हता, त्यांनी घेतलेली प्रशिक्षणे, त्यांना मिळणाऱ्या विविध सुविधांसंबंधीची माहिती (उदा. Pension, GPF, GIS इ.) वारस नोंदणीचा तपशील, ते शिकवीत असलेले विषय, त्यांचा कार्यभार इ. तपशील घेतले जाणार आहेत. त्याचा फायदा पुढीलप्रमाणे होईल.

५.१ कर्मचाऱ्यांची अद्यायवत सेवापुस्तके ऑनलाईन उपलब्ध होतील.

५.२ कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण विषयक गरजा निश्चित करता येतील.

५.३ वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी संबंधी प्रशिक्षणाबाबत निर्णय घेता येतील.

५.४ कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे याद्वारे तयार करण्यास मदत होणार आहे.

५.५ कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकामध्ये सेवाविषयक त्रुटी (उदा. सेवाखंड इ.) निदर्शनास आल्यास त्याबाबत योग्य तो निर्णय घेणे सुलभ होणार आहे.

५.६ शाळांमध्ये अतिरिक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तपशील या माहितीमधून समजणार आहे. त्यावर आधारित समायोजन करण्यासाठी उपलब्ध जागांची माहिती ऑनलाईन मिळणार आहे. ऑनलाईन रिक्त जागांचा तपशील प्राप्त झाल्यास अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांना रिक्त जागातील पसंतीच्या ठिकाणी पदस्थापनेसाठी निकषानुसार ऑनलाईन विकल्प देता येईल. समायोजनाची संपूर्ण प्रक्रियाही ऑनलाईन ठेवण्यात येणार असल्याने त्यामध्ये पारदर्शकता राहील.

५.७ शाळांमध्ये मंजूर, कार्यरत, रिक्त पदांचा तपशील प्राप्त होणार असल्याने नवीन पद भरतीसंबंधी निर्णय घेणे सोपे होणार आहे.

५.८ सर्व कर्मचाऱ्यांची माहिती ऑनलाईन असल्याने प्रत्येक व्यवस्थापनाची संवर्गनिहाय अचूक सेवाज्येष्ठता याद्या तयार कारणे सुलभ होईल. त्यामुळे प्रशासनाचा, संस्थांचा वेळ वाचणार असून कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती विषयक बाबींसंबंधी त्वरेने निर्णय घेण्यास मदत होणार आहे.

६. **विद्यार्थी माहिती (Student database) :** यामध्ये विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणी बाबतच्या तपशीलासह इतर संपूर्ण माहिती भरून घेतली जाणार आहेत.

६.१ विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती अंतर्गत शैक्षणिक प्रगती विषयक माहिती ऑनलाईन भरल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रगतिपुस्तक ऑनलाईन तयार होणार आहे. प्रत्येक सहामाहीची विद्यार्थ्यांची प्रगती शिक्षक, मुख्याध्यापक, पालक ऑनलाईन पाहू शकतील.

६.२ इयत्ता ९ वी व इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती ऑनलाईन घेण्यात येणार आहे.

६.३ प्रगतिपुस्तक ऑनलाईन तयार झाल्यामुळे वर्गशिक्षकांना वेगळे प्रगतिपुस्तक ठेवण्याची गरज भासणार नाही. ऑनलाईन प्रगतिपुस्तक प्रिंट काढून स्वाक्षरी करून पालकांना देता येईल. नजीकच्या काळात वर्गशिक्षक व मुख्याध्यापक यांची डिजिटल स्वाक्षरी करून पालकांना प्रगतिपुस्तक देण्याचे प्रस्तावित आहे.

६.४ विद्यार्थी, शाळानिहाय विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन उपलब्ध होणार असल्याने विद्यार्थ्यांच्या प्राप्त झालेल्या गुणांची/श्रेणीची पडताळणी करून अप्रगत विद्यार्थ्यांना पूरक मार्गदर्शन करण्यासाठी कार्ययोजना विकसित करून त्याची अंमलबजावणी करणे सोयीचे होणार आहे.

६.५ विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी इयत्ता १२ वी पर्यंत शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला हातात न देता त्याने ज्या नवीन शाळेत/महाविद्यालयात प्रवेश घेतला असेल अशा शाळांमध्ये दाखला ऑनलाईन हस्तांतरित करता येणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात होणारी गळती रोखण्यास/नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. केवळ राज्याबाहेर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी त्या ठिकाणी प्रवेश घेतल्याची खात्री करून संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रतिस्वाक्षरीने हा दाखला पालकांकडे देण्यात येईल अथवा शाळांकडे पाठविता येईल.

६.६ या माहितीचा उपयोग Child tracking पुरता मर्यादित राहणार नसून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत

Child Educational Quality Tracking System सुद्धा या माध्यमातून तयार होत आहे. या प्रणालीमुळे मुले शाळेत नियमित येत आहेत किंवा नाहीत यासोबतच ते शिकत आहेत की नाही हे लक्षात येणार आहे.

६.७ पालकांना आपल्या पाल्याची प्रगती पाहण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली जाईल.

६.८ विद्यार्थी लाभाच्या योजना (उदा. शिष्यवृत्ती योजना, मोफत गणवेश व लेखन साहित्य वाटप) इ. साठी निकषानुसार लाभार्थी निवडण्याकरिता वेगळी माहिती भरून घेण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच लाभार्थ्यांच्या/त्यांच्या पालकांच्या बँक खात्यामध्ये लाभाची रक्कम ऑनलाईन जमा करण्यात येईल.

६.९ विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे स्वतंत्र भरून न घेता याच माहितीच्या माध्यमातून भरून घेण्याचा मानस आहे. त्यादृष्टीने कार्यवाही सुरू आहे.

६.१०विद्यार्थ्यांची दैनंदिन माहिती तयार करणे, प्रगतिपुस्तके तयार करणे, ती अद्ययावत ठेवणे, जपून ठेवणे, इ. बाबींसाठी शिक्षकांना लागणाऱ्या वेळेत बचत होणार आहे.

उपरोक्त माहिती ही यापूर्वी सातत्याने हार्ड कॉपीच्या स्वरूपात घेतली जात होती. यापुढे ही माहिती ऑनलाईन स्वरूपात व काही ठराविक वेळीच घेतली जाणार आहे. त्यामुळे शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक, अधिकारी यांचा खूप मोठ्या प्रमाणावर वेळ वाचणार आहे तसेच श्रमाचीही बचत होणार आहे. सर्व प्रकारची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार असल्याने प्रशासनामध्ये गतिमानता, पारदर्शकता येणार आहे. शिक्षक, मुख्याध्यापक, प्रशासन यांचा आत्मविश्वास उंचावण्यास प्रोत्साहन मिळणार आहे.

७. उपरोक्त तीनही database मध्ये भरलेल्या सर्व माहितीच्या आधारे Udise प्रपत्रामधील माहिती तयार होणार आहे. त्यामुळे यापुढे स्वतंत्रपणे Udise प्रपत्र भरून घेण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे विविध प्रकारच्या माहितीची द्विरुक्ती होणार नाही.

८. राज्याने शिक्षण विभागासाठी शाळा, शिक्षक, शक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी **सरल** ही संगणक प्रणाली विकसित केली आहे. सदरची प्रणाली शालेय शिक्षण विभागासाठी एकमेव (unified) संगणक प्रणाली राहणार आहे. या माहितीशिवाय अन्य कोणत्याही स्वरूपातील माहिती यापुढे विविध स्तरांवरून मागविण्याची आवश्यकता भासणार नाही.

९. शालेय शिक्षण विभागाच्या www.education.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संस्था, शाळा, कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांची माहिती ऑनलाईन पद्धतीने भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी संस्था रजिस्ट्रेशन, शाळा स्टाफ व विद्यार्थी यासाठी स्वतंत्र लिंक उपलब्ध आहे. त्यानुसार योग्य लिंक निवडून पुढील बाबींसंबंधी माहिती भरावी.

**१. संस्था माहिती (Sanstha Registration) :** स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य व केंद्रशासनाच्या शाळा वगळता इतर सर्व शाळा या खाजगी संस्था व्यवस्थापनाच्या नियंत्रणाखाली चालतात. अशा शाळांसाठी त्यांची संस्था व त्या संस्थेचे सर्व तपशील याचे रजिस्ट्रेशन संस्था लॉग इन ला जाऊन करावयाचे आहे. संस्था लॉग इन करून संस्था नोंदणी केल्याशिवाय शाळांना शाळा लॉग इनमध्ये माहिती भरता येणार नाही.

**२. शाळांची माहिती (School Database) :**

- राज्यातील सर्व मान्यता प्राप्त शाळांना Udise संकेतांक मिळाला आहे. या संकेतांकाचा उपयोग करून शाळा लॉग इन ला जाऊन मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेची सर्व माहिती भरावयाची आहे प्रत्येक स्क्रीनवर Udise मध्ये उपलब्ध असलेली माहिती प्रदर्शित केली आहे.
- या माहितीमध्ये त्रुटी असल्यास ती अद्ययावत (Update) करण्याची तरतूद आहे. माहिती अंतिम केल्यानंतर या माहितीमध्ये बदल करता येणार नाही. मात्र या माहितीमध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यास केंद्रप्रमुख ही माहिती संबंधित शाळेस परत (return) करू शकतात. मात्र स्वत:च्या लॉग इन ला जाऊन माहितीमध्ये दुरुस्ती

ही केवळ मुख्याध्यापकच करू शकतात. ग्रामीण भागात केंद्र प्रमुखांनी व शहरी भागात वॉर्ड प्रमुखांनी प्रत्येक शाळेची माहिती तपासून अंतिम करावयाची आहे.

३. **शिक्षक/ शिक्षकेतर (कर्मचारी) माहिती (Staff Database) :**

- प्रत्येक शाळेमध्ये असणाऱ्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बहुतांश माहिती ही Udise व Shalarth या प्रणालीमध्ये उपलब्ध आहे. Udise व शालार्थमधील प्रत्येक कर्मचाऱ्याची असणारी माहिती ही संकेत स्थळावरील स्टाफ लिंकवर उपलब्ध करून दिली आहे.

मुख्याध्यापकांनी लॉग इन केल्यावर निवडलेल्या विविध टप्प्यावर कर्मचारीनिहाय उपलब्ध असणारी माहिती दिसणार आहे. या माहितीमध्ये चूक असल्यास **जन्मतारीख वगळता** इतर सर्व प्रकारच्या माहितीमध्ये संबंधित कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकातील मूळ माहितीनुसार आवश्यक त्या दुरुस्त्या मुख्याध्यापकांनी करावयाच्या आहेत. केवळ जन्मतारखेमध्ये दुरुस्ती असेल तर अशी दुरुस्ती सेवापुस्तकाच्या पुराव्यासह दाखविल्यास सेवापुस्तकातील जन्मतारखेच्या नोंदीप्रमाणे ती केवळ संबंधित तालुक्याच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना/शहर समूह साधन केंद्र समन्वयक यानांच करता येईल. गटशिक्षाधिकाऱ्यांनी/ वॉर्ड प्रमुखांनी स्वत: संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तक व इतर आवश्यक बाबींची खातरजमा करून जन्मतारखेची अचूक नोंद करावयाची आहे. ही नोंद अंतिम असेल. त्यामध्ये त्रुटी राहिल्यास त्यास गटशिक्षणधिकारी/शहरी समूह साधन केंद्र समन्वयक हे स्वत: जबाबदार राहतील. कर्मचाऱ्यांच्या जन्मतारखेत बदल करण्याचे अधिकार गटशिक्षणाधिकारी यांना दिलेले नाहीत. ते अधिकार पूर्वीच्या कार्यपद्धती–प्रमाणेच संबंधित अधिकाऱ्यांना राहतील. या डाटाबेसमधील सर्व कर्मचाऱ्यांची माहिती अचूक भरली जाईल याची दक्षता घ्यावी.

४. **विद्यार्थी माहिती (Student database) :**

- यात शाळेमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती भरावयाची आहे. कोणतीही माहिती अपूर्ण राहणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे.
- विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती, तसेच त्या वर्षामध्ये घेतलेल्या विविध चाचण्या/परीक्षा/विविध नोंदीमधील संपादणुकीची माहिती संबंधित रकान्यात भरावयाची आहे.
- विद्यार्थ्याचे नाव, आईचे नाव, जन्मठिकाण, जन्मतारीख, धर्म व जात या बाबतची माहिती शाळेच्या जनरल रजिस्टर मधील नोंदीनुसारच असावीत.
- माहिती भरताना किंवा भरल्यानंतर ती चुकली असल्याचे निदर्शनास आल्यास ती तात्काळ दुरुस्त करावयाची आहे.
- मुख्याध्यापक प्रत्येक वर्गासाठी असलेल्या तुकड्यांची संख्या प्रथमत: निश्चित करतील व त्यानंतर मुख्याध्यापकांकडून प्रत्येक वर्गशिक्षकांनी लॉग इन तयार करून दिले जातील. प्रत्येक वर्गाच्या तुकड्यांच्या संख्येनुसार सदर तुकड्यांतील विद्यार्थ्यांची माहिती भरण्याची जबाबदारी संबंधित वर्गशिक्षकांची राहील.
- सदर माहिती भरल्यानंतर ती माहिती मुख्याध्यापकांनी तपासून अंतिम करावयाची आहे.
- या प्रणालीद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याचा एक युनिक विद्यार्थी आयडी तयार होणार आहे. सदर युनिक आयडी हा विद्यार्थ्याच्या सर्व शैक्षणिक बाबींसाठी वापरला जाईल. सध्या युनिक आयडी तयार होत असला तरी ज्या मुलांचे आधारकार्ड तयार झाले आहे त्यांच्या आधारकार्डची माहिती भरावयाची आहे. सर्व मुलांचे आधारकार्ड तयार झाल्यावर व त्याची माहिती भरल्यावर फक्त आधार क्रमांकास युनिक आयडी समजले जाणार आहे.

**उपरोक्त माहिती भरण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे.**

१. सर्व data base मध्ये माहिती भरण्यासाठी शिक्षण संचालकांपासून सर्व पर्यवेक्षीय अधिकार व शाळांच्या मुख्याध्यापकांना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३० यांच्यामार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रशिक्षणामध्ये सर्व प्रकारच्या शंकांचे निरसन केले जाईल.

२. प्रत्येक शाळेकरिता मुख्याध्यापकास स्वतंत्र लॉगिन आयडी देण्यात आला आहे. प्रत्येक वर्गासाठी/तुकडीसाठी वर्गशिक्षकास मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील सर्व वर्गशिक्षकांकरिता लॉगिन आयडी तयार करून द्यावयाचे आहेत.

३. शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी केंद्रप्रमुख, शहरी समूह साधन केंद्र समन्वयक इत्यादींना देखील लॉगिन आयडी देण्यात आला आहे.

४. **माहिती भरण्याची व अंतिम करण्याची जबाबदारी निश्चित केलेले अधिकारी :**

| **क्र.** | **डाटाबेस** | **माहिती भरणारा प्राधिकृत अधिकारी** | **माहिती अंतिम करणारा प्राधिकृत अधिकारी** | **माहिती पडताळणी करणारा अधिकारी** |
|---|---|---|---|---|
| १. | संस्था | संस्था | शिक्षणाधिकारी (माध्यमिक/शिक्षण निरीक्षक) | शिक्षण उपसंचालक |
| २. | शाळा | मुख्याध्यापक | केंद्र प्रमुख वॉर्ड/ अधिकारी | गटशिक्षणाधिकारी/शहर साधन केंद्र समन्वयक |
| ३. | शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी | मुख्याध्यापक | केंद्र प्रमुख वॉर्ड/ अधिकारी | गटशिक्षणाधिकारी/शहर साधन केंद्र समन्वयक |
| ४. | विद्यार्थी | वर्ग शिक्षक | मुख्याध्यापक | केंद्र प्रमुख वॉर्ड/ अधिकारी |
| ५. | कर्मचाऱ्यांच्या जन्मतारखेच्या नोंदीतील तफावत दूर करणे. | गटशिक्षणाधिकारी/शहर साधन केंद्र समन्वयक | – | संबंधित शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक/ शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी |

५. प्रत्येकाने आपला लॉग इन आयडी व पासवर्ड लक्षात ठेवावयाचा आहे. संबंधितांची बदली झाल्यास सदर पासवर्ड त्या जागी येणाऱ्या नवीन कर्मचाऱ्यांकडे गोपनीयरित्या सोपवावयाचा आहे. स्वत:चा पासवर्ड दुसऱ्याला दिल्यामुळे अथवा स्वत: चुकीची माहिती भरल्यास वा स्वत:च्या लॉगिनला दुसऱ्याने माहिती भरल्यास या बाबत Information Technology Act, 2000 मधील तरतुदीनुसार सदर अधिकारी/कर्मचारी कारवाईस पात्र राहतील.

६. संस्था लॉगिन करून आपल्या जिल्ह्यातील सर्व संस्थांची माहिती संबंधित संस्थांकडून भरून घेण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेवर सोपविण्यात येत आहे. त्यांनी आपल्या जिल्ह्यामध्ये कार्यरत असलेल्या (मुख्यालय असलेल्या) सर्व संस्थांकडून लॉगिन करून या संस्थांकडून ऑनलाईन रजिस्ट्रेशन करून घेऊन सर्व माहिती भरून घेतल्याची खात्री करावी.

७. School, Staff database मध्ये सर्व माहिती शाळा स्तरावर अंतिम केल्यानंतर ती केंद्रप्रमुख/वॉर्ड प्रमुखांनी स्वत:च्या लॉगिनला जाऊन अंतिम करावयाची आहे. या माहितीमध्ये त्रुटी असल्यास सदर शाळेची माहिती संबंधित शाळा लॉगिनला परत पाठवून मुख्याध्यापकांकडून आवश्यक दुरुस्त्या करून घ्यावयाच्या आहेत.

८. प्रत्येक अधिकारी स्वत:च्या लॉगिनला जाऊन आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांची माहिती पाहू शकतील. मात्र त्यामध्ये सुधारणा करू शकणार नाहीत. संबंधित अधिकाऱ्यांना शाळेच्या माहितीमध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यास

संबंधित स्तरावर शाळा डाटाबेस मधील माहिती परत करून भरण्यासाठी सांगता येईल. शाळांची, कर्मचाऱ्यांची व विद्यार्थ्यांची माहिती दुरुस्त करण्याची जबाबदारी केवळ प्रकरणपरत्वे मुख्याध्यापक, वर्गशिक्षकांची राहील.

९. संकेतस्थळावर प्रत्येक डाटाबेसची माहिती भरण्याकरिता, screen पाहण्यासाठी इंग्रजी व मराठी या दोन माध्यमांचा उपयोग केला आहे. वापरकर्त्यास आवश्यकतेनुसार योग्य माध्यमाची निवड करता येईल.

१०. प्रत्येक प्रणालीमध्ये माहिती भरण्याकरिता इंग्रजी व मराठीमध्ये User Manual व दृक्‌श्राव्य माध्यमातून प्रशिक्षण साहित्य उपलब्ध करून दिलेले आहे. त्याचाही उपयोग माहिती भरताना करता येईल.

११. माहिती भरताना अडचणी आल्यास संकेत स्थळावरील मदत कक्षामध्ये (Help Desk) शाळेच्या कार्यक्षेत्रातील केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी यांचे संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक दिले आहेत. अडचणी दूर करण्यासाठी प्रथमतः संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

१२. तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर Data entry मधील त्रुटी तपासून पूर्तता करून दुरुस्त करून घेण्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रत्येक स्तरावर तांत्रिक व प्रशासकीयदृष्ट्या अनुभवी पात्र व्यक्तींची समन्वय समिती (Co-ordination Committee) तयार करावी. त्यांची माहिती excel sheet मध्ये पुढील नमुन्यात प्रत्येक टप्प्यावर ठेवावी.

School, Teacher, Student database Co-ordination Committee
Level -Cluster /Block/District/Division/State

**Code - (Enter your code)**

| S. No. | Name | Designation | Mobile No. | E-mail-ID |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |

ही समिती प्रत्येक स्तरावर येणाऱ्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचे निरसन करेल.

१३. तालुका, जिल्हा, विभागनिहाय व राज्यस्तरावरील समन्वय समितीची माहिती फक्त इंग्रजीमध्ये वरील नमुन्यात Support.education@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर दिनांक १५ जुलै, २०१५ पूर्वी पाठवावी. सदर माहिती उपरोक्त संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे शाळांना संबंधित स्तरावर संपर्क साधता येईल.

माहिती भरताना संबंधित स्तरावर मार्गदर्शन न मिळाल्यास मर्यादित कालावधीसाठी हेल्पलाईन सुरू केल्या आहेत. त्याकरिता पुढील हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. मात्र अगदी किरकोळ बाबींसाठी हेल्पलाईनवर दूरध्वनी करू नये.

हेल्पलाईन क्रमांक – १८०० २३३ ०७००, १८०० २३३ ०८००

**(वेळ –सकाळी ८.०० ते सायंकाळी ८.०० पर्यंत कार्यालयीन कामाचे दिवशी)**

१५. संकेतस्थळावर संबंधित केंद्रे, तालुका व जिल्हा स्तरावरील संबधित अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून दिले आहेत. त्या अनुषंगाने मुख्याध्यापक/केंद्रप्रमुख यांनी संबंधित स्तरावरील अधिकाऱ्यांकडून आवश्यकतेनुसार मार्गदर्शन घ्यावे.

१६. शाळा व विद्यार्थी प्रणालीमध्ये माहिती भरण्यासाठी मुख्याध्यापक/वर्गशिक्षक/संस्था इंटरनेटची सुविधा उपलब्ध असणाऱ्या मोबाईल फोन वरूनही माहिती भरू शकतात.

१७. विद्यार्थी डाटाबेसमधील माहिती भरण्यासाठी कालावधी लागणार आहे. इंटरनेटची समस्या असल्यास उपरोक्त संकेत स्थळावरील विद्यार्थी (student) database हे Application इंटरनेटची सुविधा असलेल्या ठिकाणावरून download

करून  घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या Application मध्ये विद्यार्थ्यांची माहिती ऑफलाईन पद्धतीने भरून ती पुन्हा इंटरनेटची सुविधा असलेल्या ठिकाणी उपरोक्त संकेत स्थळावर Upload करण्याची सुविधा देण्यात आली आहे.

१८. राज्यात ग्रामीण व शहरी क्षेत्रात एकूण ४०८ गट व शहर साधन केंद्र कार्यरत आहेत. तसेच ८००० माध्यमिक शाळांमध्ये ICT प्रयोगशाळा उपलब्ध आहेत. त्याठिकाणी इंटरनेटची पूर्ण वेळ सुविधा उपलब्ध आहे.

१९. शिक्षण उपसंचालकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये ज्या उच्च माध्यमिक शाळांमध्ये माहिती तंत्रज्ञान हा विषय सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे, अशा सर्व शाळांमधील इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. या सुविधेचा उपयोग इतर शाळांना करून द्यावा.

२०. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, शिक्षणाधिकारी/शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी महानगरपालिका यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात इंटरनेट सुविधेसह संगणक उपलब्ध असणाऱ्या शाळा/संस्थांची यादी करावी. या शाळांमधील इंटरनेट सुविधा इतर शाळांना उपलब्ध करून देण्यासाठी वेळेचे नियोजन करून योग्य ती कार्यवाही करावी.

२१. उपरोक्त सर्व माहिती ही शासकीय स्तरावर इंटरनेटची सुविधा उपलब्ध असलेल्या शाळा/केंद्र/संस्था या ठिकाणावरूनच ऑनलाईन पद्धतीने भरावी. कोणत्याही परिस्थितीत माहिती भरण्यासाठी सायबर कॅफे किंवा खाजगी केंद्रांचा उपयोग करू नये.

२२. सर्व संस्था, शाळा, कर्मचारी, विद्यार्थी यांची सर्व माहिती दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ पूर्वी ऑनलाईन भरली जाईल याची संबंधित स्तरावरील यंत्रणेने खात्री करावी.

२३. सर्व शाळांमधील कर्मचारी व विद्यार्थ्यांची माहिती भरून ती अंतिम करून घेण्यासाठी पुढीलप्रमाणे जबाबदाऱ्या निश्चित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | शाळांचा प्रकार | स्तर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र | तालुका | जिल्हा | विभाग | राज्य |
| १) | प्राथमिक शाळा | केंद्र प्रमुख/ वॉर्ड अधिकारी | गटशिक्षणाधिकारी/ शहर साधन केंद्र समन्वयक | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) प्रशासन अधिकारी/ शिक्षण प्रमुख शिक्षणाधिकारी म.न.पा | विभागीय शिक्षण उपसंचालक | शिक्षण संचालक (प्राथमिक) |
| २) | प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा | केंद्र प्रमुख/ वॉर्ड अधिकारी | गटशिक्षणाधिकारी/ शहर साधन केंद्र समन्वयक | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) प्रशासन अधिकारी/ शिक्षण प्रमुख शिक्षणाधिकारी म.न.पा | विभागीय शिक्षण उपसंचालक | शिक्षण संचालक (प्राथमिक) |

| अ.क्र. | शाळांचा प्रकार | स्तर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र | तालुका | जिल्हा | विभाग | राज्य |
| ३) | माध्यमिक शाळा | केंद्र प्रमुख/ वॉर्ड अधिकारी | गटशिक्षणाधिकारी शहर साधन केंद्र समन्वयक | शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई | विभागीय शिक्षण उपसंचालक | शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) |
| ४) | उच्च माध्यमिक शाळा | केंद्र प्रमुख/ वॉर्ड अधिकारी | गटशिक्षणाधिकारी शहर साधन केंद्र समन्वयक | शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई | विभागीय शिक्षण उपसंचालक | शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) |

२४. राज्यस्तरावर आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळा, कर्मचारी व विद्यार्थ्यांची माहिती अंतिम करून घेण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी आपल्या अधिनस्थ शाळांमधील सर्व डाटाबेसची माहिती भरल्याचा प्रगती अहवाल प्रत्येक आठवड्याच्या सोमवारी प्रधान सचिव व आयुक्त (शिक्षण) यांना सादर करावा.

२५. आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग इ. इतर विभागाच्या सर्व शाळा, शिक्षक, विद्यार्थी यांची माहिती भरून घेण्याची जबाबदारी संबंधित विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांची आहे. यासाठी त्या विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी मार्गदर्शन करतील.

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ रोजी सर्व डाटाबेसमधील माहिती भरून ती अंतिम केल्याचा अहवाल प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) व आयुक्त (शिक्षण) यांना सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०७०३१६४८५४८६२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यास येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**Nand kumar**

Digitally signed by Nandkumar
DN: c=IN, o=All India Service, ou= IAS
postal code = 110001, St = Maharashtra,
serial Number = dcd3577ebf0c05c2a8b5709
5c152dc6cfb37c2bb83da197788645dd8a3
62ebc5, cn = Nand kumar
Date : 2015.07.03. 17:28:12 + 05'30'

**(नंद कुमार)**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा. मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा. मंत्री (आदिवासी विकास विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
४. मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५. सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
६. सचिव (आदिवासी विकास विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
७. आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे १.
८. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. शिक्षण संचालक (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१२. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
१३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१४. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
१५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
१६. सहसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.
१७. प्रशासकीय अधिकारी, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था (बालचित्रवाणी), पुणे.
१८. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२०. सर्व प्राचार्य, डायट
२१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक, निरंतर)
२२. सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई.
२३. शालेय शिक्षण विभागातील – सर्व कार्यासने
२४. निवड नस्ती (संगणक).

❑❑❑

# ९. स्वयं-अर्थसहाय्यित शाळा अधिनियम २०१२

**RNI No. MAHBIL/2009/37831**

**Reg. No. MH/MR/South-339/2011-13**

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार – ब

**(वर्ष ४ : अंक ९७)** **शनिवार, जानेवारी १९, २०१३/पौष २९, शके १९३४** **(पृष्ठे २)**

**किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक ६**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक–अ आणि एक–ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२

दिनांक : १९ जानेवारी, २०१३.

## अधिसूचना

**महाराष्ट्र स्वयं–अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२.**

क्रमांक संकीर्ण २०११/ प्र.क्र. २३९/११/माशि–१.–महाराष्ट्र स्वंय–अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (२०१३ चा महा. १) याच्या कलम १ च्या पोट–कलम (३) नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त अधिनियमतील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी १९ जानेवारी २०१३ हा दिनांक निश्चित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ज. स. सहारिया,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

RNI No. MAHBIL/2009/35530

Reg. No. MH/MR/South-341/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

(वर्ष ४ : अंक ९७) शुक्रवार, जानेवारी ४, २०१३/पौष १४, शके १९३४ (पृष्ठे १३) किंमत : रुपये १५.००

## असाधारण क्रमांक १

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ –** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासह विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणके ठरविणे, दाननिधी निर्माण करणे यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी योग्य त्या तरतुदी करण्याकरिता अधिनियम. | पृष्ठे १–१३ |

दिनांक २ जानेवारी २०१३ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव
महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग

## सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **''महाराष्ट्र शासन राजपत्रात''** दिनांक ४ जानेवारी २०१३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करण्यासह विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी**

**आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणके ठरविणे, दाननिधी निर्माण करणे यांकरिता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी योग्य त्या तरतुदी करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थित, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, याकरिता आवश्यक असणाऱ्या बाबी आणि प्रमाणिके यासंबंधात योग्य त्या तरतुदी करणे, दाननिधी निर्माण करणे, अर्जांची छाननी करण्याच्या कार्यपद्धतीची तरतूद करणे आणि त्यांच्याशी संबधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतुदी करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्रेसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

**(१) संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ** :

(१) या अधिनियमास, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू असतील.

(३) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**(२) व्याख्या** :

(१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) ''जिल्हा शिक्षण अधिकारी'' याचा अर्थ, प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात, जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक), आणि माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात, जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक), असा आहेः

(ख) ''संचालक'' याचा अर्थ, –

(एक) प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात, शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), असा आहे;

(दोन) माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षणाच्या संदर्भात, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), असा आहे;

(ग) ''दाननिधी'' याचा अर्थ, कलम ४ अन्वये निर्माण केलेला दाननिधी, असा आहे;

(घ) ''विद्यमान शाळा'' याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास अस्तित्वात असलेली व शिक्षण देत असेलेली मान्यताप्राप्त शाळा असा आहे;

(ङ) ''स्थानिक प्राधिकरण'' याचा अर्थ, –

(एक) जिल्हा परिषदेने चालविलेल्या शैक्षणिक संस्थेच्या संबंधात, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये घटित केलेली जिल्हा परिषद; (१९६२ चा महा. ५. )

(दोन) महानगरपालिकांनी चालविलेल्या शैक्षणिक संस्थेच्या संबंधात, मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा यथास्थिति, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अन्वये घटित केलेल्या महानगरपालिका; (१८८८ चा ३.)

(तीन) नगर परिषदेने, नगर पंचायतीने किंवा यथास्थिति औद्योगिक नगरीने चालविलेल्या शैक्षणिक संस्थांच्या संबंधात, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये घटित केलेली नगर परिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी; (१९४९ चा ५९.)

(चार) अन्य कोणत्याही कायद्यान्वये स्थानिक प्राधिकरण म्हणून समजले जाणारे अन्य कोणतेही प्राधिकरण यांचा समावेश होतो, (१९६५ चा महा. ४०)

असा आहे;

(च) ''पूर्व–प्राथमिक शाळा'' याचा अर्थ, प्राथमिक शाळेला संलग्न असलेली, ३ ते ६ वयोगटातील बालकांसाठी, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी कोणत्याही माध्यमाची बालवाडी, छोटा शिशू, मोठा शिशू किंवा कोणत्याही पूर्व–प्राथमिक पातळीपर्यंत शिक्षण देणारी शाळा, असा आहे, मात्र त्यामध्ये शिशुगृहाचा समावेश असणार नाही;

(छ) ''विहित'' याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ज) ''नोंदणीकृत संस्था'' याचा अर्थ, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० याच्या तरतुदीअन्वये धर्मादाय प्रयोजनांसाठी नोंदणी केलेली संस्था, असा आहे; (१८६० चा २१.)

(झ) ''नोंदणीकृत न्यास'' याचा अर्थ, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम याच्या तरतुदीअन्वये धर्मादाय प्रयोजनांसाठी नोंदणी केलेला सार्वजनिक न्यास, असा आहे; (१९५० चा २९.)

(ञ) ''नियम'' याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले नियम, असा आहे;

(ट) ''अनुसूची'' याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे;

(ठ) ''शाळा'' याचा अर्थ, पूर्व–प्राथमिक शाळा, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालय अशी कोणतीही शासन मान्य शाळा असून, ती कोणत्याही व्यवस्थापनाकडून स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर चालविण्यात येणारी व कोणत्याही भारतीय वा परदेशी अभ्यासक्रमास अथवा मंडळास संलग्न असलेली जेथे कोणत्याही कारणाने शाळेत होणारा कोणत्याही प्रकारचा सर्व खर्च व्यवस्थापन स्वतः करील आणि राज्यशासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून कोणतेही सहायक अनुदान किंवा वित्तीय सहाय्य देण्यात येणार नाही; आणि अशा शाळेच्या व्यवस्थापनाने निर्माण केलेल्या कोणत्याही दायित्वाची पूर्ती करण्यास राज्यशासन किंवा स्थानिक प्राधिकरण जबाबदार राहणार नाही, असा आहे;

(ड) ''छाननी समिती'' याचा अर्थ, कलम ६ अन्वये घटीत केलेली छाननी समिती, असा आहे;

(ढ) ''कलम'' याचा अर्थ, या अधिनियमाचे कलम, असा आहे;

(ण) ''राज्य'' याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे;

(त) ''शाळेचा दर्जावाढ'' याचा अर्थ, मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेचा उच्च प्राथमिक शाळेत, उच्च–प्राथमिक शाळेचा माध्यमिक शाळेत किंवा माध्यमिक शाळेचा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ, असा आहे.

२) या अधिनियमात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दप्रयोगांना आणि–

(एक) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यामध्ये किंवा त्याअन्वये केलेल्या नियमांमध्ये व्याख्या केलेल्या शब्दप्रयोगांना त्या अधिनियमात किंवा नियमांत अनुक्रमे नेमून दिल्याप्रमाणेच अर्थ असतील, (२००९ चा ३५.) किंवा

(दोन) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम किंवा महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ किंवा महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापनाचे हस्तांतरण) अधिनियम, १९७१ किंवा महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६ किंवा महाराष्ट्र खाजगी शाळेतील

कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ यांमध्ये ज्यांची व्याख्या केलेली आहे, त्या शब्दांचे अर्थ संदर्भानुसार आवश्यक असेल त्यानुसार या अधिनियमांमध्ये किंवा त्याअन्वये नेमून दिल्याप्रमाणेच असतील. (१९४७ चा ६१, १९६५ चा महा. ४१, १९७१ चा महा. ४९, १९७६ चा महा. १३, १९७८ चा महा. ३.)

**(३) नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ यासाठी अर्ज करणे** :

नवीन शाळा, म्हणजे पूर्व–प्राथमिक किंवा प्राथमिक किंवा उच्च–प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळा स्थापन करण्यास, किंवा विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च–प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेत दर्जावाढ करण्यास इच्छुक असलेला कोणताही नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था, किंवा स्थानिक प्राधिकरण अनुसूची 'क' मध्ये विहित केलेल्या नमुन्यात आणि अनुसूची 'ख' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कागदपत्रांसह आणि राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शुल्कासह **संबंधित शिक्षण संचालकांकडे अर्ज** सादर करील; आणि ज्या शैक्षणिक वर्षापासून परवानगी मागितली असेल त्या शैक्षणिक वर्षाच्या आधीच्या वर्षातील ३० जून पूर्वी असा अर्ज करण्यात येईल :

परंतु, २०१३–१४ या शैक्षणिक वर्षाकरिता, असा अर्ज ३१ जानेवारी २०१३ पूर्वी करण्यात येईल.

**(४) दाननिधीची निर्मिती** :

(१) नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही नोंदणीकृत न्यासास किंवा नोंदणीकृत संस्थेस किंवा स्थानिक प्राधिकरणास दान निधी निर्मितीसाठी अनुसूची 'ग' मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेत राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र किंवा बँकेतील मुदत ठेव या स्वरूपात प्रतिभूती ठेव म्हणून ठेवावी लागेल; आणि व्यवस्थापनाच्या नावाने घेतलेले असे प्रमाणपत्र किंवा मुदत ठेव पावती संबंधित जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांकडे तारण म्हणून ठेवावी लागेल.

(२) या दान निधीचा विनियोग, राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने आणि कलम ५ च्या तरतुदीच्या अधीन राहून व्यवस्थापनाचे कायदेशीर देणे संबंधीचे दायित्व असल्यास, त्याची पूर्ती करण्यासाठी करता येईल.

**(५) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर स्थापन केलेल्या शाळेला राज्य शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य नसणे** :

(१) नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्या खाजगी व्यवस्थापनाकडून राज्यात कोठेही नवीन शाळा स्थापन करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी करण्यात येणारा अर्ज, अशी शाळा स्थापन करणे, सुस्थितीत ठेवणे आणि चालवणे किंवा तिचा दर्जावाढ करणे या सर्व बाबी स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर करण्यात येतील या आणि केवळ याच अटीवर, अर्ज करता येईल. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या कलम १२ च्या पोट–कलम (२) च्या तरतुदींना अधिन राहून कोणत्याही कारणाने शाळेत होणारा कोणत्याही प्रकारचा सर्व खर्च व्यवस्थापन स्वतः करील आणि राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याकडून कोणतेही सहायक अनुदान किंवा वित्तीय सहाय्य मागता येणार नाही; आणि शाळेच्या अशा व्यवस्थापनाने निर्माण केलेल्या कोणत्याही कायदेशीर देणे संबंधीच्या दायित्वाची पूर्ती करण्यास राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण जबाबदार राहणार नाही. (२००९ चा ३५.)

२) या अधिनियमाच्या तरतुदी अन्वये शाळा चालवण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्यास दिलेली परवानगी काढून घेतल्यास किंवा अशी परवानगी न घेता एखादी शाळा स्थापन करण्यात आली असेल किंवा तिचा दर्जावाढ करण्यात आला असेल किंवा या अधिनियमाच्या तरतुदी अन्वये परवानगी घेतल्यानंतर स्थापन करण्यात आलेली किंवा तिचा दर्जावाढ करण्यात आला असेल अशी शाळा किंवा विद्यमान शाळा कोणत्याही कारणास्तव बंद पडली असेल तर, उपरोक्तप्रमाणे एखादी शाळा स्थापन करण्यासाठी किंवा तिचा दर्जावाढ करण्यासाठी

अथवा ती बंद करण्यासाठी, व्यवस्थापनाची कायदेशीर देणे संबंधीची दायित्वे सर्वप्रथम कलम ४ अन्वये निर्माण केलेल्या दान निधीमधून भागविण्यात येतील.

(३) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळा स्थापन करण्याची किंवा दर्जावाढ करण्याची परवानगी प्राप्त केलेल्या व्यवस्थापनाने पत्करलेल्या संपूर्ण कायदेशीर देणे संबंधीच्या दायित्वाची पूर्ती करण्यास दान निधी कमी पडला तर अशा दायित्वाची समप्रमाणात पूर्ती करण्यासाठी शाळेच्या व्यवस्थापनाचे त्या त्या वेळचे पदाधिकारी आणि पद धारण करणारे सदस्य हे संयुक्तपणे व पृथकपणे समप्रमाणात जबाबदार असतील.

परंतु, असे दायित्व त्याच्या नकळत पत्करले गेले होते किंवा असे दायित्व पत्करण्यास प्रतिबंध करण्यासाठी योग्य ती सर्व तत्परता त्याने दाखविली होती असे त्याने शाबीत केले तर, या पोट–कलमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, अशा कोणत्याही व्यक्तीस पूर्वोक्तप्रमाणे जबाबदार ठरविणार नाही.

(४) पोट–कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखादे कायदेशीर देणे संबंधीचे दायित्व व्यवस्थापनाने पत्करलेले असेल आणि ते दायित्व कोणताही सचिव, व्यवस्थापक किंवा कोणताही कर्मचारीवर्ग यांच्या संमतीने किंवा मुकसंमतीने किंवा दुर्लक्ष केल्यामुळे पत्करण्यात आले असेल तेव्हा, असा सचिव, व्यवस्थापक किंवा कोणताही कर्मचारी वर्ग अशा दायित्वाची पूर्ती करण्यास जबाबदार आहे, असे मानण्यात येईल.

**(६) अर्जाच्या छाननीची कार्यपद्धती** :

(१) छाननी समितीकडून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाच्या आधारे, अर्जदारांना नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबत विचार करण्यास आणि त्यानुसार राज्य शासनास शिफारस करण्यासाठी राज्य शासन, अध्यक्ष व तीनपेक्षा कमी नसतील इतक्या इतर सदस्यांची राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे राज्यातील संपूर्ण क्षेत्रासाठी एक किंवा वेगवेगळ्या समित्या घटित करील. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९, याच्या तरतुदी आणि त्याखाली करण्यात आलेले नियम यांनुसार आवश्यक असलेली शाळेबाबतची प्रमाणके आणि मानके, तसेच वेळोवेळी विहित करण्यात येतील अशी प्रमाणके व मानके, अर्जदाराची आर्थिक सुस्थिती, शाळेच्या मतांची व्याप्ती, आवश्यक त्या पायाभूत सोयीसुविधांची उभारणी करण्यासाठीची शाळेची क्षमता, शिक्षण क्षेत्रातील तिचा अनुभव व तज्ज्ञता या बाबी विचारात घेऊन, त्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर, छाननी समितीच्या अहवालात, नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी द्यावयाची शिफारस करण्यासाठीची किंवा यथास्थिति, परवानगी अर्ज फेटाहून लावण्यासाठीची, कारणे देण्यात येतील आणि हा अहवाल कलम ३ मध्ये उल्लेखिलेल्या वर्षाच्या ३१ ऑक्टोबर रोजी किंवा त्यापूर्वी राज्य शासनास सादर करण्यात येईल : (२००९ चा ३५.)

परंतु २०१३–१४ या शैक्षणिक वर्षाकरिता, छाननी समिती असा अहवाल, राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, राज्य शासनाला सादर करील.

(२) राज्य शासनाला छाननी समितीचा अहवाल सादर केला जाण्यापूर्वी छाननी समिती तो महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करील आणि त्या संदर्भातील हरकती व सूचना मागविणारी नोटीस किमान दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत त्या संचालकांकडे पोहोचतील अशातऱ्हेने त्या हरकती व सूचना मागविण्यात येतील. पोट–कलम (१) अन्वये छाननी समितीने राज्य शासनाला पाठवावयाचा अहवाल हा, हरकती व सूचना कोणत्याही असल्यास, त्यासह पाठविण्यात येईल.

(३) छाननी समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची अर्हता व अनुभव, अधिकार व कर्तव्ये आणि छाननी समितीचे कामकाज चालविण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित केल्याप्रमाणे असेल.

**(७) परवानगी देणे** :

(१) छाननी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर, राज्य शासन, जिच्यासाठी अर्ज केलेला असेल अशी नवीन शाळा सुरू करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देईल किंवा नाकारील.

(२) राज्य शासनाने पोट–कलम (१) अनुसार दिलेला निर्णय अंतिम असेल.

**(८) शासनाचा निर्णय कळविणे** :

(१) कलम ३ अन्वये मागितलेली कोणतीही परवानगी देण्याबाबतचा अथवा ती नाकारण्याबाबतचा राज्य शासनाचा निर्णय, अर्जदारास, त्या शैक्षणिक वर्षाच्या १ मे पूर्वी कारणासह कळविण्यात येईल; आणि तो महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.

(२) शाळेची स्थापना किंवा दर्जावाढ झाल्यानंतर, ज्या शैक्षणिक वर्षापासून तशी परवानगी मिळाली असेल, ते शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, व्यवस्थापन त्याबाबतची माहिती संबंधित जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यास देईल.

**(९) विवक्षित शाळांच्या बाबतीत विशेष तरतुदी** :

राज्य शासनास, शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजी वगळता कोणत्याही भाषेतून शिक्षण देणाऱ्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी कमीत कमी पाच वर्षांच्या कालावधीकरिता चालविल्या गेलेल्या शाळांच्या बाबतीत, या अधिनियमान्वये अशा शाळेला परवानगी देण्याचा अधिकार असेल.

परंतु, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदींचे अनुपालन केले असल्याखेरीज, अशा कोणत्याही शाळेला या कलमाअन्वये परवानगी दिली जाणार नाही : (२००९ चा ३५.)

परंतु, आणखी असे की, कलमे ३, ४ व अनुसूची ‘क’ चा परिच्छेद १२ यांच्या तरतुदी वगळता, या अधिनियमाच्या सर्व तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह अशा शाळेला लागू असतील.

**(१०) शिस्तभंगाची कारवाई** :

कलम ३ अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करणे व तपासणी अहवाल सादर करणे, या अधिनियमान्वये अधिकाऱ्यांना नेमून दिलेली पदीय कर्तव्ये या कामांमध्ये चुका किंवा खोटेपणा केल्याचे आढळल्यास, किंवा अशी पदीय कर्तव्ये पार पाडण्यात जाणीवपूर्वक किंवा हेतूपुरस्पर विलंब किंवा दुर्लक्ष केले गेल्यास, सदर बाब ही शासकीय कर्तव्यपालनातील कसूर म्हणून गणली जाईल आणि असा अधिकारी, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये किंवा अशा अधिकाऱ्याला लागू असलेल्या अन्य कोणत्याही संबंद्ध शिस्तविषयक नियमांखाली, यथोचित शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र होईल.

**(११) शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी** :

या अधिनियमाच्या तरतुदींन्वये शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्यास दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरिता देण्यात आली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरिता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्यांच्या आत व्यवस्थापनास शाळा सुरू करण्यात अपयश आल्यास, सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

**(१२) विद्यमान शाळांचा दर्जावाढ** :

(१) कोणतेही नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण चालवीत असलेल्या विद्यमान शाळेस, त्यांच्या विकल्पानुसार, या अधिनियमान्वये स्वयं–अर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ मिळण्याकरिता अर्ज करील आणि या संदर्भात राज्य शासनाने दिलेल्या आदेशांचे किंवा निदेशांचे पालन करील.

(२) संचालकास अथवा संचालकाने नामनिर्देशित केलेल्या एखाद्या अधिकाऱ्यास आवश्यक असेल तेव्हा कार्यालयीन

कामकाजाच्या वेळेत केव्हाही त्या शाळेत प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल आणि राज्य शासनाकडे तपासणी अहवाल पाठवता येईल.

**(१३) या अधिनियमांतर्गत येणारी कोणतीही शाळा बंद करता न येणे** :

(१) या अधिनियमात अन्यथा केलेली तरतूद वगळता, शाळेच्या व्यवस्थापनाचा सचिव किंवा व्यवस्थापक किंवा शाळेचा कारभार पाहणारी व कोणत्याही पदाने संबोधली जाणारी कोणतीही व्यक्ती यांनी शाळा बंद करण्याचा अथवा तिचे काम खंडित करण्याचा व्यवस्थापनाचा उद्देश दर्शविणारी संबंधित शिक्षण संचालक आणि राज्य शासन यांना अठरा महिन्यांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीची पूर्वसूचना दिल्याखेरीज या अधिनियमाखाली स्थापन केलेली किंवा दर्जावाढ केलेली कोणतीही शाळा बंद करता येणार नाही किंवा तिचे काम खंडित करता येणार नाही. अशी सूचना मिळाल्यानंतर संचालक, त्याला योग्य वाटल्यास स्वविवेकानुसार सचिव, व्यवस्थापक किंवा यथास्थिती, शाळेचा कारभार पाहणारी अशी व्यक्ती यांना आपले म्हणणे समक्ष भेटून मांडण्याची संधी देईल. त्यानंतर शाळा बंद करणे किंवा तिचे काम खंडित करणे समर्थनीय असल्याचे संचालकाचे मत झाले तर, तो बाधित विद्यार्थ्यांची सोय करण्याबाबत उचित कार्यवाही करण्याचे राज्य शासनाला कळवील. शासन अशा बंद होणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांची सोय नजिकच्या उपलब्ध करण्याबाबत यथोचित कार्यवाही करील.

(२) पोट–कलम (१)अन्वये आवश्यक असणारी पूर्वसूचना देण्यास असा कोणताही सचिव, व्यवस्थापक किंवा शाळेचा कारभार पाहणारी व्यक्ती कसूरदार ठरली तर, अपराध सिद्ध झाल्यावर तिला रुपये पाच लाखांपेक्षा कमी नाही पण रुपये दहा लाखांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

**(१४) परवानगी काढून घेणे** :

(१) राज्य शासन, देण्यात आलेली परवानगी, अशी कोणतीही असल्यास कलम ११ च्या तरतुदींना बाधा न पोचवता, आदेशाद्वारे, पुढील कारणांसाठी काढून घेऊ शकेलः

क) या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा या अधिनियमाखाली दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा राज्य शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्ती अशा कोणत्याही असल्यास त्यांची पूर्तता करण्यास असमर्थ ठरल्यास;

ख) विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोचवणारी कृती केल्यास; किंवा

ग) दर्जाहीन शैक्षणिक कामगिरी केल्यास.

(२) असा न्यास किंवा संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण यांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज पोट–कलम (१) अन्वये परवानगी काढण्याबाबतचा आदेश पारीत करता येणार नाही.

**(१५) राज्यातील, राज्याबाहेरील किंवा भारताबाहेरील कोणत्याही मंडळाशी किंवा संस्थेशी संलग्नता मिळवू पाहणाऱ्या शाळेला अधिनियमाच्या तरतुदी लागू असणे** :

(१) शाळा स्थापन करण्याचा किंवा चालविण्याचा ज्याचा विचार आहे, अशी शाळा राज्यातील, राज्याबाहेरील किंवा भारताबाहेरील कोणत्याही मंडळाशी किंवा संस्थेशी संलग्न करून घेणे ज्याच्या विचाराधीन आहे, असा कोणताही नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण या राज्यात अशी शाळा स्थापन करण्याबाबतच्या किंवा चालविण्याच्या आवश्यक बाबींची पूर्तता करण्यास, तसेच राज्यातील, राज्याबाहेरील किंवा भारताबाहेरील अशा कोणत्याही मंडळाच्या किंवा संस्थेच्या अन्य कोणत्याही आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासही बांधील असेल आणि अशी शाळा सुरू करण्याबाबत परवानगी मागण्यासाठीच्या सदर न्यासाच्या, संस्थेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या अर्जावर या अधिनियमाच्या तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(२) या अधिनियमान्वये परवानगी घेतल्याशिवाय अशी कोणतीही शाळा स्थापन करण्यात येणार नाही आणि केवळ त्यासाठी अर्ज केलेला आहे म्हणून या राज्यात अशी शाळा स्थापन करण्यास परवानगी देण्यात आली आहे असे समजण्यात येणार नाही.

(३) नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा यथास्थिती, स्थानिक प्राधिकरण ही, या अधिनियमातील तरतुदी किंवा त अंतर्गत करण्यात आलेले नियम आणि विहित मानके आणि प्रमाणके यांनुसार शाळा चालवली जात असल्याची खात्री करून घेतील आणि मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील असतील.

**(१६) नोंदणीकृत न्यासास किंवा नोंदणीकृत संस्थेस किंवा स्थानिक प्राधिकरणास निदेश देण्याचा अधिकार.**

या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या किंवा आदेशांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाला या अधिनियमातील तरतुदींशी आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांशी सुसंगत वाटणारे सर्वसाधारण किंवा विशिष्ट निदेश परवानगी दिलेल्या कोणत्याही नोंदणीकृत न्यासास किंवा नोंदणीकृत संस्थेस किंवा स्थानिक प्राधिकरणास देता येतील आणि त्यांचे व्यवस्थापन अशा प्रत्येक निदेशाचे पालन करील.

**(१७) अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार** :

(१) राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्‌वारे वेळोवेळी कोणत्याही अनुसूचीमधील कोणत्याही नोंदीमध्ये फेरबदल करू शकेल, जादा दाखल करू शकेल किंवा ती वगळू शकेल आणि त्या कारणासाठी उक्त अधिसूचनेद्‌वारे अनुसूचीमध्ये यथायोग्य सुधारणा करू शकेल आणि त्यानंतर अनुसूचीतील नोंद त्यानुसार सुधारणा झाली असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोट–कलम (१) खाली काढलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

**(१८) आदेश अंतिम असणे** :

या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे केलेली तरतूद वगळता, राज्य शासन किंवा संबंधित संचालक यांनी घेतलेला प्रत्येक निर्णय, काढलेला आदेश किंवा दिलेली सूचना किंवा निदेश अंतिम असेल.

**(१९) सद्‌भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण** :

या अधिनियमान्वये किंवा त्याखालील नियम किंवा आदेशान्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कृतीबद्दल राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

**(२०) अधिकारी, इत्यादी लोकसेवक असणे** :

या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा नियमानुसार काम करणारा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक आहे असे मानण्यात येईल. (१८६० चा ४५.)

**(२१) हा अधिनियम विद्यमान कायद्यांच्या भरीला असणे** :

या अधिनियमाच्या तरतुदी या, या अधिनियमांतर्गत स्थापन केलेल्या किंवा दर्जावाढ केलेल्या शाळेच्या व्यवस्थापनासंबंधातील व त्याला लागू असलेल्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यांच्या तरतुदीच्या भरीला असतील व त्यांना न्यूनकारी असणार नाहीत.

**(२२) अधिकार सोपविणे** :

राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कलम ६, ७ कलम १७ चे पोट–कलम (१), हे कलम आणि कलम २३ या कलमाखालील अधिकारांव्यतिरिक्त, संचालकाच्या आणि जिल्हा शिक्षण अधिकाऱ्याच्या अधिकारांव्यतिरिक्त, या अधिनियमाखालील त्यांचे सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या आणि अशा नियंत्रणाच्या अधीनतेने, त्याच्या किंवा त्यांच्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्यांना सोपविता येतील; आणि राज्य शासन त्याच पद्धतीने, अशा प्रकारे सोपविलेले अधिकार काढून घेऊ शकेल.

**(२३) नियम करण्याचा अधिकार** :

(१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीनतेने, या अधिनियमाची सर्व किंवा कोणतीही प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील, आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशी अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिती, अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

**(२४) अडचणी दूर करण्याचा अधिकार** :

(१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास **राजपत्रात प्रसिद्ध** केलेल्या आदेशाद्वारे प्रसंगानुरूप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट–कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

# अनुसूची क

**(कलम ३ पहा)**

## अर्जाचा नुमना

१) अर्जदाराचे नाव :
नोंदणीकृत न्यास किंवा नोंदणीकृत संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण :

२) नवीन शाळा सुरू करण्यासाठी करण्यासाठी अर्ज :
पूर्व प्राथमिक किंवा प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक स्वतंत्रपणे किंवा त्यांच्यापैकी एक किंवा अनेक जोडून :

३) शाळेचे नाव :

४) पूर्ण पत्ता :
   क) अर्जदाराचा –
   ख) व्यवस्थापनाच्या कार्यालयाचा –

५) विद्यमान शाळेची श्रेणीवाढ :
प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक (विद्यमान शाळेचा डिआयएसई किंवा एसईएमायएस क्रमांक द्यावा.)

६) प्रस्तावित नवीन शाळेच्या किंवा श्रेणीवाढ करावयाच्या शाळेच्या शिक्षणाचे माध्यम :

७) राज्य मंडळ किंवा सीबीएसई :
(केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ) किंवा आयसीएसई किंवा आयजीसीएसई किंवा आयबी किंवा सीआयई किंवा कोणतेही मंडळ किंवा संस्था ती कोणत्याही नावाने असेल यांच्याशी सध्या असणाऱ्या किंवा प्रस्तावित असणाऱ्या संलग्नतेचा तपशील :

८) ज्या ठिकाणी शाळा आहे किंवा स्थित होणार असेल असे ठिकाण, तालुका, जिल्हा :

९) न्यास किंवा संस्था यांच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत किंवा स्थानिक प्राधिकरणाचा तपशील :

१०) क) न्यास विलेख किंवा योजना यांची प्रत :
   ख) विश्वस्त, व्यवस्थापकीय समितीचे सदस्य यांचेविषयीचा तपशील आणि त्यांचे पत्ते

११) जमिनीचा तपशील :

क) व्यवस्थापनाच्या नावे असलेली नोंदणीकृत जमीन

ख) न्यास, संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्या नावाने ३० किंवा त्याहून अधिक वर्षांचा नोंदणीकृत भाडेपट्टा विलेख

ग) शाळेला ज्याच्याशी संलग्नता हवी आहे, ते मंडळ किंवा संस्था किंवा ती परिषद

१२) उपलब्ध जमिनीचे क्षेत्र :

क) मुंबई व मुंबई उपनगरात किमान अर्धा एकर

ख) शहरी भागात एक एकर

ग) ग्रामीण भागात दोन एकर

१३) ज्या जमिनीसाठीची कागदपत्रे सादर केलेली आहेत अशा जमिनीवरील बांधकाम (बांधकामाचा तपशील)

क) एकूण क्षेत्र चौरस मीटरमध्ये

ख) बांधकामाचे क्षेत्र चौरस मीटरमध्ये

ग) प्रत्येक मुलामागे वर्गखोलीतील उपलब्ध क्षेत्र (प्रत्येक मुलामागे अंदाजे एक चौरस मीटर)

एकूण बांधकामाचा तपशील :

(एक) वर्गखोल्यांची संख्या :
(वर्गखोलंचा आकार आठ मीटर × सहा मीटर)

(दोन) शिक्षक कक्ष :

(तीन) प्राचार्य कक्ष :

(चार) कार्यालय कक्ष :

(पाच) ग्रंथालय :

(सहा) प्रयोगशाळा :

(सात) उपक्रम कक्ष :

(आठ) संगणक कक्ष (किमान दहा संगणक) :

(नऊ) प्रसाधन गृहे :
(मुले आणि मुलींसाठी स्वतंत्र शौचालये)

(दहा) पिण्याच्या पाण्याची सुविधा :

(अकरा)आवश्यक त्या फर्निचरने सुसज्ज

(बारा) खेळाचे मैदान

१४) मुलांसाठी वाहतूक सुविधा (वैकल्पिक) :

१५) मुलांसाठी निवासाची सुविधा (वैकल्पिक) :

१६) कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने (वैकल्पिक) :

१७) अतिरिक्त सुविधांबाबतचा तपशील :
(शाळेने पुरविलेल्या)

१८) बँकेचा तपशील :
क) चालू बचत खाते, नियत ठेव, रोखे
ख) ताळेबंद किंवा प्रमाणिक लेखापरीक्षा अहवाल

१९) आकारण्यात येणाऱ्या शुल्काचे तपशील, अंदाजित उत्पन्न आणि खर्चाचे तपशील :

२०) कर्मचारीवृंद प्रमाणके–प्रमाणकांनुसार पर्याप्त अर्हताप्राप्त कर्मचारी वृंद.

दिनांक : सही :

## अनुसूची ख

**(कलम ३ पहा)**

## अर्जासोबतची कागदपत्रे

१) नोंदणीच्या प्रमाणपत्राची प्रत :

२) न्यास, विलेख, योजना यांची प्रत :

३) जमिनीशी संबंधित दस्तऐवजांचा तपशील :

४) बांधकामाशी संबंधित दस्तऐवजांचा तपशील – नकाशा, प्रारंभ प्रमाणपत्र, पूर्णत्वाचे प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र

५) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ याच्या तरतुदींन्वये आवश्यक असलेली पायाभूत प्रमाणकांशी संबंधित छायाचित्रे :

६) बँक खात्यांशी संबंधित कागदपत्रे :

७) लेखापरीक्षणाचा अहवाल :

८) ताळेबंद :

## अनुसूची ग

**(कलम ४(१) पहा)**

| | | | |
|---|---|---|---|
| क) | नवीन प्राथमिक किंवा प्राथमिक शाळेला संलग्न असलेली पूर्व-प्राथमिक किंवा उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा थास्थिती, उच्च-माध्यमिक शाळा स्थापन करण्यासाठी : | (एक) ग्रामपंचायत भागात | रुपये किमान दोन लाख, |
| | | (दोन) नगर परिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी भागात | रुपये किमान तीन लाख, |
| | | (तीन) महानगरपालिका भागात | रुपये किमान पाच लाख |
| | | (चार) मुंबई व मुंबई उपनगर भागात | रुपये किमान सात लाख |
| ख) | प्राथमिक स्तर ते उच्च-माध्यमिकपर्यंत नवीन शाळा स्थापन करण्यासाठी : | (एक) ग्रामपंचायत भागात | रुपये किमान पाच लाख, |
| | | (दोन) नगर परिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी भागात | रुपये किमान दहा लाख, |
| | | (तीन) महानगरपालिका भागात | रुपये किमान पंधरा लाख |
| | | (चार) मुंबई व मुंबई उपनगर भागात | रुपये किमान वीस लाख |
| ग) | शाळेची उच्च-प्राथमिक, माध्यमिक किंवा यथास्थिती, उच्च-माध्यमिक शाळेमध्ये दर्जावाढ करण्यासाठी : | (एक) ग्रामपंचायत भागात | रुपये किमान दोन लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता) |
| | | (दोन) नगर परिषद, नगर पंचायत किंवा औद्योगिक नगरी भागात | रुपये किमान तीन लाख, (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता) |
| | | (तीन) महानगरपालिका भागात | रुपये किमान पाच लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता) |
| | | (चार) मुंबई व मुंबई उपनगर भागात | रुपये किमान सात लाख (प्रत्येक दर्जावाढ करण्याकरिता) |

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

❑❑❑

# १०. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधी व न्याय विभाग**

## सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

## महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७

(दिनांक ३ ऑक्टोबर २०१५ पर्यंत सुधारित)

**Maharashtra Act No. VI of 1988**

## The Maharashtra Educational Institutions ( Prohibition of Capitation Fee) Act, 1987

*(As modified upto the 3rd October 2015)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले व संचालक,
शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

**२०१५**

**(किंमत : रुपये १३.००)**

# महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध)

## अधिनियम, १९८७

### अनुक्रमणिका


**उद्देशिका.**

**कलमे**

१. संक्षिप्त नाव व व्याप्ती

२. व्याख्या

३. कॅपिटेशन फी मागण्यावर किंवा
गोळा करण्यावर बंदी घालणे.

४. फीचे विनियमन

५. पीडित व्यक्तीला पोलिसात तक्रार दाखल करता येईल.

६. प्रवेश करण्याचा आणि तपासणी करण्याचा अधिकार.

७. शास्ती.

७अ. अपप्रेरणेबद्दल शास्ती.

७अअ. अपराध दखलपात्र व बेजमानती असणे.

८. कंपन्यांनी केलेले अपराध.

९. वाजवी कारणाशिवाय केलेल्या आरोपाविषयी भरपाई.

१०. इतर कायद्यांपेक्षा हा अधिनियम प्रभावी असणे.

११. या अधिनियमान्वये केलेल्या कारवाईस संरक्षण.

१२. नियम.

१३. व्यावृत्ती


एच ४०३०–१

# सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६[1]

## (महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७)

(राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **''महाराष्ट्र शासन राजपत्रात''** दिनांक १५ एप्रिल १९८८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला)

या अधिनियमात पुढील अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत :

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ (२९ ऑगस्ट १९९६)

**महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याकरिता आणि त्यांना वरच्या इयत्तेमध्ये किंवा वर्गामध्ये चढविण्याकरिता कॅपिटेशन फी गोळा करण्यास प्रतिबंध करणे आणि त्यासंबंधातील बाबीसंबंधी तरतूद करणे यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याकरिता आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या निरनिराळ्या टप्प्यात वरच्या इयत्तेमध्ये किंवा वर्गामध्ये चढविण्याकरिता कॅपिटेशन फी गोळा करण्याची प्रथा राज्यात वाढत चालली आहे;

**आणि ज्याअर्थी,** या अनिष्ट प्रथेमुळे शिक्षणाचे फार मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण झालेले आहे व ते शिक्षणाचा दर्जा राखण्याच्या दृष्टीने हितवाह नाही;

**आणि ज्याअर्थी,** १९८६ च्या शिक्षणविषयक राष्ट्रीय धोरणामध्ये, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या व्यापारीकरणास पायबंद घालणे आणि शिक्षणाचे व्यापारीकरण करण्यासाठी, संस्था स्थापन करण्यास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करणे या गोष्टी अभिप्रेत आहेत;

**आणि ज्याअर्थी,** या वाईट प्रथेला प्रभावी रितीने पायबंद घालण्याच्या हेतूने, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याकरिता आणि त्यांना वरच्या इयत्तेत किंवा वर्गात चढविण्याकरिता कॅपिटेशन फी घेण्यास लोकहिताच्या दृष्टीने प्रतिबंध करणे आणि या संबंधातील बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** याद्वारे भारतीय गणराज्याच्या अडतिसाव्या वर्षी पुढील अधिनियम करण्यात येत आहे :

**१.** (१) या अधिनियमास, 'महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७'', असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, व्याप्ती**

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

---

१) उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९८७, भाग–पाच, असाधारण, इंग्रजी पृष्ठे १६६ पहा, संयुक्त समिती अहवालासाठी पहा. **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९८८, भाग–पाच, असाधारण इंग्रजी पृष्ठे ६–८

**व्याख्या** **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) ''कॅपिटेशन फी'' म्हणजे कलम ४ अन्वये विनियमित केलेले फीचे विहित किंवा यथास्थिति संमत दर यापेक्षा अधिक होणारी, [१](***) कोणतीही रोख किंवा वस्तूंच्या स्वरूपातील रक्कम असा होतो– मग त्या रकमेस कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो;

[२]((अअ) ''उप संचालक याचा अर्थ, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालक, तंत्र शिक्षण संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालक किंवा व्यवसाय शिक्षण संचालक यांच्या नियंत्रणाखाली किंवा कोणत्याही प्रकारचे शिक्षण देणाऱ्या, राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या पर्यवेक्षणाची कामगिरी ज्याच्यावर सोपविण्यात आली आहे अशा, राज्य शासनाच्या अन्य कोणत्याही संचालनालयामध्ये काम करणारा शिक्षण उप संचालक, किंवा उप संचालक म्हणून राज्य शासनाकडून सहनियुक्त करण्यात आलेला, कोणताही अधिकारी, असा आहे;)

(ब) ''शैक्षणिक संस्था'' किंवा ''संस्था'' म्हणजे, शासनाकडून, स्थानिक प्राधिकरणाकडून विद्यापीठाकडून किंवा अल्पसंख्याक जमातीकडून स्थापन करण्यात आलेल्या व चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थेसह खाजगी व्यवस्थापकाकडून चालविली जाणारी आणि पूर्णपणे किंवा निरनिराळ्या कार्यक्रमांपैकी एक कार्यक्रम म्हणून व्यावसायिक, तांत्रिक किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे शिक्षण व प्रशिक्षण देणारी शाळा (बालक मंदिर, पूर्व प्राथमिक शाळा, बालवाडी किंवा शिशुविहार शाळा धरून) महाविद्यालय किंवा कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारी संस्था किंवा, तिचा भाग आणि त्यामध्ये राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी कोणतीही अन्य संस्था किंवा तिचा भाग यांचा समावेश होतो; परंतु त्यातून उजळणी वर्ग (कोचिंग क्लास) मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येवोत, वगळण्यात येतील;

(क) ''स्थानिक प्राधिकरण'' म्हणजे

(एक) जिल्हा परिषदेकडून चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थेच्या संबंधात 'महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१' अन्वये स्थापन केलेली जिल्हा परिषद; **१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५.**

(दोन) महानगरपालिकेकडून चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थेच्या संबंधात मुंबई महानगरपालिका अधिनियम, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा यथास्थिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, नागपूर शहर महानगरपालिकाअधिनियम, १९४८ किंवायथास्थितीमुंबईप्रांतिकमहानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये स्थापन केलेली महानगरपालिका; **१८८८ चा मुंबई अधिनियम ३. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाडचा अधिनियम, १९४९ चा अधिनियम २.**

(तीन) नगरपालिकेकडून जिथे व्यवस्थापन केले जाते अशा शैक्षणिक संस्थेच्या संबंधात [३]('महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी' अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन केलेली नगरपालिका : **१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४०.**

---

१. सन १९९६चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम २, खंड (अ) अन्वये 'प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या भरण्यात आलेली किंवा वसूल करण्यात आलेली' हा मजकूर वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) द्वारे खंड (अअ) समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २ (क) द्वारे 'महाराष्ट्र नगरपालिका' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ड) ''व्यवस्थापन'' म्हणजे, –

(एक) राज्य शासनाकडून चालविल्या जाणाऱ्या संस्थेच्या बाबतीत शासन;

(दोन) स्थानिक प्राधिकरणाकडून चालविल्या जाणाऱ्या संस्थेच्या बाबतीत, स्थानिक प्राधिकरण;

(तीन) विद्यापीठाकडून चालविल्या जाणाऱ्या संस्थेच्या बाबतीत, ते विद्यापीठ आणि

(चार) अन्य कोणत्याही बाबींच्या संबंधात, एखाद्या शैक्षणिक संस्थेचे कामकाज जिच्याकडे सोपविण्यात आले आहे अशी व्यवस्थापन समिती किंवा नियामक मंडळ असा आहे– मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो,–आणि ज्या ज्या बाबतीत असे कामकाज सचिव, या नावाने, पत्रव्यवहार प्रतिनिधी या नावाने, किंवा अन्य कोणत्याही नावाने किंवा पदनामाने संबोधण्यात येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडे सोपविण्यात येते त्याबाबतीत अशा व्यक्तींचाही त्यात समावेश होतो;

(ई) ''अल्पसंख्याकांसाठी असलेल्या शैक्षणिक संस्था'' म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०, खंड (१) अन्वये तसे करण्याच्या हक्क असलेल्या अल्पसंख्याकांनी स्थापन केलेली वा त्यांच्याकडून चालविण्यात येणारी शैक्षणिक संस्था ;

(फ) ''विहित'' म्हणजे या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले;

(ग) ''नियम'' म्हणजे, या अधिनियमाखाली तयार केलेले नियम.

(ह) ''विद्यापीठ'' म्हणजे, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये स्थापन केलेले विद्यापीठ.

**कॅपिटेशन फी [२](मागण्यावर किंवा) गोळा करण्यावर बंदी घालणे.**

**३.** (१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कोणत्याही शैक्षणिक संस्थेकडून किंवा तिच्या वतीने किंवा अशा संस्थेच्या व्यवस्थापनाचा प्रभारी असलेल्या किंवा त्याबद्दल जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा तिच्या वतीने कोणत्याही विद्यार्थ्यांकडून किंवा कोणत्याही विद्यार्थ्यांच्या संबंधात अशा संस्थेत त्याला प्रवेश देण्याच्या आणि कोणताही अभ्यासक्रम चालू ठेवण्याच्या किंवा त्याला वरच्या इयत्तेत किंवा वर्गात चढविण्याच्या मोबदल्यात कॅपिटेशन फी [२](मागितली जाणार नाही किंवा) गोळा करण्यात येणार नाही.

(२) पोट–कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, व्यवस्थापन, सद्भावनेने लोकहितैषी व्यक्तींकडून किंवा संघटनांकडून किंवा सार्वजनिक न्यासांकडून किंवा नवीन शैक्षणिक संस्था सुरू करण्याकरिता कोणत्याही अन्य व्यक्तींच्या संघाकडून किंवा विद्यमान शैक्षणिक संस्थांमध्ये सुधारणा किंवा शैक्षणिक सुविधांच्या विस्ताराकरिता किंवा शिष्यवृत्त्या, पारितोषिके किंवा तत्सम अशा पुरस्कारांकरिता दाननिधी निर्माण करण्यासाठी [३](रोख किंवा वस्तूच्या स्वरूपामध्ये देणग्या मागू शकेल किंवा, विहित करण्यात आलेल्या रीतीने गोळा करू शकेल किंवा स्वीकारू शकेल;) परंतु, अशी देणगी गोळा करताना किंवा स्वीकारतांना, व्यवस्थापनाने, अशा देणगीच्या मोबदल्यात, त्यांच्याकडून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये कोणतीही जागा राखून ठेवलेली नसावी. देणग्यांमधून प्राप्त झालेला सर्व पैसा व वस्तू संस्थेकरिता हिशोबात

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, याच्या कलम ३ (ड) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

दाखविल्या जातील आणि पैसा कोणत्याही अनुसूचित किंवा सहकारी बँकेमध्ये संस्थेच्या नावे जमा करण्यात येईल आणि ज्या प्रयोजनासाठी अशा देणग्या गोळा करण्यात किंवा स्वीकारण्यात आल्या असतील अशा प्रयोजनासाठी तो वापरण्यात येईल किंवा खर्च करण्यात येईल किंवा संस्थेच्या उद्दिष्टांसाठी तो वापरण्यात येईल.

परंतु, अशी देणगी स्वीकारण्याच्या मोबदल्यात, अशा संस्थेमध्ये कोणत्याही विद्यार्थ्यांकरिता कोणतीही जागा राखून ठेवली जात आहे, तर अशी देणगी स्वीकारणे हे कॅपिटेशन फी गोळा केल्याचे मानण्यात येईल.

[१](* * *)

(३) कोणतीही तक्रार आल्यावर किंवा अन्यथा, ज्याबाबतीत राज्य शासनाची अशी खात्री होईल की, एखाद्या संस्थेच्या व्यवस्थापनाकडून किंवा, त्या संस्थेच्या व्यवस्थापनाचा प्रभारी असलेल्या किंवा त्याबद्दल जबाबादार असलेल्या एखाद्या व्यक्तीकडून या अधिनियमाच्या उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे उल्लंघन झालेले आहे, त्याबाबतीत राज्यशासन, त्या संस्थेला किंवा त्या व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, या अधिनियमान्वये त्यांच्याविरुद्ध जो कोणताही खटला दाखल करण्यात येईल त्याशिवाय, या अधिनियमाचे उल्लंघन करून वसूल केलेली कॅपिटेशन फी, जिच्याकडून ती वसूल करण्यात आलेली असेल, त्या व्यक्तीस परत करण्यात यावी असा त्या संस्थेला किंवा त्या जबाबदार व्यक्तीला निर्देश देईल आणि त्या संस्थेने या ज्या व्यक्तीने तसे करण्यास कसूर केल्यास, व्याजासहित ती रक्कम–

(अ) प्राप्तानुदाने शैक्षणिक संस्थेच्या बाबतीत, राज्य शासनाकडून अशा संस्थेला देय असलेल्या सहायक अनुदानातून कापून घेतला जाईल; आणि ती रक्कम नंतर, जिच्याकडून कॅपिटेशन फी वसूल करण्यात आलेली होती, त्या व्यक्तीस परत दिली जाईल; आणि

(ब) विनाअनुदान शैक्षणिक संस्थेच्या बाबतीत जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल केला जाईल, आणि अशा रीतीने वसूल केलेली रक्कम, जिच्याकडून कॅपिटेशन फी वसूल करण्यात आलेली होती, त्या व्यक्तीस परत दिली जाईल.

(४) कोणत्याही विद्यार्थ्यांच्या संबंधात त्यास संस्थेमधील कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश देण्याचा किंवा कोणताही अभ्यासक्रम चालू ठेवण्याच्या किंवा त्यास वरच्या वर्गात किंवा इयत्तेत चढविण्याच्या संबंधात मोबदल्याच्या स्वरूपात पोट–कलम (२) अन्वये देणग्या [२](मागणाऱ्या) गोळा करणाऱ्या किंवा स्वीकारणाऱ्या कोणत्याही संस्थेच्या व्यवस्थापनाने किंवा अशा संस्थेच्या व्यवस्थापनाचा प्रभारी असणाऱ्या किंवा व्यवस्थापनास जबाबदार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने पोट–कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन केले असल्याचे मानण्यात येईल आणि तो तिच्या विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल.

**फीचे विनियमन**

४. (१) कोणत्याही शिक्षण संस्थेने विदयार्थ्यांच्या कोणत्याही किंवा सर्व वर्गाच्या संबंधात त्या शिक्षण संस्थेतील कोणत्याही वर्गात वा इयत्तेत किंवा अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्याकरिता, आणि अभ्यासक्रम चालू ठेवण्याकरता देण्यात येईल किंवा वसूल करण्यात

१. वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) (दोन) अन्वये दुसरे परंतुक वगळण्यात आले.
२. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, याच्या कलम ३ (क) अन्वये मूळ मजकुरापूर्वी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

येईल अशा शिकवणी–फीचे किंवा अन्य कोणत्याही फीचे विनियमन करण्यास राज्य शासन सक्षम असेल.

(२) पोट–कलम (१) अन्वये विनियोग करावयाची फी पुढीलप्रमाणे असेल –

(अ) प्राप्त अनुदान संस्थांच्या बाबतीत, राज्यामध्ये अंमलात असलेल्या संबंधित विद्यापीठ कायद्याअन्वये विद्यापीठाकडून किंवा यथास्थिती, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल त्याप्रमाणे; आणि

(ब) विनाअनुदान संस्थांच्या बाबतीत, जमिनीवरील आणि इमारतीवरील किंवा राज्य शासन अधिसूचित करील त्याप्रमाणे कोणत्याही अशा इतर बाबींवरील कोणत्याही खर्चाच्या व्यतिरिक्त नेहमीचा खर्च लक्षात घेता राज्य शासन मान्यता देईल त्याप्रमाणे :

परंतु, वेगवेगळ्या संस्थांच्या बाबतीत किंवा वेगवेगळ्या वर्गाच्या किंवा भिन्न अभ्यासक्रमांच्या बाबतीत किंवा भिन्न क्षेत्रांच्या बाबतीत खंड (ब) अन्वये वेगवेगळ्या फीस मान्यता देता येईल.

(३) पोट कलम (२) अन्वये विहित कालावधीच्या किंवा मान्य करावयाच्या फीमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल :

(अ) शिकवणी फी, मग ती सत्र पद्धतीने आकारण्यात येत असो किंवा मासिक वा वार्षिक तत्वावर येत असो;

(ब) प्रत्येक शैक्षणिक सत्रासाठी सत्र फी;

(क) दर वर्षाकरिता किंवा संपूर्ण पाठ्यक्रमाकरिता ग्रंथालय फी व प्रतिभूती म्हणून अनामत रक्कम

(ड) दर वर्षाकरिता किंवा संपूर्ण पाठ्यक्रमाकरिता प्रयोगासाठी फी व प्रतिभूती म्हणून अनामत रक्कम;

(इ) वार्षिक तत्त्वावर जिमखाना फी;

(फ) संपूर्ण पाठ्यक्रमाकरिता तारण फी;

(ग) दर वर्षाकरिता किंवा संपूर्ण पाठ्यक्रमाकरिता कोणतीही असल्यास, परीक्षा फी;

(ह) वसतिगृहाची व भोजनालयाची सुविधा पुरविण्यात आली असल्यास त्यासाही वसतिगृह फी व भोजनालय आकार, मग तो सत्रपद्धतीने आकारण्यात येत असो किंवा मासिक वा वार्षिक तत्त्वावर आकारण्यात येत असो;

(आय) राज्य शासन मान्य करील अशी, अन्य कोणत्याही बाबीकरिता अन्य कोणतीही फी व प्रतिभूती म्हणून अनामत रक्कम;

(४) या कलमान्वये विनियमित केलेली फी, सर्वसाधारणपणे तीन वर्षांच्या कालावधीकरिता अंमलात राहील आणि राज्य शासन, फीच्या संरचनेचा आढावा घेण्यासाठी, राज्य शासनाच्या मते शैक्षणिक क्षेत्रामध्ये तज्ज्ञ आहेत अशा व्यक्तींची समिती नियुक्त करील आणि समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर जर तसे करणे राज्य शासनाला इष्ट वाटत असेल तर फीचे पुनरीक्षण करील.

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमाक २४, याच्या कलम ४ अन्वये कलम ५ दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कमल ५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(५) प्रत्येक शैक्षणिक संस्था किंवा, यशास्थिति व्यवस्थापन कोणत्याही प्रयोजनार्थ, जी अशा पावतीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील, वसूल केलेल्या फीसाठी किंवा अनामत रकमेसाठी किंवा अन्य कोणत्याही रकमेसाठी अधिकृत पावती देतील.

**पीडित व्यक्तीला पोलिसात तक्रार दाखल करता येईल.**

**५.** 'जिच्याकडून कोणत्याही विद्यार्थ्याच्या संबंधात, त्यास संस्थेमधील कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश देण्याच्या किंवा त्यास वरच्या वर्गात किंवा इयत्तेत चढविण्याच्या संबंधातील मोबदला म्हणून कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाकडून किंवा कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या वतीने, अशा संस्थेची प्रभारी असणाऱ्या किंवा अशा संस्थेच्या व्यवस्थापनास जबाबदार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून कॅपिटेशन फी किंवा देणगी मागण्यात आली असेल किंवा गोळा करण्यात आली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस यथास्थिती, अशा व्यवस्थापनाविरुद्ध किंवा अशा व्यक्तीविरुद्ध, त्या व्यवस्थापनाने किंवा व्यक्तीने ज्या दिनांकाला अशी कॅपिटेशन फी किंवा देणगी किंवा दोन्ही मागितली असतील किंवा गोळा केली असतील त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करता येईल.

**प्रवेश करण्याचा आणि तपासणी करण्याचा अधिकार**

**६.** (१) [2](शिक्षण उप संचालकाच्या) दर्जापेक्षा मी दर्जा नसलेला व राज्य शासनाने याबाबतीत विशेषत: प्राधिकृत केलेला एखादा अधिकारी, या अनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तदतुदीचे उल्लंघन होत आहे किंवा झालेले आहे, असे त्यास सकारण वाटत असेल तर, अशा शैक्षणिक संस्थेत किंवा तिच्या आवारात किंवा अशा संस्थेच्या व्यवस्थापनाच्या मालकीच्या कोणत्याही आवारात, त्या शैक्षणिक संस्थेच्या नेहमीच्या कामाच्या वेळांमध्ये कोणत्याही वेळी, प्रवेश करू शकेल. अशा संस्थेच्या किंवा तिच्या व्यवस्थापनाच्या मालकीचे कोणतेही अभिलेख हिशेब, नोंदवह्या किंवा इतर दस्तऐवज अशा संस्थेशी संबंधित असेल तेथवर, असे अभिलेख, हिशेब, नोंदवह्या किंवा इतर दस्तऐवज यांची झडती घेऊन तपासणी करू शकेल आणि असे कोणतेही उल्लंघन होत आहे किंवा झालेले आहे, याची खातरजमा करण्यासाठी, असे कोणतेही अभिलेख, हिशेब, नोंदवह्या किंवा इतर दस्तऐवज जप्त करू शकेल.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यातील झडती व जप्ती संबंधीच्या तरतुदी शक्य होतील तेथवर, पोट कलम (१) खालील झडती व जप्ती याबाबतीत लागू होतील.

**शास्ती** **७.** जी कोणी व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याअन्वये करण्यात आलेल्या नियमांचे उल्लंघन करील, तिला अशा दोषसिद्धीनंतर एक वर्षापेक्षा कमी नसेल अशी, परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची आणि तसेच पाच हजार रुपयांपर्यंत असे शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. **१९४७ चा २**

[1](परंतु कॅपिटेशन फी मागण्याचा कलम ३ च्या पोट–कलम (१) खालील अपराध केल्याचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर एक वर्षापेक्षा कमी नसेल अशी, परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत असे शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

---

१. वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये ७ (अ) ७(अअ) जादा दाखल करण्यात आला.

**अपप्रेरणे-बद्दल शास्ती**

७अ. या अधिनियमान्वये, शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाला अपप्रेरणा देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, दोष सिद्धीनंतर अशा अपराधासाठी तरतूद करण्यात आलेली शिक्षा केली जाईल.

**अपराध दखलपात्र व बेजमानती असणे**

७अअ. कॅपिटेशन फी ची मागणी करण्याच्या अपराधाव्यतिरिक्त या अधिनियमाखालील अन्य सर्व अपराध दखलपात्र व बेजमानती असतील.

**कंपन्यांनी केलेले अपराध**

८. (१) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांच्या तरतुदीविरुद्ध एखाद्या कंपनीकडून अपराध घडला असेल, त्याबाबतीत, असा अपराध घडतेवेळी कंपनीचे कामकाज चालवण्याबद्दल प्रभारी असलेली व त्यासाठी कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच ती कंपनीही त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा मिळण्यास ती पात्र ठरेल.

परंतु, असा अपराध आपल्या नकळत घडला किंवा तो अपराध घडू नये म्हणून तिने सर्वप्रकारे योग्य ती तत्परता दाखविली होती असे जर अशा कोणत्याही व्यक्तीने सिद्ध केले तर, या पोट कलमात अंर्तभूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काहीही अंर्तभूत असले तरी, हा अधिनियम किंवा त्याखालील नियमांअन्वये, कंपनीने कोणताही अपराध केला असेल आणि कंपनीच्या कोणत्याही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी किंवा सेवक यांच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे किंवा कोणत्याही हलगर्जीपणाशी त्यांचा संबंध आहे असे शाबीत करण्यात आले तर, असा संबंधित संचालक व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी किंवा सेवक हा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्या विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा केली जाण्यास तो पात्र असेल.

स्पष्टीकरण - या कलमाच्या प्रयोजनार्थ -

(अ) ''कंपनी'' याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे आणि त्यात न्यास, भागिदारी संस्था किंवा व्यक्तींचा इतर संघ यांचा समावेश होतो, आणि

(ब) ''संचालक'', याचा अर्थ -

(एक) एखाद्या भागिदारी संस्थेच्या (फर्म) संबंधात, त्या संस्थेतील भागीदार, असा होतो;

(दोन) संस्थेच्या, न्यासाच्या किंवा इतर व्यक्तींच्या संघाच्या किंवा व्यक्तींच्या निकायाच्या संबंधात, संस्थेच्या, न्यासाच्या किंवा इतर संघाच्या किंवा निकायाच्या नियमांन्वये ज्या व्यक्तीकडे, यथास्थिती त्या संस्थेच्या, न्यासाच्या किंवा इतर संघाच्या किंवा निकायाच्या कामकाजाच्या व्यवस्थापनाचे काम सोपविण्यात आले असेल अशी व्यक्ती, असा होतो.

१९४७ चा २ **९.** या अधिनियमान्वये न्यायचौकशी होत असेल त्यावेळी दंडाधिकाऱ्यांच्या मताप्रमाणे आरोप करण्यासारखे वाजवी कारण नसेल तर, तो फिर्यादी किंवा वर्दी देणाऱ्या विरुद्ध फौजदारी प्रक्रिया मांडता, १९७३ च्या कलम २५० अन्वये कार्यवाही करू शकेल. **वाजवी करणाशिवाय केलेल्या आरोपाविषयी भरपाई**

**१०.** या अधिनियमाच्या तरतुदी किंवा त्याअन्वये तयार केलेले किंवा काढण्यात आलेले नियम व आदेश हे, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात किंवा अशा कायद्याच्या आधारे लागू असलेल्या कोणत्याही लेखात, त्याच्याशी विसंगत कशी कोणतीही गोष्ट असली तरीही, प्रभावी होतील. **इतर कायद्यांपेक्षा हा अधिनियम प्रभावी असणे.**

**११.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली तयार केलेल्या कोणत्याही नियमान्वये, जी सद्भावनेने केली असेल आणि करण्याचे योजले असेल अशा कोणत्याही गोष्टीसाठी, राज्य शासन किंवा शासनाचा कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कोणतीही कायदेविषयक कारवाई दाखल करता येणार नाही. **या अधि-नियमान्वये केलेल्या कारवाईस संरक्षण**

**१२.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी शासकीय राजपत्रातील नियम, अधिसूचनेद्वारे व पूर्वसिद्धीच्या शर्तीच्या अधीन राहून, नियम तयार करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण ३० दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये, म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील आणि असा निर्णय **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करतील तर तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा, यथास्थिती मुळीच अंमलात येणार नाही, तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**व्यावृत्ती** **१३.** या अधिनियमास काहीही अंर्तभूत असले तरीही, काढण्यात आलेले सर्व आदेश, परिपत्रक, ठराव, निर्देश, नियम, अधिसूचना, अध्यादेश, परिनियम, योजना किंवा केलेल्या नेमणुका आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभीच्या निकटपूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिनुसार किंवा अन्यथा, कोणत्याही व्यक्तीकडून किंवा प्राधिकरणाकडून निहित करण्यात आलेले किंवा अंमलात आणण्याजोगे सर्व अधिकार हे, ते या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसतील तेथवर, अशा रीतीने अंमलात असण्याचे किंवा निहित असण्याचे चालू राहील आणि या अधियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई याद्वारे ते निष्प्रभावित झाल्याशिवाय आणि निष्प्रभावित होईपर्यंत, या अधिनियमाच्या उपबंधान्वये अशा रीतीने अंमलात असण्याचे किंवा अशा रीतीने निहित असण्याचे चालू राहील आणि ते या अधिनियमाच्या उपबंधान्वये देण्यात आल्याचे, करण्यात आल्याचे किंवा निहित करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

❑❑❑

# ११. प्रशिक्षणाची परिणामकारकता

**शैक्षणिक गुणवत्तावाढीच्या परिणामांसाठी प्रशिक्षणाच्या स्वरूपामध्ये बदल करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : राप्रधो–४२१७/प्र. क्र. ३२/२०१७/प्रशिक्षण**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२

दिनांक : ८ जून, २०१७

**प्रस्तावना** :

राज्यात सन २०१० पासून शिक्षण हक्क अधिनियम, २००९ अंमलात आला आहे. त्यानुसार राज्यातील १००% मुले शिकण्याच्या दृष्टीने व १०व्या वर्गापर्यंत मुलींच्या गळतीचे प्रमाण ५% पेक्षा खाली आणण्याच्या हेतूने शासन पातळीवर विविध निर्णय घेण्यात आले आहेत. याकरिता दिनांक २२ जून, २०१५ पासून 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रम तर दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ पासून 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' (माध्यमिक स्तर) हे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदीप्रमाणे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विद्या प्राधिकरण तसेच जिल्हा शैक्षणिक व्यवसाय सातत्यपूर्ण विकास संस्था (DIECPD) पुर्नरचित करण्यात आले आहेत. या सर्व निर्णयांमुळे विभागातील प्रत्येक कृतीचा परिणाम मुलांच्या शिकण्यात होतो हे पाहण्याची आवश्यकता स्पष्ट झाली आहे.

पूर्वीपासून विभागांतर्गत घेण्यात येणारे प्रशिक्षण कार्यक्रम हे मुलांच्या शिकण्याची पातळी वाढविणे आणि विद्यार्थी नापास होण्याचे प्रमाण कमी करण्याच्या हेतूनेच करण्यात येत होते. परंतु प्रशिक्षणाची उद्‌दिष्टे स्पष्ट असावीत तसेच प्रशिक्षणाचे मूल्यमापन व प्रशिक्षणाचे साध्य या संदर्भात स्पष्टता आणणे गरजेचे होते. त्यानुसार विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचे उद्‌दिष्ट स्पष्ट असणे, त्यांचे मापन करता येणे, प्रशिक्षण झाल्यावर ठरावीक कालावधीत परिणाम मिळणे, पर्यवेक्षण व मूल्यमापनाच्या माध्यमातून परिणाम प्राप्त झाल्याचे पाहणे इत्यादीबाबत स्पष्टता आणण्यासाठी प्रशिक्षणाच्या स्वरूपामध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

शिक्षण विभागातील प्रत्येक प्रशिक्षणाचे नियोजन, अंमलबजावणी व मूल्यमापन करताना कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहील.

**१. प्रशिक्षणाची आवश्यकता स्पष्ट होणे** :

आंतरराष्ट्रीय दर्जाचे शैक्षणिक निकष, नॅशनल अचिव्हमेंट सर्वे (SLAS), स्टेट लेवल अचिव्हमेंट सर्वे (NAS) तसेच नामांकित स्वयंसेवी संस्था यांच्या द्‌वारे प्रकाशित होणारे अहवाल, क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या भेटी याद्‌वारे निश्चित होणाऱ्या गरजांमधून प्रशिक्षणाची आवश्यकता स्पष्ट होत असते. तसेच शाळा प्रगत करणे यासाठी सुद्‌धा प्रशिक्षणाची आवश्यकता स्पष्ट होत असते. तसेच शाळा प्रगत करणे यासाठी सुद्‌धा गरज भासू शकते. प्रशिक्षणाची आवश्यकता निश्चित झाल्यावरच प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात यावे.

**२. परिणामासाठी डिझाईन करणे** :

२.१ प्रशिक्षणाची आवश्यकता स्पष्ट झाल्यानंतर त्याचे उद्‌दिष्ट स्पष्ट करावे. उद्‌दिष्टे स्मार्ट (SMART - Specific Measurable, Authentic, Realistic, Time bound) स्वरूपाची असावीत.

२.२ वरीलप्रमाणे ठरविलेली उद्‌दिष्टे मुलांच्या विविध विषयातील संपादणुकीमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने संपादणुकीत वाढ, विशिष्ट संकल्पनेच्या संपादणुकीत वाढ, प्रगत शाळांच्या संख्येत किंवा टक्केवारीत वाढ, नापास होण्याच्या प्रमाणात घट इत्यादी मापनात्मक भाषेत ठरविण्यात यावे.

२.३ अधिकांश सेवांतर्गत प्रशिक्षण कमी कालावधीचे असतात. अशा प्रशिक्षणासाठी एकच विषयातील एकच संकल्पनेच्या संपादणुकीत वाढ असे ठरविण्यात यावे. जेणेकरून परिणामाची पडताळणी करताना मापन करण्यात कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये.

२.४ प्रत्येक प्रशिक्षणाचे परिणाम प्रशिक्षणानंतर किती कालावधीत मिळतील हे देखील स्पष्ट करण्यात यावे.

२.५ वरील कालावधी संपल्यानंतर एक महिन्याच्या आत उद्‌दिष्ट प्राप्त झाले किंवा नाही या हेतूने प्रशिक्षणाचे मूल्यमापन करण्यात यावे. मूल्यमापन हे मुलांच्या संपादणूक पातळीची स्थिती पाहण्याविषयी राहील, त्याशिवाय इतर कोणत्याही बाबीने प्रशिक्षणाचे मूल्यमापन होणार नाही.

२.६ मूल्यमापनातील उद्‌दिष्ट प्राप्त झाले असल्यास, प्रशिक्षण यशस्वी झाल्यास त्याच पद्‌धतीचे नियोजन व अंमलबजावणी पुढील उद्‌दिष्टांसाठी करावी. मात्र प्रशिक्षण परिणामकारक झाले नसल्यास त्याची कारणमीमांसा करून प्रशिक्षणात दुरुस्ती करावी व या दुरुस्तीस विद्या प्राधिकरणाच्या गाभा समितीची मान्यता घ्यावी.

## ३. प्रशिक्षणाच्या परिणामासाठी पर्यवेक्षण

३.१ प्रशिक्षणाचे परिणाम मुलांच्या शिकण्यात दिसण्याकरिता प्रभावी पर्यवेक्षण आवश्यक आहे. बऱ्याच वेळा शिक्षक किंवा कनिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाबाबत वरिष्ठांना प्रशिक्षणाच्या स्वरूपाविषयी कोणतीही माहिती नसते. यापुढे शिक्षकांना दिले जाणारे प्रत्येक प्रशिक्षण केंद्रप्रमुख व मुख्याध्यापकांना त्याच स्वरूपात देण्यात यावे. तसेच **शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व DIECPD चे प्राचार्यांना सुद्‌धा प्रत्येक प्रशिक्षण संक्षिप्त स्वरूपात देण्यात यावे.**

३.२ केंद्र प्रमुख व मुख्याध्यापकांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचे सुद्‌धा त्यांच्या वरिष्ठांना संक्षिप्त स्वरूपात प्रशिक्षण देण्यात यावे.

## ४. प्रशिक्षणांना मान्यता देण्याचा अधिकार

४.१ यापुढे घेण्यात येणारे सर्व प्रशिक्षण वरील प्रक्रियेनुसार अंमलात येईल. ही प्रक्रिया पाळली जाईल हे पाहण्याची जबाबदारी विद्या प्राधिकरणाची राहील.

४.२ सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय शिक्षा अभियान, प्राथमिक संचालनालय, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, राज्य मंडळ यांच्याद्‌वारे काही प्रशिक्षण घ्यावयाचे झाल्यास त्यास सुकाणू समितीची मान्यता घेण्यात यावी. सुकाणू समितीने मान्यता देण्यापूर्वी वरील प्रक्रिया पूर्ण होत असल्याची खात्री करावी.

४.३ यापुढे जिल्हा, तालुका, बीट व केंद्र स्तरावर विविध प्रशिक्षण विद्या प्राधिकरणाच्या मान्यतेने करता येईल. विद्या प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय कोणतेही प्रशिक्षण करण्यात येऊ नये.

४.४ विभिन्न पातळीवर उद्‌भवणाऱ्या गरजा भागविण्यासाठी प्रशिक्षण घेण्याच्या उद्‌देशाने हे दिशानिर्देश देण्यात येत आहेत. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मनात उमगलेल्या गरजांचा यात समावेश आहे. मात्र पुढील नियोजित प्रक्रिया खरच गरज भागवेल हे तपासण्याची जबाबदारी विद्या प्राधिकरणाची राहील. क्षेत्रीय स्तरावरून आलेला प्रस्ताव १५ दिवसांपेक्षा अधिक प्रलंबित राहणार नाही याची जबाबदारी संचालक, विद्या प्राधिकरणाची राहील.

प्रस्तावांवर सत्वर विचार होईल या हेतूने विद्या प्राधिकारण पातळीवर विषयनिहाय गाभा समित्या तयार करण्यात याव्यात.

४.५ अशासकीय स्वयंसेवी संस्था (NGO) मार्फत शाळांमध्ये प्रशिक्षण घ्यावयाचे असल्यास अशा प्रशिक्षण कार्यक्रमांना शासनाची मंजुरी घेणे बंधनकारक राहील.

**५. प्रशिक्षक (Trainers) तयार करण्याचे तत्त्व :**

ज्यांनी संबंधित उद्दिष्टे साध्य करण्याकरिता प्रत्यक्ष काम केले आहे. त्यांनाच प्रशिक्षणात प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी देण्यात यावी. एखाद्या उद्दिष्टासाठी आधी प्रत्यक्ष काम केलेली व्यक्ती उपलब्ध नसल्यास आधी प्रायोगिक तत्त्वावर प्रशिक्षण राबवून तशी व्यक्ती तयार करण्यात यावी. त्यानंतर अशाच व्यक्ती प्रशिक्षक म्हणून कार्य करतील.

**६.** प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांकरिता आवश्यक विषयाची प्रशिक्षणे सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान तसेच राज्य मंडळाकडे/विद्या प्राधिकरणाकडे प्रशिक्षणाकरिता उपलब्ध निधीतून करण्यात येतील. उच्च माध्यमिक शिक्षकांची प्रशिक्षणे राज्य मंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीतून करण्यात येतील.

**७.** प्रशिक्षणाच्या कालावधीत परीक्षा व Feedback घेण्यात यावा. Feedback साठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयत्न करावा.

**८.** ज्या विषयाचे प्रशिक्षण आयोजित केले आहे. त्या विषय शिक्षकांनाच सदर प्रशिक्षणासाठी शाळांनी पाठवावे. अन्य शिक्षकांना पाठविण्यात येऊ नये. प्रशिक्षणासाठी शिक्षकाची निवड जबाबदारीने करावी.

**९.** प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाअंती प्रमाणपत्र देण्यात यावे.

**१०.** प्रशिक्षणाचे स्वरूप ऑनलाईन आणि अथवा प्रत्यक्ष (Face to Face) अशा स्वरूपाचे असावे.

**११.** प्रतिवर्षी शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाच्या अनुषंगाने त्या संदर्भातील स्वतंत्र गुणांकन (क्रेडिट) व्यवस्था निर्माण करण्यात येईल व संगणक प्रणालीमध्ये ते नोंदविण्यात येतील. शिक्षकांनी प्राप्त केलेले प्रशिक्षण व गुणांकन (क्रेडिट) याबाबतच्या नोंदी शिक्षकांच्या गोपनीय अहवालामध्ये/सेवापुस्तिकेमध्ये घेण्यात येतील. क्रेडिट व्यवस्था प्रणाली विद्या प्राधिकरणाद्वारे शासनाच्या मान्यतेने विकसित करण्यात येईल.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१७०६०८१६१११७२४२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(नंद कुमार)**

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव

३) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव

४) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
५) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
६) मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८) मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) मा. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट राज्य, पुणे
११) सर्व महानगरपालिका आयुक्त
१२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
१४) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई
१५) अध्यक्ष/सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे
१८) संचालक, बालभारती, पुणे
१९) सर्व विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
२०) सर्व विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
२१) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
२२) सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था
२३) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद
२४) शिक्षण निरीक्षक, मुंबई (पश्चिम, दक्षिण, उत्तर)
२५) सर्व प्रशासन अधिकारी, महानगरपालिका
२६) सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका
२७) सर्व गटशिक्षणाधिकारी
२८) सर्व मुख्याध्यापक शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत
२९) निवड नस्ती, प्रशिक्षण.

❑❑❑

# १२. शाळा भेट - वर्ग भेट

**क्र.प्राशिसं/२०१७/शाळा भेट/संकीर्ण/५१६/२९६**
**प्राथमिक शिक्षण संचालनालय, महा. रा. पुणे–०१.**
**दिनांक १६/०१/२०१७.**

**प्रति,**

१) विभागीय शिक्षण उपसंचालक, विभाग सर्व

२) शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी, मनपा, सर्व

३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषदा, सर्व

४) प्रशासन अधिकारी, मनपा/नपा, सर्व

५) गटशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषदा, सर्व

**विषय :** **शाळाभेट म्हणजे वर्गभेट ही संकल्पना स्पष्ट करून प्रत्येक पर्यवेक्षीय यंत्रणेच्या मानसिकतेत रुजवण्याबाबत.**

**संदर्भ :** शासन निर्णय दिनांक २२ जून २०१५.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी या शैक्षणिक वर्षात ५० टक्के प्राथमिक, २० टक्के माध्यमिक व २५ टक्के उच्च प्राथमिक शाळा प्रगत करण्याबाबत (Key Result Area) हा महत्त्वपूर्ण लक्ष्यपूर्ती कार्यक्रम दिला आहे. ते साध्य करण्यासाठी ९ जानेवारी २०१७ रोजी जलद 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रम परिपत्रक शासनाकडून काढण्यात आले आहे. 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रम २०१५ शासन निर्णयात १३.२ मध्ये पर्यवेक्षीय यंत्रणेसाठी तपासणी, संनियंत्रण, पर्यवेक्षण आणि मार्गदर्शन या रूढ पारंपरिक हुकूमशाही पर्यवेक्षण पद्धतीऐवजी मदत, समुपदेशन, सुलभीकरण आणि मेंटरिंग या लोकशाही पद्धतीची शाळाभेट प्रणाली अस्तित्वात आणण्याचे निर्देश दिलेले आहेत.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण लक्ष्यपूर्ती कार्यक्रमाचे (KRA) लक्ष्य साध्य करण्यासाठी पर्यवेक्षीय अधिकारी शाळाभेट करतात, परंतु ती वैज्ञानिक पद्धतीने न केल्यास या शाळाभेट कार्यक्रमाचा काहीच परिणाम दिसत नाही कारण काही वेळा अजूनही पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांची पद्धती केवळ शाळेतील रेकॉर्ड पाहण्याची असते. पाहणीत आढळलेल्या त्रुटींवर पर्यवेक्षीय अधिकारी तासन्तास भाषण देत बसतात. यामुळे ज्या प्रयोजनासाठी ही शाळा भेट होती ते उद्दिष्ट दुर्लक्षित राहते. शाळा भेटीचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. शाळा व वर्ग प्राप्त करण्यासाठी दिशा देणे, शिक्षकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रगत होण्यामध्ये काही अडचणी असतील तर त्या दूर करणे, शिक्षकांना आनंद, सन्मान आणि आत्मविश्वास देणे. वर्ग प्रगत होण्यासाठी अडथळ्यांचा शोध घेऊन विद्यार्थी व शिक्षकांशी प्रत्यक्ष संवाद करणे आवश्यक असते. यासाठी शाळा भेट कशी असावी याबाबत खालील दिशादर्शक समुपदेशनात्मक निदेश देण्यात येत आहेत.

१) वर्गात जाण्यापूर्वी शिक्षकांना भेटून प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्याचा अध्ययन स्तर समजून घ्यावा. कागदपत्रांची तपासणी करू नये.

२) वर्गात गेल्यावर मुलं ज्या पातळीवर बसली आहेत त्याच पातळीवर आपण बसावे.

३) वर्गात कृती सुरू असल्यास त्यात सहभागी व्हावे. अन्यथा अनौपचारिक गप्पांमधून विद्यार्थ्यांशी संवाद साधावा.

४) मुलांना संबोध स्पष्टता आहे का? हे समजून घ्यावे व १०० टक्के मुलांसाठी ती कोणत्या स्तरापर्यंत आली आहे हे समजून घ्यावे.

५) जी मुले अपेक्षित अध्ययन स्तरापर्यंत आलेली नाहीत, त्यांच्या शिकण्यासाठी आपणास माहीत असलेली, आपल्या मते उत्कृष्ट पद्धत अवलंबून त्यातील काही मुले अपेक्षित पातळीपर्यंत पोहोचतील हे प्रात्यक्षिक करून पहावे. हे सर्व शिक्षकसुद्धा बघतील याची काळजी घ्यावी.

६) वर्गातून बाहेर पडताना शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे जे काही चांगले होते. त्याबाबतीत कौतुक करावे.

७) आपली भेट वर्गासाठी व शिक्षकांसाठी काही शिकण्याची संधी ठरावी.

८) शिक्षकांना काही सुचवायचे असल्यास वर्गाच्या बाहेर आल्यानंतर विद्यार्थ्यांना दिसणार नाही अशा ठिकाणी सांगावे. सूचना करताना मित्रत्वाची भावना बाळगावी.

वरील निदेशानुसार पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी शाळा भेटीचे आयोजन करावे. या समुपदेशक निर्देशाचे पालन करून परिणाम दिसेल अशी शाळा भेट करावी. परिणाम दिसणार नसेल तर शाळा भेट करून शिक्षकांच्या कार्यात अकारण ढवळा–ढवळ करू नये. वरील निर्देशांचे पालन करण्यासाठी अतिरिक्त काही शिकण्याची गरज असेल तर ती शिकावी किंवा प्रशिक्षणाची मागणी करावी. या निर्देशांमध्ये काही सुधारणा सुचवावयाच्या असल्यास तेही आम्हांस सुचवावे.

हे निर्देश प्रत्येक पर्यवेक्षीय यंत्रणेला केव्हाही विसरणार नाही यासाठी आपापल्या पॉकेट डायरीत नोंद ठेवावी सतत आठवणीसाठी आपल्या कार्यालयातसुद्धा फलक लावता येईल. शाळेत मुख्याध्यापक यांना सुद्धा याचप्रमाणे वर्गभेट करावयाची असल्याने मुख्याध्यापकाने सुद्धा याचप्रमाणे कार्यवाही करावी.

**(गोविंद नांदेडे)**
शिक्षण संचालक (प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे–१.

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर**

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

२) मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्त कार्यालय, बालभारती, पुणे.

३) मा. आयुक्त, मनपा, सर्व

४) शिक्षण संचालक, सर्व

५) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदा सर्व

❑❑❑

# १३. पीएम श्री. योजना

**पीएम श्री. (PM Schools for Rising India)**
**या केंद्र पुरस्कृत योजनेची राज्यामध्ये अंमलबजावणी**
**करण्यास मान्यता प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०४/एस.डी.-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार) मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०२ मार्च, २०२३

**वाचा :** **१) सहसचिव (एसएस-II), शिक्षा मंत्रालय, स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग, भारत सरकार यांचे पत्र क्र. डी.ओ.नं.२१-१/२०२१-आयएस.८/आयएस-१९, दि. २८ सप्टेंबर, २०२२.**

**२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क.१०४/एसडी-६, दि. २७/०९/२०२२.**

**३) शिक्षा मंत्रालय, स्कूल शिक्षा और साक्षरता विभाग, भारत सरकार व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,महाराष्ट्र शासन यांचे दरम्यान दि. ०६/१०/२०२२ रोजी झालेला सामंजस्य करार.**

**प्रस्तावना :**

''पीएम श्री'' (PM Schools for Rising India) या योजनेअंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील सर्व घटकांचा समावेश करण्याच्या उद्देशाने देशातील सुमारे १५,००० हून अधिक शाळा उत्कृष्ट भौतिक/पायाभूत सुविधांसह, योग्य संसाधनासह, आनंददायी व उत्साहवर्धक शैक्षणिकदृष्ट्या अनुकूल शालेय वातावरणात उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वसमावेशक उत्कृष्ट शाळा म्हणून विकसित केल्या जाणार आहेत. तसेच, पुढील टप्प्यात २,५०,००० शाळा उत्कृष्ट केल्या जाणार असून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मधील विविध तरतुदींची अंमलबजावणी या शाळांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या शाळांचे उद्दिष्ट फक्त आकलनात्मक विकास (Cognitive development) करण्यापुरते मर्यादित नसून, विद्यार्थ्यांचा एकविसाव्या शतकातील प्रमुख कौशल्यांवर आधारित सर्वांगीण विकास करणे व त्यांना सर्वगुण संपन्न व्यक्तिमत्त्व घडवणे हे देखील आहे. प्रत्येक इयत्तेत प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

**शासन निर्णय :**

**२. ''पीएम श्री'' शाळा खालील उद्दिष्टांची पूर्तता करतील :**

**अ)** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार एक समान, सर्वसमावेशक, समाजोपयोगी आणि समाजाप्रति योगदान देणारे नागरिक घडविणे.

**आ)** अनुभवात्मक, समग्र, एकात्मिक, खेळाधारित (विशेषत: पायाभूत वर्षातील शिक्षण), चिकित्सक, शोध आधारित, विद्यार्थीकेंद्रित, चर्चा आधारित, लवचीक आणि आनंददायक शिक्षण पद्धतीचा अवलंब करून, विद्यार्थ्यांना अनुभवात्मक पद्धतीने आनंददायी शिक्षण देणे.

**इ)** प्रत्येक इयत्तेत विद्यार्थ्याच्या शिकण्याच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करून त्याच्या तार्किक कौशल्यांचे मूल्यांकन करणे, विद्यार्थ्यांची वैचारिक समज आणि वास्तविक जीवनातील परिस्थितींमध्ये ज्ञानाच्या वापरावर आणि योग्यतेवर आधारित मूल्यांकन करणे, व्यावसायिक शिक्षणासाठी कौशल्य आधारित अभियोग्यता चाचणी घेणे.

**ई)** समाज आणि माजी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेऊन त्यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, अतिरिक्त पूरक मार्गदर्शन व शैक्षणिक मदत करणे.

**उ)** सर्व मुलांना शाळेत दाखल करून त्यांची नियमित उपस्थिती टिकवून ठेवून त्यांच्या शिकण्याच्या प्रगतीचे मूल्यांकन करणे. काही कारणास्तव त्यांची गळती झाली असल्यास त्यांना पुन्हा प्रवेश देऊन, अशी मुले शिक्षणात मागे पडली असल्यास त्यांना अतिरिक्त पूरक मार्गदर्शन देणे.

**ऊ)** शिक्षणात अग्रेसर म्हणून कामगिरी पार पाडून कालांतराने शेजारच्या शाळांना आपले अनुकरण करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

**ऋ)** शाळा, 'औद्योगिक क्रांती ४.०' (Industrial Revolution ४.०) नुसार उद्योन्मुख अर्थव्यवस्थेच्या (emerging economy) आवश्यकतांनुसार पूरक करणे.

**३. ''पीएम श्री'' शाळा खालील प्रमुख सहा आधारस्तंभाच्या आधारे विकसित करण्यात येतील**

**१. अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र व मूल्यमापन :**

'पीएम श्री' शाळांमधील अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र आणि मूल्यमापनाचा उद्देश विद्यार्थ्यांना संख्या आणि उद्देशांची भावना यासह स्मरणशक्तीवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी स्वत:चे जीवन घडविण्यासह इतरांच्या जीवनात योगदान देण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमतांनी सुसज्ज करणे हा आहे. सदर शाळांमध्ये शिकविणे आणि शिकणे अधिक परस्परसंवादीपणे होईल आणि वर्गातील सत्रे अधिक मनोरंजक, सर्जनशील, सहयोगी आणि अन्वेषणात्मक असतील याची खात्री करण्यात येईल.

**२. प्रवेश आणि पायाभूत सुविधा :**

'पीएम श्री' शाळा प्रत्येक विद्यार्थ्याला एक जबाबदार व्यक्ती म्हणून विकसित होण्यासाठी, जास्तीत जास्त ज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आवश्यक शिकण्याचे वातावरण प्रदान करतील. सर्व लिंगांच्या तसेच दिव्यांग मुलांसह शिक्षक आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित, सर्वसमावेशक आणि परिणामकारक शैक्षणिक वातावरण प्रदान होईल व ते शिकवण्यासाठी आणि शिकण्यासाठी आरामदायक आणि प्रेरित असल्याची खात्री करतील.

या अंतर्गत अस्तित्वात असलेल्या शाळांचा विस्तार करण्यात येईल, तर अशा शाळा अस्तित्वात नसलेल्या भागात अतिरिक्त दर्जेदार शाळा बांधून विशेषत: मुलींसाठी सुरक्षित आणि व्यावहारिक वाहतूक व्यवस्थेसह, वसतिगृह जेणेकरून सर्व मुलांना अशा योग्य स्तराच्या दर्जेदार शाळांमध्ये जाण्याची संधी मिळेल.

**३. मानव संसाधन आणि शालेय नेतृत्व :**

शिक्षण क्षेत्रात झपाट्याने होत असलेली प्रगती पाहता, अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र तसेच मूल्यमापन इत्यादींच्या नवीनतम पद्धतींनुसार शिक्षकांना प्रशिक्षित करणे महत्त्वाचे आहे. शिक्षक हे शैक्षणिक परिसंस्थेतील महत्त्वाचे साहाय्यक देखील आहेत. शिक्षण व्यवस्थेतील गतिमानतेसाठी शिक्षकांनी आजीवन शिकत राहून प्रशिक्षण आणि

उच्च कौशल्याच्या संधीचा लाभ घेणे आवश्यक आहे. शालेय नेतृत्व विकास हा शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे.

४. **सर्व समावेशक पद्धती आणि लिंग समानता :**

शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या सुरक्षित वातावरणाचा विद्यार्थ्यांच्या भावनिक कार्यक्षेत्रावर प्रभाव टाकणाऱ्या प्रेरणा, दृष्टिकोन आणि धारणा इ. मूल्यावर परिणाम होत असल्याने असे वातावरण असलेल्या ''पीएम श्री'' शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे आवश्यक आहे. त्यानुसार ''पीएम श्री'' शाळा सर्वसमावेशक पद्धती आणि लिंग समानतेमध्ये उत्कृष्टता प्राप्त करण्याचे सुनिश्चित करतील.

५. **व्यवस्थापन, देखरेख आणि प्रशासन :**

''पीएम श्री'' शाळांनी शालेय परिवर्तनाचा परिणाम तपासण्यासाठी एक मजबूत व्यवस्थापन, देखरेख आणि प्रशासन प्रणाली सुनिश्चित करणे आवश्यक आहे. यामध्ये 'पीएम श्री' शाळांमध्ये विद्यमान योजना, नियोजन यंत्रणा, संसाधन व्यवस्थापन आणि इतर व्यवस्थापकीय पैलूंसह निरीक्षण आणि मूल्यमापन यंत्रणा यांचा समावेश आहे. त्यानुसार ''पीएम श्री'' शाळा पुरेशी व संबंधित व्यवस्थापन, देखरेख आणि प्रशासन यंत्रणा कार्यरत असल्याची खात्री करतील.

६. **लाभार्थी समाधान :**

शिक्षण प्रणालीमध्ये असलेल्या मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि समुदाय इत्यादी विविध भागधारकांच्या भूमिका आणि परिणामकारकता विचारात घेऊन 'पीएम श्री' शाळांमधील गुणवत्तेचे मूल्यमापन करण्यात येईल. वरील नमूद भागधारकांनी हाती घेतलेल्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांचे एकत्रीकरण शाळेच्या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावेल.

'पीएम श्री' (PM Schools for Rising India) या योजनेची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यास मा. मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, या संदर्भातील औपचारिक आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

१. ''पीएम श्री'' या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी राज्याने केंद्र शासनासोबत सामंजस्य करार केला असून, त्यानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० राज्यात संपूर्णपणे लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यात ''पीएम श्री'' ही केंद्रपुरस्कृत योजना : राज्य निधी हिस्सा अनुक्रमे ६०:४० प्रमाणे सन २०२२-२३ पासून राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. त्यानुसार सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र व राज्य हिश्याकरिता नवीन लेखाशीर्ष उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. पहिल्या टप्प्यात राज्यातील प्रत्येक गटातून कमाल २ शाळा याप्रमाणे ८४६ शाळा विकसित करावयाच्या असून, पहिल्या टप्प्यासाठी प्रति शाळा रु. १.८८ कोटी तरतूद विचारात घेता, केंद्र हिस्सा ६० टक्के प्रमाणे रु. १.१३ कोटीनुसार ८४६ शाळांसाठी ५ वर्षांकरिता केंद्र हिस्सा रु. ९५५.९८ कोटी राहणार आहे. तर राज्याचा ४० टक्के हिस्सा प्रमाणे रु. ७५ लाख प्रती शाळानुसार ५ वर्षांकरिता अंदाजे रु. १९१.२० कोटी व राज्य हिस्सा अंदाजे रु. १२६.९ कोटी तरतूद ५ वर्षांकरिता अर्थसंकल्पित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. योजनेचे लेखाशीर्ष मंजूर होऊन निधी अर्थसंकल्पित होण्यासाठी कालावधी लागणार असल्याने सन २०२२-२०२३ या वर्षातील ''पीएम श्री'' योजनेचा खर्च विभागाच्या समग्र शिक्षा योजनेच्या अर्थसंकल्पित तरतूदीतून करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

६. ''पीएम श्री'' या योजनेअंतर्गत दुसऱ्या टप्प्यात ४०८ गट, २८ महानगरपालिका व ३८३ नगरपालिका/नगरपरिषद यामधून ''पीएम श्री'' शाळांची निवड केंद्र शासनाकडून मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्यानंतर करण्यात येईल. सदर शाळांसाठी पुढील कार्यवाही शालेय शिक्षण विभाग स्तरावर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. ''पीएम श्री'' या योजनेची अंमलबजावणी समग्र शिक्षा यंत्रणेमार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**२. योजनेची अंमलबजावणी :**

'पीएम श्री' या योजनेची अंमलबजावणी राज्य स्तरावर समग्र शिक्षा या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या राज्य अमंलबजावणी संस्थेमार्फत (State Implementation Society) अर्थात विभागाद्वारे महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई या स्वायत्त संस्थेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. जिल्हा स्तरावर या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि महानगरपालिका स्तरावर संबंधित आयुक्त महानगरपालिका यांची राहणार आहे. याची रचना पुढीलप्रमाणे असेल :

**राज्यस्तरीय प्रशासकीय संरचना :**

| | |
|---|---|
| मा. मंत्री (शा. शि.) | अध्यक्ष |
| अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव | सदस्य |
| आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय | सदस्य |
| सह सचिव (विद्यार्थी विकास) | सदस्य सचिव तथा नियंत्रण अधिकारी |

**राज्य अंमलबजावणी समिती (State Implementation Society) (SIS) :**

| | |
|---|---|
| राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई | अध्यक्ष |
| संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | सदस्य |
| संचालक, राज्य शैक्षणिक व्यवस्थापन आणि प्रशिक्षण संस्था | सदस्य |
| चेअरमन, केंद्रीय विद्यालय संघटन | सदस्य |
| चेअरमन, नवोदय विद्यालय समिती | सदस्य |
| तांत्रिक साहाय्य गट, राज्य अंमलबजावणी समिती | महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, परिषद, मुंबई |
| सहसंचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, परिषद, मुंबई | सदस्य सचिव |

**जिल्हा स्तरीय समतिची रचना (State Implementation Society) (SIS) :**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (योजना) | सदस्य |
| ४) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) | सदस्य |
| ५) | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती सर्व | सदस्य |
| ६) | स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी | सदस्य |
| ७) | जिल्ह्यातील केंद्रीय/नवोदय विद्यालयाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | सदस्य सचिव |

**महानगरपालिका स्तरीय समितीची रचना :**

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | आयुक्त, सर्व महानगरपालिका | अध्यक्ष |
| २) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) (संबंधित जिल्हा) | सदस्य |
| ३) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) | सदस्य |
| ४) | स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | जिल्ह्यातील केंद्रीय/नवोदय विद्यालयाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६) | शिक्षणाधिकारी/प्रशासकीय अधिकारी (महानगरपालिका) | सदस्य सचिव |

या योजनेअंतर्गत निवड होणाऱ्या शाळांच्या नावासमोर ''पीएम श्री'' शाळा असे नामाभिधान राहणार असून, विद्या समीक्षा केंद्राद्वारे सदर शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे (Learning Outcomes) मूल्यांकन केले जाईल.

३. सदर शासन निर्णय नियोजन विभाग, अनौ.सं.क्र. ३५३/१४७१/२०२२, दि. ३०/११/२०२२ तसेच वित्त विभाग, अनौ.सं.क्र. १२०२/२०२२/व्यय-५, दि. ०५/१२/२०२२ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०३०२१७१०५०३४२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(इ.मु.काझी)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन,

**प्रत :**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
८) मा. संसद सदस्य/विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य.
९) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय साहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे वरिष्ठ स्वीय साहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई.
१५) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१७) संचालक, राज्य शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.
१८) संचालक, केंद्रीय विद्यालय संघटन, दिल्ली.
१९) संचालक, नवोदय विद्यालय समिती, दिल्ली.
२०) सह सचिव/उप सचिव (वि.वि.), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
२२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना) (सर्व)
२३) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२४) प्रशासकीय अधिकारी (शिक्षण), महानगरपालिका (सर्व)
२५) केंद्रीय/नवोदय विद्यालयांचे जिल्हा प्रतिनिधी (सर्व)
२६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२७) महालेखापाल (लेखा परीक्षा) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
२८) सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
२९) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
३०) अवर सचिव/कक्ष अधिकारी (व्यय-५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३१) अवर सचिव/कक्ष अधिकारी (१४७१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३२) अवर सचिव (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३३) निवड नस्ती, एसडी-६.

❑❑❑

# १४. महाराष्ट्रातील वाचन चळवळ

**राज्यातील सर्व शाळांमध्ये 'महाराष्ट्रातील वाचन चळवळ' हा उपक्रम राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.३६०/एसडी-४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई, ४०००३२
दिनांक : २२ नोव्हेंबर, २०२३.

संदर्भ : **महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र. मप्राशिप/राशी ग्रंथालय / २०२३-२४/२८५९, दिनांक १८/१०/२०२३**

**प्रस्तावना :**

व्यक्ती उन्नतीला, समाज विकासाला, राष्ट्र उत्कर्षाला वाचन आवश्यक आहे. वाचन हे एक महत्त्वाचे मूलभूत कौशल्य आहे. वाचन संज्ञानात्मक विकासाला चालना देते. पुढील आयुष्याच्या शैक्षणिक यशाचा अंदाज लावते. बोलली जाणारी भाषा मुले नैसर्गिकरित्या शिकतात. पण वाचन जाणीवपूर्वक शिकले पाहिजे. मुले सामान्यत: इयत्ता २ री पर्यंत वाचायला शिकतात, परंतु National Achievement Survey (NAS) - २०२१ राज्य अहवाल सूचित करतो की, इयत्ता ३ री मधील ३०% पेक्षा जास्त मुले राज्यात लहान मजकूर वाचू शकत नाहीत. इयत्ता ५ वी पर्यंत ४१% मुले त्यांच्या ग्रेड-स्तरासाठी योग्य मजकूर वाचू शकत नाहीत आणि ८ वी पर्यंत ४३% पर्यंत वाचतात. तथापि, लहानपणापासूनच मुलांना कथा पुस्तके (विशेषत: त्यांच्या मातृभाषेत) वाचनाच्या अनेक संधी उपलब्ध करून देऊन हे चित्र बदलू शकते. २०२० पासून, राज्य शासन ''गोष्टींचा शनिवार'' या वाचन मोहिमेद्वारे आणि अलीकडेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उर्दू वाचन कार्यक्रमाद्वारे प्राथमिक शाळेतील मुलांमध्ये वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी युनिसेफसोबत काम करत आहे. आनंददायी वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन, युनिसेफ व रिड इंडिया यांच्या संयुक्त भागीदारीत **''महाराष्ट्रातील वाचन चळवळ''** हा उपक्रम राज्यातील सर्व शाळांमध्ये राबवण्याकरिता महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडून वरील संदर्भीय पत्रान्वये शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावास अनुसरून राज्यातील सर्व शाळांमध्ये **''महाराष्ट्रातील वाचन चळवळ''** हा उपक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील सर्व शाळांमध्ये **''महाराष्ट्रातील वाचन चळवळ''** हा उपक्रम राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर वाचन चळवळ उपक्रमाचा उद्देश, सहभागी घटक व अंमलबजावणी करणारी यंत्रणा, उपक्रमाची उद्दिष्टे, सदर उपक्रमाची रूपरेषा, सदर उपक्रमांतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम आणि आर्थिक तरतूद खालीलप्रमाणे राहील :

१. **वाचन चळवळ उद्देश :**

सन २०२६ पर्यंत महाराष्ट्रातील इयत्ता ३ री पर्यंतचे प्रत्येक मूल समजपूर्वक ओघवते वाचन करू लागेल, इयत्ता ८ वी मधील प्रत्येक मूल ''शिकण्यासाठी वाचू शकेल'' असे सुनिश्चित करणारी आनंददायी वाचनाची लोकचळवळ निर्माण करण्याचा उद्देश आहे.

**२. वाचन चळवळ राबविणारे सहभागी घटक :**

१. शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य     २. UNICEF     ३. रीड इंडिया     ४. प्रथम बुक्स

**वरील संस्थांच्या मदतीने सदर उपक्रमाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांची राहील.**

**३. चळवळीची उद्दिष्टे :**

१. वाचनाचे महत्त्व सांगणे आणि इयत्ता ३ री पर्यंतच्या प्रत्येक मुलाला वाचन कौशल्य प्राप्त करून देणे व वाचायला शिकविणे.

२. मुलांना वाचनाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी लोकसहभागातून कार्यक्रमाला प्रसिद्धी देऊन एक लोक चळवळ उभी करणे.

३. वाचनाची आवड मुलांमध्ये रुजविण्यासोबतच वयोगटानुसार मुलांना मराठी भाषेतील दर्जेदार साहित्य उपलब्ध करून देणे व त्याद्वारे मराठी भाषेचा नवीन वाचक वर्ग तयार करण्यास मदत करणे.

४. वाचनाद्वारे मुलांवर चांगले संस्कार घडविणे.

५. कथा, कविता, कादंबरी, नाटके ज्यातून रसग्रहण दृष्टी प्राप्त होते. यातून मुलांमध्ये रसास्वाद घेण्याची वृत्ती निर्माण करणे.

६. मुलांमध्ये नैतिक मूल्यांची रुजवण करणे.

**४. उपक्रमाची रूपरेषा :**

**अ) राज्यस्तरीय वाचन चळवळीचा शुभारंभ :** मा. मुख्यमंत्री, मा. उप. मुख्यमंत्री तसेच मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे हस्ते महाराष्ट्रातील वाचन चळवळीचा अधिकृत शुभारंभ होईल. सदर चळवळीच्या शुभारंभाचा दिनांक व ठिकाण राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई हे शासन मान्यतेने निश्चित करतील. शुभारंभाच्या कार्यक्रमात निवडक मुलांचे कथाकथन आणि कथावाचन, वाचन चळवळीची ओळख करून देणारा लघु चित्रपट व मान्यवरांचे मार्गदर्शन इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल.

**ब) जिल्हास्तरीय वाचन चळवळीचा शुभारंभ :** राज्यस्तरीय वाचन चळवळीच्या शुभारंभानंतर शिक्षणाधिकारी, (प्राथमिक) हे राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या मान्यतेने दिनांक ठरवून संबंधित जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांचे हस्ते जिल्ह्यात वाचन चळवळीचा शुभारंभ करतील. या शुभारंभामध्ये प्रत्येक शाळा नजिकच्या शासकीय ग्रंथालयास जोडण्याच्या उपक्रमाची प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येईल. या संदर्भातील सविस्तर सूचना आयुक्त (शिक्षण) यांचे पत्र क्र. आशिका/२०२३/विद्यार्थी वाचन साहित्य/ना.उ.१०६/७१, दिनांक ३ जानेवारी, २०२३ अन्वये सर्व उप संचालक (शिक्षण) व शिक्षणाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

**क) वाचन संस्कृतीचा महायज्ञ :** या कार्यक्रमाद्वारे वाचन चळवळीला वाचन संस्कृतीचा महायज्ञ असे रूप दिले जाईल. यामध्ये प्रत्येक आठवड्यात एक विषय थीम निश्चित करून त्यावर आधारित पुस्तकांचे शाळांमध्ये वाचन करणे, वक्तृत्व स्पर्धा, लेखन स्पर्धा इ. चे आयोजन करणे. मुलांना यासंदर्भात १ ते २ मिनिटांचे व्हिडिओ करून ते सुयोग्य साईटवर अपलोड करण्यास प्रोत्साहित करणे, त्याबाबतची स्पर्धा व पारितोषिके (पुस्तक स्वरूपात) प्रदान करणे.

**ड) शाळांचा सहभाग :** राज्यातील सर्व शासनमान्य व खाजगी शाळांचा या उपक्रमांमध्ये सहभाग असेल. (खाजगी शाळांना पुस्तके अनुज्ञेय होणार नाहीत) वर्षभरात ठरावीक तारखा निश्चित करून त्या तारखांना प्रत्येक शाळेत वाचनाचे खास वर्ग / कार्यक्रम आयोजित केले जातील. यामध्ये विद्यार्थी पुस्तकांची देवाणघेवाण करतील.

**इ) ऑनलाईन प्लॅटफॉर्म (Online Platform) नियुक्त करणे :** युनिसेफ/रीड इंडिया यांच्या सहकार्याने ऑनलाईन प्लॅटफॉर्म विकसित करून त्यावर Video, Audio, Short Essay इ. स्वरूपात विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद मिळविणे जेणे करून जास्तीत जास्त मुलांना या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळू शकेल.

**ई) ब्रँड ॲम्बेसेडर (Brand Ambessador) नियुक्त करणे :** या उपक्रमास सर्वसामान्य लोकांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टिकोनातून समाजाच्या सर्व क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना राज्यस्तरीय व क्षेत्रीय स्तरावर Brand Ambessador म्हणून राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई हे त्यांच्या स्तरावर नियुक्त करतील.

**उ) मीडिया प्लॅटफॉर्मचा सहभाग :** बहुविध मीडिया प्लॅटफॉर्म आणि विभागांद्वारे जनजागृती निर्माण करण्यासाठी समाजात वाचनाच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि मुलांना प्रिंट व पुस्तकांच्या संपर्कात आणण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (DGIPR) च्या मदतीने मीडियाचा वापर केला जाईल. याबाबत प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सामुदायिक रेडिओ स्टेशन, एफएम रेडिओ पॅनेल, प्रिंट/डिजिटल मीडिया आणि टीव्ही, रेल्वे स्थानके आणि इतर सार्वजनिक जागांवर पोस्टर्स इत्यांदींचा वापर करून मोहिमेचा प्रचार व प्रसार करण्यात येईल.

**ऊ) लोकांच्या प्रयत्नांना प्रसिद्धी :** समाजाला पूर्णपणे गुंतवून ठेवण्यासाठी, मुलांना चांगल्या दर्जाची पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी सृजनशील कल्पनांना चालना देणाऱ्या स्पर्धा आयोजित केल्या जातील. लोकांच्या प्रयत्नांना प्रसिद्धी दिली जाईल, ज्या ग्रामपंचायती आणि स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या गावातील/शहरातील सर्व मुले इयत्ता ३ री पर्यंत वाचू शकतात असे घोषित करतील व सदर विद्यार्थ्यांना प्रसिद्धी दिली जाईल. तसेच स्पर्धेचे निरोगी वातावरण तयार करून पुरस्कृत केले जाईल. राज्य आणि जिल्हास्तरीय पुरस्कार देण्यात येतील आणि त्यासाठी स्थानिक नेत्यांना प्रोत्साहन आणि बक्षीस देण्यात येईल.

**५. या उपक्रमांतर्गत शालेय स्तरावर खालील उपक्रम राबविण्यात येतील :**

वाचनाला चालना देण्यासाठी आणि मुलांना वाचनाची सवय लावण्यासाठी वाचनाबाबत शाळांसाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, परिषद, मुंबई यांच्या स्तरावर मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात येतील. या उपक्रमांतर्गत शालेय स्तरावर खालील उपक्रम राबविण्यात येतील :

**अ) साप्ताहिक दोन वाचन तासिका :** शिक्षण विभाग, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, प्रत्येक शाळेच्या वेळापत्रकात आठवड्यात २ वाचन तासिका समाविष्ट करण्यात येतील. यापैकी, गोष्टींचा शनिवार उपक्रमाचा एक भाग म्हणून शनिवारी एक तासिका नियोजित केली जाईल आणि दुसरी तासिका SCERT/MPSP द्वारे प्रदान केलेल्या श्रेणीबद्ध गायक/पुस्तकांच्या माध्यमातून भाषेच्या विकासास चालना देण्यात येईल.

**ब) गोष्टींचा शनिवार :** गोष्टींचा शनिवार या उपक्रमांतर्गत सर्व शाळांमध्ये दर शनिवारी ई–पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. ही ई–पुस्तके राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे द्वारे सर्व शालेय भाषांमध्ये उपलब्ध करून दिली जातील आणि त्यात पुस्तकांसोबत प्रोत्साहन देणारे उपक्रम समाविष्ट केले जातील.

**क) आनंदाचा तास :** ड्रॉप एव्हरीथिंग अँड रीड (DEAR) यात विद्यार्थी आणि शिक्षक दोघांसाठी वर्गाच्या वेळापत्रकात नियमितपणे बाजूला ठेवलेल्या वेळेचा उपयोग केला जातो. भारतातील काही खाजगी शाळांसह अनेक देशांमध्ये याचा सराव केला जातो. या उपक्रमांतर्गत, शाळेच्या वेळापत्रकात किंवा शाळा सुरू होण्यापूर्वी १५-२० मिनिटे शिक्षक आणि मुलांसाठी कथा पुस्तके वाचण्यासाठी आनंदाचा तास वेळा पत्रकात समाविष्ट केला जाईल. त्यानंतर मुलांना कथेचा सारांश देण्यास, त्यांचे आवडते पात्र चित्रित करण्यास किंवा इतर अशा मजेदार कृती करण्यास सांगितले जाईल.

**ड) उपलब्ध ॲप्स आणि डिजिटल संसाधनांच्या वापरास प्रोत्साहन देणे :**

शाळेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये इतर डिजिटल संसाधनांचा समावेश असेल, जसे की प्रथम बुक्स स्टोरीव्हीवर पोर्टल आणि गुगल बोलो ॲप, मुलांना विविध भाषांमधील विविध बालसाहित्य सहज उपलब्ध करून देता येईल. त्याचप्रमाणे 'समग्र शिक्षण' अंतर्गत विविध शाळांना देण्यात आलेले ICT Lab, Tablet, TV sets इत्यादीच्या माध्यमातून ई-साहित्य उपलब्ध करून दिले जाईल.

**इ) रीड इंडिया सेलिब्रेशन उपक्रम :** या उपकमांतर्गत, रीड इंडिया सेलिब्रेशनच्या आयोजकांच्या भागीदारीत शाळांना रीड इंडिया सेलिब्रेशन (RIC) उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. रीड इंडिया सेलिब्रेशनचा उद्देश मुलांना स्वतंत्रपणे विचार करण्यास आणि कार्य करण्यास सक्षम होण्यासाठी अवांतर वाचनाची शैक्षणिक पुस्तके वाचण्यास प्रोत्साहित करणे आहे. या उपक्रमांतर्गत, शाळेतील त्यांच्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी स्वेच्छेने साईन-अप करण्यास सांगितले जाईल, जेथे त्यांना रीड इंडियाच्या या उपक्रमासाठी स्वतंत्र पोर्टलवर नोंदणी करावी लागेल. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांच्या मुख्य संदेशांचा सारांश देणारा २ मिनिटांचा व्हिडिओ देखील अपेक्षित आहे. प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येक आठवड्यात प्राप्त होणाऱ्या व्हिडिओ (Video) मधून सुयोग्य व्हिडिओची निवड करून अशा निवडक व्हिडिओंना पारितोषिके प्रदान केली जातील.

**ई) ग्रंथोत्सव व पुस्तकांचे प्रदर्शन :**

शिक्षणाधिकारी हे संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून जिल्हा स्तरावर ग्रंथोत्सवाचे आयोजन करतील. तसेच जिल्हा स्तरावर पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करतील. सदर पुस्तकांच्या प्रदर्शनास शाळा भेट घेतील याची दक्षता शिक्षणाधिकारी घेतील.

**उ)** या उपकमाकरिता समग्र शिक्षा अंतर्गत Library Grant, Community Mobilization& MMMER मधून सर्व शासकीय शाळेतील विद्यार्थ्यांना वयोगटानुसार पुस्तके संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या मान्यतेने उपलब्ध करून देण्यात येतील. याव्यतिरिक्त दहा प्रवर्गातील दहा पुस्तकांची यादी संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे प्रसिद्ध करतील. तसेच विद्यार्थी व शिक्षक हे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना पुस्तकांची शिफारस करतील व सदर शिफारशी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या स्तरावर पुस्तकांची निवड करताना विचारात घेण्यात येतील.

**६. आर्थिक तरतूद :**

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या दिनांक ०७/०६/२०२३ रोजीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीतील ठराव क्रमांक १०८५ नुसार 'महाराष्ट्रातील वाचन चळवळ' या उपक्रमाकरिता येणाऱ्या खर्चाबाबत आर्थिक तरतूद मंजूर केली आहे. सदर मंजूर तरतूदीतून या उपक्रमांचा खर्च भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३११२२१६१२४२८९२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**इ.मु.काझी)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र, मुंबई.
६) मा. सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र, मुंबई.
७) मा. मंत्री (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई.
९) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय साहाय्यक.
१०) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
१२) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, मुंबई.
१३) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) निवड नस्ती.

❑❑❑

# १५. विद्या समीक्षा केंद्र (VSK) रचना व कार्यपद्धती

**राज्यात विद्या समीक्षा केंद्र कार्यान्वित करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : समग्र २०२४/प्र.क्र.३३/एसडी-१,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई, ४०००३२
दिनांक : १२ मार्च, २०२४

**वाचा** : १) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. पीआरई/२०१०/(१३६/१०) प्राशि-५,दि.२०.०८.२०१०.

३) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११.

४) केंद्र शासनाचे पत्र D.O.No.२०-२०/२०२२-IS.१, दि.३०.०६.२०२२

५) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०

६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.शि.८४/एस.डी.-६, दि.२८.०८.२०२०.

**प्रस्तावना** :

'समग्र शिक्षा', स्टार्स प्रकल्प, पीएम श्री., प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण अशा केंद्रपुरस्कृत योजनांसह राज्य शासनाद्वारा विभागांतर्गत विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते. या योजनांचा लाभ सर्व संबधित घटकांना देण्यात येतो. सदर उपक्रमांचा परिणाम अंतिमतः विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत प्रतिबिंबित होणे गरजेचे असते. अशा परिणामांचे मापन परफॉरमन्स ग्रेडिंग इंडेक्स (PGI), राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS), राज्य स्तरावरील संपादणूक सर्वेक्षण (SLAS), नियतकालिक चाचण्या यातून केले जाते. सदरील माहिती संकलन व विश्लेषण करण्यास यंत्रणेतील सर्व घटकांचा श्रम व वेळ खर्च होतो.

विद्यार्थी आपली संपादणूक पातळी वाढविण्यासाठी, शिक्षक आपला व्यावसायिक विकास करण्यासाठी व प्रशासन पर्यवेक्षणात सुधारणा करण्यासाठी विविध अध्ययन सामग्रींचा, प्रशिक्षणांचा व डिजिटल साधनांचा नियमित उपयोग करीत असतात. तथापि, यातील परिणाम देणारे घटक कोणते याचे विश्लेषण माहिती अभावी करता येत नाही.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) व मशीन लर्निंगच्या मदतीने माहिती संकलन व विश्लेषण प्रक्रिया अधिक वेगवान व सुलभ व्हावी. प्राप्त माहिती विश्लेषणाच्या आधारे राज्यातील शाळा, केंद्र, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावरील शैक्षणिक स्वास्थ्याचे अचूक निदान करता यावे, प्रत्येक स्तरावरील गरजांची निश्चिती करून शिक्षण व्यवस्थेत सुधारणा होण्यासाठी नेमकेपणाने कृती कार्यक्रमांचे नियोजन, प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व अचूक मूल्यमापन करता यावे, यासाठी ''विद्या समीक्षा केंद्र (VSK)'' कार्यान्वित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय** :

शिक्षण क्षेत्रातील माहिती संकलन व विश्लेषण प्रक्रिया अधिक वेगवान व सुलभ व्हावी. तसेच धोरणकर्ते, शिक्षक आणि सर्व स्तरावरील प्रशासकांसह विविध भागधारकांना माहिती विश्लेषणासाठी एकत्रित व्यासपीठ प्रदान करावे व त्याआधारे राज्य, जिल्हा व तालुका पातळीवर गरजा लक्षात घेऊन उपक्रम/योजना आखण्यास मदत व्हावी, याकरिता संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या नियंत्रणाखाली ''विद्या समीक्षा केंद्र'' (VSK) कार्यान्वित करण्यात येत आहे.

**१. विद्या समीक्षा केंद्राची उद्दिष्टे** :

१.१ समग्र शिक्षा व स्टार्स प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम/प्रकल्पांचे Real time संनियंत्रण करणे.

१.२ शैक्षणिक व भौतिक उपक्रम/योजनांचा राज्य स्तरावरून मागोवा घेणे आणि क्षेत्रिय अधिकारी व शिक्षक यांचे डेटा आधारित निर्णय घेण्यासाठी सक्षमीकरण करणे.

१.३ प्रवेशित विद्यार्थी, शालाबाह्य विद्यार्थी, गळती झालेले विद्यार्थी, मुक्त शिक्षण घेणारे विद्यार्थी, शिक्षणाच्या प्रवाहात समाविष्ट बालकामगार, दिव्यांग विद्यार्थी, व्यावसायिक शिक्षण घेणारे विद्यार्थी, गणवेश व पाठ्यपुस्तक

वितरण, शिष्यवृत्ती, आर्थिक लाभाच्या योजना, शाळा स्तरावरील मूल्यमापन, विद्यार्थी व शिक्षक यांना आवश्यक मदत, प्रोत्साहन व पुरस्कार बाबींवर लक्ष ठेवणे.

१.४ विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी वाढविण्यासाठी व उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी शिक्षकांना मदत करणे.

१.५ डेटा आधारे तातडीने लक्ष देण्यासाठीची गरजाक्षेत्रे निश्चित करून निर्णय घेण्यासाठी मदत करणे.

१.६ शिक्षण व्यवस्थेस पूरक ठरणाऱ्या सर्व संबंधितास माहिती, जागरूकता आणि मदत करण्यासाठी राज्य स्तरावर मदत कक्ष (Help Desk) तयार करणे.

१.७ सुनिश्चित शाळा मानकांनुसार शाळांची सद्यस्थिती व सुधारात्मक कामगिरीचा Real time माहिती दर्शविणारा डॅशबोर्ड विकसित करणे.

१.८ राज्यातील सर्व पर्यवेक्षीय यंत्रणेतील समन्वय वाढवून त्यांची कार्यक्षमता आणि परिणामकारकता वाढविणे.

१.९ राज्यशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम/योजना/प्रकल्पांचे Real time संनियंत्रण करणे.

१.१० 'समग्र शिक्षा', 'स्टार्स प्रकल्प', 'पीएम श्री' तसेच शासनाचे विविध उपक्रम/योजना/प्रकल्पांचे वार्षिक कार्य योजना व अंदाजपत्रक तयार करण्यास व शासन स्तरावर धोरण निश्चितीस मदत करणे.

१.११ शिक्षण व्यवस्थेतील सर्व संस्थांच्या लेखा व वित्त विषयक बाबींचे डॅशबोर्ड विकसित करून संनियंत्रण करणे.

**२. विविध भागधारकांच्या भूमिका** :

**२.१ शिक्षण आयुक्तालय** :

- विद्या समीक्षा केंद्राच्या कामकाजासंदर्भात सर्व संचालनालयांमध्ये समन्वय राहणे व अंमबजावणीच्या विविध टप्प्यांवर येणाऱ्या अडचणी दूर करणे यासाठी आयुक्त (शिक्षण) हे दरमहा आढावा घेऊन दिशानिर्देश देतील. तसेच सर्व संचालनालयांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवतील.

- शिक्षण विभागांतर्गत सर्व संचालनालयांकडून विद्या समीक्षा केंद्रासाठी प्रत्येकी एक नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती आयुक्त (शिक्षण) यांचेद्वारे करण्यात येईल. सदर नोडल अधिकारी आपल्या कार्यालयाशी संबंधित डॅशबोर्ड अद्ययावत ठेवण्यास जबाबदार राहतील.
- शालेय शिक्षण विभागाच्या E-Governance Cell द्वारे विद्या समीक्षा केंद्रासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येईल.

**२.२ महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** :

- विद्या समीक्षा केंद्राचे कार्यनव्यन करण्यासाठी Software, Hardware and Infrastructure इत्यादींसाठी आवश्यक निधी 'समग्र शिक्षा' 'स्टार्स प्रकल्पा'अंतर्गत संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**२.३ संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे** :

- दैनंदिन कार्यालयीन व्यवस्थापन केले जाईल.
- शिक्षण विभागाव्यतिरिक्त अन्य शासकीय विभागांचा सहभाग घेण्यासाठी योग्य कार्यवाही करतील.
- विद्या समीक्षा केंद्रातील शैक्षणिक कामकाजासाठी विद्या समन्वयक (Academic Coordinator) म्हणून शिक्षक संवर्गातून आवश्यकतेनुसार मनुष्यबळ प्रतिनियुक्ती/उसनवार तत्त्वावर उपलब्ध करून घेतील. तसेच संगणक प्रोग्रॅमर/सहाय्यक संगणक प्रोग्रॅमर, Data Scientist, तांत्रिक मनुष्यबळ तसेच स्वच्छता व सेवकवर्गीय कर्मचारी बाह्यसंस्थांकडून उपलब्ध करून घेतील.
- विद्या समीक्षा केंद्राकरिता डेटा सिस्टीम व डॅशबोर्ड विकसित करण्यासाठी तसेच अन्य बाबींसाठी विविध संस्थांसोबत करारनामा करण्याचे अधिकार यांना असतील.
- प्रशिक्षण या गुणवत्तेसंबंधात ज्या उपक्रमाची अंमलबजावणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत होत असेल तर त्यासंबंधीचा डॅशबोर्ड अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी असेल.

**२.४ शिक्षण संचालनालय** :

- संबधित विषयाच्या डॅशबोर्ड विकसनाच्या प्रक्रियेत संबंधित संचालनालये सक्रीय सहभाग घेतील.
- संबधित डॅशबोर्ड वरील डेटाचे विश्लेषण करून संबधित संचालनालये कृती कार्यक्रमाची आखणी करतील.

**२.५ क्षेत्रीय कार्यालये** :

- विभागीय शिक्षण उपसंचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.), आयुक्त (म.न.पा.), शिक्षणाधिकारी आपल्या कार्यकक्षेतील प्रगतीचा दरमहा आढावा घेतील.
- विद्या समीक्षा केंद्रच्या डॅशबोर्डवरील अहवाल जिल्हा स्तरावरून तालुका व केंद्र स्तरावर उपलब्ध करून देण्यात येईल. त्यानुसार उपलब्ध माहितीवर आधारित कृती कार्यक्रम जिल्हा स्तरावर निश्चित करावा व त्याची अंमलबजावणी करावी.
- माहिती संकलनाची कोणत्याही स्वरूपात द्विरूक्ती होणार नाही यांबाबत क्षेत्रीय कार्यालये दक्षता घेतील.
- सुधारात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मदतीने करण्यात येईल.

- जिल्हा स्तरावर उपशिक्षणाधिकारी, समग्र शिक्षा व मुंबई शहर, उपनगर या करिता समकक्ष अधिकारी हे विद्या समीक्षा केंद्राचे जिल्हा नोडल अधिकारी म्हणून कामकाज पाहतील.

**३. विद्या समीक्षा केंद्राची (VSK) कार्यपद्धती :**

३.१ संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे हे नामांकित संस्थाच्या मदतीने माहिती संकलित व विश्लेषित करण्यासाठी आवश्यक यंत्रणा विकसित करतील.

३.२ सदर यंत्रणा विकसित करण्यासाठी शासनाच्या सरल, शालार्थ, सेवार्थ, यु-डायस पोर्टल व संबधित शासकीय संस्थांकडील डेटाबेसचा उपयोग करण्यात येईल.

३.३ विकसीत केलेल्या Chatbot/App/Platform इत्यादींद्वारे शिक्षक व विद्यार्थी उपस्थिती, विविध लाभांच्या योजना, प्रशिक्षणे, चाचण्या, शाळाभेटी इत्यादी बाबींची माहिती विद्या समीक्षा केंद्राच्या सर्व्हरवर संकलित केली जाईल.

३.४ विद्या समीक्षा केंद्राच्या डॅशबोर्डमध्ये उपलब्ध विविध प्रकारच्या माहितीचा अहवाल तयार होईल.

३.५ माहितीचा अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य./योजना) यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून दिला जाईल.

३.६ विद्या समीक्षा केंद्रामार्फत संकलित केली जाणारी माहिती अन्य संस्थांकडून Chatbot/App/Platform/Links द्वारा संकलित केली जाणार नाही वा त्याची द्विरुक्ती होणार नाही याबाबतची दक्षता राज्य व जिल्हा स्तरावर घेण्यात येईल.

३.७ ज्या संस्था विद्या समीक्षा केंद्राच्या माहिती व्यतिरिक्त शिक्षण विभागाशी संबधित इतर माहिती संकलित करीत असतील त्यांनी प्रस्तुत माहिती ही विद्या समीक्षा केंद्राच्या सर्व्हरवर संकलित करणे बंधनकारक राहील.

३.८ विद्या समीक्षा केंद्रामार्फत संकलित माहिती शाळांकडून अहवाल स्वरूपात कोणत्याही स्तरावरून मागविली जाणार नाही. जेणेकरून शिक्षकांच्या कामकाजात वाढ होणार नाही.

**४. विद्या समीक्षा केंद्राची प्रत्यक्ष अंमलबजावणी :**

४.१ स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेतील इ. १ ली ते इ. १० वी च्या इयत्तेतील विद्यार्थी व शिक्षक उपस्थिती ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. या बाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना आयुक्त (शिक्षण) यांचेद्वारा निर्गमित करण्यात येतील.

४.२ दीक्षा, निष्ठा, राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS), राज्य संपादणूक सर्वेक्षण (SLAS) PGI, पी.एम. पोषण, यु-डायस व Periodic Assesment Test (PAT) यांचे डॅशबोर्ड संबंधित विभागांकडून प्रसारित करण्यात येत आहेत.

४.३ विद्यार्थ्यांच्या सरावासाठी ऑनलाईन पद्धतीने इ. २ री व ३ री साठी भाषा व गणित या विषयाचा तर इ.४ थी ते ८ वी साठी भाषा, गणित व विज्ञान या विषयांचा अध्ययन निष्पत्तीनिहाय साप्ताहिक स्वाध्याय सुरू करण्यात येत आहे.

४.४ टप्याटप्याने इतर उपक्रम सुरू करण्याविषयीच्या सूचना संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेद्वारा स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०३१२१७५३०७७९२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार आणि नावाने.

**(तुषार महाजन)**
उप सचिव,, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
५) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई
६) मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई–३२.
८) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई–३२.
९) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई–३२.
१०) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
१२) राज्य प्रकल्प संचालक, (समग्र शिक्षा) म.प्रा.शि.प. मुंबई.
१३) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

❑❑❑

# १६. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना

**केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजनेची नामकरण प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण** (PM-POSHAN) **करणेबाबत..........**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : शापोआ–२०२१/प्र.क्र.१४५/एस.डी–३,**
**दिनांक : ०४ नोव्हेबंर, २०२२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

**वाचा** : १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. शापोआ–२०१०/प्र.क्र.१८/प्रशि– ४, दि. ०२ फेब्रुवारी, २०११

२) केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No.१–३/२०२१–Desk (MDM), दि. ०६ ऑक्टोबर, २०२१.

**पार्श्वभूमी :**

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने तसेच प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि शाळेतील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याकरता केंद्रपुरस्कृत शालेय पोषण आहार योजना दि. १५ ऑगस्ट,१९९५ पासून राज्यात सुरू करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने सदर योजनेचे नामकरण प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण (PM-POSHAN) असे करून प्रस्तुत योजनेच्या पंचवार्षिक (सन २०२१–२२ ते २०२५–२६) आराखड्यास मान्यता दिल्याचे दि.०६ ऑक्टोबर,२०२१ रोजीच्या मार्गदर्शक सुचनांद्वारे कळविले आहे. त्यानुसार योजनेच्या नावात बदल करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :

केंद्र शासनाने शालेय पोषण आहार योजनेचे नामकरण प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (PM-POSHAN) असे केले असल्यामुळे यापुढे राज्यात शालेय पोषण आहार ही योजना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (PM-POSHAN) म्हणून ओळखली जाईल. तसेच केंद्र शासनाने प्रस्तुत योजनेकरीता निर्धारित केलेल्या मार्गदर्शक सुचना व इतर व बाबी केंद्र शासनाच्या दि. ०६ ऑक्टोबर,२०२१ मधील पत्राप्रमाणे राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.mharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२११०४१५२४१७३१२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(इ. मु. काझी)**
सहसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
६) सर्व मा. संसद सदस्य/विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य.
७) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई.
८) सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व सहसचिव/उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई.
१०) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे.
११) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई..
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१३) शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) शिक्षण संचालक ( प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) संचालक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे.
१७) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) अध्यक्ष, माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९) महालेखपाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
२०) विभागीय शिक्षण उप संचालक (सर्व).
२१) शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद (सर्व) ..
२२) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
२३) वित्त विभाग (व्यय–५), मंत्रालय, मुंबई.
२३) निवड नस्ती–एस.डी.३.

F. No, 1-3/2021-Desk (MDM)

**Government of India**

**Ministry of Education**

**Department of School Education and Literacy**

Shastri Bhavan, New Delhi

**Dated, the 6th October, 2021**

To,

The Additional Chief Secretaries/Principal Secretaries/Secretaries of Education or the Nodal Department for implementation of **'Pradhan Mantri Poshan Shakti Nirman (PM POSHAN)'** Scheme in all States and UTs.

**Subject :** Implementation of Centrally Sponsored Scheme **'Pradhan Mantri Poshan Shakti Nirman (PM POSHAN)'**.

**Madam / Sir,**

I am directed to convey the approval of the Central Government for Implementation of Centrally Sponsored Scheme **'Pradhan Mantri Poshan Shakti Nirman (PM POSHAN)'** for providing one hot cooked meal in Government and Government-aided schools from 2021-22 to 2025-26, earller known as 'National Programme for Mid-Day Meal in Schools'.

2) **The Cabinet has approved the following :**

i. **Food Grains :** Supply of food grains @ 100 grams per child per school day for primary and 150 grams for upper primary at NFSA rate i.e. ₹ 1 per kg for coarse grains, ₹ 2 per kg for wheat and ₹ 3 per kg for rice.

ii. **Cooking Cost :** It includes cost of ingredients, e.g. pulses, vegetables, cooking oil, other condiments and fuel. The per child per day cooking cost is ₹ 4.97 for primary and ₹ 7.45 for upper primary w.e.f. 1st April, 2020. The per child details of items are as under :

| S. N. | Items | Primary | Upper Primary |
|---|---|---|---|
| 1. | Pulses | 20 gms | 30 gms |
| 2. | Vegetables | 50 gms | 50 gms |
| 3. | Oil and fat | 5 gms | 7.5 gms |
| 4. | Salt and condiments | As per need | As per need |
| 5. | Fuel | As per need | As per need |

DOSEL will form a committee of experts to review the components of cooking cost, formula and methodology of its revision, actual consumption, coverage etc.

iii. **Honorarium to Cook-cum-Helpers :** @ ₹1000 per month for 10 months in a year.

iv. **Transportation Assistance :** As per PDS rate for transportation of food grains from FCI godown to school door steps. Maximum 1500 per MT for transportation of

food grains from FCI godown to school door steps for States other than NER and 2 Himalayan States and 2 UTS.

v. **Management, Monitoring and Evaluation (MME) :** @ 3% of aggregate of cost of foodgrains, cooking cost, Honorarium to Cook- cum-Helpers and Transportation Assistance.

vi. Provision of Meals during summer vacations in drought/disaster affected areas.

vii. **Kitchen-cum-store :** As per plinth area norm and State Schedule of Rates. 20 sq meter for schools having enrolment of 100 students. Additional 4 sq meter for every addition of up to 100 students.

viii. **Kitchen devices :** Linked with enrolment.

| **Enrolment (No. of Children) per school** | **Unit Cost (In₹)** |
|---|---|
| Up to 50 | 10,000 |
| 51-150 | 15,000 |
| 151-250 | 20,000 |
| 251 and above | 25,000 |

ix. Repair of kitchen-cum-stores: 10,000/- per unit, for the kitchen-

x. cum-stores, which were constructed 10 years ago. Fortification of food items: Fortification of food items in a systematic manner through Food Corporation of India (FCI).

xi. Innovation/Flexibility component with no separate budgetary support: Five per cent of the aggregate of the cost of foodgrains, cooking cost, transport assistance, honorarium to cook- cum-helpers, and MME with no separate additional budgetary support for this component. The requirement of funds under this component will be met from available funds and implemented as per Department of Expenditure's OM No. 55(5)/PF-II/2011 dated 06.09.2016.

xii. Provision of mid-day meal to preparatory classes or Balvatika (that is before class I) In primary schools as covered in 'Samagra Shiksha' as envisaged under National Education Policy.

3) **Further, Cabinet also approved several initiatives, without any additional financial implications, in order to improve the efficiency and effectiveness of the scheme :**

i. Flexibility to create any new intervention and increase/decrease any norm in the scheme within the approved outlay and subject to the approval of Empowered Committee headed by Hon'ble Shiksha Mantri.

ii. The flexibility of changing the component-wise allocation within the approved outlay is given to Programme Approval Board (PAB), which can decide the allocation on an annual basis.

iii. Steps will be taken to ensure payment of honorarium to Cook-cum- Helpers in the lines of DBT directly into their bank accounts from State level.

**iv.** Emphasis will be laid on transfer of cooking cost directly to the school's bank account in the lines of DBT through State Government directly from State level.

**v.** Field inspections by students of eminent Universities / Institutions and also trainee teachers of District Institute of Education Training and Regional Institutes of Education, for enhanced monitoring of implementation of scheme at field level.

**vi.** 3rd party independent monitoring by using Food and Nutrition Departments of Central Universities, Agriculture Universities and eminent institutes like National Institute of Nutrition etc.

**vii.** The following interventions will be packaged and positioned as special nutritional interventions :

**a. Tithi Bhojan :** The concept of Tithi Bhojan will be encouraged extensively. Tithi Bhojan is a community participation programme in which people provide special food to children on special occasions/festivals.

**b. School Nutrition Gardens :** Efforts will be made to promote development of School Nutrition Gardens in schools to give children first hand experience with nature and gardening.

**c. Social Audit :** Social Audit in all districts is made mandatory. Social Audit is collective monitoring of a scheme by people's active involvement covering Issues of equity, equality and expenditure management.

**viii.** Nutrition and Health parameters of children will be mapped at District and Block levels in convergence with Ministry of Health and Family Welfare along with extensive monitoring through IT intervention and other methods.

**ix. Vocal for local :**

**a.** Usage of locally grown food items like millets, vegetables, condiments etc. will be systematically undertaken by states/UTs under the Scheme. This not only promotes nutrition through local traditional food items, but it also contributes to local economic growth.

**b.** Farmers' Producers Organizations, Federation of Women's Self- Help Groups etc. in implementation of Mid-Day Meal Scheme.

**c.** States/UTs to be encouraged to empower District Collector / (District Magistrate to decide menu suitable to the local Copy conditions within the prescribed nutrition and food norms and to procure locally grown food Items from Farmers Producers Organizations, Federation of Women's Self-Help Groups etc. so as to promote local employment generation and economic development while simultaneously improving the nutrition standards.

**x. Convergence :**

**a.** The existing system of health check-ups, immunization and health cards for 100% school going children will be strengthened in convergence with Ministry of Health and Family Welfare.

**b.** Convergence with Ministry of WCD will be undertaken with reference to BalVatika and co-located schools.

**c.** The States and UTs may procure pulses as per their local taste for the Scheme from the Central buffer stock created by the Government of India.

**xi. Community mobilization :**

**a.** To encourage States and UTs to promote community participation in the lines of Tithi Bhojan of Gujarat.

**b.** Strengthening of the existing system of tasting of meals by parents / teachers / community members before serving to children.

**xii. Monitoring :**

**a.** Continuation of existing fund release mechanism of the Scheme in which funds are released in two instalments (effectively 3 instalments i.e. ad-hoc grants, balance of first instalment and second instalment).

**b.** To ensure proper management structures at different levels i.e. States, districts and blocks within the existing available funds.

**c.** An institutionalized mechanism for systematic monitoring and implementation of Scheme will be developed including dietary intake, nutrition status, health parameters and Body Mass Index of children. Institutions with domain expertise in nutrition like Food and Nutrition Departments of Central / State Universities, National Institute of Nutrition etc. will be engaged.

**d.** A robust IT enabled MIS system using latest digital technologies will be developed to closely monitor the programme. The system may also include seamless tracking of health and nutritional status of children from pre-school to primary school.

**e.** All States and UTs will be encouraged to strengthen IT based grievance redressal system / suggestion system, which empowers parents / students to upload evidences of their experiences with the scheme.

**f.** Independent third-party evaluation along with regular social audit will also be carried out by states/UTs every year and reports will be sent to the centre before allocation of resources for the next year.

**g.** Strengthening of the existing monitoring system to be done to ensure daily information is received from all schools.

**xiii. Capacity Building :**

**a.** To ensure training of all cook-cum-helpers states/UTs to Involve Institutes of Hotel Management and Food Craft Institutes of Ministry of Tourism, Food Safety and Standards Authority of India, local mother's groups, etc.

**xiv. Motivating Cooks :**

a. Wherever feasible, cook-cum-Helpers may be named as 'Bhojan Mata'.

b. To encourage States to organize cooking competitions in order to motivate cook-cum-helpers towards use of locally available food material and to promote variety menu.

**xv. Special Focus :**

a. To make adequate provision for supplementary nutrition in aspirational districts/ tribal districts / districts with identified

b. high cases of malnutrition etc. In such districts, monitoring of attendance and quality of MDM to be undertaken directly under the supervision of District Collector.

**xvi. Awareness Generation :**

a. To prepare annual calendar of activities for Mid-Day Meal Scheme for dissemination of information to popularize the benefits of the Scheme and to make people aware of their rights under the Scheme.

**xvii. Disaster Management :**

**a.** To ensure every school has a disaster management plan.

**b.** Provision of hot cooked meal or Food Security Allowance to children when schools are closed due to a disaster impacting the state/UT, part of state/UT, some states/ UTs or whole country as maybe declared by the state/central government under its powers as Disaster Management Authority.

**4.** The assistance for components of cooking cost, honorarium to Cook- cum-Helpers, Construction of Kitchen-cum-stores, repair of 10 year old kitchen-cum-stores, procurement / replacement of kitchen devices and Innovation/Flexibility will be shared between the Centre and States/UTs as per the approved funding pattern of 90:10 for North Eastern Region (NER) States, 2 Himalayan States and UT of Jammu and Kashmir, 100% for Union Territories without Legislature and 60:40 for other States as well as Union Territories with Legislature (Delhi and Puducherry).

**5.** Necessary detailed guidelines in respect of the above decisions are under preparation and shall be shared shortly.

**6.** You are requested to disseminate the above decisions to all concerned.

Yours faithfully,

**(R.C. MEENA)**

**Joint Secretary to Government of India**

**Copy to :** Commission/Directors, Pradhan Mantri Poshan Shakti Nirman (PM POSHAN) Scheme of all States/UTs.

❑❑❑

# १७. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

केंद्र शासन पुरस्कृत व जागतिक बँक साहाय्यित जिल्हा प्राथमिक शिक्षण प्रकल्प योजना टप्प्याटप्प्याने स्त्री साक्षरतेत मागासलेल्या जिल्ह्यांमध्ये किंवा ज्या जिल्ह्यांत संपूर्ण साक्षरता कार्यक्रम पूर्ण झाला आहे अशा जिल्ह्यात अमलात आणण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. त्यास अनुसरून पहिल्या टप्प्यात औरंगाबाद, लातूर, नांदेडख उस्मानाबाद परभणी या पाच जिल्ह्यांमध्ये 'महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ' या स्वायत्त संस्थेची स्थापना शा.नि.क्र.पी.आर.ई. १०९३/६८०७/प्राशि – ३, दि. ७/०५/१९९४ अनुसार करण्यात आली. 'महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद' ही संस्था सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० व मुंबई विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये पंजीकृत करण्यात आली आहे. या संस्थेच्या M.O.U. ला शासनाची मान्यता असून त्यानुरूप या संस्थेचे कार्य चालते. सन २००१ मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियानाची सुरुवात केली. राज्यात या अभियानाची अंमलबजावणी या संस्थेमार्फत केली जाते.

**कार्य** :

१) प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आवश्यक त्या कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी करणे.

२) प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी प्रकल्प कालावधीत प्रत्येक वर्षीचे लक्ष्य विहित करणे व या लक्ष्याप्रमाणे कार्यक्रमाचे मूल्यमापन करणे.


३) संस्था उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, शिक्षक संघटना व इतर समर्पण वृत्तीचे कार्यकर्ते यांचा सहभाग मिळविणे.

४) सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

५) संस्थेच्या मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनच्या तरतुदीनुसार राज्य आणि जिल्हा स्तरावर योजनांची आणि उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करणे.

६) संस्थेच्या मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनच्या तरतुदीनुसार प्रकल्प जिल्ह्यातील योजनांचे कार्यान्वयन/नियोजन आणि योजनांतर्गत पदनिर्मिती या संदर्भातील सर्व अधिकार परिषदेकडे आहेत. या योजनांची कार्यवाही व पदे भरण्यासंबंधीची सर्व जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या मदतीने केली जाते.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई




❑❑❑

# १८. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या वतीने या परिषदेतर्फे विविध परीक्षा घेण्यात येतात. या परीक्षा राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणविषयक आकांक्षा पूर्ण करून त्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच व्यावसायिक कौशल्ये संपादित करण्याच्या उद्देशाने घेतल्या जातात. बदलत्या काळाबरोबर अशा शैक्षणिक परीक्षांबरोबर प्रज्ञाशोध, गुणवत्ता विकासासाठी शिष्यवृत्ती परीक्षा तसेच व्यावसायिक स्वरूपात परीक्षा सुरू करण्यात आलेल्या आहेत.

वरील विविध स्वरूपांच्या परीक्षा १९६८ पर्यंत शिक्षण संचालनाच्या 'ह' शाखेमार्फत घेतल्या जात असत. १९६८ मध्ये या परीक्षांचे नियोजन व आयोजन अधिक प्रभावी व परिणामकारकरीत्या होण्याच्या दृष्टीने शिक्षण संचालनायाअंतर्गत शासकीय परीक्षा मंडळ स्थापन करण्यात आले.

सदर परीक्षांचे नियोजन करण्यासोबतच शैक्षणिक दर्जाचा विकास व मूल्यमापनाची विश्वासार्हता दृष्टी करण्याची तसेच प्रश्नपत्रिकांचे संपादन, परीक्षांसबंधीची प्रक्रिया व मूल्यमापन पद्धती यांमध्ये भरीव सुधारणा घडवून आणण्याची जबाबदारी शासकीय परीक्षा मंडळावर सोपविण्यात आली.

शासन निर्णय क्र. एसपीइ/१०९५/(१०४/९५) माशि–८, दिनांक ६ एप्रिल, १९९६ नुसार शासकिय परीक्षा मंडळ ऐवजी 'महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ' असे नामकरण करण्यात आले. परीक्षा मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक व व्यावसायिक स्वरूपाचे स्वायत्त परिषदेत रूपांतर करण्याचा मनोदय होता. त्यानुसार १५ ऑगस्ट, २००२ पासून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद स्थापन करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पुढील परीक्षा घेतल्या जातात.

१) पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (M.S.S.)
२) माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (H.S.S.)
३) राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा (राज्यपातळी) (N.T.S.)
४) राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून प्रवेश परीक्षा (R.I.M.C.)
५) वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (G.C.C.)
६) अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा (२००४ अभ्यासक्रम)
७) प्रशिक्षित शिक्षक प्रमाणपत्र परीक्षा (टी.टी.सी.)
८) विभागीय सेवाप्रवेशोत्तर परीक्षा (शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांसाठी)
९) शारीरिक शिक्षक प्रमाणपत्र परीक्षा (सी.पी.एड)
१०) शिक्षक पात्रता परीक्षा (टी.ई.टी.)

**विभागीय परीक्षा (शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांसाठी)**

**अ) लिपिक संवर्गासाठी खातेनिहाय परीक्षा**

**उद्देश :** खात्याच्या कामकाजाची व नियमांची माहिती अवगत करून देण्यासाठी

**पात्रता :** सेवेत असलेले व प्रशिक्षण पूर्ण केलेले लिपिक

**अर्ज करण्याची पद्धती :** विभागप्रमुखांकडून आयुक्त, म. रा. परीक्षा परिषद, पुणे १ यांचेकडे

**माध्यम :** मराठी

**विषय :** एकूण ५, गुण १०० प्रत्येकी

**ब) पर्यवेक्षक पदासाठी अर्हता परीक्षा**

**पात्रता :** मुख्य लिपिक असणे आवश्यक आहे.

**अर्ज करण्याची पद्धती :** विभागप्रमुखांकडून आयुक्त, म.रा. परीक्षा, पुणे १ यांच्याकडे

**माध्यम :** मराठी

**विषय :** एकूण ४, गुण १०० प्रत्येकी

**क) सहायक शिक्षक उपनिरीक्षक व तत्सम अधिकाऱ्यांसाठी अर्हता परीक्षा**


**पात्रता :** सहायक शिक्षक उपनिरीक्षक व तत्सम अधिकारी

**अर्ज करण्याची पद्धती :** विभागप्रमुखांकडून आयुक्त, म.रा. परीक्षा परिषद, पुणे १ यांच्याकडे

**माध्यम :** मराठी

**विषय :** एकूण ४, गुण १०० प्रत्येकी

याशिवाय शासनाचे इतर विभाग/कार्यालय यांनी विनंती केल्यास परीक्षा परिषद त्यांच्या परीक्षांचे आयोजन करते.




सहायक आयुक्त – वर्ग १, पदे – ३

मू. अ. – मूल्यमापन अधिकारी – वर्ग २, पदे – ७

स. वा. शा. नि. – सहायक वाणिज्य शाळा निरीक्षक – वर्ग २, पद – १

❑❑❑

# १९. महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषा धोरण

**महाराष्ट्र राज्याचे मराठी भाषा धोरण**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : भासस–२०१८/प्र.क्र.५०/भाषा–१**
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मादामा कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक : १४ मार्च, २०२४.

**संदर्भ** :१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. भासस २०१०/प्र.क्र.७४/२०–ब, दि. २२.०६.२०१०.
२) शासन निर्णय, मराठी भाषा विभाग क्र. भासस २०२०/प्र.क्र.०६/कार्या. भाषा–१, दि. ३०.१२.२०२१.
३) अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती यांचे पत्र क्र. भासस २०२३/प्र.क.३/४८१/५–६, दि. ०८.०५.२०२३
४) अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती यांचे निरंक क्रमांकाचे दि. २०.११.२०२३ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना :**

भाषावार प्रांत रचनेनुसार दिनांक १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. स्वतंत्र राज्याचा प्रशासनिक कारभार मराठी भाषेतून करण्याकरिता महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये मराठी भाषा ही राजभाषा म्हणून स्वीकृत करण्यात आली. त्यामुळे दैनंदिन प्रशासकिय व्यवहारात मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे. राजभाषा अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र नियम तयार करण्यात आले. हे नियम महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम, १९६६ अन्वये कार्यान्वित केले आहेत. या नियमात नमूद केलेली प्रयोजने वगळता प्रशासनातील अन्य सर्व प्रयोजनाकरिता मराठी भाषेचा वापर अनिवार्य करण्याची वैधानिक तरतूद प्रस्तुत अधिनियमांतर्गत करण्यात आली आहे. अशारितीने प्रशासनामध्ये मराठी भाषेचा वापर करण्याचे धोरण सन १९६४ पासून अंमलात आले आहे.

मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, जतन, संवर्धन व विकास होऊन मराठी भाषेच्या वापराची व्याप्ती व गुणवत्ता वाढावी, याकरिता मराठी भाषेचे धोरण आखणे आवश्यक होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्याचे साधारणपणे पुढील २५ वर्षांतील मराठी भाषेचे धोरण ठरविणे, भाषा अभिवृद्धीसाठी नवनवे उपाय व कार्यक्रम सुचविणे व या अर्थाने शासनाला मार्गदर्शन करणे याकरिता महाराष्ट्र शासनाने संदर्भाधीन क्र. १ येथील दि. २२.०६.२०१० च्या शासननिर्णयान्वये भाषा संचालनालयांतर्गत कायमस्वरूपी भाषा सल्लगार समितीची स्थापना केली आहे. सदर भाषा सल्लागार समितीकडे भाषा धोरणाचा मसुदा तयार करण्याचे काम सोपविण्यात आले होते.

श्री. नागनाथ कोतापल्ले, श्री. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली भाषा सल्लागार समितींनी मराठी भाषा धोरणाचे मसुदे शासनास सादर केले होते. तथापि, तत्कालीन परिस्थितीत सदर मसुदे विविध मंत्रालयीन विभागांच्या अभिप्रायांसह अंतिम होऊन मा. मंत्रिमंडळासमोर सादर होऊ शकले नाहीत.

तद्नंतर संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णय, मराठी विभाग, दि. ३०.१२.२०२१ अन्वये श्री. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली भाषा सल्लागार समितीची पुनर्रचना करण्यात आली. श्री. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली

भाषा सल्लागार समितीने श्री. नागनाथ कोतापल्ले व श्री. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या धोरणामधील समान व महत्त्वाच्या शिफारशी (काही बदलांसह किंवा भर घालून) कायम ठेवत कालानुरूप बदल लक्षात घेऊन दि. ०८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये नव्याने मराठी भाषा धोरणाचा मसुदा शासनास सादर केला होता.

मराठी भाषा धोरणासंबंधी मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०८.११.२०२३ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमध्ये मा. मंत्री, मराठी भाषा यांनी भाषा सल्लागार समितीने दि. ०८.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेले धोरण सर्वसामान्यांना समजेल अशा स्वरूपात सादर करावयाच्या सूचना दिल्या. त्यास अनुसरून अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती यांना दि. २०.११.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषा धोरणाचा मसुदा संक्षिप्त स्वरूपात सादर केला आहे.

मराठी भाषा धोरणाच्या अनुषंगाने दि. २८.०२.२०२४ रोजी झालेल्या चर्चेमध्ये मा. मंत्री महोदयांनी धोरणाच्या मसुद्यातील शिफारशीसंदर्भात मार्गदर्शन करून मराठी भाषेच्या विकासाच्या अनुषंगाने काही नवीन व व्यापक हिताच्या तरतूदी सूचित करून त्यांचा अंतर्भाव धोरणाच्या मसूद्यामध्ये करण्याचे निदेश दिले.

मराठी भाषा धोरणाच्या अनुषंगाने विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायांना अनुसरून मराठी भाषेच्या धोरणाचा मसुदा मा. मंत्रिमंडळाच्या दि.१३.०३.२०२४ रोजीच्या बैठकीत सादर केला होता. मा. मंत्रिमंडळाने सदर धोरणास मान्यता दिली आहे. त्यास अनुसरून मराठी भाषा धोरण जाहीर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

मराठी भाषा धोरणाच्या मसूद्यास मा. मंत्रिमंडळाच्या दि.१३.०३.२०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरून राज्याच्या मराठी भाषा धोरणास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर मराठी भाषा धोरण खालीलप्रमाणे आहे.

**१) मराठी भाषा धोरणाची उद्दिष्टे**

मराठी भाषेचा विचार हा महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती व एकंदर जीवन व्यवहार यांच्याशी संबंधित असणारे प्राणभूत तत्त्व आहे. महाराष्ट्राचे मराठी भाषेशी असणारे नाते जैविक स्वरूपाचे आहे. त्यामुळे मराठी भाषेचा वापर हा केवळ अस्मितेचा प्रश्न नसून तो मराठी माणसाच्या अस्तित्वाचाही प्रश्न आहे. तसेच सर्वसामान्य माणसाच्या जगण्याशी व महाराष्ट्राच्या विकासाशी निगडित हा प्रश्न आहे. हे सातत्याने दृष्टीपुढे ठेवून पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) भारतीय स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवी वर्षापर्यंत (२०४७) म्हणजेच पुढील सुमारे २५ वर्षांत मराठी भाषा तिच्या अगंभूत सामर्थ्यासह ज्ञान आणि रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थपित करणे.

२) ज्ञान-विज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, वैद्यकशास्त्र, विधी व आभियांत्रिकी इत्यादी सर्व ज्ञानशाखांमधील उच्च शिक्षणासाठी इंग्रजीसोबत ऐच्छिक स्वरूपात मराठी माध्यम उपलब्ध करून देणे.

३) मराठी भाषिकांची भाषिक क्षमता विकसित करण्यासाठी ठिकठिकाणी भाषा प्रयोगशाळा उभारणे.

४) राज्यातील भाषिक व सांस्कृतिक संचित असलेल्या मराठी भाषेच्या बोलींचे जतन व संवर्धन करण्यासाठी राज्य शासन सतत प्रयत्नशील राहील.

५) मराठी भाषेला नवतंत्रज्ञानाने सुसज्ज करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना माहिती तंत्रज्ञान संचलनालयामार्फत केल्या जातील.

६) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे सर्वतोपरी पाठपुरावठा करण्यात येईल याकरिता राज्य शासनाच्या वतीने एक समिती गठीत करण्यात येईल.

७) राज्यात व देशाबाहेर मराठी भाषेचे जतन व संवर्धन होण्याच्या अनुषंगाने बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषिकांच्या भाषाविषयक उपक्रमांना साहाय्य करणे.

८) जनमानसामध्ये मराठी भाषेविषयी आत्मविश्वास निर्माण करणे.

९) सर्वसामान्यांना समजेल अशी प्रशासकीय व्यवहाराची मराठी भाषा विकसित करणे.

१०) मराठी भाषेसमोरील आव्हांनाचा शोध घेऊन मराठी भाषेच्या विकासासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणे.

११) मराठी भाषा, साहित्य व कला-संस्कृतीचा, राज्य, देश व जगभरात प्रसार व्हावा यासाठी विशेष प्रयत्न शासनाच्या सर्व विभागांमार्फत केले जातील व मराठीला राष्ट्रीय व वैश्विक स्तरावर एक महत्त्वाची भाषा म्हणून प्रस्थापित केले जाईल.

**२) मराठी भाषा धोरण : व्यवहारक्षेत्रातील,**

**शालेय शिक्षण (बालशिक्षण, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण)**

**भूमिका** : मराठी भाषा धोरणाचा एक मुख्य उद्देश राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मराठीतून मिळाले पाहिजे हा आहे. मातृभाषेतून शिक्षण मिळणे हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत अधिकार आहे. म्हणून हे भाषा धोरण मराठी भाषेतून उत्तम, कल्पक आणि प्रयोगशील शालेय शिक्षण देण्यावर भर देणारे आहे. पण त्याच वेळी देशात आज असणारे इंग्रजी भाषेचे महत्त्व व तिचे आधुनिक ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रेसरत्व नजरेआड करून चालणार नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळांची वाढती संख्या आणि पालकांचा त्याकडे असणारा ओढा लक्षात घेता ''उत्तम इंग्रजीसह उत्तम मराठी'' या तत्त्वाचा हे भाषा धोरण पुरस्कार करते. त्यासाठी पुढील शिफारस प्रस्तावित आहे.

२.१ महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाचे माध्यम हे प्रामुख्याने व प्राधान्याने मराठी भाषाच असेल. राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीकरीता मराठी हा विषय अनिवार्य असेल. तसेच मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये पहिलीपासून अनिवार्यपणे इंग्रजी भाषा शिकविण्याचे धोरण यापुढेही कायम राहील

२.२ राज्यतील अमराठी माध्यमांच्या शाळांमध्ये (उदा. इंग्रजी, ऊर्दू इ.) शिकविण्यात येणाऱ्या मराठी विषयाच्या पुस्तकांची काठिण्यपातळी कमी करून सुलभ स्वरूपाचा अभ्यासक्रम असलेली पाठ्यपुस्तके बालभारतीकडून तयार करण्यात येतील त्याकरीता शालेय शिक्षण विभाग विविध शैक्षणिक संशोधन संस्थांशी सामंजस्य करार करेल.

२.३ ० ते ३ वर्षे या वयोटातील बालकांच्या प्रारंभिक बालव्यवस्थेतील संगोपण व शिक्षणासाठी पालकांना कार्यात्मक पुस्तिका आणि दृक्श्राव्य माध्यमाद्वारे साहित्य उपलब्ध करून त्यांचे प्रबोधन केले जाईल.

२.४ सर्व माध्यमांच्या पूर्वप्राथमिक शिक्षण व नर्सरी शिक्षणाच्या अभ्यासक्रमात मराठी अक्षरओळख या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव करण्यात येईल.

२.५ मराठी शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी या शाळांमध्ये दर्जेदार इंग्रजीचे अध्यापन होण्याकरिता शालेय शिक्षण विभाग इंग्रजी भाषेचे शिक्षण देणारी अध्यापन प्रशिक्षणाची यंत्रणा माहिती व तंत्रज्ञान सुयोग्य वापर करीत अधिक दर्जेदार करील.

२.६ महाराष्ट्रातील सर्व शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी विशेष प्रयत्न केले जातील.

२.७ राज्यातील सर्व माध्यमांच्या महाविद्यालयांमधील अकरावी ते बारावीकरिता मराठी हा विषय अनिवार्य करण्याबाबत कायद्यामध्ये सुधारणा करण्यात येईल.

**३) उच्च शिक्षण**

३.१ राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या प्रशासकीय कामकाजात इंग्रजीसोबत मराठीचाही वापर अनिवार्य असेल.

३.२ राज्यातील महाविद्यालये व विद्यापीठे त्यांना अनुदान आयोगासारखा नियामक संस्थांकडून संशोधनासाठी मिळणाऱ्या निधींपैकी यथोचित निधी विविध ज्ञानशाखांतील मराठी भाषेतून होणाऱ्या संशोधनपर लेख, प्रबंधासाठी तसेच इंग्रजीसह अन्य भाषेतून मराठीमध्ये अनुवादाच्या रूपाने संशोधनपर लेख व प्रबंध प्रकाशित करण्यासाठी खर्च करतील.

३.३ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ त्यांना अनुदान अधिनियमातील तरतुदीनुसार महाविद्यालयीन व विद्यापीठीय उच्च शिक्षण मराठीतूनही ऐच्छिक स्वरूपात उपलब्ध करून दिले जाईल. विज्ञान आणि तंत्रत्रानविषयक उच्च शिक्षण माध्यमातून उपलब्ध केले जाईल.

३.४ विद्यापीठीय शिक्षणात दोन श्रेयंकाचा मराठी विषय किमान चार सत्रांसाठी अनिवार्य करण्यात येईल. बहुशाखीय विषयात आणि क्षमता विकास या घटकात मराठी विषयाचा समावेश करून तो ऐच्छिक स्वरूपातही सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिला जाईल.

३.५ नवीन शैक्षणिक धोरण – २०२० च्या अनुषंगाने सर्व ज्ञान, विज्ञान–तंत्रज्ञान आणि सामाजिक व मानव्य विभागांचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण मराठीतून देण्यासाठी अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके व पूरक संदर्भ ग्रंथ निर्माण करण्याकरिता 'महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळा' याची पुर्नस्थापना केली जाईल.

३.६ मुलांच्या भाषिक विकासातील बालसाहित्याचे स्थान व महत्त्व लक्षात घेऊन 'मराठी बालसाहित्य' या विषयाचा स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून समावेश करण्यात येईल.

३.७ उच्च शिक्षणतील मराठी भाषेचे अध्ययन व अध्यापन व्यवसायाभिमुख, रोजागारभिमुख व कौशल्यभिमुख करण्यासाठी अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम अनिवार्य स्वरूपात शिकवले जातील.

३.८ एम. फिल. व पीएच. डी.चे प्रबंध मराठीतून सादर करताना ते एकसंकेत (युनिकोड) प्रणालीतून सादर करणे अनिवार्य केले जाईल. तसेच या संबंधातील संशोधन तपासण्यासाठी विशिष्ठ प्रणाली शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत विकसित करण्यात येईल.

३.९ पीएच.डी करीता मराठी भाषाविषयक संशोधन करणाऱ्या विद्यार्थी व मार्गदर्शक यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येईल. तथापि, एका विषयाकरिता एकदाच अनुदान देय असेल.

### ४) नवतंत्रज्ञान आणि मराठीचा वापर

माहिती तंत्रज्ञान विभागात मराठी भाषेचे भाषिक अभियंते आणि भाषाशास्त्रज्ञ यांची नियुक्ती करण्यात येईल. भाषिक अभियंते आणि भाषाशास्त्रज्ञ यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या शासन निश्चित करील.

### ५) संगणन साधने, उपयोजन, निर्मिती व विकसन

५.१ महाराष्ट्र राज्यात शासकीय खरेदी व शासकीय अनुदानातून खरेदी केल्या जाणाऱ्या संगणक कळ फलकांवरील 'छापील अक्षर कळमुद्रा' रोमन लिपीबरोबरच मराठी देवनागरी लिपीत छापलेल्या/कोरलेल्या/उमटविलेल्या असणे अनिवार्य असेल.

५.२ मराठी भाषा संगणक स्नेही करण्यासाठी साहाय्यक संगणकीय साधने उदा. लेखनशोधक, व्याकरण तपासनीस, स्वयं दुरुस्ती प्रणाली (Auto Correct), पठणप्रणाली (Text to voice), समानार्थी शब्द सुविधा यांचे, संशोधन करून निर्मिती केली जाईल. शासनाने मान्य केलेले अपवाद वगळून सर्व तंत्रज्ञान/ प्रमाणके मुक्त स्वरूपात खुली असतील. प्रतिमुद्राधिकार,निजस्व आणि व्यावसायिक मुद्रा यांपासून ते मुक्त असतील.

५.३ महाराष्ट्रात सर्व अधिकोषांची (बँकाची) ए.टी.एम., विमानतळावर, रेल्वेस्थानक व अन्य सार्वजनिक सुविधा केंद्रात लोकांच्या सोयीसाठी असणारा संवाद पटल (युजर्स इंटरफेस) केंद्राच्या त्रिभाषा धोरणानुसार

मराठीमधूनही उपलब्ध करून दिला जाईल.

५.४ राज्यातील विविध बोलीभाषांचा प्रमाण मराठी भाषेत अनुवाद करण्याच्या अनुषंगाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सुलभ उपयोजके विकसित करण्यात येतील.

**६) संगणकीय शिक्षण**

६.१ इयत्ता पाचवीच्या वर्गापासून शालेय शिक्षणात माहिती तंत्रज्ञान विषयाचे काही घटक वैकल्पिक स्तरावर कार्यानुभव विषयांतर्गत समाविष्ट करण्यात येतील. तसेच आठवीपासून बारावीपर्यंत व्यवसायिक शिक्षण विषयांतर्गत माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा समावेश करता येईल.

६.२ महाविद्यालयीन सर्व शाखांच्या पदवी शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) सारखे अत्याधुनिक विषय शिकविण्यासाठी व्यवस्था करण्यात येईल.

**७) बोलीभाषांचे जतन, संशोधन आणि दस्तऐवजीकरण**

७.१ मराठीच्या सर्व बोलींची नोंद, संकलन, सखोल अभ्यास व संशोधन केले जाईल. महाराष्ट्रातील सर्व कृषीतर विद्यापीठांमध्ये त्या – त्या प्रदेशातील बोलींचे संशोधन व अभ्यास करण्यात येईल.

७.२ सर्व भटक्या, विमुक्त जाती–जमाती आणि आदिवासी जमातींच्या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास केला जाईल.

७.३ मराठी बोलीभाषेतील नाट्य व चित्रपट यांना सांस्कृतिक कार्य विभागाकडून प्रोत्साहन देण्यात येईल.

७.४ राज्यातील विविध बोलीभाषा प्रमाण मराठी भाषेमध्ये भाषांतरीत करण्याच्या अनुषंगाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शासनातर्फे प्रकल्प राबविण्यात येतील.

**८) विधि व न्याय व्यवहार**

८.१ दि.२१जुलै,१९९८ च्या अधिसूचनेप्रमाणे तालुका व जिल्हा न्यायालयांच्या कामकाजाची भाषा मराठी आहे आणि त्यानुसार न्यायालयांमधील मराठीतून कामकाज होण्यासाठी शासनामार्फत, तालुका व जिल्हा न्यायालयांना सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

८.२ संविधानाच्या अनुच्छेदात ३४८ (२) मधील तरतुदीप्रमाणे मराठी भाषेला मुबंई उच्च न्यायालयातील कामकाजासाठी प्राधिकृत भाषेचा दर्जा देण्याकरीता मा. उच्च न्यायालयाकडे पाठपुरावा करण्यात येईल.

८.३ 'बॉम्बे उच्च न्यायालयाचे' नामांतर 'मुबंई उच्च न्यायालय' करण्याकरिता केंद्र शासनाकडे पाठपुरावा करता येईल.

८.४ राज्यशासनाने दुय्यम न्यायालयांच्या कामकाजांची भाषा मराठी करण्यासाठी दि. २१ जुलै १९९८ रोजी काढलेल्या अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी मुबंई उच्च न्यायालय अंतर्गत स्थापन केलेल्या अंमलबजावणी समितीच्या पुनरुज्जीवनाची शिफारस मुबंई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींकडे करण्यात येईल.

**९) प्रशासनात मराठी भाषेचा वापर**

९.१ सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक संस्था, शासन महामंडळे, शासन अनुदानित कार्यालयांमध्ये अभ्यागतांशी व अभ्यागतांनी (परदेशस्थ व राज्याबाहेरील अमराठी व्यक्ती वगळता) मराठी भाषेमधून संभाषण करणे अनिवार्य असेल. तसेच मराठी भाषेचा वापर व मराठीमध्ये संभाषण करण्याबाबत कार्यालयांमध्ये दर्शनी भागात फलक लावणेही अनिवार्य असेल. याबाबतची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल.

वर नमूद कार्यालयांमध्ये मराठी भाषेमधून संभाषण न करणाऱ्याा शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्याबाबत संबंधित कार्यालय प्रमुख वा विभागप्रमुख याच्यांकडे तक्रार करता येईल. कार्यालय प्रमुख वा विभागप्रमुख

याबाबत पडताळणी करून तपासणीअंती संबंधित शासकीय अधिकारी/कर्मचारी दोषी आढळल्यास त्याच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करेल. तथापि, तक्रारदारास कार्यालय प्रमुख वा विभाग प्रमुख यांनी केलेली कार्यवाही सदोष वा समाधानकारक न वाटल्यास त्या संबंधी विधिमंडळाच्या मराठी भाषा समितीकडे अवाहन (अपील) करता येईल.

९.२ मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार व विकास याच्या अनुषंगाने विविध योजना, उपक्रम राबविणे, उपायायेजना करणे व आढावा घेणे याकरिता मा. मंत्री, मराठी भाषा यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठित करण्यात येईल. सदर समितीमध्ये राज्यमंत्री, मराठी भाषा हे सहअध्यक्ष, विभागाचे सचिवस्तरीय अधिकारी हे समितीचे सदस्य सचिव तसेच विभागाच्या अधिनस्त कार्यालयांचे अध्यक्ष हे पदसिद्ध सदस्य असतील. सदर समिती त्रैमासिक बैठक घेईल.

९.३ महाराष्ट्र राजभाषा अधिनियम,१९६४ अनुसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय कार्यालयांतील मूळ प्रस्ताव, सर्व पत्रव्यवहार, टिप्पण्या, आदेश, संदेशवहन मराठीतच असतील व कार्यालयीन स्तरावरील सर्व प्रकारची सादरीकरणे व संकेतस्थळे मराठीत असतील.

९.४ मराठी भाषा धोरणाच्या जिल्हा स्तरावरील अंमलबजावणीचे काम जिल्हास्तरीय मराठी भाषा समितीकडे सोपविण्यात येईल.

९.५ केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यतील केंद्र सरकारची सर्व कार्यालये तसेच सर्व बँका इत्यादींमध्ये दर्शनी भागात लावण्यात येणारे सूचनाफलक, अधिकाऱ्यांचे नामफलक, अर्ज नमुने मराठीतून असणे अनिवार्य कराण्यात येईल.

९.६ शासकीय आणि निमशासकीय आस्थापनांची तसेच महामंडळे, मंडळे शासन अंगीकृत उपक्रम, यांची शासनाने (मंत्रिमंडळाने) निश्चित केलेली मराठी नावेच आस्थापनांच्या कामकाजात वापरली जातील. नवीन नावे निश्चित करताना मराठीतील एकच नाव निश्चित केले जाईल. त्यांचे इंग्रजीत भाषांतर न करता रोमन लिपीत केवळ लिप्यंतर करण्यात येईल. ज्या आस्थापनांना द्विभाषिक नावे आहेत त्यांचा कारभार यापुढे मराठी नावाने होईल.

९.७ शासन अंगीकृत उपक्रमातील उद्योगांकडून माध्यमांना दिल्या जाणाऱ्या जाहिरातीमध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य असेल.

९.८ गृहनिर्माण, म्हाडा, सिडको, एमआयडीसी, एमपीसीबी, एमएसईबीच्या तीनही कंपन्या इत्यादींकडून केल्या जाणाऱ्या दस्तऐवजासह सर्व व्यवहार मराठी भाषेत प्राधान्याने होईल यासाठी मार्गदर्शक सूचना दिल्या जातील.

९.९ दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालयांमध्ये खाजगी गृहनिर्माण विकासकांनी ग्राहकांशी केलेले करारमदार तसेच, राज्यातील मालमत्ता खरेदी-विक्री करताना व्यक्ती/संस्था यांच्यामध्ये करण्यात येणारे खरेदी दस्त आदि दस्तऐवजांची मराठी किंवा इंग्रजी मराठी-इंग्रजी अशा द्वैभाषिक स्वरूपात नोंदणी अनिवार्य करण्यात येईल.

**१०) वित्त व उद्योगजगत**

१०.१ महाराष्ट्र राज्यातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीयीकृत व आंतरराज्यीय अधिकोषांचे (बँका) व वित्त संस्थांचे सर्व कामकाज त्रिभाषा सूत्रानुसार प्राधान्याने मराठी भाषेमधून करण्यासाठी संबंधित संस्थांकडे पाठपुरावा करण्यात येईल.

१०.२ महाराष्ट्रात विक्री केल्या जाणाऱ्या उत्पादनांसोबतची माहितीपत्रे, हमीपत्रे (Warranty/Guarantee) इत्यादी सर्व कागदपत्रे इंग्रजीसोबत मराठीत व देवनागरी लिपीत देण्याबाबत राज्यातील उद्योगांमध्ये प्रचार-प्रसार

करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

१०.३ मराठी भाषा, साहित्य, कला व संस्कृतीच्या विकासासाठी काम करणाऱ्या नवउद्यमी (स्टार्ट अप) कंपन्यांना विशेष अनुदाने तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये याबाबत संशोधन करणाऱ्या प्रयोगशाळांना प्रोत्साहन देण्यात येईल.

**११) प्रसारमाध्यमे** :

११.१ महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र शासन अंगीकृत कंपन्या, मंडळे, महामंडळे, निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, इत्यादींकडून मराठी वृत्तपत्रात दिल्या जाणाऱ्या सर्व जाहिराती, निविदा, सूचना इत्यादी मराठी भाषेतूनच दिल्या जातील.

११.२ जाहिरातीविषयक शासकीय धोरणाच्या निकषांत वृत्तपत्रे व अन्य माध्यमांची प्रतवारी (rating) ठरवताना इतर निकषांसोबत मराठी भाषेचा दर्जा व वापर यांचाही विचार केला जाईल.

**१२) मराठी ज्ञानभाषा म्हणून समृद्ध करण्यासाठीच्या उपाययोजना** :

१२.१ सर्व विद्यापीठांना इंग्रजीतून लिहिलेल्या प्रबंधाचा सारांश मराठीत करणे अनिवार्य करण्यात येईल.

१२.२ उच्च शिक्षण हे इंग्रजी सोबत मराठीत ऐच्छिक पर्याय म्हणून उपलब्ध करून दिले जाईल. त्यासाठी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके व संदर्भ ग्रंथ विद्यापीठांच्या सहभागाने खास मराठीमध्ये लिहून घेतली व विहित केली जातील.

१२.३ मराठी भाषेसंबंधी संशोधन करणाऱ्या संस्थांचा शोध घेऊन शासनातर्फे अनुदान देण्यात येईल.

**१३) मराठी रोजगाराची भाषा म्हणून विकसित करण्याच्या उपाययोजना** :

**भूमिका** : तांत्रिक व रोजगाराभिमुख शिक्षण, प्रशिक्षण, उद्योजकता विकास आणि तदनुषंगिक बाबी ज्या व जितक्या प्रमाणात मराठीतून होतील, त्या व तितक्या प्रमाणात मराठी ही रोजगाराची भाषा होईल. त्यासाठी पोषक अवकाश व पृष्ठभूमी निर्माण करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या जातील :–

१३.१ प्रत्येक मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या औद्योगिक कारखान्यात व इतर उद्योगात मनुष्यबळ विकास विभागात मनुष्यबळ विकास प्रमुख हा मराठी भाषेचे उत्तम ज्ञान असलेला अधिकारी असावा आणि कर्मचारी भरतीच्या वेळी इंग्रजीसोबत मराठीतून मुलाखत घेणे, अंतर्गत प्रशिक्षण द्विभाषिक स्वरूपात करणे आदि कार्यवाही उद्योगसमूह व कारखान्यांनी स्वेच्छेने करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

१३.२ प्रत्येक विद्यापीठामार्फत त्यांच्या परिक्षेत्रातील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्रांच्या गरजा लक्षात घेऊन योग्य तांत्रिक मनुष्यबळ पुरविण्यासाठी अभ्यासक्रमाचे आराखडे (मॉड्युल्स) बनविण्यात येतील व ते विद्यार्थ्यांना शिकवले जावेत यासाठी विशेष धोरण, आर्थिक मदत व कृतिकार्यक्रम आखण्यात येईल.

१३.३ वेगाने वाढणाऱ्या मनोरंजन, जाहिरात आणि वृत्त/बातमी क्षेत्रासाठी लागणारे मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी सर्जनशील स्वरूपाच्या पटकथा व टीव्ही मालिका लेखन, ललितेतर वृत्त व माहितीपट लेखन, आशय लेखन (कंटेंट रायटिंग), नाटयलेखन यांचे अल्प मुदतीचे अभ्यासक्रम महाराष्ट्रातील निवडक महाविद्यालयांमध्ये मराठी वा मराठी– इंग्रजी संमिश्र भाषेतून शिकवण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

१३.४ उच्च व तंत्र शिक्षण विभागाने स्थापन केलेल्या मराठी भाषा विद्यापीठाकडून मराठी ही ज्ञानभाषा व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करण्याकरिता विशेष प्रयत्न करण्यात येतील. हे विद्यापीठ महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई यांच्या मदतीने विविध ज्ञानशाखांच्या पाठ्यपुस्तकांची निर्मिती करेल.

१३.५ मराठी भाषेला ज्ञानभाषा म्हणून स्थापित करण्याबाबत येणाऱ्या अडचणींच्या समाधानाकरिता मराठी भाषा विभाग विशेषतः महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई सहकार्य करेल.

१३.६ राज्यातील सर्व प्रवासी वाहन चालकांकरिता वाहन परवाना मिळण्याकरिता मराठी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य असेल.

**१४) बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषा व संस्कृतीचे जतन आणि संवर्धन करणे.**

१४.१ बृहन्महाराष्ट्रात नियमितपणे प्रसिद्ध होणाऱ्या मराठी मासिकांना आर्थिक मदत, नियमित शासकीय जाहिराती, कार्यरत मराठी वाचनालयांना वर्ग एकचे अनुदान देणे, शासकीय पुस्तके ग्रंथालयास भेट देणे, या प्रांतात साहित्य संमेलने घेण्यासाठी बृहन्महाराष्ट्रात व खास करून कर्नाटक सीमाभागात दरवर्षी संपन्न होणाऱ्या साहित्य संमेलनासाठी तेथील संस्थांना वार्षिक आर्थिक अनुदान देणे अशा विविध उपाययोजनांद्वारे बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषा जिवंत ठेवण्यासाठी व वर्धिष्णू करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल.

१४.२ परदेशस्थ शाळांमध्ये मराठी भाषा शिकविण्याच्या अनुषंगाने बृहन्महाराष्ट्र मंडळांच्या मदतीने मराठी भाषेचा अभ्यासक्रम व प्रमाणपत्र राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून विहित करण्यात येईल.

१४.३ राज्याबाहेर व परदेशात महाराष्ट्रास अभिमानास्पद ठरतील अशा वस्तू, वास्तू व स्मारकांचे जतन, संवर्धन व आनुषंगिक बाबींसाठी शासनाकडून सर्वतोपरी मदत करण्यात येईल.

१४.४ बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या ग्रंथालयांना राज्य शासनातर्फे मदत करण्यात येईल.

१४.५ राज्याबाहेरील देशांतर्गत बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत संमेलने आयोजित करण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात येईल.

१४.६ परदेशातील बृहन्महाराष्ट्र मंडळामार्फत संमेलने आयोजित करण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात येईल.

१४.७ मराठीचा भाषेचा प्रचार, प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर परंतु देशांतर्गत मराठी युवक मंडळे स्थापन करणे व प्रत्येक युवक मंडळास कार्यक्रम/उपक्रम राबविण्यास अनुदान देण्यात येईल.

१४.८ मराठी भाषेच्या प्रचार, प्रसाराच्या अनुषंगाने नवी दिल्ली व गोवा येथे स्थापन केलेल्या महाराष्ट्र परिचय केंद्राच्या धर्तीवर बेळगाव, कर्नाटक येथे महाराष्ट्र परिचय केंद्र स्थापन करण्यासाठी व तेथे भाषिक उपक्रम राबविण्यासाठी अनुदान देण्यात येईल.

१४.९ मराठी भाषेचा प्रचार, प्रसार केवळ राज्यापुरता सिमित न राहता त्याच्या कक्षा राज्याबाहेर व परदेशात रुंदावण्यासाठी प्रतिवर्षी विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात येईल.

**१५) ग्रंथालय चळवळ बळकट करणे, ग्रंथालय धोरण आखणे व वाचन संस्कृती विकसित करणे.**

१५.१ ग्रंथालय संचालनालय हे सध्या उच्च तंत्र शिक्षण विभागाकडे आहे. ते मराठी भाषा विभागाकडे वर्ग करण्यात येईल.

१५.२ महाराष्ट्राचे स्वतंत्र ग्रंथालय धोरण एक तज्ज्ञ समिती नेमून ठरविण्यात येईल आणि त्या आधारे ग्रंथालय चळवळ बळकट व वाचन संस्कृती विकसित करण्यात येईल.

१५.३ राज्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालये डिजिटल ग्रंथालय (Digital Library) म्हणून विकसित करून त्यावर ई–वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल.

१५.४ शालेय ग्रंथालये समृद्ध करणे व विद्यार्थ्यांवर वाचन संस्कार करणे यासाठी एक विस्तृत शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाकडून काढण्यात येईल.

**१६) मोडी लिपीचे जतन व संवर्धन**

१६.१ मोडी लिपीतील दस्तऐवजांचे डिजिटायजेशन करण्याकरिता विशेष प्रयत्न करण्यात येतील.

१६.२ मोडी लिपीचे संशोधन करण्यास व लिप्यंतर करण्याकरिता आवश्यक तंत्रज्ञान विकसित करून मराठी भाषेमध्ये दस्तऐवज निर्माण करण्याकरिता शासनातर्फे मदत करण्यात येईल.

**१७) मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी वित्तीय तरतूद**

मराठी भाषा धोरणाच्या अंमलबजावणीसाठी संबंधित सर्व विभाग आवश्यकतेप्रमाणे निधी अर्थसंकल्पित करण्याची कार्यवाही करतील.

**१८)** मराठी भाषा धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत पुढील २५ वर्षांसाठीचे हे मराठी भाषा धोरण आहे, त्यात आवश्यकतेप्रमाणे वेळीच काही नवे उपक्रम समाविष्ट होऊ शकतात. त्यामुळे धोरणाचा कालबद्ध आढावा घेणे आवश्यक आहे.

१८.१ मा. मुख्यमंत्री मराठी भाषा धोरणाचा त्रैवार्षिक आढावा घेतील.

१८.२ मा. मंत्री, मराठी भाषा व मा. सचिव, मराठी भाषा विभाग सर्व विभागांच्या सचिवांची बैठक घेऊन धोरणाच्या अंमलबजावणीचा वार्षिक आढावा घेतील.

२) सदर धोरणातंर्गत असलेल्या विविध योजनांना संबंधित प्रशासकीय विभागामार्फत विहित पद्धतीने स्वतंत्र मान्यता घेणे तसेच निधी प्राप्त करून घेणे आवश्यक राहील. तसेच योजनांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीपूर्वी यथास्थिती/यथायोग्य बदल करणे आवश्यक राहील.

३) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील/अधिनस्त कार्यालयांना सदर धोरण अवगत करुन द्यावे व सदर धोरणातील त्यांच्याशी संबंधित शिफारसीसंदर्भात अंमलबजावणीच्या अनुषंगाने सूचित करावे.

४) सदर शासन निर्णय वित्त व नियोजन या विभागांनी त्यांच्या अनौपचारिक संदर्भ अनुक्रमे क्र.२०४/व्यय-४, दि. ०७.०३.२०२४ व अनौ.सं.क्र.१७४/का.१४४३, दि. ०७.०३.२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन आणि दि. १३ मार्च, २०२४ रोजीच्या मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

५) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या ... या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०३१४१२३२४२४०३३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(मनीषा पाटणकर-म्हैसकर)**
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल भवन, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५) मा. मंत्री, मराठी भाषा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/ विधानसभा, विधान भवन, मुंबई,
८) मा. अध्यक्ष/सदस्य, मराठी भाषा समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
९) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
१०) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
११) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
१२) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
१३) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
१४) प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
१५) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय मुंबई,
१६) अपर मुख्य सचिव, मराठी भाषा विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२०) अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती (व्दारा- भाषा संचालक, भाषा संचालनालय, मुंबई)
२१) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२) अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२३) अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२४) भाषा संचालक, भाषा संचालनालय, मुंबई
२५) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
२६) निवड नस्ती (भाषा -१).

❑❑❑

# २०. राज्य शाळा मानक प्राधिकरण

**राज्य शाळा मानक प्राधिकरण (State School Standards Authority - SSSA) स्थापन करण्यास मान्यता प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२४/प्र.क्र.०९/एसडी-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १५ मार्च, २०२४.

वाचा : **संचालक, राज्य शैक्षिणक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे पत्र क्र.राशैसंप्रप/संकीर्ण/SSSA/२०२४/४६७, दि.१९.०१.२०२४**

**प्रस्तावना :**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० मधील परि. ८ मध्ये शालेय शिक्षणासाठी मानक ठरविणे व अधिस्वीकृती याबाबत सविस्तर ऊहापोह करण्यात आला आहे.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० मधील परि. ८.१ खालीलप्रमाणे आहे.**

शैक्षणिक निष्पत्तीमध्ये सातत्याने सुधारणा करणे हे शालेय शिक्षण नियामक व्यवस्थेचे उद्दिष्ट असायला हवे; या व्यवस्थेमुळे शाळांवर अतिरिक्त बंधने लादली जाऊ नयेत, नावीन्यपूर्ण शोध लावण्यावर प्रतिबंध घातला जाऊ नये, किंवा शिक्षक, मुख्याध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या मनोबलाचे खच्चीकरण केले जाऊ नये. सर्व गोष्टींचा विचार करता, शाळा आणि शिक्षकांना उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करता यावा आणि आपले सर्वोत्कृष्ट काम करता यावे, यासाठी त्यांना विश्वासपूर्ण पद्धतीने सशक्त बनवणे, याबरोबरच पूर्ण पारदर्शकतेची अंमलबजावणी करणे आणि सर्व आर्थिक व्यवहार, प्रक्रिया आणि शैक्षणिक निष्पत्तीचे सार्वजनिक प्रकटीकरण करून व्यवस्थेची एकात्मता अबाधित राखणे, हे नियमनासमोरील उद्दिष्ट असावे.

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० मधील परि. ८.५ (C) खालीलप्रमाणे आहे.**

आवश्यक गुणवत्तेच्या मानकांचे अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी, पूर्वप्राथमिक शाळांसह शिक्षणाच्या सर्व स्तरांसाठी व खाजगी, सरकारी आणि देणगी आधारित शाळांसाठी एक प्रभावी गुणवत्ता स्वयं-नियमन किंवा अधिस्वीकृती प्रणाली स्थापन केली जाईल. सर्व शाळा काही किमान व्यावसायिक आणि गुणवत्तेच्या मानकांचे पालन करतील हे सुनिश्चित करण्यासाठी, राज्ये/केंद्रशासित प्रदेश राज्य शाळा मानक प्राधिकरण (SSSA) ही एक स्वतंत्र, राज्यव्यापी संस्था स्थापन करतील, SSSA मूलभूत निकषांच्या आधारे किमान मानकांचा संच (म्हणजेच, सुरक्षा, सुरक्षितता, मूलभूत पायाभूत सुविधा, विषयांसाठी आणि इयत्तांमधील शिक्षकांची संख्या, आर्थिक विश्वसनीयता आणि प्रशासनाच्या उत्तम प्रक्रिया) स्थापित करेल, ज्याचे पालन सर्व शाळा करतील. या निकषांसाठीचा आराखडा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) सर्व हितसंबंधींशी, विशेषतः शिक्षकांशी आणि शाळांशी सल्लामसलत करून बनवेल.

SSSA ने ठरवलेल्या सर्व मूलभूत नियामक माहितीच्या पारदर्शक, जाहीर सार्वजनिक स्वयं–प्रकटीकरणाचा सार्वजनिक देखरेखीसाठी आणि उत्तरदायित्वासाठी मोठ्या प्रमाणात वापर केला जाईल. माहितीचे स्वयं–प्रकटीकरण किती प्रमाणात आणि कोणत्या स्वरूपात केले जाईल, हे शाळांसाठी मानक – निश्चिती करण्याच्या जागतिक सर्वोत्तम पद्धतींच्या आधारे SSSA ठरवेल. SSSA द्वारा चालवल्या जाणाऱ्या उपरोक्त सार्वजनिक वेबसाईटवर आणि शाळांच्या वेबसाईटवर, ही माहिती सर्व शाळांना उपलब्ध करून द्यावी लागेल आणि ती अद्ययावत व अचूक स्वरूपात ठेवावी लागेल. सार्वजनिकपणे खुल्या केलेल्या या माहितीच्या आधारे, हितसंबंधींनी किंवा इतरांनी केलेल्या कोणत्याही तक्रारी किंवा गाऱ्हाणी यांबाबत SSSA द्वारे निर्णय घेतला जाईल. अत्यंत उपयुक्त सूचना मिळवण्यासाठी नियमित कालांतराने, स्वैरपणे निवडलेल्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अभिप्राय मागवला जाईल. SSSA च्या संपूर्ण कामकाजामध्ये कार्यक्षमता आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा योग्य वापर केला जाईल. यामुळे सध्या शाळांना देण्यात येत असलेल्या नियामक आदेशांचा भार लक्षणीयरीत्या कमी होईल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी 'सार्थक' ही पुस्तिका तयार करण्यात आली असून त्याद्वारे एकूण २९७ टास्क्स निश्चित करण्यात आले आहेत. त्यातील टास्क क्र. २१२ खालीलप्रमाणे आहे.

States / UTs will set up an independent, State-wide, body called the State School Standard Authority (SSSA). All States / UTs to have SSSA websites by 2023.

संदर्भाधीन पत्रान्वये राज्य शाळा मानक प्राधिकरण (SSSA) स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या कार्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० मधील तरतुदीनुसार तसेच 'सार्थक' पुस्तिकेतील टास्क क्र. २१२ च्या पूर्ततेसाठी खालीलप्रमाणे राज्य शाळा मानक प्राधिकरण (State School Standards Authority- SSSA) स्थापन करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**अ) प्राधिकरणाची संरचना** :

| अ. क्र. | सध्या धारण केलेले पद | प्राधिकरणातील पदनाम |
|---|---|---|
| १. | संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे | पदसिद्ध अध्यक्ष |
| २. | शिक्षण संचालक (प्राथमिक) | सदस्य |
| ३. | शिक्षण संचालक (माध्यमिक) | सदस्य |
| ४. | समग्र शिक्षा, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यातील सर्व विभाग प्रमुख | सदस्य |
| ६. | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील उप संचालक (समन्वय) | सदस्य सचिव |

**ब) प्राधिकरणासाठी आवश्यक मनुष्यबळ :**

| अ. क्र. | पदाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| १. | कार्यक्रम व्यवस्थापक | १ |
| २. | कार्यक्रम सहायक तथा माहिती विश्लेषक | २ |
| ३. | तांत्रिक सहायक | २ |
| | **एकूण** | **५** |

i) उपरोक्त पदांसाठी आवश्यक अर्हता व अनुभव तसेच त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्याचे व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्याचे अधिकार प्राधिकरणास असतील.

ii) उपरोक्त पदे प्राधान्याने उसनवार तत्त्वावर भरण्यात यावीत. सदर पदे बाह्ययंत्रणेद्वारे तात्पूरत्या स्वरूपात भरण्याची मुभा वित्त विभाग (आपुक कक्ष) व उच्च स्तर सचिव समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

**क) प्राधिकरणाची कार्यपद्धती व कार्ये :**

i) सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी विकसित करण्यात आलेल्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि अधिस्वीकृती आराखड्याची (SQAAF) प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सदर प्राधिकरणाची असेल.

ii) सदर प्राधिकरणाची स्वतंत्र वेबसाईट/वेब पोर्टल असेल यावर शाळांची नोंदणी, स्वयं मूल्यांकन, बाह्य मूल्यांकन, प्रशिक्षणासाठी गाभा मानकांसदर्भातील व्हिडीओ, गाभा मानके, दस्तऐवज, स्वयं आणि बाह्य मूल्यांकनाचे अहवाल, मूल्यांकन कालावधी इत्यादी माहिती तथा आनुषांगिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील.

iii) शाळांची गुणवत्ता निश्चित करण्यासाठी व त्यात वाढ करण्यासाठी विविध निकषांच्या आधारे मानकांची निश्चिती करण्यात आली आहे. या निकषांचे पालन राज्यातील सर्व शाळा करतील. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **प्रपत्र–अ** मध्ये याबाबतच्या सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

iv) राज्यातील सर्व शाळा प्राधिकरणाने तयार केलेल्या वेबसाईट/वेब पोर्टलवर स्वयं–मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण करतील.

v) प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर सर्व शाळांची नोंदणी व स्वयं–मूल्यांकन करून घेण्याची जबाबदारी प्राथमिक शाळांच्या व माध्यमिक शाळांच्या संदर्भात अनुक्रमे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील. शाळांना मूल्यांकनासंदर्भात तसेच शाळा विकास आराखडा निर्मिती संदर्भात गरजेनुसार मार्गदर्शन करण्याची जबाबदारी प्राचार्य, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था यांची असेल.

vi) बाह्य मूल्यांकन व त्रयस्थ पक्षाद्वारे केले जाणारे मूल्यांकन याचे एकूण शाळांची संख्या विचारात घेऊन वर्षनिहाय प्रमाण व त्याची वारंवारता ठरविण्याचे अधिकार शासनाच्या मान्यतेने प्राधिकरणास असतील.

vii) बाह्य मूल्यांकनसाठी व त्रयस्थ पक्षाद्वारे केल्या जाणाऱ्या मूल्यांकनासाठी निर्धारक/संस्था निवडण्याचे अधिकार प्राधिकरणास असतील. या निवडीसाठी निकष व निवडीची कार्यपद्धती याबाबत प्राधिकरणाच्या स्तरावर स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील. त्याचप्रमाणे निर्धारक/संस्था यासाठी आदर्श आचारसंहिता लागू करण्याचे अधिकार देखील प्राधिकरणास असतील.

viii) बाह्य मूल्यांकनानंतर/त्रयस्थ पक्षाद्वारे केल्या जाणाऱ्या मूल्यांकनानंतर मिळालेल्या श्रेणीचा शाळेच्या दर्शनी भागात अथवा शाळेच्या लेटरहेडवर उल्लेख करावा.

ix) बाह्य मूल्यांकनानंतर ज्या मानकांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे, अशा मानकांचा विकास आराखडा तयार करून तो पोर्टलवर अपलोड करणे शाळांना बंधनकारक राहील.

x) मूल्यांकनासंदर्भात काही तक्रार असल्यास शाळेला प्राधिकरणाकडे तक्रार दाखल करता येईल.

xi) प्राधिकरण स्वत:च्या कामकाजाचा राज्यस्तरीय/जिल्हानिहाय आढावा घेण्यासाठी ठरावीक कालावधीनंतर बैठकांचे आयोजन करेल.

xii) स्वयं मूल्याकन/बाह्य मूल्यांकन/त्रयस्थ पक्षाद्वारे केले जाणारे मूल्यांकन करताना खालीलप्रमाणे स्तरनिहाय गुणदान करून संबंधित शाळेची श्रेणी निश्चित करण्यात येईल.

| अ. क्र. | प्राप्त गुण | श्रेणी |
|---|---|---|
| १. | ९१ ते १०० टक्के | अ + |
| २. | ८१ ते ९० टक्के | अ |
| ३. | ७१ ते ८० टक्के | ब + |
| ४. | ६१ ते ७० टक्के | ब |
| ५. | ५१ ते ६० टक्के | क + |
| ६. | ५० टक्केपेक्षा कमी | क |

xiii) शाळांनी स्वयं मूल्यांकन करताना ते वस्तुस्थितीवर आधारित असले पाहिजे याची दक्षता घ्यावी. अवास्तव स्वयं – मूल्यांकन होणार नाही याची खबरदारी संबंधित मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीने घेणे आवश्यक राहील. स्वयं–मूल्यांकनानंतर यथास्थिती बाह्य मूल्यांकनात व त्रयस्थ पक्षाद्वारे केल्या जाणाऱ्या मूल्यांकनात १५% हून अधिक तफावत आढळल्यास संबंधित मुख्याध्यापकांवर याबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

**ड) वित्तीय तरतूद :**

वेब साईट/वेब पोर्टलची निर्मिती दुरुस्ती व देखभाल तसेच बाह्य स्रोताद्वारे घेण्यात आलेल्या मनुष्यबळाचे मानधन व निर्धारक/त्रयस्थ संस्था यांना अदा करावयाचे मानधन/शुल्क यासह इतर अनुषंगिक खर्च यथास्थिती SCERT अथवा 'समग्र शिक्षा' या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत अनुरुप बाबींसाठी करण्यात आलेल्या तरतुदीतून तूर्तास भागविण्यात यावा. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० च्या अंमलबजावणीसाठी ज्या घटकांवर खर्च होणे अनिवार्य आहे, त्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष व त्याअतर्गत वित्तीय तरतूद याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येत आहे. कालांतराने हा प्रस्तावांतर्गत खर्च या तरतुदीतून भागविता येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०३१५१५५२४६३०२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(तुषार महाजन)**
उप सचिव,, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. सभापती व मा. उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६. मा. अध्यक्ष व मा. उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
७. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, मुंबई.
८. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. विभागीय आयुक्त (सर्व)
१२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१३. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संचालनालय, पुणे
१४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१५. जिल्हाधिकारी सर्व
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
१७. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च-माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, राज्य, पुणे
१९. संचालक, महाराष्ट्र राज्य, पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे
२०. अध्यक्ष, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
२१. शिक्षण संचालक (योजना), पुणे
२२. सहसंचालक,(प्रशासन), शिक्षण आयुक्तालय, पुणे
२३. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२४. शिक्षण सहायक संचालक (सर्व)
२५. गटविकास अधिकारी (पंचायत समिती)(सर्व)
२६. मुख्याधिकारी, नगरपालिका, सर्व
२७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/योजना), जिल्हा परिषद (सर्व)
२८. गटशिक्षणाधिकारी (सर्व)
२९. विस्तार अधिकारी (शिक्षण)(सर्व)
३०. उपशिक्षणाधिकारी (सर्व)
३१. शिक्षण निरीक्षक (सर्व)
३२. प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
३३. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
३४. निवड नस्ती (कार्यासन-एसडी-६)..

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०२४/प्र.क्र.०९/एसडी–६, दि.      मार्च, २०२४ सोबतचे**

**प्रपत्र–अ**

१) शाळा मूल्यांकन दर्शक फलकावर आवश्यक असलेली सर्व क्षेत्रनिहाय, उपक्षेत्रनिहाय, मानकनिहाय माहिती संकलित करण्यात यावी.

२) संकलित केलेल्या माहितीच्या पुष्टीसाठी छायाचित्र, अभिलेखे, नोंदवही, उतारा, इतिवृत्त यांसारखे पुरावे संकलित करावे.

३) संकलित केलेल्या माहिती आणि पुराव्याच्या आधारावरच गाभामानके स्तर (वर्णन विधाने) निवडण्यात यावे निवडलेल्या वर्णन विधानाबाबत शाळेतील सर्व घटकांचे एकमत होणे आवश्यक आहे. त्यासाठी संकलित केलेली माहिती शाळा व्यवस्थापन समिती किंवा केंद्रप्रमुख यांच्याकडून प्रमाणित करून घ्यावी. त्यानंतरच सदर माहिती राज्य शाळा मानके प्राधिकरण वेब पोर्टलवर भरावी.

४) स्वयं मूल्यांकन पूर्ण केल्यानंतर स्वयं मूल्यांकन दर्शक फलकाची एक प्रत आपल्या दफ्तरी ठेवावी. शाळाबाह्य मूल्यांकन प्रसंगी ही प्रत निर्धारक यांना उपलब्ध करून द्यावी.

५) गाभा मानकेनिहाय आपल्या शाळेचा शालेय विकास आराखडा तयार करण्यात यावा. या शालेय विकास आराखड्यामध्ये अपेक्षित गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी करावयाचे उपक्रम आणि कृती कार्यक्रम कोणते याची नोंद करावी. गुणवत्ता प्राप्त करण्यासाठी उपक्रम आणि कृती कार्यक्रमाचे प्राधान्यक्रम नोंदविण्यात यावे.

**(तुषार महाजन)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

❑❑❑

# २१. संच मान्यता

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित, अंशत: अनुदानित इ. सर्व) नवीन शाळा सुरू करणे, वर्ग जोडणे त्याअनुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : एसएसएन २०१५/(प्र.क्र.१६/१५)/टीएनटी-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ मार्च, २०२४.

**वाचा :**
1. **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. एसएसएन २०१५/प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२, दि. २८.०८.२०१५**
2. **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. एसएसएन २०१५/प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२, दि. ०८.०१.२०१६**
3. **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. एसएसएन २०१५/प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२, दि. ०२.०७.२०१६**
4. **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. एसएसएन २०१५/प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२, दि. ०१.०१.२०१८**
5. **आयुक्त (शिक्षण) यांचा क्र. आशिका २०२२/संच मान्यता निकष/आस्था क्र. माध्य/४०४९, दि. ०७.०७.२०२२ चा प्रस्ताव.**

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या धर्तीवर महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तयार करण्यात आलेले आहेत. सदर नियम संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू असतील. सदर नियमातील कलम एक (m) नुसार नजिकची शाळा म्हणजे "neighbourhood school means a school in respect of children in classes I-V, a school shall be established as far as possible within a distance of 1 km of the neighbourhood and has a minimum of 20 children in the age group of 6 to 11 years available and willing for enrollment in that school and in classes VI to VIII, a school shall be established as far as possible within a distance of 3 km of the neighbourhood and which has not less than 20 children in class v$^{th}$ of the feeding primary schools, taken together, available and willing for enrollment in that school."

राज्यातील वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील जात, वर्ग, लिंग मर्यादा ओलांडून सर्व बालकांना मोफत शिक्षण मिळावे या हेतूने उपरोक्त नियम तयार करण्यात आलेले आहेत.

राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळांतील बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या अनुषंगाने सर्व व्यवस्थापनाच्या (स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, खाजगी, अनुदानित, अंशतः अनुदानित इ. सर्व) नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे त्या अनुषंगाने शाळांमधील संरचनात्मक बदल करणे आणि संचमान्यतेचे सुधारित निकष विहित करण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक १ अन्वये शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय दि. २८.०८.२०१५ निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये दि. ०८.०१.२०१६, दि. ०२.०७.२०१६ आणि दि. ०१.०१.२०१८ च्या शासन निर्णयानुसार आवश्यक त्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. तथापि सदर शासन निर्णयान्वये करण्यात येणाऱ्या पदनिश्चितीच्या प्रचलित निकषांमध्ये अधिक सुस्पष्टता आणण्याच्या अनुषंगाने, सर्व बाबींचा सर्वंकष विचार करण्याकरिता तत्कालीन अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांनी दि. ११.०८.२०२० रोजी दिलेल्या मान्यतेनुसार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकींमध्ये झालेल्या निर्णयानुसार मा. आयुक्त (शिक्षण) यांनी विविध शिक्षक संघटना आणि लोकप्रतिनिधी यांच्याशी संच मान्यता निकषाबाबत चर्चा केल्यानंतर दि. ०७.०७.२०२२ च्या पत्रान्वये संच मान्यता निकषाबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थी पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे निर्धारित करणे, नवीन शाळा सुरु करणे, वर्ग जोडणे, शाळांमध्ये संरचनात्मक बदल करणे इ. बाबत निकष विहीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थी पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे निर्धारित करणे, नवीन शाळा सुरू करणे, वर्ग जोडणे, शाळांमध्ये संरचनात्मक बदल करणे इ. बाबत संदर्भाधीन शासन निर्णय आणि या पूर्वी अस्तित्वात असलेले या आधीचे सर्व शासन निर्णय जे या निर्णयाशी विसंगत असतील ते अधिक्रमित करण्यात येत असून शासन आता पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे :

**शासन निर्णय :** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदी विचारात घेऊन राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे मंजूर करणे, एकाच वर्गात अधिक विद्यार्थी असल्यास शिक्षक पदे मंजूर करणे इत्यादीबाबतचे निकष पुढील प्रमाणे विहीत करण्यात येत आहेत :

**१. प्राथमिक शाळा : प्राथमिक व उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली ते ४/५वी, इ. १ ली ते ७/८ वी) :**

| अ.क्र. | शाळेचा प्रकार | गट | शाळेतील इयत्तेचा गट | विद्यार्थी संख्येचा गट | देय शिक्षक पद संख्या | देय पद मंजूर होण्यासाठी किमान आवश्यक विद्यार्थी संख्या | पूर्वीच्या मंजूर पदांस संरक्षण देण्यासाठी आवश्यक किमान विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ ते २० पटाच्या शाळांकरिता किमान १ शिक्षक तद्नंतर दुसऱ्या पदांवर सेवानिवृत्त शिक्षकांची आवश्यकतेप्रमाणे नियुक्ती. | | | |
| १. | प्राथमिक शाळा (इ.१ली ते ४/५वी) इ.१ली ते ७/८वी | इ.१ली ते ५वी | इ.१ली ते ५वी (किंवा यांपैकी कोणतीही इयत्ता) | २० ते ६० | २ | २० | २० |
| | | | | ६१ ते ९० | ३ | ७६ | ६१ |
| | | | | ९१ ते १२० | ४ | १०६ | ९१ |
| | | | | १२१ ते १५० | ५ | १३६ | १२१ |
| | | | | १५१ ते १८० | ६ | १६६ | १५१ |
| | | | | १८१ ते २१० | ७ | १९६ | १८१ |

| अ.क्र. | शाळेचा प्रकार | गट | शाळेतील इयत्तेचा गट | विद्यार्थी संख्येचा गट | देय शिक्षक पद संख्या | देय पद मंजूर होण्यासाठी किमान आवश्यक विद्यार्थी संख्या | पूर्वीच्या मंजूर पदांस संरक्षण देण्यासाठी आवश्यक किमान विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २१० विद्यार्थी संख्ये पर्यंत आरटीई निकषांनुसार प्रति ३० विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील | | |
| | | | | २११ ते २५० | ८ | २३१ | २१० |
| | | | | २१० च्या पुढे | २१० विद्यार्थी संख्येनंतर प्रति ४० विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील. | | |
| | | | कोणतीही एक इयत्ता असल्यास | १० ते ३५ | १ | १० | १० |
| | | | | ३५ ते ७० | २ | ५३ | ३६ |
| | | | | ७१ ते १०५ | ३ | ८८ | ७१ |
| | | | | १०५ च्या पुढे | ३५ विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील. | | |
| | | इयत्ता ६वी ते ८वी | कोणत्याही दोन इयत्ता असल्यास | २० ते ७० | २ | २० | २० |
| | | | | ७१ ते १०५ | ३ | ८८ | ७१ |
| | | | | १०५ च्या पुढे | प्रति ३५ विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील | | |
| | | | तीनही इयत्ता असल्यास | २० ते ६० पर्यंत | २ | २० | |
| | | | | ६१ ते १०५ | ३ | ७८ | |
| | | | | १०६ ते १४० | ४ | १२३ | |
| | | | | १४१ ते १७५ | ५ | १५८ | १४१ |
| | | | | १७५ च्या पुढे | प्रति ३५ विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील | | |

१.१ इयत्ता १ली ते ५वी या गटामध्ये विद्यार्थी संख्येच्या गटासाठी आरटीईच्या निकषानुसार आवश्यक असलेल्या ३० विद्यार्थी संख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थी म्हणजेच (१५+१) १६ विद्यार्थी असल्यास पुढील पद देय होईल.

१.२. इयत्ता १ ते ५ वी गटामध्ये विद्यार्थी संख्येच्या गटापेक्षा विद्यार्थी संख्या कमी झाल्यास संरक्षित असलेले पद कमी होईल.

१.३ इयत्ता १ ली ते ५ वी या गटातील २१० पेक्षा जास्त विद्यार्थी असल्यास देय पदांची गणना करताना २१० विद्यार्थ्यांपर्यंत ७ शिक्षक व त्यावरील (म्हणजेच २१० च्या पुढील विद्यार्थी संख्येनंतर) प्रति ४० विद्यार्थी संख्येवर १ पद देय होईल.

१.४ इयत्ता ६वी ते ८ वी गटामध्ये आरटीईच्या निकषानुसार आवश्यक असलेल्या ३५ विद्यार्थी संख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थी म्हणजेच (१७+१) १८ विद्यार्थी असल्यास पुढील पद देय होईल.

१.५ इयत्ता ६वी ते ८ वी च्या गटामध्ये नव्याने पद मंजूर होण्यासाठी तक्त्यामध्ये नमूद किमान विद्यार्थी संख्या आवश्यक राहील.

१.६ इयत्ता ६वी ते ८ वी च्या गटामध्ये मंजूर असलेले पद विद्यार्थी संख्येच्या गटापेक्षा विद्यार्थी संख्या कमी झाल्यास संरक्षित असलेले पद कमी होईल.

१.७ संबंधित व्यवस्थापनाने प्रत्यक्ष शिक्षक उपलब्ध करून देताना इयत्ता ६ वी ते ८ वी या गटासाठी मंजूर शिक्षक संख्येच्या मर्यादेत विषयनिहाय येणारा कार्यभार विचारात घ्यावा.

## १. मुख्याध्यापक पदे (प्राथमिक व उच्च प्राथमिक) (इ.१ली ते ४/५वी किंवा इ. १ली ते ७/८ वी)

| अ.क्र. | पद | गट | पट संख्येचा निकष | देय पदे | पूर्वीच्या मंजूर पदांस संरक्षण देण्यासाठी आवश्यक किमान विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुख्याध्यापक | इ.१ ली ते ४/५ | १५० | १ | १३५ |
| २. | मुख्याध्यापक | इ.१ली ते ७/८ | १५० | १ | १३५ |

२.१ उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पटसंख्या असल्यास स्वतंत्र मुख्याध्यापक पद मंजूर होईल.

## ३. माध्यमिक शाळा (गट इ. १ ली ते ५ वी/गट इ. ६वी ते ८ वी/गट इ. ९वी ते १०वी)

| अ.क्र. | शाळेचा प्रकार | गट | शाळेतील इयत्तेचा गट | विद्यार्थी संख्येचा गट | देय शिक्षक पद संख्या | देय पद मंजूर होण्यासाठी किमान आवश्यक विद्यार्थी संख्या | ४० पूर्वीच्या मंजूर पदांस संरक्षण देण्यासाठी आवश्यक किमान विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्राथमिक शाळा (इ.१ली ते ४/५वी) इ.८वी ते १०वी) | इ.१ली ते ५वी | इ.१ली ते ५वी (किंवा यांपैकी कोणतीही इयत्ता) | २० ते ३० | १ | २० | २० |
| | | | | ३१ ते ६० | २ | ४६ | ३१ |
| | | | | ६१ ते ९० | ३ | ७६ | ६१ |
| | | | | ९१ ते १२० | ४ | १०६ | ९१ |
| | | | | १२१ ते १५० | ५ | १३६ | १२१ |
| | | | | १५१ ते १८० | ६ | १६६ | १५१ |
| | | | | १८१ ते २१० | ७ | १९६ | १८१ |
| | | | | २१० विद्यार्थी संख्येनंतर प्रति ३० विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील | | | |
| | | | | २११ ते २५० | ८ | २३१ | २१० |
| | | | | २१० विद्यार्थी संख्येनंतर प्रति ४० विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील | | | |
| | | | कोणतीही एक इयत्ता असल्यास | २० ते ३५ | १ | २० | २० |
| | | | | ३६ ते ७० | २ | ५३ | ३६ |
| | | | | ७ ते १०५ | ३ | ८८ | ७१ |
| | | | | १०५ च्या पुढे | प्रति ३५ विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील | | |
| | | इयत्ता ६वी ते ८वी | कोणत्याही दोन इयत्ता असल्यास | ४० ते ७० | २ | ४० | ४० |
| | | | | ७१ ते १०५ | ३ | ८८ | ७१ |
| | | | | १०५ च्या पुढे | प्रति ३५ विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील | | |
| | | | तीनही इयत्ता असल्यास | ६० ते १०५ | ३ | ६० | ६० |
| | | | | १०६ ते १४० | ४ | १२३ | १०६ |
| | | | | १४१ ते १७५ | ५ | १५८ | १४१ |
| | | | | १७५ च्या पुढे | प्रति ३५ विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील | | |

| अ.क्र. | शाळेचा प्रकार | गट | शाळेतील इयत्तेचा गट | विद्यार्थी संख्येचा गट | देय शिक्षक पद संख्या | देय पद मंजूर होण्यासाठी किमान आवश्यक विद्यार्थी संख्या | ४० पूर्वीच्या मंजूर पदांस संरक्षण देण्यासाठी आवश्यक किमान विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शाळेत कोणतीही एक इयत्ता असल्यास | २० ते ६० | १ | २० | २० |
| | | | | ६१ ते १०० | २ | ८१ | ६१ |
| | | | | १०१ ते १४० | ३ | १२१ | १०१ |
| | | | | १४१ ते १८० | ४ | १६१ | १४१ |
| | | | | १८१ ते २२० | ५ | २०१ | १८१ |
| | | इयत्ता ९वी ते १०वी | दोनही इयत्ता व प्रत्येक इयत्तेत किमान २० विद्यार्थी असल्यास | ४० ते १०० पर्यंत | ३ | ४० | ४० |
| | | | | १०१ ते १४० | ४ | १२१ | १०१ |
| | | | | १४१ ते १८० | ५ | १६१ | १४१ |
| | | | | १८१ ते २२० | ६ | २०१ | १८१ |
| | | | | २२१ च्या पुढे | प्रति ४० विद्यार्थ्यांमागे १ पद देय राहील | | |

३.१ इयत्ता १ ली ते ५ वीसाठी च्या विद्यार्थी संख्येच्या गटासाठी आरटीईच्या निकषानुसार आवश्यक असलेल्या ३० विद्यार्थी संख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थी म्हणजेच (१५+१) १६ विद्यार्थी असल्यास पुढील पद देय होईल.

३.२ विद्यार्थी संख्येच्या गटापेक्षा संख्या कमी झाल्यास संरक्षित असलेले पद कमी होईल.

३.३ इयत्ता १ली ते इयत्ता ५ वी गटात २१० पेक्षा जास्त विद्यार्थीसंख्या असल्यास देय पदांची गणना करतांना २१० विद्यार्थ्यापर्यंत ७ शिक्षक व त्यावरील (२१० नंतरचे विद्यार्थी) प्रति ४० विद्यार्थी संख्येवर पदे देय होतील.

३.४ इयत्ता ६वी ते ८वी गटामध्ये आरटीईच्या निकषानुसार आवश्यक असलेल्या ३५ विद्यार्थी संख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थी म्हणजेच (१७+१) १८ विद्यार्थी असल्यास पुढील पद देय होईल.

३.५ इयत्ता ६ वी ते ८ च्या गटामध्ये नव्याने पदे मंजूर होण्यासाठी तक्त्यामध्ये नमूद किमान विद्यार्थी संख्या आवश्यक राहील.

३.६ विद्यार्थी संख्येच्या गटापेक्षा विद्यार्थी संख्या कमी झाल्यास संरक्षित असलेले पद कमी होईल.

३.७ इयत्ता ९ वी ते इयत्ता १० वी या गटामध्ये २२० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्यास पुढील नवीन पद देय होण्यासाठी गटासाठी आवश्यक असलेल्या ४० विद्यार्थी संख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त विद्यार्थी म्हणजेच किमान २१ असल्यास पुढील पद देय होईल.

३.८ संबंधित व्यवस्थापनाने प्रत्यक्ष शिक्षक उपलब्ध करुन देतांना इयत्ता ६ वी ते इ. ८ वी या गटासाठी मंजूर शिक्षक संख्येच्या मर्यादेत विषयनिहाय येणारा कार्यभार विचारात घ्यावा.

**४. मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक पदे माध्यमिक शाळा**

| अ.क्र. | शाळा प्रकार | पद | विद्यार्थी संख्या/शिक्षक पद संख्या | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | इ. १/५ ली ते इ. १०वी<br>इ. १/५ ली ते इ. १२ वी<br>आणि<br>इ. ८ वी ते इ. १० वी<br>इ. ८ वी ते इ. १२ वी | मुख्याध्यापक | १५० किमान विद्यार्थी संख्या | १ |
| २. | | उपमुख्याध्यापक | ३१ शिक्षक पद संख्या | १ |
| ३. | | पर्यवेक्षक | १६–४६ शिक्षक पद संख्या | १ |
| ४. | | पर्यवेक्षक | ४६–६० शिक्षक पद संख्या | २ |
| ५. | | पर्यवेक्षक | ६१ शिक्षक पद संख्येच्या पुढे | ३ |

४.१ उक्त तक्त्यामधील निकषानुसार मुख्याध्यापकाचे पद अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना त्या त्या व्यवस्थापनाच्या अन्य शाळांमध्ये समायोजित करावे. पुणे जिल्ह्यात किंवा त्याच व्यवस्थापनाच्या कार्यक्षेत्रात मुख्याध्यापक अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना शिक्षकांच्या रिक्त पदामध्ये रिक्त जागेवर समायोजित करावे, परंतु त्यांना वेतन संरक्षण देण्यात यावे.

४.२ उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक ही पदे मंजूर होताना शाळेतील एकूण मंजूर शिक्षक (अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित या सह)विचारात घेण्यात येतील. पद कमी होत असल्यास उपमुख्याध्यापक /पर्यवेक्षक पदावर मान्यताप्राप्त कर्मचारी कार्यरत असल्यास त्याचे संस्थेअंतर्गत समायोजन होईल समायोजनासाठी पद रिक्त नसल्यास, सेवा निवृत्त होईपर्यंत सदर पदावर संरक्षण राहील.

**५. विशेष शिक्षक माध्यमिक शाळा :**

| अ.क्र. | शाळा प्रकार | विद्यार्थी संख्या | विशेष शिक्षक (क्रीडा) | विशेष शिक्षक (कला/संगीत | विशेष शिक्षक (कार्यानुभव/ आयसीटी) | एकूण विशेष शिक्षक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | (इ.१ली ते १० वी) | २५१ ते ५०० | १ पद | निरंक | निरंक | १ पद |
| | | ५०१ ते ७५० | १ पद | १ पद | १ पद | ३ पद |
| | | ७५१ ते १००० | २ पद | १ पद | १ पद | ४ पद |
| | | १००० ते १२५० | २ पद | २ पद | १ पद | ५ पद |
| | | १२५१ ते १५०० | ३ पद | २ पद | १ पद | ६ पद |
| | | १५०० व त्यापुढे | ३ पद | २ पद | २ पद | ७ पद |
| २. | | १५१ ते ५०० | १ पद | निरंक | निरंक | १ पद |
| | | ५०१ ते ७५० | १ पद | १ पद | १ पद | ३ पद |
| | | ७५१ ते १००० | २ पद | १ पद | १ पद | ४ पद |
| | | १००० ते १२५० | २ पद | २ पद | १ पद | ५ पद |
| | | १२५१ ते १५०० | ३ पद | २ पद | १ पद | ६ पद |
| | | १५०० व त्यापुढे | ३ पद | २ पद | २ पद | ७ पद |

५.१ शारीरिक शिक्षण या विषयासाठी शिक्षक नियुक्त करतांना पुर्णवेळ शिक्षकाच्या किमान ५० टक्के शारीरिक शिक्षण या विषयाचा कार्यभार आवश्यक राहील व अशा नियुक्त होणाऱ्या शिक्षकास उर्वरित कार्यभार त्यांच्या पदवी स्तरावरील अध्यापनाच्या विषयाच्या राहील. कार्यभार गणना करतांना शाळेतील इयत्ता ६ वी पासूनच्या पुढील सर्व इयत्ता विचारात घेण्यात येतील. नियुक्त करण्यात येणारा शिक्षक इयत्ता ९ वी ते १० वी या गटातील असेल.

५.२ कला शिक्षक, संगीत शिक्षक, कार्यानुभव शिक्षक इत्यादी विषय शिक्षकांचा नियुक्तीसाठी त्या त्या विषयाचा पूर्णवेळ कार्यभार येईल. त्यावेळी सदर पदावर नियुक्ती करता येईल. कार्यभार गणना करताना शाळेतील इ. ६ वी पासूनच्या पुढील सर्व इयत्ता विचारात घेण्यात येतील नियुक्त करण्यात येणारा शिक्षक इयत्ता ६ ते ८ वी गटातील असेल.

५.३ उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार ज्या शाळांना कार्यभारा अभावी विशेष शिक्षक मंजूर होणार नाहीत. अशा शाळांमध्ये नजिकच्या शाळांतील विशेष शिक्षक मॅपिंग करुन उपलब्ध करुन देण्यात येतील.

५.४ जिल्हापरिषद शाळांसाठी विशेष शिक्षकांच्या अनुषंगाने गट स्तरावर दोन CWSN (Children with special Needs) शिक्षक व केंद्रस्तरावर एक क्रीडा शिक्षक उपलब्ध करुन देण्यात येईल.

५.५ उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद अनुज्ञेय होणारी विशेष शिक्षकांची पदे राज्याच्या एकूण पायाभूत पदांच्या मर्यादेत मंजूर केली जातील.

## ६. १ ते २० पटसंख्या असणाऱ्या शाळांकरिता संच मान्यता :

६.१ १ संच मान्यता करतांना १ ते २० पटांकरिता प्रथम एकपद मान्य करावे. त्यामध्ये सर्व प्रथम ११ ते २० पटांकरिता किमान १ शिक्षक नियमित आणि तद्नंतर दुसऱ्या पदावर सेवानिवृत्त शिक्षकांची आवश्यकतेप्रमाणे नियुक्ती करण्यात यावी.

६.२ १ ते १० पटाच्या शाळेमध्ये आवश्यकतेप्रमाणे एक सेवानिवृत्त शिक्षक देण्यात यावा आणि सेवानिवृत्त शिक्षक उपलब्ध नसल्यास नियमित शिक्षक देण्यात यावा.

## ७. सर्व साधारण :

७.१ सरल प्रणालीतील केवळ आधार क्रमांक प्रमाणित असलेली दि. ३० सप्टेंबर रोजीची विद्यार्थी संख्या संच मान्यतेतील पद मंजूर करण्यासाठी विचारात घेतली जाईल. विद्यार्थी संख्येची माहिती शाळांनी १६ ऑगस्ट व शिक्षणाधिकारी व तत्सम सक्षम अधिकारी ३१ ऑगस्ट पर्यंत त्यांच्या स्तरावरील कार्यवाही पूर्ण करतील. संकेत स्थळावर संच मान्यतेची कार्यवाही पूर्ण करुन शिक्षणाधिकारी संच मान्यता शाळांना १५ ऑक्टोबर पर्यंत वितरीत करतील आणि १५ नोव्हेंबर पूर्वी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन पूर्ण करण्यात येईल.

७.२ शाळेत उपलब्ध असलेल्या वर्ग संख्येपेक्षा अधिक शिक्षक पदे मान्य होत असल्यास त्यानुसार शाळेस वर्ग खोल्यांची संख्या आव्यक आहे.

७.३ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २००९ मधील भाग तीन कलम ४(६) नुसार (क) इयत्ता पहिली ते पाचवी यामध्ये शिकणाऱ्या बालकांबाबत वस्ती नजीकच्या एक किलोमीटर एवढ्या चालत जाण्यायोग्य अंतराच्या आत व ६ ते ११ वर्षे वयोगटातील किमान २० बालके उपलब्ध असेल तेथे शाळा स्थापन केली जाईल.

७.४ इयत्ता सहावी ते आठवी यामध्ये शिकणाऱ्या बालकांबाबत, वस्तीनजीकच्या तीन किलोमीटर एवढ्या चालत जाण्यायोग्य अंतराच्या आत व इयत्ता ५ वी मध्ये किमान २० बालके उपलब्ध असतील तेथे शाळा स्थापन केली जाईल.

७.५ तुकडी व्यवस्था बंद करण्यात आल्यामुळे पुढील काळांमध्ये इयत्ता १ली ते ५वी, ६ वी ते ८वी किंवा ९ वी १० वी च्या शाळांना नैसर्गिक वाढ राहणार नाही.

८. शिक्षकांच्या समायोजनाबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय आणि महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतूदी आणि त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले प्रचलितनिकष कायम राहतील.

९. सदर शासन निर्णयानुसार सन २०२४-२५ पासूनच्या संचमान्यता करण्यात याव्यात.

१०. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२४०३१५१७२९१६०६२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(तुषार महाजन)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा. मंत्री (शालेय शिक्षण), यांचे स्वीय सहायक,
५) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक,
६) अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई मुंबई
११) सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य
१२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१६) सर्व शिक्षणाधिकारी माध्यमिक/प्राथमिक जिल्हा परिषद
१७) सर्व मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपरिषद
१८) सर्व प्रशासन अधिकारी नगर परिषद कटक मंडळे
१९) शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई
२०) निवडनस्ती (कार्यासन टीएनटी-२)

# २२. भारताचे संविधान

**महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार–अ. गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ३–९, २०२२/माघ १४–२०, शके १९४३**

**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २ फेब्रुवारी, २०२२

**अधिसूचना**

**भारताचे संविधान,**

क्र.टीआरएन–२०११/प्र.क्र.२८४/११/१२–अ. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे शासन सेवेतील गट अ, ब, क आणि ड मधील पदांसाठी कालबद्ध प्रशिक्षणाबाबत पुढील नियम करीत आहेत.

**१) संक्षिप्त शीर्षक :**

या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (कालबद्ध प्रशिक्षण) नियम, २०२२ असे संबोधण्यात यावे.

**२) व्याख्या :** या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर –

(ए) **'एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम'** याचा अर्थ महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेद्वारे सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या गट 'अ' आणि गट 'ब' च्या अधिकाऱ्यांकरिता शासनाने आयोजित केलेला संवर्गनिहाय एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम.

(बी) 'प्रमाणपत्र' याचा अर्थ शासकीय कर्मचाऱ्याने विहित प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबत संबंधित प्रशिक्षण संस्थेने दिलेले प्रमाणपत्र.

(सी) 'पायाभूत प्रशिक्षण' याचा अर्थ शासनसेवेत नियुक्तीपासून एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण करावयाचे, संबंधित विभागाचे कामकाज, सेवाशर्ती, प्रशासनिक, आस्थापना व वित्तीय बाबी इ. बाबतचे राज्य प्रशिक्षण धोरणानुसार विहित संवर्गनिहाय विस्तृत प्रशिक्षण.

(डी) 'शासन' याचा अर्थ महाराष्ट्र शासन.

(ई) 'शासकीय कर्मचारी' याचा अर्थ नागरी सेवेत कोणत्याही पदावर किंवा राज्य व्यवहाराशी संबंधित असलेल्या पदावर नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती असा असून यामधे, ज्या शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवा तात्पुरत्या स्वरूपात केंद्र शासन किंवा भारतातील अन्य कोणत्याही शासनाकडे किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या कंपनीकडे किंवा महामंडळाकडे अथवा स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाकडे सुपूर्द केलेल्या आहेत, मग त्यांचे वेतन राज्याच्या एकत्रित निधी व्यतिरिक्त अन्य मार्गाने काढले जात असले तरी त्याचाही समावेश होतो.

**स्पष्टीकरण :** ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन केंद्र/राज्य शासनाच्या एकत्रित निधीतून अदा केले जात नाही परंतु केंद्र/राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या साहाय्यक अनुदानामधून कायमस्वरूपी भागविले जाते किंवा ज्यांचे नियुक्ती प्राधिकारी राज्य शासन नाही असे कर्मचारी हे शासकीय कर्मचारी ठरत नाहीत.

(एफ) 'तोंड ओळख प्रशिक्षण' याचा अर्थ शासकीय धोरण किंवा अंतर्गत कार्यपद्धती किंवा अधिनियम किंवा नियम किंवा तंत्रज्ञान यामध्ये होणाऱ्या सुधारणा/बदल याविषयी शासकीय कर्मचाऱ्यांना अवगत करण्यासाठी वेळोवेळी द्यावयाचे प्रशिक्षण,

(जी) 'पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण' याचा अर्थ शासकीय कर्मचाऱ्यास पदोन्नतीनंतर देण्यात येणारे प्रशिक्षण,

(एच) 'बदलीनंतरचे प्रशिक्षण' याचा अर्थ बदली झाल्यानंतर जर नवीन पदाची कार्ये व कर्तव्ये पूर्णतः वेगळी असल्यास शासकीय कर्मचाऱ्यास देण्यात येणारे प्रशिक्षण,

(आय) 'उजळणी प्रशिक्षण' याचा अर्थ शासकीय कर्मचाऱ्याने मागील प्रत्येक सात वर्षांमध्ये नवीन विषयाची तोंडओळख व बदलीनंतरचे प्रशिक्षण वगळता राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत इतर कोणतेही प्रशासकीय प्रशिक्षण घेतले नसल्यास त्यांना द्यावयाचे आवश्यक प्रशासकीय प्रशिक्षण,

(जे) 'राज्य प्रशिक्षण धोरण' याचा अर्थ शासकीय कर्मचाऱ्यांना सेवेच्या विविध टप्प्यांवर विविध कालबद्ध प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेले धोरण,

(के) 'कालबद्ध प्रशिक्षण' याचा अर्थ शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शासकीय कर्मचाऱ्याने सेवेच्या विविध टप्प्यांवर ठरावीक कालावधीत अथवा ठरावीक कालावधीनंतर पूर्ण करावयाचे विविध प्रकारचे प्रशिक्षण,

(एल) 'प्रशिक्षण संस्था' याचा अर्थ, राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशासकीय प्रशिक्षण देण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे घोषित केलेली संस्था,

(एम) 'प्रशिक्षण कालावधी' याचा अर्थ राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत शासकीय कर्मचाऱ्याला द्यावयाच्या कालबद्ध प्रशिक्षणासाठी विहित केलेला कालावधी.

**३) कालबद्ध प्रशिक्षण पूर्ततेबाबत :**

**(१)** विविध शासकीय कार्यालयांतील किंवा विभागांतील शासन सेवेच्या पदांवरील नियुक्तीबाबत अस्तित्वात असलेले नियम, आदेश किंवा अनुदेश यामध्ये काहीही तरतूद असली तरीही राज्य प्रशिक्षण धोरणानुसार सेवेच्या विविध टप्प्यांवर विहित केलेले कालबद्ध प्रशिक्षण प्रत्येक शासकीय कर्मचारी विहित कालावधीत पूर्ण करून त्याबाबतचे प्रमाणपत्र त्याच्या संबंधित कार्यालयास सादर करेल.

**(२) शासकीय कर्मचारी पुढील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करेल :**

**(ए) पायाभूत प्रशिक्षण :** एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमातील समाविष्ट संवर्ग वगळून इतर विविध संवर्गातील शासकीय कर्मचारी त्याच्या नियुक्तीनंतर एक वर्ष कालावधी पूर्ण होण्यापूर्वी पायाभूत प्रशिक्षण पूर्ण करेल.

**(बी) पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण :** शासकीय कर्मचारी त्याच्या पदोन्नतीनंतर एक वर्षाच्या कालावधीत पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण पूर्ण करेल.

**(सी) उजळणी प्रशिक्षण** : पायाभूत प्रशिक्षण किंवा पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षणानंतर सात वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरच्या एक वर्ष कालावधीत शासकीय कर्मचारी त्याचे उजळणी प्रशिक्षण पूर्ण करेल. उजळणी प्रशिक्षणानंतर सात वर्षे कालावधी पूर्ण होईपर्यंत शासकीय कर्मचारी पदोन्नत न झाल्यास, त्यानंतरच्या एक वर्ष कालावधीत तो पुन्हा उजळणी प्रशिक्षण पूर्ण करेल.

**(डी) बदलीनंतरचे प्रशिक्षण** : बदलीनंतर कामाच्या स्वरूपामध्ये बदल होत असल्यास शासकीय कर्मचारी बदलीनंतरचे प्रशिक्षण पूर्ण करेल.

**(ई)** तोंडओळख प्रशिक्षण शासकीय धोरण किंवा अंतर्गत कार्यपद्धती किंवा अधिनियम किंवा नियम किंवा तंत्रज्ञान यामध्ये होणाऱ्या बदलांविषयी अवगत करण्याकरिता वेळोवळी आयोजित केलेले तोंडओळख प्रशिक्षण संबंधित शासकीय कर्मचारी पूर्ण करेल.

**४) कालबद्ध प्रशिक्षणाच्या आनुषंगिक इतर बाबी** :

(१) एखाद्या अपवादात्मक परिस्थितीमध्ये शासकीय कर्मचारी एखाद्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उपस्थित न राहिल्यास, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने त्याला लगतनंतरच्या प्रशिक्षणास उपस्थित राहण्याची परवानगी देता येईल.

**स्पष्टीकरण :** या नियमाच्या प्रयोजनार्थ अपवादात्मक परिस्थिती यामध्ये नैसर्गिक आपत्ती, निवडणूक, जनगणना कर्तव्यार्थ नेमणूक, कायदा व सुव्यवस्था स्थिती आणि शासकीय कर्मचाऱ्याच्या स्वतःच्या आरोग्यासंदर्भात आकस्मिक उद्भवलेले वैद्यकीय कारण इत्यादी बाबी अंतर्भूत राहतील.

(२) शासकीय कर्मचारी त्याच्या संपूर्ण प्रशिक्षण कालावधीमध्ये प्रशिक्षण संस्थेमध्ये उपस्थित राहील.

(३) कालबद्ध प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित शासकीय कर्मचारी, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय प्रशिक्षणास अनुपस्थित राहिल्यास त्याच्या सदर प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च त्याच्या वेतनातून कपात करून संबंधित संस्थेकडे अथवा शासनाकडे जमा करण्यात येईल. याकरिता प्रशिक्षण संस्था सदर अनुपस्थिती अहवाल पंधरा दिवसात संबंधित विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांना सादर करेल.

(४) इतर विभागात प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारा शासकीय कर्मचारीसुद्धा वेळोवेळी आयोजित पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण तसेच उजळणी प्रशिक्षण पूर्ण करेल.

(५) शासकीय कर्मचाऱ्याने वेळोवेळी पूर्ण केलेल्या कालबद्ध प्रशिक्षणाची नोंद त्याच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात येईल.

**५) कालबद्ध प्रशिक्षण पूर्ण न केल्यास होणारे परिणाम :**

(१) (ए) परिविक्षाधीन कालावधी बंधनकारक असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत पायाभूत प्रशिक्षण पूर्ण न केल्यास त्याचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यात येणार नाही आणि सदर प्रशिक्षण पूर्ण करेपर्यंत तो वार्षिक वेतनवाढीसाठी पात्र ठरणार नाही.

(बी) परिविक्षाधीन कालावधी बंधनकारक नसलेल्या शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत त्याचे पायाभूत प्रशिक्षण पूर्ण न केल्यास, सदर प्रशिक्षण पूर्ण करेपर्यंत तो वार्षिक वेतनवाढीसाठी पात्र ठरणार नाही.

(सी) कालबद्ध प्रशिक्षण पूर्ण करेपर्यंत शासकीय कर्मचारी सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना किंवा कार्यात्मक अथवा अकार्यात्मक पदोन्नतीच्या लाभासाठी पात्र ठरणार नाही.

(डी) शासकीय कर्मचाऱ्याने त्याच्या पदोन्नतीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण पूर्ण न केल्यास सदर प्रशिक्षण पूर्ण करेपर्यंत त्याची पुढील वार्षिक वेतनवाढ रोखण्यात येईल.

(ई) शासकीय कर्मचाऱ्याने उजळणी प्रशिक्षण पूर्ण न केल्यास, सदर प्रशिक्षण पूर्ण करेपर्यंत त्याची पुढील वार्षिक वेतनवाढ रोखण्यात येईल.

(२) शासकीय कर्मचाऱ्याने कालबद्ध प्रशिक्षण विहित कालावधीत पूर्ण न केल्यामुळे त्याची रोखलेली वेतनवाढ, त्याने सदर प्रशिक्षण पूर्ण केल्याच्या दिनांकास मुक्त करण्यात येईल आणि सदर वेतनवाढ जणू काही रोखलेली

नव्हती अशा रीतीने त्याचे वेतन निश्चित करण्यात येईल. मात्र सदर वेतनवाढीची थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

(३) संबंधित प्राधिकरणाने प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन न केल्यामुळे अथवा संबंधित विभागाने कार्यमुक्त न केल्यामुळे शासकीय कर्मचाऱ्याचे कालबद्ध प्रशिक्षण विहित कालावधीत पूर्ण झाले नाही, तर संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास उपरोक्त उपनियम (१) (ए) वगळून या नियमातील इतर परिणामातून सूट देण्यात येईल.

परंतु असे की अशी सूट केवळ दोन वेळा देता येईल आणि त्याबाबतची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात येईल.

**६) प्रशासकीय विभागाची जबाबदारी :**

(१) शासकीय कर्मचाऱ्यास विहित कालावधीत नामनिर्देशित करून, कार्यमुक्त करून, कालबद्ध प्रशिक्षणास पाठविण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभाग किंवा नियुक्ती प्राधिकारी यांची असेल.

(२) शासकीय कर्मचाऱ्याचे प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन न करणाऱ्या अथवा नामनिर्देशनानंतर कार्यमुक्त न करणाऱ्या अधिकारी किंवा विभाग प्रमुखांविरुद्ध शासनास कारवाई करता येईल.

**७) प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट :** सदर नियम अमलात आल्याच्या दिनांकापासून सेवानिवृत्तीस २ वर्षे शिल्लक असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास त्यापुढील प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबत प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यात येईल. तथापि अशा कर्मचाऱ्यास या कालावधीत प्रशिक्षण घ्यावयाचे असल्यास अथवा विभागास सदर कर्मचाऱ्यास प्रशिक्षण देणे आवश्यक वाटत असल्यास अशा कर्मचाऱ्याचे प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन करण्यात येईल.

**८) या नियमांच्या तरतुदी शिथिल करण्याचा अधिकार** : या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी. शासनास न्याय्य आणि सयुक्तिक वाटेल अशा परिस्थितीत एखादा शासकीय कर्मचारी अथवा संवर्गाच्या बाबतीत शिथिलतेची लेखी कारणे नोंदवून या नियमातील कोणत्याही तरतुदी शिथिल करता येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुजाता सौनिक**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

❑❑❑